श्री

# कुमावत क्षत्रिय जातीचा इतिहास.

# HISTORY

OF

# SHRI KUMAWAT KSHATRIYA CASTE.



गणपतराव भिवाजी वैताडे.

G. B. NAIK., M.A .H. S. ( Chicago U. S. A. )

ॐ

# आमची जात.



कूरक्षामावतधृता संज्ञेति ख्यातं महीम् ।
सूर्य्यवंशोद्भवं क्षितिष्वाद्याऽपि नः प्रस्थीयते ।

लेखक व प्रकाशकः

**गणपतराव भिवाजी बैताडे.**

**( जी. बी. नाईक. )**

सन १९१६.

आदरदर्शक नम्र भेट

COMPILER AND PUBLISHER:

**G. B. NAIK, M. A. H. S.**
(Chicago.)

PROPRIETOR OF

**G. B. NAIK & Co.**

BOMBAY AND POONA.

**Watch, Clock Specialists & Jewellers,**

*Gold Medalists & Holders of Several Diplomas.*

EDITORS AND PUBLISHERS
OF

**The Vyaparotejak** and **Hunnerotejak.**

AUTHORS OF

**The Value of Time &c. &c.**

HORNBY ROAD, SITARAM BUILDINGS,
BOMBAY.

*Registered under Act XXV of 1867 and all Rights Reserved by the Compiler.*

Printed by
G. N. Kulkarni, at the Karnatak Press
434, Thakurdwar,
BOMBAY.

नगर वाचनालय सातारा.

परमपूज्य, परमवंद्य व परमप्रिय मज्ज्ञातिबांधवांस

## अल्पसेवा समर्पण.

श्लोक ( **शार्दूलविक्रीडित.** )

**झालों काय कसा असें कवण मी कोठूनि आलों कधीं ।**
**ह्याचें उत्तर सांगण्यांत गढले लक्षानुलक्षावधी ॥**
**जातीही तुमची असे कवण हो! त्वद्धर्म तो कोणता ।**
**खालीं मान करी उगाच बसुनी लज्जेमुळें नेणता ॥ १ ॥**

श्लोक ( **स्रग्धरा.** )

**इंग्लदाचे क्रमानें भरभर कतिथी पूर्विंचे सर्व राजे ।**
**ठावे नाहींत आतां नविन पिढिस ह्या आपुले बाप आजे ॥**
**मज्जाती धर्म मोठा म्हणति किति आम्ही पाळितों एकनिष्ठ।**
**बाकीचे लोक चित्तीं सकल समजती हीन जाती कनिष्ठ॥२॥**
**अज्ञानें स्वाभिमानें बरळत सुटती काय उच्चस्वरानें ।**
**स्वत्त्वाच्या आढ्यतेनें फुकटच फुगती द्वेष कीं मत्सरानें ॥**
**ऐसा जो का चुकीचा दिसत समज तो व्हावया दूर जाण ।**
**वंशाची आपणाला उचित मिळविणें शृंखळा सप्रमाण ॥३॥**
**होतों प्राचीन कालीं कवण जन अम्ही जाहलों कोण अंशीं ।**
**गोत्राच्या लौकिकाचा पुरुष निपजला आमुच्या कोण वंशीं॥**
**स्वज्ञाती धर्म कर्मै घडति कसकशीं देवता कोण इष्ट ।**
**ही सारी माहिती मी बरिच मिळविली सोसुनि फार कष्ट॥४॥**

श्लोक ( **शार्दूलविक्रीडित.** )

**ऐसा हा इतिहास शक्य तितुका शोधोनि केला नवा ।**
**प्रेमें अर्पितसें नमूनि विनयें मज्ज्ञातिच्या बांधवां ॥**
**सेवा गोड करोनि घ्या सहृदयें अल्प प्रमादा सहा ।**
**प्रार्थी जोडुनि हात मी गणपती स्वज्ञातिचा दास हा ॥ ५ ॥**

No. 148 Presented to

Mr. The Native General Library of Satara Satara.

With the best Compliments by

G. B. Naik.

अर्पण पत्रिका

श्रीमान सकल गुणालंकृत

कुमावत क्षत्रिय जातगंगा

के

सौजन्य, प्रेम, आदरबुद्धि आदि गुणोंपर लुब्ध होकर
यह सचित्र लघु इतिहास सविनयपूर्वक
निवेदन करनेमें आनंद
मानता हूं.

आपका अनुग्रहित

गणेश भिवाजी चव्हान उर्फ बैताडे.

**विनयपूर्वक सूचनाः**—जो कोई महाशय कृपा करके इस इतिहासके बाबत भूलचूक दिखायंगे या कुछ उपयुक्त और जियादा खुलासा करेंगे उसका योग्य विचार बडे खुषीके साथ हिंदीमें छापनेके बखत अवश्य किया जायगा.

# प्रस्तावना.

जें जें कांहीं आपणांस ठावें। तें तें हळू हळू शिकवावें॥
शहाणे करून सोडावे॥ सकल जन॥ १॥ —श्रीरामदास.

प्रस्तुत ग्रंथ लिहिण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति होण्यास कसकसे प्रसंग येत गेले त्याचें येथें प्रथम दिग्दर्शन केलें असतां या ग्रंथाचें महत्व, उपयुक्तता व आवश्यकता किती मोठी आहे, तीं चांगली दिसून येणार आहे.

माझा शाळेंतील आवडता विषय ह्मटला ह्मणजे इतिहास हा होय; त्यामुळें मला लहानपणापासूनच इतिहास, पुराण व चरित्रें वाचण्याचा मोठा नाद असे, आणि मी आपली रिकामपणचीं बहुतेक वेळ ह्याच विषयांवरील पुस्तकें वाचण्यामध्यें घालवीत असें. त्यामुळें अर्थातच माझ्या मनांत आपल्या जातीसंबंधीं माहिती समजून घेण्याची विशेष जिज्ञासा उत्पन्न होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. ब्राह्मणेतर ज्ञातींपैकीं, बऱ्याच लोकांची आपली जात सांगण्याची अशी एक साधारण वहिवाट पडून गेली आहे कीं, त्यांच्यामध्यें जे कोणी नामांकित पुरुष होऊन गेले किंवा सध्या आहेत, त्यांच्या जातीचे आह्मी आहोंत, असें सांगत असतात. तद्वतच आमच्या जातींत ज्यांनीं उत्तम लौकिक संपादन केला आहे असे कै० श्री. नंदरामजी सुंदरजी कवलये नाईक आणि कै० श्री. रा. ब. भाऊसाहेब मनसारामजी धवारे नाईक यांच्या जातीचे आह्मी आहोंत, असें आमचे जातबंधु सांगत असतात.

मी सन १८७९ सालीं, कै० नंदरामजी नाईक यांना भेटण्यास गेलों होतों; त्यावेळीं मी त्यांना " आपली जात ही कोणत्या वर्णाची आहे? तिचें खरें नांव काय? आपलें मूळ ठिकाण कोणतें?" वगैरे अनेक प्रश्न विचारले. तेव्हां त्यांनीं मला असें उत्तर दिलें कीं, 'आपल्या जातीसंबंधानें अशा प्रकारचे प्रश्न विचारणारे आपल्या जातींत आपणच पहिले आहांत; आणि या गोष्टीचा मला परम संतोष वाटत आहे; इतकेंच नाहीं, पण मोठें कौतुक वाटत आहे. माझे वडील मला असें नेहमीं सांगत होते कीं, आपण क्षत्रियवर्णाचे आहोंत. आपला मूळ देश राजपुताना हा आहे. क्षत्रियांना पुढें रजपूत म्हणण्याचा प्रघात पडला. आपणांस कुमावत असें म्हणतात, त्याचा पुढें अपभ्रंश कुंभार असा झाला आहे. पण आपण कुंभाराचें कर्म आजपर्यंत कधींही केलें नाहीं. आपण गवंडी काम करीत असल्यामुळें आपली जात गवंडी या नांवानें प्रसिद्धीस आली आहे;

आणि याच जातीच्या नांवानें आपला एकंदर सर्व व्यवहार चालला आहे; यापेक्षां मला अधिक कांहीं माहिती नाहीं. सरकारानें पुण्यांतील जातींचा इतिहास शोधून लिहून काढण्याकरितां आणि तो पुढें **ग्याझिटीअर** पुस्तकांत छापून प्रसिद्ध करण्याकरितां जो एक कामदार नेमला होता, त्यालाही मी अशीच माहिती दिली होती. मी त्यांना दुसरा प्रश्न असा विचारला कीं, "आपल्या जातिसंबंधानें कांहीं लेख, आधार, वगैरे आहेत काय?" तेव्हां त्यांनीं "नाहीं" असेंच उत्तर दिलें. मी पुन्हा त्यांना असा प्रश्न केला कीं, "आपल्या जातीच्या आधाराविषयीं आपणांस शोध कसा लागावा?" तेव्हां त्यांनीं मला असें उत्तर दिलें कीं, "राजपुतान्याकडील **चारण भाट** आणि **वडवे** यांच्या चोपड्यावरून माहिती मिळण्याचा संभव आहे." मी त्यांना "कुमावत" या जातिवाचक शब्दाचा अर्थ काय आहे? असें विचारलें, तेव्हां ते ह्मणाले कीं, "मला कांहीं ठाऊक नाहीं." शेवटीं, ते मला असें म्हणाले कीं, "आपल्यासारख्या शोधक-बुद्धीच्या तरुणानें आपल्या जातीची सविस्तर माहिती लिहून ठेवल्यास फार उत्तम होणार आहे."

हिंदु जातिसंबंधीं शोध करणारें Ethnographical Survey of India या नांवचें कलकत्ता येथें जें मुख्य ऑफिस आहे त्याचे सुपरिंटेंडंट रा. ब. बाळकृष्ण आत्माराम ऊर्फ भाईसाहेब गुप्ते, बी. ए., हे आहेत; त्यांचा आणि माझा साधारण परिचय आहे. त्यांचेकडून मला असें एक पत्र आलें होतें कीं, "आम्हाला तुमच्या जातीसंबंधीं वगैरे माहिती सांपडत नाहीं; यासाठीं तुह्मांस कांहीं माहिती ठाऊक असल्यास ती इकडे पाठवून देण्याची मेहरबानी व्हावी."

माझे पुण्यांतील स्नेही रा. रा. त्रिंबकराव वासुदेव ऊर्फ तात्यासाहेब गुप्ते, वकील, Ethnographical Notes on Chandraseniya Kaysatha Prabhu या ग्रंथाचे कर्ते, हे नेहमीं मला असें ह्मणत असत कीं, "तुमची जात ही विद्येंत फारच मागसलेली आहे; आणि ती अज्ञानांधकारामध्यें पडलेली आहे. तिला पुढें आणण्याकरितां प्रयत्न न करणें ही मोठीच चूक होय. तुमची जात ही उद्योगधंद्यानें श्रीमान्, दानशूर आणि सुखी अशी आहे. तुमच्या ज्ञातीमध्यें मोठमोठे कंट्राक्टर आहेत, त्यांनीं गरिबांच्या होतकरू मुलांना मदत करून पुढें आणलें पाहिजे. तुमच्यामध्यें विद्या नसल्याकारणामुळें तुमचे लोक जातजेवणें घालण्यांत आणि शिमग्यांतील नाच, रंग, तमाशे करण्यांत आपल्या पैशाचा चुराडा उडवितात; असा त्यांचा लौकिक आहे. हा खर्च व्यर्थ, निरर्थक व अपात्रीं होत आहे. याचा विनियोग विद्यादानाकडे केल्यास तो सत्पात्रीं होणार आहे. ज्या जातीचा इतिहास नाहीं, त्या जातीस कधींही उन्नतावस्था प्राप्त होणार नाहीं. ती हीन दशेलाच पोंहचल्याचीं अनेक उदाहरणें आहेत. इतिहासाचा उपयोग जरी हल्लीं झाल्याचें दिसून येणार नाहीं, तरी

तो पुढील पिढीस चांगला उपयोगीं पडणार आहे. परमेश्वरकृपेनें आपणांस दोन्ही गोष्टींची चांगली अनुकूलता आहे. तुमची जात ही अज्ञानावस्थेंत असल्यामुळें तिची सुधारणा करण्याचें श्रेय आपण संपादन केल्यास तें कांहीं अनाठायीं होणार नाहीं."

कै. रा. श्रीकृष्ण चिंतामण चिटणवीस वकील आणि कै. रा. गोपाळ छोटीराम तेलपुरे गंवडी वकील यांनीं मला असें सांगितलें कीं, आपल्या एका जातीच्या गृहस्थावर एक दिवाणी मुकद्दमा झाला होता; त्या मुकद्दम्यांत त्याची दोन वेळां एकाच कोर्टांत जबानी झाली; त्या वेळीं त्यानें दोन्ही वेळां आपली जात निरनिराळी अशी सांगितली. त्या प्रसंगीं कोर्टांत हंशा उडून त्याच्या विरुद्ध निकाल झाला.

कै. गोपाळराव गवंडी हे आमच्या ज्ञातींतील पहिलेच वकील होते; यांनीं थोडक्याच दिवसांत आपल्या धंद्यामध्यें चांगला नांवलौकिक मिळविला होता. यांना आपल्या जातीचा मोठा अभिमान असे आणि तिची सुधारणा करण्याकडे त्यांचें विशेष लक्ष होतें; यांनीं मला असें ह्मटलें कीं, " आपण आपल्या आप्तांचें पालनपोषण करण्यांत आणि लग्नकार्यांत हजारों रुपये खर्च केले आहेत; आणि करीतही आहांत. तसेच दीड दोन हजार रुपये गेले असें समजून जातीचा इतिहास तयार केल्यास आपलें एक चिरस्मरणीय स्मारकच होणार आहे. "

मला आपल्या उद्योगधंद्यासंबंधानें आणि तीर्थयात्रेच्या निमित्तानें हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत प्रवास करावा लागत असे. मी ज्या ज्या गांवीं जात असें त्या त्या गांवीं मला आपल्या जातीविषयीं चौकशी करण्याची मोठी हौस असे. माझ्या जातीचे लोक एकाच गांवांत राहतात; आणि त्यांच्यामध्यें अन्नव्यवहार आणि कन्याव्यवहार होत असतो; परंतु ते आपल्या जातीचीं नांवें मात्र निरनिराळीं सांगतात; आणि इतर लोक त्यांना भलत्याच जातीचीं नांवें देतात. सूक्ष्मदृष्टीनें आणि शोधकबुद्धीनें प्रश्न विचारल्यास ते त्यांचीं अज्ञानमूलक उत्तरें देतात. सिंव्हास कोल्हा नांव दिल्यानें त्याची जशी विटंबना होते, तद्वत आह्मी खरे सिंव्ह (रजपूत) असून आमची कोल्ह्यांत (कुंभारांत) गणना होत आहे; यामुळें याचा परिणाम अत्यंत शोचनीय झाला असून पुढेंही अधिक होणार आहे, अशी माझ्या मनाची पूर्ण खात्री झाली.

आपल्या जातीचें मूळ ठिकाण, वंश, वर्ण, गोत्र, देवी, कुलाचार वगैरेसंबंधानें आजपर्यंत कोणीच शोध करण्याचा प्रयत्न केला नाहीं. अंधपरंपरेप्रमाणें स्थिति चालत आली आहे. आमच्या जातीचा इतिहास लिहिणें हें जितकें कठीण आणि खर्चाचें काम आहे, त्यापेक्षां तें विशेष जोखमीचेंही आहे. ह्मणूनच आजपर्यंत तें करण्यास कोणी धजलें [illegible]. आमच्या जातीची सत्य, साग्र व विश्वसनीय माहिती मिळविण्यासाठीं मी मो[illegible]या बक्षिसांच्या जाहिराती हिंदुस्थानांतील बहुतेक इंग्रजी, मराठी, गुजराथी

आणि हिंदी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध केल्या; पण त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं, तदनंतर मी निरनिराळ्या गांवीं राहणाऱ्या जातींतील प्रमुख पुढाऱ्यांस खाजगी-रीतीनें पत्रें लिहून जातिसंबंधानें माहिती कळविण्याची तसदी घ्या अशी त्यांना विनंति केली; परंतु त्यांच्यापैकीं तर पुष्कळांकडून पत्र पावल्याचें उत्तरहि पाठविण्याची तसदी घेतली गेली नाहीं. उलट टीका करूं लागले, अर्थातच त्यांच्याकडून माहिती कितपत मिळणार, हें उघडच दिसत आहे. अशी सर्वप्रकारें निराशा उत्पन्न करणारी स्थिति अनुभवास आली ; परंतु त्यांतल्यांत्यांत समाधान मानण्याजोगी गोष्ट ह्मटली ह्मणजे ही आहे कीं, कांहीं सद्गृहस्थांनीं आपणांस माहिती नाहीं असें प्रांजलपणें कळवून आपला उद्योग अत्यंत स्तुत्य, प्रशंसनीय व अभिनंदनीय आहे; आणि या सत्कार्यी आपणांस पूर्ण यश मिळो, अशी आपली सदिच्छा प्रदर्शित करून मला मोठें प्रोत्साहन दिलें. अशा प्रकारचीं जातीच्या शुभेच्छु गृहस्थांकडून मला पत्रें आलीं आहेत, तीं जर सर्व छापलीं तर एक लहानसा ग्रंथच होणार आहे. यासाठीं तीं कोठकोठून आलीं, आणि त्यांतील सारांश कळविला असतां आपल्या जातीच्या इतिहासाची किती मोठी जरूर आहे, ती चांगली दिसून येणार आहे.

जयपुर, दिल्ली, लाहोर, अजमीर, जोधपूर, उदेपूर, ब्यावर, आग्रा, वडनगर, इंदूर, ग्वाल्हेर, अलाहाबाद, नागपूर, अमरावती, जालना, औरंगाबाद, हैद्राबाद, कांग्रा, रतलाम, निमच, पुणें वगैरे ठिकाणच्या आमच्या ज्ञातींतील प्रमुख पुढाऱ्यांनीं मला असें लिहून कळविलें आहे कीं, " जे स्तुतिपाठक असतात ते स्तुति करितात; आणि जे निंदक असतात ते निंदा करीत सुटतात; अशी जरी वास्तविक स्थिति आहे, तथापि सज्ज-नांचा धर्म असा आहे कीं, जें उत्तम आहे त्याचा स्वीकार करावा; आणि जें वाईट आहे त्याचा त्याग करावा. हें सर्वमान्य व अत्यंत ग्राह्य तत्त्व आहे. या न्यायानें स्तुति हीं कांहीं प्रसंगीं अयोग्य अशी ठरत नाहीं. आह्मी आपली जितकी स्तुति करावी तितकी थोडीच होणार आहे. जर प्रसंगानुसार आह्मांस एकमेकांस भेटण्याचा प्रसंग प्राप्त झाला तर निरनिराळ्या ठिकाणीं जातींचीं नांवें निरनिराळीं सांगतात. आह्मी श्रेष्ठवर्णां-तील असून आह्मी कोण हें आधारयुक्त सांगण्यास आमच्याजवळ कोणत्याच प्रकारचें साधन नसल्यामुळें अन्य वर्णीय लोक आह्मांस खुशाल शूद्रवत् समजतात; आणि आह्मांसही तें आमच्या अज्ञानामुळें निमूटपणें ऐकून घ्यावें लाग आहे. ही स्थिति दूर करण्यास आपल्या जातीचा खरा इतिहास प्रसिद्ध झाला पाहिजे. जें काम आपण स्वीकारलें आहे, तें परम स्तुत्य आणि अत्यंत प्रशंसनीय आहे. या आपल्या अपुर्व धाडसाची जितकी प्रशंसा करावी तितकी थोडीच होणार आहे. आपण या जातींत जन्मास येऊन आपले जातबंधु, ज्यांना आपल्या जातीची खरी ओळख नाहीं आणि जे त्यासंबंधानें अज्ञानांधकारामध्यें पडले आहेत, त्यांना आपल्या जातीची खरी

ओळख करून देऊन त्यांचा अज्ञानांधकार घालवून त्यांना जातीचा खऱ्या ज्ञानाचा प्रकाश प्राप्त करून देणार आहांत, ही जी आपण ज्ञातीची केवळ निरपेक्षबुद्धीनें तन, मन, धनपूर्वक सेवा करण्याचा संकल्प केला आहे, तिला सेवा हें साधारण नांव शोभत नाहीं; पण ज्ञातीचा उद्धार केला असें ह्मणणें हेंच योग्य नांव शोभणार आहे. आपल्या ज्ञातींत पुष्कळ दानशूर पुरुष होऊन गेले; त्यांनीं हजारों रुपये खर्च करून नवीन देवालयें बांधलीं, जुनाट देवालयांचा जिर्णोद्धार केला, सभामंडप तलाव, धर्मशाळा, विहिरी वगैरे बांधून आपली औदार्यबुद्धी प्रगट केली आणि आपलें चिरकालिक स्मारक करून ठेवलें आहे. त्यामुळें ते बहुजनाच्या स्तुतीस पात्र झाले आहेत, आणखी, ते जातीस भूषणावहही झाले आहेत. आपण जातीचा इतिहास लिहिण्याचें मोठया खर्चाचें, बुद्धीचें आणि ज्ञानाचें काम स्वीकारलें आहे, तें वरील कामापेक्षांहि अधिक उपयुक्त व महत्वाचें ठरल्यावांचून राहाणार नाहीं; आणि आपणांस ज्ञातीचा उद्धार केल्याचें श्रेय प्राप्त होणार आहे. आपल्या या परोपकाराच्या कृतीबद्दल आह्मी तर आपले ऋणी आहोंतच; परंतु आपली भावी पिढी ही देखील ऋणी होणार आहे; आणि तीही आपली ऋणी आहे, असें कृतज्ञबुद्धिपूर्वक कबूल केल्यावांचून कदापि राहवणार नाहीं. या इतिहासांतील अपूर्व शोधाची वास्तविक किंमत व योग्यता सध्याच्या पिढीस जरी कळणार नाहीं, किंवा कळत असूनही न कळल्या सारखे दाखवितील तथापि पुढील पिढी या अपूर्व शोधाची खरी खरी योग्यता जाणल्यावांचून राहणार नाहीं. इतकेंच नाहीं, तर हा इतिहास इतर जातींसही पुष्कळ उपयोगी पडण्याचा संभव आहे. आपल्या या पुस्तकास **इतिहास** ह्मणण्यापेक्षां आपला हा जातीचा **परमपूज्य ग्रंथ** समजला जाईल. आज आमच्या ज्ञातीची स्थिति डबक्यांतील किंवा विहिरींतील बेडकाप्रमाणें झाली आहे; त्या बेडकाला तें डबकें किंवा विहिर इतकेंच कायतें जग आहे असें वाटत असतें; कारण त्याला सागराचें दर्शन झालेलें नसतें; तद्वतच आपल्या जातीचा किती विस्तार झाला आहे, आणि या भरतखंडांत आपली किती मोठी जात पसरली आहे याची बहुजनसमाजाला माहिती नसल्यामुळें जी इकडे थोडी जात आपल्या दृष्टीस पडते तितकीच कायती आपली जात असा त्यांचा ग्रह होणें अगदीं स्वाभाविक आहे; परंतु तुमच्या इतिहासाच्या द्वारें आपल्या जातीचें विराट स्वरूप प्रगट होणार आहे, ह्मणजे आपली जात कोठपर्यंत पसरली आहे, हें कळण्यास उत्तम साधन व मार्ग होणार आहे आणि एकमेकांबरोबर दळणवळण ठेवण्याचा मार्गही सुलभ करून दिल्यासारखें होणार आहे. आपण स्वतः आपल्या जातीचा इतिहास लिहीत आहांत, हें ऐकून आह्मांस जो आनंद झाला आहे त्याचें आह्मांला वर्णन करतां येत नाहीं, इतका तो थोर व अवर्णनीय आहे. श्रीहरी आपणास उदंड आयुष्य देवो; आणि आपण या उतार वयामध्यें

इतकें थोर कार्य कोणाचीहि कोणत्याहि प्रकारची मदत नसतां हातीं घेतलें आहे, तें निर्विघ्नपणें सिद्धीस जावो. आपणास पूर्ण यश प्राप्त होवो. श्रीरामदासानें म्हटलें आहे कीं, **मरावें परी कीर्तिरूपें उरावें,** त्याप्रमाणें आपली या ग्रंथरूपानें Literature (वाङ्मय) मध्यें कीर्ति अमर राहणार आहे. आपण जर आपला इतिहास हिंदींत तयार केला असता तर तो सर्वोपयोगी झाला असता. आणखी आमची आपणाजवळ अशी आग्रहपूर्वक सूचना आहे कीं, जे लोक गरीब स्थितींतून आपल्या उद्योगाच्या बलावर पुढें आलेले असतात त्यांचें चरित्र होतकरू मंडळीस उपदेश घेण्यासारखें असतें, असा सर्वत्र अनुभव आहे. त्याप्रमाणें आपणही गरीब स्थितींतून स्वपराक्रमानें पुढें आलेले आहांत. आपलें सचित्र चरित्र जरी युरोपांतील अनेक ठिकाणच्या सुप्रसिद्ध मासिकांमध्यें प्रसिद्ध झालें आहे; तथापि निव्वळ मराठी वाचकांस त्याचा उपयोग होत नाहीं; यासाठीं मराठींत लिहिल्यास तें आपल्या जातबंधूंस वाचावयास मिळेल. आपल्या जातीचा इतिहासाबरोबर आपलें चरित्र प्रसिद्ध केल्यास तेंही विशेष उपयुक्त, बोधपर व अनुकरणीय होणार आहे. या आमच्या नम्र पण प्रेमळ सूचनेचा अनादर आपणाकडून होऊं नये अशी विनंति आहे. ”

अशा प्रकारचीं स्तुतीनें ओतप्रोत भरलेलीं पत्रें आलीं. माझ्या संबंधानें त्यांची इतकी प्रेम व आदरबुद्धि झाली आहे, तीस मी मुळींच पात्र नाहीं; असें मी प्रांजलपणें येथें कबूल करतो; आणि मी त्यांच्या थोरपणाबद्दल त्यांचें नम्रतापूर्वक उपकार मानतों. जयपूर, अजमीर, निमच, इंदूर, ग्वालेर, आग्रा, दिल्ली, लखनौ, बनारस, अलाहाबाद वगैरे दूरदूरच्या भागांतील लोकांना जातीच्या इतिहासासंबंधानें इतका आनंद व्हावा आणि त्यांनीं तो केव्हां बाहेर पडेल याची चातकाप्रमाणें मार्गप्रतिक्षा करीत बसावें. परंतु येथील अगदीं नजीक राहाणाऱ्या जातभाईंकडून जातीसंबंधी माहिती मिळण्यासंबंधानें कोणत्याच प्रकारची मदत मिळूं नये, ही किती दिलगिरीची गोष्ट आहे बरें? आणि त्याबद्दल मला येथें दिलगिरी प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं.

सन १९०० सालापासून मी स्वतः शोध करण्यास सुरवात केली; आणि मनुष्य ठेवून ग्रंथ, पुराण, दंतकथा, इतिहास, शिला, सनदा, जुने लेख वगैरे शोधण्याचें काम सुरू केलें; त्यांतून जे आधार मिळत गेले तें टिपून ठेवूं लागलों. ज्या ज्या गांवीं जातीचा विशेष भरणा आहे त्या त्या गांवीं पत्रें पाठवून शोध मागविला; परंतु बहुतेकांकडून साधार माहिती मिळाली नाहीं. मी राजेश्री तात्यासाहेब गुप्ते वकील यांना विचारलें कीं, “ माझ्या जवळ बसून मी जें सांगेन ते शुद्ध व व्यवस्थेशीर लिहील असा मला आपल्या ओळखीचा कोणी इतिहास लेखक असल्यास द्या.” त्यांनीं मला भंडारी ज्ञातिचा इतिहासलेखक रा. सखाराम हरि गोलतकर राहणार वसई जिल्हा ठाणें यांची

शिफारस केली; त्याचप्रमाणें मी त्यांस सन १९०६ सालीं बोलावून माझ्या संग्रहीं असलेलीं सर्व कागदपत्रें व टिपणें दाखविलीं, तीं पाहून लिहिण्याचें काम त्यांनीं पत्करलें; आणि त्याप्रमाणें लेखी करारनामाहि झाला. मी त्यांना कांहीं रकम अगाऊही दिली. मी त्यांना सांगितलें कीं, " आपण माझ्या ऑफिसांत बसून माझ्या समक्ष मी सांगेन तसें लिहिण्याचें काम करावें." परंतु त्यांनीं एक दोन महिने चाळवाचाळवी केली आणि लिहिण्याचें काम केलें नाहीं, किंवा अगाऊ उचललेली रकमही परत केली नाहीं.

हा ग्रन्थ सन १९०७ सालींच छापून प्रसिद्ध झाला असता; परंतु माझे परमपूज्य वडील वंधु तीर्थस्वरूप बाळारामजी हे आजारी पडून ते सन १९११ सालीं मरण पावले; तसेंच माझें चौथें कुटुंब हें फार आजारी होतें म्हणून मला तिला अनेक ठिकाणीं हवापाणी बदलण्यासाठीं आणि औषधोपचार करण्यासाठीं न्यावें लागलें. शेवटीं माझ्या दुर्दैवानें व्यापाराची व पैशाची हानी होऊन ती सन १९१३ सालीं वारली. या दुःसह हानीमुळें इतिहास लिहिण्याचे कामास बराच व्यत्यय आला.

उद्योग केल्यास लक्ष्मी प्राप्त होते; पण अक्षरशत्रुपणा आणि अज्ञान स्थिति असली म्हणजे लक्ष्मीचा कसा विनयोग करावा याचें ज्ञान नसतें; आणि त्यामुळेंच शिमग्याचा सण गाजविण्यांत हजारों रुपयांची राखरांगोळी उडते ! मोर नाचूं लागला म्हणजे लांडोरही नाचूं लागते; तशी स्थिति चालू आहे. कर्ज काढून मेजवान्या, बैठकी, पार्ट्या यांची चंगळ उडते; अशा प्रकारें द्रव्याचा नाश चालला आहे हें पाहून मनाला अतिशय वाईट वाटतें. या द्रव्याचा विनियोग जर विद्यादानाकडे केला तर कितीतरी उत्तम झालें असतें बरें ?

मी सन १९१५ च्या जानेवारी महिन्यांत पुण्यास गेलों होतों; त्या वेळीं हे वरील जातींतील रंगढंग मोठ्या प्रचंड प्रमाणावर चढाओढीनें चालले होते; त्यांस कांहींतरी आळा बसावा म्हणून मी एक विनंतीपत्र काढलें; परंतु विद्येचा अभाव असल्यामुळें नगाऱ्याच्या आवाजापुढें तुणतुण्याचें काय वळणार ? ज्या विनंतिपत्रास इतर जातीनें आपली पूर्ण मान्यता दर्शविली आणि तें वर्तमानपत्रकारांनींही प्रसिद्ध केलें त्या विनंतिपत्राचा आमच्या जातीवर कांहींच संस्कार घडला नाहीं. ही स्थिति अवलोकन करून मला माझ्या जातीची मोठी कींव आली; आणि ही जात पुढें अत्यंत निकृष्ट स्थितीस पोहोंचणार हें पाहून मला मोठा खेद वाटूं लागला.

इश्वरानेंच ज्ञानदेवाचा अवतार धारण करून अज्ञानीजनांस ज्ञानामृत पाजून मुक्त केले व करीत आहेत. तें ज्ञानामृत म्हटलें म्हणजे 'विद्या' हेंच होय. सुधारणा, मदत, परोपकार, सहाय्य आणि धर्म यांचा उगम प्रथम आपल्या कुटुंबांत होतो, नंतर त्याचा फैलाव आप्तवर्गात, तदनंतर समाजांत अशा क्रमाक्रमानें होत गल्यास जें आपणांस

आज अशक्य दिसतें तें साहजीकच शक्य होऊन जात असतें. हें युग अज्ञानाचें नाहीं, पण ज्ञानाचें व विचाराचें आहे. आज आपल्या या हिंदुस्थानदेशामध्यें आपल्या जातीचा समाज सुमारें पांच लक्ष असावा. या समाजावर ईश्वरीकृपा आणि ईश्वराचा आशीर्वाद इतका आहे कीं, या समाजांत अनेक हुन्नराच्या बळावर खाऊन पिऊन सुखी अशीं शेंकडा पन्नास मनुष्यें आहेत; आह्मांस शोधाअंतीं असें कळून आलें आहे कीं, हिंदुस्थानांतील प्रांचीन व अर्वाचीन ज्या प्रसिद्ध इमारती बांधल्या आहेत त्यांवर आमच्यापैकीं मेस्त्री, ओव्हरसिअर किंवा कंट्राक्टर या तिघांपैकीं कोणी तरी एक असावयाचाच. परंतु अशा समाजांत विद्येचा अभाव असणें ही किती शोचनीय स्थिति आहे बरें ? या समाजांत शेंकडा नव्हे पण हजारीं एकदेखील युनिव्हर्सिटीची परिक्षा पास झालेला मनुष्य सांपडणें कठीण आहे ! निकृष्ट आणि हीन मानलेल्या जातींत जितका विद्याप्रसार झाला आहे, तितकाही आमच्या जातीमध्यें नसावा ही किती लाजिरवाणी आणि खालीं मान घालण्यास लावणारी स्थिति आहे बरें ? अशा समाजास अगर जातीस उच्च, सुखी व वैभवयुक्त असें कसें ह्मणतां येईल वरें ? जातींत विद्येचा प्रसार होण्यास काय करावें ? आणि त्यांच्या मध्यें विद्येविषयीं अभिरुची कशी उत्पन्न व्हावी ? या प्रश्नाचा मी विचार करीत असतां रा. तात्यासाहेब गुप्ते वकील यांच्या प्रमाणें इतर कांहीं सुज्ञ मंडळीनें मला असें सुचविलें कीं, "आपण कोण ? आपले पूर्व वैभव काय ? आपली सांप्रत स्थिति काय झाली आहे ? आणि ती सुधारण्यास आपण कोणत्या मार्गाचे अवलंबन केलें पाहिजे ? हें समजण्याचें साधन इतिहासावांचून अन्य नाहीं." मी त्यांना उत्तर दिलें कीं, 'असें जर आहे तर मजवळ इतिहासास लागणारी सामुग्री बरीच आहे; आणि मी आतां त्याच उद्योगास लागतों, आणखी, याच वेळीं मला या कामीं साह्य करण्याची रा. हरिश्चंद्र नारायणराव नवलकर यांनीं आपली उत्सुकता दर्शविली; त्यामुळें मला विशेष प्रोत्साहन मिळालें.

आपल्या जातीसंबंधानें विशेष माहिती मिळणें जरी कठीण होतें, तथापि कांहीं गृहस्थ माहिती देण्यांत ( कांहींकांकडील माहिती जरी निराधार होती ) आणि पत्रांचीं उत्तरें त्वरित पाठविण्यांत जी आस्था व कळकळ दाखवित असत आणि उत्तेजन देत असत अशा गृहस्थांच्या नांवांचा येथें आदरपूर्वक उल्लेख केल्यावांचून माझ्यानें राहावत नाहीं.

जयपुर येथील "**मराठा क्लब**" चे माजी सेक्रेटरी श्रीयुत काशिनाथ दामोधर शुक्ल, बी. ए., एल. एल. बी., वकील यांनीं मला तेथील आमच्या जातीसंबंधानें निरपेक्षबुद्धीनें जी माहिती दिली त्याबद्दल मी त्यांचा फार फार आभारी आहें. तसेंच सवाई जयपूरचे उस्ता लक्ष्मीनारायण रामबिलास मणेठ्या जाहगिरदार आणि औरंगाबादचे शितलजी भाऊसाहेब देवतवाळ कंट्राक्टार यांनींहि आपल्याकडील माहिती

देऊन मदत केली, याबद्दल मी त्यांचे फार फार उपकार मानतों. तसेंच दिल्लीहून चौधरी केवलसिंग कालेसिंग वर्मा वहरे व चौधरी कल्याणसिंगजी यांचेकडून विशेष माहिती मिळाली त्याबद्दल मी त्यांचा मोठा आभारी आहें. **श्रीशिल्पावत जात्युन्नतिसभा**, सवाई जयपूर, **श्रीकुमावत जात्युन्नतिसभा**, अजमीर, **श्रीकुमावत क्षत्रिय जात्युन्नतिसभा**, वडनगर आणि **श्रीजाति प्रबन्धिनी सल्लूक सभा**, दिल्ली वगैरे यांच्या बरोबर माझ्या जातिसंबंधीं अनेक महत्वाच्या मुद्यासंबंधीं माहिती गोळा करण्याची आणि विचार करण्याची स्फूर्ति मिळाली, त्याबद्दल मी त्या सभेचे उपकार मानतों.

आपल्या जातीचा इतिहास कसा काय लिहिला गेला आहे, हें पाहण्याकरितां मुद्दाम तसदी घेऊन अजमीरहून श्रीयुत मुन्नालालजी भवानीरामजी धनरिया, कंट्राक्टर, ब्यावरहून श्रीयुत मोहनलालजी नगरामजी नराणिया, कंट्राक्टर आणि श्रीयुत नथुलालजी गोगराजी जायलवाळ कंट्राक्टर, पुण्याहून श्रीयुत रामचंद्र नारायणजी माळवाळ, कंट्राक्टर, निमच व रतलाम येथील समाजाकडून श्रीयुत रामचंद्रजी नरसिंगजी वडमुंडा कंट्राक्टर, खानदेशांतील जळगांवहून श्रीयुत विष्णु बाबाजी कुंडळवाळ, ओव्हरसिअर, वडनगर ( माळवा ) येथील **श्री कुमावतक्षत्रिय जात्युन्नति सभेकडून** वे. शा. सं. पंडित गंगाप्रसाद रामशा वगैरे बांधव येऊन त्यांनीं समग्र ग्रंथ वाचून पाहिला आणि हा ग्रंथ सर्वांगसुंदर झाला आहे, असें आपलें मत व्यक्त केलें, त्यांनीं इतकी तसदी घेऊन ग्रंथ वाचून पाहिला, त्याबद्दल मी त्यांचे फार फार उपकार मानतों. माझे मित्र व हितेच्छु संपादक केरळकोकीळ आणि अनेक लोकमान्य ग्रंथांचे कर्ते महाराष्ट्रभाषाचित्रमयूर कृष्णाजीपंत आठल्ये, पंडित राजारामशास्त्री ऋषी, नित्यानित्य विवेक, सामुद्रिक दीप इ० पुस्तकांचे कर्ते वगैरे मंडळीनें आपला अमोल्य वेळ खर्च करून साग्र ग्रंथ वाचण्याची तसदी घेतली; आणि या विषयासंबंधानें आपलें पूर्णानुकूल मत प्रदर्शित केलें, त्याबद्दल मी त्यांचे अत्यंत कृतज्ञबुद्धिपूर्वक उपकार मानतों; त्याच प्रमाणें खानदेशांतील आमच्या ज्ञातींतील परमहंस शिवराम बावा लक्ष्मणजी चव्हाण तेलपुरे यांनीं आणि आमच्या जातींतील पंड्या परशराम तुळशीराम यांनीं मला जी माहिती दिली, त्याबद्दल मी त्यांचाही फार आभारी आहें. मी जें सांगत होतों त्याचें टिप्पण करून घेणें, त्याची छापण्याकरितां शुद्ध प्रत करणें आणि पुस्तक छापीत असतां प्रुफें तपासणें वगैरे कामीं श्रीयुत हरिश्चंद्र नारायणराव नवलकर यांनीं मला जें साह्य केलें त्याबद्दल मी त्यांचाही आभारी आहें. तसेंच माझ्या ऑफिसांतील रा. दत्ताराम हरि घुरये यांनीं मला जी मदत केली त्याबद्दलही मी त्यांचे आभार मानतों. आणखी माझी विनंति मान्य करून निरनिराळ्या ठिकाणच्या आमच्या समाजांनीं आपले फोटो पाठविण्याच्या कामीं जी उत्सुकता व्यक्त केली त्याबद्दल मी त्यांचेही अत्यंत प्रेमपूर्वक उपकार मानतों. या पुस्तकांत आमच्या जातीच्या लोकांचे जे फोटो दिले आहेत, ते देण्याचा आमचा मूळ हेतू असा आहे कीं, आमच्या जातीच्या लोकांचा निरनिराळ्या प्रांतांत पोषाख कसा आहे आणि त्यांची

परस्परांस चित्र-ओळख व्हावी. देशाचाराप्रमाणें त्यांचा पोषाख, वगैरे जरी भिन्न आहे तथापि ते आणि आह्मी एकच आहोंत, असें जसें आह्मी कबूल करतों तसेंच तेही आह्मी आणि ते एकच आहोंत असें कबूल करतात. जे लोक ज्या प्रांतांमध्यें रहातात त्या प्रांतांतील लोकांच्या चालीरीतीस अनुसरून पोषाख वगैरे करण्याचा प्रघात पडला आहे. स्त्रियांचेहि फोटो देण्याचा प्रथम आमचा मानस होता, पण पुढें कांहीं ठिकाणीं गोषाची आडकाठी आल्यामुळें देतां आले नाहींत; तथापि निरनिराळ्या ठिकाणच्या कांहीं मुलींचे फोटो दिले आहेत, त्यांवरून त्या त्या देशांतील स्त्रियांच्या पेहरावाची कल्पना होणार आहे. याशिवाय इतर ठिकाणाहूनहि बरेच फोटो आले, पण ते वेळेवर न आल्यामुळें घेतां आले नाहींत, त्याबद्दल मी दिलगिरी प्रदर्शित करतों. फोटो देण्याचें महत्व व विशेष हेतू काय आहे तो मार्मिक रीतीनें विचार करणाराच्या तात्काल लक्षांत येणार आहे.

मला येथें एक विशेष महत्वाची व अत्यंत संतोषजनक गोष्ट कळविण्याचा मोठा आनंदकारक प्रसंग प्राप्त झाला आहे, ती गोष्ट हीच कीं, दिल्ली येथील आमच्या पुढारी समाज मंडळीचा फोटो पाठवून देण्याविषयीं मी जेव्हां त्यांना विनंती केली, तेव्हां एका तटांतील पुढारी मंडळीनें आपल्या तटाचा फोटो पाठवून दिला. पुढें ही गोष्ट जेव्हां दुसऱ्या तटांतील लोकांच्या कानावर गेली तेव्हां त्यांनीं मला असें कळविलें कीं, आह्मीहि आमच्या तटांतील पुढारी मंडळीचा फोटो पाठवून देतों. तेथें अभिमानानें दोन तट आहेत; एक **देशवाल** आणि दुसरा **दिल्लीवाल,** यावरून मला कळलें कीं, तेथें दोन तट आहेत, ह्मणून मी या दोन्ही तटांतील पुढारी मंडळीस असें विनंतिपूर्वक पत्र लिहिलें कीं, तुह्मी आपआपसांतील हे दोन्ही तट मोडून एक होऊन आणि दोन्ही तटांतील पुढारी मंडळीनें एकत्र बसून आपला फोटो पाठवून दिल्यास तो मी मोठ्या आनंदानें स्वीकारीन, आणि असें करणें हें अधिक सयुक्तिक व हितकर होणार आहे. या माझ्या विनंतीस मान्यता देऊन दोन्ही तटांतील मंडळीची एकत्र सभा भरून माझ्या पत्राचा विचार होऊन हे दोन्ही तट मोडून आणि एक होऊन त्यांनीं आपला फोटो पाठविला. या त्यांच्या स्तुत्य व पोक्त विचाराबद्दल मी या उभय तटांचा फार आभारी आहें. पुस्तक बाहेर पडण्यापूर्वींच असा एक चांगला परिणाम झाला, हा एक मी मोठाच शुभशकून समजतों, यावरून आमच्या समाजांत जागजागीं जे अभिमानानें तट होऊन दुफळ्या झाल्या असतील, त्यांवर माझ्या पुस्तकाचा असाच चांगला परिणाम होवो आणि आपसांतील हे तट मोडून त्यांच्यामध्यें ऐक्यभाव व प्रेमबुद्धि उत्पन्न होवो, अशी माझी परमेश्वराजवळ अनन्यभावें प्रार्थना आहे.

त्याचप्रमाणें मला या स्थळीं कांहीं कांहीं दुःखकारक गोष्टींचाही उल्लेख केल्यावांचून राहवत नाहीं. मी सन १८९८ सालीं महायात्रेस गेलों होतों. परत येते वेळीं मी राजपुतान्यांतील जयपूर येथें गेलों होतों. तेथील प्रसिद्ध प्रेक्षणीय स्थलें पाहिलीं. तेथील

आर्टस स्कूल मध्येंहि गेलों होतों. त्या वेळीं तेथें आमच्या जातीचे कै० लाला रामबक्सजी बालोव्या हे ड्राईंग मास्तर होते. यांनीं शिल्पशास्त्रावर अनेक लोकमान्य पुस्तकें तयार केलीं आहेत. हा त्यांचा सुलौकिक मी फारा दिवसांपासून ऐकून होतों, ह्मणून मी त्यांची मुद्दाम भेट घेतली. मी त्यांना आपल्या जातीचें मूळ, कूळ, नांव, उद्योग वगैरेसंबंधानें बरेच प्रश्न विचारले. या माझ्या प्रश्नांसंबंधानें त्यांनीं मला असें उत्तर दिलें कीं, अशा प्रकारच्या माहितीचा ग्रंथ अद्याप माझ्या अवलोकनांत आला नाहीं किंवा मला त्यासंबंधानें कांहींच माहिती नाहीं. शेवटीं त्यांनीं मलाच अशी शिफारस केली कीं, जर कोणी अशा प्रकारच्या माहितीनें भरलेला ग्रंथ तयार करील, तर त्याचे आपल्या अज्ञानी व सर्वोपरी मागसलेल्या ज्ञातीवर महत् उपकार होणार आहेत. त्यांतून आपल्यासारख्या लक्ष्मीसरस्वतीच्या कृपेंतल्या शोधक गृहस्थानें मनावर घेतल्यास विशेष चांगलें होणार आहे. परंतु हे गृहस्थ आज हा ग्रंथ पाहण्यास नाहींत, हें पाहून मला वाईट वाटत आहे.

तसेंच मुंबईंतील परलोकवासी श्री. शेट सितारामजी लक्षुमणजी कुक्कडवाळ (किनारीवाळ), कंट्राक्टर सिताराम बिल्डिंगचे मालक, हे नेहमीं मजजवळ असे उद्गार काढीत असत कीं, 'आपण क्षत्रिय असून आपल्या जातीस कुंभार हें विशेषण लागलें. यांतील घोटाळा काय आहे, तो मला बिलकूल कळत नाहीं. तो कोणी जर पुस्तकरूपानें काढून टाकील तर बरें होणार आहे.' पण हेही गृहस्थ आज हा ग्रंथ पाहण्यास हयात नाहींत याबद्दल मला फार दिलगिरी वाटत आहे.

पुण्यांतील कैलासवासी श्रीमंत काळुराम भाऊ मनसारामजी धवारे चौधरी हे गर्भश्रीमंत होते; ते लोकप्रिय असून त्यांची गणणा सरदारांमध्यें होत असे. हें आनररी म्याजिस्ट्रेट, म्युनिसिपाल कमिशनर व बऱ्याच लोकोपयोगी संस्थेचे प्रेसिडेन्ट व मेंबर होते.यांना आपल्या जातीचा मोठा अभिमान होता. यांच्या तीर्थरूपांपासून यांचा आणि माझा चांगला घरोबा होता. हे माझे आप्तहि होते. त्यांनीं आपल्या कै० ज्येष्ट बंधूच्या स्मरणार्थ श्रीक्षेत्र आळंदी येथें '**श्रीविठ्ठलाश्रम**' या नांवाची एक प्रशस्त अशी धर्मशाळा बांधली आहे, ती दाखविण्याकरितां त्यांनीं मला आपल्याबरोबर आळंदीस नेलें होतें. त्या प्रसंगीं त्यांचें आणि माझें जातीच्या नांवासंबंधानें बरेंच भाषण झालें. शेवटीं ते असें ह्मणाले कीं, 'आपण खरे रजपूत असून आपला कोणत्याही प्रकारचा अर्थाअर्थी संबंध नसतांनाहि आपल्या ज्ञातीस शूद्रवत् जातीचें नांव कां पडलें आहे, याचें कारण कांहींच कळत नाहीं. याचें निवारण झाल्यास फार उत्तम होणार आहे. आपल्यासारख्या विचारशील व शोधक मनुष्यानें मना‌र घेतल्याशिवाय हें काम सिद्धीस जाणार नाहीं. सदरहु गृहस्थ हे ता० १६ माहे डिसेंबर सन १९१२ रोजीं अकालीं मृत्यु पावले. यांच्या शोकजनक मृत्यूमुळें आमच्या जातीचा एक मोठाच आधारस्तंभ आणि पुरस्कर्ता

नाहींसा झाला. दुर्दैवानें आज आमच्यांतील हे तीन थोर पुरुष हा ग्रंथ पाहण्यास जिवंत नाहींत, झणून मला आपली दिलगिरी प्रदर्शित केल्यावांचून राहवत नाहीं !

मूळ वर्ण चार आहेत. या चार वर्णांतून पुढें जरी धर्म, कर्म, उद्योगधंदा, यांवरून कालानुरूप व अभिमानानें सहस्रावधि जाती निर्माण झाल्या आहेत, आणि जरी जातींच्या मूळ नांवांत विशेष फेरफार झाला नाहीं, तथापि भेदभाव पुष्कळ उत्पन्न झाला आहे. जसें:– अहिर ही एक जात आहे. या एकाच जातीचे १,७६७ भेद झाले आहेत. या भेदांमध्यें परस्परांत क्वचितच रोटीव्यवहार होत असेल; पण बेटीव्यवहार मुळींच होत नाहीं. तद्वतच वाण्यांमध्यें १,८२७, कुणब्यांमध्यें १,४८८, गौडब्राह्मणामध्यें १,४१४, गुर्जरांमध्यें १,१७८, ब्राह्मणामध्यें ९०२ आणि कुंभारांमध्यें ७७३ भेद आहेत. यांचीं हीं जातीचीं नांवें जरी पुरातन आहेत, तथापि अनेक भेद उत्पन्न झाल्यानें त्यांच्यामध्यें परस्परांत अन्नव्यवहार क्वचितच होत असेल, पण कन्याव्यवहार मुळींच होत नाहीं.

क्षात्रधर्मी रजपूत अगर मराठे यांचे वंश, आडनांवें, कुलाचार वगैरे अन्य जातीमध्येंहि कांहीं अंशीं दिसून येतात. ते जरी कांहींसे सारखे दिसले तथापि तितक्यावरून ते एकाच जातीचे आहेत असें कोणत्याहि प्रकारें ठरत नाहीं. त्यांच्या जाती ह्या अगदीं भिन्न असल्यानें त्यांचा परस्परांशीं जातिसंबंध मुळींच नाहीं.

ब्राह्मण ज्ञातीमध्यें धर्मशाखा व देश यांमुळें अनेक भेद झाले आहेत. त्यांच्यामध्यें कांहीं ठिकाणीं अन्नव्यवहार होतो, पण कन्याव्यवहार मुळींच होत नाहीं, त्यावरून त्या कांहीं निराळ्या जाती मानीत नाहींत. आणखी, त्यांचा व्यवसाय हा धर्मवृत्तीचा असल्यामुळें आणि उद्योगधंदे हें त्यांनीं कनिष्ठ कर्म मानल्यामुळें त्यांची इतर उद्योगधंदे करण्याकडे प्रवृत्ति झाली नाहीं; याचमुळें त्यांच्यामध्यें उद्योगधंद्यांवरून निरनिराळ्या जाती झाल्या नाहींत. झणूनच ते आपणास पूर्वापार इतर जातींपेक्षां श्रेष्ठ मानून घेत आहेत; पण तसा प्रकार क्षत्रियांचा नाहीं. त्यांना आपल्या पोटापाण्यासाठीं लहान मोठे व्यवसाय करावे लागत आहेत, त्यामुळें त्यांच्यामध्यें उद्योगधंद्यांवरून निरनिराळ्या अनेक स्वतंत्र जाती बनल्या आहेत.

ज्या परशरामानें निःक्षत्रिय पृथ्वी केली असें सांगतात, त्याच परशरामानें क्षत्रियांचें अस्तित्व कबूल केलें आहे. परशरामानंतर **श्रीराम** व **श्रीकृष्ण** अवतार झाले. हे क्षत्रिय होते, त्याचमुळें पुढें **रघुवंश, यदुवंश** वगैरे क्षत्रियवंश चालत आले आहेत. झणूनच क्षत्रिय नाहींत हें विधान चुकीचें व अभिमानाचें आहे. भागवतांत असें लिहिलें आहे कीं, छप्पन कोटीं यादव, साठ हजार सगरपूत, आणि याशिवाय सामान्य जन हे परशरामाच्या निःक्षत्रिय पृथ्वी करण्याच्या मोहिमींतून बचावले गेले आहेत.

फार पुरातन काळापासून क्षत्रियांचे लग्नांत श्री शंकराचे व श्री रामचंद्राचे शाखोच्चार होत असतात. वराचे हातांत हळदीच्या वेळीं कट्यार व लग्नाचे वेळीं तलवार व वधूचे

हातांत बाण (तीर) असतो. वीरपत्नी असल्यानें सौभाग्यचुडा हा लग्न लागल्या उपरांत भरतात. ही वहिवाट अद्याप आमच्यामध्यें चालू आहे आणि ही क्षत्रिय जातीची दर्शक आहे.

आमचे शेंकडा पंच्याहत्तर लोक आपली जात **कुमावत** अशी सांगत आहेत; कुमावत हा क्षत्रियवाचक संस्कृत शब्द आहे; हा अस्सल आहे; हा अपभ्रंश झालेला शब्द नाहीं. एकाक्षरी, अमरकोश, शास्त्र, पुराण यांच्या आधारावरून या शब्दाचा अर्थ पृथ्वीचे रक्षक ( ह्मणजे क्षत्रिय ) असा सिद्ध होत आहे. आह्मी याच ग्रंथांत ३५ व्या पानावर कुमावत या शब्दाचा जो अर्थ दिला आहे, तो लोकप्रचारांतील अर्थावरून दिला आहे.

जग हें त्रिविध आहे. मृदुंगाचा आवाज हा दोन्हीकडून होतो. श्री तुकाराममहाराज यांचें असें वचन आहे कीं, **'कोणी निंदा अथवा वंदा आह्मां स्वहिताचा धंदा ॥'** ज्यांत आपलें हित आहे, तोच आपला खरा धर्म आहे. क्षत्रियांच्या अस्तित्वाबद्दल विचार करणें नको आहे; कारण क्षत्रिय आहेत, हें अनेक प्रबल प्रमाणांवरून निर्विवाद-रीतीनें सिद्ध झालें आहे. कुमावत हें क्षत्रियवाचक नांव असून तें पूर्वापारापासून प्रचारांतही चालू आहे. या नांवाचा खरा अर्थ स्वतःस व इतरांस माहित नसल्यामुळें अज्ञान व उद्योगवाचक नांव ग्राह्य करणें ही मोठीच चूक झाली आहे.

हे कुमावत ज्ञातीचे लोक क्षत्रिय आहेत, अशाविषयीं कुमावत या शब्दाची सशास्त्र व्याख्या येथें देतों:—

**पृथिव्यां कुः समाख्यातः कुः शब्देऽपि प्रकीर्तितः ॥**

या एकाक्षरी कोशांतील प्रमाणान्वयें कुमावत या शब्दांतील **कु** हें अक्षर पृथ्विवाचक आहे, हें स्पष्ट होतें.

**गोत्राकुः पृथवी पृथ्वीक्ष्मावनि मेदिनी महि ॥**

या अमर कोशांतील प्रमाणानुसार कुमावत यांतील **कु** अक्षराचा अर्थ मेदिनी ह्मणजे पृथ्वि असा झाला आहे.

कुमावत या शब्दांतील **मा** या अक्षराचा अर्थ पाहूं–

**म शिवश्चन्द्र मावेधा मा लक्ष्मीश्च प्रकीर्तितः ॥**
**मा च मातरि माने च बंधनेमः प्रकीर्तितः ॥**

याचा अर्थ–म–मकर शंकर किंवा चंद्रमा द्योतक आहे. तसेंच मा–ह्मणजे लक्ष्मी, मा–ह्मणजे मातरी–माता, मा–ह्मणजे माया इत्यादि. असा अमरकोशांत अर्थ दिला आहे.

**कुमा** या दोन अक्षरांचा एकत्र अर्थः–कु ह्मणजे पृथ्वीला, मा ह्मणजे माता व वत् ह्मणजे प्रमाणें असा अर्थ झाला. पृथ्वीला मातेप्रमाणें रक्षण करणारी जी ज्ञात तीच कुमावत क्षत्रिय ज्ञात होय. याविषयीं प्रमाण–

**कुरक्षा मावत धृता संज्ञेतिख्यातं महीम् ।**
**सूर्यवंश समुद्भवं क्षितितले नाद्यापि नष्टंगता ॥**

या प्रमाणान्वयें पृथ्वीचें रक्षण करणारे सूर्यवंशांत उत्पन्न झालेले असे या भूमंडळावर कुमावत नांवाचें जे लोक आहेत, ते क्षत्रिय असून जगांत हयात आहेत.

**सृष्ट्यादौ मरीचि वंश प्रभाव बाहू प्रतापोज्वला**
**गौब्राह्मण महीरक्षणाय भुवनेऽजित पदं क्षत्रेतिख्यातं महा ।**
**तस्यै वेति निर्मित पदं शाखामया वर्ण्य ते ॥**

ह्मणजे जगत् उत्पन्न झालेल्या वेळीं आरंभीं प्रजापती **मरीचि** महर्षी उत्पन्न झाले. त्यांनीं आपल्या सामर्थ्यानें उज्वल प्रतापशील असे क्षत्रिय राजे पृथ्वीचे रक्षणार्थ उत्पन्न केले. हेच पुरुष क्षत्रियवंशास आद्यजनक होत. या क्षत्रियवर्णाची अन्य शाखा कुमावत या नांवानें भूतलावर वास करीत आहे.

याप्रमाणें कुमावत ह्मणजे पृथ्वी व तीवरील गोब्राह्मणादिकांचें रक्षणकर्त्ते असे हे क्षत्रिय होत, व हीच आमची क्षत्रिय ज्ञात होय.

क्षत्रिय अर्थात् रजपूत या जातिवाचक नांवावरून राजपुतान्याची प्रसिद्धी आहे. तद्वत् कुमावत हें क्षत्रियवाचक नांव असल्यानें त्यावरून तें कुमायु* प्रांतास नांव पडलें आहे. हल्लीं त्यास कुमान देश असें ह्मणतात. त्या प्रांतांत कुमावत व कुणबी हे मूळचे रहिवाशी असल्यामुळें हे दोघेहि क्षत्रिय आहेत, असें पूर्ण आधारयुक्त सिद्ध होत आहे.

श्रीजगद्गुरु शंकराचार्य यांनीं क्षत्रिय ह्मणून कै. श्री. नंदरामजी सुंदरजी कवलिये नाइक यांच्याकडून आपली पादपूजा करून घेतली. जरी शूद्रास श्रींच्या पादपूजेचा अधिकार असला, तथापि तो ब्राह्मणद्वारें असावा.

## आर्या.

**जोंवरि शिवप्रसादें धरणी वरि क्षत्रियत्व नांदेल ॥**
**तोंवरि ज्ञाति-कुमावत क्षत्रियवंशज कदां न भंगेल ॥ १ ॥**

---

*कुमायून प्रांतांतील जंगली प्रदेशांत क्षत्रियांचे वंशज अगदीं रानटी स्थितींत सांप्रत वसत असल्याबद्दल एका अर्वाचीन शोधक पुरुषानें वर्णन केलें आहे. ते लोक स्वतःस "राऊत" उर्फ "राजे" असें ह्मणवितात. "आपण क्षत्रियांचे वंशज असल्यामुळें कोणाच्याही ताब्यांत रहात नाहीं व कोणासच हात उचलून मुजरा करीत नाहीं. लोकांनीं आम्हांस मुजरे केले पाहिजेत; कारण, आमच्या अंगांत राजाचें रक्त खेळत आहे. अनेक पिढ्यांपासून स्वसंतोषानें जरी आह्मी जंगलांत राहतों, तथापि, आह्मी राजवंशीय आहों, हें आह्मी पूर्णपणें जाणतों." *Forbidden Land*, Vol. I, by A. Henry Savage Landor.

शास्त्र, इतिहास आणि रूढी यांच्या आधारावरून आपण क्षत्रिय वर्णांपैकीं **कुमावत** आहोंत असें निर्विवाद रीतीनें सिद्ध झालें आहे; यासाठीं आमच्या जातबांधवांनीं अज्ञानदर्शक जातीच्या नांवाचा त्याग करून **कुमावत क्षत्रिय** हेंच जातीचें खरें नांव चालविणें हें योग्य व भूषणास्पद आहे.

आणखी, येथें एक दोन गोष्टींविषयीं अवश्य उल्लेख केला पाहिजे; त्यांपैकीं पहिली गोष्ट ही आहे कीं, मुसलमानांच्या मुळारंभींच्या अमदानींत रजपूत लोकांचा कसा छळ झाला, त्यांच्यापैकीं बऱ्याच मंडळीस आपल्या जन्मभूमीचा त्याग कसा करावा लागला आणि आपली श्रेष्ठ जात चोरण्याचा कसा प्रसंग आला, यासंबंधानें आह्मांस ऐतिहासिक दृष्टीनें शुद्ध हेतूनें लिहावें लागलें आहे. यावरून आमच्या मनांत मुसलमानांविषयीं द्वेषबुद्धि आहे, किंवा ती वाढवावी असा आमचा मुळींच हेतू नाहीं. आमच्या जातीच्या मनांत मुसलमानांविषयीं किती प्रेमबुद्धि वसत आहे, हें दर्शविण्याकरितां येथें एकच गोष्ट सांगितली ह्मणजे पुरे आहे. ती हीच कीं, आमच्या जातींतील बहुतेकांच्या येथें पीराची भक्ति आहे. यावरून आमच्या मनामध्यें मुसलमानांविषयीं कोणत्याच प्रकारचा द्वेषभाव नाहीं हें उघड उघड दिसून येतें.

दुसरी गोष्ट ही कीं, पंचायतीसंबंधानें आह्मी ज्या पुस्तकाच्या आधारें संक्षिप्तांत आणि सौम्य शब्दांत अल्प लेख लिहिला आहे, त्यावरून कित्येक सनदी चौधरी, पटेल व सरपंच यांना प्रसंगीं विषाद वाटण्याचा संभव आहे, परंतु यांच्यापैकीं कांहीं-कांकडून वेळोवेळीं गरिबांवर कशाप्रकारें जुलूम व अन्याय झाले आहेत, यासंबंधानें आमच्याजवळ भरपूर व सबल पुरावा आहे; परंतु तो ग्रंथविस्तारभयास्तव येथें दिला नाहीं. पंचाईतींतील जुलूम व अन्याय नाहींसा करण्यास चौधरी, पटेल व सर-पंच हे चतुर व शाहाणे असले पाहिजेत. शाहाणा कोणास ह्मणावें याविषयीं श्रीसमर्थ रामदासस्वामी यांचें असें वचन आहे कीं:—

> **जो बहुतांस मानला । तो जाणावा शहाणा झाला ॥**
> **जनीं शहाण्या मनुष्याला । काय उणें ॥ १ ॥**

आणखी **मोरोपंत** ह्मणतातः—

> **संसार दों दिसांचा, यश जोडी जो कुलीन तोचि तरे ।**
> **ऱ्यावें बरें ह्मणोनि, स्वपरमुखीं हें कुलीन तोचि तरे ॥ १ ॥**

अलीकडच्या सुधारणेच्या काळांत चौधरी, पटेल व सरपंच यांनीं शहाणपणानें आपल्या पंचायतीस सभेपेक्षांहि अधिक समाजमान्य व समाजप्रिय असें स्वरूप देऊन ही अप्रिय झालेली संस्था प्रिय करतील अशी माझी त्यांस सविनय विनंति व सूचना आहे.

मी हा इतिहास लिहीत असतां माझा हिंदुस्थानांतील बहुतेक भागांतील निरनि-राळ्या ठिकाणच्या समाजपुढाऱ्यांबरोबर पुष्कळ पत्रव्यवहार झाला; त्यावरून मला

असें स्पष्ट कळून आलें कीं, जेथें गांव आहे तेथें सर्व कांहीं असणारच. जेथें गंगा आहे तेथें सर्व कांहीं पवित्र कार्य होत असतें. तसेंच जेथें जातगंगा आहे तेथें वाद हादेखील असणारच. वाद हा एका अर्थी कांहीं वाईट नाहीं; कारण त्यापासून **वादे वादे जायते तत्त्वबोधः** । आणखी हा प्रकार एकसारखा चहूंकडे सर्व बाबतींत चालू आहे. सुशिक्षितांमध्यें देखील वाद व पक्ष आहेतच. जेथें समाज आहे तेथें दोन पक्ष हे असणारच. एक जुना ( अज्ञान ) व दुसरा ( सज्ञान ). ( पहिला सनदी चौधरी, पटेल व सरपंच यांचा; आणि दुसरा बहुजन समाजाच्या मतानें नेमलेले चौधरी, पटेल, सरपंच अथवा सभाध्यक्ष, सभासद वगैरे यांचा ). हल्लींचा काळ आणि ज्ञानतेज याच्या योगानें पहिला पक्ष हा कमजोर व ज्ञानतेजहीन तर होणारच, परंतु असा आपसांतील हानिकारक वाद वाढवीत बसण्यापेक्षां या दोन्ही पक्षांनीं जर आपलें लक्ष्य व वजन ज्ञानवृद्धि करण्याकडे केल्यास खरोखरच ज्ञानवृद्धि व समाजसुधारणा होण्यास विशेष साह्य होणार आहे. समाजसुधारणा करण्याचें उच्च ध्येय व श्रेष्ठ आणि पवित्र कर्तव्यकर्म इकडे सारी दृष्टि ठेवून आणि ह्याच मूलतत्वावर वाद किंवा पक्षभेद झाल्यास त्यापासून स्वतःच्या समाजाचें हित व कल्याण होणार आहे; इतकेंच नाहीं, तर ती इतर ज्ञातींसहि बोधपर व अनुकरणीय होणार आहे. ह्मटलें आहे:—

**हिताचिया गोष्टी सांगूं एकमेकां । शोक मोह दुःखा निरसूं तेणें ॥ १० ॥**

आणखी:—

**एकमेकां करूं सदा सावधान। नामीं अनुसंधान तुटों नेदूं ॥**

पूर्वकालीं थोर थोर राजे आपली मनकामना सिद्धीस जाण्याकरितां यज्ञयाग करीत असत; परंतु यज्ञयाग करण्याचा प्रघात पुष्कळ कमी झाला आहे. सांप्रतचा काळ हा ज्ञानाचा काळ असल्यामुळें या काळीं ज्ञानयज्ञ करणें इष्ट आहे. ज्ञानयज्ञ करणें ह्मणजे विद्याप्रसार करणें हेंच होय. जातीचा उत्कर्ष हा केवळ विद्याप्रसारावर अवलंबून आहे. यासाठीं आमच्या ज्ञातगंगेनें विद्याप्रसाराच्या कामीं आस्थापूर्वक परिश्रम केले पाहिजेत. विद्यादानासारखें महत् पुण्य इतर कशांतहि नाहीं. श्री तुकाराममहाराजांचें असें वचन आहे कीं,

**याच देहीं याच डोळां । पाहिन मुक्तीचा सोहळा ॥**

या बचनाप्रमाणें विद्यादानयज्ञाचें फळ आपणास प्रत्यक्ष आपल्या डोळ्यानें पाहण्यास मिळतें. विद्येचें महत्व किती आहे, यासंबंधानें वामनपंडितानें असें ह्मटलें आहे:—

**विद्या हें पुरुषास रूप बरवें कीं झांकलें द्रव्यही ।**
**विद्या भोग सुकीर्तिदायक पहा जें मान्य मान्यांसही ॥**
**विद्या बंधु असे विदेशगमनीं, विद्या महादेवता ।**
**विद्या पूज्य नृपास, हा नर पशू तींवेगळा तत्वतां ॥ १ ॥**

कालचक्र हें एकसारखें फिरत असतें, त्यामुळें गतकाल हा पुन्हा प्राप्त होत नाहीं आणि त्याकाळचें वैभव व स्थिति हीं देखील राहात नाहींत; परंतु प्रस्तुत काळ आणि भावी काळ यांचा सद्व्यय करण्याची शक्ति आपणांमध्यें आहे. कालानुरूप वर्त्तन ठेवणें आणि विचार करणें हा आपला धर्म आहे. ज्ञानवृद्धि आणि हुन्नरवृद्धि यांच्यायोगानें खोटे हिरे व मोतीं हीं खरीं आहेत अशी मनुष्यांना भुरळ पाडतात. अज्ञानाच्या योगानें खरें रत्न असून गारगोटी आणि हंस असून काग ह्मणवून घेणें अशाप्रकारच्या निकृष्ट स्थितीस पोहंचलेल्या जातीस * आपल्या जातीच्या मुळाची मार्गदर्शक अशी एक लहानशी पायवाट, आपल्या जातीस्वरूपाचें ज्ञान प्राप्त करून देणारा दर्पण आणि आपल्या मनाचें समाधान करून देण्यास आधार असें हें पहिलेंच इतिहासरूपी लहानसें साधन जर उपलब्ध झालें आहे तर हल्लींचा काळ हा प्रत्येकानें आपलें तन, मन, धनपूर्वक अज्ञानरूपी शत्रूचा ज्यानें आपणास सर्वोतोपरी हीन दशेस आणून सोडलें आहे त्याचा ज्ञानरूपी अस्त्रानें संहार केला पाहिजे.

हल्लीं आपल्या जातींत विद्याप्रसार नसल्यामुळें आपली जात जी अज्ञानरूपी कुंभकर्णी निद्रेमध्यें घोरत पडली आहे तिला जागृत केलें पाहिजे, आणि तिच्यामध्यें चैतन्यशक्ति आणण्यासाठीं आजपर्यंत आपणाकडून कोणत्याच प्रकारचा प्रयत्न किंवा चळवळ झाली नाहीं. आपले पूर्वज महा थोर पुरुष होऊन गेले, आणि त्यांची आह्मी संतती असून आमची आज कितीतरी निकृष्ट स्थिति झाली आहे, याकडे कोणीच लक्ष्य देत नाहीं. आह्मी आज इतके अज्ञानदशेस जाऊन पोंहचलों आहोंत कीं, आह्मी आमच्या जातीचें खरें, शुद्ध, उच्च व प्रतिष्ठित नांव देखील विसरून गेलों आहोंत; आणि खोटें, अशुद्ध, कनिष्ट व अप्रतिष्ठित नांव धारण करून त्या नांवामध्येंच आह्मांस मोठा अभिमान व भूषण वाटत आहे. ही किती दुःखाची व शोचनीय अवस्था आहे बरें! आह्मीं† क्षत्रिय असून आज आमची शूद्रांमध्यें गणना होत आहे!!! धिःकार असो आमच्या मनुष्यपणास! माझे जातबंधुहो, या अज्ञानरूपी निद्रेमध्यें आपण आणखी किती दिवस निमग्न राहणार? हल्लींचा काळ हा स्वस्थ घोरत पडण्याचा नव्हे; जागे व्हा, उठा आणि आपली पूर्वस्थिति पुन्हा आपणास प्राप्त व्हावी यासाठीं विद्यावृद्धी करण्याचा प्रयत्न करा. सांप्रत, आपणास आपल्या पूर्वस्थितीचें यथार्थ ज्ञान प्राप्त झालें

* या पुस्तकाच्या शेवटीं परिशिष्ट ड मध्यें आपण कोण? आपलें मूळ काय? आपले पूर्वज कोण? आपला संबंध कोणाशीं? वगैरे संबंधानें विशेष खुलासा व माहिती संक्षिप्तरीतीनें दिली आहे त्यावरून आपणासंबंधानें सर्वांस यथार्थ ज्ञान प्राप्त होणार आहे.

† आमची जात ही क्षत्रिय (रजपूत) असून आह्मांस यज्ञोपवित, संध्या, गायत्री मंत्र यांचा पूर्ण अधिकार आहे. यांस गाईत्रीपुराण, मूळस्थंभ, शाणवकुळी यांत शास्त्राधार सांपडतो.

आहे; ही मोठीच सुदैवाची गोष्ट होय. अशा समयीं आपण जर असेच घोरत पडलों तर आपली यापेक्षांहि अत्यंत निकृष्ट स्थिति होणार आहे; आणि आपण जर आपल्या जातीचा श्रेष्ठपणा लोकांस सांगूं लागलों तर ते देखील **'नांव सोनुबाई आणि हातीं कथलाचा वाळा '** असें ह्मणून आपली कुचेष्टा करतील आणि श्रीरामदासस्वामींच्या वचनाप्रमाणें आपली मूर्खांत गणना केल्यावांचून कदापि राहणार नाहींत; तें वचन हें:- **आपण आपली करी स्तुति । स्वदेशीं भोगी विपत्ती । सांगे वडिलांची कीर्ति । तो एक मूर्ख ।** इतकेंच नाहीं, तर आपणांसहि आपल्या जातीचें खरें श्रेष्ठ नांव सांगण्यास लाज व शरम वाटणार आहे; इतकी आपली हीन दशा होऊं नये, यासाठीं आपण वेळींच आपल्या जातींत विद्येचा प्रसार करून तिला वर आणण्याचा दीर्घोद्योग केला पाहिजे. हें काम जातींतील प्रमुख व सधन लोकांचें आहे. त्यांनींच आपल्या जातीस वर काढण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आपण सधन व सुखी झाल्यानें आपणांस आपल्या जातीचा थोरपणा व प्रौढी कदापि मिरवितां येणार नाहीं. यासाठीं आपल्या जातींतील सर्वांना पुढें आणण्याचा प्रयत्न करणारांनाच थोर व सधन ह्मणतात. आपल्या जातीस वर काढण्यास सध्याचा काळ हा चांगला व अनुकूल आहे. हाच समय योग्य आहे आणि या कामीं आपणांस सरकारचें पूर्ण सहाय्य मिळत आहे. यासमयीं तुह्मी जर जातीच्या सुधारणेसंबंधीं कांहीं चळवळ केली नाहीं तर तुमच्या पुढील पिढीस फार वाईट दिवस येणार आहेत, हें तुह्मी पूर्णपणें लक्ष्यांत ठेवा; आणि जातीच्या सुधारणेच्या मार्गास लागा. उद्योगधंद्याच्या निमित्तानें निरनिराळ्या गांवांत आपल्या जातीचे लोक पसरल्यामुळें त्यांच्या आचाराविचारांत फरक पडण्याचा संभव असणें हें साहजिकच आहे. आणि तो प्रसंगीं विशेष महत्वाचा मानलाहि जात नाहीं; परंतु राज्यक्रांतीमुळें, अज्ञानामुळें आणि उद्योगधंद्याच्या निमित्तामुळें एकाच जातीचीं निरनिराळीं नांवें सांगून भेदभाव मात्र उत्पन्न झाला आहे; तो काढून टाकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. यासाठीं आमच्या निरनिराळ्या ठिकाणच्या* प्रमुख, विद्वान व सधन लोकांनी एकत्र जमून सर्वानुमतें जातीचें एक मूळ नांव कायम करावें; आणि तें सर्वत्रांस जाहीर करावें, ह्मणजे तेणेंकरून जातीच्या नांवाचा घोटाळा अजिबात नाहींसा होणार आहे. निरनिराळ्या नांवांच्या योगानें आपली जी जातीची मोठी हानी झाली आहे, होत आहे व पुढें होणार आहे, ती लवकर दूर करण्याच्या कामी प्रत्येकानें झटावें अशी माझी सर्व ज्ञातगंगेस अत्यंत नम्रतापूर्वक प्रार्थना आहे.

---

*उद्योगधंद्याच्या निमित्तानें बंगाल व मद्रास इलाख्यांत आणि काश्मीर व ह्मैसूर संस्थानांत आमची मंडळी पुष्कळ आहे, असें कळलें आहे; परंतु जरी त्यांच्यासंबंधीं शोध करण्यास सवड झाली नाहीं, तथापि या पुस्तकाच्या द्वितीयावृत्तिमध्यें त्यांची अवश्य नोंद केली जाईल.

मी कांहीं फार शिकलेला नाहीं. माझा व्यवसाय हा कांहीं लेखकाचा किंवा ग्रंथकाराचा नाहीं. आणखी, ज्या विषयावर मी लेख लिहिण्याचा प्रयत्न केला आहे त्याविषयासंबंधानें जितकी अवश्य सामुग्री पाहिजे आहे तीही अत्यंत दुर्मिळ आहे. अशा स्थितींत मी हें प्रथमच इतिहासासारख्या अत्यंत महत्वाच्या व जोखमीच्या विषयावर अनेक मार्गानें शोध करून आणि माहिती मिळवून लेख लिहिण्याचें धारिष्ट केलें आहे; त्यांत अनेक दोष असण्याचा संभव आहे; इतकेंच नाहीं, तर भाषेसंबंधानें व रचनेसंबंधानेंहि अनेक प्रमाद होण्याचा संभव आहे. हेंच काम एखाद्या विद्वानानें आणि ज्याच्यावर शारदादेवीचा वरदहस्त आहे अशा मनुष्यानें स्वीकारिलें असतें तर तें चांगलें वठलें असतें. मी अल्पबुद्धीनें ही जी इतिहासरूपी वेडीवांकडी पायवाट तयार केली आहे तिचा राजमार्ग करण्याचें काम माझ्या ज्ञातींतील सुशिक्षित व होतकरु मंडळीवर सोंपवीत आहें. ते यांत जे दोष असतील ते सुधारतील आणि यांत जी न्यूनता असेल ती देखील भरून काढतील.

मला या स्थळीं ही गोष्ट कळविण्यास आनंद वाटतो कीं, हें आमच्या जातीचें शोधपूर्वक लिहिलेलें पहिलेंच पुस्तक आहे, आणि या पुस्तकाची कोणत्याहि प्रकारची प्रसिद्धी केली नसतांहि तें बाहेर पडण्यापूर्वीच इतकी प्रसिद्धी झाली कीं, कित्येक ठिकाणच्या लोकांना जरी हें मराठी भाषेंत लिहिलेलें आहे आणि याची रचना आणि यांतील विचार यासंबंधाने ते जरी अज्ञानी असले तथापि निरनिराळ्या ठिकाणच्या जातीपुढारी, हितेच्छू व जिज्ञासू वगैरे सद्गृहस्थांच्या या पुस्तकास सुमारें ७०० च्यावर मागण्या आल्या. त्यामुळें अर्थातच मला या पुस्तकाची दुसरी आवृत्ति हिंदीमध्यें छापावी लागणार आहे. ही माझी इच्छा माझ्या वयाच्या मानाने शेवटास नेण्यास **श्रीज्ञातगंगेचा** आशिर्वाद हाच समर्थ आहे.

आपल्यामध्यें अशी एक ह्मण आहे कीं, 'घर बांधून पहा आणि लग्न करून पहा ह्मणजे त्याचा पूर्ण अनुभव येत असतो'; त्याचप्रमाणें ग्रंथ लिहून पहा ह्मणजे त्याचाहि पूर्ण अनुभव येईल. या तीन्हीं गोष्टीं अनुभवावांचून कळत नाहींत. हा इतिहास सुमारें शंभर पानांच्या आंतच होईल अशी माझी प्रथमारंभाची कल्पना होती; जरी मी अगदीं संक्षिप्तरीतीनें हा ग्रंथ लिहिण्याचा संकल्प केला होता तथापि हा सुमारे दोनशें पानांवर होऊन गेला. इतकें करूनही कांहीं विषयांची जितकी पूर्णता व्हावी तितकी कांहीं करतां आली नाहीं, आणि ग्रंथविस्तारभयास्तव मला आपली लेखणी आंवरून ग्रंथाची त्वरित समाप्ति करावी लागली आहे.

या पुस्तकांत तोच तोच विषय पुन्हापुन्हां आल्या सारखें वरवर वाचणारास वाटण्याचा संभव आहे खरा; परंतु यासंबंधानें मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, मी हा विषय केवळ दक्षिणेंतील माझ्या जातीसाठीं लिहिला आहे, असें नाहीं; तर ज्या ज्या देशांत

माझ्या जातीची वस्ती आहे त्या त्या जातीस धरून लिहावा लागला आहे; त्यामुळें पुन्हा पुन्हा चर्वितचर्वण झाल्यासारखें वाटणार आहे आणि हरदासाप्रमाणें मला वारंवार पूर्व पदावर यावें लागलें आहे.

या पुस्तकावर कित्येकांकडून असा एक आक्षेप येण्याचा संभव आहे कीं, हिंदूंत जातींची संख्या तीन हजारांवर असून त्यांच्या पोटजाती वीस हजारांवर असाव्यात. आणखी, बारिकसारीक भेद तर पुष्कळच आहेत. या जातीचा पाया पुरातनकाळीं जितका भक्कम बांधला गेला होता तितकाच तो आज भक्कम आहे; अशी वास्तविक स्थिति असतां ' आपण ही इतकी खटाटोप करून आपण **रजपूत** आहोंत असें सप्रमाण सिद्ध केलें आहे खरें; पण यापासून आतां आपणांस असें कोणतें श्रेष्ठ पद प्राप्त होणार आहे ? हा कालाचा अपव्यय, द्रव्याचा व्यर्थ चुराडा, आणि लेखणीला विनाकारण शीण दिल्यासारखे होणार नाहीं काय ? " या आक्षेपांत बराच तथ्यांश आहे; परंतु या संबंधानें मला इतकेंच सांगावयाचे आहे कीं, आमच्या ज्ञातबांधवांस आपल्या ज्ञातीचें वास्तविक खरें ज्ञान प्राप्त होऊन त्यांनीं कालास अनुसरून सुधारणेच्या आणि विद्याप्रसाराच्या मार्गास लागावें यापलीकडे माझा कांहीं हेतु नाहीं.

मी ही इतिहासरूपानें जी ज्ञातगंगेची सेवा केली आहे ती **श्री भगवान कृष्णानें** जसे सुदाम्याचे पोहे प्रेमपूर्वक ग्रहण केले तद्वत ही माझी अल्प व नम्र सेवा ज्ञातबंधूंनीं स्वीकारावी आणि, हंसक्षीरन्यायानें दोष टाकून देऊन गुण मात्र ग्रहण करावे. **येथें जें न्यून पूर्ण । तें सज्जनीं घ्यावें सांभाळून** ॥ अशी माझी त्यांना अत्यंत नम्रतापूर्वक प्रार्थना आहे.

शेवटीं, माझी श्री जातगंगेस हीच विनंति आहे कीं:—

**देह त्यागितां कीर्तिमागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी ॥**
**मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥ १ ॥**

आणखी,

**खावें, प्यावें, ल्यावें, आनंदे खेळावें । ऐशासाठीं नोहे जन्म बापा ॥ १ ॥**
**" धरिल्या देहाचें सार्थक " करावें । शील प्रकाशावें मूर्त्तिमंत ॥ २ ॥**
**उपकार सर्वांवर ते करावे । देह झिजवावा त्यांचे साठीं ॥ ३ ॥**
**सुखाचा तो ठेवा, यांतच शोधावा । निववावा चित्तीं आत्माराम ॥ ४ ॥**

ता. १ जानेवारी सन १९१६ इ०

सर्वांचा अत्यंत नम्र सेवक,
**गणपतराव भिवाजी बैताडे.**

## शुद्धिपत्र

**सूचना**—या ग्रंथांत नजरचूकीनें बऱ्याच चुका राहिल्या आहेत; यासाठीं हा ग्रंथ वाचण्याच्या पूर्वी वाचकांनीं प्रथम कृपा करून या शुद्धिपत्रावरून ग्रंथ शुद्ध करून घ्यावा आणि नंतर वाचण्यास सुरवात करावी अशी विनंति आहे.

### प्रस्तावना.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ६ | १६ | त्यांचा | यांचा. |
| ८ | २७ | लाग | लागत |
| ९ | १५ | राहवणार | राहणार. |
| ११ | १ | त्याच | त्या |
| ११ | ८ | वडील | वडील |
| ११ | ८ | वंधु | बंधु |
| ११ | ९ | चौथे | पांचवे. |
| ११ | ३१ | गल्यास | गेल्यास |
| १२ | २६ | नांबांचा | नांवांचा |
| १५ | २० | गणणा | गणना |
| १८ | १९ | पादपूजा | पाद्यपूजा. |

### इतिहास.

| | | | |
|---|---|---|---|
| ११ | मथाळा | क्षत्रियकुळें. | क्षत्रियकुलें |
| ११ | २१ | अत्हे. | आहे |
| १७ | २२ | घुसण्याचा | छपण्याचा |
| १९ | २० | (सैरंध्रि) | सैरंध्रि |
| २५ | २ | अर्भचाका. | अर्भकाचा |
| २६ | २१ | Maratha's | Marathas |
| २६ | २५ | राजपुतत्न्यांत | राजपुतान्यांत |
| ४० | २ | ते | ती |
| ४० | ३ | पसरले | पसरली |
| ४४ | ९ | १७०० | १७६८ |
| ४४ | १२ | यांस | यांच्या आज्यास |
| ५० | २ | विचवे | बिच्छवे |
| ५२ | १४ | सयुक्तिक; | सयुक्तिक, |

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ५२ | २१ | Mansons | Mason |
| ५८ | ६ | अनावज्या | † अनावज्या |
| ५८ | १२ | उदेवाळ | १ उदेवाळ |
| ५८ | १३ | उंजूवाळ | † उंजूवाळ |
| ५८ | २५ | जेटीवाळ | १ जेटीवाळ |
| ५९ | ८ | तुसे | १ तुसे. |
| ६१ | ७ | तेलपुरे | * तेलपुरे. |
| ६२ | १२ | * पन्ह्यांरे | २ * पन्ह्यार. |
| ६३ | २३ | याहणे | २ याहणे |
| ६३ | १५ | भवरे | १ भवरे |
| ६८ | २ | लग्नचिह्न्यां | लग्नचिह्न्या |
| ६९ | २ | इष्ट आप्त | आप्तइष्ट |
| ७२ | १४ | कुलाच्यारा प्रमाणे | कुलाचाराप्रमाणें |
| ७५ | २३ | कवडी, | कवडी |
| ७६ | २ | देशाचारा | देशाचाराप्रमाणें |
| ७९ | ३ | शक्त्यानुसार | शक्तिनुसार |
| ८१ | ८ | सावडा | छावडा |
| ८२ | ८ | झाडाचा | लाकडाचा |
| ८२ | २४ | ठेवून | ठेवून |
| ८५ | २८ | किनारीचे | किनारीचे |
| १०८ | १६ | त्याच्या | त्याची |
| ११४ | १६ | बुंदी संस्थान २५० | बुंदीसंस्थान ११०० |
| ११४ | १६ | माळवा प्रांत ६००० | माळवा प्रांत १४००० |
| ११६ | ८ | संथेस | संस्थेस. |
| ११९ | २२ | पटल | पटेल. |
| १४४ | २ | पागोटीवाल | पागोठीवाले |

# इतिहासाची आवश्यकता.

आमच्या जातीचें मूळ, कुळ, वंश, वर्ण, धर्म, नांव, गांव, आचार, विचार, वगैरे संबंधानें जरी निरनिराळ्या ठिकाणीं आधारयुक्त माहिती उपलब्ध होती खरी; तथापि तिचा शोध करण्याकडे आज कित्येक शतकें कोणी लक्ष्य दिलें नाहीं, किंवा तिचें टांचण करून ठेवण्याकडे किंवा ग्रंथरूपानें संग्रह करण्याकडे कोणाच्याही मनाची प्रवृत्ति झाली नाहीं; त्यामुळें असा शोचनीय परिणाम झाला आहे कीं, आमच्या जातीसंबंधानें सप्रमाण माहितीनें भरलेला असा स्वतंत्र ग्रंथ आजपर्यंत झाला नाहीं. ही मोठीच उणीव अलिकडे तर सर्वांस फारच तीव्रतेनें; भासूं लागली आहे. अशा वेळीं मी हा जातीचा इतिहास लिहिण्याचें काम हातीं घेतलें आहे हें ऐकून आमच्या समाजपुढारी मंडळींत किती उत्सुकता आणि जिज्ञासा उत्पन्न झाली आहे हें त्यांनीं मला जीं उत्तेजनदायक आणि अभिनंदनपर पत्रें पाठविलीं आहेत, त्यांपैकीं कांहीं पत्रांतील भाग येथें सारांशरूपानें देतों, ह्मणजे त्यावरून या इतिहासाची आमच्या समाजास किती मोठी उपयुक्तता आणि आवश्यकता वाटत आहे ती स्पष्ट कळून येणार आहे.

Delhi, 31-11-15.

I became very glad to hear that you have undertaken a very excellent work of caste reformation which was badly needed for us all.

I am very glad to learn through your correspondence that you have treated fully well so many subjects in your caste History. This clearly shows that you were working on the subject for years.

And my idea is that it will have a very good effect on our caste brothren. It will without any doubt turn their minds to grasp the right and to give up the wrong idea prevailing among them for years. If this is done then there is every hope for you of every further prospect for the future. If you have attained so much of your object then the brilliant success is in your favour.

I am to thank that you have crowned my labours with success.

CHAWDHRY KEWALSINGH KULLANSINGHJI VERMA, BEHRA.
Land Lord & Banker.

---

Bewar ( Rajputana ), 10-5-15.

The Panchas of my caste very earnestly wished to have Societies, Libraries and Schools of their own as those of other castes. I was conversing with them on this very subject when your letter reached me. The perusal of your letter infused their minds with great vigour and enthusiasm, so much so that they began to thank the Almighty in their ecstasy, for this kindness in creating in the mind of one of their fellowmen so great a fervour and zeal for their communtiy.

Thanking warmly for your great kindness.

BABUTTIRAM M. BHAITADA.
Mistry.

---

Allahabad, 26-8-1915.

I felt much pleasure in reading that you are preparing the History of the caste. I hope it would be an useful and interesting book. I shall always be pleased to help you in any matter required in this connection.

N. LALL SHEOLALL VERMA, MAHRAVANDIA.
Computor, High Court Division.

---

Agra. 4-11-1915.

The caste history's work undertaken by you has been much appreciated by all of us who wish you grand success in this respect which is purely in the interest of our community. With best wishes from us all and assuring you our personal help whenever it is essential.

Thanking you for such keen interest which you are taking in the welfare of our society.

INDERLALL JAGANNATHPERSHAD MAROTHIA,
Acctt, The General Assurance Society, Ltd.

---

Loni ( Poona ), 5-5-1915.

Mr. R. N. Malwal has explained to me the appreciated interst you have taken in describing the lineage with photos, and I am glad to tender you thanks worthy of it.

BHAW TUKARAMAJI BHERA,
Station Master. G. I. P. Ry.

---

Kowrampet ( Hydrabad Deccan ), 20-11-15.

I surprised to see your perseverance in getting information regarding our caste from different parts of India. I hope it must be interesting and very usefull to all.

PANDURANG KRISHNAJI PADVE,
Sub Divsional officer. N. G. S. Ry.

---

## श्री जाती प्रबन्धनी सलूक सभा दिल्ली.

दिल्ली, ता० ३०-१०-१५.

वहोत वर्षोंसे आपका नाम और कीर्ति सुन रहे हैं, आपने स्वबांधवोंकी सुधार करनेका प्रयत्न चलाया है, और हालमें भी आप अपने तन-मन-धन और बुद्धी सर्वस्व खर्च करके चारों ओरके अपने जातभाईयोंकी तरफसे तथा पौराणिक इतिहास ग्रंथोंसे सम्मतियोंकी मिलान करके जाति इतिहास लिखनेका जो सहारणीय प्रयत्न कर रहे हैं उसके वास्ते हम देहली रहीवासी जातीसमाज आपको कोटिशः धन्यवाद देते हैं, और आप सरीखे धर्मवीर दाताओंसे यह पवित्र कामकी सफलता होनेके वास्ते ईश्वर सन्निध प्रार्थना करते हैं.

इस जगतमें हजारों पवित्र नदियां हैं और अपनी ज्ञातीमें भी वहोतसे धनवान, विद्वान, परोपकारी, दानशूर हो गये हैं और हालमें भी मौजूद हैं, तथापि जिस प्रकार प्रयागमें एकही त्रिवेणी संगमको पवित्र माना जाता है वैसे ही हजारोंमें एकही धर्मवीर उत्पन्न होता है.

जिस प्रकारसे गुहकने अपनी नौकामें बिठाकर **श्रीरामचंद्रजी**को नदीके दूसरे किनारे पहुंचाकर आपकी कृपासे उद्धार कर लिया उसी माफक आप भी अज्ञानरूपी अंधःकारको नष्ट करके; ज्ञानरूपी सूर्यरश्मीके प्रकाशमें अपने समाजको प्रगट करनेका हेतूसे काम कर रहे हैं. आशा है और हम परमेश्वरसे प्रार्थना करते हैं कि हे जगचालक परमेश्वर तू इस जातीवीरके कार्यको सफल कर उसका और सब समाजका उद्धार कर.

हमारे ह्यां अभिमानसे दो पक्ष थे वो आपके विनयपूर्वक और उपदेशक दो शब्दोंसे हमारा सबका एक दील हो कर आपकु बडे आनं और खुषीके साथ ह्यांका समाजका फोटो ग्रूफकी दूसरी कापी भेजी है. सब समाजबांधवोंका और सभासदोंके तरफसे नम्रतापूर्वक रामराम स्वीकारना इत्यलम्.

समाज तर्फे आपका नम्र,

**गोपीनाथ मोहोरीलालजी अजमेरे**

**सभा मंत्री.**

---

## श्रीकुमावत क्षत्रिय जाती उन्नतिसभा.

बडनगर ( माळवा ), ता० ४-११-१९१५.

अपनी समाजकी इस मालवेमें करीब १५००० लोगसंख्या है, उनकी तरफसे और सभासदोंकी तरफसे मैं लिखता हूं के आप अनेक शोध खोज करके अपनी जातिका इतिहास लिखकर अपना और अपने जातिबांधवोंका एक समाज बनानेकी कोशिस करते हैं उसके लिये आपको जितने धन्यवाद दिये जायंगे उतने कम हैं.

धन्योऽस्ति तव मातुजननी धन्यो कुलं दीपकः
धन्योऽस्ति तव नामकीर्ति रतुला जात्यभिमान दृढा
सफलं ते भवेत् ईश्वरकृपा पायान् नृसिं हो विभु.

आप ज्ञानशोधसे अजब मेहनत और स्वखर्चसे जाती इतिहासके द्वारे उद्धार तो कर लिया और कालाक्ष्यके माफक जाति सुधारनेका उद्देश देखकर हम जो आपकु धन्यवाद देतें हैं वो बहुत अल्प हैं, धन्यधन्य आपकी बुद्धी.

आपका शुभचिंतक,

**केसूरामजी भवानीरामजी नैवाळ ( चऽहान ),**

सभाध्यक्ष, बेपारी.

---

## श्री शिल्पावत् जात्युन्नती सभा सवाई जयपुर.

जयपुर, ता. १६-४-१९१५.

बाबु रामचंद्रजी नरसिंगजी बडमुंडा कॉन्ट्रॅक्टर निमचसे आपके पास आकर आपने लिखा हुवा जातिका इतिहास पढलिया है, वे लिखते हैं कि आपके इतिहासका विषय रचना वगैरे बहुतही अच्छी है और आपकी लिये बडीभारी तारीफ करते हैं, ये सुनक

हमको बडा भारी आनंद हुवा, आप जो परोपकारका काम करते हैं इसे यह सभा आपको धन्यवाद देती हैं. ब. लक्ष्मीनारायण.

आपका कृपाभिलाषि

**लालचंद धनारिया ( गेहलोत )** प्रधान श्री. शि. जा. सभा.

जयपुर, ता. २०-४-१९१५.

आपको में बडा प्रेमसे निवेदन करतां हुं कि आपकी लिखी हुई हस्तलिखत अपनी जातिके इतिहासकी कापी जिन्होने देखी हैं वे आपका कामकी वडी भारी स्तुति करते हैं और जो विषय प्रतिपादन किये हैं उस्की सुचीपत्रक देखकर जिस कामकी समाजको वडी जरुरत थी उस्की पुर्ति आपही की, आप सरीखे धर्मवीरकु ईश्वर सुखी रक्खो, हम मानव देह धारण करके कुछ हुवा नहीं आपने वहुसमाजका कार्य करके अपने जन्मको सार्थ किया है.

आपका हितेच्छु

**लक्ष्मीनारायण रामविलासजी मणस्या,** जाहागीरदार.

સુરત તા० ૧૦-૪-૧૯૧૫.

આપની જ્ઞાતીનો ઈતીહાસ લખવાનું કામ તમે હાતમાં લીધુ છે એ સાંભળી અમારે ઘણો સંતોષ થયો છે. આ જ્ઞાતી ઉપયોગી અને ઉદ્ધારક કામ કરવા શારૂ અનેક પ્રકારની ઈતીહાસીક માહીતી મેળવાની અગત હતી. તેની જોખમ લઈ તમે કામ શરૂ કીધો છે તે માટે તમારે જેટલા ધન્યવાદ આપીએ તેટલા થોડાજ છે. આ પુણ્ય કામમાં અમારાથી બની શકે તે મદત ઘણી ખુશી સાથે આપશું. આવતા અઠવાડીઆં તમોને રૂબરૂ મળવાની ઉમેદ રાખું છું,

**લા. ભગવાનદાશ રતનજી રેબરૂ,** ભીસતરી.

पुणें, ता० २१-११-१५

ज्याची आपल्या जातीस मोठी गरज आहे असें कार्य आपण समयास अनुसरून केवळ निरपेक्षबुद्धीनें स्वीकारलें आहे, त्याबद्दल बहुजनांस जो आनंद व उपयोग होणार आहे त्याचें वर्णन मला मुळींच करतां येत नाहीं; इतकें तें अवर्णनीय आहे.

**हरि कृष्णाजी कुंडळवाल, सांगलीकर.** कंट्राक्टर.

औरंगाबाद ( दक्षिण ), ता० १६-३-१५.

आपलें पत्र येथील राजावटी व शेखावटीचे जातगंगेस वाचून दाखविलें त्याप्रमाणें इकडील मंडळीचे फोटो पाठविण्याचा विचार झाला आहे. लवकरच पाठऊन देऊं.

आपले पत्रापासून इकडील पंचमंडळीस जो आनंद झाला, तो लिहितां पुरवत नाहीं. आपण जातीकरितां इतके परिश्रम करीत आहांत ते परमेश्वर सिद्धीस नेणार समर्थ आहे. आपण इहलोकीं धन्य आहां कीं, सर्वकाल परोपकारांत तन मन धन खर्च करून झटत आहां तर श्रीहरी आपलेस दीर्घ आयुष्य करो. आह्मी आपले स्तुती करण्यास योग्य नाहीं. वेडींवाकडीं दोन अक्षरें लिहिलीं आहेत तीं मान्य व्हावीं हेच विनंती.

सर्व मंडळी तर्फे,

**सीतलजी भाऊ देवतवाल,** कँट्राटदार.

---

**नेरी ( खानदेश ).** ता. २२-९-१५.

श्रावण वद्य ८ गुरवार संवत् १९७१ रोजीं येथें एका उत्तरकार्यानिमित्तानें निरनिराळ्या ठिकाणाहून आलेली जातीची सुमारे १२०० मंडळी जमली होती; ज्या ज्या प्रसंगीं आणि ज्या ज्या स्थळीं आपल्या जातीचा जमाव जमत असतो त्या त्या समयीं कोणत्या ना कोणत्या तरी कीर्तिरूपानें आपलें नांव निघत असतें; त्याप्रमाणें याही वेळीं आपण आपल्या जातीचा इतिहास लिहीत आहांत त्यासंबंधानें विषय निघाला होता. त्या समयीं मी जमलेल्या मंडळीस आपलें पत्र वाचून दाखविलें; त्याच्या योगानें सुर्यकिरणानें जसा अंधःकार नाहींसा व्हावा तसा येथील अनांधःकारांत पडलेल्या लोकांच्या मनावर ज्ञानाचा प्रकाश पडला आणि त्यापासून जो सुपरिणाम झाला त्याचें वर्णन करण्यास माझी अल्पमतीची लेखणी अगदीं असमर्थ आहे. आपण जो ज्ञातीचा इतिहास लिहीत आहांत त्याचा मूळ हेतू व विचार बहुजनाला मान्य झाला; आणि त्यांनीं मला आपले जातीवर महत उपकार झाले आहेत असें लिहून कळविण्याची परवानगी दिली आहे; ह्मणूनच मी येथील जात समाजतर्फे आपणांस मोठ्या आनंदानें कळवित आहे कीं, आपण जे निरपेक्ष बुद्धीनें जातीपरोपकाराचें काम स्वीकारलें आहे तें अत्यंत महत्वाचें आहे. या इतिहासाच्या द्वारें खरोखरच आपला वर्ण, धर्म, आचार, विचार यांचें पूर्ण दिक्प्रदर्शन होणार आहे. आपल्या इतिहासापासून पुढें चांगलाच परिणाम होणार आहे; असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. आपण आपल्या मानव देहाचें योग्य सार्थक्य केल्याचें श्रेय आपणांस जरूर मिळणार आहे. आपण हातीं घेतलेलें कार्य निर्विघ्नपणें शेवटास जावो अशी सर्वत्रांची मनःपूर्वक परमेश्वराजवळ प्रार्थना आहे.

सर्वानुमतें,

**शिवराम लक्ष्मण चव्हाण, तेलपूरे.**

---

# आभारप्रदर्शन.

मी हा जो अल्पमतीनें स्वज्ञातीचा इतिहास लिहिला आहे तो कितपत लोकमान्य झाला आहे, हें पाहण्याकरितां हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणच्या परजातींतील धर्माधिकारी, जातिसंशोधक, इतिहासज्ञ, विद्वान वगैरे गृहस्थांकडे तसेंच धर्ममंडल, इतिहाससंशोधक मंडळ वगैरे संस्थांकडे त्यांच्या अभिप्रायार्थ याच्या छापील प्रती पाठविल्या होत्या, त्या सर्वांनीं आपला अमोल्य वेळ खर्च करून ग्रंथ वाचण्याची तसदी घेतली आणि आपले अभिप्राय दिले एतदर्थ मी त्यांचे अत्यंत कृतज्ञतापूर्वक येथें आभार प्रदर्शित करतों. इतर जे कोणी मजसारखे प्रयत्न करणारे असतील त्यांनाहि याच्या योगानें मोठेंच उत्तेजन मिळणार आहे.

आणखी, माझी अशी अत्यंत नम्रतापूर्वक विनंति आहे कीं, ज्या जातीचा इतिहास प्रसिद्ध झाला नसेल अशा जातीनें आपला वंश व कुळ यांची साग्र माहिती प्रसिद्ध करणें हा त्यांचा स्वजातिसंबंधीं आद्यधर्म व श्रेष्ठ कर्तव्यकर्म आहे; त्यापासून स्वजातीस व राष्ट्रासही विशेष उपयोग होणार आहे.

मला संस्कृताचें ज्ञान नसल्यामुळें मी एक गुजराथी शास्त्री ठेवला होता; त्याच्या चुकीमुळें या पुस्तकांत जे संस्कृत उतारे दिले आहेत, त्यांत कांहीं ठिकाणीं क्वचित् अशुद्ध राहिलें आहे, याबद्दल मला फार दिलगिरी वाटत आहे. शेवटीं, ज्या विद्वान गृहस्थांनीं आपला अमोल्य वेळ खर्च करून माझें पुस्तक वाचून पाहिलें आणि उपयुक्त सूचना केल्या त्याबद्दल पुन्हां एकवार त्यांचे आभार मानून येथें लेखणी खालीं ठेवतों.

आपला सर्वांचा कृपाभिलाषि,

**जी. बी. नाईक.**

# अभिप्राय

## आमची जात अर्थात् राजकुमार
किंवा
## कुमावत क्षत्रियांचा इतिहास.

या इतिहासांतील माहिती किती सयुक्तिक व ग्राह्य झाली आहे हें पाहण्याकरितां या पुस्तकाच्या कांहीं प्रति हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणच्या **धर्माधिकारी, इतिहासज्ञ, विद्वान** वगैरे प्रमुख गृहस्थांकडे पाठविलेल्या होत्या; त्यांच्याकडून जे अभिप्राय आले ते विस्तृत असल्यामुळें स्थलसंकोचास्तव समग्र घेतां आले नाहींत; म्हणूनच ते येथें संक्षिप्तामध्यें घ्यावे लागले आहेत.

---

### हिन्दू धर्म, वर्ण व्यवस्था मंडल, कार्यालय.

**फुलेरा**—जयपूर ता० १७ माहे जानेवारी सन १९१६.

आज हमें मान्यवर बाबू गनपतराय भीवाजी बैताडे, हार्नबी रोड, सिताराम बिल्डींग मुम्बईसे " कुमार " जातिसम्बन्धी महाराष्ट्रीय भाषा की सचित्र पुस्तक समालोचनार्थ व सम्मत्यर्थ प्राप्त हुई, जिसको देख कर हम उपरोक्त ग्रन्थकर्त्ता जी की प्रशंसाकिए विना नहीं रह सक्ते हैं, क्योंकि जिस अतुल परिश्रम व महान उद्योग के साथ आपने जो स्वजाति सेवा कियी है उसके लिए कुमार जातिको आपका कृतज्ञ होना चाहिये. पुस्तकके देखनेंसे ग्रन्थकर्त्ता जी की स्वजातिसेवा, स्वजात्यानुराग भले प्रकार झलकता है, इस पुस्तकके बीच बीच मे स्वजाति बन्धु वर्गोंके चित्र भी दिये गये हैं. कुमार ज़ातिके लिए पुस्तक उपयोगी है परन्तु पुस्तक मरहाठी भाषेमें होनेके कारण मरहाटी न जाननेवाले युक्त प्रदेशीय व राजपुताना प्रान्तर्गत सज्जनोंके लिए विशेष उपयोगी नही हो सक्ती, हा इसका अनुवाद हो जानेपर इस देश वासियोंके भी लाभकारी हो सकेगी.

परशराम जीके क्षत्रियसंहार व मुसलमानी अत्याचारके कारण जो क्षत्रियवंशको छिपाकर कही राज, कही राजकुमार, और कही कुमार कहाते हैं उनके लिए यह पुस्तक बडे काम की है. ये लोग कुमार कहाते कहाते अविद्यान्धकारके कारण कहीं कहीं ये ही प्रायः ' कुम्हार ' कहलाते हैं पूर्वकालमे ये खेतैड कुमारके नामसे प्रसिद्ध थे ते ही आज कल खेतैड कुम्हार कहाते हैं इन्हीके लिये यह पुस्तक लाभकारी है. यह राजकुमार जाति जिसकेकि विषयमे यह किताब लिखी गई है उस वंशका आदि पुरुष बीर यारसिंव्ह हुवा है जो दिल्लीके बादशाह **पृथ्वीराज चौहा-**

नके भाई राजा कुन्ध राजके वंशमेंसे है. वीर सिंव्ह का जन्म सांभर नगरमे हुवाथा Mr. C. S. W. C. × × × Late Collector Unuao
मिस्तर सी. एस. डब्ल्यु. सी. × × × पूर्व कलेक्टर उन्नाव अपने ग्रन्थके पृष्ठ २१६ मे ऐसा लिखते हैः—

The Raj-Kumars, through Bariyar Singh claim direct descent from Raja Kundh Raj, brother of Prithivi Raj of Delhi. इस अंग्रेजी लेखका भावार्थ तो हम उपर लिखही आये है अंतः पुनः यहा लिखना निरर्थकसा है इस जातिके विषयमे हम अपने रचे हुये जाति–प्रन्वेषण प्रथम भागमे बहुत कुच्छ लिख आये हैं तथापि बहुत कुच्छ लिखना भी बाकी है वह सब शेष विवरण भविष्यतमे छपनेवाले सत खण्डी ग्रन्थमे लिखेंगे.

लोकहित सेवी

**श्रोत्रिय छोटेलाल शर्म्मा.**

महामंत्री हिंन्दू धर्म वर्ण व्यवस्था मंडल, फुलेरा—जयपूर स्टेट.

---

श्रीयुत हरिचरणसिंव्ह चौहान, '**क्षत्रियवंशमणिमालाका**' संपादकः—

**अजमेर** ( राजपुताना ) ता. १–८–१६

**आमची जातः**–इस पुस्तकपर आपने मेरी सम्मति मांगी है उसका विशेष धन्यवाद. पुस्तक आपके सजातियोंके लिये लाभदायक है. आजकल समस्त जातिया उन्नति कर रहीं है फिर, आपकी जाति उन्नति क्यों न करे ? अस्तु. यद्यपि भारतवर्षमें चार वर्णकी सृष्टि चिरकालसे हैं पर मनु, आदिकोंके लेखानुसार, आपद्धर्म्मके समय तथा अनुलोम प्रतिलोमतासे प्रत्येक वर्णकी अनेक जातियां हो गई है. सम्भव है, आपकी जाति भी इसी प्रकार क्षात्रियवंशसे हो. पर अभी-तक ख्याल यह था कि ब्रम्हासे भी पूर्वमें आपकी जाति पैदा हुई थी और इसी कारण ब्रह्माको कुम्हार ( कुमार ) की उपमा दी गई थी, आपके लेखानुसार सह-स्त्रार्जुन के और परशरामजी के युद्धके पीछे आपकी राजकुमार जातिने शिल्पीकर्म ग्रहण कर कुमावत पदवी पाई. पर जिस समयका आप जिकर करते है उस समय चौहान, गेहेलोत, राठोर, पडिहार, प्रमार आदि नामके क्षत्रिय कुलोंका नाम नहीं था, केवल १०, ११ सो वर्षों से ऐ नाम क्षत्रियों के हुए है. मुख्य मनुष्योंके नामसे, अथवा देसके नामसे.

**हरिचरणसिंव्ह चौहान.**

---

Rai Bahadoor Balkrishana Atmaram Gupte, F. Z. S., late Assistant Director of Ethnography for India; and now Curator Victoria Memorial Collection, and Assistant Secretary Victoria Memorial Trustees Calcutta:—

कलकत्ता; ता. ६ जानेवारी १९१६

आपला उद्योग स्तुतीस पात्र आहे. जातीचा इतिहास ज्याचा त्यानें लिहिणें हें अगदीं अवश्य आहे. परजातीची निंदा करून त्यांना खालच्या पायरीवर ढकलण्याची आमच्यांतील कांहीं लोकांस खोड जडली आहे. तिचे निवारण करण्यास हा एकच मार्ग खुला आहे.

जातींतील पोट भेद एकत्र करणें, जातींत विद्यावृद्धि करणें व परस्पर दळण वळण वाढविणें या कामीं आपला प्रयत्न बराच फळास आलेला दिसतो, व त्याबद्दल आपली कीर्ति चिरकाळ राहील.

**बाळकृष्ण आत्माराम गुप्ते.**

**सुचनाः**—मारवाडचे सेन्ससचे साल १८९९ चे ठिकाणीं सन १८९१ असावें.

---

रावबहादुर काशिनाथ नारायण साने बी. ए. माजी प्रिन्सिपाल पुना हायस्कूल, व अनेक ऐतिहासिक ग्रंथांचे कर्तेः—

बदलापूर रेल्वे स्टेशन, ५।२।१६

'**आमची जात**' नांवाचें पुस्तक रा. गणपतराव भिवाजी बैताडे यांनीं लिहून त्याची छापील प्रत पाठविली ती पाहिली. या पुस्तकांत त्यांनीं आपल्या जातीची इत्थंभूत हकीगत देण्याचें योजिलें आहे. प्रत्येक जाती आपली मुळापासून हकीकत साधार अशी तयार करून प्रसिद्ध करील, तर त्या जातिकथांचा एकंदर देशाच्या इतिहासाच्या कामीं बहुत उपयोग होईल असें माझें मत एका प्रसंगीं मी बोलून दाखविलें होतें त्यास आज वीस वर्षांवर दिवस होऊन गेले. आतां गणपतरावांनीं पुष्कळ शोध करून आपल्या जातीची कथा लिहिली ती पाहून परम संतोष झाला. या पुस्तकांत रा. बैताडे यांनीं जागोजाग आपल्या जातीबांधवांस उत्तम उपदेश केला आहे; त्याप्रमाणें त्यांचे जातभाऊ वागतील तर दिवसें दिवस उत्कर्ष होईल यांत संशय नाहीं पुस्तकांत स्वजातींतील पुढारी पुरुषांचीं चित्रें दिलीं आहेत त्या योगें जातींतील लोकांस पुष्कळ उत्तेजन येणार आहे. अशा प्रकारें इतर जातींतिल लोक प्रयत्न करून आपापल्या जातीचे वृत्तांत लिहितील तर किती नामी काम होईल !

**काशिनाथ नारायण साने.**

---

**श्रीयुत गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए. माजी राजकुमार शिक्षक बडोदा, हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास, मराठी, मुसलमानी व ब्रिटिश रियासतिचे कर्तेः—**

**बडोदें,** ८ जानेवारी १९१६.

वि. वि. आपण केलेलें "**आमची जात**" हें पुस्तक मजकडे अभि-

प्रायार्थ पांठविलें, त्याबद्दल मी आपला फार आभारी आहें. **आपला उद्योग व ज्ञानार्जनाची कळकळ हे गुण पाहून धन्यता वाटते**; आणि प्रत्येक ज्ञातींतील पुढारी मंडळी असाच उद्योग आपआपल्या ज्ञातीसंबंधीं करतील तर आपलें एकंदर राष्ट्र फार लवकर उदयास येईल. हल्लीं निरनिराळ्या जातींच्या मनांत आपआपल्या उन्नतीसंबंधानें विचार येऊं लागले आहेत, हें राष्ट्राच्या भावी उत्कर्षाचें सुचिन्ह होय. ज्यानें त्यानें आपली उन्नति आपण करून घेतली पाहिजे, लोक आपणांस मदत करतील ह्या भावनेनें स्वस्थ बसणें योग्य नाहीं. आपल्या पुस्तकावरून हीच गोष्ट मुख्यतः निदर्शनास येते.

पुस्तक मी मोठ्या उत्सुकतेनें वाचून पाहिलें. आपल्या समाजाची संख्या व दर्जा ह्यांची आजपावेतों मला यत्किंचित कल्पना नव्हती. चार लक्ष उच्च ज्ञातीचे लोक देशाच्या अफाट प्रदेशांत **स्वत्व** विसरून गडप झालेले आहेत हें पाहून मोठा खेद वाटतो. **आपल्या पुस्तकानें त्यांच्या ठिकाणीं स्वत्वासंबंधानें जागृति उत्पन्न होईल अशी मला आशा आहे.**

निरनिराळ्या प्रांतांत पसरलेल्या एकाच जातीच्या आचाराविचारांचा पूर्ण शोध करून जी माहिती आपण एकत्र जमविली आहे ती तर **फारच उपयुक्त असून** मला वाटतें, प्रत्येक जातीसंबंधानें असा उद्योग सुरू होईल, तर आपल्या ह्या अफाट देशांतील निरनिराळ्या लोकांची फारच उत्कृष्ट माहिती बाहेर येईल आणि सर्वांच्या मुळाशीं विलक्षण ऐक्य आहे हा प्रकार उघड होऊन, आपल्यांतले भेदभाव पुष्कळ अंशीं नाहींसे होऊं लागतील. आपल्यासारखाच उद्योग करण्याची इतर जातीचे पुढाऱ्यांस सुबुद्धि व्हावी, एवढीच इच्छा आहे.

जातीच्या न्यायाची पद्धत आपण वर्णिलेली अगदीं बरोबर आहे. ज्यानें त्यानें आपले हक्क संभाळण्यास जपलें पाहिजे; आणि ही जबाबदारी अंगीं येण्यास विद्येचा प्रसार झाला पाहिजे. सबब पहिलें काम विद्या प्रसाराचें आहे. हें आपल्यासहि कबूल आहेच, त्या धोरणानें आपण जी सभेची नवीन योजना दिली आहे, तिच्यांत अनुभवानें व व्यवहारानें कित्येक फेरफार करावे लागतील; आणि ह्यासंबंधांत इतर जातींचे अनुभवहि एकमेकांस कांहीं अंशीं उपयोगी पडतील. प्रयोगादाखल सभेची **नवीन** योजना आपण ठेवली तें ठीकच आहे.

सुंदर चित्रें व ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांची नामावळी वगैरे देऊन तयार केलेलें हें पुस्तक आपण सर्व ठिकाणच्या मोठमोठ्या लायब्ऱ्यासहि पाठवावें, म्हणजे तें लोकांच्या नजरेस येऊन त्याचा उद्देश सफल होईल. बडोद्याच्या सेंट्रल लायब्ररींत हें पुस्तक घेण्याविषयीं मी कळवीत आहें.

पुस्तकाचें नांव ' आमची जात ' असें न ठेवितां " **कुमावत क्षत्रियांचा वृत्तान्त** " अशा प्रकारचें कांहीं तरी ठेविलें असतां एकदम जास्त बोध होईल असें मला वाटतें.

**गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए.**

**रावबहादुर पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी,** जे. पी, एफ. आर. जी.एस:—
मुंबई, ता. १७ जानेवारी १६

हल्लींचा मनु असा आहे कीं, सर्व जातींनीं आपापली उन्नति करून घेतली पाहिजे; आणि असें झालें तर राष्ट्रहिताचें कार्य अधिक सोपें होईल. मूल स्थलांवरून, देशांवरून जाती जातींत तट पडल्यामुळें, आचारविचारांच्या भिन्नत्वामुळें स्थलांतरामुळें, व अशाच अत्यंत क्षुल्लक कारणांवरून मूळच्या चातुर्वर्ण्यांत अनेक भेद व तट पडून चारांच्या चार हजार जाती झाल्या आहेत. ही स्थिती राष्ट्राच्या घटनेस व ऐक्यास विघातक आहे. म्हणून आपली स्वतःची व ज्ञातीची उन्नति करून चातुर्वर्ण्याकडे जातिभेदाचा ओघ वळविण्याचा जे प्रयत्न करितात ते स्तुतीस पात्र आहेत. आपण दिलेल्या माहितीवरून आपल्या जातीचे मूलस्थान कोठें होतें हें निश्चित ठरवितां येत नाहीं, तथापि **आपले पूर्वज क्षत्रिय असावे असें मानण्यास हरकत दिसत नाहीं.**

**पुरुषोत्तम बाळकृष्ण जोशी.**

---

श्रीयुत त्रिंबकराव वासुदेव गुप्ते, वकील, अध्यक्ष चांद्रसेनीय कायस्थ प्रभू सोशिअल क्लब आणि Ethnographical Notes on Chandraseniya Kayastha Prabhu या इंग्रजी पुस्तकाचे कर्तेः—

पुस्तक चांगलें आहे. **एथनोग्राफिक रिचर्स** या दृष्टीनें अशीं पुस्तकें प्रत्येक जातीनें आपआपल्या जातीसंबंधी तयार केल्यास सर्व लोकांचा इतिहास नव्या दिशेनें लिहिल्याचें श्रय मिळेल.

**त्रिंबकराव वासुदेव गुप्ते.**

---

रावबहादुर दत्तात्रय बळवंत पारसनीस, इतिहासज्ञ व अनेक ऐतिहासिक ग्रंथाचे कर्तेः—

सातारा, ता. २८ । १ । १६

वि. वि. आपलेकडून आलेलें ' **आमची जात** ' हें पुस्तक वाचून पाहिलें. आपण ह्या पुस्तकांमध्यें आपल्या जातीची जी माहिती दिली आहे, ती पुष्कळ उपयुक्त व वाचनीय आहे. इतिहासदृष्ट्या तिचें निरिक्षण करण्याचा काल अद्यापि आला नाहीं. परंतु तिचा इतिहास लिहिण्याचीं सर्व साधनें उपलब्ध करून तीं लोकांपुढें मांडण्याचा प्रयत्न पहिल्यानें झाला पाहिजे. तो स्तुत्य प्रयत्न आपण करीत आहां, हें पाहून संतोष वाटतो. अशा प्रकारच्या प्रयत्नांत कांहीं दोष राहणार हें उघड आहे, परंतु त्या योगानें त्या प्रयत्नांची किंमत कमी होत नाहीं.

**द. ब. पारसनीस.**

---

શ્રીયુત પટેલ માંદન રામજી ' કુમારજ્ઞાતીપ્રકાશ ' નુ કર્તાઃ—

કચ્છ, અંજાર; તા. ૧૭-૧-૧૬

' આમચી જાત ' એ પુસ્તક ખરેખર પ્રશંસા પાત્ર છે, અને તેના કર્તાની બાહોશી સ્તુતિ પાત્ર છે. એમ કેહેવામા અમો જરા પણ સંકોચ ખાતા નથી. મિ० બૈતાડેનુ અનુકરણ કરી ભારતવાસી દર એક જ્ઞાતીના સાક્ષરો પોતાની સ્વજ્ઞાતીનો પ્રાચીન અર્વાચીન અને આધુનિક ઇતિહાસ અને રીતીરીવાજો સુલભ રીતે છપાવ વાનુ કરશે તો તેથી જ્ઞાતીબંધુંઓને આશીર્વાદ રુપયઇ પડશે.

પટેલ માંડન રામજી.

કવી ગૌરીશંકર જયશંકર વોરા.

---

प्रो. वामन गोविंद काळे, एम. ए., फर्ग्युसन कालेजांतील इतिहासाचे प्रोफेसर आणि भारत इतिहास संशोधक मंडळीचे सभासद इ. इ.

पुणें, ता. २१ जानेवारी १९१६.

अलिकडे हिंदुस्थानांत निरनिराळ्या वर्णांच्या व जातींच्या लोकांमध्यें जागृति उत्पन्न होऊन आपल्या उन्नतिप्रीतर्थ्य त्यांचे प्रयत्न चालले आहेत ही अभिनंदनीय गोष्ट आहे. नुसत्या हिंदु समजांतील भिन्न भिन्न वर्णांचा विचार केला असतां, त्यामध्यें असंख्य जाति आणि पोटजाती निर्माण झाल्या आहेत व त्या जन्मसिद्ध कर्तव्याप्रमाणें उच्च व नीच अशा लेखल्या जात आहेत असें दिसून येईल. चातुर्वर्ण्य मूळ कोणत्याहि परिस्थितींत किंवा कोणत्याहि कारणानें स्थापन झालें असो, आज त्याचे हजारो भेद आणि पोटभेद झाले आहेत आणि त्यांच्यामध्यें सामाजिक उच्च नीचत्वाच्या ज्या कल्पना रूढ झाल्या आहेत त्या अत्यंत अनिष्ट, अनावश्यक आणि हानिकारक आहेत ह्यांत संशय नाहीं. मनुष्य विवक्षित कुळांत जन्मास आला म्हणून त्यास विविक्षित धंदा करावयास लावणारीं आणि त्याच्या आनुवंशीय धंद्यावरून व जातीवरून त्यांस समाजांमध्यें ठरलेलेंच स्थान देणारी व्यवस्था सारासार विचारास पटण्यासारखी नाहीं. सध्यांच्या परिस्थितींत व देशांत होणाऱ्या विचारक्रांतींत असली समाजव्यवस्था टिकणें शक्यच नाहीं आणि त्याचप्रमाणें तिची उत्क्रांति होत असल्याचें आपणांस चोहोंकडे दिसून येत आहे. मनुष्यांच्या गुणाप्रमाणें व कर्माप्रमाणें त्यांचा समाजांतील दर्जा निश्चित असला पाहिजे; असें होईल तरच हिंदू समाजाची प्रगति होण्याची आशा आहे.

प्रत्येक जातीनें आपली स्वतःची सुधारणा करण्याची खटपट केल्यास प्रगतीचा मार्ग बराच सुलभ होण्याचा संभव आहे व शिक्षणाच्या प्रसारास त्याचें सहाय्य होऊन सध्यांच्या उचनीचत्वाच्या खोट्या कल्पनांचें निर्मूलन होण्यास ही परिस्थिति अनुकूल होण्यासारखी आहे. हिंदुस्तानांतील निरनिराळ्या जाती सर्व देशभर पसरल्या असून त्यांस आपल्या पूर्वेतिहासांचें विस्मरण झालें आहे. त्यांच्या

शाखा देशाच्या निरनिराळ्या भागांत जाऊन राहिल्याकारणानें त्यांची एकमेकांची ओळखहि नाहींशी झाली आहे. असल्या जातींचें जरी एकीकरण झालें तरी पुष्कळ कार्यभाग होण्यासारखा आहे व बेटीव्यवहारक्षेत्र आकुंचित झाल्यामुळें होणाऱ्या अडचणी नाहींशा होण्यासारख्या आहेत.

मुंबईच्या प्रसिद्ध जी. बी. नाईक कंपनीचे मालक श्री. गणपतराव ह्यांनीं आपल्या स्वतःच्या जातीसंबंधाची शक्य तेवढी माहिती मोठ्या परिश्रमानें मिळवून ती 'आमची जात' ह्या पुस्तकांत एकत्रित केली आहे. कै० वा० श्री० नंदरामजी नाईक, कै० श्री० रा० ब० भाऊसाहेब मनसाराम वगैरे त्यांची जातीची मंडळी गवंडी जातीची आहे अशी सामान्य समजूत आहे. ती खोटी असून आपण वस्तुतः रजपूत व क्षत्रिय आहों असें श्री. गणपतराव ह्यांनीं आपल्या पुस्तकांत दाखविलें आहे. त्यांच्या जातीचीं अनेक कुटुंबें राजपुताना, माळवा वगैरे ठिकाणीं असून त्यांनीं केलेल्या शोधांवरून, हे सर्व मूळचे रजपूत लोक कालचक्राच्या फेऱ्यांत सांपडून देशाच्या निरनिराळ्या भागांमध्यें गेले व उदरनिर्वाहार्थ भिन्न भिन्न व्यवसाय करूं लागले असें दिसून येतें. पुस्तकांत ग्रंथकर्त्यांनीं आपल्या जातीच्या भिन्न भिन्न कुळांची, त्यांच्या रीतिरिवाजांची वगैरे हकीगत दिली आहे, तीवरून त्या सर्व कुळांचा उगम एकच असावा व तीं मूळ क्षत्रिय असावीं असें अनुमान काढण्यास हरकत वाटत नाहीं. स्वतःस हलकें म्हणून घेण्यांत कोणासहि तिटकारा येणें ह्यांतच प्रगतीचें बीज आहे. ज्या त्या जातीनें सामाजिक उच्चत्वास हक्क सांगावा हें विपरीत दिसतें, परंतु गुणकर्मानें मनुष्य उच्च असल्यास त्यावर हीनत्वाचा कायमचा छाप मारण्याचा समाजास अधिकार नाहीं. उत्तर हिंदुस्थानांतील व दक्षिणेंतील आपले ज्ञातिबंधु हे एकच आहेत व दोघेहि मूळ रजपूत होत, ह्या श्री. गणपतरावांच्या विधानाची सत्यता त्यांच्या पुस्तकांत दिलेल्या माहितीवरून वाचकांस पटण्यासारखी आहे. ह्यास बलवत्तर प्रमाण म्हटलें म्हणजे त्यांच्या उत्तर हिंदुस्थानांतील बंधूंनीं ही एकज्ञातित्वाची कल्पना पूर्ण चौकशीअंतीं मान्य केली आहे हें होय. जास्त शोध केल्यास सदरहू विषयासंबंधानें अधिक महत्त्वाची व विश्वसनीय माहिती उपलब्ध होण्याचा संभव आहे आणि ग्रंथकर्त्याच्या सिद्धांताची उभारणी ऐतिहासिक पुराव्याच्या बलवत्तर पायावर करतां येण्यासारखी आहे. तथापि श्री. गणपतराव ह्यांनीं विलक्षण परिश्रम करून व अनेक अडचणींस न जुमानतां 'आमची जात' हें पुस्तक लिहून प्रसिद्ध केलें ह्याबद्दल त्यांचें अभिनंदन करणें जरूर आहे. पुस्तकाचा ग्रंथकर्त्याच्या जातीच्या उन्नतीस उपयोग होईल अशी आम्हांस उमेद आहे.

वामन गोविंद काळे.

प्रो. हरि गोविंद लिमये, एम. ए., फर्ग्युसन कॉलेज, सभासद **भारत** इतिहास संशोधक मंडळः—

फर्ग्युसन कॉलेज पुणें, ता. २६ जानेवारी १९१६

" आमची जात " हें पुस्तक वाचून पाहिलें. आपला उद्योग स्तुत्य आहे. आपण आपल्या जातीविषयीं जी माहिती दिली आहे, ती मिळविण्यास आपणाला फार खटपट करावी लागली असेल. पण त्या योगानें सर्व हिंदुस्थानभर पसरलेल्या आपल्या जातीच्या मंडळींना आपण एक आहोंत असें वाटावयाला लागलें हें आपल्याला मोठें समाधान आहे. आपण दिलेलें चालीरीतींचें वर्णन ह्या कामीं विशेष उपयोगी पडेल. आपण आपल्या पुस्तकाला पायवाट हें नांव यथार्थ दिलें आहे. तेथेंच पुढें आपल्या जातीच्या विशेष चिकित्सक बुद्धीनें लिहिलेल्या इतिहासाचा राजरस्ता तयार करण्यास एखाद्या गृहस्थाला आपल्या उपक्रमानें उत्तेजन मिळालें म्हणजे आपले परिश्रम फलद्रूप होतील.

**प्रो. हरि गोविंद लिमये.**

---

श्रीयुत नरसिंव्ह चिंतामण केळकर बी. ए. एल. एल. बी. संपादक **केसरी** आणि " **मराठा**, ":-

पुणें, ता. १८।१।१६.

सा. न. वि. आपलें पुस्तक पाहिलें. पुस्तकांतील माहिती पुष्कळ परिश्रमानें मिळविलेली असून लेखकाचा हेतु आत्मोद्धाराचा म्हणून अत्यंत स्तुत्य आहे. स्वजातिविषयीं योग्य अभिमान बाळगणें व तिला नांवरूपास आणणें हें प्रत्येक मनुष्याचें कर्तव्य आहे. आपल्या प्रयत्नाबद्दल मीं आपलें अभिनंदन करितों.

**न. चि. केळकर.**

---

*Mr. N. N. Phadake*, B. A. Head Master B. J. High School Thana, and Author of the *History of the Reign of Queen Victoria*. ( राणीचे राज्याचा इतिहास. ):—

Thana, 8—1—16

Your's is an extremely laudable effort in a very desirable direction and you have earned thereby not only the deep gratitude of all the members of your community, but set a worthy example to other community, for which you deserve great praise.

N. N. Phadke, B. A.

---

श्रीयुत गोपाळ दाजीबा दळवी, संपादक **मराठामित्र**:—

मुंबई; ता. ११।२।१६.

हें पुस्तक समग्र वाचलें. सदर पुस्तक लिहून आपण आपल्या ज्ञातीचें क्षत्रियत्व सिद्ध करण्यासंबंधानें जे प्रयत्न केलें आहेत ते अत्यंत अनुकरणीय आहेत यांत संशय

नाहीं. जात ही कांहीं ईश्वरनिर्मित नाहीं. ती आपल्या प्राचीन पूर्वजांनीं आपआपल्या सोईसाठीं निर्माण केलेली होती व तींतच त्यांस गोडी लागल्यामुळें त्या जातीचे लोक गणले गेले व ती वर्णपरंपरा ठरली गेली. यावरून नीच धंदा स्वीकारला म्हणून त्या ज्ञातीचे लोक नीचच ठरले पाहिजेत असें नाहीं. प्रत्येकास आपली उन्नति करून घेण्याचा पूर्ण अधिकार आहे व त्याच्या आड कोणीही येणार नाहीं. असो.

आपण सदर पुस्तकाच्या पूर्वतयारीसाठीं जो प्रवास केला व शोधकबुद्धीनें जी माहिती मिळविली ह्याबद्दल मी आपलें अभिनंदन करीत आहें. आपल्या ज्ञातीसाठीं झटणारे असेच पुरुष निर्माण होणें अत्यंत अगत्याचें आहे. आपण सदर पुस्तकामध्यें ' **कुमावत** ' क्षत्रिय हेच सध्याचे '' कुंभार '' होत अशासंबंधानें जी व्युत्पत्ति दिली आहे ती संभवनीय अशी आहे. + + कुंभार ही जात क्षत्रिय वर्णाची असली पाहिजे, कारण राजस्थानामध्यें पूर्व काळीं ज्या भयंकर वावटळी उठल्या त्या वावटळींमध्यें अनेक फेरफार झालेले आहेत. कैक कुटुंबें देशोधडीस लागलेलीं आहेत. क्षत्रिय वर्णी लोकांनीं आपल्या आपत्तीच्या निवारणार्थ अनेक नीच धंद्यांत शिरून आपले प्राण वांचविले आहेत. ते ज्या ज्ञातीमध्यें शिरले तीच त्यांची जात पुढें ठरली गेली असें झालें आहे. आपल्या कुंभार ज्ञातीचेंही असेंच झालें असलें पाहिजे. ही जात क्षत्रिय वर्णाचीच असावी असें मलाही वाटतें. टॉड साहेबांनीं आपल्या राजस्थानच्या इतिहासांत ' जेसलमीर ' राजघराण्याची जी पूर्वपीठिका दिलेली आहे तींत ह्या गोष्टीचा आधार मिळतो. भट्टीकुळ हें यदुकुलापासून उत्पन्न झालेलें आहे. ह्या कुळामध्येंच शालिवाहनाची उत्पत्ति झालेली आहे. ह्या वंशांतील मंगळराव ह्या नांवाच्या राजास भाजमराव, कल्हराय, मूळराज, शिवराज फूल आणि केवळ असे सहा पुत्र होते. यावर गजनीच्या टुंडी राजानें स्वारी करून त्याचें राज्य घेतलें त्यावरून तो राजा आपल्या पुत्रासह पळून गेला. त्या वेळीं टुंडी राजानें त्यांस शोधण्यास अत्यंत प्रयत्न केले. परंतु लोकांच्या राजनिष्ठेनें त्यांचा प्राण बचावला गेला. लोकांनीं त्या राजपुत्रांपैकी चौघांस जाटांचा पहेराव देऊन वांचविलें. त्यांवरून त्या राजानें त्यांची जाट कन्यांबरोबर लग्नेंहि लावून दिलीं आहेत. व फूल आणि केवळ यांस ते कुंभाराचे पुत्र आहेत असें सांगून वांचविलें. ++ आपण रीतीरिवाजांची माहिती दिली आहे तीही संतोषकारक आहे. एकंदरींत आपला प्रयत्न स्तुत्य व अभिनंदनीय असा आहे. **गोपाळ दाजीबा दळवी.**

---

श्रीयुत रामचंद्रराव विठ्ठलराव वंडेकर जनरल सेक्रेटरी, **मराठा शिक्षण परिषद**:—

सुंबई, ता. ४ फेब्रुवारी सन १९१६.

रा. रा. गणपतराव भिवाजी नाईक यांचा ' **आमची जात** ' हा ग्रंथ

वाचण्याचा सुयोग मिळाला. हा ग्रंथ ऐतिहासिक माहितीनें परिप्लुत असून इतिहाससंशोधकांस याचा बराच उपयोग होईल. रा. नाईक यांनीं ह्या ग्रंथप्रकाशाचे कामीं पुष्कळ वेळ श्रम व पैसा खर्च करून सरस्वती देवीची उत्तम सेवा केली आहे याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करितों. रा. नाईक यांजसारखी ज्यांस सर्व गोष्टींची अनुकूलता आहे, अशांनीं या नवीन पद्धतीचीं स्मारकें करणें म्हणजे पुढील पिढीस उत्तम वळण घालून देण्यासारखें आहे. विद्येंत मागासलेल्या वर्गात जागृति होत आहे, हें नाईक यांजसारख्यांच्या प्रयत्नाचें उत्तम द्योतक आहे. ज्ञातिज्ञातीच्या इतिहासापासून सर्व ज्ञाति एके काळीं उन्नत स्थितींत होत्या व अज्ञानत्वामुळें त्यांचा ऱ्हास झाला हें अशा प्रकारच्या इतिहासानें समजतें. मागसलेल्या वर्गांमध्यें इतिहासकार निर्माण होऊं लागले हें भावी प्रगतीचें सुचिन्ह होय.

**रामचंद्रराव विठ्ठलराव वंडेकर.**

---

श्रीयुत गोविंद बळवंत बाकळे " **क्षत्रिय महात्म** " कर्तेः—

सोलापूर; ता. ६।१।१६

" **आमची जात** " हें पुस्तक पोंचलें. त्याचा आभारयुक्त स्वीकार करून समग्र वाचून पाहिलें. कुमार आणि कुमावत क्षत्रिय लोकांना स्वजातीच्या इतिहासाची चांगलीशी ओळख पटवून देणारें आहे.

**गोविंद बळवंत बाकळे**

---

**॥ श्री विश्वेश्वर प्रसन्न ॥ श्री महाक्षेत्र काशी**

गौब्राह्मण प्रतिपालक रा० रा० नाईक साहेब यांस अनके आशिर्वाद. आपणांस कळविण्यांत येत आहे कीं, आमच्या पुरातन चोपड्या पाहतां त्यांत आपली जात ही क्षात्रिय वर्णापैकीं **कुमावत** अथवा **राजकुमार** आहे., आणि या जातीचें आम्ही या क्षेत्रांतील तीर्थोपाध्यये आहोंत. पौष व ॥ ३० दुर्गा घाट' भट कचेरी.

श्री कापिलेश्वर महादेवाच्या देवळाजवळ. **रामचंद्र उर्फ रामभाऊ गंगाधर देव**

**वामन गंगाधर देव.**

---

श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर, पौष व॥ १० शके १८३७.

श्रीक्षेत्र त्रिंबकेश्वर हें ज्योतिर्लिंगांपैकीं एक असून येथें नारायण नागबळी, क्षौर, श्राद्ध वगैरे धर्मकर्मे होत असतात. येथेंच गोदावरीचा उगम झाला आहे. तिचें मुख पुण्यांतील राजकुमार अर्थातच कुमावत रजपूत क्षत्रिय ज्ञातींतील कै. श्री. रा. ब. भाऊसाहेब मनसाराम नाईक धवारे यांनीं बांधलें आहे. यांच्या ज्ञातीचा

मी येथील क्षेत्रउपाध्याय आहें; आणि ही वृत्ति आज :शेंकडों वर्षांपासूत आमच्या घराण्यांत चालत आली आहे.

त्र्यंबक गोपाळ तानपाठकी.

---

श्रीक्षेत्र नाशीक पंचवटी, रविवार पेठ घरनंबर २२, पौष वा। ११ शके १८३७ तारीख ३० जानेवारी १९१६.

या क्षेत्रास यात्रेकरू तर येत असतात, परंतु सिंहस्थ पर्वणींत सर्व देशांतील हिंदुधर्म अभिमानी सर्व जातीचा मोठा मेळा जमत असतो. मी वाडवडिलापासून कुमावत रजपूत जातीचा तीर्थउपाध्याय आहें. करितां आपल्या जातीच्या इतिहासांत माझ्या नांवाची नोंद झाल्यास उत्तम होणार आहे. हेंच आशीर्वाद.

रघुनाथ अनंत बेळे.

प्रसिद्ध पंडित राजारामशास्त्री ज्योतिषी, नित्यानित्यविवेक व सामुद्रीक दीप ग्रंथकर्तेः—

पुणें ता. ७ माहे मार्च सन १९१६.

आपलें "आमची जात" अथवा कुमावत क्षत्रिय ज्ञातीचा इतिहास हेंपुस्तक मननपूर्वक समग्र वाचलें. हें पुस्तक तुमचे जातीस अज्ञानामुळें आलेला गौणपणा दूर करणारें व स्वज्ञातीस त्याच्यामुळें संस्कृतीचें ज्ञान देऊन क्षत्रिय कुलाभिमान उत्पन्न करण्यास उपयुक्त आहे.

" स्वधर्मो निधनं श्रेयः " या गीतेंतील वाक्याप्रमाणें या ग्रंथाच्या योगें तुमचे ज्ञातिबांधवांस आपण कोण आहों व आपण वर्णाश्रमधर्म कोणता पाळावा व त्या योगें इहलोकीं आत्मोन्नति करून घेऊन परलोकींही तरणोपाय कसा करून घ्यावा हें जाणण्यास उत्कृष्ट साधन प्राप्त झालें आहे यांत संशय नाहीं. कुमार म्हणजे राजपुत्र हा अर्थ बरोबर असून तेच कमकुवत झाल्यानें कुमावत या नांवास पात्र झाले असावे असें मला वाटतें. आपण कुमावत या शब्दांतील कु हें अक्षर पृथ्वीवाचक धरून कुमावत म्हणजे पृथ्वीचें दुष्टांपासून रक्षण करणारे क्षत्रिय असा केलेला अर्थ योग्य दिसतो. या नांवानें उत्तर खंडांत आजमित्तीस तुमची ज्ञात नांदतही आहे हा उत्कृष्ट पुरावाच होय. या पुस्तकाच्या योगें आपण परिश्रम करून स्वज्ञातीचें अत्यंत महत्त्वाचें कार्य केलें आहे व ही तुमची सेवा ज्ञातीस उद्धारण्याचें पुण्य संपादन करण्याइतकी श्रेष्ठ आहे असें मानण्यास हरकत नाहीं.

राजाराम शास्त्री ऋषी.

---

श्री.

## श्रीमज्जगद्गुरु शंकराचार्य पीठ करवीर ( कोल्हापुर ).

श्रीयुत रा. रा. गणपतराव भिवाजी वैताडे ऊर्फ जी. बी. नाईक वास्तव्य मुंबई यांस.

अनेक आशीर्वाद. तुम्ही ' आमची जात ' या नांवाच्या स्वलिखित ग्रंथाची एक प्रत श्रीसंस्थानाकडे पाठविली ती पावली. ग्रंथ पाहून फार संतोष झाला. स्वज्ञातीच्या उन्नतीसाठीं तुमचा हा प्रयत्न अभिनंदनीय असून श्रीशंकर कृपेनें तो शुभफलदायी होईल असा पूर्ण भरंवसा वाटत आहे. भरतखंडांत आंग्ल-साम्राज्य होण्यापूर्वी सुमारें दहा शतकांचा जो काल गेला त्यांत चातुर्वर्णांचा अनेक कारणांनीं एकसारखा ऱ्हास होत गेला हें आतां इतिहासावरून स्पष्ट झालें आहे. हा काल विशेषेंकरून क्षत्रिय जातींना व धनिक वैश्यजातींना फार आपत्तीचा गेल्यामुळें त्यांना उदरनिर्वाहार्थ निरानिराळे धंदे करावे लागले. त्यांचीं धर्मबंधनें शिथिल होऊन धार्मिक संस्कार नामशेष होत चालले, व कालांतरानें त्यांच्या मूळ-च्या खऱ्या स्थानाचीं ओळखही बुजत जाऊन अखेर स्वीकृत—धंद्याचींच नांवे त्या त्या जातींना रूढ झालीं. त्यांच्या संस्कार—हीनतेमुळें ब्राह्मण वर्णही त्यांना शूद्रसम मानूं लागला, व त्यांचे संस्कार पौराणिक रितीनें सुरू झाले. शेवटीं तर " कलि-युगांत क्षत्रिय व वैश्य जाती नाहींत असें एकमत प्रचलित होऊन तें धर्मव्यवहारांत रूढ होऊन बसलें आहे. हा प्रकार विशेषतः दक्षिण हिंदुस्थानांत दिसून येतो. तथापि क्षत्रिय वैश्य वर्णांच्या ठिकाणीं आतां जागृति उत्पन्न झाली असून आपापल्या इतिहासाचा शोध करून सत्य निर्णयाच्या मार्गाला ते लागले आहेत ही फार संतोषाची गोष्ट आहे. श्रीमज्जद्गुरु शंकराचार्य संस्थानाचे शिष्यवृन्दांत क्षत्रिय व वैश्य हे पूर्ण प्राचीन परंपरेनें अन्तर्भूत असून ते आज विद्यमान असल्याचे दाखले मिळ-तात, यामुळें हल्लीं क्षत्रिय व वैश्य वर्ण नाहींत या भ्रामक मताचा निरास होऊन वैदिक मतानुयायी समाजांत चातुर्वर्ण्यव्यवस्था पूर्ववत्‌रूढ होऊन संस्थानच्या विस्तृत शिष्यवृन्दांत ऐक्याची व सुखाची अभिवृद्धि होईल असा पूर्ण भरंवसा आहे.

तुम्ही आपल्या ग्रंथांत स्वज्ञातीचें क्षात्रियत्व, तिची प्राचीन परंपरा, ज्ञातींत ठिकठिकाणीं रूढ असलेले संस्कार इत्यादि संबंधानें दिलेला इतिहास फार शोध-पूर्वक व काळजीनें लिहिला आहे; यामुळें तो अत्यंत चित्तवेधक व मननीय असा झाला आहे. या ग्रंथावरून त्यांतील प्रतिपादित विषयावरील तुमचा दीर्घ व्यासंग व चिकित्सक बुद्धि, सत्यान्वेषणाची कळकळ व स्वज्ञातीबद्दलचा सद्‌भिमान हे गुण उत्कृष्टपणें दिसून येतात. श्रीसंस्थानच्या शिष्यवृन्दांत अशा प्रकारचें जागृति—दर्शक प्रयत्न होतील तेवढे थोडेच आहेत.

कुमावत क्षात्रिय ज्ञातींत तुमचें उत्तरोत्तर अनुकरण होऊन अशाप्रकारचे प्रयत्न होतील, व्हावे व ज्ञातीची भरभराट व्हावी असा श्रीसंस्थान देवतेचा आशी-र्वाद तुम्ही आपल्या सर्व ज्ञातिबांधवांस कळवावा. कळावें हा आशीर्वाद.

करवीर मठ, कोल्हापुर } G. S. Piswikar धर्माधिकारी नि॰
ता. ४ मार्च १९१६ इ. } श्रीजगद्गुरु संस्थान पीठ करवीर.

सूचनाः——राजन्य, राजकुमार, कुमावत हीं क्षत्रियांपैकींच जातीवाचक नांवें पुरातन काळापासून चालत आलीं आहेत; पण या जातिवाचक नांवाचा त्यांच्या आणि इतर जातींच्या अज्ञानानें अपभ्रंश झाला आहे; आणि हीं अपभ्रंश पावलेलीं जातीचीं नांवें सांगण्यास त्यांना कोणत्याहि प्रकारें हीनत्व वाटत नाहीं; हा प्रकार आमच्याच जातीचा झाला आहे, अशांतला मुळींच प्रकार नाहीं; याचीं उदाहरणें इतर जातींतहि आढळून येत आहेत; जसें:——सारस्वत ब्राह्मण यांना शेणवी, दैवज्ञ ब्राह्मण यांना सोनार, क्षत्रिय यांना खत्री म्हणण्याचा प्रघात पडला आहे. अशा प्रकारचीं दुसरीं अनेक उदाहरणें देतां येतील; तद्वत इतरांनीं जरी आपणांस आपल्या जातीसंबंधीं अज्ञानत्वानें अगर इतर कोणत्याहि बुद्धीनें हीनत्वदर्शक नांव दिलें असेल आणि तें आपण आपल्या अज्ञानपणामुळें मान्य केलें असेल तथापि तेंच पुढें चालविणें आणि त्यांतच भूषण मानणें यासारखा अविचारपणा दुसरा कोणताच नसेल, आणखी याचा परिणाम आपल्या समाजावर किती हानिकारक झाला आहे, याचें विवेचन आम्ही याच पुस्तकांत अनेक ठिकाणीं केलें आहे. प्रत्येकानें आपलें मूळ, कूळ, वंश, जात व नांव यांचा अभिमान बाळगणें हें एक मोठें श्रेष्ठ तत्व आहे. याकरितां याचा कोणाकडूनहि कोणत्याहि प्रकारचा अपभ्रंश न होईल यासंबंधानें विशेष दक्षता बाळगली पाहिजे हाच सर्वांचा खरा धर्म आहे.

# निर्णय.

मूळारंभीं वर्णव्यवस्था नव्हती. पुढें कालांतरानें चार वर्ण उत्पन्न झाले आणि पुढें या चार वर्णांपासून अनेक वर्ण झाले आणि हल्लीं तर सहस्रावधि झाले. या मूळ चार वर्णांपैकीं क्षत्रिय हा एक वर्ण होय. या वर्णांत राजकर्ते, शेती करणारे, कुणबी, कुरमी, कुमावत, कणब वगैरेंचा समावेश होतो. जरी ते आपल्या उपजीविकेसाठीं सामान्य उद्योगधंदा करीत आहेत, तथापि त्यांचा वर्ण हा **क्षत्रिय** होय. जातिसंबंधाचा वाद हा पुरातन आहे आणि त्याचा निर्णय मागें लागला नाहीं किंवा पुढेंहि लागणार नाहीं. यामुळेंच आपल्यांत अशी एक फार जुनी म्हण आहे कीं, ऋषीचें कूळ आणि नदीचें मूळ हें पाहूं नये.

आमच्या जातीचे लोक हिंदुस्थानांतील निरनिराळ्या देशांत पसरले आहेत. आणि ते आपल्या जातीचीं नांवेंहि निरनिराळीं सांगत आहेत. हीं नांवें जातिवाचक नसून धंदेवाचक आहेत. कित्येकांना या नांवांत अभिमान व भूषण वाटत आहे आणि तें वाटणें हें अगदीं स्वाभाविक आहे. हा सारा अज्ञानाचा आणि अत्याचाराचा परिणाम होय. याचमुळें आपल्या जुन्या व शास्त्रयुक्त नांवाचा विसर पडत गेला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. अशी जरी वस्तुस्थिति आहे आणि मी जरी अनेक ग्रंथ, इतिहास, वहिवाट चालीरीति यांचा चांगला शोध व विचार करून हा इतका ग्रंथविस्तार केला आहे; तथापि माझ्या जातीनें कोणतें नांव धारण करावें याच्यासंबंधानें मला मोठाच विचार पडला होता, कारण मीं धारण केलेलें नांव इतर देशांतील माझे ज्ञात बंधु मान्य करतील किंवा नाहीं यासंबंधानें मला मोठी जबरदस्त शंका वाटत होती, म्हणूनच मला या पुस्तकावर प्रथम **' आमची जात '** हें नांव द्यावें लागलें.

मी पुराण वगैरे धर्मग्रंथ, जुने इतिहास, बखरी, शिलालेख, दंतकथा, वंश, कुलें व प्रचारांतील आडनांवें, पुण्यक्षेत्रांतील उपाध्यायांकडील नोंद, चालीरीति, आणि आमचा संबंध कोणाशीं झाला होता, व सध्यां आहे याचें सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें यावरून असें स्पष्ट व निर्विवाद रीतीनें सिद्ध होतें कीं, आम्ही क्षत्रिय वर्णांपैकीं आहोंत. इतकेंच नाहीं, तर चोहोंकडील इतर वर्णांतील धर्मगुरु, धर्ममंडल, इतिहाससंशोधक, प्रमुख विद्वान व पुढारी यांच्याकडून अशी सम्मति मिळाली आहे कीं, आपण क्षत्रिय आहांत, ज्यांना **राजकुमार** अथवा **कुमावत क्षत्रिय** म्हणण्याचा जुना प्रघात आहे; त्यांपैकींच आपण आहांत ही अगदीं निर्विवाद गोष्ट आहे.

आजमित्तीस देखील राजपुताना वगैरे अनेक ठिकाणीं आपल्या जातीचे संस्थानिक, जहागिरदार, सरदार, मानकरी, इनामदार, वतनदार, दरकदार वगैरे आहेत. ह्या पुस्तकाच्या शेवटीं, जोडलेल्या ड परिशिष्टामध्यें पाहतां त्या कुळाचे

व वंशजाचे अधिकार अद्यापर्यंत कांहीं अंशीं त्यांच्या वंशजाकडे चालू आहेत. जरी कित्येकांचा नामनिर्देशहि राहिला नाहीं, तथापि त्या सर्वांमध्यें क्षात्रतेज झळकत आहे; उदाहरणार्थः—

**बैताडे** ( चौहान )यांच्या पूर्वजांनीं चारण भाटास दिलेलीं इनामें, वतनें वगैरे अद्याप कांहींकांच्या वंशजांकडे चालू आहेत. आणखी यांच्या वंशजांस दरबारचा मान वगैरेहि अद्याप चालूं आहे. यावरून हें वंशज कोणत्या योग्यतेचे आहेत हें चांगलें दिसून येईल.

**बहिरे** या वंशाचा संबंध काश्मीरच्या राजाशीं असून हल्लीं ते संस्थानाधिपति आहेत.

**धनरिया** हे गेहलोत कुळांतील सिसोदिया वंशांतील असून शोधाअंतीं त्यांचा संबंध उदेपूरच्या राजघराण्याशीं आहे. असें आढळून आलें आहे.

**घोडेले** (चौहान) ह्या वंशांतील श्रीमंत शेट उदेरामजी नारायणजी फोटो आर्टिस्ट, जयपूर यांना अनेक संस्थानाकडून चांगला आश्रय आहे; परंतु यांना नुक्तेच ईदर संस्थानांतून दरबारचा मान व तिकडील वहिवाटीप्रमाणें पायांत **सोन्याचा कडा** (तोडा) घालण्याचा मान मिळाला. हा सोन्याचा कडा पायांत घालण्याचा मान क्षत्रियावांचून इतरांस नाहीं. हा बहुमान त्यांना एकट्यानांच भूषणावह नसून आमच्या एकंदर जातीस भूषणावह आहे.

**फिरोझपुर** जिल्ह्यांत डंगरखेडा, धरमपुरा, केरा यागांवचे प्रसिद्ध नंबरदार (जमीनदार) असे जे लोक आहेत त्यांची नांवे कुमार बहादूर अमरूजी काबवाळ, दुधारामजी शीमार, रामचंद्रजी ढुंडाडो (धुंदाऱ्या) हीं होत. अशाच प्रकारें त्याबाजूस अनेक जहागिरदार, वतनदार व जमीनदार आहेत.

अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें,शास्त्राधार आणि सर्व विषयांचा विचार करितां आम्ही **रजपुत** अर्थात **क्षत्रिय** आहोंत असें निर्विवाद रीतिनें सिद्ध होत आहे. अनेक ठिकाणचे आमच्या जातीचे लोक आपणांस **कुमावत रजपुत** किंवा **क्षत्रिय** असें म्हणवित आहेत. हें नांव **राजकुमार** याच मूळ नांवावरून पुढें प्रचारांत आलें आहे. ह्यासाठीं आमच्या निरनिराळ्या देशांत राहणाऱ्या जातबंधूंनीं आपले उद्योगदर्शक अगर अज्ञानवाचक नांवाचा उल्लेख करण्याचें कमी करून आपलें जातिवाचक **राजकुमार** अथवा **कुमावत रजपुत (क्षत्रिय)** हें खरें नांव सांगण्याचा जुना प्रघात चालूं करावा अशी सविनय सूचना आहे.



श्री अंबिका प्रसन्न.



वंदेहं शीतलां देवीं रासमस्थां दिगंबराम्।
मार्जनी कलशोपेतां शूर्पालंकृतमस्तकाम् ॥ १ ॥
वंदेऽहं शीतलां देवीं सर्व रोगभयापहाम्।
यामासाद्य निवर्तेत विस्फोटकभयं महत् ॥ २ ॥
शीतले शीतले चेति यो ब्रूयाद्दाहपीडितः।
विस्फोटकभयं घोरं क्षिप्रं तस्य प्रणश्यति ॥ ३ ॥

---

मार्तंड वंशी दश हे कृतघ्नी।
सुसोम अंशी दश चार अग्नी॥
बारा कहे हैं ऋषि तेज जाये।
छत्तीस क्षत्री सब देश छाये ॥१॥

---

नयस्थ नित्यं निज गौरव क्रिया।
नहि स्वजात्यभिमातिश्च सत्क्रिया ॥
नरोयनोऽयं नृपशुः सईरितो।
भुवि प्रजीवन् मृतवाद्विभासते ॥ १ ॥

---

म. ९२८ / इति. ९०/ ८८३५६
श्री कुमावत क्षत्रिय ... इतिहास
बैताडे ग. भि.



माझे परमपूज्य

## तीर्थरूप कै० श्री. भिवाजी जगोजी च०हाण

## ऊर्फ बैताडे नाईक.

यांच्याच प्रेरणेनें मला हा इतिहास लिहिण्याची स्फूर्ति झाली व त्यांच्याच आशिर्वादानें तो पूर्ण झाला एतदर्थ प्रथम मी त्यांना वंदन करून अशी

## सविनय प्रार्थना

करतों कीं, माझे जातीचे चौधरी, पटेल, सरपंच, पुढारी, सभाध्यक्ष, हितेच्छू वगैरे सुशिक्षित व विचारशील बंधुजनांच्या सेवेंत हें प्रेमपूर्वक भेट ह्मणून सादर करीत आहें, तें आपण लक्षपूर्वक वाचाल अशी मला पूर्ण आशा आहे. आणि आपण कृपा करून तसदी घेऊन ज्या आपल्या ज्ञातिबांधवांना वाचतां येत नाहीं, त्यांना त्यांचे रिकामपणाच्या वेळीं एकत्र जमवून त्यांना हें पुस्तक वाचून दाखवून यांतील हेतू व विचार समजावून सांगावे; असें केल्यास माझ्या श्रमाचें सार्थक्य झालें आणि माझ्या अल्पसेवेचा योग्य मोबदला मला मिळाला असें समजून माझ्या मनाला मोठा संतोष होईल आणि मीं त्यांचा मोठा आभारी होईन.

**ग्रंथकर्त्ता.**

# अनुक्रमणिका.


**आमची जात.** पृष्ठ.

१ जगदुत्पत्ति आणि क्षत्रियवंश. १
२ क्षत्रियकुलें. ... ... ११
३ राज्यक्रांतीमुळें होणारे फेरफार. १५
४ मुसलमानांच्या अमदानींत रजपुतांचा छल. ... ... २०
५ अत्याचाराचा परिणाम. ... २४
६ रजपूत ही एक जात आहे. २६
७ राजकुमार,कुमार आणि कुमावत. २८
८ दक्षिणेंत आलेले रजपूत. ... ३८
९ पुनश्च ऐक्य. ... ... ३९
१० समाजांतील कांहीं वहिवाटी. ४४
११ नथ कां नाहीं ... ... ४८
१२ आह्मी रजपूत आहोंत. ... ५२
१३ कुलें, कुलदेवी आणि आडनांवें. ५६

**आमच्या चालीरीती.**

१४ पांचवी अथवा षष्ठीपूजन. ... ६५
१५ सोयरीक अथवा सगाई. ... ६५
१६ विवाहपद्धति. ... ... ६७
१७ ऋतुदर्शन. ... ... १०७
१८ बारसें. ... ... ... १०७
१९ पुनर्विवाह. ... ... १०८
२० चौधरी, पटेल, शेटे, सरपंच. ११०
२१ पांच्या. ... ... ११०
२२ भाट. ... ... ... १११
२३ न्हावी. ... ... ... ११२
२४ लोकसंख्या. ... ... ११४
२५ जातीपंचाइतीचें साधारण स्वरूप ११५
२६ सभा. ... ... ... १२७
२७ नम्रपूर्वक विनंति. ... १३२

**परिशिष्ट.**

२८ आमचा समाज आणि त्याचें कर्तव्यकर्म. ... ... १३५
२९ चौधरी, सरपंच यांचें कर्तव्यकर्म. ... ... ... १४०
३० फोटोंतील नांवें. ... ... १४२
३१ आडनांवांची व कुलांची पुरवणी १४८
३२ कुमावत क्षत्रियांचें कुल, वंश, गोत्र इ० संबंधी माहिती. १४९


## स्वज्ञातबांधवांच्या फोटोंची अनुक्रमणिका.


ग्रंथकारांचा फोटो ग्रंथारंभीं. पृष्ठ.

१ पुणें व मुंबई. ... ... ६
२ पुणें व मुंबई. ... ... २२
३ जयपूर. ... ... ३०
४ ब्यावर व फुलेरा.... ... ३८
५ अजमीर, बुंदी, श्रीनाथद्वार आणि हैद्राबाद.... ... ५४
६ रतलाम व नीमच. ... ७०
७ बडनगर. ... ... ७०
८ धुळें. ... ... ... ७८
निरनिराळ्या ठिकाणच्या मुलींचा. ८६
९ औरंगाबाद. ... ... ९४
१० दिल्ली ... ... ... ११०
११ आग्रा व अलाहाबाद. ... ११८
१२ नेरी ( खानदेश ). ... ११८
माळवा. ... ... १२६

# देवतास्तवन.

श्लोक—( स्रग्धरा. )

शुंडादंड प्रचंड प्रचलित विलसे सिंदुरें भाल लाल।
नाशी जो विघ्नराशी अभयकर शिरीं ठेवुनी सर्व काल॥
पावे हाकेस धावे व्यसनिं निज जनां पाहुनीयां स्वभावें।
आर्तां सज्ञान दाता सदय गणपती वंदितों भक्तिभावें ॥ १ ॥
वाग्देवी नित्य सेवी सकल पुरविते इष्ट तें कामुका ही।
पंगू लंघूनि जातो गिरिवर निमिषें वेद बोले मुकाही ॥
वाणी पीयूषखाणी करित निज बळें ज्ञानही फार देते।
प्रेमें नेमें स्मरोनी उपकृति सगळी वंदितों शारदे ते ॥ २ ॥

श्लोक—( शार्दूलविक्रीडित. )

गौरी पार्वति अंबिका भगवती हेमाद्रिची बालिका।
रूपें घेउनिया अनंत नटली विख्यात ही कालिका ॥
दीप्तीनें शशिसूर्यही दिपविते चिच्छक्ति सौदामिनी।
वंदीं ठेवुनियां सदैव हृदयीं माझी कुलस्वामिनी ॥ ३ ॥

श्लोक—( स्रग्धरा. )

शंभो अंभोदसा तूं अमृतमय अशा वृष्टिनें तुष्टिदाता।
कष्टी राहे न दृष्टीं ह्मणुनि किति मुनी भागले स्तोत्र गातां।
संसारीं तूंच तारीं सविनय ह्मणुनी प्रार्थितों शंकरातें।
सेवा घेवोनि देवा घडिघडिस करा धन्य या किंकरातें ॥ ४ ॥

श्लोक—( शार्दूलविक्रीडित. )

भक्ती ठेवुनि आदिशक्ति नमितों अंबा भवानी तिला।
माते जाउं नये कधींच मन हें सोडोनियां नीतिला ॥
उल्हासें जमते सदैव नमते पादास दासावली।
प्रेमाची तुझिया बरी मजवरी राहो सदा सावली ॥ ५ ॥

## ग्रंथकर्त्याचें कुलवृत्त.

श्लोक—( शार्दूलविक्रीडित. )

मद्वंशीं अजमीर पीठ पहिलें वस्तीस जें शोभलें ।
जेथें सांभरहून गांव अमुचें आम्हांस लाभे भलें ॥
तेथोनी गुजराथ पाहुनि बरी आले तिथें पूर्वज ।
होते सोनगडीं करून वसती ऐकोनि ठावें मज ॥ १ ॥
आलों तेथुनियां पुण्यास सहजीं अन्नोदकाच्या परीं ।
साधूं कष्ट करूनि इष्ट अपुलें नांदूं सुखानें घरीं ॥
धंदा चालविण्यास नित्य झटतों जाऊन मुंबापुरीं ।
जातां अग्निरथें भराभर तिथें वाटे न कांहीं दुरीं ॥ २ ॥
पूर्वीपासुन सूर्यवंश कुलही चोहान नामें असे ।
जाती क्षत्रिय शौर्य धैर्य असुनी आंगीं क्षमाही दिसे ॥
नांवानें रजपूत लोक म्हणती देशानुसारे जनीं ।
ऐशा वंशपरंपरेंत अमुची वासिष्ठ गोत्रीं जनीं ॥ ३ ॥
बैताडे उपनाम चालत असे अस्मत्कुलस्वामिनी ।
श्रीमद्दैवत कालिका भजतसों आम्ही दिवा यामिनी ॥
होता सत्वगुणी सुशील सुमती आजा जगोजी मला ।
झाला तत्सुत सद्गुणी जनक तो माझा भिवाजी भला ॥ ४ ॥
आलों घेउनि जन्म मी यदुदरीं तातास आतां नमी ।
नामानें म्हणती मला गणपती आहे भवद्दास मी ॥
संसारीं असतां निमग्न घडलें कांहीं न माझ्या करें ।
ज्ञातीचा इतिहास ह्यास्तव जनां अर्पीतसें सादरें ॥ ५ ॥

# आमची जात.

## **जगदुत्पत्ति** आणि **क्षत्रियवंश.**

**श्रीमत् भागवता**दि धर्मग्रंथांमध्यें आणि पुराणांतरीं जगत् कसें निर्माण झालें, याचें चांगलेंच विवरण केलें आहे, तें असें:—महाप्रलयकाळीं संपूर्ण ब्रह्मांडाचा नाश झाला; त्या समयीं फक्त एका परमात्म्या-ज्योतिस्वरूप-शिवाय अन्य कांहींच नव्हतें. तदनंतर परमात्म्याला पुन्हा सृष्टि निर्माण करण्याची इच्छा झाली. प्रथम त्यांनीं एक प्रधान पुरुष उत्पन्न केला; आणि त्यापासून **विराट**स्वरूप प्रगट झालें; आणि याच विराटस्वरूपापासून क्षिरसागरामध्यें **श्री आदिनारायण** निर्माण झाले. **श्री आदिनारायणा**नें आपल्या ललाट ( कपाळ ) स्थानापासून **श्रीशंकर,** वक्ष ( छाती ) स्थळापासून **श्री विष्णु,** आणि नाभी ( बेंबी ) कमळापासून **श्री ब्रह्मदेव** उत्पन्न केले.

ब्रह्मदेवानें आपल्या शरीराच्या अवयवांपासून स्वेच्छेनें **मरीची, अत्री, अंगिरा, पुलस्त, कृत, भृगु, वसिष्ट, कुलह, दक्ष** आणि **नारद** असे दशपुत्र उत्पन्न केले. **मरीची**पासून **कश्यप**ऋषि उत्पन्न झाले. **कश्यप**-ऋषीनें **दक्षा**च्या तेरा कन्यांबरोबर विवाह करून त्यांच्यापासून देव, दैत्य, पशु, पक्षी आदिकरून स्थावरजंगमात्मक प्रजा निर्माण केली.

देव आणि दैत्य यांचें स्वाभाविकच वैर असल्यामुळें दैत्य, ऋषींच्या आश्रमांत शिरून त्यांच्या यज्ञाचा भंग करीत आणि त्यांना नानाप्रकारें पीडा करीत. अशा समयीं दैत्यांच्या नाशार्थ एके दिवशीं **वसिष्ठ**ऋषीनें आपली मातोश्री **श्री अंबिका** हिच्या आज्ञेनें अग्निकुंडांतून आजानुबाहु अशा अत्यंत बलिष्ट व महापराक्रमी पांच पुत्रांस उत्पन्न केलें. हेच पांच पुत्र क्षत्रिय वंशाचे मूळपुरुष होत. त्यांचीं नांवें:—१ **परमार** ( पवार ), २ **राठोर,**

**३ यादव**, **४ चव्हाण** आणि **५ सोळंकी**. पुरातन काळीं क्षत्रियांना **राजन्य** ही संज्ञा होती.

या पांच पुत्रांना **वसिष्ठानें** दैत्यांचा संहार करून ऋषीजनांला तापांतून विमुक्त करण्याची आज्ञा केली; त्या आज्ञेप्रमाणें या क्षत्रिय पांच पुत्रांनीं भूतलावर येऊन दैत्यांचा संहार करून **श्रीवसिष्ठ** मुनीला येऊन प्रदक्षणा केली, आणि साष्टांग नमस्कार घातला; त्या समयीं **वसिष्ठ**मुनीनें आपल्या पांच पुत्रांवर सुप्रसन्न होऊन त्यांना आशिर्वाद दिला आणि त्यांना इहलोकींचें राज्य अर्पण केलें. या क्षत्रियकुलासच **यादव** वंश असें ह्मणतात. याच **यादव** वंशांत पुढें **सहस्रार्जुन** या नांवाचा महाविख्यात व अत्यंत पराक्रमी चक्रवर्ती राजा होऊन गेला. यानें **माहिष्मति** नगरीमध्यें राज्य केलें. त्याच्या राणीचें नांव **यमघंटा** असें होतें. **जमदग्नि** ऋषीची भार्या **रेणुका** ही तिची वडील बहिण होती. **जमदग्नि** ऋषीला **रेणुके**पासून दशावतारांपैकीं सहावा अवतार **श्रीपरशुराम** झाला. **सहस्रार्जुना**ला **यमघंटे**पासून कांहींच संतति झाली नाहीं; त्यामुळें तो सदा सर्वकाळ खिन्न व उदास असा असे. शेवटीं, त्यानें **श्रीकाशी**-क्षेत्रांत जाऊन यज्ञ, दान वगैरे करून ब्राह्मणांना तृप्त केलें आणि त्यांचा आशीर्वाद प्राप्त करून घेतला.

**श्रीकाशी** क्षेत्रामध्यें **जमदग्नि** ऋषीचा आश्रम असल्यामुळें अर्थातच **सहस्रार्जुन** राजाची राणी जी **यमघंटा** तिला आपली बहिण जी **रेणुका** तिला भेटण्याची इच्छा उत्पन्न झाली; असें होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. तिनें आपल्या बहिणीस आपल्या भेटीस बोलावण्याकरितां तिच्याकडे आपले जासूद पाठविले. या समयीं श्रीसतीदेवी **रेणुका** ही गंगातटाकीं पाणी भरण्याकरितां आली होती. **यमघंटा** राणीच्या जासुदांनीं ती आपल्या राणीची बहिण श्रीसतीशिरोमणी देवी **रेणुका**च आहे असें न ओळखतां तिलाच विचारलें कीं, “ श्रीसतीदेवी **रेणुका** कोठें राहत आहेत ? त्यांना त्यांची जी बहिण राणी **यमघंटा** यांनीं मोठ्या आदरानें, प्रेमानें आणि उत्कंठेनें आपल्या भेटीस बोलाविलें आहे.” हें श्रवण करून श्रीदेवी **रेणुकेनें**

आपल्या मनाशीं असा विचार केला कीं, माझी बहिण ही सार्वभौम राजाची राणी असून वस्त्रालंकारांनीं मंडित आहे; तिच्या भेटीस मी वल्कलें धारण केलेली आणि अलंकारभूषणरहित अशी कशी जाऊं ? असा विचार करून तिनें त्या जासुदांना आश्रमाचा खरा मार्ग न दाखवितां भलत्याच मार्गानें जाण्यास सांगितलें.

महासाध्वी **रेणुका** हिच्याजवळ गंगोदक आणण्याकरितां पात्र वगैरे कांहीं नसल्यामुळें ती आपल्या वस्त्राच्या पदरांतूनच तें आणीत असे; असा या माउलीचा मोठा महिमा असे; परंतु यासमयीं तिचें मन वर घडलेल्या गोष्टीमुळें विषाद पावून चंचल झालें; त्यामुळें असें झालें कीं, तिनें नित्याप्रमाणें आपल्या पदरांत गंगाजल घेतलें असतां तें त्यांत मुळींच राहिना; तेव्हां ती उदास अशा मनानें परत आपल्या आश्रमीं आली.

**जमदग्नि** ऋषीनें आपली भार्या सती **रेणुके**चें मुख खेदयुक्त झालेलें पाहून तिला त्याचें कारण विचारलें; तेव्हां तिनें गंगातटाकीं घडलेली सविस्तर हकीगत निवेदन केली. तसेंच त्या वेळीं आपल्या अंगीं आपले बहिणीस तिच्या सर्व परिवारासह भोजनास बोलावण्याची शक्ति नाहीं हें जाणून तिच्या नेत्रांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. आपली पत्नी सती **रेणुका** हिला दुःखित पाहून **जमदग्नि** ऋषींना तिची दया आली; त्यांनीं तात्काल यज्ञकुंडांतून नाना प्रकारचीं वस्त्रें, रत्नें व अलंकार निर्माण केले; आणि स्त्रीस सांगितलें कीं, तुला इतकें दुःखी व निराश होण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. तूं हीं वस्त्रें परिधान कर आणि हे अलंकार धारण करून आपल्या बहिणीच्या भेटीस जा. भेटीनंतर परत आपल्या आश्रमीं येतेवेळीं तिला आपल्या बहिणीस आणि तिच्या भ्रतारास त्यांच्या असंख्य सेनेसह आपल्या आश्रमीं भोजनाचें अगत्यपूर्वक आमंत्रण देण्यास सांगितलें.

पतिआज्ञेप्रमाणें सती **रेणुका** ही आपली बहिण जी राणी यमघंटा हिची भेट घेऊन मोठी आनंदी झाली; आणि आपल्या बहिणीस आणि तिचा भ्रतार जो राजा **सहस्रार्जुन** यांस आपल्या सकल सेनेसह उदईक आमच्या आश्रमीं भोजनास यावें, असें अत्यंत आग्रहपूर्वक निमंत्रण केलें;

परंतु राजाराणीस यांची अति गरिबी पाहून हें भोजनाचें आमंत्रण स्वीकारण्यास त्यांचें मन धजेना; पण अतिशयच आग्रह पडल्यामुळें शेवटीं त्यांनीं मोठ्या जुलमानें ह्या आमंत्रणाचा स्वीकार केला.

इकडे सती **रेणुका** देवी आपल्या बहिणीच्या भेटीस गेल्यानंतर **जमदग्नि** ऋषीनें आपल्या मनाशीं असा विचार केला कीं, मी **सहस्रार्जुन** राजास त्याच्या अनंत सेनेसह सहकुटुंब आमच्या आश्रमीं भोजनास यावें ह्मणून सती **रेणुका** हिला आमंत्रण देण्यास पाठविलें खरें, पण आमच्या आश्रमांत पहावें तों भस्माखेरीज इतर साहित्य आमच्या संग्रहास मुळींच नाहीं; तेव्हां विचाराअंतीं त्यांनीं आपल्या मनांत असें योजिलें कीं, स्वर्गीं जाऊन **कामधेनु** घेऊन यावी, ह्मणजे तिच्या साह्यानें संपूर्ण राज्योपभोगी नाना पदार्थांची प्राप्ति होऊन सर्वत्रांस आनंदी आनंद होईल. अशी योजना करून **जमदग्नि** ऋषी स्वर्गलोकीं गमन करते झाले; आणि तेथून **कामधेनु** घेऊन आपल्या आश्रमीं आले. इतक्यांत त्यांची पत्नीही **सहस्रार्जुन** राजास भोजनाचे आमंत्रण देऊन परत स्वआश्रमीं आली. कांहीं वेळानंतर राजा **सहस्रार्जुन** आपल्या **यमघंटा** राणीसह आणि आपल्या असंख्य सेनेसह **जमदग्नि** ऋषीच्या आश्रमीं आले.

**जमदग्नि** ऋषीच्या विनंतिप्रमाणें सर्वत्र मंडळीची भोजनास उठण्याची तयारी झाल्यावर, ऋषीनें **कामधेनू**ची प्रार्थना करून तिच्यापासून मनइच्छित वस्तूंची प्राप्ती करून घेतली. भूलोकींही अत्यंत दुर्मिळ अशी नानाप्रकारचीं पक्वानें तयार झालेलीं पाहून सर्वत्र मंडळी आश्चर्यचकित झाली. सर्वांची जेऊन तृप्ति झाल्यावर जो तो त्या भोजनाची व पक्वानांची प्रशंसा करूं लागला. राजा **सहस्रार्जुन** अत्यंत आश्चर्यचकित होऊन ह्मणाला कीं, या पर्णकुटिकेमध्यें कोणत्याहि प्रकारचें साहित्य किंवा साधन नसतां पर्वतप्राय पक्वानांचे ढीग कोठें व कसे तयार केले! आणि ते तयार करीत असतां धूर किंवा गडबड मुळींच दिसली नाहीं हें कसें? यावरून हा सर्व ऋषीच्या कामधेनूचा प्रभाव होय, असें तो समजला; परंतु त्याच वेळीं त्याच्या मनांत असें आलें कीं, अशा प्रकारची मनोवांच्छित फल

वाचनालय सातारा


देणारी कामधेनूरूप वस्तु आपल्या संग्रहीं असणें अत्यंत अवश्य आहे. सबब कसेंहि करून ती मिळविलीच पाहिजे, असा विचार करून त्यानें आपली स्त्री जी **यमघंटा** हिला आपला हेतू सांगून तिला कामधेनु प्राप्त करून आणण्यास ऋषीकडे पाठविली.

राणी **यमघंटा** आपली बहिण जी रेणुका तिचा निरोप घेण्यासाठीं आली असतां, तिनें आपण लहान बहिण असल्यामुळें आपणास मोठ्या बहिणी-कडून कांहीं नांव घेण्यासारखी देणगी मिळाली पाहिजे अशी आपली इच्छा व्यक्त केली; इतकेंच नाहीं, तर अशी स्पष्ट याचना करण्यास कोणत्याहि प्रकारचा संकोच तिला वाटला नाहीं. **जमदग्नी**नें आपल्या स्त्रीच्या बहिणीची याचना ऐकून सती रेणुकेस सांगितलें कीं, तूं आपल्या अंगावरील अलंकारभूषणें काढून तीं तिला अर्पण कर. राणी **यमघंटा** हें ऋषीचें भाषण श्रवण करून म्हणाली, "ऋषीमहाराज, मला अलंकारादिक भूषणांची मुळींच जरूर नाहीं; कारण तीं मजजवळ विपुल आहेत. आम्हांस प्रचंड सेना बरोबर घेऊन देशदेशांतरीं फिरावें लागतें; आणि इतक्या लोकांची भोजनादिक व्यवस्था ठेवण्यास नेहमीं मनस्वी अडचण पडते. ही अडचण आपल्या देणगीनें दूर व्हावी. आपणापासून आम्हांस जी देणगी प्राप्त व्हावी अशी जी आम्ही अपेक्षा बाळगून आहोंत ती हीच कीं, आपली मनोवांच्छित पदार्थ पुरविणारी जी कामधेनु ( गाय ) आहे ती आम्हांस मिळावी; कारण आपण आपल्या तपोबळानें दुसरीहि आणूं शकाल." ऋषीनें उत्तर दिलें कीं, "आपण म्हणतां ही गोष्ट सत्य आहे खरी; पण मी ही गाय इतक्या कारणा-पुरतीच स्वर्गाहून मागून आणली आहे. ती मला सत्वर परत केली पाहिजे. ती मला आपणांस देतां येत नाहीं; कारण तिजवर माझी मुळींच सत्ता नाहीं."

हें ऋषीचें भाषण श्रवण करून राणी **यमघंटे**स मोठा क्रोध आला; ती आपली भ्रुकटी चढवून क्रोधानें म्हणाली, "असें जर आहे, तर तुम्ही आपली कामधेनु संभाळा. आम्ही पाहून घेऊं." अशाप्रकारें **यमघंटा** राणीनें धमकी देऊन आपला पति जो **सहस्रार्जुन** याजपाशीं जाऊन घड-लेली सर्व हकिगत त्याला निवेदन केली. राजा **सहस्रार्जुना**नें तात्काळ

आपल्या सर्व सैन्यास आश्रम वेढण्याची आज्ञा केली आणि सांगितलें कीं, ऋषी **जमदग्नी** व सती **रेणुका** या उभयतांना बांधून त्यांच्याजवळ असलेली कामधेनु गाय तिच्या वत्सासहित बलात्कारें हरण करून आपल्या **माहिष्मति** नगरीस घेऊन जा. **सहस्रार्जुना**च्या सेनेनें त्याच्या आज्ञेप्रमाणें ऋषी आणि ऋषिपत्नीस बांधून ती कामधेनु आपल्या नगरास नेली.

ज्या वेळीं ही गोष्ट घडली, त्या वेळीं **जमदग्निसुत परशुराम** हे बाहेर गेले होते, ते आतां परत आले. आपल्या पित्यास दुःख दिलेलें पाहून रागानें ते संतप्त होऊन गेले; आणि याचा सूड उगविण्यासाठीं हातांत भयंकर परशु, ढाल, धनुष्य व बाण वगैरे शस्त्रास्त्रें घेऊन मस्त गजेंद्रामागें जसा पशुपती सिंह लागतो, त्याप्रमाणें ते मोठ्या त्वरेनें **सहस्रार्जुना**च्या सैन्याच्या मागें धावले. सूर्याप्रमाणें तेजस्वी, जटाधारी, मृगचर्म नेसलेला, हातीं धनुष्यबाण व परशु घेतलेल्या **परशुरामास** आपल्या नगराकडे येतांना राजा **सहस्रार्जुना**नें पाहिलें; आणि लागलेंच त्यांनीं आपल्या अक्षौहिणी सैन्यास सज्ज होण्यास सांगून **रेणुका**सुत **परशुरामा**बरोबर युद्ध करण्याची आपल्या सैन्यास आज्ञा केली. **श्रीपरशुरामानें** आपल्या अंगावर **सहस्रार्जुना**ची असंख्य सेना येत आहे, हें पाहून आवेशयुक्त होऊन क्षणार्धात जशी अग्नीची ठिणगी मोठ्या गवताच्या प्रचंड गंजीचा नाश करते, तद्वतच श्री **परशुरामानें** **सहस्रार्जुना**च्या सकल सेनेचा निःपात केला. आपल्या प्रबळ सेनेचा विध्वंस झालेला पाहून राजा **सहस्रार्जुन** क्रोधायमान झाला; आणि **श्रीपरशुरामा**वर आपल्या पांचशें हातांत पांचशें धनुष्यबाण घेऊन एकाच वेळीं पांचशेंप्रमाणें असंख्य बाण सोडले; परंतु तितके असंख्य बाण आपल्या अतुल परशु नामक आयुधाच्या योगानें **श्रीपरशुरामानें** एकदम तोडून टाकले. तेव्हां **सहस्रार्जुनानें** आपल्या हजार हातांनीं अनेक वृक्ष व पर्वत उपटून घेऊन **श्रीपरशुरामा**च्या अंगावर प्रहार करण्याकरितां येत असतां **श्रीपरशुरामानें** जशी सर्पाची फणी तोडावी, त्याप्रमाणें आपल्या प्रबल कुऱ्हाडीच्या योगानें **सहस्रार्जुना**चे सहस्र बाहू आणि मस्तक तोडून तें धडावेगळें केलें.



नंबर १. पुणें व मुंबई येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहावीत.

**सहस्रार्जुन** मरतांच त्याचे दहा हजार पुत्र भयभीत होऊन पळून गेले. नंतर **श्रीपरशुराम** आपली वत्सासह **कामधेनु** घेऊन आश्रमीं परत आले. आपल्या दुःखी मातापित्यांस नमस्कार करून घडलेली सविस्तर हकिगत त्यांना निवेदन केली; ती श्रवण करून **जमदग्नी**नें त्यास असा बोध केला कीं, आपण ब्राह्मण आहोंत; आणि आह्मां ब्राह्मणांना केवळ एका क्षमेमुळेंच श्रेष्ठपद प्राप्त झालें आहे. क्षमा हा गुण ब्राह्मणांच्या अंगीं असल्यामुळेंच त्यांना श्रेष्ठत्व आलें आहे. क्षमेमुळेंच त्यांच्या अंगीं ब्रह्मतेज झळकत आहे; एतदर्थ राज्यपदारूढ झालेल्या राजाचा वध करणें हें ब्रह्महत्ये इतकेंच महापातक आहे. आतां तूं या पापक्षालनार्थ तीर्थवासी होऊन, स्वधर्माचरण करून एक तपपर्यंत तपश्चर्या कर, म्हणजे त्यायोगेंकरून तुझे सर्व दोष निर्मूलन होतील आणि सर्व पातकांचें क्षालन होईल.

आपल्या पित्याच्या आज्ञेप्रमाणें **श्रीपरशुराम** एक वर्षपर्यंत तिर्थाटण करून परत आपल्या आश्रमीं आले. पुढें बराच काळ लोटल्यावर एके दिवशीं सती **रेणुका** गंगातटाकीं उदक आणण्याकरितां गेली असतां तेथें जलक्रीडा करण्याकरितां आलेल्या रूपयौवनसंपन्न अशा **चित्ररथ** नांवाच्या गंधर्वास तिनें पाहिलें; आणि ती त्या स्थळीं त्याची क्रीडा अवलोकन करण्यास उभी राहिली; त्यामुळें **जमदग्नि** ऋषीच्या हवनहोमास जल पोहोचविण्यास जरा विलंब झाला. थोड्या वेळानें सती **रेणुका** जल घेऊन आश्रमीं आली; आणि तिला ऋषीच्या शापाचें मोठें भय असल्यामुळें भयभीत झालेली अशी ती ऋषीपुढें हात जोडून उभी राहिली.

आपल्या स्त्रीनें मानसिक व्यभिचार केला असें जाणून ऋषी **जमदग्नी**नें आपल्या पुत्रांना अशी आज्ञा केली कीं, तुह्मी या तुमच्या महा अधम मातेचा वध करा; परंतु त्याच्या पुत्रांनीं ही पित्राज्ञा मान्य केली नाहीं; कारण मातृवधाइतकें महाघोर अन्य पाप नाहीं, हा शास्त्रधर्म ते जाणत होते. आपली आज्ञा भंग केली म्हणून तेही **जमदग्नी**ऋषीच्या क्रोधास पात्र झाले. थोडया वेळानंतर **श्रीपरशुराम** बाहेरून आश्रमीं आले, त्यांनाही ऋषी **जमदग्नी**नें पूर्ववत् इतर पुत्रांप्रमाणेंच आज्ञा केली कीं "तूं आपल्या मातेचा, आणि

माझी आज्ञा भंग करणाऱ्या तुझ्या बंधूंचा सत्वर वध कर." **श्रीपरशुरामानें** तात्काल आपल्या पित्याची आज्ञा मान्य करून आपल्या मातेचा आणि आपल्या बंधूंचा वध केला.

**श्रीपरशुरामानें** आपल्या आज्ञेप्रमाणें केलेलें पाहून **श्रीजमदग्नी** ऋषीस परम संतोष झाला; आणि पुत्रास वर मागण्याची आज्ञा केली. **श्रीपरशुरामानें** आपली माता व बंधू यांना पुन्हा जिवंत करावें असा वर मागितला. **जमदग्नी** ऋषीनें आपल्या तपोबलाच्या योगानें निद्रेंतून जसें जागें व्हावें तसें त्या सती **रेणुकेस** आणि तिच्या पुत्रांस मरणावस्थेंतून उठविलें.

वर सांगितलेंच आहे कीं, **सहस्रार्जुनाचे** दहा हजार पुत्र जे भयानें पळून गेले होते, त्यांना भयामुळें एकाच जागीं कोठेंच वास करितां आला नाहीं; त्यामुळें ते सचिंत असे भटकत फिरत होते. एकेवेळीं **श्रीपरशुराम** आपल्या बंधूंसह वनांत गेले असतां **सहस्रार्जुनाचे** पुत्र, **जमदग्नी** ऋषीच्या आश्रमीं आले; त्या समयीं ऋषी ध्यानमग्न असतां आणि त्यांची स्त्री सती **रेणुका–श्रीपरशुरामाची** माता–ही दीन स्वरानें त्यांची प्रार्थना करीत असतांही त्यांनीं **जमदग्नी** ऋषीचा शिरच्छेद केला; आणि त्यांचें शीर घेऊन ते पळून गेले. आपल्या पतीचा अशाप्रकारें वध झाला हें पाहून **रेणुका** अत्यंत शोक करूं लागली; आणि आपल्या महापराक्रमी पुत्रास उद्देशून म्हणाली ' अरे **परशुरामा**, अरे बलिष्ठा, यासमयीं तूं कोठें रे आहेस ! सत्वर ये, बा ! " अशा रीतीनें उंच व अत्यंत करुणस्वरानें विलाप करूं लागली. आपल्या मातेचा रुदनस्वर ऐकून, **श्रीपरशुराम** हे आपल्या बंधूंसह आश्रमीं आले; त्या वेळीं त्याला आपल्या पित्याचा वध झालेला दिसला. तो बराच वेळ शोकाकुल होऊन व आपल्या बंधूंला पित्याच्या शवाचें संरक्षण करण्यास सांगून क्षत्रियांचा समूळ नाश करण्याची त्याच वेळीं त्यानें महा अघोर प्रतिज्ञा केली. ऋषीपत्नी सती **रेणुका** हिनें शोकाकुळ होऊन एकवीस वेळां आपली छाती पिटलेली **श्रीपरशुरामानें** पाहिली; व निश्चय केला कीं, ज्याअर्थीं क्षत्रियांनीं या माझ्या मातेस दुःखानें एकवीस वेळां छाती पिटविण्यास लाविलें त्याअर्थीं मी ही पृथ्वी एकवीस वेळां निःक्षत्रिय करीन तेव्हांच राहीन.

**सहस्रार्जुना**चे पुत्र ऋषीवध करून आपल्या **माहिष्मति** नगरांत जाऊन राहिले होते. ते या ब्रह्महत्येच्या पातकाच्या योगानें दोषी झाले होते; आणि त्यामुळें तेही भयभीत झाले होते. **श्रीपरशुराम** हे त्या **माहिष्मति** नगरी-मध्यें गेले आणि **सहस्रार्जुना**च्या पुत्रांचा नाश करून त्यांच्या रक्ताच्या नद्या वाहविल्या. या **सहस्रार्जुना**च्या दहा हजार पुत्रांपैकीं फक्त पांचच* पुत्र ईश्वरेच्छेनें निभावून पळून गेल्यामुळें त्यांचा मात्र बचाव झाला होता. **परशुरामानें** आपल्या प्रतिज्ञेप्रमाणें पृथ्वीवरील सर्व क्षत्रियांचा एकवीस वेळां संहार केला; आणि पृथ्वीवरील सर्व राज्य, त्यांनीं ब्राह्मणांस अर्पण केलें. याप्रकारें सर्व पृथ्वी एकवीस वेळां निःक्षत्रिय केल्यावर **श्रीपरशुरामानें** आपल्या पित्याचें शीर आश्रमीं आणून पित्याच्या शवास चिकटवून त्यास सजीव केलें.

ब्राह्मणांना राज्यकारभार चालविण्याचें ज्ञान नाहीं असें दिसून आल्यावर **श्रीपरशुरामानें** पुन्हा छपून राहिलेल्या क्षत्रियांचा शोध करून आणि त्यांना परत आणवून त्यांचें राज्य त्यांस दिलें. आणखी, त्यांना राज्याभिषेक करून धर्मानें व नीतीनें राज्य चालविण्याची आज्ञा केली.

जैनमुनी **हेमाचार्य** यांनीं आपल्या "**६३ शिलाखा पुरुष**" या नांवाच्या ग्रंथांत पुढीलप्रमाणें याच गोष्टीचें निराकरण केलें आहे:—"पूर्वी गजपुरचा ( हस्तनापुरचा ) **कितींवज** या नांवाचा एक राजा होऊन गेला. तो **श्रीपरशुराम** याच्या हस्तें मारला गेल्यामुळें त्याची **शोभा** या नांवाची एक गर्भवती स्त्री होती; तिनें आपल्या जीवाचें आणि गर्भाचें संरक्षण व्हावें म्हणून गजपुरांतून पळून गेलेले क्षत्रिय, तपस्वीवेषानें अरण्यांत आश्रम करून रहात असत, त्यांच्या आश्रमांत जाऊन त्यांना आपलें रक्षण करावें म्हणून विनंति केली; तेव्हां त्या क्षत्रियांनीं तिला आपल्या आश्रमाच्या आंत असणाऱ्या एका गुप्त जागीं ठेविलें; त्या स्थळीं तिला एक पुत्र झाला. त्याचें नांव तिनें **सुभोम** असें ठेवलें. हा **सुभोम** पुत्र चौदा वर्षांचा झाल्यावर ती **शोभा** राणी त्यास घेऊन **श्रीपरशुरामा**च्या वसतिस्थानाकडे गेली.

---

* श्रीमत् भागवताच्या नवव्या स्कंदांतील २३ व्या अध्यायांत या पांच पुत्रांची नांवें दिलीं आहेत, तीं:—१ जमध्वज, २ शूरसेन, ३ वृषभ, ४ मधू आणि ५ उर्जित.

**श्रीपरशुरामा**नें जे क्षत्रिय मारले होते, त्यांच्या दाढा एका सुवर्ण पात्रांत घालून तें पात्र एका धर्मशाळेंत ठेविलें आणि त्याचें रक्षण करण्यास आपल्या सेवकजनांस आज्ञा केली; कारण कोणी एका ज्योतिषानें **श्रीपरशुरामा**स असें भविष्य कथन केलें होतें कीं, ' ज्या पुरुषाच्या वक्र दृष्टीनें या दाढांचें दूध बनेल, तोच पुरुष तुमचा पराभव करील." हें भविष्य श्रवण केल्यापासून **श्रीपरशुरामा**नें त्या दाढांवर सक्त पाहारा ठेविला होता. कांहीं काळ लोटल्यावर **सुभोम** त्या ठिकाणीं येऊन पोहोंचला. त्यानें त्या दाढांवर आपली वक्र नजर फेंकतांच त्यांचें दूध झालें; आणि तें त्यानें प्राशनही केलें. हें पाहून **श्रीपरशुरामा**च्या दूतांनीं त्यास वेढलें; त्याबरोबर **सुभोमा**नें त्याच थाळीचा चक्राप्रमाणें उपयोग करून त्यांचा संहार केला. हें वर्तमान **श्रीपरशुरामा**स कळतांच तो आपलीं परशु वगैरे आयुधें घेऊन आला; परंतु क्षणार्धांत **सुभोमा**नें त्यांस जर्जर करून सोडलें; तेव्हां **श्रीपरशुराम** मागें परतले. तदनंतर **सुभोमा**नें तपस्वीवेषामध्यें असलेल्या गुप्त क्षत्रिय राजांना बोलावून आणून त्यांचें राज्य त्यांच्या स्वाधीन केलें; आणि आपण आपल्या पित्याच्या राज्यपदावर आरूढ झाला. त्यानें ब्राह्मण असलेल्या राजांना राज्यपदावरून पदच्युत केलें." अशा प्रकारें पुनरपी क्षत्रिय राजे प्रगट झाले, ते येणेंप्रमाणें:—**१ परमार, २ राठोड, ३ यादव, ४ चव्हाण,** आणि **५ सोळंखी;** हीं पांच घराणीं मुख्य होत. या पांच मुख्य घराण्यांतून १ सूर्यवंश, २ चंद्रवंश, ३ यादव, ४ कच्छवाड, ५ दधीखा, ६ जेठवा, ७ जोतिक, ८ जाट, ९ अभिवर, १० चव्हाण, ११ चावडा, १२ चंदेल, १३ मकवाना, १४ हूण, १५ ध्यानपाळ, १६ राजपाळ, १७ पोटपाळ, १८ काळछर, १९ सोळंखी, २० शिलार, २१ प्रतिहार, २२ पढीहार, २३ टांक, २४ परमार, २५ गोहीअर, २६ घेलोत, २७ देवडा, २८ तुंवर, २९ अनिग, ३० राठोड, ३१ गोड, ३२ लुकम, ३३ सिंधव, ३४ कांठी, ३५ हाडा आणि ३६ दाहिमा; याप्रमाणें ३६ कुळें बांधलीं गेलीं; त्यांपैकीं २४ शाखा चव्हाण वंशाच्या झाल्या; १३ शाखा राठोर वंशाच्या झाल्या; २० शाखा यादव वंशाच्या झाल्या; ७ शाखा सोळंकी वंशाच्या झाल्या; आणि ३५ शाखा परमार वंशाच्या झाल्या; या सर्व मिळून ९९ शाखा सध्यां क्षत्रियकुलांमध्यें प्रसिद्ध आहेत;

---

# क्षत्रिय कुळें.

**यादव** ( अथवा जाधव ) हे चंद्रवंशीय क्षत्रिय रजपूत असून त्यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांची कुलदेवी "**चावल**" ही आहे. हे मूळचे **मथुरागड**चे रहिवाशी असून तेथून ते **प्रभासपाटण** येथें आले. तदनंतर ते इतर ठिकाणीं पसरले. सन ८२९ च्या सुमारास देवगिरी (दौलताबाद) येथें येऊन राहिले.

**चुडासमा**—हे सूर्यवंशी रजपूत होत. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांच्या कुलदेवीचा शोध लागत नाहीं. यांच्या शाखा:— १ ली, **खोडीयार**, कुलदेवी "**खोडीआर**"; २ री **वेगड**, कुलदेवी "**खोडीआर**"; मूळ ठिकाण "**सिद्धपुर पाटण**"; पुढें तेथून ते **कुन्डेल** गांवीं येऊन राहिले. यांच्याविषयीं अशी एक आख्यायिका सांगतात कीं, **वेगड** यांस **बाबर** या नांवाचा एक पिशाच अनुकूल झाला होता; त्याच्या साह्यानें तो एका रात्रींत मोठमोठे गड अगर किल्ले तयार करीत असे; अशाच प्रकारें त्यानें एक **श्रीशंकराचें** देवालय बांधलें आहे, तें अद्याप कायम आहे. आणि ३ री **सावरीया**, कुलदेवी **चावल**.

**भटी**—हे चंद्रवंशीय रजपूत; यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे; यांचें मूळ ठिकाण **जसलमेर**; कुलदेवी "**खोडीआर.**" प्रथम हे **प्रभासपट्टणा**-हून निघून **जुनागड** येथें येऊन राहिले. तदनंतर पुढें ते **नवानगर** येथें आले; आणि तेथून पुढें ते चहूंकडे फैलावले.

**गोहेल**—हे चंद्रवंशीय रजपूत होत; यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांची कुलदेवी '**ब्रह्माणी.**" मूळ ठिकाण **खैरागड.** हे ज्या ठिकाणीं राहिले त्या प्रांतास **गोहिलवाड** असें नांव पडलें आहे; तें अद्याप तसेंच चालू आहे. यांच्या पोटशाखा:–१ ली **नांदोदरया**, २ री **धोधारी** आणि ३ री **कुकडीया.** हे ज्या गांवीं जाऊन राहिले त्या गांवांचीं नांवें हींच त्यांचीं आडनांवें झालीं आहेत. हे **नाथद्वारा**पासून आले म्हणून त्यांना

**नाथोदरया** असें म्हणतात. आणखी, त्यांनीं **बरडा** गांवामध्यें **कुकंनवाडा** बांधला म्हणून त्यांना **कुकडीया** असें म्हणतात.

**जेठवा**–श्रीहनुमान यांचा पुत्र **मकरद्धज** याचा पुत्र **मोडद्धज** आणि त्याचा पुत्र **जेठीद्धज** यापासून हा वंश उत्पन्न झाला आहे. या वंशाचें मूळ गांव **निलगिरी** आहे; आणि तेथून ते पुढें **पोरबंदर** येथें आले. यांच्यांतील पोट शाखा:—**पोरिया, रावळीया** आणि **गोला** ह्या होत. **गोला** हें नांव पडण्याचें कारण असें आहे कीं, **गोलधर** येथें त्यांची गादी होती. यांना यज्ञोपवित धारण करण्याचा अधिकार आहे. पहिल्या तिघांची कुलदेवी '**चावला**' आणि शेवटच्या **गोल** यांची कुलदेवी '**ब्रह्माणी**" ही आहे.

**सोळंखी**–**सौराष्ट्र** ( काठेवाड ) देशाच्या दक्षिणेस **जाफ्राबाद** या नांवाचें एक शहर आहे; तेथें त्यांचें मूळ वसतिस्थान होतें. पुढें ते तेथून निघून **पोर्तुगीज** सरकारच्या **दीव** बेटांत येऊन राहिले. तदनंतर पुढें ते कल्याणास येऊन राहिले; आणि तेथून ते चहूंकडे पसरले. यांच्या वंशाचीं आडनांवें:—**देवलिया, कामलिया, आसीपाल, खिमजिया, चाचकीया, चंदेरा, बुढानिया, चोथाजी, चोटलीआर, बुधानिया, देवडा, खर्सानिया** वगैरे, अशा प्रकारचीं त्यांचीं बावीस आडनांवें पडलीं आहेत; आणि तीं त्यांच्या राहत्या गांवांच्या नांवांवरून पडलीं आहेत. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे; यांची कुलदेवी '**चावण**' ही आहे.

**वाघेला**–**रीवा**च्या राजाच्या इतिहासामध्यें असें लिहिलें आहे कीं,**चालुक** कुलामध्यें **साळुंखेदेव** या नांवाचा एक राजा होऊन गेला; त्याच्या वंशाला **सोळंखी** असें म्हणतात. याच वंशामध्यें **वीरद्धज** उत्पन्न झाला; आणि त्याच्यापासून **व्याघ्रदेव** आणि **सुखदेव** असे दोन पुरुष उत्पन्न झाले. या **व्याघ्रदेवाच्या** वंशाला **वाघेला*** असें म्हणतात. हे सुर्यवंशीय रजपूत आहेत. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांची कुलदेवी "**ब्रह्माणी**" आहे.

**परमार**–**क्षिप्रा** नदीचे कांठीं **उज्जनी** या नांवाचें एक मोठें प्रख्यात शहर आहे. पुरातन काळीं या शहराचा असा सर्वत्र सुलौकिक पसरला होता

* **व्याघ्रहपाली** अथवा **वाघेला** हा गांव **अन्हीलवाड्याच्या** नैऋत्येस आहे. या गांवाच्या दहा मैलावरील जंगलांत वाघांची वस्ती आहे; त्यावरून हें नांव पडलें आहे.

 नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

कीं, हें विद्यादेवीचें जणूं काय माहेरघरच आहे. याच शहरांत थोर विद्वान् पुरुषरत्नांचा उदय झाला. याच गादीवर वीर **विक्रमादि** आणि राजा **भोज** यांच्यासारखे मोठे धर्मपरायण राजे होऊन गेले. त्यांच्यापैकींच **सिद्धराज जयसिंव्ह** हा आपल्या राजधानीचें संरक्षण करण्याकरितां आपल्या शत्रूंबरोबर सतत बारा वर्षें लढत होता. हेच परमार ऊर्फ **पवार** उच्च क्षत्रिय कुळांत मोडत आहेत. यांची गादी **धार** येथें आहे. या कुळाचा मूळपुरुष, राजा **यशोवर्मादि** हा होय. यांच्या पोटशाखा:—**धारवा**, कुलदेवी "**मोमाय**"; २ **मयानी**, कुलदेवीचा शोध लागत नाहीं; ३ **वरु**, कुलदेवी "**तृठिआन**"; ४ **पानखान्या**, कुलदेवी "**चावण**"; ५ **मेहरथा**, कुलदेवीचा शोध लागत नाहीं; ६ **मंडोरा**, कुलदेवी "**महमाया**"; आणि ७ **पढीहार**, कुलदेवीचा शोध लागत नाहीं.

**मारू**—हे सूर्यवंशीय रजपूत आहेत. यांना यज्ञोपवित्राचा अधिकार आहे. यांची कुलदेवी "**शिकोत्तर**" ही होय. हे पूर्वी मारवाड देशांत राहत असल्यामुळें यांना **मारू** अशी संज्ञा प्राप्त झाली आहे. यांच्यामध्यें १ **गांगपुरा** ( गंगापुरा ) आणि **डाबी** या दोन गांवांवरून दोन शाखा उत्पन्न झाल्या आहेत.

**चावडा**—या कुळाचा मूळपुरुष **भीम** चावडा. याच्या पोटशाखा सात आहेत, त्या येणेंप्रमाणें:— १ **भोम**, २ **इलिया**, ३ **आत्रोलीया**, ४ **सुवड**, ५ **वाघमसी**, ६ **सेनगरा** आणि ७ **चंडेगरा**.

**चव्हाण—वसिष्ठ** मुनीच्या अग्निकुंडांतून अबूच्या पर्वतावर उत्पन्न झालेल्या पांच क्षत्रिय वीरांपैकींच **चव्हाण** हें एक असून यांच्यामध्यें पुढें जे राजे होऊन गेले त्यांपैकींच **अन्हहल** या नांवाचा एक राजा होऊन गेला; यानें आपली गादी प्रथम **नागोरा** येथें स्थापन केली; त्या **अन्हहल**चा पुत्र, राजा **जयपाळ** यानें आपली गादी **अजमीर** येथें स्थापन करून राज्य करूं लागला. त्याचे वंशज **चव्हाण** या नांवानें प्रसिद्ध आहेत. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांची कुलदेवी, "**ब्रह्माणी**" ही होय. यांच्या पोटशाखा:— १ **कचकाच्या** आणि २ **नचकाच्या**. या दोन शाखांची

कुळदेवी "**ब्रह्माणी**"; ३ **बळीयाकाच्या** आणि ४ **वडुकर** या दोन शाखांच्या कुळदेवीचा शोध लागत नाहीं. ५ **उन्हेवाड** आणि ६ **देलवाडी** या दोन शाखांची कुळदेवी "**कनक**"; आणि ७ **सोनगढे** यांची कुळदेवी **कालिका.**

**राठोर**–सूर्यवंशीय रघुकुलोत्पन्न रजपूत; यांच्या दोन शाखा आहेत; १ **कनोजीया** आणि २ **कमधजीया.**

१ **कनोज**–सूर्यवंशीय रजपूत. कुळदेवी "**ब्रह्माणी**" यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे; यांच्या पोटशाखा:—

१ **जोगिया**–यांना यज्ञोपविताचा अधिकार असून यांची कुळदेवी "**चावण**" ही आहे.

२ **देवळीया**–यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांच्या कुळदेवीचा शोध लागत नाहीं.

२ **कमधजीया**–यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे; यांची कुळदेवी "**चावण**" ही आहे. यांची शाखा:—

**कालेरा**–यांस यज्ञोपविताचा अधिकार आहे; यांच्या कुळदेवीचा शोध लागत नाहीं.

**बोरणीया टांक–पृथ्वीराज** चव्हाण यांच्या पदरीं **टांकचट्टो** या नांवाचा सरदार होता; तोच या वंशाचा मूळपुरुष होय. हा सूर्यवंशीय होय. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. यांची कुळदेवी "**ब्रह्माणी**"; यांच्या एकंदर पंधरा पोटशाखा आहेत, त्या येणेंप्रमाणें:—

१ **कुसंबिया**—यज्ञोपविताचा अधिकार आहे; कुळदेवी, **सिकोत्तर.**

२ **बुडानिया**—यज्ञोपविताचा अधिकार आहे. कुळदेवी, **ब्रह्माणी.**

३ **चित्रोडा**—यज्ञोपविताचा अधिकार आहे; कुळदेवी, **ब्रह्माणी.**

४ **बलदाणीया**–यज्ञोपविताचा अधिकार आहे; कुळदेवी, **सिकोत्तर.**

५ **केसरीया**—यज्ञोपविताचा अधिकार. कुळदेवी, **सिकोत्तर.**

६ **बेटेचा**—यज्ञोपविताचा अधिकार. कुळदेवी, **सिकोत्तर.**

७ **वाढेर**—यज्ञोपविताचा अधिकार. कुळदेवी, **रांदल.**

८ **रेशमिया.**—यज्ञोपविताचा अधिकार. कुळदेवी, **सिकोत्तर.**

९ **बोराणिया**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवी, **ब्रह्माणी.**

१० **बोराणिया गांगाणी**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवी, **ब्रह्माणी.**

११ **झांपाई**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवी, **सिकोत्तर.**

१२ **काकरेचा**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवी **ब्रह्माणी.**

१३ **कचोळीया**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवीचा शोध लागत नाहीं.

१४ **केसरया**—यज्ञोपविताचा अधिकार. कुलदेवीचा शोध लागत नाहीं.

१५ **मकवाण**—हा वंश दिल्लीचा राजा अनंगपाळ याच्यापासून चालू आहे. मूळ वंशउत्पत्तिं कुंतिभोजपासून झाली आहे. मूळ राजधानी कीर्तिगड. यांना यज्ञोपविताचा अधिकार आहे. कुलदेवी **कालिका.**

---

## राज्यक्रांतीमुळें होणारे फेरफार.

एकाच जातीचे लोक एकाच काळीं निरनिराळ्या देशांमध्यें राहत असल्यामुळें ( मग त्यांचें राहणें कोणत्याहि कारणामुळें झालें असो ) त्यांच्या चालीरिती, पोषाख, भाषा, उद्योगधंदे व व्यवहार वगैरे गोष्टींमध्यें त्या त्या देशाच्या कालमानास अनुसरून थोडाबहुत तरी भिन्नपणा दिसून आल्याशिवाय राहत नाहीं; आणि हा भिन्नपणा कांहीं पिढ्या तसाच चालू राहिला म्हणजे त्यांच्या पुढील पिढीस तोच आपला सनातन कुलधर्म, तीच आपली पुरातन रूढी, आणि तीच आपल्या वाडवडिलांपासून चालत आलेली परंपरा आहे, असें वाटूं लागतें, हें अगदीं स्वाभाविक आहे. यामुळें ती तशीच पुढें कायम ठेवण्याची परंपरा सुरू होते. अशीं आपणांस धार्मिक आणि ऐतिहासिक ग्रंथांत पुष्कळ उदाहरणें सांपडतात.

त्याचप्रमाणें प्रत्येक गोष्टीस देखील आदि-अंत आहे, उन्नति आहे, अवनाति आहे; अशी स्थिति ही असावयाचीच. असा सर्वत्र नियम असलेला दिसून येत आहे. कोणत्याहि देशाच्या इतिहासाकडे जर आपण अवलोकन केलें तरी देखील आपणांस असेंच दिसून येतें कीं, व्यक्तिमात्राच्या स्थितीमध्यें जसा फरक होतो आणि रावाचा रंक आणि रंकाचा राव होऊन जातो, तद्वत् राज्यांचीही अवस्था होऊन जाते.

पूर्वी आपल्या या भरतखंडांत सूर्यवंशी **पृथ्वीराज चव्हाण** यांच्यासारखे महा थोर आणि महा प्रतापशाली क्षत्रिय अर्थातच रजपूत राजे होऊन गेले; परंतु जेव्हां त्यांच्या राज्यावर मोंगलांनीं एकामागून एक जंगी स्वाऱ्या केल्या आणि त्यांनीं आपल्या प्रत्येक स्वारीमध्यें प्रजाजनाला लुटणें, त्यांची भयंकर कत्तल करणें, त्यांचीं पवित्र देवळें भ्रष्ट करणें आणि त्यांचा समूळ नाश करणें अशीं कृत्यें करण्याचा सपाटा उडविल्यामुळें रजपूत राजे अगदीं जेरीस आले; आणि त्यामुळें त्यांचे आणि त्यांच्या प्रजेचे जे हाल झाले, ते कांहीं विचारूंच नका. देशांत शांतता नसल्यामुळें कलाकौशल्य आणि उद्योगधंदे यांचा ऱ्हास होत चालला. जो तो आपल्या प्राणाच्या रक्षणार्थ आपला देश सोडून ज्याला जिकडे मार्ग दिसेल तिकडे तो जाऊं लागला. आपल्या पोटापाण्याची जिकडे सोय लागेल तिकडे जाऊन त्या देशांत कायमची वस्ती करून ते राहूं लागले. अशा बिकट प्रसंगीं* त्यांची फार गरिबीची स्थिति असली पाहिजे. त्यांना त्या

---

* राजा असो किंवा रंक असो, त्याजवर प्रसंग हा असावयाचाच. सर्व दिवस कांहीं सारखे नसतात. सुखामागून दुःख आणि दुःखामागून सुख अशी परंपरा ही लागलेली आहे. मग शककर्त्ता क्षत्रिय शालिवाहन याजवर प्रसंग आला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं. त्या प्रसंगीं त्यास कुंभाराच्या घराचा आश्रय स्वीकारावा लागला! या शालिवाहनवंशास **कुमारराज** असें नांव आहे. या वंशाचे लोक आपणांस **कुंभार** ह्मणवून घेणार नाहींत, आणि ह्मणणें चुकीचें आहे. या वंशांतील राजे ह्मैसूर व काश्मीर येथें आहेत. कुमार या शब्दाचा कुह्मार व कुंभार असा अपभ्रंश होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. फार काय सांगावें, शालिवाहन हा कुंभाराच्या घरीं आश्रयास राहून त्याच्याच घरीं लहानाचा थोर झाला, यावरून तो कुंभारवंशांतीलच आहे असें कांहीं लोक समजतात; हें केवढें त्यांचें अज्ञान!!!

देशांत आपल्या उपजीविकेसाठीं काळवेळ पाहून स्वतःस सोइस्कर पडेल, असा उद्योगधंदा शोधून काढणें भाग पडलें. याच कारणामुळें हल्लीं आपणांस एकाच ज्ञातींत उद्योगधंद्यासंबंधानें जो भिन्नपणा दिसून येतो, त्याचें मुख्य कारण हेंच होय.

पौराणिक काळीं श्रीपरशुरामास निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची जशी विचित्र बुद्धि झाली आणि त्यामुळें क्षत्रिय लोकांना तपस्वी वेष धारण करून पर्णकुटिकेमध्यें वास करावा लागला, तद्वतच ऐतिहासिक काळींही मुसलमान लोकांच्या अमदानींत क्षत्रियांना आपले प्राणरक्षणार्थ आपली अस्सल रजपूत जात लपवून ठेवण्याचा महादुर्धर प्रसंग आला. असा प्रकार पूर्व काळींच घडला आहे, अशी गोष्ट मुळींच नाहीं. अशा प्रकारचीं उदाहरणें मानवजातीच्या इतिहासांत पुष्कळ सांपडतात; तीं शोधण्यास फार लांब जावयास नको. आपण अशा प्रकारचीं उदाहरणें अगदीं अलीकडच्या काळांतील घेऊं. कांहीं वर्षांमागें पुणें जिल्ह्यांतील कांहीं रामोशी लोकांनीं मारवाडी लोकांच्या विरुद्ध एक बंड उभारलें होतें. त्या प्रसंगीं त्यांनीं शेंकडों मारवाड्यांच्या वह्या जाळून टाकल्या, त्यांचीं घरेंदारें लुटलीं, आणि त्यांचीं नाकें कापण्याचा सपाटा आरंभिला; त्या प्रसंगीं मारवाड्यांनीं आपलें वित्त आणि नाक यांचें रामोशांपासून रक्षण करण्याकरितां खरे मारवाडी असून देखील, आम्हीं मारवाडी नाहींत असें दाखविण्याकरितां मारवाडी चालीच्या पागोट्यास फारकत देऊन टाकली; तीन शेंड्यांपैकीं दोन शेंड्या अजिबात उडवून दिल्या आणि कुणब्याप्रमाणें पागोटें बांधून, धोतर नेसून आणि पोषाख करून आम्ही कुणबी आहोंत असें बंडाचा मोड होईपर्यंत म्हणवूं लागले. या साधारण व क्षुल्लक कारणामुळें त्यांना आपली जात चोरण्याचा आणि कुणब्यांमध्यें घुसण्याचा प्रसंग आला.

तसेंच सन १८९३ सालीं मुंबईंत हिंदु मुसलमान लोकांचा मोठा दंगा झाला; त्या प्रसंगीं उभय जातीची मिळून बरीच प्राणहानी झाली. या प्रसंगीं कित्येक हिंदूंनीं आपल्या घरीं मुसलमानांना आश्रय देऊन त्यांचें प्राणरक्षण केलें; त्याचप्रमाणें कांहीं कुलीन मुसलमान लोकांनीं देखील आपल्या घरीं

हिंदूंना आश्रय देऊन त्यांचें प्राणरक्षण केलें. मुंबईतील घड्याळाचे आणि जवाहिराचे व्यापारी श्रीयुत **जी. वी. नाईक** यांनीं आपल्या घरांत मुसलमानांना आश्रय देऊन त्यांचे प्राण वांचविले, ही गोष्ट त्यावेळच्या वर्तमान व मासिकपत्रांतून आणि दंग्याच्या इतिहासाच्या पुस्तकांतून देखील प्रसिद्ध झाली आहे. हा दंगा जरी लवकरच मोडला, तथापि पुष्कळ हिंदु मुसलमान लोकांनीं प्राणसंरक्षणार्थ आपली जात चोरली. अशा आणीबाणीच्या प्रसंगीं या उभय जातींनीं योग्य समयसूचकता प्रगट करून आपल्या प्राणांचें रक्षण केलें, हें उत्तम झालें.

जेव्हां मोंगलांनीं प्रथमच रजपूत राजेलोकांवर स्वाऱ्या केल्या; त्या प्रसंगीं पुष्कळ रजपूत लोक आपले प्राण वांचविण्यासाठीं मोंगलांना वश झाले; इतकेंच नाहीं, तर त्यांनीं आपल्या कन्या देखील मोंगलांना दिल्या. याच कारणामुळें पुढें रजपुतांमध्यें दोन मोठे भेद झाले. एक मुसलमानांना कन्या देणारा आणि दुसरा त्यांना कन्या न देणारा; पण हा दुसरा भेद हाच अस्सल होय. या जातींतील लोकांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, "आम्ही आपला गळा मोंगलांना देऊं; पण आम्ही आपलें नाक ( कन्या ) कदापि देणार नाहींत." याच वर्गांतील रजपूत लोकांना मोंगलांच्या जुलुमापासून आपल्या प्राणाचा बचाव करण्यासाठीं आपली जात लपवून ठेवण्याचा प्रसंग आला; इतकेंच नाहीं, तर आपण उच्च जातीचे लोक असून देखील आम्ही हीन जातीचे आहोंत, असें स्वतःच त्यांना सांगण्याचा कठीण प्रसंग आला, यांत कांहीं आश्चर्य नाहीं.

आतां आपण अगदीं अलीकडचें एक ताजें उदारहण घेऊं. हल्लीं युरोपखंडांत युद्ध चाललें आहे, हें युद्ध कांहीं सामान्य नाहीं. हें महाप्रचंड आहे. अशा प्रकारचें युद्ध पुरातन काळीं देखील कोणत्याही देशांत झालें नाहीं. या युद्धांत तरी आपणांस काय दिसून येतें. ज्या प्रदेशांत युद्ध सुरू आहे, त्या प्रदेशांतील रहिवाश्यांमध्यें प्राणसंरक्षणार्थ धांवपळ सुरू झाली आहे. जात चोरण्याचा किंवा लपविण्याचा जो प्रकार आपल्या पौराणिक युगांत

आणि ऐतिहासिक काळांत झाला, तोच आज युरोपखंडांतील युद्धक्षेत्राच्या प्रदेशांतही दिसून येण्याचा संभव आहे. कित्येक जर्मन लोक इंग्लडांत आहेत, ते इंग्रज लोकांपासून आपली नजरकैद चुकविण्याकरितां आपण जर्मन असून, आम्ही कांहीं जर्मन नाहींत पण इंग्रज आहोंत, असें सांगत असतील. कित्येक इंग्रज, जर्मन देशांत असतील ते आपली नजरकैद चुकविण्यासाठीं इंग्रज असूनही जर्मन सांगण्याची वेळ आली आहे. अशा प्रकारचीं अनेक उदाहरणें वर्तमानपत्रांतून आपल्या वाचण्यांत आलीं आहेत. **इंग्रज, फ्रेंच, रशियन, बेल्जियन्, इटालिअन, जर्मन,** इत्यादि राष्ट्रें जीं आज युद्धांत गुंतलीं आहेत, आणि त्या राष्ट्रांतील जे लोक आज आपल्या शत्रूंच्या प्रदेशांत आहेत, त्यांना या दुर्धर प्रसंगीं आपल्या प्राणांचें रक्षण करण्यासाठीं आपला खरा देश लपवून ठेवून शत्रूचा देश तोच आपला देश आहे, असें सांगण्याची वेळ आली आहे.

आमच्या पूर्वजांनीं शत्रूच्या भयानें आपली जात चोरली, हा त्यांनीं मोठाच शहाणपणा केला आणि आपला दूरदर्शी स्वभाव व्यक्त केला, यांत तिळमात्र संशय नाहीं. जेव्हां पांडवांना वनवासास जाण्याचा प्रसंग आला आणि त्यांचा वनवास पुरा झाल्यावर त्यांना एक वर्ष अज्ञातावस्थेंत काढावयाचें होतें, त्या वेळीं त्यांनीं आपली अस्सल क्षत्रिय जात लपवून ठेवून वेषांतर केलें. **धर्मराज** कंकभट ( ब्राम्हण ) होऊन विराटाच्या घरीं राहिले. **भीम** बल्लव ( आचारी ) बनले. **अर्जुन,** बृहन्नडा ( नर्तकी ) झाले. **नकुळ,** ग्रंथिक ( मोतद्दार), **सहदेव,** अरिष्टनेमी (शूद्र) आणि **द्रौपदी,**(सैरंध्रि) दासी झाली. **हरिश्चंद्र** राजाला जरी जात चोरण्याचा प्रसंग आला नाहीं, तरी आपलें सत्व रक्षण करण्यासाठीं डोमाच्या घरीं रहावें लागलें. छत्रपति **श्रीशिवाजी** महाराज बाल्यावस्थेंत असतां त्यांचें गुप्त रीतीनें संरक्षण करण्यासाठीं एका ब्राह्मण पंडिताच्या घरीं ठेविलें होतें; पुढें ही गुणगुण मोंगलांच्या कानावर गेली आणि ते बाल शिवाजीमहाराजांना मारण्याकरितां त्या पंडिताच्या घरीं आले; त्या प्रसंगीं त्या पंडितानें, शिवाजी हा आपलाच मुलगा आहे असें सांगितलें; पण ही

गोष्ट मोंगलांस खरी वाटेना. तेव्हां त्यांनीं अशी शक्कल काढली कीं, जर हा तुमचाच स्वतःचा मुलगा आहे, तर त्याला आपण आपल्या ताटांत घेऊन एकत्र भोजन करावें. त्याप्रमाणें त्या पंडितानें लागलेंच केलें.

आमच्या देशांतील लोकांना आणि आमच्या पूर्वजांना प्रसंगीं आपली जात कशी चोरावी लागली, यासंबंधानें वर जें विवेचन केलें आहे, त्यासंबंधानें रामोशांच्या वेळचीं मारवाड्यांचीं, आणि हिंदु मुसलमानांच्या दंग्याच्या वेळीं हिंदु मुसलमानांचीं उदाहरणें दिलीं आहेत; त्यावरून आणि खुद्द आज युरोपखंडांत महायुद्धप्रसंगीं शत्रूपासून आपलें रक्षण करण्यासाठीं आपला देश लपविल्यावांचून दुसरा कोणताच मार्ग नाहीं. यावरून आमच्या पूर्वजांनीं प्राणरक्षणार्थ आपली रजपूत जात लपविली, यांत त्यांनीं कोणत्याही प्रकारचा अधर्म केला नाहीं, पाप केलें नाहीं किंवा दोषहि केला नाहीं. उलट हा त्यांनीं मोठा शहाणपणा केला, याबद्दल ते स्तुतीस आणि प्रशंसेस पात्र आहेत.

## मुसलमानांच्या अमदानींत रजपूतांचा छल.

क्षत्रिय अर्थातच रजपूत हे एका संकटांतून (श्रीपरशुरामाच्या निःक्षत्रिय करण्याच्या घोर प्रतिज्ञेंतून) पार पडून कांहीं युगें लोटल्यानंतर दुसरें एक संकट दत्त म्हणून त्यांच्यापुढें येऊन उभें राहिलें. तें संकट म्हटलें म्हणजे मोंगलांच्या हिंदुस्थानावरील स्वाऱ्या हेंच होय. ह्या स्वाऱ्या करण्याचा मुख्य हेतू केवळ राज्यतृष्णा हीच होय. देश पादाक्रांत करावे आणि आपल्या राज्याचा विस्तार करावा, या राक्षसी महत्वाकांक्षेमुळें त्यांनीं रजपूतांचीं थोर थोर राज्यें रसातळास पोंहचविलीं. त्यासंबंधानें ग्रंथविस्तारभयास्तव थोडक्यांत इतिहास निवेदन केला पाहिजे; म्हणजे त्यावरून रजपूतांचे वंशज आपला मुळचा देश सोडून दक्षिणेंत कसे आले, हें चांगलें कळून येणार आहे.

इ० स० ९६७ सालीं रजपूत राजा जयपाळ यानें आपल्या सरहद्दीजवळ मुसलमानी राज्याची सरहद्द आल्यामुळें त्यानें दोन वेळां मुसलमानांविरुद्ध

युद्ध केलें, आणि दोन्ही वेळां त्याचा पराभव होऊन उलट त्यास मुसलमानांना खंडणी द्यावी लागली. आपला दोन वेळां पराभव झाला हें पाहून, जयपाळ राजानें आपला पुत्र अनंगपाळ यास गादीवर बसवून आपण स्वत: आत्म-हत्या करून घेतली. पुढें अनंगपाळावर महमुदानें इ० स० १००६ मध्यें स्वारी केली, त्याप्रसंगीं सर्व रजपूत, त्याचा पराभव करण्याकरितां एकत्र जमले. या वेळीं रजपूत स्त्रियांनीं आपलें जवाहीर व दागिने विकून युद्धास द्रव्यसाहाय्य केलें; परंतु अखेरीस महमुदाचाच जय झाला. पुढें इ० स० १०२४ मध्यें पुन्हा महमुद रजपुतांचा पराभव करण्याकरितां चालून आला; त्या वेळींहि त्याचाच जय झाला. पुढें इ. स० ११९१ मध्यें महमद घोरीनें दिल्लीचा महाप्रख्यात रजपूत राजा पृथ्वीराज चव्हाण याचा पाडाव करण्याकरितां स्वारी केली; परंतु या स्वारींत महमद घोरीचा पराभव झाला. या पराभवाचा सूड उगविण्याकरितां महमद घोरीनें पुन्हां इ० स० ११९३ मध्यें पृथ्वीराज चव्हाणवर स्वारी केली; या स्वारींत पृथ्वीराज चव्हाणचा पूर्ण पराभव झाल्यामुळें त्यांनीं आपला शेवट करून घेतला. पुढें महमदघोरीनें* अजमीर घेऊन तेथील रजपुतांची भयंकर कत्तल केली.

* पृथ्वीराज चव्हाणानें मुसलमानांबरोबर सात लढाया केल्या; त्यांत त्याला जय मिळाला; त्यानें मुसलमान बादशहांना कैद करून त्यांचा अत्यंत छल केला; आठव्या लढाईंत महमद घोरी बादशहाचा जय होऊन त्यानें पृथ्वीराजास कैद केलें; आणि त्याचे हाल हाल करून त्याला मारण्याचा त्यानें निश्चय केला. पृथ्वीराजाच्या अनुयायी मंडळींना देहान्त प्रायश्चित्त दिलें ! त्या प्रसंगीं कांहीं रजपूत शूर वीरांनीं आपल्या धन्याकरितां प्राणाची देखील पर्वा न करितां आह्मी रजपूत आहोंत असें सांगून स्वसंतोषानें सुळीं गेले; परंतु कांहीं लोक बादशहाच्या जुलमांतून मुक्त होण्याकरितां अन्य जातींच्या आश्रयानें राहून आणि त्या जातीचें नांव सांगून आपले प्राण रक्षण केले. महमद घोरी बादशहानें बरींच वर्षें राज्य केलें; त्यामुळें अन्य जातींच्या आश्र-यानें छपून राहिलेले रजपूत त्या जातीच्या आड दडून त्यांना त्यांचे उद्योगधंदे करणें भाग पडलें; आणि कांहीं रजपूत, हुशारीनें आणि चलाखीनें आपला रजपूतपणा कायम राखण्याकरितां बादशहाच्या जुलमांतून पळून गेले. तेच रजपूत निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या जातींच्या नांवानें प्रसिद्ध होऊन कालानुरूप उद्योगधंदे करूं लागले, आणि


इ० स० ११९७ सालीं सर्व हिंदुस्थान देश पादाक्रांत करणारा अल्लाउद्दिन यानें राजपुतान्यांतील चितोड ह्मणजे हल्लींचें उदेपूर जेथें मोठें नामांकित रजपूत राज्य होतें, तेथील राजा भीमसिंग याची राणी पद्मिनी ही अत्यंत लावण्यवती स्त्री आपणांस प्राप्त व्हावी ह्मणून चितोडावर स्वारी केली. त्यानें रजपुतांचा पाडाव करून चितोड शहर घेतलें, पण त्याच्या हातीं कांहीं पद्मिनी लागली नाहीं. महंमद तघलखानें इ० स० १३२६–१३५१ मध्यें असा विचार केला कीं, दक्षिण हिंदुस्थानांत बंडें फार होतात, यासाठीं आपण तेथें स्वतः हजर असावें; ह्मणून तो आपली दिल्लीहून राजधानी काढून ती देवगडास **दौलताबाद** हें नवीन नांव देऊन तेथें वसविली. पुढें अकबरानें इ० स० १५६१ मध्यें रजपूत लोकांना अनुकूल करून घेण्यासाठीं लढाईसारखे जालीम उपाय न योजितां सौम्य उपायानें त्यांना अनुकूल करून घेण्याची एक विलक्षण शक्कल काढली. ती ही कीं:— रजपूत लोकांच्या मुलींचीं लग्नें मुसलमानांबरोबर करण्याचा प्रघात सुरू करावा, आणि त्याप्रमाणें तो त्यानें प्रचारांतहि आणला. खुद्द अकबरानें जयपूरचा राजा बहारमल याची कन्या जोधबाई हिच्याबरोबर आपला विवाह केला. इ० स० १५६७ मध्यें अकबरानें चितोडावर स्वारी केली. या समयीं रजपूत निकरानें लढले, व शेवटीं त्यांचाच पराभव झाला खरा,

---

त्यांनीं जरी जातीचें उद्योगदर्शक नाम धारण करून तें पिढ्यानपिढ्या चालू ठेवून अंधपरंपरेनें वागूं लागले, तरी धर्मविधी व रीतिरिवाजामध्यें प्रसंगानुसार फारसा फरक पडला नाहीं.

१. अकबर हा हिंदुमुसलमानांतील द्वेषभाव नष्ट करण्यासाठीं आणि त्यांच्यामध्यें प्रेमभाव उत्पन्न करण्यासाठीं स्वतः गंध लावीत असे. यास प्रमाण:—History of the Nations ( राष्ट्रांचा इतिहास ) या मालेंतील India ( हिंदुस्थान ) या पुस्तकाच्या १९१ पानावर एक सुंदर चित्रपट दिला आहे. त्यांत रजपुतांचीं सहा आणि मोंगलांचीं सहा अशीं बारा चित्रें दिलीं आहेत. त्यांत अकबराच्या कपाळावर वैष्णवाप्रमाणें उभें गंध लावलेलें दाखविलें आहे.

२. या विवाहाच्या मुळाशीं जरी कांहीं राजकारस्थान असलें, तथापि त्यापासून राजवंश अथवा अन्य रजपूतवंश कोणत्याहि प्रकारें दोषी होऊं शकत नाहीं.



नंबर २. पुणें येथें ता. ३० माहे मे सन १९०७ इ. रोजीं पुणें, मुंबई, जयपूर व इतर ठिकाणच्या आमच्या ज्ञातबांधवांचा घेतलेला फोटो.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

तथापि ते कांहीं अकबरास शरण गेले नाहींत, किंवा त्याचें वर्चस्वहि त्यांनीं कबूल केलें नाहीं. त्यांनीं आपली राजधानि नवीन केली, तिचें नांव **उदेपूर** असें ठेविलें. या घराण्यांतील राजांनीं आपल्या मुली मुसलमानांस दिल्या नाहींत. इ० सन १५७२ मध्यें अकबरानें गुजराथ प्रांत जिंकला आणि दक्षिणेस अहमदनगर येथें आला. पुढें मुसलमान राजे गुजराथ, खानदेश, औरंगाबाद, अहमदनगर वगैरे ठिकाणीं इ० सन १५९५ मध्यें आले. तेव्हां त्यांच्याबरोबर पुष्कळ रजपूत लोकहि आले; आणि ते तेथें आपलें कायमचें ठाणें देऊन राहिले. तेथून त्यांचे वंशज पुणें, सातारा वगैरे शहरीं जाऊन कायमचे रहिवाशी झाले.

प्राचीनकाळीं नवरंगशहा या नांवाच्या बादशहाला राजपुतान्यांतील सवाई जयसिंग नांवाच्या राजानें पूर्व वहिवाटीस अनुसरून दहा हजार मनुष्यें * नजर केलीं; त्यांपैकीं चार हजार नर्मदेच्या उत्तरेस राहिलीं, व सहा हजार दक्षिणेस गेलीं; हीं सर्व माणसें रजपूत होतीं; देशत्याग घडल्यामुळें त्यांनीं आपलें पूर्वकर्म सोडून उदरंभरणार्थ निरनिराळे व्यवसाय सुरू केले.

पूर्वकाळीं **जुगाद** या नांवाचा एक रजपूत राजा होऊन गेला; त्याचा जन्म जलापासून झाला, म्हणून त्याचे गोत्रज आपणांस **जलेंद्रे** म्हणवितात. ह्या **जुगाद** राजाचा वंशज जयपुरचा **मान** राजा हा होय. त्यानें जेव्हां दक्षिणेवर स्वारी केली तेव्हां त्याच्या समागमें क्षत्रिय लोक आले; त्यांपैकीं कांहीं लोक शत्रूपासून आपल्या प्राणांचें संरक्षण करण्यासाठीं बेलदारांच्या आश्रयानें राहिले. यामुळें त्यांना खेड्यापाड्यांत बेलदार असें म्हणण्याची वहिवाट पडली आहे; परंतु त्यांचा बेलदारांबरोबर कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. ते आपली जात क्षत्रिय कुमावत असें सांगतात.

---

* रजपूत मनुष्यें फौजेंत हमाली काम करण्याकरितां आणि पाणी देण्याकरितां दिलीं होतीं; त्यांना बेलदार व भिस्ती ( शिक्का ) असें ह्मणण्याचा प्रघात आहे; परंतु त्यांना हीं नांवें जातीवरून पडलीं नसून धंद्यावरून पडलीं आहेत. यांचा बेलदार व भिस्ती या जन्मसिद्ध जातीबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध नाहीं.

# अत्याचाराचा परिणाम.

हिंदुधर्म हा अति पुरातन आहे, असें सर्व पुराणग्रंथकार आणि इतिहासकार कबूल करतात. हिंदूंचा धर्म, हिंदूंची नीति, हिंदूंचें सौजन्य आणि हिंदूंचें औदार्य यांचा सुलौकिक फार पुरातन काळापासून पसरला आहे. तो अद्याप तसाच कायम आहे; आणि तो तसाच कायमहि राहणार आहे, ही अगदीं निःसंशय व निर्विवाद गोष्ट होय. मुसलमानांचा धर्म हा हिंदुधर्माच्या मागाहून उत्पन्न झाला आहे; इतकेंच नाहीं, तर तो ख्रिस्ती धर्माच्याहि मागाहून उत्पन्न झाला आहे.

कांहीं मुसलमान लोकांनीं आपल्या धर्माचा प्रसार करण्याच्या कामीं धर्माज्ञा नसतां केवळ अविचारानें तलवारीचा उपयोग करून धर्म व नीति धाब्यावर बसवून धर्माच्या पवित्र नांवाखालीं कसा अधर्म केला आणि किती अनाचार केला, याचीं उदाहरणें इतिहासांत पुष्कळ सांपडतील आणि तीं येथें नव्यानें सांगण्याची जरूर नाहीं; कारण ही अगदीं इतिहासप्रसिद्ध गोष्ट आहे. लढाईत सांपडलेल्या किंवा जुलूम जबरदस्तीनें धरून आणलेल्या क्षत्रियांच्या सुंदर स्त्रियांची विटंबना करावी, त्यांचें पातिव्रत्य हरण करावें, द्रव्यप्राप्तीसाठीं हिंदूंचीं पूज्य देवळें भ्रष्ट करावीं, आणि त्यांतील पवित्र मूर्त्तिचा विध्वंस करून टाकावा ! अशा प्रकारचीं कर्में मुसलमानांनीं केल्यामुळें खरे व अस्सल जे क्षत्रिय होते, ते लढाईस निघाले म्हणजे आपल्या सुंदर स्त्रियांचा मुसलमानांपासून छळ व विटंबना होऊं नये म्हणून **जोहार** करीत; म्हणजे त्यांना जिवंत जाळून टाकीत असत ! कधीं कधीं असाहि प्रकार होत असे कीं, आपले पती लढाईवर गेले आहेत, त्यांना आतां जय मिळण्याची आशा नाहीं, अशा प्रसंगीं त्या स्त्रियाच स्वतः आपणांस जिवंत जाळून घेत असत ! ! ! रजपूत स्त्रियांची मुसलमान पराकाष्टेची विटंबना करीत असल्यामुळें आपणांस कन्या झाली असें समजल्याबरोबर रजपूतांना अतिशय वाईट वाटत असे; तें इतकें कीं, कन्या झाली म्हणजे ते तिला तात्काल मारून टाकीत असत; किंवा तें तान्हें बाल आहे तोंच तिचा बाप एका हातांत ती

ह ९२६ ग्रं. क्र. इति.. १०

तान्ही मुलगी आणि दुसऱ्या हातांत शस्त्र घेऊन भरबाजारांत उभा राहून उच्च स्वरानें असें बोलत असे कीं, "ह्या दीन अर्भचाका पत्नी म्हणून प्रतिपाल करणारा कोणी आहे काय ? जर नसेल, तर मला या दीनाची हत्या करण्याचा महा भयंकर व अमानुष्य प्रसंग येणार आहे.*" अशा प्रकारची त्या वेळीं वहिवाट पडून गेली होती. यावरून त्या काळीं मुसलमान लोक रजपूत स्त्रियांचा किती छल आणि किती विटंबना करीत होते, तें ढळढळीत दिसून येत आहे. पण ही कन्याहत्येची दुष्ट चाल परम दयाळु व न्यायी इंग्रज सरकारच्या राज्यांत बंद झाली. पूर्वींच्या रजपूत वीरांचें रक्त अद्यापपर्यंत त्यांच्या वंशजांच्या अंगीं खेळत असल्यामुळें, त्यांना या शांततेच्या काळांतही जरी कन्या झाली, तरी मन खट्टू झाल्याशिवाय रहात नाहीं; हें कन्यारूपी बिकट संकट आपणांवर येऊन गुदरलें आहे असें त्यांना वाटतें !

आपणांवर आणि त्यांतहि मुख्यत्वेंकरून आपल्या स्त्रियांच्या पातिव्रत्यावर केव्हां प्रसंग येईल, याचा मुळींच भरवंसा नसल्यामुळें पुष्कळ रजपुतांनीं आपली जन्मभूमी सोडून हिंदुस्थानांतील बहुतेक भागांत जाऊन, तेथें ते स्थायिक बनले. **टॉड**साहेब असें लिहितात कीं, पूर्वीं जेव्हां मुसलमान लोकांनीं राजपुतान्यावर स्वारी करून तेथील पुष्कळ लोकांस राजपुताना सोडून बाहेर पळून जाण्यास भाग पाडलें, तेव्हां जे रजपूत नेपाळांत गेले, ते आपणास गुरखे म्हणवूं लागले. हें नांव 'गोरख' अथवा 'गोरखा' या नांवाचें नेपाळचें जें जुन्या राजधानीचें शहर होतें, त्यावरून तेथील राजकर्त्या लोकांस पडलें आहे. तसेंच रजपुतांपैकीं जे लोक कुमायून प्रांतांत गेले, ते आपणा स्वतःस राऊत उर्फ राजे असें म्हणवितात. राऊत या आडनांवाचे लोक रजपूत व मराठे या उभय वर्गांत आढळतात.

श्री क्षत्रिय जातीचा इतिहास

* टॉड्कृत राजस्थानचा इतिहास, भाग १, पान ५४७.

वैताडे ग. भि.

# रजपूत ही एक जात आहे.

रजपूत लोकांविषयीं पुष्कळ लोकांचा असा समज आहे कीं, जे लोक राजपुतान्यांत राहतात, त्या सर्वांना रजपूत असें ह्मणतात; आणि या रजपुतांमध्यें अठरापगड जाती आहेत; परंतु हा त्यांचा समज अज्ञानमूलक अगर भ्रांतिमूलक आहे; कारण रजपूत ही एक स्वतंत्र जात आहे. यासंबंधानें **व्हीलर**साहेब आपल्या History of India ( हिंदुस्थानाचा इतिहास ) या पुस्तकाच्या तिसऱ्या भागाच्या ३२७ व्या पानामध्यें असें लिहितात:— "The Rajputs or sons of Rajas are the noblest and proudest race in India" ह्मणजे "हिंदुस्थानामध्यें रजपूत अथवा राजाचे पुत्र ही अत्यंत कुलीन आणि अभिमान बाळगण्यासारखी एक **जात** आहे." यावरून असें उघड उघड सिद्ध होतें कीं, राजपुतान्यांत राहणारे हे सर्व रजपूत नसून, रजपूत ही एक निराळीच **जात** आहे. पौराणिक युगांत ज्यांस **राजन्य** ( क्षत्रिय ) असें ह्मणत असत, त्याच जातीस आज रजपूत असें ह्मणतात. आणखी, पौराणिक काळांत जे थोर क्षत्रिय नृपती झाले, त्यांच्याच वंशाचे आह्मी आहोंत, असें ते सप्रमाण सिद्ध करून दाखवीत आहेत. अशाच प्रकारचा एक आक्षेप चांगले चांगले सुशिक्षित लोक **मराठा** या शब्दासंबंधानें घेत असतात. ते **मराठा** या शब्दाचा अर्थ जातिवाचक न करितां देशवाचक करितात. महाराष्ट्रांत राहणारे जितके लोक तितके सारे **मराठे** असें ते प्रतिपादन करितात; परंतु हा त्यांचा समज अगदीं चुकीचा आहे; कारण **मराठे** ह्मणविणारी एक मोठी जात आहे आणि ती **मराठे** या नांवानें लोकप्रसिद्ध आहे. सर डॉ. रामकृष्णपंत भांडारकर यांनीं कै० बिर्जे यांनीं केलेल्या Who are the Marathas's? ( **मराठे हे कोण आहेत ?** ) या इंग्रजी पुस्तकावर आपला अभिप्राय दिला आहे; त्यांत त्यांनीं महाराष्ट्रांत राहणारे जितके लोक तितके सारे मराठे नसून, मराठा ही एक वेगळी **जात** आहे असें कबूल केलें आहे. तद्वतच प्रकार रजपुतांसंबंधानें झाला आहे.

जर आपण राजपुतत्न्यांत राहणारे जितके लोक तितके सारे रजपूत असा अर्थ कबूल केला, तर यावर अशी एक शंका येणार आहे कीं, राजपुतान्यांत

राहणारे ब्राह्मण लोक आहेत, ते आपणास रजपूत ब्राह्मण असें कधींहि ह्मणवीत नाहींत; आणि रजपूत ब्राह्मण आहेत असें आपणहि कधीं ऐकलें नाहीं. राजपुतान्यांतील कनिष्ट जातींतील लोक परदेशांत गेले ह्मणजे आपल्या जातीचा कनिष्टपणा झांकण्यासाठीं आपल्या जातीच्या मागें **रजपूत** हें श्रेष्ठ जातिपद कदाचित् लावीत असतील; त्यावरून ते कांहीं रजपूत ठरत नाहींत. फार झालें तर, ते राजपुतान्यांतील असतील, इतकेंच मात्र ठरेल. जसें बंगाल, गुजराथ, महाराष्ट्र, मद्रास, तेलंग वगैरे देशांतील ब्राह्मण दूरच्या प्रदेशांत गेल्यावर आपण बंगाली ब्राह्मण आहोंत, गुजराथी ब्राह्मण आहोंत, मद्रासी ब्राह्मण आहोंत, तेलंगी ब्राह्मण आहोंत असें सांगतात, तसें आजपर्यंत राजपुतान्यांतील ब्राह्मणांनीं आपण रजपूत ब्राह्मण आहोंत असें कधींहि सांगितलें नाहीं. याचें कारण काय ? तसेंच महाराष्ट्रांतील ब्राह्मण आपणांस मराठे ब्राह्मण असें कधींहि सांगत नाहीं, याचें कारण काय ? महाराष्ट्रांतील ब्राह्मण दूरदेशीं गेले ह्मणजे आपणांस दक्षिणी ब्राह्मण असें सांगतात. याचें कारण काय ? यावरून राजपुतान्यांत राहणारे तितके सारे **रजपूत**, आणि महाराष्ट्रदेशांत राहणारे तितके सारे **मराठे** असा अर्थ सिद्ध होत नाहीं, तर **रजपूत** व **मराठे** ही स्वतंत्र जात आहे, आणि ती क्षत्रिय वर्णांत मोडणारी आहे असें सिद्ध होत आहे. पौराणिक ग्रंथांत जी क्षत्रिय जात सांगितली आहे, तीच ही **रजपूत** व **मराठे** जात आहे.

ब्राह्मण लोक आपणांस तीन वर्णांपेक्षां श्रेष्ठ समजतात, ह्मणूनच ते आपणांस रजपूत ब्राह्मण अगर मराठे ब्राह्मण ह्मणवीत नाहींत. बंगाल, गुजराथ, महाराष्ट्र, मद्रास, तेलंग हीं जशीं देशांचीं नांवें आहेत, तशीं रजपूत अगर मराठे हीं देशांचीं नांवें नसून जातींचीं नांवें आहेत असें ढळढळीत दिसून येतें; आणि, ते त्या देशाचे सत्ताधारी असल्यामुळें त्यांच्या जातीचें नांव त्यांच्या देशास प्राप्त झालें आहे.

**राजावटी** आणि **शेखावटी** हीं नांवें अभिमानदर्शक आहेत. पूर्वीं राजपुतान्यामध्यें हे दोन मोठे पक्ष होते. एक राजाचा राजावटी आणि दुसरा बादशहाचा शेखावटी; यांत जातिवाचक भेद नाहीं.

## राजकुमार, कुमार आणि कुमावत.

**म** आणि **भ** या दोन अक्षरांमध्यें प्रथमपासूनच फार थोडा फरक आहे. आपल्या कुमार जातीची सविस्तर माहिती ज्या वह्यांमध्यें भाटानें लिहून ठेवली आहे, त्या वह्या कोणी चोरून नेऊं नयेत, आणि त्या वह्यांचा कोणी कोणत्याहि प्रकारें दुरुपयोग करूं नये, यासाठीं ते पूर्वीपासूनच मोठी काळजी बाळगीत असत; म्हणूनच ते आपल्या वह्यांवर एक प्रकारची सांकेतिक शब्दरूपी खूण लिहून ठेवीत असत. सांप्रत, आपण सूक्ष्म दृष्टीनें शोध, मनन व विचार केला असतां आपणांस असें उघड उघड दिसून येतें कीं, त्या वह्यांमध्यें **बोडियार** या शब्दाच्या ऐवजीं **बोलिया**, आणि **पडिहार** या शब्दाच्या ऐवजीं **पढिहार** असे सांकेतिक शब्द मुद्दाम लिहून ठेवले आहेत; म्हणजे **डी**च्या ठिकाणीं **लि** आणि दुसऱ्या स्थळीं **डी**च्या ठिकाणीं **ढि** ही वर्णयोजना केली आहे. तद्वतच **म**च्या ऐवजीं **भ** हा वर्ण मुद्दाम सांकेतिक अथवा खुणेचा म्हणून लिहिण्याचा प्रघात असे; या त्यांच्या विचारशैलीमुळें या ज्ञातीचें मूळनांव **राजकुमार**[1] असून वरील सांकेतिक वर्णामुळें **म** बद्दल **भ** लिहिण्याचा प्रचार पडून ही जात पुढें **कुंभार** जात या नांवानें प्रसिद्धीस आली आहे.

आणखी, **भाटे ज्ञातीच्या मूळकथा** या नांवाच्या पुस्तकाच्या ४६ व्या पानावरील चवथ्या पॅरिग्राफमध्यें **उईलफोर्ड** साहेबांचा अभिप्राय दिला आहे, त्यावरून असें कळून येतें कीं, यज्ञकुंडांतून उत्पन्न झालेल्या ( भट्टीवंशाच्या ) कित्येक शाखा आपणा स्वतःला **शकराजकुमार**[2] असें म्हणवितात; यावरून

---

१. **टॉड**साहेब आपल्या **राजस्थान** नामक प्रमाणभूत ऐतिहासिक ग्रंथांत असें लिहितात कीं, The Rajkoomar is one of Chohan Sacha, chief of the Agniculas. **राजकुमार** हे चव्हाण शाखेपैकीं एक आहेत. हे अग्निकुळांत प्रमुख आहेत. Vol. I, p. 549.

२. जसेलमेर, अजमीर, उदेपूर व जयपूर या ठिकाणीं या जातीचे लोक राहतात; ते आपण त्याच जातीचे ह्मणजे **राजकुमार** जातीचे आहोंत असें ह्मणतात.

असें सिद्ध होतें कीं, ही जात मूळारंभीं **कुमार** जात या नांवानें ओळखली जात असे, ही अगदीं उघड उघड आणि नि:संशय सिद्ध गोष्ट आहे; कारण या जातींत भट्टीवंशांतील शाखेचेहि पुष्कळ लोक आहेत. जसे भाटे लोक आपल्या स्वत:चा संबंध **जेसलमेरचे भट्टी** राजवंशाबरोबर जोडतात, तसेच या जातींतील निरनिराळ्या शाखाहि आपला संबंध निरनिराळ्या क्षत्रिय राजांबरोबर जोडतात; परंतु ते लोक अज्ञानी असल्या कारणामुळें त्यांनीं या गोष्टीचा आधार आपल्या भाटांपासून समजून घेतला नाहीं. त्याचप्रमाणें **म** आणि **भ** या दोन अक्षरांमध्यें कोणता भेद आहे, तोहि त्यांनीं समजून घेतला नाहीं. आपल्या घरीं उपाध्ये आले म्हणजे ते त्यांची सढळ हातानें योग्य संभावना करीत होते; पण त्यांनीं त्यांच्यापासून आपल्या जातिवाचक [illegible]मध्यें **म**चा **भ** कसा झाला, याविषयीं मुळींच विचारपूस केली नाहीं; [illegible]ामुळें आज असा शोचनीय परिणाम झाला आहे कीं, तेव्हांपासून ही **कुमार** जात **कुंभार** या नांवानें संबोधिली जात आहे. आणखी, आज [illegible]पण जर कोणास असें सांगितलें कीं, **कुंभार** जात ही एक निराळीच जात असून **कुमार** ही एक निराळी जात आहे, व या उभय जातींचा परस्परांशीं कोण-त्याहि प्रकारचा मुळींच संबंध नाहीं, तर ही गोष्ट कित्येकांस खरी वाटणार नाहीं; इतकेंच नव्हे तर, हें म्हणणें त्यांना मोठें आश्चर्यकारक वाटल्यावांचून राहणार नाहीं.

पूर्वींचे क्षत्रिय जे राजपदावर होते, ते आपल्या प्रजेचें पालन न्यायनीतीनें करण्यांत मोठे तत्पर होते; परंतु पुढें कालांतरानें त्यांचेच वंशज शेतकी आणि इतर धंदे करूं लागले; तद्वत् **राजकुमार** जातींतील लोकहि आपल्या उदरनिर्वाहासाठीं निरनिराळ्या प्रकारचे उद्योगधंदे करूं लागले असें भाटांच्या चोपड्यांवरून ढळढळीत दिसून येत आहे. याप्रमाणें हीं क्षत्रिय अथवा **राजकुमार** जात पुढें **कुमार** जात या विशेष नांवानें प्रसिद्धीस आली आहे, असें निर्विवाद रीतीनें सिद्ध होत आहे. अशाप्रकारें क्षत्रिय **कुमार** जात राजवैभवरहित झाल्यावर आणि निव्वळ शेतकरी होऊन किंवा इतर धंदे करून राहिल्यावर विद्येच्या अभावामुळें ते आपलें **मूळ** विसरून गेले.

आमची जात आणि माझे टिपण

 इ. १३

हल्लीं पुणें, मुंबई, सातारा, खानदेश, औरंगाबाद, जयपूर, राजपुताना, माळवा, मारवाड, कच्छ, काठेवाड, गुजराथ वगैरे भागांत कुमार जातीचीं सुमारें ५०।६० हजारांवर घरें आहेत; परंतु त्यांपैकीं कोणी मडकीं करण्याचें कुंभार काम केलेलें नाहीं, किंवा करीतही नाहीं. गरिबीमुळें कोणी शेतकीचें काम, कोणी गवंडी काम, व लहानसहान इतर उद्योगधंदे करून आपला निर्वाह चालवीत आहेत. याप्रमाणें ही **कुमार** जात अस्सल क्षत्रिय रजपूत-कुलामध्यें उत्पन्न झाली आहे.*

**कच्छमियानी** परगण्यांतील **धानोटी** गांवचे "**तोरण**" **कुमार** जातीच्या **मरु ( मारु )** शाखेंतील **गंगापटेल** यानें संवत् १२३४ ह्मणजे इ० स० ११७९ सालीं बांधलें असें भाटांच्या चोपड्यांतील लेखांवरून कळलें; आणि त्यावेळीं **मारु, लाडवा, कोठीयार, मकवाणा, गेधड, उन्वाळ, काच्या, सोळंखी, परमार, भलसोड, जेठवा, राठोर, वरु, चावडा, सावरीया, वाढेल, यादव, गोहील, धोकीया, टांक, चवाण, भरडवा, भट्टी, कुकडिया, वाघेला,** इतक्या शाखेंतील **कुमार** शाखेचे लोक सौराष्ट्र, काठेवाड, व हलार वगैरे ठिकाणांहून गंगा पाटला-बरोबर येऊन **मियानी** परगण्यांतील **धानोटी** गांवीं येऊन राहिले आणि तेथून पुढें ते इतर ठिकाणीं ह्मणजे अहमदाबाद, सुरत, सोनगड, मुंबई, पुणें, सातारा, खानदेश, निमाड, औरंगाबाद, हैद्राबाद, वऱ्हाड, नागपूर वगैरे ठिकाणीं जाऊन राहिले. यांना कोठें राज[1] ह्मणतात, कोठें शिल्पावत ह्मणतात, कोठें कडिया ह्मणतात, कोठें गवंडी ह्मणतात; वगैरे देशाचाराप्रमाणें उद्योगा-वरून यांना निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळीं नांवें मिळालीं आहेत.

---

* ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र हे मूळचे चार वर्ण आहेत; या वर्णांतील बहुतेक लोकांना देशकालवर्तमानानुरूप आपला पूर्वापार चालत आलेला धर्म व आचार-विचार सोडावा लागला आहे. तथापि ते वर्ण भ्रष्ट झाल्याचें क्वचितच दिसून आलें आहे.

१. क्षत्रियांचें मूळ नांव **राजन्य** असें आहे. हा शब्द संस्कृत आहे. त्याचा प्राकृत अर्थ **राज** असा आहे. आपण क्षत्रिय आहोंत, असें दर्शविण्याकरितां ते आपणास **राज** असें ह्मणत असत.



नंबर ३. सवाई जयपूर ( राजपूताना ) येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

**जातिअन्वेषणः**—या पुस्तकांत **कुमार** यासंबंधानें असें लिहिलें आहे कीं, "**कुमार** ही राजपुतान्यांतील जयपूरच्या राज्यांतील एक जात आहे. विशेषतः ही राजपुताना आणि भरतखंडांतील सर्व भागांत थोड्याबहुत प्रमाणानें पसरली आहे. देश, भाषा वगैरे भेदांमुळें यांच्यापैकीं कोणी स्वतःस कोठें **कुमार**, कोठें **राज**, तर कोठें **राजकुमार** आणि कोठें तर **कुंभार** असेंहि म्हणवितात. असा प्रकार होण्याचें वास्तविक मूळ कारण म्हटलें म्हणजे यांच्यांतील विद्येचा अभाव हेंच होय, आणि याच कारणामुळें **कुमार** या मूळ शब्दाचा अपभ्रंश होऊन शेवटीं **कुंभार** या शब्दापर्यंत मजल येऊन ठेपली. ह्या जातीचे पूर्वज पूर्वी या भरतखंडांत राज्याधिकारी होते; परंतु यासंबंधानें एका थोर विद्वानानें असें लिहिलें आहे कीं, श्रीपरशुरामानें एकवीस वेळां पृथ्वी निःक्षत्रिय करण्याची प्रतिज्ञा केल्यामुळें आणि पुढें मुसलमान लोकांच्या अमदानींत रजपूत लोकांवर मोठा जुल्म झाला, अत्याचार झाला आणि त्यांना पराकाष्टेचा त्रास भोगावा लागला; त्यामुळें अशा बिकट प्रसंगीं त्यांनीं आपल्या प्राणसंरक्षणार्थ आपणांस **कुमार** न म्हणवितां **कुंभार** असें म्हणवून आपले प्राण वांचविले. परंतु जरी यांच्या प्राणांवर प्रसंग येऊन गुदरला, तथापि त्यांनीं कुंभाराचें कर्म केलें नाहीं. त्यांनीं कधीं आपल्या घरांत गाढवें बाळगिलीं नाहींत, किंवा मडकीं करण्याचें कामही केलें नाहीं, किंवा आपला इतर कुंभारांबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध जोडला नाहीं. ही जात कुंभार जातींत मोडणारी मुळींच नाहीं. **कुमार** ही जात शिल्पाचार्य ब्रह्मर्षि विश्वकर्म्याप्रमाणें मोठमोठीं शिल्पकामें करणारी आहे. या जातींत मोठमोठ्या इमारती, मोठमोठे राजमहाल, घरें, वाडे, कचेऱ्या, बंगले, वगैरे बांधकाम करणारे आहेत. कोणी कंट्राक्टर, कोणी व्यापारी, कोणी इंजीनिअर, कोणी ओव्हरसिअर, कोणी मेस्त्री, कोणी वकील, कोणी कारकून, कोणी नकाशे वगैरे करणारे आणि नाना प्रकारचे आर्टिस्ट (शिल्प कारागीर) आहेत. यांची या कामांतील निपुणता सर्वत्र सुप्रसिद्ध आहे. यांची बुद्धि कुशल कारागिरीच्या कामामध्यें इतकी चांगली चालते कीं, त्यांना ही एक ईश्वराकडून जन्मसिद्ध देणगीच प्राप्त झाली आहे. हे मोठे हुशार कारा-

गीर आहेत. हे लोक मोठमोठ्या इमारती बांधण्यामध्यें अत्यंत प्रवीण असल्यामुळें आणि हे अस्सल क्षत्रिय असल्यामुळें यांना **राज** असेंहि म्हणतात. अलीकडे **राज** हा शब्द **गवंडी** याच अर्थाचा दर्शक झाला आहे; आणि याच नांवानें हे लोक पुष्कळ ठिकाणीं प्रसिद्ध आहेत. जरी हे **राजकुमार** आहेत, तथापि अज्ञानानें आणि निकृष्टावस्थेंत लोळत पडल्यामुळें यांना कित्येक ठिकाणीं कुम्हार ( कुंभार ) ही बोलतात. परंतु हा अज्ञानाचा परिणाम होय. यांच्याच पैकीं कित्येक लोक मोठमोठ्या शहरीं व्यापारी आहेत, कंट्राक्टर आहेत, शेती करणारे आहेत. शेती करणारे आपणांस **शेतकुमारा**-बद्दल **शेतकुंभार** असें म्हणवून घेतात; हाही सारा परिणाम त्यांच्या अविद्येचा होय.

राजपुतान्यांतील जयपुर संस्थानांत यांच्यापैकीं जे थोर थोर लोक आहेत, त्यांना **उस्ता** ( तज्ज्ञ किंवा प्रवीण ) अशी सन्मानदर्शक पदवी मिळाली आहे. तद्वत् जोधपूर, आणि गुजराथेंतील संस्थानांतून यांना "**गजधर**" हें थोर प्रतिष्ठादर्शक भूषण मिळत असे. ( हा **गज** चांदीचा केलेला असून, त्या वेळीं त्याचा उपयोग हल्लींच्या फुटाऐवजीं करीत असत.) यावरून ही गोष्ट निर्विवादपणें सिद्ध होत आहे कीं, या **कुमार** जातीचा **कुंभार** जातीशीं कोणत्याहि प्रकारचा संबंध नाहीं. या जातीचे आचार-विचार, खाणेंपिणें वगैरे गोष्टींवरून ही जात क्षत्रिय आहे असें सप्रमाण सिद्ध होत आहे:

यथा—**अग्नेः पुत्रः कुमारस्तु श्रीमान् शारवणालयः ।**
**तस्य शाखो विशाखश्च नैगमे यश्च पृष्टजः ॥**
**कृत्तकाभ्युपपत्तेश्च कार्तिकेय इति स्मृतः" ।**

**अट्टालिकाकार.**—दुसरे ठिकाणीं* 'अट्टालिकार' या सदराखालीं असें लिहिलें आहे कीं, "**राजकुमार** जातीचे लोक शिल्पकलेंत अत्यंत प्रवीण असल्यामुळें त्यांना कोठें अट्टालिकार, मिस्त्री, राजकारागीर असेंहि ह्मणतात; हें नांव पडण्याचें कारण असें आहे कीं, हे लोक राजवाडे व मोठमोठ्या

---

* Researches into Hindu Castes and Creeds.

इमारती बांधतात आणि त्या बांधण्याचीं कंट्राक्टें घेतात. कित्येक ठिकाणीं यांना **प्रासादकार** असेंहि ह्मणतात; याचें कारण असें आहे कीं, हीं कामें करण्यांत हे आपलें बुद्धिसामर्थ्य इतकें प्रगट करतात कीं, तें सामान्य नसल्या-मुळें लोकांना तें ईश्वरी देणगीरूप वाटतें. हा त्यांना ईश्वरी प्रसाद मिळाला आहे, असें ह्मटल्यास वावगें होणार नाहीं. कित्येक ठिकाणीं यांना **कारागिर, मिस्त्री** म्हणतात आणि कित्येक ठिकाणीं **राज**ही म्हणतात. हे लोक कित्येक ठिकाणीं घरें बांधण्याचें काम करतात, कित्येक ठिकाणीं दगड घडण्याचें काम करतात, कित्येक ठिकाणीं मूर्ति घडण्याचें काम करतात, कांहीं व्यापार करतात, कांहीं कंट्राक्टें घेतात आणि कांहीं थोर थोर हुद्यावर आहेत. कित्येक साव-कार आहेत. हे लोक क्षत्रिय वर्णापैकींच आहेत. यांचा कुंभारांबरोबर मुळींच संबंध नाहीं. ही जात उच्च वर्णाची आहे. अनेक विश्वसनीय आधारांवरून असें कळून येतें कीं, ही जात प्रथम आपणांस **राजकुमार** असें म्हणवीत असे; यावरून ही जात अस्सल क्षत्रिय वर्णांत मोडणारी आहे, असें सिद्ध होतें; परंतु धर्मयुगांतील श्रीपरशुरामाच्या निःक्षत्रिय पृथ्वी करून टाकण्याच्या सपाट्यांतून आणि ऐतिहासिक काळांतील मुसलमानांचा डोळा क्षत्रिय ( रजपूत ) राजांवर असल्यामुळें, त्यांच्या अत्याचारांपासून आपले प्राणसंरक्षणार्थ त्यांनीं आपली क्षात्रवृत्ति सोडून आपल्या उदरभरणासाठीं शिल्पकाम स्वीकारलें. ते आपणांस कांहीं ठिकाणीं **राजकुमार** म्हणविण्याचें सोडून देऊन **राज** म्हणवूं लागले. कांहीं ठिकाणीं **राज** हेंहि सोडून देऊन **कुमार** म्हणवूं लागले. शेवटीं, विद्येच्या अभावामुळें ते आपणांस **कुमार**च्याऐवजीं कुंभार म्हणवून घेऊं लागले; परंतु आह्मी विशेष लक्ष देऊन चौकशी केली, त्यावरून आम्हाला असें कळून चुकलें कीं, यांनीं गाढव बाळगणाऱ्या किंवा मडकीं घडणाऱ्या कुंभारांबरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध केला नाहीं. यांची जात जयपुरामध्यें फार मोठी आहे. हे अस्सल **कुमारां**पैकीं आहेत. जे आपणास **राजकुमार** असें म्हणवितात, त्यांच्याच वंशापैकीं हे होत. हे अस्सल क्षत्रियांपैकींच आहेत. राजवंशीय क्षत्रियां ( रजपूतां ) मध्यें ज्या चालीरीती आहेत, त्याच अद्यापपर्यंत यांच्या-

मध्यें चालत आल्या आहेत. यावरून हे त्याच राजवंशांतील आहेत, असें सप्रमाण सिद्ध होतें; आणि त्यासंबंधानें इतर अनेक प्रमाणें सांपडतात. ही जात जयपुरामध्यें थोर व प्रतिष्ठित मानली जात आहे. यांना **गजधर**ही ह्मणतात. **गजधर** हें देखील एक मोठें प्रतिष्ठेचें चिन्ह आहे. उच्च वर्णांतील ब्राह्मण यांच्याकडील लग्नादि कार्यें करतात; आणि यांच्या हातचीं पक्वान्नें उघडपणें सेवन करतात. यांची जयपुरामध्यें एक मोठी सभा आहे, त्या सभेचें नांव **श्रीमती शिल्पवत् जात्युन्नति सभा** असें आहे."

पूर्वकाळीं धर्म, कर्म व व्यवहार ज्यांचा जो असेल, तोच त्यांनीं करावा असा नियम असे. जो ज्यांत प्रवीण असेल, त्यास त्यासंबंधाच्या बहुमानाच्या पदव्या व इनामें मिळत असत. हल्लींच्या काळांत शिल्पकामांत निपुण असणारास **मिस्त्री** असे ह्मणण्याचा प्रघात आहे. हा शब्द परभाषेंतील आहे. पूर्वकाळीं थोर हुद्देदारास **नाईक** ही बहुमानसूचक पदवी देण्याची वहिवाट असे. त्याप्रमाणें सौराष्ट्र राजांकडून ( हल्लींचे काठेवाड ) दक्षिणेंत आलेल्या रजपूत मंडळीच्या पूर्वजांस, तसेंच श्रीछत्रपति शिवाजी महाराज व श्री. गायकवाड सरकार यांच्याकडून कै० नंदरामजी कवलिया, जगुजी बैताडे, मनसाराम धवारे, राणुजी छापरवाळ, केशवजी बकवासे, बापुजी बिंद्रामण वगैरे मंडळीच्या पूर्वजांस त्यांच्या प्रवीणतेबद्दल **नाईक** ही बहुमानदर्शक पदवी मिळाली आहे. म्हणूनच यांच्यामध्यें **नाईक** ह्मणण्याचा प्रघात पडला आहे.

**शिलावत** हा धंदेवाचक शब्द **शिल्पावत** या शब्दापासून निघाला आहे. याचा अर्थ शिल्पशास्त्रज्ञ असा आहे. जे लोक शिल्पशास्त्राच्या नियमानुसार इमारती वगैरे बांधण्याच्या कामांत प्रवीण आहेत, त्यांना हें विशेषण लावतात. शिल्पशास्त्र हें विश्वकर्म्यानें उत्पन्न केलें आहे, आणि या शास्त्राचें ज्ञान ज्यांनीं संपादन केलें आहे, त्यांना शिल्पावत असें म्हणतात. यांना **सूत्रधार** असेंहि दुसरें नांव आहे; कारण यांच्याजवळ नेहमीं मोजण्यासाठीं सूत्र ( दोरी ) असतें. या दोरीनें सरळ व उभें काम पाहतां व मोजतां येतें. याप्रमाणें ते आपणास **सूत्रधार (शिलावत)** असें म्हणवीत असत. जो कारखा-

त्यांतील काम पाहतो व दाखवितो त्याला मारवाडामध्यें **गजधर, उस्ता** आणि दक्षिणेंत **नाईक** असें म्हणतात. त्याचप्रमाणें पूर्वी त्यांना सूत्रधार ह्मणण्याचा प्रघात होता. फक्त हिंदु शिलावतासच असें म्हणत होते. यावरून रजपूतांचे शिलावत ( गवंडी ) झाले आहेत, असें मारवाडच्या सन १८९९ सालच्या प्रजागणतीच्या इतिहासावरूनहि दिसून येतें.

इतिहासप्रसिद्ध असे जे थोर थोर राजे आणि महाराजे होऊन गेले, त्यांची वंशावळहि बरोबर मिळत नाहीं. फक्त उदेपूर, जयपूर, जोधपूर, यांची वंशावळ अलीकडील सुमारें सात आठशें वर्षांपर्यंत मिळते. अशी जर वास्तविक स्थिति आहे, तर आमच्यासारख्या सर्वोपरी मागें पडलेल्या गरीबांची कशी मिळणार ? आणखी याचा पूर्वीच्या लोकांनीं देखील मुळींच विचार केला नाहीं. यामुळें **राजकुमार, कुमार, कुमावत, कुंभवंसी** हीं ज्ञातीचीं नांवें सोडून शिलावत, कारागीर, कडिया, राज, गवंडी, चेजारा, बेलदार वगैरे निरनिराळ्या ठिकाणीं उद्योगधंद्यांमुळें आपणांस निरनिराळीं नांवानें म्हणवून घेऊं लागले; परंतु एक नांव नसल्यामुळें बराच घोंटाळा व बऱ्याच अडचणी होत असत; त्यामुळें अर्थातच रीतीभातींमध्येंहि फरक होण्याचा संभव आहे.

**कुमावत.***—सन १४१९ सालीं रजपुतांपैकीं [1]**कुंभो** या नांवाचा एक मेवाडचा राणा होऊन गेला; त्याचे वंशज आपणांस **कुंभोजवंशज** असें ह्मणवूं

---

* हें नांव झाडशाई अथवा मारवाडी असावें. याचा अर्थ जरी स्पष्ट होत नाहीं, तथापि '**कमाई**' शब्द मारवाडी असून याचा अर्थ प्राप्ति असा होतो. त्यापासूनच हा शब्द निघाला असावा. राजवैभव व शौर्यकर्म नष्ट झाल्यामुळें कोणताहि उद्योग, उदीम, कसब, मजुरी वगैरे करून निर्वाह करणारे जे लोक ते **कुमावत**, असा अर्थ असावा. रजपूत तर खरेच, पण अनेक हुन्नरी !

१ गुहिलोत घराण्यांतील महाराजाधिराज श्रीकुंभकर्ण ह्मणजे अर्थात् राणाकुंभ. माळव्याच्या व गुजराथच्या सुलतानांनीं राणाकुंभाच्या विरुद्ध कट करून त्याचा नाश करण्याचा प्रयत्न केला; पण त्यांत कुंभासच जयश्रीनें माळ घातली. या आपल्या जयाचें चिरंतन स्मारक ह्मणून चितोडमध्यें संवत १५५५ मध्यें एक कीर्ति(जय)स्तंभ बांधला. या कीर्तिस्तंभास येथें कुंभमेरू ह्मणतात; कारण तो कुंभानें केला ह्मणून त्यास कुंभमेरू नांव दिलें गेलें. हा कीर्तिस्तंभ जमिनीपासून १२० फूट उंच आहे. याचे नऊ मजले

लागले. पुढें ते आपणास **कुंभोज**च्या ऐवजीं **कुंभावत** म्हणवूं लागले. नंतर कुंभावतचे **कुमावत** झाले. हें जातिवाचक नांव मेवाड, अजमीर, माळवा, मध्यप्रांत, वऱ्हाड, जयपुर, काठेवाड, गुजराथ, मुंबई, पुणें, खानदेश वगैरेकडे फार पुरातन आहे. अलीकडे देखील शेंकडा पाऊणशें लोक आपली जात **कुमावत** अशी सांगतात. हा प्रघात सन १७६६ पासून पडला असावा. परंतु अलीकडे पांच पन्नास वर्षांत जातिवाचक नांव सांगण्यास किंवा आपणांस त्या नांवानें म्हणवून घेण्यास कांहींतरी अडचण उत्पन्न झाली असावी. ज्याप्रमाणें कुमाराचा अपभ्रंश कुंभार झाला, त्याप्रमाणें **कुमावत** शब्दाचा अज्ञानानें अपभ्रंश कुम्हार किंवा कुंभार असा होण्याचा संभव असल्यामुळें **कुमावत** म्हणण्याचा परिपाठ कमी झाला असावा; आणि जातीस धंदावाचक नांव देऊन ही जात जरी विशेष प्रसिद्धि पावली खरी, तथापि हे जातीनें अस्सल रजपूत आहेत. अजमीर येथें यांची **श्रीकुमावत जात्युन्नति सभा** आहे.

मेवाडप्रांतांत **मंडेलगड** हा एक जिल्हा आहे; आणि या जिल्ह्यांत ३६० गांवें आणि खेडीं आहेत; आणि तेथील लोकांत रजपुतांच्या जुन्या चालीरीती आणि धर्मविधी वगैरे दिसून येतात; या गांवावरून त्यांची कांहीं आडनांवें पडलीं असावींत असें दिसतें.

**टॉड** साहेबांच्या **राजस्थान** या पुस्तकांतहि यासंबंधानें सत्य व विश्वसनीय आधार सांपडतो. "**भूमिआ** हे पुरातन काळीं जे राजे होऊन गेले,

---

आहेत. यामध्यें हिंदु लोकांच्या नाना प्रकारच्या उपास्य देवतांच्या लहान लहान मूर्ति खोदल्या आहेत. नवव्या मजल्यावर सध्या दोनच कोनाड्यांत दोन शिलापट्टिका राहिल्या आहेत. या लेखांत गुहिलोत घराण्यांतील मूळपुरुष बाप्पारावळ याच्यापासून राणा-कुंभापर्यंत वंशाळी दिली आहे; व सूत्रधाराची व्याख्या केली आहे. हा स्तंभ प्रेक्षणीय आहे. राणा कुंभ विष्णूचा निस्सीम भक्त होता. त्याचा बाप राणा मोकल हा निस्सीम शिवभक्त होता.—**देवदत्त रामकृष्ण भांडारकर, एम. ए.**

कुंभ हें विशेषनाम आहे. कुंभ या शब्दाचा मूळ अर्थ मातीचें भांडें असा आहे; यामुळें अज्ञानानें अर्थाचा अनर्थ करून कुंभार बनले !!! ते सूत्रधार होऊन दोन्ही देवांचे उपासक आहेत.

त्यांच्या वंशांपैकींच आहेत. हेच **भूमिआ** पुढें कुमावत या नांवानें प्रसिद्धि पावले आहेत. हे मेवाडप्रांतांतील अनेक भागांत आहेत. त्यांच्यावर जुलूम झाल्यामुळें त्यांना शहर सोडून रानावनांत व डोंगरांत जाऊन रहावें लागलें; आणि ते तेथें आपल्या उदरनिर्वाहार्थ शेती करूं लागले. **भूमिआ** हा शब्द **भू** या वर्णापासून निघाला आहे. **भू** ह्मणजे जमीन. पुढें मुसलमानी राज्यांत ज्यांना जमीनदार असें म्हणतात, त्याच अर्थाचा दर्शक **भूमिआ** हा शब्द आहे. भूमिआ म्हणजे जमीनदार.

यांच्या वंशाचें सामान्य नांव **कोंबावत, लुनावत** व **राणावत** असें आहे; यावरून त्यांचें मूळ व शाखा कोणती आहे, तें उघड दिसून येत आहे; परंतु हे निव्वळ शेतकरी बनल्यामुळें असा परिणाम झाला कीं, नवीन व थोर दरबारांत त्यांचा प्रवेश होण्यास जितकें वजन पाहिजे तितकें त्यांच्यामध्यें नसल्यामुळें त्यांचा तेथें शिरकाव झाला नाहीं; आणि त्यांना शेतकीमध्येंच आपला काळ घालवावा लागला; परंतु शेतकऱ्याप्रमाणें काम करून त्यांची उपजीविका बरोबर होत नसल्यामुळें त्यांना अर्थातच शेतकीचा कंटाळा आणि तिरस्कार आला खरा; परंतु त्यांनीं आपला शूर रजपूत शिपाईबाणा सोडला नाहीं. त्यांना जरी गुरें चारण्यास न्यावीं लागत असत आणि जमिनीची लागवड करण्याचीं कामें करावीं लागत असत, तथापि त्यांनीं आपल्या पूर्वजांची ऐट व बाणेदार स्वभाव हा अधिक विनयानें, कमी तोऱ्यानें आणि खुळसट विचार न धरतां स्वीकारला होता. ते जरी आपल्या दरबारी जातबंधूंपासून अलिप्त राहिले होते, त्यांचे दरबारी जातबंधु त्यांच्या शेतीच्या कामास अत्यंत तुच्छ मानीत होते आणि त्यांची निर्भत्सना करीत होते, तरी त्यांची जात ही अगदीं शुद्ध रजपूत होती; आणि त्यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा अशुद्धपणा शिरला नाहीं.* (Tod's Annals and Antiquities of Rajasthan, Vol. I, p. 171; and Second Edition p. 150).

* प्रारंभीं पौराणिक काळांत जी क्षत्रिय जात होती, तीच जात पुढें ऐतिहासिक काळांत रजपूत या नांवानें प्रसिद्ध पावली आहे; या रजपुतांपैकीं जे दक्षिणेमध्यें आले, ते आपणांस मराठे असें ह्मणवूं लागले. त्यांच्यापैकीं एखादा राज्याधिकारी, शस्त्रधारी, जाह-


# दक्षिणेंत आलेले रजपूत.

आणखी, एका विशेष महत्वाच्या गोष्टीविषयीं येथें अवश्य उल्लेख केला पाहिजे; ती गोष्ट हीच कीं, जे रजपूत दक्षिणेंत येऊन स्थायिक झाले, त्यांपैकीं कांहीं लोकांनीं आपणांस **मराठे** हें नांव धारण केलें. मराठे आणि रजपूत हे एकच आहेत, हें मराठ्यांच्या आणि रजपुतांच्या कुळीवरूनहि स्पस्ट दिसून येत आहे.


रजपुतांच्या नांवावरून त्यांच्या देशास जसें नांव प्राप्त झालें आहे, तसेंच मराठ्यांच्या नांवावरूनहि त्यांच्या देशास नांव प्राप्त झालें आहे. रजपुतांचे जसे मोठमोठे धार्मिक व ऐतिहासिक ग्रंथ आहेत, तसेच मोठमोठे धार्मिक व ऐतिहासिक ग्रंथ मराठ्यांचेहि आहेत. थोरले श्रीछत्रपति शिवाजीमहाराज राज्यपदारूढ होण्यापूर्वीं त्यांना कोणी रजपूत म्हणजे अर्थातच क्षत्रिय समजत नव्हते. त्यांची शूद्रांमध्यें गणना होत असे; पुढें जेव्हां शिवाजीमहाराजांचा राज्याभिषेक करण्याचा प्रसंग आला तेव्हां महाराष्ट्रांतलि लोक शिवाजीचें क्षत्रियत्व अथवा हे रजपूत आहेत असें कोणीहि कबूल करीना. शेवटीं, काशीहून महाविद्वान शास्त्री गागाभट्ट यांस मुद्दाम पुण्यास बोलावून आणिलें. त्यांनीं शिवाजी महाराज अस्सल क्षत्रिय आहेत असें शास्त्राधारें सिद्ध करून दाखविलें, आणि कांहीं प्रधान मंडळी उदेपुरास जाऊन तेथून त्यांनीं असा प्रबल पुरावा आणिला कीं, शिवाजीमहाराजांचे पूर्वज हें उदेपूरच्या अस्सल रजपुतांपैकींच आहेत; तेव्हां कोठें दक्षिणेंतील लोकांनीं ते खरे रजपूत आहेत असें कबूल केलें.

---

गीरदार, इनामदार, पाटील, देशमुख, वतनदार, सधन व सुखी वगैरे असला ह्मणजे तो आपणांस मराठा असें ह्मणवूं लागतो. यांचेच पैकीं, जे शेतकरी, अंगमेहनतीचीं कामें करणारे, मजूर वगैरे हे कुणबी असे जरी समजले गेले आहेत तथापि यांच्यामध्यें कोणत्याहि प्रकारचा भेद पडला नाहीं. तद्वतच रजपुतांत राज्याधिकारी, शस्त्रधारी, जाहगीरदार, इनामदार, पटेल, वतनदार, जमिनदार, ताल्लूकदार, सधन व सुखी असा असला ह्मणजे तो आपणांस राजकुमार, कुमार [redacted] ह्मणवूं लागतो आणि यांच्या पैकीं जे कालानुरूप निर्वाहाच्या निमित्तानें अनेक हुन्नर, उद्योग, मजुरी शेती करणारे कुमावत असे जरी समजले गेले आहेत, तथापि ते एकच आहेत.



नंबर ४. ब्यावर ( राजपूताना ) येथील आमचे ज्ञातबंधु.



फुलेरा ( राजपूताना ) येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

श्रीछत्रपति शिवाजीमहाराजांसारख्यांना आपलें क्षत्रियत्व म्हणजे अर्थातच आपली जात रजपूत आहे असें सिद्ध करून दाखविण्याकरितां महाभगिरथ प्रयास पडले; ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. मग जे रजपूत लोक दक्षिणेंत येऊन क्षात्रवृत्तीचा त्याग करून आपल्या उदरभरणार्थ गवंड्याचें काम करून एका ज्ुटीनें राहत होते; आणि त्यांना अज्ञानामुळें आणि गरिबीमुळें आपणहि रजपूत आहोंत, आणि मराठ्यांप्रमाणें आपणहि दक्षिणेंत आलों आहोंत असें पुढें येऊन म्हणण्याचें धैर्य झालें नाहीं, आतां याबद्दल त्यांना आपणांस दोष देतां येत नाहीं. कर्मानें लोपलेल्या अस्सल जातीचा उदय कसा होणार ?

**रजपूत** आणि **मराठे** या दोन जातींचें मूळ स्थान एकच आहे. या दोन जातींची आपण जर तुलना केली, तर यांच्यांतील बहुतेक चालीरीतींवरून यांच्यामध्यें पुष्कळ साम्य असल्याचें दिसून येतें; आणि हे दोघेहि एकच आहेत, असें सिद्ध होतें. रजपुतांचा जसा इतिहास आहे, तसाच मराठ्यांचाहि आहे. रजपूत हे शिवभक्त आहेत, त्याचप्रमाणें मराठेहि शिवभक्त आहेत. रजपुतांचीं कुलदैवतें **श्री**शंकर व शक्ति ( भवानी, कालिका, दुर्गा ) आणि शंकराचा दुसरा अवतार भैरव हीं आहेत. मराठ्यांचीं कुलदैवतें **शि**व व **श**क्ति ( तुळजापूर, कोल्हापूर येथील देवी भवानी अंबा ) हीं आहेत; व शिवाचीं अन्य स्वरूपें भैरव, खंडोबा, जोतिबा ह्यांचीहि ते पूजा करतात. रजपूत व मराठे हे दोघेहि आपल्या नांवापुढें जी, सिंह, राव हीं बहुमानवाचक पदें लावतात. यांच्यामध्यें बेटीव्यवहार फारसा होत नाहीं.

---

## पुनश्च ऐक्य.

चंदभाटानें **पृथ्वीराजसा** नांवाचा जो महाभारताएवढा एक प्रचंड ग्रंथ लिहिला आहे, त्यांत त्यानें असें लिहिलें आहे कीं, सन ११०९ सालीं कनोजचा राजा जयचंद्र राहठोर व पृथ्वीराज चौहाण यांचें देवनगरी येथें जें महा तुंबळ युद्ध झालें, त्यांत जयचंद्राचा पराभव झाला. त्या वेळीं

अजमीर, जयपूर, जोधपूर, उदेपूर वगैरेकडील कांहीं रजपूत मंडळी काठेवाड व गुजराथ देशांत येऊन राहिली आणि तेथून पुढें ते सातारा, खानदेश, औरंगाबाद वगैरेकडे पसरले. या गोष्टीस आज जवळ जवळ ८०० वर्षे होत आलीं आहेत; परंतु मारवाडांतील रजपूत ते शिलपावत आणि दक्षिणेमध्यें येऊन राहिलेले रजपूत ते गवंडी या नांवानें प्रसिद्ध आहेत. राजपुतान्यांतील मंडळी जाणत होती कीं, आमचे जातबंधु दक्षिणेमध्यें पसरले आहेत, आणि दक्षिणेंतील मंडळीही जाणत होती कीं, आपण राजपुतान्यांतून आलों आहोंत आणि आपलें मूळगांव आणि वंशज तिकडे आहेत, असें उभयतां पूर्वीपासून जाणत आहेत; परंतु बराच काळ लोटल्यामुळें परस्परांत पत्रव्यवहार वगैरे नव्हता; तेव्हां अर्थातच अन्य संबंध जुळण्याचा प्रसंग कसा येणार ? आणि त्यांत अविद्येमुळें शोध करण्याची बुद्धि उत्पन्न झाली नाहीं.

मुंबईंत माझी **जी. बी. नाईक आणि कंपनी** या नांवानें व्यापार करणारी मंडळी आहे. ही कंपनी पस्तीस वर्षांची जुनी असून हिचा व्यवहार हिंदुस्थान देशांतील बहुतेक लहान खेड्यांपासून तों मोठ्या शहरांतील लोकांबरोबर चालला आहे. मला वाचण्याचा आणि जुना इतिहास शोधण्याचा मोठा नाद लहानपणापासून आहे. आपल्या स्वज्ञातीचा उत्तरोत्तर उत्कर्ष होत जावा, अशी माझी इच्छा असल्यामुळें मी आपल्या जातीच्या इतिहासाचा शोध लावण्याच्या कार्यास लागलों. पुढें जयपूर येथील राजाश्रित उस्ता लक्ष्मी नारायणजी मनेठ्या गजधर जाहगीरदार आणि प्रसिद्ध फोटोग्राफर शेट उदेरामजी घोडेले यांच्याबरोबर पत्रव्यवहारानें चांगला परिचय झाला. जातिसंबंधी व चालीरितीसंबंधीं पत्रव्यवहार सुरू असतां त्यांची खात्री झाली कीं, ते आणि आह्मी एकाच जातीचे आहोंत. पुढें माझे धाकटे बंधु चि. तुळशीरामजी भिवाजी बैताडे यांचे वडील चिरंजीव ह्मणजे माझे पुतणे चि. दत्तारामजी यांच्या लग्नाचा योग आला. या मंगलकार्यास येण्यास जयपूरच्या मंडळीस आमंत्रणपत्रिका पाठविली. त्यांनीं आपल्या जातीची मोठी सभा भरवून इकडील जातींतील लोकांची माहिती, चालरीत, वहिवाट वगैरे पाहण्यास आपल्या

तर्फे तिकडील प्रमुख पुढाऱ्यांपैकीं उस्ता लक्ष्मीनारायणजी रामबिलासजी मनेठ्या, शेट उदेरामजी नारायणजी घोडेले, श्रीनारायण रामबिलासजी नथुरामजी बहीरुजी घोडेले, गणेशजी जगन्नाथ घोडेले वगैरे यांना पुण्यास पाठविण्याचें ठरविलें; त्याप्रमाणें ही वरील जयपुराकडील समाजांतील प्रमुख मंडळी ता. २७ माहे मे सन १९०७ रोजीं पुण्यास येऊन एकच समजून आमच्या वाड्यांत उतरली. गांवांतहि इतरांच्या घरीं लग्नें निघालीं असल्यामुळें त्या वेळीं मुंबई, सातारा, खानदेश वगैरे बाहेरगांवची व पुण्याची आमच्या ज्ञातीची एक हजारावर मंडळी पुण्यास जमली होती.

जयपुराहून लग्नाकरितां आलेल्या पाहुणे मंडळीनें आमच्या इकडील लग्नांतील धर्मविधी आणि चालीरिती फार लक्ष्यपूर्वक पाहिल्या आणि चौकशीही केली. ती मंडळी लग्नांतील प्रत्येक लहानसहान धर्मविधीच्या वेळीं देखील हजर राहून फार बारकाईनें विचारपूस करीत असे. आमची वहिवाट, चालरीत, धर्मकर्म, चालू गोत्रें पाहून त्यांची अशी पूर्ण खात्री झाली कीं, आपण सर्व एकच आहोंत, यासाठीं आपणांमध्यें रोटीव्यवहार आणि बेटीव्यवहार होण्यास कोणत्याच प्रकारची हरकत नाहीं, असें त्यांनीं कबूल केलें.

आमच्या घरांतील लग्नकार्य उरकल्यावर या जयपूरकर पाहुणेमंडळीच्या सन्मानार्थ त्यांना मी एक मेजवानी दिली. त्या मेजवानीस आमच्या सर्व ज्ञातबंधूंस भोजनास येण्याचें आमत्रंण दिलें; या माझ्या आमंत्रणाचा स्वीकार करून जयपूरकर मंडळीनें सर्वांना आपल्या पंक्तीचा लाभ दिला. या प्रसंगीं मी पाहुणे मंडळीच्या योग्यतेनुरूप त्यांना पोषाख करून त्यांचा योग्य गौरव केला.

दुसरे दिवशीं जातीच्या पंचांकडून कै० श्रीमंत काळुराम भाउसाहेब धवारे यांच्या भव्य व सुशोभित दिवाणखान्यांत जयपूरकर मंडळीच्या स्वागतार्थ जातीची मोठी सभा भरविली. या सभेसहि लग्नानिमित्त आलेली बाहेरगांवची व गांवची सर्व मंडळी हजर होती. त्या प्रसंगीं जातींतील बऱ्याच लोकांचीं आनंदप्रदर्शक भाषणें झालीं. पंचांच्या वतीनें श्रीयुत विठ्ठलराव नारायणजी माळवाल सातारकर, ड्राइंग मास्तर, स्कूल ऑफ आर्ट्स, मुंबई, यांनीं समयास अनुसरून गौरवयुक्त

भाषण केलें. त्यांतील सारांश असा होता कीं, " श्रीयुत गणपतराव भिवाजी बैताडे ( जी. बी. नाईक ) यांनीं जयपुराकडील पाहुणेमंडळीच्या भेटीचा अपूर्व योग ज्ञातगंगेस प्राप्त करून दिला, याबद्दल त्यांचे, आणि आजच्या पाहुणे मंडळीनें जयपूरसारख्या दूरच्या प्रांतांतून इतकें लांब येण्याची तसदी घेतली, आणि त्यांच्या आगमनाच्या योगानें आज बऱ्याच शतकांपासून इतक्या दूरच्या आपल्या जातीच्या लोकांचा आणि आपला निकट संबंध तुटल्यासारखा झाला होता तो जुळवून आणला, व आपण जे एकमेकांस अगदींच विसरल्यासारखे झालों होतों, ते आज आपण आपली ओळख पटून एकमेकांस ओळखूं लागलों, याबद्दल आजच्या पाहुणे मंडळीचे आभार मानले पाहिजेत. आजपर्यंत आपण एकमेकांविषयीं अगदींच तटस्थ होतों, तो तटस्थपणा जाऊन आपणामध्यें एकी होऊन परस्परांविषयीं सहानुभूति, जात्यैक्य आणि प्रेमभाव उत्पन्न झाला आहे, ही कांहीं सामान्य गोष्ट नाहीं. हा एक मोठाच अपूर्व योग घडून आला. आणि हा अपूर्व योग ज्यांच्या ( जी. बी. नाइकांच्या ) प्रयत्नानें घडून आला, त्यांचे आपण प्रसिद्धपणें पुन्हां आभार प्रदर्शित केले पाहिजेत." तदनंतर पंचांनीं पाहुणेमंडळीस पोषाख करून त्यांचा सन्मान केला. दुसऱ्या दिवशीं पंचांनीं जातीच्या वतीनें पाहुणेमंडळींस मेजवानी केली; त्या प्रसंगीं जातींतील सर्व मंडळीस निमंत्रण होतें.

जयपूरच्या मंडळीबरोबर आमचा आज कित्येक शतकें रोटीव्यवहार* नव्हता, तो अशा रीतीनें सुरू झाला, ही आमच्या जातीच्या इतिहासांत

---

* हें ऐक्य झाल्या दिवसापासून जयपूर आणि त्याच्या आजुबाजूच्या गांवांतील माझ्या जातीच्या मंडळीचें माझे येथें हमेषा येणेंजाणें सुरू झालें. तसेंच पुण्याचे सखारामजी बावाजी कुंडलवाळ, कंट्राक्टर हे आपल्या मंडळीसह महायात्रेस गेले होते, त्यावेळीं ते जयपुरासहि गेले होते; आणि तेथें ते आपल्या जातवाल्यांच्या घरीं उतरले होते; त्यांनीं त्यांचा योग्य सत्कार केला. त्यांनीं परत येते वेळीं आपल्या जातीच्या विद्यालयास व उद्योगशाळेस उत्तेजनार्थ कांहीं रकमहि दिली. मी जो जातीचा इतिहास लिहीत होतों तो पाहण्यास मुद्दाम अजमीरहून तेथील श्री कुमावत जात्युन्नति सभेचे अध्यक्ष श्रीयुत भवानीरामजी मुन्नालालजी धनारिया, कंट्राक्टर, ब्यावरहून तेथील जाति·

सोन्याच्या शाईनें लिहून ठेवण्यासारखी गोष्ट होय. आतां बेटीव्यवहारहि* होण्यास हरकत नाहीं; पण इतक्या लांब आपली मुलगी कोण देणार? गरिबीमुळें लोक पुण्याची मुलगी मुंबई, सातारा, खानदेश, औरंगाबादेस देण्यास धजत नाहींत; तर इतकें दूर आपल्या मुली देण्यास व तिकडील मुली करण्यास कसे बरें धजतील? पण पुढेंमागें हा बेटीव्यवहार सुरू झाल्यावांचून राहणार नाहीं; कारण आज आमच्या जातीचा प्रसार किती आहे तो कळून आला.

**शिवनाथ बडवा.**—याचे पूर्वज एके वेळीं दक्षिणेमध्यें आपल्या यजमानाकडून दक्षणा गोळा करण्याकरितां येत होते. त्या वेळीं आगगाडी नसल्या-

---

समाजातर्फें श्रीयुत नथुलालजी गोगराजी जाळवाळ, कंट्राक्टर, श्रीयुत मोहनलालजी नेगरामजी नराणीया, कंट्राक्टर, आणि माळवाप्रांताकडील समाजामार्फत नीमच व रतलाम येथील श्रीयुत रामचंद्रजी नरसिंगजी बडमुंडा, कंट्राक्टर, हे आले होते. यांचा आणि माझा पत्रव्यवहाररूपानें पूर्वींच परिचय झाला होता; पण प्रत्यक्ष नव्हता, तो यायोगानें झाला. ही मंडळी मुंबईस येऊन माझ्या घरीं उतरली होती. त्यांच्याबरोबर माझें जातीसंबंधानें बरेंच भाषण झालें, त्यांत त्यांनीं असें कबूल केलें कीं, 'तुह्मी आणि आह्मी एकाच जातीचे आहोंत आणि आपणामध्यें कोणत्याहि प्रकारचा भेदभाव नाहीं.' ही मंडळी आमच्या घरीं असतां त्यांनीं आमच्याबरोबर मुळींच दुजाभाव न ठेवतां व्यवहार केला; इतकेंच नाहीं, तर बेटीव्यवहार करण्यासंबंधानेंहि प्रश्न काढला; परंतु इतक्या दूर मुली देण्यास कोणी धजणार नाहींत, असें मला त्यांना स्पष्ट सांगावें लागलें; त्यांनीं मीं लिहिलेला जातीचा साग्र इतिहास लक्षपूर्वक श्रवण केला आणि त्यासंबंधानें आपली पूर्ण सहानुभूति व आनंद प्रदर्शित केला.

* हिंदुस्थान देशांत निरनिराळ्या भागांत जे ब्राह्मण आहेत, त्यांच्यामध्यें अन्नव्यवहार होत नाहीं; मग कन्याव्यवहार कोठून होणार? पण दाक्षिणेमध्यें जे ब्राह्मण आहेत, त्यांच्यांत कोंकणस्थ, देशस्थ, कऱ्हाडे असे तीन भेद आहेत. त्यांच्यांत अन्नव्यवहार होतो, पण कन्याव्यवहार होत नाहीं. तो करण्यास धर्मशास्त्राची मुळींच मनाई नाहीं, असें जरी शंकराचार्यांनीं आज्ञापत्र काढलें आहे, तथापि रूढीचें वर्चस्व असल्यामुळें फारसे कन्याव्यवहार होत नाहींत. परंतु मेवाड, राजपुताना, माळवा वगैरे देशांत राहणाऱ्या आणि दक्षिणेंत राहणाऱ्या रजपूतांना धर्माची किंवा रूढीची आडकाठी नाहीं, फक्त इतक्या लांब कोणी कन्या देण्यास धजत नाहींत, याचमुळें त्यांच्यामध्यें कन्याव्यवहार झाला नाहीं.

मुळें त्यांना उंटावरून प्रवास करावा लागत असे. त्यांच्याबरोबर स्वारीचा एक उंट, सामानाचे दोन उंट आणि चार माणसें होतीं. आणखी, त्यांच्याबरोबर त्यांच्या दक्षिणेंतील यजमानाच्या वंशावळीच्या पोथ्या (चोपड्या) हि होत्या. हे कोणीतरी व्यापारी असावेत असें समजून त्यांचे तिन्ही उंट सामानासह आणि पोथ्यांसह चोरांनीं लुटून नेले. रजपुतांपैकीं कांहीं लोक दक्षिणेंत येऊन स्थायिक झाले आहेत, हें ह्या भाटांना ठाऊक होतें ह्मणूनच ते त्यांच्याकडे दक्षणा घेण्याकरितां येत असत.

**भाट** किंवा **बडवा (बारट).**—जयपूर येथील हरिनाथाच्या चोपड्यांतील लेखावरून असें कळतें कीं, संवत् १७०० आणि १७८८ सालांत वरील बडव्यांचे पूर्वज दक्षिणेंतील आपल्या यजमानाकडून दान व दक्षणा घेण्या-करितां आले होते; ते भिवाजी लखमाजी बैताडे ( या ग्रंथकाराचे पूर्वज ) यांस **अंजनगांव, हासपूर** आणि **लासूर** येथें भेटले. त्यांचें उत्तम प्रकारें स्वागत करून दोन्ही वेळां त्यांना योग्य दक्षणा दिली; आणि **गांगाई** नांवाच्या खेड्यांत लग्नानंतरची **क्षेत्रपाल** पूजा याच वेळीं त्यांनीं आमच्या पूर्वजांच्या घरीं केली. औरंगाबाद, पुणें, सातारा, जळगांव, नंदुरबार, अमरावती, अकोला वगैरे ठिकाणीं निरनिराळ्या आडनांवांचे ( चाळ्ळ गोत्रांचे ) त्यांचे चौपन्न यजमान आहेत.

---

## समाजांतील कांहीं वहिवाटी.

आमचे जे लोक खालीं गुजराथेंत व दक्षिणेंत आले, त्यांच्यांतील कित्येक किरकोळ चालीरीतींविषयीं येथें थोडासा उल्लेख करणें इष्ट आहे.

**१. भाषा**—यांची भाषा हिंदुस्थानी व मारवाडी या दोन भाषांचे मिश्रणानें बनलेली आहे; आणि जे मारवाडांत राहतात, ते मारवाडी भाषा बोलतात, जे गुजराथेंत राहतात ते गुजराथी भाषा बोलतात. आणि दक्षिणेंत येऊन राहिलेले लोक मराठी भाषा बोलतात. अद्यापपर्यंत कांहीं ठिकाणीं

हिंदुस्थानी, मारवाडी, गुजराथी या तिन्ही भाषांचें मिश्रण होऊन बनलेली भाषा बोलतात.

**२. पागोटें.**—राजपुतान्यांतून जी रजपूत मंडळी निघाली, ती प्रथम काठेवाड व गुजराथमध्यें येऊन राहिली. तदनंतर त्यांच्यापैकीं कांहीं मंडळी दक्षिणेमध्यें आली. त्या वेळीं त्यांचें शिरोभूषण ( पागोटें ) गुजराथी धर्तीवर होतें. कै. नंदरामजी कवलिये, भिवाजी बैताडे, रा. ब. भाऊसाहेब धवारे, बापुजी बिंद्रामण, केशवजी बकवासे, रामचंद्रजी धवारे वगैरे पुष्कळ मंडळी आपलें पागोटें गुजराथी धर्तीवर बांधीत असत.

**३. स्त्रियांचा पेहराव.**—कित्येक ठिकाणीं वस्त्रें नेसण्याचा रिवाज हिंदुस्थानी चालीचा लहंगा आणि ओढणी घेण्याचा आहे. परंतु अलीकडे जरी लहंग्याची वहिवाट कमी होत चालली आहे, आणि लुगडें नेसण्याची वहिवाट वाढत चालली आहे, तरी लुगडें गुजराथी तऱ्हेनें नेसतात; आणि गुजराथी स्त्रियांप्रमाणें पदर डाव्या बाजूला घेतात.

येथपर्यंत जें विवेचन झालें आहे, त्यावरून रजपूत लोक जरी आपला मुळचा राजपुताना प्रांत सोडून दूरदूरच्या देशांत जाऊन राहिले आहेत, आणि ते तेथील स्थायिक रहिवाशी झाले आहेत, तथापि त्यांच्यामध्यें मूळच्या कांहीं चाली अद्यापपावेतों जशाच्या तशाच चालू आहेत.

(१) मुलगा झाला ह्मणजे त्याच्या उजव्या हाताच्या दंडास हरळी ( दुर्वा ) बांधण्याचा प्रघात आहे. आपणांस मुलगा झाला, हें आनंदाचें वर्तमान आपल्या नातलगांना कळविण्याचे वेळीं एकवीस दुर्वांची लहानशी जुडी करून ती त्यांच्या घरीं पोंहचती करतात; ह्मणजे त्यावरून ते मुलगा झाला असें समजतात.

(२) पांचवीचे रात्रीं मातीचा किंवा कणकेचा सशस्त्र घोडेस्वार तयार करून किंवा पिठाचें मुटकुळें करून तें व ज्या शस्त्रानें ( तलवार, कट्यार किंवा चाकू ) मुलाचा नाळ कापला असेल तें शस्त्र पाटावर मांडून त्याची पूजा करीत असतात; त्याला छट्टीपूजन असें ह्मणतात.

(३) पूर्वकाळांतील क्षत्रिय आपल्या तरवारीच्या पराक्रमानें आणि मोठ्या शिताफीनें स्त्रिया हरण करून आणीत; आणि नंतर त्यांच्याबरोबर विवाह लावीत असत. याची साक्ष रुक्मिणी, सुभद्रा, वत्सला, अंबा, अंबिका, इत्यादि क्षत्रिय राजकन्यांच्या उदाहरणांवरून पटणार आहे.* आणि या वहिवाटीचें दर्शक ह्मणून वर वधूच्या मंडपांत प्रवेश करण्यापूर्वी वधूमंडप आणि वधुपक्षाकडील मंडळी यांना आपण आपल्या शौर्यानें वश करून घेतलें आहे, याचें चिन्ह ह्मणून वरपक्षाकडील मंडळी वधूच्या मंडपास "**मांडवमाळ**" ( फुलांचा हार ) घातल्याशिवाय ते वधूमंडपांत प्रवेश करीत नाहींत. मांडवमाळ घातली ह्मणजे वधुपक्षाला जिंकून त्याचा कब्जा घेतला असें होतें. लग्नसमयीं वराकडून वधूच्या गळ्यांत घालण्याकरितां दोन चांदीच्या प्रतिमा करितात; त्यास **क्षेत्रपाल** व **ब्रीजपाल विजयासन** असें ह्मणतात. क्षेत्राचा संरक्षणकर्ता विजयासन यानें तुझा ( ह्मणजे वधूचा ) अंगीकार केला आहे याचें हें सूचक आहे.

( ४ ) एके समयीं राजा दशरथ हा शिकारीस गेला असतां अंधाऱ्या रात्रीं महामातृपितृभक्त **श्रावण** हा नदीवर आपल्या अंध मातापितरांना पिण्याकरितां पाणी नेण्याकरितां आला असतां, हरण आलें आहे असें समजून दशरथानें त्याचा वध केला. या आपल्या महा अपराधाचें पश्चात्तापयुक्त स्मारक म्हणून क्षत्रियांच्या ( अर्थातच रजपुतांच्याहि ) घराच्या दाराच्या दोन्ही बाजूंस पंड्या किंवा न्हावी श्रावणमासीं गेरूनें श्रावणाचें कावडीसारखें चित्र काढून देतो, त्याची ते पूजा करीत असतात.

( ५ ) श्रावणमासीं राखी पौर्णिमेच्या दिवशीं बहिण आपल्या भावाच्या हातास राखी बांधीत असते. वद्य नवमीच्या दिवशीं मातीचा सशस्त्र घोडेस्वार तयार करून तो **चव्हाण** म्हणून त्याची पूजा करून राखीचें विसर्जन करितात. या आणि भाद्रपदाच्या अमवाशेच्या दिवशीं पोळा म्हणजे बैलाची

* राजपुतान्यांत लग्नाचे प्रसंगीं प्रथम वधूस लपवून ठेवीत असतात; तदनंतर वर युद्धाची नक्कल करून वधूला शोधून काढतो. अशी वहिवाट कांहीं ठिकाणीं अद्याप चालू आहे.

पूजा करतात; ज्यांच्या घरीं बैल नाहींत ते मातीचा बैल करून त्याची पूजा करतात.

( ६ ) आश्विन महिन्यांत अष्टमीस कुळस्वामिनीची व नवमीस भवानीची पूजा करतात. विजयादशमीस ( दसऱ्या ) चे दिवशीं आपल्या घरांतील हत्यारें शस्त्रें ( जीं असतील तीं ), अश्व ( घोडा ), रथ ( गाडी ) असल्यास त्याची पूजा करतात.

( ७ ) चैत्रमासीं **गनगोर** म्हणजे महादेव पार्वतीची मूर्ति मांडून तिच्या सभोंवतालीं मुली व स्त्रिया फेर धरून स्तुतिपर गीत गाऊन नदीवर किंवा तलावावर नेऊन तिचें विसर्जन करितात.

( ८ ) **सीतलादेवी.**—ही देवी प्रत्येकाच्या अंगणांत असते. तिची वर्षांतून एक वेळ पूजा करितात. तसेंच लग्नकार्याच्या पूर्वी किंवा मागाहून अगर लेंकरांस देवी आल्या म्हणजे बासोडयानें ( आधले रात्रीं मिष्टान्नाचा नैवेद्य तयार केला असतो त्यानें ) प्रात:काळीं सूर्योदय होण्यापूर्वी तिची पूजा करीत असतात.

( ९ ) लग्न, दिवस, मास, श्राद्ध, पक्ष वगैरेप्रसंगीं यज्ञोपवित ( यदाकदाचित्* कोणाच्या गळ्यांत नसेल तर या वेळीं तें ) जरूर घालावें लागतें.

( १० ) राजा पृथ्वीराज चौहान याच्या वेळेपासून पीराची भक्ति कांहीं ठिकाणीं चालू झाली, ती अद्याप चालू आहे.

( ११ ) एकमेकांच्या भेटीच्या वेळीं रामराम करून प्रत्युत्तरीं सिताराम असें ह्मणतात.

मेवाड, काठेवाड, गुजराथ प्रांतांत **श्रीनाथजी** ( श्रीगोपालकृष्ण ), माळवा, मध्यप्रांत, वऱ्हाड, दक्षिणेकडील भागांत **श्रीविठ्ठलनाथ** ( श्री

---

* पूर्वी कांहीं क्षत्रियलोक शिकारीला जातेवेळीं जानवीं काढून ठेवीत असत आणि घरीं परत आल्यावर स्मरण होईल तेव्हां तें घालीत असत. यावरून अर्थांतच ते जानव्याचें विशेष महत्व बाळगीत नसावेत असें दिसून येतें. आणखी ज्यास यज्ञोपविताचा अधिकार आहे, अशा ज्ञातींनाहि धर्माधिकाऱ्यांकडून मनस्वी त्रास भोगावा लागला. अशी त्या वेळची स्थिति असल्यामुळें सर्व गोष्टींत मागें असलेल्या मंडळीपैकीं कांहीं लोक कांहीं ठिकाणीं जानवीं घालतात आणि कांहीं ठिकाणीं घालीतहि नाहींत. असा प्रकार देशत्याग आणि अज्ञान यामुळें झाला आहे.

गोपालकृष्ण ) आणि मद्रासेंत **श्रीव्यंकटेश** ( श्रीकृष्ण ) यांची भक्तमंडळी आपणास वैष्णव म्हणवितात; ते आपलें धर्मव्रत जितकें कडक रीतीनें पाळतात आणि पशुपक्ष्यांदि प्राण्यांवर जितकी भूतदया दाखवितात, तितकी कांहीं अन्य देवांची भक्तमंडळी दाखवीत नाहींत; त्यावरून एकमेकांत भेद मानला जात नाहीं. कांहीं रजपूत, मराठे व इतर वर्ण कित्येक ठिकाणीं मांसाहार सेवन करीत नाहींत.

मद्यपानापासून पुष्कळ अपायकारक परिणाम झाले आहेत, होत आहेत आणि पुढें होणारही आहेत. यासाठीं त्याचा प्रतिबंध करण्यासाठीं सर्व समाजांत अनेक मार्गांनीं प्रयत्न चालले आहेत. तत्संबंधानें येथें विशेष पाल्हाळ करण्याची जरूर नाहीं. प्रायः मांसाहारी* जे आहेत, त्यांना मद्यपानाचें व्यसन जडण्याचा पुष्कळांशीं संभव आहे; म्हणून त्याच्या प्रतिबंधनार्थ वैष्णवधर्माभिमानी आपले घोडे पुढें जरी दामटीत आहेत, तथापि त्यांना एक मांसाहार करणारी आणि दुसरी न करणारी असा ज्ञातींत भेद करतां येणार नाहीं. मद्यपाननिषेधासंबंधानें जितके प्रयत्न करवतील तितके करणें अत्यंत इष्ट व आवश्यक आहेत.

---

## नथ कां नाहीं ?

**क्षत्रिय** ऊर्फ रजपूत जातींत जितक्या साध्वी, पतिव्रता व शूर वगैरे स्त्रिया सांपडतील आणि हजारों स्त्रिया सती गेल्याचे पुराणांत आणि इतिहासांत जितके दाखले सांपडतील, तितके इतर वर्णांत सांपडणें कठीण आहे. इतर वर्णांत तशा स्त्रिया फारच थोड्या सांपडणार आहेत.

रजपूत पुरुषजात ही स्वभावानें भोळी आणि दैववादी म्हणजे नशिबावर भरंवसा ठेवून वागणारी असल्यामुळें त्यांनीं जरी आपलें अतिशय नुकसान

---

* ब्राह्मण म्हणविणारे काश्मिरी पंडित, बंगाली व कनौजी ब्राम्हण, पंजाबांतील सारस्वत ब्राम्हण इ. इ. उघडपणें आणि शास्त्राधारें मांसाहार करतात, तर क्षत्रिय धर्मांत त्यास बहिष्कार करणें हें विरुद्धता दाखवितें.

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत


करून घेतलें आहे, तथापि ते हाडानें शूर आणि पूर्ण हिम्मतबहाद्दर होते; त्यांच्या स्त्रिया चतुर, धोरणी, विचारी, ईश्वरभक्तींत तत्पर असून पुरुषांप्रमाणें पूर्ण हिम्मतीच्या होत्या; म्हणूनच चितोडगडावरील जोहाराच्या वेळीं आणि इतर दुसऱ्या ठिकाणीं शत्रूपासून आपल्या अब्रूचें रक्षण करण्यासाठीं स्वतःस जिवंत जाळून घेतलें, ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे.

प्रत्येक बारा कोसाच्या अंतरावर राहाणारे रहिवाशी पाहिले म्हणजे असें दिसून येतें कीं, त्यांची भाषा, त्यांचे पोषाख, त्यांचे अलंकार, त्यांची वहिवाट, त्यांची चालरीत वगैरेमध्यें फरक आहे. अशी जर वास्तविक स्थिति आहे, तर हजारों व शेंकडों कोसांच्या अंतरावरून येऊन कित्येक शतकें त्या देशांत स्थायिक होऊन गेलेल्या लोकांमध्यें सर्व गोष्टींत कसा व किती फरक झाला असावा, याचें अनुमान करणें सुद्धां कठीणच होणार आहे.

मनुष्यास तृप्ति व समाधान कोठेंच नाहीं, असा सर्वसाधारण प्रकार आहे. सर्वांस कांहींतरी मर्यादा आहे; परंतु स्त्रियांची दागिने घालण्याची इच्छा इतकी दांडगी व अनिवार आहे कीं, तीस मर्यादा म्हणून घालतांच येत नाहीं. पुरुषांचे खरे अलंकार म्हटले म्हणजे दया, क्षमा, शांति, नम्रता, सत्यभाषण हे होत. भिकबाळी ही भिक्षेची किंवा धर्माची वस्तु असावी असें तिच्या नांवावरून व्यक्त होत आहे. पुष्कळ कुटुंबांत भिकेची बाळी घालण्याची वहिवाट आहे आणि प्रत्येक कुटुंबांत कोणती ना कोणती तरी एक स्वकष्टार्जित वस्तु वर्ज्य असते.

देव, राजा व गुरु हे समान आहेत. यांचा प्रसाद, देणगी व अनुग्रह कोणीहि अमान्य केला नाहीं. देवाची कृपा गुप्त असते, राजाची देणगी जाहीर होत असते, आणि गुरूच्या देणगीनें ज्ञानाची वृद्धि व मनाची शांति होत असते. ऊर्जितकाळाची वहिवाट ही पडत्या काळांत दारिद्र्य वाढविते आणि पडत्या काळांतील वहिवाट ऊर्जित काळांत मूर्खत्व दाखविते. आधाररहित कृत्याच्या विचारावर हल्लींचे काळांत लोकांचा विश्वास बसणें कठीण आहे. पोषाख व अलंकारांवरून जाती व्यक्त करतां येणें अशक्य आहे.

रजपुतांपैकीं कित्येक लोकांत स्त्रियांनीं नाकांत नथ, दंडांत कडीं व पायाचे बोटांत बिचवे वापरण्याची पुरातन काळापासून वहिवाट नाहीं. हे दागिने न वापरणाऱ्या इतर जाती सुमारें पंधराविसांच्या वर आहेत.

ज्या समाजांत पुष्कळ वीर स्त्रिया उत्पन्न झाल्या आहेत, त्या समाजांत मुलींचीं नाकें कधींही टोंचीत नाहींत आणि नथही घालीत नाहींत. कित्येक वेळां वीर स्त्रिया आपल्या पतीबरोबर मर्दानी वीराचा पोषाख करून सशस्त्र घोड्यावर स्वार होऊन रणामध्यें जाऊन आपलें रणशौर्य प्रगट करीत असत. याचमुळें रजपूत लोकांत मुलींचीं नाकें टोंचण्याचा आणि नथ घालण्याचा प्रघात नसे.*

पौराणिक ग्रंथ, इतिहास, दंतकथा, शिलालेख पुष्कळ आहेत; ते बहुतेक चाळले, वर्तमानपत्रांतून बक्षिसें देऊन आधार व खुलासा मागविला, खासगी रितीनें पत्रव्यवहार करून बहुतेक ठिकाणीं शोध केला; पण नथ कां घालीत नाहींत याच्या कारणाचा शोध लागला नाहीं, आधार मिळाला नाहीं, खुलासा कळला नाहीं; परंतु कांहीं वयोवृद्ध गृहस्थांचें असें म्हणणें पडलें कीं, आमच्यापैकीं ज्या स्त्रिया सतीदेवी झाल्या ह्मणजे सती गेल्या, त्यांपैकीं एका स्त्रीनें आपल्या अंगावरील सर्व अलंकार ब्राह्मणांस आणि आप्तस्वकीय स्त्रियांस देऊन टाकले; आणि चितेंत प्रवेश करतेसमयीं फक्त नथ,† कडें व बिच्छवेसह सती गेली ह्मणून हे दागिने स्त्रियांनीं

---

* चितोडगडच्या भयंकर जोहाराच्या वेळच्या आणि सती जाणाऱ्या स्त्रियांचीं चित्रें पाहतां रजपूत स्त्रियांच्या अंगावर सर्व अलंकार आहेत; परंतु नाकांत नथ मुळींच नाहीं. यावरून नथ ही पूर्वीं वापरीत नसावी. यास प्रमाणः—History of the Nations,—India.

† पूर्वकाळांतील नथीचा घेर इतका मोठा होता कीं, ती नथ डोक्यापासून गळ्यापर्यंत येत असे. त्या नथीचें वजन सुमारें पांच तोळ्यांपेक्षांहि अधिक असे. नाकाची खराबी होऊं नये ह्मणून ती दोन तीन ठिकाणीं सांखळीनें बांधित असत. इतका जड आणि चेहरा विद्रूप दिसणाऱ्या अलंकाराचा कंटाळा येऊन किंवा नाकछेदन करणें बरें नाहीं अथवा स्त्री असें समजू नये ह्मणून एखाद्या चतुर व हुशार स्त्रीनें नथ न वापरण्याबद्दल नथ ही सतीदेवीनें आपणाबरोबर नेली ह्मणून आपणांस ती घालतां येत नाहीं अशी शक्कल लढवली; आणि अर्थांतच तिच्यावर भोळ्या भाविक जनांची श्रद्धा बसली.

ब पाने ९२८ ज्ञाती ९० / ८८३५
श्री कुमावत क्षत्रिय जातीचा इतिहास

घालण्याचें वर्ज्य केलें आहे. या सतीदेवीचें नांव, गांव, कुळ याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. तथापि याच कारणावरून स्त्रिया नथ घालीत नाहींत; आणि अशी वहिवाट पुरातन काळापासून चालत आलेली आहे. ती शिरसावंद्य करणें हाच आपला वडिलोपार्जित सनातन धर्म व रुढी आहे, असें ज्ञाते समजतात. यासंबंधानें दुसरी एक दंतकथा अशी ऐकण्यांत आली आहे कीं, पुरातन काळीं जलापासून उत्पन्न झालेला जलेंद्र या नांवाचा एक राजा होऊन गेला. एके दिवशीं राजा आपल्या दरबारीं बसला असतां त्यानें असा प्रश्न केला कीं, 'सर्वांत श्रेष्ठ जात कोणाची' तेव्हां प्रथम न्हाव्यानें असें उत्तर दिलें कीं, "माझी जात सर्वांत श्रेष्ठ आहे; कारण, सर्वांच्या शेंड्या आमच्या जातीच्या हातीं असतात." नंतर सोनारानें असें उत्तर दिलें कीं, "आमची जात ही सर्वांत श्रेष्ठ आहे; कारण सर्व जातींच्या स्त्रियांचीं नाकें आमच्या जातीच्या हातांत असतात ( नथी घालण्याकरितां सोनाराकडून नाकें टोंचून घेण्याची वहिवाट आहे.)" राजास सोनाराचे हें उत्तर मान्य झालें नाहीं; ह्मणून त्यानें असा हुकूम सोडला कीं, "अत:पर स्त्रियांनीं आपलीं नाकें टोचूं नयेत." त्यामुळें नथ घालण्याचा प्रघात बंद झाला असावा. ठेताडे ग. शि.

नथ घालण्याचा आमच्यामध्यें पूर्वापार फारसा प्रघात नाहीं. आणि ज्या घराण्यांत सती गेली असेल त्या घराण्यांत नथ मुळींच घालीत नाहींत. कित्येक ठिकाणीं राजाच्या राणीनें नथ न घालणाऱ्या जातींच्या स्त्रियांना नथी बक्षिस दिल्या आहेत आणि त्या राजदेणगी ह्मणून स्वीकारून वापरीत आहेत. यामुळें त्यांना रुढीविरुद्ध वर्तन केल्याचा दोष देतां येत नाहीं. उलट यांत भूषण व अभिमान आहे.

हल्लींच्या काळांतील सुखवस्तु व शोकी लोक नथ न वापरण्याच्या जुनाट चालीवर फारसा भरंवसा ठेवित नाहींत; आणि बहुजनमान्य असा जो सौभाग्यालंकार आपल्या सौभाग्यवतीस नसल्यामुळें ती सुरेख दिसत नाहीं, ह्मणून कांहीं ठिकाणीं नथ वापरण्याचा तुरळक प्रघात पडत चालला आहे. प्रस्तुतच्या राज्यांत लोक आपल्या सनातन वहिवाटीविरुद्ध वर्तन करणारास शासन किंवा मनाई करण्यास असमर्थ झाले आहेत; त्याचमुळें त्यांना शासन

करतां येत नाहीं, आणि मनाईहि करतां येत नाहीं. ह्मणूनच तुरळक ठिकाणीं नथ घालितात. राजदेणगी किंवा नवसाची म्हणून नथ घालण्यास दोष नाहीं. उत्तमाचें ग्रहण करावें आणि वाईटाचा त्याग करावा हा सुज्ञजनांचा मार्ग आहे.

स्त्रियांनीं आपल्या पायाचे बोटांत बिच्छवे नांवाचे चांदीचे दागिने वापरूं नयेत; परंतु त्याच्या ऐवजीं दुसऱ्या नांवाचे व आकाराचे दागिने वापरण्यास मुळींच हरकत नाहीं; जसें रंगजोडवीं, जोडवीं, विरोद्या, करंगळ्या, मासोळ्या, फुलें, आंगठ्या वगैरे; दंडांत कडीं घालूं नयेत पण वाक्या, वेळा, तोळबंदी, बाजूबंद यांसारखे घाटदार दागिने मिळतात, मग साध्या दागिन्यांकडे लक्ष्य कसें जाईल बरें ?

पूर्वापार चालत आलेली नथ न घालण्याची रूढी बलवत्तर बनली खरी; परंतु सबल आधार नसल्यामुळें कांहीं स्त्रियांनीं नथ घालण्याचा प्रघात पाडला आहे, तो दोषास्पद होतो; परंतु हल्लींच्या कालानुरूप मनाई करण्याचें सामर्थ्य कोणांत नाहीं यामुळें नवीन नवीन प्रघात पडत असतो; तो सयुक्तिक; शास्त्र व रूढी यांच्याविरुद्ध नसल्यास त्यास मान देणें हा ज्ञाते धर्म समजतात.

## आह्मीं रजपूत आहोंत.

क्षत्रिय उर्फ रजपूत लोकांच्या मागें सर्व बाजूनें बहिरी ससाणा लागल्याप्रमाणें संकटांची परंपरा लागली; एतदर्थ त्यांना आपली अब्रू व प्राणसंरक्षणार्थ रजपूत नांवाचा त्याग करावा लागला, आणि* **राजकुमार** असें जुनें शास्त्रोक्त नांव धारण करावें लागलें.

* "Raja or Rajkumar—Mansons Hindu Tribes & Castes by Rev. M. A. Sherring, M. A., L.L. B. शेरींग साहेब आपल्या हिंदु जाती आणि वर्ण या ग्रंथांत असें लिहितात कीं, "**राज** अथवा **राजकुमार** हे गंवडी आहेत."

या दोन्ही नांवाच्या अर्थामध्यें मुळींच फरक नाहीं. रजपूत म्हणजे राजाचे पुत्र आणि राजकुमार देखील राजाचेच मुलगे, असा या दोन्ही शब्दांचा अर्थ अगदीं बरोबर आहे. रजपुतांनीं मुसलमानांच्या जुलमांतून सुटण्यासाठीं, आपलें प्राचीन 'राजकुमार' हें नांव धारण केलें; परंतु त्यापासूनहि पुढें त्रास होऊं लागला; कारण मुसलमानांना कळलें कीं, राजकुमार हें नांव रजपुतांनींच धारण केलें आहे, तेव्हां त्यांनीं पुढें आपणांस फक्त '**कुमार**–असें नांव घेतलें; परंतु अशिक्षित आणि अज्ञानी मंडळी कुमाराच्या ऐवजीं आपणांस **कुम्हार** म्हणवूं लागले. पुढें सुशिक्षित व इतर वर्गातील लोकहि त्यांना शुद्ध **कुंभार** समजून त्यांच्याबरोबर तशाच प्रकारचा संबंध ठेवून तसाच व्यवहार-हि करूं लागले !!! आणि आमचे अडाणी बांधवही तें मान्य करूं लागले ! यापेक्षां अधिक आश्चर्य तें कोणतें ? त्या वेळचा काळ आणि त्या वेळची स्थिति पाहतां असें दिसून येतें कीं, त्याकाळीं वास्तविक सत्य तत्त्व काय आहे याचा सूक्ष्म रीतीनें विचार करणारे शेंकडा पांचही लोक आम-च्यामध्यें नव्हते. अर्थाचा अनर्थ कसा होतो ? शुद्धपणास अशुद्धपणा कसा प्राप्त होतो ? या प्रश्नाचा कोणी विचार केला नाहीं, किंवा याची कोणी पर्वाहि बाळगिली नाहीं. त्यामुळें असा शोचनीय परिणाम झाला कीं, शुद्ध रूपास अशुद्ध रूप प्राप्त होऊन त्याप्रमाणें परिपाठही पडला.

**कुंभार** * म्हटला म्हणजे तो मडकीं करणारा; पण या कुमार जातीनें मडकीं करण्याचें कुंभारी काम कधींहि केलें नाहीं; अशी वास्तविक खरी खरी स्थिति असतांहि त्यांना जरी लोक कुंभार म्हणूं लागले तरी ते अज्ञा-नानें इतके अंध बनले होते कीं, लोक आपणास व्यर्थ कुंभार म्हणतात, हें अगदीं बरोबर नाहीं अशी त्यांनीं केव्हांहि तक्रार केली नाहीं. कुमाराचे

*कित्येक ब्राह्मण वगैरे उच्च जातीचे लोकांनी आजकाल परिट नोकर ठेवून कपडे धुण्याचीं परटाचीं आणि रंगारी नोकर ठेवून रंगकामाचीं दुकानें काढलीं आहेत. कित्येक ब्राह्मण स्वतः शिंप्यांचीं दुकानें काढून कपडे शिवण्याचें काम करतात. त्यामुळें ते आपल्या ब्राह्मणत्वास मुकून परिट, रंगारी, शिंपी जातीचे झाले आहेत काय ? नाहीं. जात ही जन्मसिद्ध आहे; ती आतांच्या काळीं धंद्यामुळें भ्रष्ट होत नाहीं. समजा जर ब्राह्मणानें चांभार नोकर ठेवून बुटांचा मोठा कारखाना काढला तर त्यांस कोणी चांभार म्हणेल काय ? हात भ्रष्ट झाला म्हणून कांहीं जात भ्रष्ट होत नाहीं.

कुंभार बनविले आणि ते बनले म्हणून हे खरेच कुंभार असावेत असा लोकांचा व्यर्थ ग्रह होऊं नये म्हणून त्यांनीं निरनिराळ्या ठिकाणीं आपली पुरातन जातीचीं नांवें प्रचारांत आणून आपणास **खेतड ( शेतकरी ) कुमार, कुमावत, परदेशीकुमार कुंभवंसी** म्हणूं लागले. परंतु ही नांवें बोधवाचक नसल्यानें आणि कोर्टांत व सरकार दरबारांत बराच घोटाळा उडाल्यामुळें अलिकडील लोकांनीं धंदावाचक नांव सांगण्याची सुरवात केली आहे; जसें:—**गवंडी, शिल्पावत, राज, कडिया** इत्यादि, याच नांवांनीं ही जात देशपरत्वें प्रसिद्ध आहे. आम्ही जरी उदरभरणार्थ कालानुरूप व्यवसाय* करीत आहोंत तथापि आम्ही खरे **क्षत्रिय ( रजपूत )** आहोंत, शूद्र नाहींत, असें पुराणाचा, इतिहासाचा, धर्मशास्त्राचा व भाटांचा आधार, चालरीत, वहिवाट, वगैरे पाहतां कोणीहि इतिहासज्ञ कबूल करील.

इतर रजपूत लोक ज्या प्रमाणभूत धार्मिक आणि ऐतिहासिक ग्रंथावरून आणि भाट व बडवे यांच्या चोपड्यांवरून आपलें क्षत्रियत्व सिद्ध करून दाखवित आहेत त्याच ग्रंथावरून आणि त्याच चोपड्यांवरून आह्मांसहि आमचें क्षत्रियत्व सिद्ध करून दाखविण्यास भरपूर आधार आहे. उदाहरणार्थ अजमीरचा पृथ्वीराज चोंहाण हा **चोंहाण** वंशीय होय; या वंशाचीं आडनांवें बैताड्या, घोडेला, मामोड्या. कृष्णावतारांतील जिवनजीपासून जो वंश चालत आला आहे, तो **यादव** ( जाधव ) वंश होय; या

* आमच्यापैकीं कित्येकांनीं इतर नोकर ठेवून चुन्याच्या भट्टया घातल्या आहेत; त्यामुळें ते कांहीं लोणार होत नाहींत; किंवा आजपर्यंत कोणीहि त्यांना लोणार ह्मटलें नाहीं; त्याचप्रमाणें कित्येक आमचे लोक तंबाखूची लागवड करितात; हें धर्मशास्त्र-दृष्टया दोषास्पद आहे खरें; तथापि आतांच्या काळांत त्यांना कोणी दोष देणार नाहीं; कारण ब्राह्मण ज्ञातींतील लोकहि सिंधीच्या झाडांची लागवड करूं लागले आहेत, आणि दारुताडीचीं कंत्राटें घेत आहेत. यावरून ते कांहीं कलाल होत नाहींत. कित्येक आमचे लोक मातीचे गणपती व इतर चित्रें करतात; क्वचित् ठिकाणीं इतर जातीचे लोक नोकर ठेवून विटे कौले करण्याच्या भट्टया घालीत असतील; त्यावरून देखील त्यांना कुंभार ह्मणतां येणार नाहीं. स्कूल ऑफ आर्टसमध्यें उंच वर्णांतील विद्यार्थी मातीचीं भांडीं व चित्रें करूं लागले आहेत; त्यावरून ते कांहीं कुंभार होत नाहींत.



…नाथद्वार. ( मेवाड )
…राम शंकरजी केकट्या,
पखवाजी.



नंबर ५. अजमीर. ( राजपुताना )

डावीकडून उजवीकडे पहावे.

१ नाथुलाल नानगराम आसोला; व्यापारी.
२ मंगालाल छोटीलाल केगट्या; कंपाझिटर.
३ मुन्नालालजी भवानीरामजी धनारिया; कंट्राक्टर.
४ रामनारायण छाजुराम धनारिया; व्यापारी.
५ भारुलाल काळुराम देवतवाळ; कंट्राक्टर.
६ गेगराज धनराज मारवाळ; फोटोग्राफर.



बुंदी.

डॉ. हिरालाल जगन्नाथप्रसादजी मारोट्या; असि. सि. सर्जन.
२ गोवर्धनलाल हिरालाल मारोट्या; विद्यार्थी.



हैद्राबाद ( दक्षिण )
गुरुबक्सजी; जयपूरी
फोटो आर्टीस्ट.

Bombay Art Printing Works, Fort

वंशाचें आडनांव नांदीवाळ. अर्जुनाचा पुत्र अभिमन्यु यापासून दिल्लीचा **तुंवर** वंश चालत आला आहे; या वंशाचीं आडनांवें अनावडया, तोंदवाळ, कुदाळ, खोराण्या; गौडबंगालचा गौडेश्वराचा पुत्र मंगलजी, त्याचा पुत्र महिपालजी यापासून **गौड** वंश चालत आला आहे; या वंशाचें आडनांव मारोठ्या. कच्छराजापासून **कच्छवा** हा वंश चालत आला आहे; या वंशाचें आडनांव मारवाळ. गोदावरीच्या अनाद राजापासून जुगाद राजा; जुगाद राजापासून अवडराणा याच्यापासून **गिहलोत** हा वंश चालत आला आहे; या वंशाचें आडनांव धनारिया. हेच वंश आणि हींच आडनांवें आमचीं आहेत, असें त्यांच्या चोपड्यांवरूनही दिसून येतें.

येथपर्यंत आम्ही जें विवेचन केलें आहे, त्यावरून असा निर्णय निघतो कीं, रजपूतांपैकीं जे लोक हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत पसरले आहेत, त्यांनीं आपल्या जातींचीं भिन्न भिन्न नांवें धारण केलीं आहेत; कोणी गुरखे, कोणी कायस्थ, कोणी मराठे इ० इ०; परंतु आमच्या ज्ञातीनें नवीन नांव धारण न करितां पुरातन **कुमावत** हेंच नांव चालू ठेवलें आहे. मूळ क्षत्रिय, पुढें ते आपणांस **राजन्य** असें ह्मणवूं लागले. या राजन्य नांवावरून ते पुढें आपणांस रजपूत ह्मणवूं लागले. या रजपुतांपैकींच राजकुमार, कुमार अथवा कुंभबंसी ही एक शाखा आहे. या शाखेचे जे लोक राजदरबारीं होते ते आपणांस राजकुमार वगैरे ह्मणवूं लागले; आणि यांच्यापैकीं जे लोक शेतकी वगैरे लहानसहान कामें करून आपला चरितार्थ चालवित होते त्यांना **कुमावत** असें म्हणूं लागले; परंतु या नांवावरून जातींत कोणत्याच प्रकारचा भेद झाला नाहीं. जशी मराठे व कुणबी हीं नांवें जरी निरनिराळीं आहेत, तथापि तीं एकाच जातीचीं दर्शक आहेत. जशीं गंगानदीस अनेक नांवें आहेत, तशींच जातगंगेसही अनेक नांवें आहेत. गंगेला निरनिराळ्या भागांत जरी निरनिराळीं नांवें दिलीं आहेत, तरी गंगानदी ही एकच असून तिच्या कांहीं निरनिराळ्या अनेक नद्या झाल्या नाहींत; त्याचप्रमाणें एकाच जातीपासून निघून निर-

निराळ्या देशांत जरी निरनिराळीं नांवें धारण केलीं आहेत तरी त्यावरून त्या कांहीं निरनिराळ्या जाती होत नाहींत. यावरून आमच्या जातीचें मूळ नांव **कुमार** अथवा **कुमावत** म्हणजे **रजपूत.**

आमची मंडळी प्रसंगानुसार उद्योगानिमित्तानें आणि अज्ञानानें जरी जातीचीं अनेक नांवें सांगत आहेत आणि त्याप्रमाणें आपणांस ह्मणवून घेत आहेत, तथापि आपसांत विचारपूस केल्यास ती आपली जात **कुमावत** किंवा **कुमार** किंवा **कुंभवंसी** या नांवाशिवाय अन्य नांव कधींही सांगत नाहींत किंवा सांगणारही नाहींत. असें जरी आहे तथापि वरील नांवाचा अर्थ काय आहे ? याचा अर्थ त्यांना स्वतःस समजत नाहीं तर ते दुसऱ्यास काय समजून सांगणार आहेत ! परंतु आतां या ग्रंथावरून त्यांचें अज्ञान दूर होऊन त्यांस आपल्या ज्ञातीचें यथार्थ स्वरूप कळून येईल अशी उमेद आहे.

---

## कुलें, कुलदेवी आणि आडनांवें.

रजपुतांचीं प्रमुख राजकुलें ३६ आहेत; शाखा ९९; याशिवाय पोटशाखा पुष्कळ आहेत; त्यांचीं आडनांवें १,८०,००० आहेत, असें म्हणतात. हीं आडनांवें एकाच जातीस लागू नाहींत; तीं निरनिराळ्या जातींतहि एकसारखींच सांपडतात. कांहीं आडनांवांमध्यें पुष्कळ अशुद्धता दिसून येते; याचें कारण म्हटलें ह्मणजे देश, भाषा, व अज्ञान हें असावें. कित्येक लोक आडनांवांसच गोत्रें समजतात; पण हा त्यांचा निव्वळ अज्ञानमूलक समज होय. गोत्रें आणि आडनांवें हीं अगदीं निरनिराळीं आहेत. **काश्यप, वसिष्ठ, कौशिक** यांना गोत्रें म्हणतात.

आडनांवें ( चालू गोत्रें ) हीं मुख्यत्वेंकरून त्यांच्या राहण्याच्या गांवावरून, किंवा त्यांच्या धंद्यावरून, किंवा त्यांच्या शौर्यादिक विशेष महत्वाच्या कामगिरीवरून, किंवा त्यांनीं संपादन केलेल्या किताबावरून पडलेलीं असल्याचें दिसून येतें. प्रसंगानुसार गांवाच्या, धंद्याच्या वगैरे नांवांतहि पुढें

मागें पुष्कळ फेरफार होतात. गांवांचीं जुनीं नांवें किंवा धंद्यांचीं जुनीं नांवें जरी बदललेलीं आहेत, तथापि कांहीं आडनांवें जशींच्या तशींच अद्याप कायम आहेत; त्यांत म्हणण्यासारखा फेरफार झाला नाहीं. आमच्यांत जुन्या काळाचा इतिहास चौकस बुद्धीनें शोधण्याची प्रवृत्ति नसल्यामुळें आडनांवें कशीं पडलीं, कां पडलीं, त्यांत पुढें कसा फेरफार झाला, याविषयीं कांहीं विचार व शोध केला नाहीं. या ऐतिहासिक चौकसबुद्धीचा आमच्यांत लोप झाल्यामुळें वंश, कुल, कुलदैवत, कुलदेवी व कुलाचार, सती, मूळगांव, या बाबतींतहि बरेंच अज्ञान व बराच घोटाळा दिसून येत आहे.

मुख्य देवी दोन आहेत; एक पार्वती आणि दुसरी लक्ष्मी; यांनीं निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळीं रूपें धारण केलीं, आणि शौर्य व पराक्रम प्रगट केला; त्यावरून भक्तजनांनीं आवडीनें ठिकठिकाणीं त्यांना निरनिराळ्या भाषेंत निरनिराळीं नांवें दिलीं आहेत; आणि त्यांतहि देश व भाषाभेदामुळें अशुद्ध-पणा दिसून येत आहे.

आमच्यामध्यें पुष्कळ ठिकाणीं गोत्रांचें विशेष बंड नाहीं. या ग्रंथावरून स्वकुलाची माहिती होण्याचें सुलभ साधन उपलब्ध झालें आहे. एकाच कुलांत निरनिराळीं आडनांवें आहेत; आणि आडनांवें हींच आमचीं गोत्रें आहेत, असा रूढीमुळें आमचा ग्रह होऊन बसला आहे. एकाच आड-नांवाच्या घराण्यांत लग्नसंबंध होत नाहीं, अशी पुरातन काळापासून रूढी चालत आली आहे. प्रसंगीं जर कुलाची आडकाठी मानल्यास रूढीस अनु-सरून मुलीस तिसऱ्याच कुलाच्या पदरांत दिली ह्मणजे मुलीचें दत्तविधान केल्यासारखें होऊन ही आडकाठी दूर करतां येते.

**क्षत्रिय कुलें** या सदराखालीं जीं कुलें, शाखा, आडनांवें वगैरे दिलीं आहेत, तीं गुजराथ काठेवाडकडील कुमार जातीचीं आहेत; यांची लोकसंख्या सुमारें पंधरावीस हजार असावी.

**कुलें**:—***चौहान** (चव्हाण). ।·**गिहलोत** (गोहील), +**तुंवर** (तुवर) १ **यादव** ( जाधव ), २ **परमार** ( पवार ), ३ **गौड**, ४ **कच्छवा**, ५ **राठोर**, ६ **सोंलखी**, ७ **पडिहार** ( पुरिहार ), ८ **लोहाना**, ९ **भाटी**.

| प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. | प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. |
|---|---|---|---|
| अनावड्या. | रणवाय. | कोल्हूगरा. | नगरकोट, ज्वाला |
| आजमिरा. | नोसोर. | कोल्हा. | महालक्ष्मी. |
| आसीवाळ. | कालका. | खाटवाळ. | भवानी. |
| २असोला. | चांवडा. | खिरणीवाळ. | बेलासन. |
| आहानें. | भवानी. | खोवाळ. | निमवाय. |
| ९उटवाले. | भवानी. | +खोराण्या. | श्याम, कालीका. |
| उदेवाळ. | लैकोड, भवानी. | खेडा. | चावल. |
| उंजूवाळ | बोराय. | ८गढवाळ. | भवानी. |
| उचवाळ. | कालिका. | गुडीवाळ. | भवानी. |
| ६करोडीवाळ. | सकराय, कुसंबी. | गैदर. | दुर्गा. |
| कयगठा. | साकंमबरी. | गोरीया. | ब्रह्माणी. |
| काकरवाळ. | नगरकोट भवानी. | २घानारीया. | अंबाई. |
| कामे. | नगरकोट भवानी. | घुमन्या. | जमवांय. |
| कारवाळ. | भवानी. | *घोडेला. | लैकोड,कालीका. |
| कारगवाळ. | कालिका. | घोडीवाळ. | अंबाई. |
| कुंडळवाळ. | जमवाय. | जाजोरे. | भवानी. |
| कुसंबीवाळ. | जीण. | जायलवाळ. | कालिका. |
| कुदेवाळ. | बोलासन. | जायतवाळ. | कालका. |
| +कुदाळ. | कटारी. | जीवनवाळ. | भवानी. |
| कैकटया. | बीछनदर. | जेटीवाळ. | स्वाही, भवानी. |

| प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. | प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. |
|---|---|---|---|
| जोंधवाळ. | चतुसशिंगी. | पुसा. | जीन. |
| ९जोंजावरा. | अंबाई. | बगराणे (सुतवाले) | बगडासन. |
| झिंजोटे. | कोमासन. | बबेरीवाळ. | चतुःशींगी. |
| झिनोऱ्या. | पिंपळासनी. | बहीरे, बैरा. | अब्यासन. |
| ९टांक. | चावंडा, चामुंडा. | बडमुंडा. | नरसींगजी. |
| टावला. | अंबाई. | बसवाळ. | जीण. |
| तांगडा. | नीमासा. | बटचाऱ्या. | भादर. |
| तुसे. | पिंपळासन. | बारवाळ. | नगरकोट भवानी. |
| +तोंदवाळ. | चावंडा. | बासनीवाळ, बासल. | कालिका, पिपळासन. |
| *तोनगरे. | नीमासा, भवानी. | बावला. | जोवन. |
| तोतनराण्या. | जगदंबा. | बीलोठ्या, बालोठ्या. | जमवाय, पिपळासनी. |
| *दादरवाळ. | मुंजाय. | *बैताडे;(बैताड्या) | कालिका, भवानी |
| *देवतवाळ. | नागन, जोबनर. | ७बोरावडा. | भवानी. |
| दैमीवाळ. | भवानी. | ७भटकोलीया. | बेलासन. |
| दोराया. | हिंगलाज. | भोरोदे. | आंबीका. |
| ·|·धनारिया. | आंबीका. | भोवरिया. | अंबाई. |
| *धवारे, धुवाऱ्या. | नगरकोट भवानी | मरेठ्या. | मोरवण. |
| धीरपुऱ्या. | बडवाय. | मरमट. | भवानी. |
| धुवा. | भवानी. | मरोड्या. | मोरवण. |
| *नराणा. ५ | जीण. | मंडोरे. | नारेळी. |
| १नांदीवाळ. | श्याकुल. | मंडावरा. | कालीका. |
| नारोळ्या. | सितळा. | | |
| पीपोडे. | नगरकोट भवानी. | | |

| प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. | प्रचारांतील चालू आडनांवें. | कुलदेवींचीं नांवें. |
|---|---|---|---|
| मणेव्या | गांगजून. | शींगनवाळ. | आसावरी. |
| ३मारोव्या. | अंबाई. | सांबरवाळ. | भवानी. |
| २मालविया,मालीया. | चावंडा. | २साडीवाळ. | महालक्ष्मी. |
| *मामोड्या. | नायण,आसावरी. | २सिपोटा. | भवानी. |
| ४मारवाळ. | जमवाय,कालीका. | सुकडीवाळ. | दुर्गा. |
| माचीवाळ. | ,, | सेंगाव्या. | जीन. |
| माळवाळ. | बेलासन. | सेलारे. | बेलासनी. |
| माऱ्या. | चावंडा. | सोकल. | पिपळासनी. |
| मोरवाळ. | लैकाड,बिजासन. | २हतेरिया. | गांगजन. |
| ६मैराण्या, मांडेल. | चामुंडा. | हिरापुरीया. | अंबा. |
| | | हुजरे. | भवानी. |

## चालू गोत्रें अर्थात् आडनांवें.

| | | | |
|---|---|---|---|
| अजरोरा. | कवलीये. | करीवाळ. | किनारीवाळ. |
| अतिगढवाळ. | कपालीया. | करोळे. | कुसा. |
| अमलवद्या. | कलछानिया. | कटाऱ्या. | कुलच्यान्या. |
| अवताडे. | कसरवाळ. | कासन्या. | ८ कुकडवाळ. |
| आजमेरा. | कहकरीया. | कापडी. | कुसमीवाळ. |
| आयताड. | कपाटराना. | कासवाळ. | कुक्कडवाळ |
| उंबरवाळ. | कवलखरा. | ५ काच्छा. | ६ कुंडालिया |
| उनीवाळ. | कपुरपुरा. | कायडी. | ८ कुचेरिया. |
| उजारवाळ. | कच्छीली. | कारबवाळ. | कुऱ्हाडे. |
| उंबराण्या. | कच्छवा. | कारवाळ. | कोलहगरा. |

चाल्ह गोत्रें अर्थात् आडनांवें.

| | | | |
|---|---|---|---|
| कंडोरीवाळ. | घटेलीवाळ. | छावड्या. | तांदुळ. |
| कोल्हकरा. | घडेलवाळ. | छानवाळ. | ९ तिलायचा. |
| कोहकरा. | घडवाळ. | छीलाश्या. | तीहीनगीरया. |
| खटोल्या. | घाटवाळ. | २ जगनाथे. | * तुनगरा. |
| खरनासरा. | घाठळवाल. | जगरवाळ. | तुरसीया. |
| खवाळ्या. | घापोल. | २ जळींद्रे. | + तुंवर. |
| खरगडा. | * घारोळा. | जलंधरा. | तेलपुरे. |
| खरकडा. | घोडावड. | जवजवाल. | तेहरपड्या. |
| खरेव्या. | * चव्हाण. | २ जाघडवाळ. | तोनघरे. |
| खटावले. | चक्रीवाळ. | १ जाधव (यादव ). | दहीवाळ. |
| खंडारिया. | चंदेल. | जारोरा. | दरगया. |
| खरेला. खरोल्या. | चवरांष्या. | * जालवाळ. | दहोरे. |
| खरनान्या. | २ चांदीबा. | * जालोरा. | * दहीगवां. |
| खुरनारीया. | २ चारोडा. | ९ जावलवाल. | दयाडवाळ. |
| खोराणिया. | चाटसवाळ. | ( जांबळवाल ) | दुधवारा. |
| खेडीवाळ. | चिचोलीया. | जायसवाळ. | दुधान्या. |
| खेहावाळ. | २ चेटी. | जुनवाळ. | * दुबलदिया. |
| खोडान्या. | चोथाड्या. | जेसवाळ. | * देतोडिया. |
| गठेलीवाळ. | चोरमा. | जोंधवाळ. | देवराय. |
| गुरवे. | चौघड्या. | जोनवाळ. | देवळे. |
| गेडागीर. | चोलिया. | झलारे. | देवन्या. |
| ८ गेधर. | चौराशा. | टिटवाड्या. | दंबीवाळ. |
| ७ गोयेल. | छलारे. | ठोसरीवाळ. | धाडवाळ. |
| ७ गोरीया. | २ छापरवाळ. | डुंगरवाळ. | धमान्या. |
| * गोंडेला. | छापु. | तळावल्या. | धुमूण्या. |
| गाटेवाळ. | २ छापोला. | तातवाड्या. | धनकुठा. |

## चालू गोत्रें अर्थात् आडनांवें.

धनारे.
धाकर.
धावरा.
धामनीया.
* धांदलेचा.
* धुमा.
* धुमोणें.
धुंदाऱ्या.
नईपाळ.
नऱ्हाणें.
नवाळे.
नगरे.
नरड्या.
* नरानिया.
ननाव.
नवखवाळ.
नऱ्हा.
नागरे.
नागे; नागा.
नागरकोल्हा.
नाकेवाळ.
* नाणेचा.
नांदीरवाळ.
* नारनोळे.
नागोरी.
नावड्या.

नाहोला.
नाहाडिया.
* निंदरवाळ.
निंबीवाळ.
निरवाळ.
( करोडीवाळ)
निगड्या.
निगरीया.
७ पडीहार.
पंचखासे.
* पच्छेरीवाळ.
* पन्ह्यार.
पाडवा.
* पालडीवाळ.
पाऊवे, पाडवे.
पारंवाळ.
पारंबवाळ.
पहाडीवाळ.
* पिपलोदीया.
पीळपे.
पीलये.
पुसा.
पालरीया.
बनावड्या.
बयतळे.
बरेंडे.

बाधोरा.
बारवाळ.
बाहातरे.
बागमुडा.
बाहादुरे.
बाहापुरे.
बाहींचा.
बाहातड्या.
बाळोद्या.
बाबोरे.
बाबरे.
* बागेरचा.
* बागोरिया.
* बाबदरा.
७ बागडीया.
बाबळे.
बबड्या.
( सिंधलेरा )
बबेरेवाळ.
बगमुडा.
* बरणवाळ.
बरहा.
बहुरोद्या.
बधाण्या.
बकवासे.
बगडान्या.

बटचार.
बढेरे.
बटनारे.
बडोलें.
बडीले.
बडेया.
बरदीया.
बनवरे.
बगीवाळ.
बडीवाळ.
बडशिवा.
बडवाळ.
बडधिया.
बदरीया.
बरनेटे.
बाहदरपुरे.
बीजे.
बीद्रामण.
७ बथेडिया
बेहवाळ.
बाजुले.
ब्याहणे.
बांसल.
बोहडीवाळ.
भगांऱ्या.
भधाऱ्या.

भरोद्या.
७ भान.
भान्या.
भाटीवाळ.
७ भाठोदरी.
भाडोरे.
भाडीवाळ.
७ भिवाना.
७ भुरवाळ.
भेंडीवाळ.
भोवरया.
भोरीवाळ.
भरमुट्टे.
भरोगा.
भवरे.
भडमुंडा.
भडारख्या.
७ भंडेचा.
७ भलकिया.
भदाण्या.
मगराणे.
मव्हाणे.
मझावरे.
मडरिआ.
मनेरिया.
७ मंडोबरा.
मसलेव्या.
मल्हाने.
मळीया.

मरमार.
मथुरीया.
माचीवाळ.
माहोर.
२ मावर.
मावरे.
माचवाड्या.
मान्या.
माहारणे.
माहाराजाड.
मासेडीया.
मुजवरवा.
मुदारे.
* मुरवाळ.
* मुलेवा.
मुदोल्या.
मुडालीया.
६ मेवाडा.
मैराणे.
मोहान्या.
मंजेठ्या.
मंढेरा.
याहणे.
येहाते.
रसाणे.
रतीवाळ.
रसीने.
रहीडा.
राजळवाळ.

राहडे.
राजुरे.
२ रामनिया.
२ राहोरिया.
* राजोरिआ.
रेनीवाळ.
६ रेनावळ.
रेवड्या.
६ राहोटीया.
रोडीवाळ.
लव्हाणीवाळ.
लाहोरे.
लालगंड्या.
लारणा.
लाकेशरा.
लिंबीवाळ.
लेखा.
६ लोदरीवाळ.
लोडवाळ.
२ वडवरा.
७ वतरानिया.
वनवाड्या.
वसतीवाळ.
वाघेरा.
वाडलीया.
व्याडवाळ.
शिरसवाळ.
शिमार.
शिवाटे.

शिरस्वा.
शिक्का.
शिरताळे.
शिलंगी.
शीरहोडीया.
शीलोटे.(शीहोटे)
शिरोहीया.
शेकाड्या.
शेवटे.
शोकारीवाळ.
षनावड्या.
षन्या.
षीरया.
सधीवाळ.
सनावड्या.
सन्या.
सलावड्या.
सरताळे.
सवालाख्या.
सयरावंत.
सलवाड्या.
साभेरा.
साबळे.
सांभेरा.
२ सारडीवाळ.
२ सालेचा.
२ सांखळेचा.
सांबराचव्हान.
सांबरे.

| | | | |
|---|---|---|---|
| सिवानचा. | सीलोरे. | २ सुनारो. | हरपुड्या. |
| सिरथ्या. | सुकडीवाळ. | सैरावत. | हिरापुरिया. |
| २ सिव्होरिआ. | २ सुकाळीवाळ. | २ हडवा. | हौदखासे; हौदरख्यां. |

## ज्या घराण्यांत सती गेल्या त्यांचीं नांवें.

| आडनांव. | सतीचें नांव. | आडनांव. | सतीचें नांव. |
|---|---|---|---|
| असोला. | बईना. | धनारिया. | गोहा. |
| १अनावडिया. | रुकमा. | देवतवाळ; नराणा. | लाडण. |
| कुदाळ. | बुल्दी. | २मारोव्या. | राजां. |
| घोडेला. | तोली. | मामोड्या. | कुर्मा. |
| १तोंदवाळ. | दामाँ. | ३नांदीवाल. | पाली. |

## मूळगांव ( निकास. )

१. हस्तिनापूर. २. हरमाडा. ३. करोली. बैताडे, (सांभर.) खोराण्या, (हस्तिनापूर.) मारवाळ, (नरवल.) कोल्हूगरा, नराणा ( नराना. ) बडमुंडा, ( साईवाड. ) आसीवाल, ( भादवा. ) जायलवाळ, ( जायल. ) कंसांतील हीं मुळगांवें आहेत.

हीं वर जीं आडनांवें दिलीं आहेत, तीं हल्लीं प्रचारांत चालू आहेत असें शोधांतीं कळून आलें आहे; आणि तीं निरनिराळ्या ठिकाणच्या आमच्या जातिसमाजाच्या प्रमुख पुढाऱ्यांकडूनहि समजलीं आहेत. याशिवाय हिंदुस्थानांत जीं सुप्रसिद्ध **महाक्षेत्रें** व **तीर्थें** आहेत, तेथील ब्राह्मण ( उपाध्याय ) हे पुरातनकाळापासून जे यात्रेकरू येत असतात, त्यांचीं नांवें नोंद करून ठेवीत असतात, त्या नोंदींत यात्रेकरूचा देश, प्रांत, गांव, जात, कुल, वंश, नांव, आडनांव लिहून ठेवण्याची त्यांची फार जुनी वहिवाट आहे; त्या नोंदीच्या चोपड्या पाहतां त्यांवरूनही असा निर्विवाद आधार मिळतो कीं, आम्ही क्षत्रियवर्णाचे व धर्माचे असून **रजपूत** आहोंत.





# आमच्या चालीरीती.

## पांचवी अथवा षष्टीपूजन.

पुत्र किंवा कन्या जन्मल्या दिवसापासून पांचवे दिवशीं रात्री बाळंतिणीची खोली स्वच्छ सारवून त्यावर रांगोळी काढून एका पाटावर चांदीची किंवा सोन्याची षष्टीदेवतेची प्रतिमा, ज्या शस्त्रानें बालकाचें नालछेदन केलें असेल तें शस्त्र, दीप, कुंकुवाचा करंडा व दुर्वा, शाईची दौत व लेखणी, ठेवितात. याच्या कारणपरंपरेविषयीं अशी समजूत आहे कीं, त्या रात्रीं षष्टीदेवता लेंकराचे कपाळावर भवितव्यतेचें लेखन करिते. बाळंतिणीनें लेंकरास वस्त्रांत गुंडाळून घेऊन शस्त्र आणि षष्टीदेवतेची पूजा करून नमस्कार केल्यानंतर गुळांत शिजविलेल्या गव्हाच्या घुगऱ्या मुलांमुलींस वाटतात.

## सोयरीक अथवा सगाई

स्वगोत्रीय* किंवा एकाच आडनांवाचे व मामा आणि मावशी यांच्या मुलीं खेरीज करून इतर आडनांवाच्या घराण्यांशीं शरीरसंबंध करावा.

प्रथम मुलाच्या बापानें किंवा त्याच्या आप्तानें मुलीचा बाप किंवा आप्त याजकडे मुलीची मागणी करण्याकरितां उपाध्यायास पाठविण्याची वहिवाट आहे; परंतु उपाध्याय नसला तर बाप किंवा आप्त यास स्वतः जाऊन मागणी करितां येते.

जन्मनांवावरून मुलामुलींचें राशी नक्षत्रादि पाहणें उत्तम; जन्मनांवाच्या अभावीं चालू नांवावरून पहावें; दोन्हीं पाहणें नसल्यास मनाच्या निश्चयाप्रमाणें करावें.

---

* गोत्रांची नोंद दिली असती, परंतु तसें करणें हें कांहींसें अप्रशस्त व असंतोषजनक झालें असतें, म्हणून ती मुद्दाम वेगळणें भाग पडलें. चालू आडनांवें हींच गोत्रें समजण्याची वहिवाट आहे.

मुलाचें लग्नवय सुमारें १८ आणि मुलीचें लग्नवय १२ या खालीं नसावें. विशेष प्रसंगीं थोडीशी सवलत असावी.

लग्ननिमित्तानें मुलीचे पैसे व धन घेण्याची अनिष्ट रूढि कांहीं ठिकाणीं असल्यास ती बंद होईल अशी व्यवस्था असावी.

मुलीच्या बापानें किंवा आप्तानें मागणीस संमती दिल्यानंतर मुलाकडील आप्तस्त्रियांनीं मुलीच्या आप्तस्त्रियांचें अनुमोदन घ्यावें.

उभयपक्षांनीं ज्ञातीच्या कांहीं गृहस्थांसमक्ष सोयरीक जर निश्चित केली तर साखरपुडा करावा. तो शुभ दिवस पाहून दोघांनीं पंच सरपंच ( चौधरी ) आणि आपापल्या आप्तांस कळवावा व त्यांसमक्ष करावा. या समयास त्यांनीं येणें हें त्यांचें कर्तव्य आहे.

उभयपक्षांत देण्याघेण्याचा कांहीं ठराव झाला असल्यास पंच किंवा सर-पंच यांनीं विचारलें असतां त्यांस कळवावा.

मुलीकडील वडिलांनीं मुलाकडील वडिलांस श्रीफळ म्हणजे नारळ द्यावा; म्हणजे माझी मुलगी तुमच्या मुलास दिली असें होतें; अशी कांहीं ठिकाणीं वहिवाट आहे.

न्हाव्यानें किंवा मुलीच्या आप्तानें जागा सारवून रांगोळी काढून चौरंग अथवा पाट त्यावर मांडावा. नंतर विवाह होणाऱ्या मुलीस त्यावर पूर्वाभिमुख बसवून उपाध्यायाचे हस्तें तिला कुंकु लावावें व तोंडास पांच वेळां साखर घालून हातांत श्रीफळ, फळें, साखरेची पुडी, मिठाईचा पुडा, अथवा सव्वा शेर गुळ, कुंकुवाची व मेंदीची पुडी व एक रुपाया द्यावा. या समयास जर उपाध्याय नसला तर मुलाच्या बापानें किंवा आप्तानें करावें.

यावेळीं पुरोहीत व न्हावी असल्यास वरपक्षानें शक्तीप्रमाणें यथानुक्रमें संभावना करण्याची वहिवाट आहे; परंतु पंचांचा मात्र कांहीं एक हक्क नाहीं. जमलेल्या मंडळीस पानसुपारी वाटावी.

सोयरीक जमल्यानंतर ज्यावेळीं मुलीस कुंकु लावतात त्यावेळीं इच्छेनुरूप अनुकूलते प्रमाणें मुलीस चिरडी चोळी व दागिने घालावे. वधूचे बापानें

किंवा आप्तानें मुलास भोजनाचें आमंत्रण देऊन त्यास शेलापागोट्याचा अहेर करावा.

सोयरीक जमल्यानंतर लग्नापूर्वीं जेवणास मुलामुलीस बोलाविलें असतां एकमेकांकडे इच्छेनुरूप जातां येतें. मध्यंतरीं वराकडील कोणी हौसेनें मुलीस कपडे वगैरे केल्यास करितां येतात.

साखरपुडा झाल्यानंतर दोन वर्षांचे आंत लग्न करावें; तथापि उभय पक्षानें एकमेकांच्या अडचणी लक्षांत आणल्या पाहिजेत.

## विवाह पद्धति.

**लग्न वर्तविणें.**—वरीलप्रमाणें सोयरीक जमल्यानंतर उभयतां व्याह्यांनीं एक मतानें उपाध्याय ( पांड्या ) अथवा जोशी यांजकडे श्रीफळ घेऊन जावें. लग्न पाहाणारा उपाध्याय अथवा जोशी यास लग्न होणारे मुलामुलीचीं नांवें सांगावीं. त्यावरून राशी नक्षत्रादि पाहून लग्नपत्रिका, कुंडली, टिपण, साल, शक, महिना, घटी, पळें, वार, नक्षत्र; नाम घटी पळें; योग घटी पळें सह वराचें व वधूचें नांव वगैरे सह, तयार करून दिल्यावर वराकडील आप्तानें त्यांचा स्वीकार करण्याची वहिवाट आहे. त्यापूर्वीं उपाध्याय अथवा जोशी यांस यथाशक्ति दक्षिणा द्यावी.

लग्नसमारंभ हें मंगलकार्य असल्यानें अशा समयीं अनेक अडचणी संकटें, व विघ्नें येण्याचा संभव असतो; म्हणून कार्य करणारांनीं आप्तइष्टांसह पोक्त व दूरवर विचार करून आपले आद्याबाहेर खर्च न जावा आणि मंगलकार्य आरंभापासून अखेरपर्यंत पार पडेल अशी दक्षता ठेवली पाहिजे.

**लग्नपत्रिका.**—वराच्या बापानें किंवा वडील आप्तानें वधूचे घरीं जाऊन लग्न पत्रिकेस मुलीकडील आप्तांनीं हळद, कुंकू, अक्षता वाहून पूजा करून त्या पत्रिका श्रीफळासह उभयतां व्याह्यांचे पदरांत टाकतेवेळीं दोहींकडील इष्ट, आप्त, सरपंच, उपाध्याय ( पांड्या ) व न्हावी असतात. वधूचें लग्नखर्चानिमित्त योग्य कारणपरत्वें वराकडून कांहीं रोकड देण्याचें ठरलें असल्यास व ते या वेळीं मागत असल्यास तें देण्याची चाल जरी आहे, तरी ती गौण आहे.

लग्नपत्रिका पदरांत पडल्यानंतर उभय पक्षांनीं आपापल्या इष्ट, आप्त मित्र किंवा बाहेर गांवचे मंडळीस लग्नचिठ्या पाठविणें व गांवांतील मंडळीस अक्षतासहित विनयपूर्वक आमंत्रण द्यावें.

लग्नाची हळद लावण्यापूर्वी नवस फेडून कुलाचार वगैरे करणें असतील ते करून घेण्याचा रिवाज आहे.

**मंडपस्थापन***—ब्राह्मण शुभ दिवस पाहून लग्नकरणाऱ्या दोन्ही घरीं जाऊन दोहोंकडील जो कोणी वडील असेल त्याजकडून मंडपस्तंभाची **पूजा करवून** वधू आणि वर यांच्या हातांत विडादक्षिणा देऊन नमस्कार करवितो. ह्मणजे लग्नमण्डप तयार करण्यास सुरवात झाली असें समजावें.

---

* या वेळीं उपाध्याय मंत्र ह्मणतो तो:—स्वस्ति नइंद्रो वृद्धिश्रवा: स्वस्तिन: वीश्ववेदा: स्वस्तिनस्तारक्षो अरिष्टनेमि: स्वस्तिनो बृहस्पतिर्दधातु ॥ समुर्त्ते शुभलग्नं क्षेमं कल्याणं आरोग्यं निर्विघ्नेन शुभं भवतु ॥ द्वे भार्येसिद्धि बुद्धि त्वदनु सहचरै रिद्धि वृद्धि गणाढयौ । द्वौ पुत्रौ लक्षलाभौ सकल गुणमये मण्डपे कल्पवृक्ष: ॥ गृहे यस्य प्रभुत्वं सदसनममृतं मोदका खंडमिश्रा । भूयात् भूति गणेश सकल जनानंदकारी कुटुंब: ॥ सुमुखश्चैकदंतश्च कपिलो गजकर्णक: लंबोदरश्च विकटो विघ्ननाशो विनायक ॥ धूम्रकेतुर्गणाध्यक्ष भालचंद्रो गजानन: द्वादशैतानि नामानि य: पठेत् श्रृणुयादपि ॥ विद्यारंभे विवाहेच प्रवेशे निर्गमे तथा संग्रामे संकटे चैव विघ्नस्तस्य न जायते ॥ शुक्लांबरधरं दिव्यं शशिवर्णं चतुर्भुजं प्रसन्न वदनं ध्यायेत् सर्व विघ्नोपशांतये ॥ अभीप्सितार्थ सिद्ध्यर्थं पूजितो यत्सुरासुरै: सर्व विघ्न हरेत्तस्मै महागणाधिपतये नम: ॥ लाभस्तेषां जयस्तेषां कुतस्तेषां पराजय: येषां इन्दिवरश्यामो हृदयस्थो जनार्दन: पुण्याहं पुण्याहं पुण्याहं अद्याच श्री ब्रह्मणो द्वितीय प्रहरार्धे तदादौ श्री श्वेत वराह कल्पे सप्तमे वैवस्वत: मन्वंतरे अष्टाविंशतितमे कलियुगे प्रथमचरणे भरतखंडे भूर्लोके जंबुद्वीपे आर्यावर्तमान तरीक्षत ब्रह्मावर्तैक देशे अर्बुदारण्ये कच्छकुमारिकानाम्ने क्षेत्रे स्वरस्वतियोरंतराले देव ब्राह्मणानांसनिधौ सप्तमे मन्वंतर शालिवाहन नाम्ने अमुक शके अमुक संवत्सरे प्रवर्तमाने रवौ अमुकायने श्रीसूर्ये अत्राद्यमहामांगल्य फलप्रद मासोत्तम मासे पुण्य पवित्रकारी अमुक मासे अमुक पक्षे अमुक तिथौ अमुक वासरे यथावर्तमान नक्षत्र योगकरण लग्नमुहुर्त संवायमादि ग्रहगुण विशिष्टायां पुण्य तिथौ ममलाभार्थं क्षेमार्थं विजयार्थं मनकामना सिद्ध्यर्थं शरीरेगृहे रोग दोष क्लेश कष्ट भय उच्चाट व्याधि

**पृथ्वीपूजन.**—( अंगणमाती ) पृथ्वी क्षमाशील आणि मातृवत् आहे, म्हणून तिचें पूजन करितात. वधुवराचे आईबाप, भावजयी किंवा आप्त आपल्या इष्टआप्त स्त्रियांस बरोबर घेऊन देवळाच्या बाजूच्या अथवा प्रसंगीं आपले घरचे बाहेरील पृथ्वीला हळद, कुंकू, अक्षता, धूप, दीप, गुळधण्याचा व भिजाण्याचा ( भिजलेले हरभरे ) नैवेद्य दाखवून पूजन करतात. नंतर नमस्कार करून अक्षता टाकून तेथील मातीचें एक ढेंकूळ घेऊन त्यास कच्या धाग्यानें गुंडाळतात. त्या प्रसंगोचित गीत ह्मणत आणण्याची ज्याच्याकडे चाल असेल ते आणतात. तें ढेंकूळ ज्या स्थळीं देवपीठ असेल तेथें ठेवतात. नंतर ज्या स्त्रिया तेथें जमल्या असतील त्यांस हळद, कुंकू, पांच किंवा अधिक खारका आणि पानसुपारी देतात.

**सतीपूजन**—ज्याचे कुलांत कोणी स्त्री सती गेली असेल त्या कुलांतील सुवासिनीकडून वटवृक्षाखालीं सौभाग्य वायनासह सतीपूजा करावी.

**हळदीपूजन.**—शुभ दिवस पाहून कुटुंबांतील पांच सुवासिनी स्त्रिया मिळून पूजा करून सव्वाशेर हळद फोडून दळावी.

**हळद लावणें.**—( सोहळ्यास सुरवात ) लग्नपत्रिकेंत जो दिवस व जी वेळ नेमली असेल आणि कुटुंबांतील ज्या सुवासिनींचीं नावें लिहिलीं असतील ( हें सर्व उपाध्याय पूर्वींच समजून सांगतो ) त्या पांच सुवासिनींच्या हातानें लावित असतात.

**हळद.**—लग्नपत्रिका करण्यापूर्वी पुरोहित किती दिवसांची पाहिजे असें विचारतो; त्या वेळीं उभयतां व्याह्यांनीं आपली सोय, इच्छा व शक्तीप्रमाणें ९, ७, ५, ४ आणि २ दिवसांची लिहिण्यास सांगावी. ४–९ दिवसांची हळद साधारण वहिवाटींतील आणि सोइस्कर आहे; आणि कार्यही चांगल्या प्रकारें होतें.

---


विनाशनार्थं अलक्ष्मी विनाशनार्थं दशविधि लक्ष्मीफल प्राप्त्यर्थं कायिकवाचिक भानसिक सांसर्गिक चतुर्विध पापक्षयार्थं धमार्थ काम मोक्षार्थं विवाहोत्सर्ग कर्म प्रारंभ निमित्तं मंडपाधिष्ठा त्रिदेवतानां क्षाता देवता त्रिदेवतानां पूजनाद्यर्चनमहं करिष्ये ॥

वरास व वधूस हळद लावण्यापूर्वी विघ्नहर्ता श्रीगणपतीस अक्षत देण्याची कांहीं घरीं वहिवाट आहे.

**सुमुहूर्त**—( बाण बसविणें ) वर व वधूस हळद लावण्याच्या दिवशीं आपल्या आप्तइष्ट स्त्रियांस अगर शक्ति असल्यास चौधऱ्याचे मार्फत जातींतील सर्व स्त्रियांस हळद कुंकवाचें ( घुगऱ्याचें ) आमंत्रण द्यावें. घराच्या दरवाजाच्या उजव्या बाजूचे भिंतीस असलेल्या खोलीची भिंत पांढऱ्या मातीनें सारवून त्यावर कुंकुवानें सातया ( स्वस्तिक ) काढावें. या सातयास घरचे वडील माणसानें चार वेळां अक्षता टाकून नमस्कार करावा. प्रथम वधूस व नंतर वरास हळद लावावी.

न्हावी मंडपांत गाईचे शेणानें सारवून रांगोळी काढून त्यावर लांकडाचा चौरंग अथवा पाट व त्याचे उजवे बाजूस दुसरा एक चौरंग किंवा पाट ठेवतो. नंतर सुवासिनी कुंभारिणीनें आणलेले मातीचे रंगीत कळस व कुंडी व घरांतून दोन मुसळें आणून सव्वापात्र मूग व तितकेच सातू हे दोन्ही नवीन सुपांत घालून समोर ठेवतात. एका ताटांत हळदकुंकू, तांबडें गंध, तांदुळाच्या अक्षता, गूळ, धणे, कच्च्या धाग्याची गुंडी, लेंकुरवाळीं हळकुंडें पांच आणि दीप ठेवतात. आणि सुवासिनीनें आणलेलें पाण्याचें गंगाळही त्याचप्रमाणें ठेवतात. ही सर्व तयारी न्हावी किंवा सुवासिनी न्हावीण करिते. तीं नसल्यास कुटुंबांतील माणसांनीं करण्याचा प्रघात आहे. उपाध्याय आणि बोलविलेल्या स्त्रिया आल्यानंतर वाजंत्री वाजवितात आणि स्त्रिया गीत गातात.

वर अथवा वधू यांच्या हातांत विडा व श्रीफळ देऊन प्रथमतः कुलदेवतेस नमस्कार करवितात. पुन्हा विडा सुपारी देऊन वडील आप्तइष्टांस नमस्कार केल्यानंतर कुलदेवतेचें स्मरण करीत मंडपांत मांडलेल्या चौरंगावर प्रथम उजवा पाय ठेऊन पूर्वाभिमुख बसवितात. उजवे बाजूचे चौरंगावर लग्न न झालेला लहान भाऊ, भाचा, किंवा इतर आप्ताचा मुलगा **विनायक** ( गणपति ) समजून बसवितात. कदाचित् कोणींच नसल्यास सुपारी



नंबर ६. रतलाम व नीमच (मध्याहिंदुस्थान) येथील आमचे ज्ञातबंधु.



नंबर ७. बडनगर (मध्याहिंदुस्थान) येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

मांडतात. सुवासिनी बहीण, भाची किंवा आप्तांपैकीं निरनिराळ्या स्त्रिया ज्यांचीं नांवें लग्नपत्रिकेंत लिहिलेलीं असतील अशा पांच सुवासिनी किंवा त्यांपैकीं दोन, तीन आणि बाकी इतर सुवासिनींस उपाध्याय हळदीकुंकू देऊन त्यांच्या उजव्या हाताचे मनगटास पिंवळें केलेलें सूत बांधितो. त्याचप्रमाणें कळस, सुपडी आणि मुसळासही पिंवळें सूत बांधितो. असें करीत असतां उपाध्याय मंत्र ह्मणत असतो. ज्या स्त्रियांचे हातास सूत बांधिलेलें असतें त्यांपैकीं दोघीजणी वर अथवा वधू यांचे समोर बसून आपल्या दोन हातांचीं बोटें एकमेकांत अडकवून पशाप्रमाणें करून त्या एकत्र चार हातांनीं ( लक्ष्मी हस्तांनीं ) एकमेकीच्या सुपांत धान्य टाकतात; नंतर दोघी दोन धान्याचीं सुपें हातांत घेऊन आवाज न होईल अशा रीतीनें पांच वेळ थोडथोडें धान्य एकमेकीच्या सुपांत टाकतात. नंतर तें मिश्र धान्य त्याचप्रमाणें आवाज न होतां मातीच्या कुंडीमध्यें टाकून दोघींनीं सूत बांधलेलीं दोन मुसळें घेऊन उभ्या राहून हेरफेरानें पांच वेळां मुसळास मुसळ न लागतां व कुंडीस इजा न होतां हलके हातानें कण्डन करितात.

उपाध्याय मंत्र म्हणत प्रथम विनायकाचे कपाळास कुंकुवाचें गंध आणि अक्षता लावून नंतर वर किंवा वधूच्या कपाळास लावतो. सूत बांधलेल्या सुवासिनी प्रथम विनायकाचे अंगास थोडी हळद लावून थंड पाण्यानें स्नान घालतात; नंतर वर किंवा वधूस त्याचप्रमाणें देशाचाराप्रमाणें स्नान घालतात आणि लागलेंच आंग पुसून वस्त्र नेसवितात. नंतर सुवासिन बहीण किंवा भाची वगैरे प्रथम विनायकास कुंकुवाचें गंध, अक्षता लावून नंतर वर अथवा वधूस लावितात. राखेचे चार गोळे ओंवाळून चारी दिशेस फेंकतात, आणि ताटांत दिवा असतो त्यानें आरति करितात. त्या आरतीच्या ताटांत शक्तीप्रमाणें पैसे जें टाकणें असेल तें टाकतात. मिठानें दृष्ट काढल्यानंतर ज्या खोलींत सातया काढल्या असतील तेथें देवपीठासमोर पाट मांडून त्यावर रजई आंथरून वर किंवा वधूस नमस्कार करण्यास सांगतात; नंतर मिष्टान्न सेवन करवून सुताचे लग्नदृष्टीकंकण उजवे हाताचे मनगटास बांधून कपाळावर कुंकुवाचा मळवट

भरून अक्षता लावितात. त्यावर सुवासिनी बेगडाची किंवा खोट्या मोत्यांची वगैरे मुंडावळ बांधतात. शक्य असल्यास फुलांची मुंडावळ, गळ्यांत हार, बाहूंस बाजूबंद, मनगटांत गजरे वगैरे घालावे; आणि तो क्रम लग्नविधी आटपेपर्यंत चालू ठेवावा.

कित्येक ठिकाणीं जमलेल्या स्त्रियांस प्रत्येकीं पांच, सात किंवा नऊ पर्यंत खारका वाटतात अथवा आदल्या दिवशीं रात्रीं पाण्यांत हरभरे भिजत घालून ते भिजाणे चौधऱ्याची सुवासिनी स्त्री किंवा आप्तांपैकीं वडील सुवासिनी-कडून प्रत्येकीस हळदीकुंकुं लाववून दोन किंवा चार ओंजळी वाटण्याची वहिवाट आहे.

नवऱ्या मुलाजवळ कट्यार आणि नवरी मुलीजवळ तीर, निदान चाकू हीं शस्त्रें सदोदित असावीं; कारण हें क्षत्रिय धर्माचें द्योतक आहे.

ज्या ठिकाणीं सातया काढलेल्या असतील त्या ठिकाणींच पाटावर कुटुं-बांतील वडिलाच्या हस्तें उपाध्याय ( पंड्या ) लहान गणेश व नवग्रहांची स्थापना करवितो. कुलाच्याराप्रमाणें बाजरी व गव्हांचा भरडा गूळ तूप घालून उकडून त्याचे लाडू कुलाचाराप्रमाणें जितके करावयाचे तितके करून त्याचा नैवेद्य देवपीठाचे चारी बाजूंस ठेवितात. नवरा मुलगा किंवा मुलीचे हातांत सातया काढलेलें श्रीफळ देऊन देवापुढें ठेववितात.

गीत गाणाऱ्या आणि आप्तइष्ट बायकांस आमंत्रण करण्याची चाल आहे. ज्या स्त्रिया सकाळ संध्याकाळीं येऊन प्रसंगोचित गीत म्हणतात त्या प्रत्येकीस दरवेळेस पांच ते सात खारका देतात.

## बिनोरा, फुलेका ( गडगनेर ).

हळद लागल्या दिवसापासून तेल चढेपर्यंत लग्न करणाराचे संबंधी म्हणजे ज्यांचें व्याही जांवयाचें नातें असेल त्यांनीं नवरा मुलगा किंवा मुलगीस आप्तांसह बोलावून घेऊन जावें. जो गडगनेर करितो तो आपले आप्तमंडळी-सही जेवणाचें आमंत्रण देतो. अनुकूल असल्यास सर्व ज्ञातीस कोणी बोल-वितात. भोजनोत्तर नवरा मुलगा किंवा नवरी मुलीस सुवासिनीकडून कुंकु-वाचा मळवट भरून अक्षता लावून फुलाची मुंडावळ हार गजरे वगैरे घालितात.

नंतर घोड्यावर किंवा गाडींत विनायकासह बसवून वाद्यासह सर्व स्त्रिया पुरुष मिरवत नवऱ्या मुलास किंवा नवरी मुलीस घरीं पोंचवितात. त्यावेळीं गडगनेर करणाराकडील एक सुवासीन एका ताटांत मिठाई, केळीं, पानसुपारी व दीप बरोबर घेते आणि सर्व स्त्रिया गीत गात जातात. नवरा मुलगा किंवा मुलगी आपल्या दरवाज्याजवळ आलीं म्हणजे त्याचे मस्तकावर छत्र किंवा चांदवा धरितात. व त्यांस आई किंवा इतर आप्त, राख किंवा भाताचे चार उंडे घेऊन त्यांजवरून ओंवाळून चार दिशेस फेंकून देतात; त्यांजकडून देवास नमस्कार करवितात. पुरुष मंडळीस पानसुपारी आणि स्त्रियांस पांच पासून सातपर्यंत खारका किंवा हरबऱ्याचे भिजाणे देतात. ताट घेऊन येणाऱ्या बाईच्या ताटांत धान्य व एक रुपयापासून अधिक जें टाकणें असेल तें टाकतात. असा पहिल्या दिवसाचा व रात्रीचा समारंभ करतात.

**फुलें, मिठाई फळें वगैरे आणणें**—हळद लागल्यापासून लग्नाचे दिवसापर्यंत नवऱ्या मुलाची किंवा मुलीची वहीण, भाची आत्या मावशी वगैरे आप्त सुवासिनी एका ताटांत फुलांची मुंडावळ, हार वगैरे श्रीफळ, केळीं, किंवा इतर फळें अथवा बदाम, खडीसाखर, मिठाईचा पुडा, विडा, वेलदोडे, हळद कुंकुवासह आणतात. नवरा मुलगा अथवा मुलीस कुंकवाचा मळवट भरून, अक्षता लावून मुंडावळ बांधतात व हार गजरे वगैरे घालतात. नंतर घरच्या बायकांनीं तें ताट रिकामें करून त्यांत सवाशेर धान्य व पानाचा विडा घाढून परत देतात. फुलें आणणाऱ्या आप्तच असल्याकारणाने कधीं कधीं जेऊं घालतात. अशीं फुलें जितक्यांकडून येतील त्यांची नांवें पुढें अहेर देण्याकरितां टिपून ठेवितात.

**कडाकने करणें**—तेल चढविण्याचे दिवशीं नवरी मुलीची आई कुटुंबांतील आणि आप्त व शेजारी स्त्रियांस बोलावणें करिते. त्या आल्यावर गव्हांचा मैदा सव्वाशेर किंवा अधिक भिजवून त्याच्या पापड्या आकारानें लहान व पातळ गीत ह्मणत लाटून तळून काढितात. सुमारें सव्वाशेर तांदुळाचे भरड पिठाचे गूळ घाढून लहान लहान लाडू करितात. पापड्या

लाटणाऱ्या स्त्रियांस प्रत्येकी हळदकुंकू व विडा देऊन सात ते नऊ खारका देतात. कुंभाराकडून मातीचा मोठा माठ कळशीसह आणलेला असतो, त्या माठांत कडाकने व कळशींत लाडू भरून तयार ठेवतात. नवऱ्या मुलाचे आईस मुलगी सासरीं जातेवेळीं ही नवाळ ( भेट ) ह्मणून न्हावीण किंवा दुसऱ्या बरोबर पाठवितात. त्यास पहाडाचा माठही म्हणतात. त्याच माठामध्यें विनोदानें पिठाचे केलेले दोन पुतळेही ( व्याही व विहीण ) असतात. कितीएक ठिकाणीं गहूं, तूप, गुळाचा मलिदाही पाठविण्याची वहिवाट आहे.

**विनायक ( गणेश )**—हा एक आप्त लहान मुलगा असतो. विघ्न निवारण करणारा या समजुतीनें नवरा-नवरी बरोबर आरंभापासून शेवट लग्न संपेपर्यंत अज्ञान मुलाचे रूपानें विनायकाची स्थापना करितात; वधूवरांस जे लग्नाचे सोहळे करतात ते सर्व प्रथम विनायकास केले म्हणजे कार्य निर्विघ्नपणें पार पडतें म्हणून ही चाल आहे.

**अभ्यंग स्नान, तेल विधिः**—मंगलस्नानास लग्नपत्रिकेंत जो दिवस नेमला असेल त्या दिवशीं प्रथम दिवसाप्रमाणें आप्तस्त्रियांस अथवा सर्व ज्ञातींतील स्त्रियांस बोलावितात. त्यांस खारका किंवा भिजाणें वाटण्याची व्यवस्था करतात. ह्या दिवशीं हळदीमध्यें सुवासिक जिन्नस घालून गंधाप्रमाणें ( चिकसा ) तयार करितात. तो समवयस्क आणि मानकरणींनें एकमेकींस लावण्याचा प्रघात आहे. जातेवेळीं त्यांस हळदकुंकू व विडा देतात.

न्हावी किंवा घरची मंडळी जागा सारवून त्यावर रांगोळी काढून दोन चौरंग ठेवून नवरा किंवा नवरीस विनायकासह पूर्वाभिमुख बसवितात. प्रथम दिवशीं ज्या सुवासिनी स्त्रियांचे हातास सूत बांधिलेलें असतें त्यांनींच तयार केलेला हळदीचा सुगंधित चिकसा सर्वांगास लावून सुवासिक तेल ( अत्तर वग़ैरे ) चोळून उष्णोदकानें स्नान घालतात. त्या वेळीं नात्याचा उच्चार करून प्रसंगोचित गीत ह्मणतात व वाजंत्री वाद्यें वाजवितात. मंगल स्नान झाल्यावर वस्त्रें नेसवून आई, बहीण, किंवा इतर आप्त सुवासिनी कुंकुवाचा टिळा व अक्षता लावून, मिठानें दृष्ट काढून अनेक धान्याचीं

ह.९२८
८८३५६
इति.९०

केलेलीं मुटकीं ओंवाळून चारी दिशेस फेंकून देतात. आणि तुपाच्या दिव्यानें ओंवाळतात. त्या आरतींत शत्त्यनुसार जें टाकणें तें घरच्या यजमानानें टाकण्याची रीत आहे. आरती करणारी व इतर आप्त सुवासिनी वारे फेरे करून एक पैसा ओंवाळतात. ती ओंवाळणी न्हावी घेत असतो. नंतर नवरा किंवा नवरीस देवघरांत आणून देवासमोर बसवून तोंड गोड करून कुंकुवाचा मळवट भरून अक्षता लावितात. उपाध्याय लग्नकंकण[१] बांधतो. नंतर फुलांची मुंडावळ बांधून हार वगैरे घालितात. गीत ह्मणणाऱ्या व स्नान घालणाऱ्या स्त्रियांस खारका किंवा भिजाणे नियमापेक्षां दुप्पट देतात.

**चौरंग** अथवा **पाटावरून उठविण्याची रीत***—मंगलस्नान झाल्यावर पाटावरून उठवितांना "जलदी आयीये लाडका दादा" लग्न होणाराचें नांव घेऊन "पाट परसे उटो समजे दादा देऊंगा घोडा." इतक्यांत बाप येऊन देणें असेल तें देतो अथवा कौतुकानें ह्मणतो कीं, तुझें लग्न करून देतों. त्याचप्रमाणें काका, मामा, आत्या, वगैरे जे देण्यासारखे असतील त्यांच्या नात्याचें नांव घेऊन गीतानें सुचवितात. शक्तीप्रमाणें जें देणें तें मुलाच्या किंवा मुलीच्या हातांत देतांत. नंतर पाटावरून उठवून देवघरांत नेतात.

**गणपतिस्थापना**—पहिल्या दिवशीं ज्या भिंतीवर साते ( स्वस्ति चिन्ह ) काढिले असतील त्याच भिंतीवर सायंकाळचे वेळीं कुंकुवांत सुगंधी तेल मिश्र करून त्यानें किंवा गेरूनें गणपतीचें चित्र काढतात. ( अलीकडे कागदावर काढलेलें चित्र चिकटवून काम चालू करितात. ) प्रथम दिवशीं घरच्या ज्या वडील मनुष्यानें पूजन केलें असेल त्यानेंच चार किंवा पांच पापड्या एकावर एक रचून त्यावर गुलगुले ठेवून सांप्रदायाप्रणें देवाच्या पाटाच्या चारी बाजूंस खंड म्हणजे खूट म्हणून ठेवावे. कोणी बाजरीचा

---

१. काकण डोरले—कच्चे पिवळे सुताची एकवीस पदरांची दोरी करून त्यांत कवडी, नचकी, लाख व लोखंड यांच्या बारीक आंगठ्या ओवून त्या वराच्या व वधूच्या उजव्या पायांत बांधतात.

* ही चाल सर्वत्र दिसून येत नाहीं.

भरडा व गूळ शिजवून त्याचे लाडू किंवा मुटके करून ठेवतात. कोणी गुळपापडीचे तुकडे ठेवतात. असे निरनिराळ्या प्रकारानें देशाचारा आणि कुलाचाराप्रमाणें करण्याची चाल आहे.

**गीत**––वधुवरांकडे मुहूर्तारंभ झाल्यापासून शेवट लग्न होईपर्यंत प्रसंगानुसार गीत म्हणण्यांत कुशल अशा स्त्रियांस बोलावण्याची वहिवाट आहे. त्या नियमित प्रसंगीं येऊन स्तुति व विनोदपर गीत म्हणतात. त्यांस खारका किंवा गूळ देण्याची चाल आहे.

**मंगल तोरणः**—हें आंब्याच्या पानाचें, बेगडाचें किंवा भरजरीचें अशीं अनेक प्रकारचीं यजमानाच्या हौशेप्रमाणें किंवा अनुकूलतेप्रमाणें न्हावी अथवा आप्तनें लग्न घराचे दरवाज्यावर बांधावें. त्यास नियमित मोल किंवा वस्त्र मोबदला देण्याची वहिवाट आहे.

**वई, चवरी, चाक, माती वगैरेची पद्धत**—वर किंवा वधू यांचे आप्तस्त्रियांस आमंत्रण करावें. एका बुरडी खळींत किंवा दुरडींत नारळ, भिजाणे, मूठभर खारका, गुलगुले ( पुवा ), विडा, पैसा, ठेवून एका कुमारिकेचे डोकीवर देतात. एका ताटांत उकिरडा पूजनाचे वेळची पोटली, दिवा, गूळ, हळदकुंकू, विड्याचीं पानें, सुपारी पैसा असें ठेवून आणि पाण्याचा तांब्या एका सुवासिनीनें घेऊन आप्तस्त्रियांसह वाजत गाजत गीत म्हणत कुंभाराचे येथें जाऊन दुरडींतील सामान त्याचे स्वाधीन करून मातीचा ढीग ज्या ठिकाणीं असेल तेथें त्यावर बरोबर आणलेली पोटली ठेवून पूजा करून अक्षता टाकून नमस्कार करितात. नंतर दोन सुवासिनी समोरासमोर बसवून हाताचे पंजे एकत्र करून चार हस्तांनीं ( लक्ष्मी हस्तें ) चार पसे माती दुरडींत पोटलीसुद्धां भरतात व ती दुरडी कुमारिकेच्या डोकीवर ठेवतात.

लग्नानिमित्त तयार केलेली मातीची ( माट ) वई, डेरे दोन किंवा चार व त्यावर कळशा अधिक लागत असल्यास तितकीं अधिक मातीचीं भांडीं घेऊन सुवासिनीचे डोक्यावर ठेवतात.

**कुंभाराचें चाक***—या चाकावर कुंकुवानें सातिया काढून हळदकुंकूं व अक्षता वाहून गूळ व गुलगुल्याचा नैवेद्य दाखवून नमस्कार करितात. नंतर कुंभाराचा निरोप घेऊन वाजतगाजत, गीत म्हणत सर्व स्त्रिया परततात. ती मंडळी मंडपाच्या दरवाज्याजवळ उभी राहिली म्हणजे यजमानीण माठ आणणारी बाई व कुमारिकेस हळदकुंकूं देऊन प्रथम कुमारिकेची दुरडी उतरून घेते. त्या सुवासिनींचे नवरे तेथें असले तर त्यांनीं त्यांच्यावरून चवरी ( वई ) उतरून ज्या ठिकाणीं देवपीठ मांडलेलें असेल त्या ठिकाणीं आणलेले माठ दोन्ही बाजूंस उतरंडीप्रमाणें मांडून ठेवतात.

**ग्रहशान्ति**† व **वृद्धी** किंवा **नान्दीश्राद्ध.**—वर आणि वधू यांच्या वडिलांनीं शास्त्रोक्त ग्रहशान्ति करण्याची रीत आहे व लग्नांतील व ग्रहशान्तीचे होमास लागणारी मृत्तिका जी कुमारिकेनें आणलेली असते तिचा उपयोग करितात. सांप्रदायाप्रमाणें गोत्रीक कलश भरण्याची वहिवाट आहे.

सूचना—एकाच तिथीला किंवा अंतरानें एकाच मंडपांत दोन कन्यांचीं लग्नें करण्यास हरकत नाहीं; परंतु दोन मंगलस्तंभ ( रणस्तंभ ) आणि चवऱ्या देवतांची स्थापना निरनिराळी असावी.

एकाच वेळीं दोन भावंडांचीं लग्नें असल्यास, कुलाचार, माया वगैरे एकच करण्याची वहिवाट आहे. अंतरानें असल्यास मात्र निरनिराळे केले जातात.

**श्री माया** किंवा **मातृका स्थापनाची रीत.**—"**गृह निर्गम वामांगे गृहं वै पूर्व दक्षिणे**" हा कुलाचार प्रत्येकाकडे पूजन व स्थापन निरनिराळ्या पद्धतीनें करितात. त्यांत हल्लीं प्रचारांत दोन रीती आहेत:—

---

* हें चाक पृथ्वीच्या आकाराप्रमाणें गोलाकार असल्यामुळें त्याचें पूजन म्हणजे पृथ्वीचें पूजन असें मानतात. राजपुतान्यांत कांहीं क्षत्रिय राजघराण्यांत चाक पुजण्याची वहिवाट आहे.

† वृद्धी किंवा नान्दीश्राद्ध हें श्रेष्ठ वर्णांच्या हिंदुजातींत करतात; कारण हें श्राद्ध केलें म्हणजे विवाहासारखें शुभ कार्य करणारा श्राद्धकर्ता, त्याची स्त्री आणि लग्न होणारा यांस सूतक लागत नसून सुखावह होतें. हें कर्म जे दिवशीं गणपतिस्थापना होते त्याचे आदले दिवशीं करितात. तें करावें हा उत्तम मार्ग आहे.

१ ली—घरांत ज्या ठिकाणीं गणपती स्थापन केला असेल, त्याजवळील भिंतीवर पाण्यांत कुंकुं कालवून शंखाकार प्रथम एक, त्याखालीं दोन, नंतर तीन, मग चार असे सातपर्यंत वाढते प्रमाणानें काढतात. शेवटच्या ओळीचे सातव्या टिपक्यावर वसुधारेप्रमाणें तुपाचा ओघळ सोडतात; त्यास मातृकास्थापन असें म्हणतात.

२ री—कुंभाराकडील दिवली किंवा पंत्या दोन घेऊन त्यांत मूग, चिकसा, पैसा, सुपारी, हळकुंड ठेवून किनाऱ्यास गव्हांचें पीठ लावून गणपती मांडला असेल, त्या भिंतीस चिकटवितात, त्यास माया म्हणतात.

कुंभाराकडून माठ आणून जे बाजूला ठेवलेले असतात, त्यास आणि गोत्रज कळसास कच्च्या सुतानें बांधतात. नंतर जो कांहीं कुलाचार असेल तो मुलामुलींचे बाप, भाऊ व चुलते यांनीं पाटावर करण्याची चाल आहे. हें क्षात्रधर्माचें दर्शक आहे.

**अहेर ( पेहरावणी )**—ज्या दिवशीं लग्नानिमित्त प्रयोजनाचा (मांडवाचा) समारंभ असेल, त्या दिवशीं वर आणि वधु यांच्या आईनीं अथवा भावजईनीं आपापल्या माहेरीं ताटांत कुंकुवाचें गंध, अक्षता, गुळाचा खडा, व दिवा ठेवून बरोबर आप्त स्त्रिया घेऊन वाजत गाजत गीत म्हणत जावें आणि बाप, भाऊ, चुलता, वगैरे आप्तांस गंधाक्षता लावून आमंत्रण ( नौता ) करतात, व त्यानिमित्त अक्षता, सुपारी आणि एक रुपया देतात; तो रुपया खोटा समजून लागलाच तिला परत देतात. लग्न होणाऱ्या घरच्या सुनांनीं आपल्या आईबाप व आप्त यांचे घरीं जाऊन याच रीतीनें आमंत्रण करण्याची चाल आहे. ज्या व्याह्याकडून अहेर येण्याचा विशेष संभव आहे त्याच्या घरीं आमंत्रणास जाण्याची जरी वहिवाट आहे तरी ज्या व्याह्यांनीं व आप्तांनीं अहेर ( पेहेरावणी ) शक्तीप्रमाणें करण्याचा धर्म आहे, त्यांनीं मांडवाचे दारीं व्याही, विहीण, जांवई, मुलगी, दीर, जाऊ, नणंद वगैरे आप्तांस अहेर करण्याची रीत आहे. ज्या परातींत किंवा ताटांत अहेर आणला असेल, त्यांत जें जेवणास अन्न तयार केलें असेल तें वाढून किंवा धान्य देऊन अहेर घेऊन येणारे मंडळीस जेऊं घालण्याची वहिवाट आहे.



नंबर ८ धुळें व जळगांव ( पूर्व व पश्चिम खानदेश ) कडील आमचे ज्ञातबंधु.
या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

मुलामुलींचे लग्नानिमित्त प्रयोजन ( मांडव ) ज्या दिवशीं असेल त्या दिवशीं इष्ट आप्त स्त्रीपुरुषांचा जमाव असतो म्हणून ज्या आप्तांनीं बिनोरा ( गडगनेर ) केला असेल त्यांस त्या मानानें किंवा शक्त्यानुसार जो परत अहेर करण्याचा असेल तो करावा; अहेर द्रव्य अगर दागिन्याच्या रूपानें केल्यास बरा. त्याच प्रमाणें मुलामुलीस फुलांचे हाराचीं ताटें आलीं असतील ( त्यांची यादि अलाहिदा असतेच. ) त्यांना शक्तनुसार अहेर करण्याची वहिवाट आहे.

अहेराचे समयीं सरपंच, पंच, उपाध्याय, भाट, न्हावी वगैरे मंडळी असतातच.

**मजलसी नौता ( जातींतील सर्व मंडळीस )** लग्नानिमित्तानें प्रयोजन ज्याच्या त्याच्या मर्जीप्रमाणें व अनुकूलतेप्रमाणें करावें. ज्याला आप्तइष्ट मंडळीस किंवा ज्ञातीस जेवण देण्याची इच्छा असेल त्यानें आदले दिवशीं सरपंचांकडे जाऊन नौत्याचें आमंत्रण फिरविण्याविषयीं विनंति करावी. ती लागलीच मान्य होते. बोलावणें न्हाव्याचे मार्फत फिरलें जातें. सरपंच, पंच, आप्तइष्ट, समाज मंडळी, पुरोहित, भाट, न्हावी वगैरै मंडळी रात्रौ लग्नघरीं येतात. जेवण देणाराची हौस असल्यास मंडळीच्या कर्मणूकीकरितां वाजंत्री, फोनोग्राफ, बैठक, गवई अथवा कलावंतीण* वगैरेंची व्यवस्था करितात. प्रसंगीं कोणी विनंति किंवा अर्ज करण्यास आले असल्यास व त्याचा निकाल लावण्यास योग्य सवड असल्यास घरवाल्याचे आणि मंडळीचे इच्छेनुरूप व्यवस्था केली जाते व घरवाल्यानें फुलांचे गोटे किंवा गजरे, अत्तर, गुलाब, पानसुपारी, व विड्याचें ताट हें पंचांमध्यें ठेवावें व त्रिछाइतीचे शेवटीं हात जोडून उभें राहून मंडळीनें तसदी घेतल्याचे आभार मानून आपली इच्छा आणि शक्तीप्रमाणें पगडीबंद किंवा सुगैरा आमंत्रण अमक्या वेळेचें फिरविण्याबद्दल विनयपूर्वक विनंती करावी. मंडळीनें ती विनंति मान्य केल्यावर

---

* हा खर्च विद्यादानाकडे केलेला बरा.

१ गांवांतील स्वज्ञातीच्या पुरुष मंडळीस पाहुण्यांसह जेवणाचें आमंत्रण केलें जातें.

२ गांवांतील स्वज्ञातीच्या स्त्रीपुरुषमंडळीस जेवणाचें आमंत्रण दिलें जातें.

सरपंच न्हाव्यांस हुकूम देतो. नंतर पानविडा वगैरे वाटल्यावर मंडळी घरवाल्याचा प्रेमपुरःसर निरोप घेऊन आपापले घरीं जाते.

**जाग्रणः**—पुरुषमंडळीचे नौते ( बैठक ) आटपले म्हणजे आप्त बायामंडळी गीत म्हणतात. घरवाली बाई देवपीठाचे देवतांस हळदकुंकुं आणि मेंदी समर्पण करून नवरामुलगा व नवरीमुलगी यांचे हातापायांचे बोटांस मेंदी लावून मग घरांतील सुना, बहिणी, भाच्या व गाणाऱ्या बायामंडळीस मेंदी लावण्यास देत असते; त्या आपल्या खुशीनें लावून घेतात. नंतर पानसुपारी व रीतीप्रमाणें खारका वांटल्या जातात; यास रात्रजाग्रण (रातजागा) म्हणतात. कोणाचा कुलाचार असल्यास तोंही उरकून घेतात.

**रुखवत ( कासा )**—लग्नाचें जेवण प्रथम नवऱ्या मुलाकडे होतें आणि दुसरे दिवशीं नवरी मुलीकडे करतात. ज्या दिवशीं नवऱ्या मुलाकडे जेवण असेल, त्या दिवशीं नवरी मुलीकडे केलेलें अन्न व पक्कान्नें अनुकूलता व वहिवाटीप्रमाणें दोन पासून पांचपर्यंत पराती भरून पाठवितात. त्या पराती पोंचविण्यास वराकडील स्त्रिया गीत म्हणत व वाजत गाजत नवरी मुलीचे मांडवांत जाण्याची रीत आहे. बरोबर गुलाल, पानसुपारी व विहिणीचा विडा घेऊन जातात. नवरी मुलीकडील आप्त स्त्रिया तेथें असतातच. त्या वेळीं प्रथम रुखवत घेऊन आलेल्या पक्षाकडील स्त्रिया मंगल आणि नंतर विनोदपर गीत म्हणतात. त्याचप्रमाणें नवरीकडीलही गीत संपल्यावर एकमेकींचे डोक्यावर गुलाल टाकून विहिणीचा विडा विहिणीस देऊन व पानसुपारी वांटून परत जातात. जें रुखवत आलें असेल, त्यांतून नवरी मुलीस आणि आलेल्या आप्त इष्ट स्त्रियांस जेऊं घालतात. समयानुसार व्याही वगैरे आप्तइष्टांचे घरीं थोडथोडें वांटण्याची वहिवाट आहे. याप्रमाणें नवऱ्या मुलाकडील व्यवस्था झाली. त्याप्रमाणेंच नवरी मुलीकडील जेवणाचे दिवशीं करण्याची रीत आहे. अशा वेळीं मर्जीनुरूप इतर व्याही मंडळीकडे ताटांतून रुखवत आप्तांबरोबर अगर चाकरांबरोबर पाठविण्याची वहिवाट आहे.

**प्रयोजन अथवा भोजनसमारंभः**— नियमित मंडळीस प्रयोजन देण्याचें असल्यास त्याची सर्व व्यवस्था आप्त, इष्ट, व्याही मंडळीनें ठेवावी.

ज्ञातिभोजन देणें असल्यास सरपंच, पंच, इष्ट, आप्त यांनीं बातबेत कसा आहे, मंडळीस बसण्याची सोय कशी आहे, वगैरे पाहून कांहीं न्यूनता दिसल्यास यजमानाच्या विचारानें तजवीज करावी. वाढणाऱ्या मंडळीची योजना करून पंक्तींत न्यूनता न पडेल अशी व्यवस्था ठेवावी. एकंदर लहानथोर मंडळीचे भोजनोत्तर यजमान, घरचे आप्त व वाढणारी मंडळी यांनीं भोजन करावें. न्हावी, भाट वगैरे जसे ज्याचे हक्क देणें असतील, तसे ते दिल्यावर आणि यजमानानें सर्वत्रांचे आभार मानल्यावर मंडळी घरोघर जाते.

**वराकडील वानोळा ( सावडा ) भेटः**—एका मोठ्या टोपल्यामध्यें मूग, गहूं, हरभऱ्याची डाळ, मीठ, गूळ, धणे, खारका, सुपारी इत्यादि जिन्नस सव्वाशेर किंवा सव्वापाव घेऊन कपड्यांत त्याच्या पोटल्या बांधून ठेवतात, आणि पांच करंडे, कुंकुं, हळद, टिकल्या, हिंगूळ व मेंदी भरून वहिवाटीप्रमाणें किंवा सहा आण्यांचे पैसेही ठेवतात, त्याच हाऱ्यांत ( टोपल्यांत ) मुलीचे आजीकरतां नानेर बेस ( लुगडें किंवा ओढणी, चोळी व फडका ) ठेवतात. याप्रमाणेंच नवरीमुलीचे कपडे साडी अथवा दंडिया, ओढणी, खह्लाचोळी किंवा पैठणी, मश्रूचा फडका, काचोळी, जोडा, मणिमंगलसूत्र, चांदीचीं जोडवीं व चांदीचे[1] क्षेत्रपाल व ब्रिजपाल, रेशमी चोटी व हातांतील पहुंच्या व विनायकाचा पोशाख, आणि नवरी मुलीच्या आप्तांच्या मुलांमुलीं-करितां आंगडेंटोपडें, लेंघें, ओढण्या, परकर, चिरड्यां ज्यांस धुंड ह्मणतात ( हीं अनुकूलतेप्रमाणें ५,७,९ ते १२ पर्यंत असतात.) हीं त्यांतच ठेवतात. खारीक, खोबरें व सुपारी, बेगड चिकटवून तयार केलेली जंव्हाळी(माणिकहार), फुलांचे हार गजरे, शेवरा,* थारोळी ( एका ताटांत खोबऱ्याच्या वाट्या

१ हे चांदीचे किंवा सोन्याचे पुतळी आकाराचे असून एकावर भैरव व दुसऱ्यावर श्रीकृष्णाचे ठसे उमटवलेले असतात.

२ वधूचे गळ्यांत घालण्याकरितां खारका, सुपाऱ्या, खोबरें वगैरेनें तयार केलेले हार.

*( १ ) रेशीम व मखमलीचे सुमारें ९×६ इंच असे बाशिंगाप्रमाणेंच असतो. एकावर जरीचा गणपती व दुसऱ्यावर सरस्वतीचें चित्र काढलेलें असतें. ही अलीकडील सुधारणा असावी. (२) प्राचीनकाळीं केवडा किंवा केतकीचे पानाचें बाशिंग करीत असत, आणि कित्येक ठिकाणीं अद्यापही करतात. (३) फार पुरातन वहिवाट— विड्याचे किंवा पिंपळाचे पानांचा उपयोग करीत असत.

साखर भरून, खडीसाखरेची पुडी व मेंदीची पुडी असते ) वगैरे ( देशाचाराप्रमाणें यांत फेरफार असतो ) सर्व त्या हाऱ्यांत (मोठ्या टोपलींत) ठेवून वरून वस्त्र गुंडाळून तयार ठेवण्याची रीत आहे.

**नवरी मुलीकडील मंडपाची तयारीः**—पूर्वसूचनेप्रमाणें सुतारानें पुढें वर्णिलेल्या वस्तू आणून दिल्यावर त्यांस गंधाक्षता वाहून सुतारास गंधाचा टिळा लावून त्याला नारळ, भिजाणे, किंवा सव्वापाव खारका, शिधा आणि दाहा आण्यांपासून सव्वा रुपयापर्यंत देतात. लग्नासारख्या मंगलकार्यांत आंब्यांच्या किंवा वडाच्या झाडाचा उपयोग करितात. **चिडखणी** सुमारें पंधरा अंगुळें लांब सव्वातीन अंगुळें रुंद लांकडाचे दोन पट्ट्यांस पांच छिद्रें पाडून सुमारें पंधरा अंगुळांच्या कळकाच्या सळया बसवून लांकडांच्या त्या सळयांवर बसविण्याकरितां चिमण्या त्यांस हळदीचा पिवळा रंग किंवा गेरूचा रंग देऊन नवरी मुलीचे मण्डपद्वारावर बांधतात. जूं, रवी, मुसळ, किंवा बडगा, सळई, चौरंग, पाटले वगैरे मण्डपप्रवेश आणि लग्नाच्या वेळीं लागतात. सुमारें सात विती उंचीचा मांगलिक स्तंभ आंब्याचे लांकडाचा असून मध्यभागीं त्यास दिवठाण ( दिवा ठेवण्याची जागा ) असतें. त्या खांबावर स्वस्तिकाकार पूर्वपश्चिम व दक्षिणोत्तर अशा पंधरा अंगुळें लांबीच्या व २ अंगुळें रुंदीच्या दोन लांकडाच्या पट्ट्या बसवून त्यांच्या टोंकांवर वीतभर उंचीच्या चार लांकडाच्या खुंट्या उभ्या बसवितात. त्यास हळदीचा पिवळा किंवा गेरू ( काव ) चा रंग देतात. बाप किंवा मुलीचें लग्न करणारा आप्त ज्यानें मण्डपस्तंभ स्थापन केला असेल त्याच्याच हस्तें लग्नाचे दिवशीं मांगलिक स्तंभाची ( तोरण किंवा रणखांब ) विधियुक्त स्थापना करवितात. त्या वेळीं उपाध्याय किंवा जोशी असतो. मण्डपाचे मध्यभागीं एक वीत खोलीचा खळगा करून एका मातीच्या बोळक्यांत दहीं, दूध, सुपारी, हळकुंड, पळस व पिंपळाचें पान, मुरुडशेंग आणि एक पैसा टाकून तो त्या खळग्यांत ठेवून त्याचे तोंडांत मांगलिक स्तंभाचें बूड ठेवतात आणि तो खळगा मातीनें बुजवून त्याला ठोकून बळकटी आणतात. मांगलिक स्तंभाचे स्वस्तिकांत मावेल अशा एका बुरडी टोपलींत आंब्याचीं पानें आणि दुर्वा थोड्याशा टाकून कुंभारानें आणून

दिलेल्या कुंभांत हळकुंड, सुपारी, पैसा, विडयाचीं पानें टाकून तो कुंभ कळसासह त्या टोपलीमध्यें ठेवतात. नंतर सव्वा हात रुंदीचें कोरें वस्त्र हळदीनें पिवळें करून त्यानें कळस झांकून, सुताची दोरी गुंडाळून, ती टोपली मंगलस्तंभाच्या खुंट्याचे आंत ठेवतात. मातीच्या आठ कोऱ्या पंत्या घेऊन त्यांस मध्यें भोंक पाडून, दोन वीत लांबीचे चार सुताळीचे तुकडे शेवटास गांठ मारून प्रत्येकांत एक सवाशी व दुसरी उपडी अशा दोन पंत्या ओंवून मंगलस्तंभाच्या वरील खुंटयांस लोंबत्या बांधितात. सवाशी पंतींत हळद, मूग, चिकसा, पैसा सुपारी वगैरे ठेवतात. नंतर मंगलस्तंभास चारी बाजूनें सुतळीनें ताण देऊन तो बांधतात. त्या स्तंभाची पूजा करते वेळीं पागोटयाचा पदर मोकळा करितात. नंतर नमस्कार करते वेळीं उपाध्याय "**स्वस्ति न इंद्रो०**" हा मंत्र म्हटल्यावर यजमानास गंधाक्षता लावून "**आयुद्रोण सुते श्रयमिति**" याप्रमाणें आशीर्वाद देतो. उपाध्यायास रीतीप्रमाणें दक्षिणा देतात.

**वरप्रयाण ( नकाशा )**:--वरप्रयाणाच्या वेळेस सरपंचाचे मार्फतीनें बोलावणें करावें. तें न्हाव्याच्या मार्फत केलें जातें. नवऱ्या-मुलाचे घरीं मंडळी जमण्यास प्रारंभ होण्यापूर्वी गुरुदीक्षा घेऊन ब्राह्मणाकडून जानवें घालावें लागते. तें या समयीं घालतात किंवा लग्नसमयीं घालतात.* नंतर रांगोळी काढून त्यावर पाण्यानें भरलेला कलश ठेवून रीतीप्रमाणें वराला मंत्र देणाऱ्या

---

* अशी एक दंतकथा आहे कीं, चितोडच्या वेढ्याच्या वेळीं रजपुतांची इतकी प्राणहानी झाली कीं, त्यांचीं जानवीं जेव्हां वजन केलीं, तेव्हां तीं ७४॥ मण भरलीं. त्या वेळेपासून कित्येक रजपुतांनीं जानवीं घालण्याचें वर्ज्य केलें. ( परंतु क्षात्रधर्मास अनुसरून लग्नप्रसंगीं घालण्याची वहिवाट आहे.) त्या दिवसापासून रजपुतांत, मारवाड्यांत व इतर कांहीं ज्ञातींत लखोटयावर आणि पत्राच्या वाजूला ७४॥ चा आंकडा लिहिण्याची वहिवाट पडली आहे. ही पडण्याचा हेतू असा आहे कीं, ज्याचा नांवाचा तो लखोटा असेल, त्यानेंच तो फोडावा आणि वाचावा; आणि इतर कोणी फोडील आणि वाचील तर त्यांस वरील रजपूतहत्येचें महा घोर पातक घडेल ! जसा ४२ कुळीचा आंकडा आहे त्याप्रमाणें हा ७४॥ चा आंकडा आहे.

गुरूस गंधाक्षता लावून यथाशक्ति दक्षिणा देतात. गुरुदक्षिणा दिल्यानंतर न्हाव्याची[१] अनुकूलतेप्रमाणें संभावना करून विनायकास व वरास चौरंगावर बसवितात.नंतर अभ्यंगस्नानाच्या वेळीं दहीं दूध लावून सुवासिनी मंगलस्नान घालतात. नंतर रंगाचें कोरें वस्त्र नेसवून पायजमा ( विझार ) घालून मग जरतारी किंवा जामदानीजामा व पागोटें घालून शेवरा बांधून कमरेस शेला बांधून व दुपेटा अंगावर घेऊन नवरा मुलगा तयार होतो. त्या वेळीं बहीण किंवा इतर निकटसंबंधी सुवासिनी गंधाक्षता लावून ओंवाळते, त्यावेळीं यथाशक्ति ओंवाळणी द्यावी लागते. मुलाचे मामानें आरती ओंवाळल्यानंतर हातांत तलवार देऊन व कमेरेला कट्यार बांधल्यावर चांदीची किंवा सोन्याची मुदी हाताचे बोटांत घालावी. त्याला हातीं धरून देवपीठाजवळ आणून बसवावें. त्यावेळीं उपाध्याय " **स्वस्ति न इंद्र** " हा मंत्र म्हणत असतो. तोंडांत साखर घालून कुलदैवतास नमस्कार करवावा. नंतर मुलाची आई आंचळ दूध देण्याचें निमित्त करते. वडील भावजय डोळ्यांत काजळ किंवा सुरमा घालते व गालबोट लावते. त्या वेळीं तिचे जे देण्याचे हक्क ते द्यावे लागतात. कारण ही एक दृष्टि काढण्याची रीत आहे, व भाताचे चार मुटके ओंवाळून चार दिशेस टाकून देतात. नंतर मुलगा कुलदेवतेचें स्मरण करून मातोश्रीची आज्ञा घेऊन मामा किंवा इतर आप्त त्यास हातीं धरून वरास घोड्यावर बसवितात. त्या वेळीं पुरोहीत " **सुमुहूर्त शुभलग्न, क्षेमकल्याणं आरोग्यं निर्विघ्नं कल्याणमस्तु** " हा मंत्र ह्मणून आशिर्वाद देतो. त्यावेळीं स्त्रिया * मूग,

---

१. लग्नास जाण्याचे दिवशीं न्हाव्याकडून नवरदेवाची कोर करण्याची वहिवाट कांहीं ठिकाणीं चालू आहे.

* कांहीं ठिकाणीं स्त्रिया क्वचित वराबरोबर गीत ह्मणत जातात. वराची लग्न न झालेली लहान बहीण किंवा आप्ताची कन्या लहान गड्डूंत मूग व मीठ टाकून वराचे पाठीमागें प्रसंगीं हौसेनें बसवितात. ती गड्डू वाजवीत असते. ज्या ठिकाणीं स्त्रिया वराबरोबर जात नाहींत, त्या ठिकाणीं त्या मागें " तुल्या " खेळतात. या खेळासंबंधी शास्त्राधार किंवा दंतकथा कोठेंही नाहीं. बहूतकरून हे कर्मणुकीकरितां खेळ असावेत. परंतु हे खेळ अप्रशस्त आहेत.

व चिकसा नवऱ्या मुलाचे आंगावर टाकतात. तसेंच घोड्यावर बसविण्यास (नकश्यास) आलेल्या मंडळीस पानसुपारी व स्त्रियांस* खारका वाटतात. नवरा मुलगा घोडयावर बसल्यावर क्षात्रधर्माप्रमाणें छत्र व अब्दागीर वर धरतात. वराचे आंगावर मूग वगैरे टाकल्यावर वाजत गाजत जातात. मेहुणा ( वराच्या बहिणीचा नवरा ) घोडा अडवितो त्या वेळीं शक्त्यनुसार त्याचा हक्क देतात. त्याचप्रमाणें भाट वगैरे मंडळीची रीतीप्रमाणें देणें तें देऊन संभावना करावी. लग्नाला नवरा मुलगा निघाल्यावर मार्गांत देवस्थान असेल त्या ठिकाणीं श्रीफळ द्यावें, व पूर्वसंस्काराप्रमाणें जो साबडा असतो, तो न्हावी किंवा चाकर बरोबर घेऊन निघतो. मुलाचा मामा किंवा इतर आप्त यांनीं झोळण्यांत विडा-सुपारी ठेवण्याची वहिवाट आहे. मुलाचे बापानें किंवा इतर आप्तानें मुली-करितां शक्तीप्रमाणें चांदीचे किंवा सोन्याचे दागीने बरोबर घ्यावेत.

**नवरी मुलीकडील तयारीः**—न्हावी किंवा घरचे मंडळीनें मंडपांत जागा सारवून त्यावर रांगोळी काढून तेथें दोन चौरंग किंवा पाट ठेवून वराकडे ज्याप्रमाणें गुरु केलेला असतो, त्याच प्रमाणें नवरीमुलीस केल्या-नंतर नवरी मुलगी व विनायक यांस चौरंगावर बसवितात. व प्रथम दिवशीं ज्या सुवासिनी असतील, त्यांचेच हस्तें तूप, दूध वगैरे लावून उष्णोदकानें स्नान घाळून मामाकडून कावड (पातळ) व तांबडी चोळी ( खल्लाचोळी ) हीं

---

* पूर्वीं क्षत्रियांच्या मुलींचे पण लावून, किंवा स्वयंवरानें विवाह होत असत अथवा लढाया करून त्यांचें हरण केल्यावर लग्न लावीत असत. ह्मणून वराकडील स्त्रिया नवऱ्या मुलाबरोबर किंवा नवरीचे मांडवांत जात नसाव्या. परंतु तो काळ हल्लीं नाहीं.

जन्मदाती माता, सख्या बहिणी, भावजया, चुलत्या, आत्या, मामी, वगैरे आप्त स्त्रियांच्या अक्षता आपल्या जिव्हाळ्यावर पडूं नयेत, हें शास्त्रसंमत नसून धर्मविरुद्ध आहे. ज्या अर्थीं नवऱ्याची आई अथवा दुसऱ्या सौभाग्यवती आप्त स्त्रिया यांच्या हस्तें मंगलसूत्र नवरी मुलीस बांधावें असा धर्म आहे, व हें शास्त्रसंमत आहे, त्या अर्थीं आई जरी वराबरोबर न गेली तरी मागाहून नवरीचे मांडवांत जाणें इष्ट आहे, व अक्षता टाकण्यास कांहीं हरकत नाहीं.

१ नेसण्यासारखें कोरें मांजरपाटाचें कापड, हळदीचे रंगानें पदर व किनारी पिंवळें केलेलें, किंवा किनार असलेलें अथवा रेशमी किनारीचें पांढरें पातळ.

नेसवून नवरी मुलीची सुवासिनीनें अगर भावजय किंवा आप्तबाईनें कुंकवाचा टिका अक्षता डोळ्यांत काजळ लावून, ताटांत दिवा घेऊन आर्ती ओंवाळणी केल्यावर त्या आर्तींत जें कांहीं टाकणें तें टाकून, नंतर नवरी मुलीचे आईनें कुरवाळणें व वारेफिरे करून भाताच्या पिंड्या ( मुटके ) चार दिशेस ओंवाळूत फेंकून दिल्यावर आप्तेष्ट स्त्रियांनीं वारेफेरे करून ती ओंवाळणी न्हाविणीस दिली जाते. आईबापाकडील जे कांहीं दागिने असतील ते काढून घेतले जातात. नंतर मुलीचे मामानें मुलीचे हातांत चांदीची किंवा सोन्याची आंगठी घाल्रून देवाजवळ बसविल्यावर रीतीप्रमाणें तोंडांत गोड ग्रास (साखर) देतात. या वेळीं पुरोहित समयोचित मंत्र म्हणत असतो. नंतर लग्नास पुढें लागणारें साहित्य व तयारी घरचे मंडळींकडून करून घेतली जाते.

नवरी मुलीकडील जेवणावळीची व्यवस्था आप्त, इष्ट व सरपंच मंडळी लावून घेतात. आणि लग्न मुहूर्तावर लागावें व मंडळीस बसण्याची गैरसोय होऊं नये ह्मणून मंगलस्तंभाजवळ चार बाजूस केळीचे खुंट लावलेली जागा असते, ती बहुतकरून नवरामुलगा येण्याचे वेळीं मोकळी ठेवण्याची दक्षता असते.

**वरराज आगमनः**—नवरामुलगा मंडळीसह वाजत गाजत येत आहे, असें समजल्याबरोबर नवरीकडील आप्तपुरुषमंडळी सामोरी जाऊन व्याह्याचें व आप्तमण्डळींचें स्वागत करून, क्षेमसमाचार घेऊन नंतर मुलाचा मामा नवऱ्याच्या दाराजवळ मुलास घोड्यावरून खालीं उतरून, नवरी मुलीच्या मांडवाच्या दरवाज्याजवळ बिछायत टाकली असते, तीवर[1] बसवितात व बरोबर आलेली मण्डळीही बसतात.

---

१ ही रीत फारशी नाहीं. बहुतकरून बाहेरगांवाहून येणाराचे सोईकरितां व मुलीकडील लग्नाची जागा रिकामी नसल्यास ही रूढी असावी.




आमच्या ज्ञातीच्या मुली.

The Bombay Art Printing Works, Fort

नगर वाचनालय सातारा

नवरा मुलगा घोड्यावरून उतरण्याचे पूर्वीं नवऱ्या मुलाचा मेहुणा ( बहिणीचा नवरा ) किंवा कोणी आप्त फुलांची माळ घेऊन, नवरीकडील मंडळी किती हुशार आहे व तयारी कोणत्या प्रकारची आहे हें पाहण्याकरितां गुप्तरीतीनें जाऊन, ती मांडवमाळ मंगलस्तंभावर टाकून परत येण्याचा प्रयत्न करितो. परंतु नवरी मुलीकडील आप्त मंण्डळीही हाताचे पंजास हळद लावून टपत बसतात. जो कोणी असा गुप्त हेर येऊन हें कृत्य करील, त्याचे पाठीवर हळदीचा छाप मारतात; म्हणजे वराकडील मंडळीनें समजावें कीं, मुलीच्या मांडवांतील सावधगिरी व तयारी चांगली आहे.

नवरा मुलगा मंडळीसह मांडवाच्या दाराजवळील बिछायतीवर बसल्यावर पुरोहित गोत्रज कळसांतील पाण्यांत साखर टाकून उभयतां व्याह्यांच्या हातांत दोन वाटया[1] देतो, त्या दोघे एकमेकांस देतात. यास रसबदाई ह्मणण्याची रीत आहे. नंतर दोघे व्याही रामराम करितात. मग नवरी मुलीकडील आप्त सुवासिन स्त्री किंवा पुरोहित, ज्यांत थारोळीचें ताट, कुंकूं, अक्षता आणि उपवस्त्र वगैरे असतें, तें टिका लावण्याचें ताट घेऊन नवऱ्या मुलास गंधाचा टिका अक्षतासह लावून उपवस्त्र दिल्यावर व नवऱ्या मुलाकडील मंडळीनें रीतीप्रमाणें ताटांत कांहीं ओवाळणी टाकल्यावर मुलास उठवितात, आणि तो नवरी मुलीचे मंडपाचे दरवाज्याजवळ येतो. आंतून नवरी मुलीची आप्त स्त्री ( सुवासिन ) डोक्यावर शुभकारक मृत्तिकाकुंभ, हातांत पाण्याचे कळस, एका तबकांत दिवा, कुंकवाचें गंध, अक्षता वगैरे ठेवून वराचे दोन्ही बाजूला किंचित् पाणी टाकून गंधाक्षता लावल्यावर आरती करिते. नंतर छत्रीस गंधाक्षता लावल्यावर तेथें जवळच असलेल्या जूंला[2] गंधाक्षता लावून नवऱ्या मुलास दाखवितात, आणि पुरोहिताचे हातांत दिल्यावर तें मुलाच्या आ-

---

१ हा मधुपर्कविधि असावा.

२ हें संसाररूपी गाडीचें जूं आहे व तें आजपासून तुमच्या दोघांच्या मानेवर ठेवलें आहे तर तें दोघांनीं सुख, शांति, धैर्य व एक जुटीनें ओढून संसाररूपी गाडी नीट चालवावी.

ह्याच्या स्वाधीन करतात. मुसळ[1], रवी[2], शलाका[3], पंथ्याचें संपुष्ट[4] यांस गंधाक्षता लावून तीं वरावरून चार वेळ वरून खालीं उतरून उजवे पायाजवळ ठेवतात. नंतर राखेचे चार मुटकें[5] तसेच उतरून चार दिशेस फेंकून देतात. नंतर मिठाच्या मुठी[6] व पाणी उतरून तें खालीं टाकून त्यावर पाणी टाकतात.

कांहीं ठिकाणीं नवरा मुलगा मुलीचे मंडपांत प्रवेश करण्याचे वेळीं अंतरपाट करून मुलीचा मामा किंवा आप्त मुलीस कडेवर घेऊन येतो आणि तिचे हस्तें भाताचें मुटकें फेंकलें जातें; ही एक जरी रूढी आहे, तरी ती आधाररहित असून, वराचा व मुलीचा संबंध नसतांना पूर्वींच असें करविणें बरोबर दिसत नाहीं आणि मंगलाष्टक वगैरे होण्यापूर्वीं अंतरपाट धरतां येत नाहीं. ही रूढी अज्ञानमूलक व गौण आहे. हें मुलीच्या आईनें किंवा आप्तानें करण्याचें असावें.

पूर्वीं नवरदेवास मंगलस्तंभाजवळ येतां येऊं नये व त्यानें घोटाळ्यांत पडावें ह्मणून त्याच्या होतकरू मेहुण्या व शालक गीत ह्मणत गुलालगोटे त्याच्या अंगावर फेंकीत व विनोद व आनंद प्रदर्शित करीत. त्याचा बचाव तो ढालीनें करी आणि आप्तजन मंडळी शेले व उपरणीं आड करीत. ही चाल सोडून वरील नवीन रूढी सुरू झाली असावी; परंतु ती अप्रशस्त दिसते.

---

१ धान्य ज्याप्रमाणें कांडून त्याचे कणकोंडा काढून टाकून उत्तम भाग ग्रहण करतों त्याप्रमाणें या संसार जंजालांत धैर्यरूपी मुसळानें कांडून क्लेशरूपी कणकोंड्याचा त्याग करून सुखसंतोषाच्या संमेलनाचें सार ग्रहण करा.

२ स्त्रिया रवीनें दधिमंथन करून ज्याप्रमाणें नवनीत काढितात त्याप्रमाणें तुह्मी या संसार-समुद्राचें सदाचरणरूपी रवीनें मंथन करून स्वसंतोषानें तत्वज्ञानरुपी नवनीताचें संपादन करा.

३ हा देह तृणाप्रमाणें आहे ह्मणून शेवटपर्यंत जगांत सुसंगतीची जोड करून उभयतां सुखांत राहावें ह्मणून परमेश्वराचें स्मरण करींत असा.

४ दोन पंथ्यांचें डबडीसारखें संपुष्ट करून दाखवितात ह्मणजे प्रत्येक कार्यांत विघ्नं गुप्तपणें येऊन विघ्नें करितात, करितां हुषार राहा.

५ रक्षा ( राख ) इचे चार पिंड ( मुटके ) करून चार दिशेस फेंकले जातात ह्मणजे चार दिशेकडील असणाऱ्या वैऱ्यांच्या डोळ्यांत पडो.

६ मिठाच्या मुठी व पाणी उतरून टाकण्याचा हेतू हा कीं कोणाची नजर लागूं नये.

नवऱ्या मुलाचे आंगावर चार वेळां अक्षता टाकून ओंवाळणी झाल्यावर त्यांत रितीप्रमाणें वराकडून ओवाळणी टाकले उपरांत वरराज संपुटीवर उजवा पाय देऊन ती फोडून टाकतो[1] व लागलाच मंडपाचे प्रवेशद्वारावर चिडखणी[2] बांधलेली असते तीस तलवारीनें स्पर्श करून मंडपांत प्रवेश करितो. त्यावेळीं पुरोहित "स्वति न इंद्रो" हा मंत्र ह्मणत असतो. मंगलस्तंभाजवळ लागणाऱ्या साहित्याची तयारी पूर्वीच पुरोहितानें केलेली असते. वरकन्या पूर्वाभिमुख बसावी ह्मणून वराकरितां व वधूकरितां चौरंग किंवा पाट मांडलेला असतो, त्यावर रजई चौघडी करून अंथरतात, व त्यावर दोन्ही आसनांवर एक आंथरलें जाईल असें एका छिटाच्या पासोड्यावर कुंकवानें दोन सातीया काढून तो पसरतात. नंतर वरराज पूर्वाभिमुख बसल्यावर पंड्या मोठ्या स्वरानें "( १ ) कन्या दाता सावधान, ( २ ) कन्या प्रतिग्राही सावधान, ( ३ ) वरमाला सावधान, ( ४ ) आचार्य सावधान, ( ५ ) हतियाळो[3] सावधान, ( ६ ) कन्या यावें सावधान" असें ह्मणत असतो. नंतर नवरी मुलीस स्नान घालून व मामाकडील आलेलें पातळ नेसवून वराकडून आलेला सावड्यांतील शेवरा तिच्या मस्तकावर सुवासिनीनें बांधून मामा किंवा आप्त मुलीस आणून नवरदेवाचे डावे बाजूस पूर्वाभिमुख बसवितात. नंतर कन्यादान करणारा मुलीचा आप्त समोर बसून पंचांचा हुकूम घेतो व पंड्या आशिर्वाद देऊन मंगलाष्टक ह्मणण्यास सुरवात करितो.

---

१ या कृतीनें येणारीं संकटें रगडून टाकण्याचें सामर्थ्य आहे असें दर्शवितो.

२ मोरतोरण, हें बांधण्याची वहिवाट पुरातन असावी. १३५७ सालीं उदेपुरच्या राण्याच्या दोन कन्या व एक नात यांचीं लग्नें एकाच दिवशीं जेसलमीर, बिकानेर व किसनगड येथील राजपुत्रांबरोबर झालीं. त्या वेळीं अशीं तीन तोरणें राजवाड्याच्या तटावरून लोंबत ठेवलीं होतीं. नवरदेव घोड्यावर बसून हातांत भाला घेऊन तोडण्यास जाऊं लागले तेव्हां नवरीकडील स्त्री मंडळी त्यांचे आंगावर गुलाल गोटे फेंकून तोरणाचें रक्षण करीत होत्या व समयाला उचित अशीं गाणीं गात होत्या. शेवटीं मंडळीचे जयघोषांत तोरण तोडल्यानंतर त्या बाया आंत निघून गेल्या.

हल्लीं तुरळक गांवाचे वेशीस किंवा नवरी मुलीचे मण्डपाजवळ आंब्यांचे पाल्याचें तोरण बांधीत असतात, त्यास तलवारीनें स्पर्श करून घोड्यावरून वरास खालीं उतरवितात.

३ वर कन्येचे हात मिळविणारा.

कांहीं ठिकाणीं नवरी मुलगी पश्चिमाभिमुख बसवून वराकडील मंडळी जवळ बसते. नवरी मुलीची आई व बाप बहुतकरून मंगलाष्टक ऐकण्याचें टाळतात. अंतरपाट विधि झाल्याशिवाय त्यांनीं येण्याचा धर्म नाहीं; अशी वहिवाट आहे.

खालील श्लोक सुरू झाल्यावर वराची आई किंवा आप्त सुवासिनी स्त्री आल्यावर पंड्या हळदकुंकू देतो तें स्वीकारून नवरी मुलीचे गळ्यांत मंगलसूत्र बांधते.

यदा भवेत् पृथिवी । तदा भवेत् । सत्य युगं । मध्य तोयं तदा भवेत् । यज्ञस्य राजा हेमाचलः । हेमपर्वतस्थानं । वरस्थानं कैलास पर्वतः । स्थानं श्रीमेरुः । अचल स्थानं । आकाश मण्डपं । कन्याच गौरी । वरं श्री ईश्वरदेवः । आचार्यश्च ब्रह्मा । चत्वारि वेदपठितम् । बाजे बाजा* बहु शब्दः । भावरिय-रतिशयं गीतनादं शुभ मंगलम् । ते पुण्यकाले वरतु मनुष्यः । आपः शिवाः शौत्तमास्तां । तमास्तां ते कृण्वंत भेषजमतिः ॥ १ ॥

यदा भवेत् पृथिवी । तदा भवेत् त्रेतायुगम् । मध्य तोयं तदा भवेत् । यज्ञश्च राजा जनकस्य । स्थानं च मिथिलापुरी । वरस्थानं अयोध्यापुरी । श्री स्वर्णस्य स्थानम् । पटवस्त्र मण्डपम् । कन्या च सीता । वरः श्रीरामचंद्र देवः । आचार्यश्च वसिष्ठः । चत्वारिवेद पठितम् । बाजे बाजा बहुशब्दः । भावरिय-रतिशयं । गीत नादम् शुभमंगलम् । ते पुण्यकाले वरतु मनुष्यः । आपः शिवाः शौत्तमास्ताम् । तमास्तां ते कृण्वंत भेषजमतिः ॥ २ ॥

यदा भवेत् पृथिवी । तदा भवेत् द्वापारयुगं । मध्यतोयं तदा भवेत् । यज्ञस्य राजा विचित्रः । स्थानं च विचित्र नगरी । वरस्थानं इंद्रप्रस्थः । श्री-खंड चंदनस्य स्थानम् । सूत्रवस्त्र मण्डनम् । कन्या च द्रौपदी । वर श्री अर्जुन देवः । आचार्यश्च द्रोणाचार्यः । चत्वारिवेद पठितम् । बाजे बाजा बहुशब्दः । भावरियरतिशयं । गीतनादं शुभमंगलम् । ते पुण्यकाले वरतु मनुष्यः । आपः शिवाः शौचमास्ताम् । तमास्तां कृण्वंत भेषजमतिः ॥ ३ ॥

* डंका वाजवितात किंवा वाद्यें वाजवितात.

यदा भवेत् पृथिवी। तदा भवेत् कलौ कलियुगम्। मध्यतोयं तदा भवेत्। यज्ञस्य राजा विचित्रः। स्थानं च विचित्र नगरी। वरस्थानम् धारापुरी। श्री हरीवंश संभवः। तृणस्य मण्डपम्। कन्या च भानुमतिः। वर श्री भोजराज देवः। आचार्यश्च वुरिञ्चिः। चतुदर्श विद्या बहुप्रवेशम्। बाजे बाजा बहु-शब्दः। भावरियरतिशयं। गीतनादं शुभमंगलम्। ते पुण्यकाले वरतु मनुष्यः। आपः शिवाः शौचमास्ताम्। तमास्तां कृण्वंत भेषजमतिः॥ ४॥

**श्लोक.** ( शार्दूलविक्रीडित )

**दुर्वासाश्च्यवनोऽथ गौतम मुनिर्व्यासो वसिष्ठोऽसितः।**
**कौशल्यः कपिलः कुमार कवषौ कुंभोद्भवः काश्यपः॥**
**गर्गो देवल आर्ष्टिषेण ऋतवाग्बोध्यो भृगुरासुरिः।**
**मार्कंडेय शुकौ पतंजल मुनिः कुर्यात् सदा मंगलं॥ १॥**
**शुभ मंगल सावधान॥०॥**

**इक्ष्वाकुर्नभगोंबरीष पुरुजित्कारुष्टकः केतुमान्।**
**मांधाता पुरुकुत्स रोहित सुतो चम्पो वृको बाहुकः॥**
**खट्वांगो रघुवंश राजतिलको रामो नलो नाहुषः।**
**शांतिः शंतनु भीष्म धर्म तनुजाः कुर्यात् सदा मंगलम्॥२॥**
**शुभ मंगल सावधान॥०॥**

**सत्या श्री जनकात्मजा च गिरिजा काष्टाऽनुसूयाशची।**
**सावित्री च ह्यरुंधति च सुरसा मंदोदरी द्रौपदी॥**
**संकल्पा दमयंत्यतीव सुभगा मूर्तिस्तथा दक्षिणा।**
**तारा श्री धरणीर्दनुश्च सततं कुर्यात् सदा मंगलम्॥ ३॥**
**शुभ मंगल सावधान॥०॥**

**श्री शैलो मलयस्त्रिकूट ककुभौ गोवर्धनो रैवतः।**
**सह्यो देवगिरीर्महेंद्र ऋषभो विंध्योऽथ गोकामुखः॥**

**नीलः कामगिरिश्च वारिधरणो मैनाक ऋक्षो गिरि ।**
**द्रोणः कोल्लक ऋष्यमूक निषधौ कुर्यात् सदा मंगलम् ॥ ४ ॥**
**शुभ मंगल सावधान ॥०॥**

नंतर आशिर्वाद दिल्यावर फक्त मुलीचा बाप किंवा आप्तालाच बोलावून त्यास नवरा नवरीपुढें बसवितात. कित्येक ठिकाणीं मुलीचे आईबापांस बोलावून त्यांस गंधाक्षता लावून उभयतांचे वस्त्रास ग्रंथी देतात व पुरोहित "**स्वस्ति न इंद्रो**" हा मंत्र पूर्ण होईपर्यंत उभयतांस हात जोडून बसण्यास सांगतो आणि "**वर कन्ययोः कन्यादाननिमित्त पादप्रक्षालनमहं करिष्ये**" हा संकल्प ह्मणूं लागतो. हें झाल्यावर वरकन्येच्या उजवे पायाचा आंगठा एका ताटांत पाण्यानें धुवून, वस्त्रानें पुसून गंधाक्षता लावल्यावर पाय आंवरून घेतात आणि तें चरणामृत कन्यादान करणारा आचमन घेऊन ग्रहण करितो किंवा नेत्रस्पर्श करितो. नंतर पंड्या कन्येच्या बापाचे हातांत कुश, कुंकू, तुळशीचें पान, तांदूळ आणि पाणी देऊन कन्यादानाचा संकल्प ह्मणूं लागतो. या वेळीं कन्येच्या आईनें आपल्या पतीचे उजवे बाजूला बसून त्याच्या हातास हा[1]त लावण्याचा धर्म आहे.

ॐ अद्य श्रीमद्भगवतो महापुरुषस्य श्री विष्णोराज्ञया प्रवर्तमानस्य श्री ब्रह्मणोर्द्वितीयपरार्धे श्री श्वेतवाराह कल्पे वैवस्वत मन्वंतरे अष्टाविंशतितमे कलियुगे प्रथम चरणे विभागे श्रीमन्नृप विक्रमार्क समयातीत संवत्सराणां अमुक संख्याधिकायां समतीतायां शालिनवाहनकृत शकतः अतीतामुक संख्याधिकामुक शततमे शब्दे श्री विष्णौबुद्धावतारे अमुक नाम्ने संवत्सरे उत्तरायण गते श्री सूर्ये सौरमानात् अमुक ऋतौ महामांगल्यप्रदे पुण्य पवित्र मासोत्तमे मासे अमुक पक्षे अमुक तिथौ अमुक वासरे अमुक नक्षत्रे अमुक योगे अमुक करणे अमुक चंद्रे अमुक सूर्ये अमुक देव गुरौषेशु ग्रहेषु यथा यथा स्थानेषु सत्सु एवं ग्रहगण विशिष्टे पुण्यकाले देशे च

---

१ कांहीं कृत्यांत स्त्री वर्ज्य असेल परंतु अशा प्रसंगीं पतीचे हातास हात लावण्याचा धर्म आहे.

जंबुद्वीपे भरतखंडे आर्यावर्तान्तर्गते ब्रह्मावर्तैक देशे अमुक कुमारिका क्षेत्रान्तरवर्तिनि श्री अमुक नद्याः पश्चिमतटे अस्मिन् सकल कल्याणवति मंडपायतने देवानां ब्राह्मणानां च सन्निधौ वेदशास्त्रोक्त पुण्यफलावाप्त्यर्थं अमुक गोत्रस्य अमुक प्रवरस्य अमुक वेदान्तर्गत अमुक शाखाध्यायिनः अमुक नाम्नीं कन्यां पंचेंद्रिय निरुपहत शरीरिणी वस्त्रे युग्मेनाच्छादितां सोपानक्तां सुवर्णरजतादि यथाशक्ति अलंकृतां प्रजापतिदेवतां शास्त्रोक्त पुण्यफलावाप्तिकामः ।

## आतां कन्यादान देणाराचा गोत्रोच्चार.

'अमुक गोत्रस्य अमुक शर्मणः अहं कन्यादानजनीत यथोक्त फलावाप्ति कामः संप्रददे' हा संकल्प झाल्यावर कन्यादान करणाराचे हातांत कुश, कुंकू, तुळशीपत्र वगैरे जीं दिलेलीं असतात तीं कन्येच्या हातांत देऊन व तिचा हात वराजाचे हातांत देऊन एकमेकांचे तळहात मिळवितात. ह्यास हतियाळो ह्मणतात. कित्येक ठिकाणीं तांबूल ( विडा ) कुसकुरून देतात. परंतु ही रूढि आधाररहित असावी.

हतियाला मिळाल्यावर कन्यादानाबरोबर जें कांहीं द्यावयाचें तें दिलें जातें. आईबापांनीं आपल्या शक्तीप्रमाणें कन्यादानाची देणगी ह्मणून चांदीसोन्याचे दागिने वगैरे काशाच्या ताटांत दिल्यावर व नवरी मुलीस गुरु करण्याचे वेळीं जी गुरुदक्षिणा दिली असेल त्याचा निम्मे आकार गुरूकडून कन्यादानांत पडल्यावर, नवरी मुलीकडील आप्त, इष्ट, मित्र व जात मंडळी आपल्या शक्तीप्रमाणें व इच्छेनुरूप चांदीसोन्याचे दागिने किंवा रोख वगैरे रूपानें देण्यास प्रारंभ करितात. आईबापाकडील वस्तू काय व किती किमतीची आहे हें सर्वांस समजावें ह्मणून पंड्यानें मोठ्यानें ओरडून सांगण्याची वहिवाट आहे. तसेंच ज्याचेकडून कन्यादानाची देणगी येईल त्याचेंही नांव आडनांवासह मोठ्यानें उच्चारलें जातें. याचें टिप्पण करण्याची वहिवाट आहे. हें झालें ह्मणजे कन्यादानाची एकंदर रक्कम किती झाली हें पंचांस मोठयानें कळविल्यावर पंड्या रीतीप्रमाणें नवरानवरीस गंधाक्षता लावून उभयतांचे हस्तस्पर्श त्या ताटास

करवितो. नंतर तें ताट नवरदेवांचे आप्तांचे स्वाधीन करण्यापूर्वी एकंदर गोळा झालेल्या रकमेंतून नवरदेवास एक मूठ घेण्याची सूचना होते. नंतर ती त्याजपासून घेऊन त्याचा मेहुणा किंवा त्या नात्याचा जो जवळच असतो त्याच्या स्वाधीन केली जाते. नवरदेवाचे व मुलीचे हस्तें " नक्षत्र समावेधी "-ची दक्षिणा मिळाल्यावर ते कन्यादानाचे दागिने व रोख वगैरे शिल्लक जी राहील ती नवरे मुलाचे आप्तांचे स्वाधीन केली जाते. नंतर पंड्या कन्येचे गळ्यांत वरमाळा ( जव्हाळी ) घालून वराचे अंगावरील दुपेटा व कन्येच्या पातळाचें टोंक यांची ग्रंथी[1] बांधतो. हतियाळावरही याचे दुपेट्याचा अंतरपाट टाकतात. त्या वेळीं वर आणि वधूपक्षाकडील स्त्रिया समयोचित मांगलिक गीत गातात व पंड्या लग्न वाचून दाखवितो. लग्ननिमित्तानें भट, भिक्षुक, बैरागी, वगैरे मंडळी जमली असेल त्यांस उभयतां व्याह्यांनीं शक्तीप्रमाणें दक्षिणा देण्याची रीत आहे. जातीची, बिरादारी मंडळी खेरीज इतर जातीची जी मंडळी आली असेल तीस पंचांचा हुकूम घेऊन पान विडा वगैरे देऊन सन्मान केला जातो.

कांहीं ठिकाणीं वरमाळ—रुईच्या किंवा अन्य फुलांची माळ—नवरी मुलीनें नवरदेवाच्या गळ्यांत घालण्याची जी चाल आहे ती उत्तम आहे. पंड्यानें लग्न वाचून झाल्यावर नवरी मुलीस वराचे डावे बाजूला बसवितात.

अश्मारोहणाची तयारी व स्थापना पंड्यानें पूर्वीच करून ठेवलेली असते. ईशान्य बाजूला एका पाषाणावर गुलाल वगैरे टाकलेला असतो व जवळच एका पाटावर पांढरें कोरें कापड सव्वाहात लांबीरुंदीचें आंथरून त्यावर धान्याचे नवखंड* काढितात. त्यास क्षेत्रपालाची स्थापना ह्मणतात; त्याचेमध्यें एक तांब्याचा गडू ठेवून त्यांत पाणी व एक पैसा टाकून आंब्याचें, पिंपळाचें, किंवा नागवेलीचें पान निम्में बाहेर दिसेल अशा बेतानें ठेवून त्यावर एक श्रीफळ ठेवतात; यास रुद्रकळस ह्मणतात. गृह-

१ यावरून स्त्री, पुरुषाची अर्धांगी आहे हें दर्शित होतें.

* नऊ खंडांतील प्रत्येक खंडांत एक याप्रमाणें ९ पैसे, ९ सुपाऱ्या, ९ बदाम ९ खारका, व ९ वेलदोडे अशीं सर्व वरराज मंडळीकडून घेतलीं जातात.



नंबर ९. औरंगाबाद येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

...ालय, सातारा.

शांतीच्या होमाची जशी वेळच्या वेळीं व्यवस्था करितात, तशी या वेळीं करावी लागते; परंतु हे होम नसून लग्नामध्यें अग्नीची साक्ष ह्मणून करावे लागतात. नंतर पंड्या नमस्काराचा मंत्र ह्मणून नवरानवरीकडून नवग्रहांची व क्षेत्रपाळाची पूजा करवितो. हें झाल्यावर वर व वधूस उभें राहण्यास सांगतात आणि नवरीचे भाऊ किंवा आतांस बोलावून पंड्या त्यांस गंध व अक्षता लावून "**स्वति न इंद्रो**" हा मंत्र ह्मणतो. नंतर नवरी मुलीचे दोन्ही हातांचा पसा करून नवऱ्यानें दोन्ही हात मुलीच्या हाताच्या कांड्या-जवळ धरून नवरीचे हात हळू हळू हालवावे व तिचे भावानें बहिणीच्या पशांत लाह्या टाकीत असावें व पंड्या अग्नींत तूप टाकून खालील मंत्र ह्मणतो; यास लाजाहोम म्हणतात. कांहीं ठिकाणीं तीळ व जव टाकतात, तें या होमाच्या वेळीं अयोग्य असावें.

ॐ अर्य्यमणं देवंकन्याऽग्निमचक्षत ॥ सनोऽर्य्यमादेवः प्रेतोंमुञ्चतुमा-पतेः स्वाहा ॥ १ ॥ इदमर्यमणे नमम ॥ ॐ इयं नार्युप ब्रुते लाजानावपंतिका ॥ आयुष्मानस्तु मे पतिरेधन्तां ज्ञातयोममे स्वाहा ॥ २ ॥ इदमग्नये नमम ॥ ॐ हमांल्लांजानावपाम्यग्नौ समृद्धिकरणं तव ॥ मम तुभ्यं च संपननंतदग्निरनुमन्यता-मियढः स्वाहा ॥ ३ ॥ इदमग्नये नमम ॥

याप्रमाणें पंड्या तीन वेळां मंत्र ह्मणतो. प्रत्येक वेळीं नवरी मुलीनें साळीच्या लाह्या होमांत टाकीत असावें. तीन वेळां झाल्यावर पंड्या "**चतुर्थमौनेन**" असें म्हणतो. त्यावेळीं चौथी आहुती म्हणजे हातांतील सर्व लाह्या टाकून देतात.

वरप्रमाणें चार आहुती झाल्यावर "अथास्यै दक्षिण ॐ हस्तं गृण्हाति सांगुष्टम्" असा उच्चार करून पंड्या कन्येच्या दोन्ही हातांचे पसे एकावर एक ठेवून त्यावर वराच्या दोन्ही हातांचे पसे ठेवून, नवऱ्या मुलाचे अंगावरील शेल्यानें ते हात झांकून खालील श्लोक ह्मणतोः—

ॐ गृभ्णामि ते सौभगत्वाय हस्तंमयापत्याजरदीष्टयथासः

भगो अर्यमा सविता पुरंधिर्मह्यं त्वा दुर्गार्हपत्याय देवाः ।

**अर्थ**—मी तुझा हात तुझ्या सौभाग्यार्थ पति या नात्यानें हातांत घेतला आहे. तूं, इंद्र, अर्यमा, सूर्य, अग्नि आणि पुरंधि यांसमक्ष मला प्राप्त झाली आहेस.

नंतर कांहीं ठिकाणीं पंडया, नवरी मुलगी पुढें व वर मागें असे तीन फेरे व वर पुढें आणि वधू मागें असे चार फेरे करवून, सातवे फेरीचे वेळीं पायांत एक चांदीची हांसळी ( सरी ) टाकून संसारबेडी पडली ह्मणून उच्चार करितो आणि सोनेरी पहाड आडवें आलें ह्मणून एक गोटा मोठयानें जमिनीवर आपटतो; व नवरा नवरीस किंचित् कांहीं दाखविल्यासारखें करून त्यांचीं आसनें बदलून डावे बाजूस मुलगी व उजवे बाजूस मुलगा अशीं पूर्वाभिमुख बसवितो आणि ध्रुव दाखवून बोळक्यांत हळदीचें कुडें ( गांठ ) टाकून खुळखुळ्याप्रमाणें हालवून दाखवितो. या कृतींत कोणत्या तऱ्हेचा बोध अगर रूढीचा संबंध जुळत नसून ही रीत पुष्कळ ठिकाणीं नाहीं.

कांहीं ठिकाणीं पंड्या खालील कृती करवितो; ती शास्त्र व धर्मास अनुसरून असल्यानें तिचा कांहीं संबंध व बोध होण्यासारखा आहे. वर डाव्या हातानें वधूच्या उजव्या पायाचा अंगुष्ट धरून हळूच उत्तर बाजूला होऊन फेरा करण्याकरितां ज्या ठिकाणीं क्षेत्रपाळाची स्थापना केली असेल, त्या ठिकाणीं येतो. नंतर मोठया हुषारीनें तिचा अंगुष्टस्पर्श अश्मा ( सहाण किंवा शिला ) रोहणाला करितो. परंतु *दुसरें बोट मात्र लागूं नये ह्मणून वरानें व पंडयानें दक्षता ठेवावी लागते.

नंतर पुढें वधू व मागें वर अशीं पूर्व व दक्षिण दिशेस होऊन आपल्या पहिल्या स्थानावर येतात. अशा लाजाहोमासभोंवतीं सात

---

* वरेण वाम हस्तेन वधू पादंश्च दक्षिणाम् ॥ शिलामारोहयेत्प्राज्ञो मंगलानि यथाक्रमम् ॥ शक्तिरूपेण या शैल्या शिवरूपे शिलापतिः ॥ उभयांगुष्ट संस्पर्शात्सा कन्या विधवा भवेत् ॥ **अर्थ**—वरानें डाव्या हातानें कन्येचा उजव्या पायाचा आंगठा धरून अश्मारोहणाला स्पर्श करून मंगल फेरा फिरावा. शिला ही शक्तिरूप आहे व तिचा पती शंकर आहे. आंगठा व जवळील बोट या दोहोंचा स्पर्श झाल्यास ती कन्या विधवा होईल. ( असें आपस्तंभ ऋषीचें वाक्य आहे. )

प्रदक्षिणा* करवितात. शेवटीं सातव्या फेऱ्याच्या वेळीं पंडया दोघांचे हातांत गंध व अक्षता देऊन त्या होमास वाहण्यास सांगून नमस्कार करवितो. नंतर तेथे असलेली मातीची कुलिया किंवा बोळकी मुलीला मंगलस्तंभावर ठेवण्यास सांगतो. त्यास चौरी म्हणण्याची रीत आहे. नंतर नवरानवरी आपापल्या आसनांवर शांतपणें बसतात. होमास प्रदक्षिणा घालते वेळीं नवरा नवरी हात सोडून लवकर फेरे आटपण्याच्या हेतूनें किंवा घरांत लवकर जाण्याच्या किंवा आसनावर बसण्याच्या हेतूनें विनाकारण धांवाधांवी करितात. तें शास्त्रविरुद्ध आहे. फार करून याच कारणास्तव दंपत्यांत कलह उत्पन्न होण्याचा संभव आहे. नंतर पंड्या उभयतांस थोडी साखर देऊन तोंड गोड करितो. फेरे फिरण्याच्या वेळीं स्त्रिया शंकर किंवा रुक्मिणी विवाहाचें गीत म्हणत असतात. फेरे फिरल्यावर कन्येची सप्तपदी करितात; म्हणजे यज्ञमण्डपांत तांदुळांचे सात ढीग करून त्या प्रत्येक ढिगावर एक एक पैसा व एक एक खारीक ठेवून कन्येच्या हातानें पूजा करवून तिच्या उजव्या पायाच्या आंगठयाचा स्पर्श करवितात. त्या वेळीं पंड्या " **स्वस्ति न इंद्रो** " हा मंत्र म्हणत असतो; परंतु कन्या जेव्हां त्या ढिगाला स्पर्श करिते, तेव्हां विवाहकौस्तुभ मधील खालीं लिहिल्याप्रमाणें म्हणावें असें सांगितलें आहे.:—

---

*** कन्यकाग्रे वरं कृत्वा, ब्राह्मणो ज्ञानदुर्बलः ।**
**विधवा जायते कन्या, निषिद्धस्तत्र कारणात् ॥ १ ॥**

**अर्थ**—मंगल फेऱ्यांत जो कोणी वराला पुढें करून फेरे फिरावयास लावतो, त्यास विलकुल ज्ञान नाहीं असें समजावें; कारण असे फेरे फिरण्यानें मुलगी विधवा होईल म्हणून तें करणें व करविणें निषिद्ध आहे.

**अग्रे तु शुभदा पत्नी, मांगल्ये सर्व कर्मणि ।**
**पदेपदेऽश्वमेधंच, धनायुः पुत्रवर्धनम् ॥ २ ॥**

**अर्थ**—प्रत्येक मंगलकार्यांत पत्नी पुढें चालणें हें शुभदायक आहे. पदोपदीं अश्वमेधाचें फळ आहे; तसेंच धन, आयुष्य, पुत्रवृद्धि करणारें आहे. याप्रमाणें स्त्री पुढें असून तीन वेळां फेरे फिरण्याचें श्रेय आहे, म्हणून तीन फेरे तरी पत्नीला पुढें चालवावें, नंतर वर पुढें असावा.

ॐ एक मिषे विष्णुस्त्वानयतु ॥ १ ॥ ॐ द्वेड ऊर्ज्जे विष्णु-स्त्वानयतु ॥ २ ॥ ॐ श्रीणिरायस्पोषाय विष्णुस्त्वानयतु ॥ ३ ॥ ॐ चत्वारि माये भवाय विष्णुस्त्वानयतु ॥ ४ ॥ ॐ पञ्चम शुभ्यो विष्णुस्त्वानयतु ॥ ५ ॥ ॐ षड्ऋतुभ्यो विष्णुस्त्वानयतु ॥६॥ ॐ सर्वे सप्तपदा भव सा मामनुव्रता भव विष्णुस्त्वानयतु ॥७॥

**भावार्थ**—( १ ) रस आदिकरून पिण्याकरितां तूं एक पाय टाकणारी आहेस असें पहिले पदीं कन्येला वर म्हणतो. ( २ ) दुसरे पदीं म्हणतो कीं, अन्नाकरितां दोन पाय टाकणारी आहेस. ( ३ ) तिसरे पदीं, धनवृद्धीकरितां तिसरा पाय टाकणारी आहेस. ( ४ ) आरोग्यतेसाठीं चार पाय टाकणारी आहेस. ( ५ ) पशूकरितां पांच पावलें टाकणारी आहेस. ( ६ ) ऋतूकरितां साहा पाय टाकणारी आहेस. ( ७ ) सातवे पदीं तूं मित्राप्रमाणें आहेस. नंतर कन्या खालीं लिहिलेल्या सात श्लोकांत उत्तर देऊन प्रतिज्ञा करिते.

त्वतो मेऽखिल सौभाग्यं, पुण्यैस्त्वं विविधैः कृतैः ॥
देवै संपादितो मह्यं, वधुराद्ये पदेऽब्रवीत् ॥ १ ॥

**भावार्थ**—पहिल्या पदीं कन्या प्रतिज्ञा करते कीं, देवानें मला जें अखंड सौभाग्य दिलें आहे, त्यांत राहून नानाप्रकारचीं पुण्यकारक कामें करीन.

कुटुम्ब पालयिष्यामि, ह्या वृद्ध बालकादिकं; ॥
यथालब्धेन संतुष्टा, ब्रूते कन्या द्वितीयके ॥ २ ॥

**भावार्थ**—कुटुंबांतील बालक आणि वृद्ध यांचें पालन करीन आणि मिळेल त्यांतच संतोष मानीन.

मिष्टान्न व्यंञ्जनादीनी, काले संपादये तव ।
आज्ञा सम्पादिनी नित्यं, तृतीये सा ब्रवीद्वरम् ॥ ३ ॥

**भावार्थ**—ज्या वेळीं जसा भाजीपाला किंवा मिष्टान्न मिळेल, त्यांत आनंद मानून सदा आपल्या आज्ञेंत राहीन.

शुचिः शृङ्गार भूषाहं वाङ्मनः कार्यकर्मभिः ॥
क्रीडिष्यामि त्वया सार्द्धं, तुरीये सा वदेद्वरम् ॥ ४ ॥

**भावार्थ**—मी वचनक्रमेंकरून पवित्र शृंगार आणि भूषणें धारण करून आपली अर्धांगी होऊन आपलेबरोबर सुखानें क्रीडा करीन.

**दुःखे धीरा सुखे हृष्टा, सुखदुःखविभागिनी ॥**
**नाहं परनरं गच्छे, पञ्चमे सा ब्रवीत्पतिम् ॥ ५ ॥**

**भावार्थ**—दुःखप्रसंगीं धीर देईन, सुखाचे वेळीं आनंद मानीन म्हणजे तुमच्या सुखदुःखाची वांटेकरीण होईन; परंतु परपुरुषाबरोबर केव्हांहि गमन करणार नाहीं.

**सुखेन सर्वकर्माणि, करिष्यामि गृहे तव ॥**
**सेवां श्वशूरयोश्चापि, बन्धूनां सत्कृतिं तथा ॥ ६ ॥**

**भावार्थ**—तुमच्या घरीं राहून सर्व कामें सुखानें करीन; त्याच प्रमाणें सासूसासरा व तुमचे बंधू यांची योग्य सेवा करीन.

**होमयज्ञादि कार्येषु, भवामि च सहायकृत् ॥**
**धमार्थ कामकार्येषु, मनोवृत्तानुसारिणी ॥ ७ ॥**

**भावार्थ**—संसारांत होम, यज्ञ आदिकरून सर्व कार्यांत साहाय्यकारिणी होईन व अर्थ, काम आणि मोक्ष यांसंबंधी गोष्टींत तुमच्या मतास अनुसरेन.

वरीलप्रमाणें सप्तपदी झाल्यावर उभय व्याही पंचांसमक्ष येऊन मांडवाची जी रक्कम (लग्नाचे हक्क) किंवा जेवण, जशी रीत किंवा ठराव असेल, त्याप्रमाणें त्याचा निकाल झाल्यावर, पंडया, न्हावी, भाट यांचे जे कांहीं ठरलेले हक्क ते प्रथम वराकडील व नंतर वधूकडील असे देऊन टाकतात.

नवऱ्या मुलास व मुलीस पंडया थोडीशी साखर देऊन तोंड गोड करितो. नंतर वराची आई किंवा आप्त सुवासिनी स्त्री हातांत तांदुळाचे दाणे घेऊन वधूच्या डोक्यावर थोडथोडे टाकून नवरी मुलीचे कानांत हळूच सांगते कीं, **इंद्र इंद्राणीचें सौभाग्य.**' तसेंच मुलाची भावजय किंवा बहीण वरील प्रमाणें मुलीच्या कानांत सांगते कीं, '**ब्रह्म सावित्रीचें सौभाग्य.**' तसेंच नवरी मुलीची आई, बहीण, मामी, भावजय वगैरे सुवासिनी स्त्रियांनीं तिचे कानांत '**ईश्वर पार्वतीचें सौभाग्य,**' '**सूर्य रणादेचें सौभाग्य,**'

बृ. ९२२ 
११३५६
ग्रं. ९०



असे चौघी जणींनीं सौभाग्य दिल्यावर हातांत जे शिल्लक तांदूळ असतील ते मुलीचे ओटींत घालून वारेफिरे करून ओंवाळणी करितात. वराची आई (सुवासिनी असल्यास) मुलीच्या गळ्यांतील वरमाळा (जव्हाळी) काढून आपल्या ओटींत घेते व तिला ओंवाळणी करून पुन्हा ती गळ्यांत घालते. सौभाग्य देणाऱ्या सुवासिनी स्त्रियांस प्रत्येकीस सव्वापाव खारका देतात व त्या ज्या मार्गानें आल्या असतील त्याच मार्गानें फिरून परत जातात. नंतर पंडया नवरा नवरीस उभें करवून ध्रुवाचें दर्शन करवितो. "**अस्तामिते ध्रुव दर्शयती।**" सूर्यास्त झाला असल्यास ध्रुवाचें दर्शन होतें.

मंगलस्तंभाची नवरी मुलीकडून पूजा करवून त्यावर ठेवलेलीं बोळकीं खालीं उतरून घेतात. प्रसंगीं पंडया हें कृत्य करितो व "**स्वस्ति न इंद्रो**" हा मंत्र म्हणत असतो. नंतर नवरा नवरी दोघेंजण नवरीच्या घरांत देवपीठाजवळ जातात, व देवास नमस्कार करून रजई आंथरली असते, त्यावर बसतात; आणि प्रथम नवरीनें नवऱ्याचे तोंडांत चार गोड ग्रास व नंतर नवऱ्यानें नवरीचे तोंडांत चार ग्रास देण्याची रीत आहे. त्या वेळीं स्त्रिया गीत म्हणत असतात; कन्यादानांत देणगी रूपानें आलेली आंगठी (बेलछाप) छाप हे नवऱ्या मुलाच्या हातांतून काढून घेऊन तो छाप आणि सुपारी किंवा हळदीची गांठ अशीं एका मातीच्या कुडींत टाकून त्यांत गुलाल किंवा चुना आणि हळद मिसळून थोडें पाणी घालून नवरा नवरीकडून हारजीत वगैरे अनेक खेळ खेळवितात. वराकडील मंडळीनें मंगलस्तंभाजवळ असलेलें काशाचें ताट, लांकडाची पाटली, पासोडा, कळसकुंडा वगैरे जिन्नस, आपल्या ताब्यांत घेतल्यावर त्यांस जवळच जानोस देतात. सुवासिनीनें अगर पंड्यानें नवरानवरीचे वस्त्रास जी गांठ बांधलेली असते ती सोडल्यावर नवरदेव जानोसघरांत जाऊन बसतो. तेथें पूर्वीच बिच्छाईत, पानसुपारी, पाणी वगैरे तयारी केलेली असते आणि नवरीचे भाऊबंद, आप्त वगैरे विनोदानें नवरदेवाची तलवार, कट्यार, जोडा वगैरे नजर चुकवून चोरण्याचा प्रयत्न करीत असतात.

नवरीकडे घरगुती जेवण असल्यास, जेव्हां ज्ञात, पानविडे वाटल्यावर उभयता व्याह्यांचे परवानगीनें जाणारे ते निघून जातात, तेव्हां नवरीकडील

ढोताडे गम्भी

मंडळीनें त्यांस जेऊन जाण्याची विनंति करण्याची वहिवाट आहे. नवरा मुलगा आपले जनोतीसह आपल्याबरोबर असलेल्या मंडळीसुद्धां मांडवांत बसतो. नवरीमुलीनें काशाच्या ताटांत, जेवण किंवा पक्वान्न असेल, तें घेऊन यावें व नवऱ्याच्या डोक्याजवळ धरून त्यांतील निम्मे भाग घेऊन तें ताट नवऱ्यापुढें ठेवावें व आपण घरांत जाऊन जेऊं लागावें. इकडे नवरदेव जेऊं लागतो व स्त्रिया गीत ह्मणत असतात, वाद्यें वाजत असतात. या वेळीं एकंदर वराकडील मंडळीनें जेवण्याचा धर्म आहे.

नवरी मुलीकडील जिव्हाळ्याची आप्त मंडळी जी उपाशी ( कणाळ ) असते, तीही जेवते आणि वरातीस मुहूर्त असल्यास व नवरा मुलगा एक दोन दिवस ठेवण्याचा मानस नसल्यास लागलीच मुलीस रवाना करण्याचे तयारीस लागतात. नवरामुलगा ठेवून घेतल्यास दुसऱ्या दिवशीं, कन्यादानाच्या रकमेंतून मेहुण्यानें जी वराच्या मुठींतील घेतलेली रक्कम व घोडा अडविल्याची रकम त्यांत कांहीं पदरचें घालून अथवा मुलाचा बाप हौसेनें आपल्या खर्चानें बागेंत नवरानवरी घेऊन जाऊन आप्त मंडळीस किंवा जातीस जेवण देतो. नंतर सायंकाळीं वाजतगाजत व दारू उडवीत वरात नवरीचे घरीं मंडळीसह पोंचवितात. तेथें पानविडा होऊन दुसऱ्या दिवशीं नवरीमुलीकडून शक्तीप्रमाणें साधें किंवा ज्ञातभोजन ( बडेरचें जेवण ) देण्याची वहिवाट आहे.

**सपटोनी ( वरात )**—मंगलस्तंभाजवळ मुलीकडील आप्ताच्या खुशीवर शक्तीप्रमाणें लांकडाचा पलंग नवार विणून ठेवतात, किंवा पाठ मांडून त्यावर रजई आंथरून तयार करितात. व जीं कांहीं मुलीस तांब्या पितळेचीं भांडीं, नवरेमुलाचा व विनायकाचा पोशाख, नवऱ्याकडील आप्तांस अहेर व त्याचप्रमाणें नवरीकडील आप्तांस अहेर ही सर्व तयारी मुलीकडून तयार झाल्यावर नवरदेवास व नवरीस आणून बसवितात. नवरी वराकडून आलेले दागिने, कपडे व जोडा वगैरे घालून तयारच केलेली असते. छाबड्यांतील ( भेटींतील ) थोडेंसें सामान काढून घेतात किंवा सवाईदिढीनें

घालून एक लुगडें, चोळी, फडका वगैरे वराकडून आलेलें तें तसेंच ठेऊन शक्तीप्रमाणें दुसरें नवीन ठेवणें किंवा न ठेवणें खुशीवर आहे. तो छाबडा व पहाडानें भरलेला डेरा कळशीसह नवरीबरोबर रवाना करितात. अशा वेळीं पंड्या, भाट, न्हावी व दोन्ही व्याह्यांकडील मंडळी असतात. नवरदेवाला व विनायकास पोषाख घालतात. शक्तीप्रमाणें पागोटें, जामदानी जामा, शेला वगैरे व वराचे बापास किंवा आप्तास व एकंदर सर्व आप्तांस रीतीप्रमाणें व अहेराचा मानपान मिळाल्यावर नवरीकडील आप्तांची मानाप्रमाणें व्यवस्था करावी व पंचांचा मानाप्रमाणें मान दिल्यावर नवरा नवरी पुन्हा देवाचें दर्शन करण्यास जातात. नवरा नवरीस उभें करून स्त्रिया मंडळी निरोप ( जँवारी ) करीत असतात ह्मणजे बिदागी निमित्तानें नवरीकडील एकंदर आप्त स्त्रियांनीं श्रीफळ दिल्यानंतर वारेफिरे करून कुरवाळे घेतल्यानंतर मग वराकडील जो आप्त वृद्ध असेल त्याचे मांडीवर नवरी मुलीस बसवून नवरीकडील आप्त प्रार्थना करितो कीं, ही आपले पदरांत घातली आहे. आजपर्यंत मी जसा हिचा सांभाळ केला, तसाच पुढें आपण करावा; ज्याचे वसंगळींत नवरी मुलगी दिली असेल तो मुलीस एक रुपया देतो. हें मान्य झाल्यावर पानविडा देऊन मंडळी मांडवाचे बाहेर उभी राहाते. नंतर नवरदेवानें मांडवाचे पूर्वदिशेकडील दोरीची तनी सोडल्यावर मुलगी घराच्या उंबऱ्याची पूजा करिते आणि दाराचे चौकटीचे बाजूला दोहींकडे दोन हळदीचे छाप मारते, व मामाचे उरावर छाप मारून नवरदेवाबरोबर बाहेर येते. गाडी, वाजंत्री, मशाली, दारु वगैरे वरातीची तयारी केलेलीच असते. नवरदेव व नवरी बाहेर आलीं ह्मणजे नवरदेवानें मुलीकडील पुरुष व स्त्रीमंडळीस नमस्कार केल्यावर नवरीची आई किंवा आप्त त्यास एक रुपया देतात. नवरा नवरी, दोन विनायक व एखादी बरोबर कन्या ह्यांना घोड्याच्या गाडींत बसवितात. दोन्हीकडे दोन व्याही मंडळी उभी राहून रामराम केल्यावर वाजंत्रीं वाजूं लागतात. वराकडील स्त्रिया असल्यास गीत म्हणत असतात व पंड्या आशिर्वचन मंत्र ह्मणतो; अशा वेळीं मार्ग क्रमूं लागतात. नवरा मुलगा नवरीसह घरीं आल्यावर प्रथम आई किंवा बहीण

वगैरे आप्त सुवासिनी कुंकवाच्या गंधाक्षता लावून व आरती करून चार दिशेस चार भाताचीं मुटकीं ( पिंड्या ) ओंवाळून टाकतात. नंतर सात काशाचीं ताटें ओळीनें लावून ठेवतात व त्यांत गव्हाच्या पिठाच्या चांदकी (पुऱ्या) ठेवतात. त्यांस वरानें आपल्या तलवारीचा स्पर्श करीत पुढें चालावें आणि वधूनें थालीचा आवाज न करितां त्या गोळा कराव्या. नंतर श्रीगणेश, कुलाचार आणि माया ज्या ठिकाणीं बसविली असेल त्या ठिकाणीं रजई आंथरलेली असते; तेथें उभयतां बसून देवास श्रीफळ आणि रौप्य दक्षिणा ठेवून नमस्कार करितात. नंतर कुलदैवतास नमस्कार करितात; पुरोहित रीतीप्रमाणें मंत्र ह्मणत असतो व स्त्रिया गीत ह्मणत असतात आणि त्या दोघांस सुग्रास जेऊं घालतात. नंतर नवरीमुलीकडे जसे हारजितचे खेळ होतात, तसे येथेंही करवितात. नंतर सुवासिनीनें किंवा पंड्यानें उभयतांच्या वस्त्रास दिलेली गांठ सोडून, दोघांनीं घरांतील आप्तेष्ट वडील मंडळीस नमस्कार केल्यावर व बाहेरच्या मंडळीस पानविडा दिल्यावर ते निरोप घेऊन निघतात. दुसऱ्या दिवशीं नवरी मुलीकडील आप्त स्त्रिया मुलीस भेटण्यास येतात, त्या वेळीं त्या मुलीस खाऊ ह्मणून फळें, मिठाई वगैरे घेऊन येतात; ते तिच्या ( नवरी मुलीच्या ) हातांत देतात व क्षेमसमाचार पुसतात.

## कंकण सोडण्याची रीति ( काकनडोरला ).

शुभ दिवस असल्यास त्याच दिवशीं अगर पुढें जो शुभ दिवस असेल, त्या दिवशीं कंकण सोडण्याचा समारंभ करितात; तेव्हां वधूवरांकडील आप्त मंडळीकडे कांकणडोरल्याचें व सूनमुख ( व रूपदर्शनाचें ) बोलावणें आप्तसंबंधांत किंवा ज्ञातमार्फत वरपक्षाकडून दिलें जातें. नवरदेवास व वधूस मंगल स्नान घालून वधूस लाखेच्या किंवा हिरव्या बांगड्या भरतात. त्या वेळीं शक्तीप्रमाणें मुलीबरोबर आलेल्या मुलींस व आप्तापैकीं पांच सात मुलींसही बांगड्या भरतात. नंतर नवरानवरीस लग्नाचे कपडे नेसवून शेवरा बांधून श्रीसीतलादेवीची पूजा करवितात. पुरोहित, न्हावी, भाट, तेथें अस-

तात, वाद्यें वाजत असतात व स्त्रिया गीत * ह्मणतात. नवरेदवानें आपल्या डाव्या हातानें नवरीचें कांकणडोरलें सोडल्यावर नवरीमुलगी त्याचें लग्न-कंकण उजव्या हातानें सोडते. त्या वेळीं स्त्रिया विनोदपर गीत गातात. नंतर तेथेंही कुंडींत रंगाचें पाणी टाकून त्यांचे हारजितचे खेळ व आणखी कांहीं खेळ होऊन ज्या ठिकाणीं श्री गणपति, माया आणि सात्याची स्थापना केली असेल तेथें नमस्कार करतात. नंतर कुलदेवतास, उपास्य देवतास व कुटुंबांतील वडील मंडळीस नमस्कार केल्यानंतर देवकाचें उद्यापन वहिवाटीप्रमाणें केलें जातें. नवऱ्या मुलाची आई सुनेस आपल्या मांडीवर घेऊन शक्तीप्रमाणें मुखदर्शनाबद्दल दागिना देते. नंतर वराकडील जे कोणी आप्त असतील ते शक्तीप्रमाणें नाणें किंवा दागिना मुलीस देतात. आलेल्या स्त्रीमंडळीस तांदूळ मुगाची खिचडी वांटतात, किंवा जेऊं घालतात.

## परतनावळ ( फेरघोडा. )

त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं वर व वधू आपल्या जनोतीसह नवरीच्या आईबापाकडे जेवण्यास जातात. त्या वेळीं फळें व मिठाई बरोबर घेऊन जातात. वर, वधू व जनोती मंडळी यांचें जेवण झाल्यावर नवरदेवास कुंकवाच्या गंधाक्षता लावून शक्तीप्रमाणें उपरणें, नारळ, विडा, अधेली किंवा रुपया दिल्यावर तीं आपल्या घरीं येतात; व पाठोपाठ नवरीकडील मंडळी येऊन मुलीचे सासूस शक्तीप्रमाणें अहेर करून मुलीस माहेरीं घेऊन जाते. त्या वेळीं

---

* लग्नांमध्यें निरनिराळ्या प्रसंगीं स्त्रिया जीं गाणीं ह्मणतात, तीं सुमारें पाऊणशें आहेत; तीं सर्व आमच्या संग्रहीं आहेत; परंतु तीं ग्रंथविस्तारभयास्तव येथें देतां येत नाहींत. नमून्यासाठीं फक्त एकाच प्रसंगीं निरनिराळ्या ठिकाणीं जें एक गाणें तीन प्रकारें ह्मणतात, त्याचे पहिले चरण येथें दिले आहेतः—१ डोरलो ना छुटे लाडा, तेरा बापन् बेग बुला ॥ लाडा डोरलो ना छुटे इ०. २ बींद तारु काकण छूटो ॥ तारा बाप ने बलावरे ॥ बींद तारु काकण छूटो ॥ इ०. ३ तारे दोरडीये दसगांठ, छबीली डोरडो नव छूटे तूं तो निवडी लक्षणो लांट इ०. नवरानवरी ( लाडालाडी किंवा बींदबींदानी) चे फेरेचे प्रसंगीं स्त्रिया (लुगाइयां) अनेक गीतें गातात; त्यांपैकीं पहिले फेरे बाबारी बेटी। दूजे फेरे भुआरी भतीजी ॥ तीजे फेरे मामारी भानजी ॥ चौथे फेरे दी हुई पराई ॥

मुलीच्या सासरच्या मंडळीनें नवरी मुलीस नवीन लुगडें, चोळी, फडकें वगैरे, तसेंच बरोबर आलेल्या मुलींसही शक्तीप्रमाणें वस्त्र देऊन माहेरच्या मंडळी बरोबर रवाना करितात. एक दोन दिवसांनीं मुलीस सासरचें बोलावणें येऊन नवरा मुलगा व मुलीस गांवांतील देवदर्शन करवितात.

**चंद्रदर्शन ( चांदरात्र ).**—चंद्रदर्शन ज्या दिवशीं असेल, त्या दिवशीं सायंकाळीं जांवई सासुरवाडीस जेवावयास जातो. त्या दिवशीं पक्वान्नांचें जेवण करून जांवयास तांबडें गंध व अक्षता लावून श्रीफळ, पानसुपारी, रुपया देतात, व शक्तीप्रमाणें उपरणें वगैरे देतात; तसेंच मुलाकडे वाढण पाठवून देतात.

मांडव परतण्याचें वाढण नवरी मुलीकडून शक्तीप्रमाणें मुलाकडे पाठविण्याची वहिवाट आहे.

**सालंकृत कन्यादान**—वधू व वर ह्या दोहों पक्षांकडील लग्नाविषयींचा सर्व खर्च वधूचा बाप जेव्हां आपणच करितो, त्यास सालंकृत कन्यादान म्हणतात.

**बारा महिन्यांचे सण.**—हे उभयतां व्याह्यांची इच्छा व शक्तीप्रमाणें प्रसंगानुसार गांवचे वहिवाटीनुरूप करीत असतात.

**व्याही भोजन.**—लग्नसमारंभाचें सर्व कृत्य आटोपल्यावर उभयतां व्याही आपल्या आप्तेष्ट मंडळीसह स्वसंतोषानें व शक्त्यनुसार जेवण वगैरे करितात. प्रथम नवरी मुलीकडील आप्तानें वराकडील व्याही, आप्त, इष्ट वगैरे बोलाविण्याची वहिवाट आहे; तेव्हां वराकडील सर्व आप्त स्त्रीपुरुष मंडळीसह येऊन मुलीकडील आप्तांस संतोषित करावें हा धर्म आहे. या वेळीं नवरी मुलीस नवीन वस्त्रें करण्याची चाल आहे. नंतर वराकडील मंडळी वधूकडील एकंदर आप्तेष्टांसह आमंत्रण करिते. नवरीकडील आप्तानें जांवयास अहेर करावा लागतो. शक्त्यनुसार आप्तेष्टांसही अहेर करण्याची वहिवाट आहे. कोणी वधूचे आईबाप प्रेमानें असा संकल्प करितात कीं, आपल्या मुलीस पुत्र होईल, तेव्हां जांवयाकडे जेवणास जाण्यास मोकळीक आहे; इतकेंच नाहीं, तर वाढणरूपानें अन्न आलें तरी स्पर्श करीत नाहींत. हा नियम

फक्त मुलीचे आईबापांस लागू आहे. मुलांकडील आप्तांस मुलीकडे जेवणास न जाण्यासंबंधी असा कोणताही नियम नाहीं व त्यांनीं जेवणास जाणें हेंच योग्य आहे.

शरीरसंबंधाचें नातें जोडणें हें फार नाजूक व जोखमीचें असल्यामुळें उभयतां व्याही व त्यांकडील आप्तेष्टांनीं एकमेकांकडे प्रसंगानुसार घडणाऱ्या कृत्यांमध्यें आनंदानें व उत्सुकतेनें सर्व प्रकारचा भाग घेऊन होतकरू जोडप्यास प्रेमाचें वळण लावून संसारांतील अनेक संकटें एकजुटीनें निवारण करण्याचा मार्ग दर्शविणें हा धर्म आहे.

प्राचीनकालीं क्षत्रियांच्या मुली पणानें, स्वयंवरानें, किंवा लढाया करून हरण करून, राजे लोक त्यांच्याशीं लग्न लावीत असत; म्हणून उभयपक्षांतील व्याहीमंडळी परस्परांकडे जेवणास जाण्याचा सांप्रदाय घातक समजून, तो वर्ज्य करीत असावे; परंतु हल्लीं तसा काळ मुळींच नाहीं.

लग्नकार्यांतील बहुतेक कृत्यें शक्तीप्रमाणें आटपून घेतात आणि व्याहीभोजन मात्र कोत्या विचारामुळें उभयतां व्याही लांबणीवर टाकतात; हेंच फार घातक आहे. व्याह्याकडे दुसरें लग्न होईल, त्या वेळीं घरदेखणी (घर पाहण्यास) येऊं आणि जेऊं वगैरे निमित्तानें व्याही एकमेकांकडे जेवण वर्ज्य करितात. उभयतांकडे अनेक लग्नें होऊन जातात, परंतु प्रथमतः वळणीं लागलेले शुभाशुभाचे विचार इतके वाढतात कीं, परस्परांसंबंधानें प्रेमाची जोड वाढणें तें बाजूला राहून, सर्व प्रकारच्या व्यवहारांत तूट मात्र होते, अशीं पुष्कळ उदाहरणें सांपडतील. व्याहीभोजनाचें महत्व उभयतां व्याह्यांस समजत नसल्यामुळें अज्ञान व होतकरू जोडप्याचे मनांतील प्रेम आणि संघशक्ति हीं निर्बल होऊन द्वेषभाव सहजीं उत्पन्न होतो; व द्वेषभावाचें वळण पूर्वजांनीं लावून दिलें असें होण्याचा संभव आहे, व परिणाम असा दिसून येतो कीं, अशीं जोडपीं सासूसासरे वगैरे आप्तांशीं विरुद्धमतानें वागत असतात; करितां व्याहीभोजन हें लग्नकार्यांतील एक मुख्य भाग समजून शक्तीप्रमाणें उरकून घ्यावें, आणि होतकरू जोडप्यास संघशक्तीनें संसारांतील

त्यांजवरील संकटें निवारण करण्याचा मार्ग दर्शवून त्यांचें प्रेम वृद्धिंगत करणें हा धर्म आहे.

## ऋतुदर्शन ( न्हाण ).

प्रथम रजोदर्शन झालें ह्मणजे तो दिवस, वेळ वगैरे कशी काय आहे, तें पाहण्याची रीत आहे व पांचव्या दिवशीं अगर पुढें शुभ दिवस असेल त्या दिवशीं गर्भदानाचा समारंभ करितात; व त्या दिवशीं आपल्या आप्तमंडळीस हळदकुंकूं, भिजविलेले हरभरे वगैरे देत असतात. शक्ति असल्यास जेवणाचेंही आमंत्रण देतात. मुलीचे आईबाप, आप्त वगैरे मंडळीनें शक्तीप्रमाणें अहेर वगैरे आणण्याची वहिवाट आहे. गर्भदानाचा समारंभ हा तीन महिन्यांनंतर केल्यास उत्तम समजलें जातें. या वेळीं पुरोहित, न्हावी वगैरेंस सूचना देणें खुशीवर आहे; त्यांचा हक्क जरी नाहीं तरी खुषीनें शक्तीप्रमाणें संभावना केल्यास चांगलें.

## सूर्यदर्शन आणि बारसें.

बाळंतीण व बालक यांस सूर्यदर्शन करवितात; ह्मणजे दाहा दिवस झाल्यावर शुभ दिवस पाहून त्या दिवशीं आंगणांत* पाट ठेवून त्यावर कुंकवानें स्वस्तिक ह्मणजे साते, चंद्र, सूर्य काढून, तेथें बाळंतीण बालकासह येते व हळदकुंकूं, अक्षता टाकून नमस्कार करून, देवतांस व वडील मंडळीस नमस्कार करिते. व जमलेल्या सुवासिनींस हळदकुंकूं, भिजाणे, व पानसुपारी देण्याची वहिवाट आहे.

बाळंतपणाच्या प्रथम समारंभाच्या वेळीं खुशीनें व शक्तीप्रमाणें आप्तमंडळीस हळदकुंकवाचें बोलावणें केल्यास, बाळंतिणीचे आईबाप, व आप्तमंडळी शक्तीप्रमाणें अहेर करितात. नवऱ्याकडील आप्तमंडळीनें शक्तीप्रमाणें आंगडें, टोपडें, दागिने वगैरे बाळलेणें आणण्याची वहिवाट आहे; व ज्यानें बाळलेणें आणलें असेल त्यास बदला शक्तिनुरूप लुगडें, चोळी वगैरे देतात.

---

* आधींच अशक्त झालेल्या बाळंतिणीस चालत उघड्या हवेवर आणण्यापेक्षां तिच्या खोलींतच ही व्यवस्था केल्यास विशेष उत्तम होणार आहे.

याच वेळेस नामकरणविधि केल्यास येणाऱ्या आप्त स्त्रीमंडळीस जेऊं घालून हळदकुंकूं, भिजाणे, साखरपान देण्याची वहिवाट आहे. ज्ञातीचें कार्य असल्यास न्हाव्यासह घरवाल्यानें सरपंचांकडे जाऊन त्यांचे हक्क असतील ते देऊन ज्ञातींत आमंत्रण देण्याची विनंति करावी, ह्मणजे सरपंच न्हाव्यास हुकूम देऊन व्यवस्था करितो. आलेल्या स्त्रियांस हरभऱ्याचे भिजाणे, पानाचा विडा, हळद व कुंकूं देण्याची वहिवाट आहे व खुशीनें सर्व जातीचे घरीं खोबऱ्याच्या वाटींत साखर घालून वांटतात व पुरोहित, न्हावी, भाट यांना ठरावाप्रमाणें अथवा इच्छेनुरूप दिलें जातें.

## पुनर्विवाह* ( मोहतर, नोत्रा ).

पुरुषास पहिली स्त्री असून संतति होत नसेल अगर होऊन जगत नसेल, रोगिष्ट व भ्रमिष्ट वगैरे असेल व दुसरें लग्न करण्याची सोय नाहीं तर त्यास म्होतुर करण्यास हरकत नाहीं. परंतु तो संबंध एका आडनांवांत किंवा आप्तांत नसावा.

स्त्रीचा नवरा परागंदा होऊन बारा वर्षें शोध लागत नसल्यास, मृत, रोगिष्ट, नपुंसक, धर्मभ्रष्ट असल्यास तिला म्होतुर करण्यास हरकत नाहीं. अशा विधुरास अगर विधवेस आपल्या खुशीनें घरोबा करणें असेल तर विधुराचे आईबाप किंवा आप्तांकडून विधवेचे आईबाप किंवा आप्तांकडे प्रथम सम्मति विचारण्याची वहिवाट आहे. पहिला पति मृत झाल्यावर त्याच्या विधवा स्त्री सहा महिने व्रतस्थ राहिल्यानंतर खुषीनें दुसरा नवरा करूं शकते.

ज्या पुरुषास पुनर्विवाह करणें असेल, त्यानें पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीच्या आईबापांपाशीं समक्ष अगर आप्तेष्टांकडून सम्मति विचारण्यास हरकत नाहीं. स्त्री व तिचे आईबाप अगर आप्तेष्ट कबूल असतील व तिचे पोषणाबद्दल कांहीं रक्कम मागत असतील तर ती देण्याची वहिवाट खुषीवर आहे. म्होतुर करणाऱ्या स्त्रीचे सासरचे हक्क, रोकडीनें देणेंघेणें हें खुषीवर आहे.

* क्षत्रिय धर्मांत पुनर्विवाहाची वहिवाट पूर्वी नव्हती. ती संवत् १३५७ व इ० सन १३०१ मध्यें सुरू झाली असावी.

म्होतुर करण्याकरितां जोडवीं व काकणांबद्दल एक किंवा दोन रुपये वराकडून स्वीकारल्या नंतर म्होतुर तोडतां येत नाहीं. म्होतुराचा ठराव झाल्यावर वरानें पंचांचे जे हक्क असतील ते चौधरीला देऊन हुकूम मिळाल्यावर म्होतुर करण्याची वहिवाट आहे.

दोन्ही बाजूच्या संमतीनें म्होतुराचा दिवस कृष्णपक्षांत कायम करावा. तो फक्त आदितवार, मंगळवार व गुरुवार या तिहींपैकींच असला पाहिजे. व या प्रमाणें ठरलेल्या दिवशीं रात्रीं म्होतुर करणारा चार मंडळीसह त्या स्त्रीच्या घरीं जातो; नंतर घरांतील कर्त्ता पुरुष सर्व मंडळीचा आदरसत्कार करून आलेल्या मंडळीस जेऊं घालतो, अशी वहिवाट आहे.

वराकडून आलेलें लुगडें चोळी स्त्रीस नेसवून दागिनेही घालण्यास हरकत नाहीं. नंतर दोन चौरंग किंवा पाट टेवून त्यावर उभयतां बसून, पुरोहित आपल्या हातानें दोघांस कुंकवाच्या गंधाक्षता लावतो व जे कांहीं मंत्र म्हणावयाचे ते म्हटल्यावर स्त्रीची भावजय किंवा कोणी तरी आप्त स्त्री साखर तूप घालून त्यांचें तोंड गोड करते व म्होतुर करणारा लागलाच आपल्या स्त्रीस घरीं घेऊन जातो. दुसऱ्या दिवशीं देवदर्शन वगैरे करण्याची वहिवाट आहे. दोन्ही पक्षांनीं आप्तांस किंवा जातीस जेवण देण्याचें त्यांच्या खुषीवर आहे.

पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीनें दुसरा नवरा केला ह्मणजे तिच्या पहिल्या लग्नाच्या घरचे जे दागदागिने, कपडे वगैरे असतील ते चार मंडळी समक्ष पहिल्या घरच्या वारस मंडळीचे येथें पोंचते करण्याची वहिवाट आहे.

तिचा पहिल्या घरचा मुलगा अगर मुलगी अज्ञान, असमंजस असल्यास, तीस आपल्या नवीन नवऱ्याचे घरीं घेऊन जातां येतें, व ह्मोतुर करणाऱ्यानें त्याचें पालनपोषण केलें पाहिजे. समंजस झाल्यावर तो आपल्या खुषीनें जाईल किंवा पहिल्या घरचे वारसदार त्यास मागतील तर त्यांच्या स्वाधीन करण्याची वहिवाट आहे. जर स्वाधीन केलें नाहीं तर म्होतुर करणाऱ्या गृहस्थानें त्याचें पालनपोषण करून लग्न केलें पाहिजे. तसेंच पुढें मुलगा आपल्या मूळच्या घरीं गेल्यास अगर विभक्त निघाल्यास, त्याचेकडून केलेला खर्च घेतां येत नाहीं.

म्होतुर करणाऱ्या स्त्रीला पहिल्या घरचीं दोन तीन मुलें असलीं आणि जर ती त्यांस सोडून जाईल व त्यांना सांभाळ करण्याचें पहिल्या घरच्या मंडळीस गरिबीमुळें सामर्थ्य नाहीं, तर त्या मुलांचे संगोपनार्थ जातिरिवाजाप्रमाणें कांहीं ठराविक रक्कम त्या स्त्रीचे नव्या नवऱ्यापासून, पंचांस योग्य वाटल्यास, घेण्याची वहिवाट आहे.


## चौधरी, पटेल, शेटे, सरपंच.

ही अधिकारी मंडळी पीढीजाद चालत आलेली आहे. ती कोणासहि मान्य नाहीं, असें बहुतेक समाजपुढारी वगैरेंचें ह्मणणें पडलें आहे; ह्मणूनच आह्मी त्यांच्यासंबंधानें येथें विशेष उल्लेख करीत नाहीं. ही मंडळी जातीच्या समाजानें बहुमतानें निवडलेली असावी, असें सर्वांचें मत आहे.

## पुरोहित किंवा पांड्ये ( गौडब्राह्मण ).

हे वंशपरंपरेनें नेमलेले असल्यामुळें पूज्य मानले जातात. समाजांत घडणारीं अनेक धर्मकृत्यें वेळचे वेळीं नियमितपणें करण्याची वहिवाट असून जन्ममृत्यूची नोंद ठेवणें, हेंही त्यांचें कर्तव्य आहे; व समाजांतून असलेली नेमणूक पंचांकडून जशी दिली जाते, तशीच समाजमंडळींतील अनेक कृत्यांबद्दल निरनिराळे ठरलेले हक्क व दक्षिणा वगैरेहीं पंचांचे अनुमोदनानें घेण्याची चाल आहे. एकादशी किंवा द्वादशी आणि व्यतिपात यांबद्दल दक्षिणा पात्र आण्यापेक्षां जास्त घेण्याची वहिवाट जरी नाहीं, तरी कोणी खुषीनें आपल्या शक्तीप्रमाणें जास्त दिल्यास घेण्यास हरकत नाहीं. राखीपौर्णिमेस रक्षाबंधन करण्याची वहिवाट असून खुषीनें शक्त्यनुसार कोणी शिधा, दक्षिणा वगैरे देतील ती स्वीकारणें धर्म आहे. धन व मकर संक्रांतीचा तिळगूळ, दक्षिणा व खिचडी देणें, हें ज्याचे त्याचे खुषीवर आहे. समाजाच्या कांहीं कृत्यांमध्यें पंचाची परवानगी घेण्याची वहिवाट आहे व त्याच्या हुकुमाप्रमाणें करणें धर्म आहे.

पांड्याचें मुख्य काम वधूची मागणी, राशी नक्षत्र पाहणें, कुंकू लावणें, लग्नमुहूर्त, लग्नचिट्ठी, मंडपस्तंभ, शांती, गणेश अक्षता व पूजन, हळद चढ-




नंबर १०. दिल्ली येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

विणें, अभ्यंगस्नान, वरप्रस्थान, लग्न, साडे, कंकण वगैरे; तसेंच जन्मपत्रिका, बारसें, पक्ष, श्राद्ध, दशक्रिया, बारावें अगर तेरावें वगैरे प्रसंगीं हजर राहून शास्त्रोक्त विधि करणें हें त्याचें मुख्य काम आहे.

जातींत जीं कार्यप्रयोजनें होतात आणि तीं कच्या रसईचीं असल्यास त्या समयीं पंड्यास सुका शिधा द्यावा; आणि पक्की रसई असल्यास पंड्यास व त्याच्या घरच्या मंडळीसहि जेऊं घालावें. ज्या गांवांत नेमलेला पंड्या नाहीं, त्या गांवांत ग्रामजोशाकडून सर्व कामें करून घेण्यास हरकत नाहीं.

## भाट.*

भाटांचा धंदा राजवंशाच्या हकिकती व चरित्रें कविताबद्ध करावीं, व तीं राजांस वाचून व म्हणून दाखवावीं हा होय. जेथें क्षत्रिय राजे आहेत तेथें भाट लोक असतात. राजपुताना, काठेवाड व गुजराथ येथें ह्या भाटांची वस्ति फार आहे; व त्यांस तेथील राजांकडून इनामें, मानमरातब, लग्नकार्यांत पोषाख, वगैरे मिळत असतात. क्षत्रिय वंशास पडता काळ आला तशी भाटांचीही दुर्दशाच होत गेली; तथापि ज्या ज्या राजांजवळ हल्लीं भाट आहेत, ते ते राजे त्यांस ब्राह्मणांपेक्षांहि अधिक पूज्य मानून, त्यांचा मानमरातब व देणग्या हीं रीती-प्रमाणें देण्यास कधींही हरकत आणीत नाहींत. इतिहासकारांना पूर्वीच्या क्षत्रिय व रजपूत राजांचे इतिहास लिहिण्यास या भाट लोकांचेच ग्रंथ बरेच सहाय्यभूत झाले आहेत.

हे राजपुतान्यांतील क्षत्रियांचे कवी ह्मणून इतिहासप्रसिद्ध आहेत. उत्तरोत्तर त्यांचा आश्रय कमी होत गेल्यामुळें हल्लीं ते शेतीवाडी करून रहातात. ज्या ठिकाणीं जातिसमाज मोठा आहे, त्याच ठिकाणीं त्यांस आश्रय दिला जातो.

* फार प्राचीन कालापासून सर्व राजांजवळ भाट असण्याचा परिपाठ दिसतो. पूर्वीच्या तिन्ही युगांतील राजांजवळ भाट असलेले ग्रंथांतरीं आढळतात; ते हे आहेत:—कृतयुगांत—चंडीजवळ वेलंग व वळास हे दोन भाट होते; व शेषाजवळ भीमसी नांवाचा भाट होता. त्रेतायुगांत—बळी राजाजवळ पिंगल व रामराजाजवळ रंपाळ, भारोट असे भाट होते. द्वापारयुगांत—पांडवांजवळ संजय व नैमिषारण्यांत शौनकादि ऋषींजवळ सूत हे भाट होते; आणि अलीकडील युगांत विक्रमराजाजवळ वेताळ, पृथ्वीराजाजवळ चंदभाट, अकबर बादशहाजवळ गंगभाट आणि शिवाजी राजाजवळ भूषण या नांवाचा भाट होता.

यांस समाजाकडून नेमणूक असून समाजांत होणारीं बहुतेक शुभ कार्यें, प्रयोजनें, लग्नें वगैरे आनंदाच्या समारंभांत त्यांना हक्क देण्याची वहिवाट आहे, व ते समाजाच्या वहिवाटीप्रमाणें दिले जातात.

आनंदाच्या प्रसंगीं ह्मणजे लग्न, नौते, बारसें, मजलसी, शिमगा, समाजबैठकी, पंचायत वगैरे प्रसंगीं हे समयोचित स्तुतिपर काव्यें, कवनत्व* वगैरे उंच स्वरानें ह्मणत असतात. इतकेंच त्यांचें काम आहें असें नाहीं, तर समाजासंबंधानें जो बरावाईट इतिहास असेल, त्याची नोंद करून ठेवणें हेंसुद्धां त्यांचें कर्तव्य होय.

---

## न्हावी.

हे ज्या ठिकाणीं जातीचा भरणा जास्त आहे त्या ठिकांणीं बहुतेक समाजाचे मानानें कायमचेच नेमलेले असतात. समाजांत होणाऱ्या, बहुतेक कार्य, प्रयोजन, वगैरे कृत्यांबद्दल हक्क नेमलेले असतात. ते बहुतेक पंचजमेंतून, जेथें जशी वहिवाट असेल त्याप्रमाणें, देण्याची वहिवाट आहे; व पंचांचे अनुमोदनानें ठरलेले चिल्लर हक्क, हें कृत्य करणाऱ्या गृहस्थाकडून घेऊन, देण्याची रीत आहे. ठराविक कृत्यांबद्दल ठरलेल्या हक्कांशिवाय जास्त घेण्याची जरी मनाई आहे, तरी यजमानानें खुशीनें जास्त दिल्यास घेण्यास हरकत नाहीं. पंचांच्या हमेशाच्या वर्दी व हुकूम महत्वाचे व जोखमीचे असल्यामुळें ते वेळेवर बजावण्याबद्दल विशेष काळजी ठेवली जाते; आणि समाजांत हुक्का तंबाखूची व्यवस्था ठेवावी.

---

* **लग्नप्रसंगाचें कवित्व**—येकज अइची तमे तै देखी मृत मोड:उगर बुधरंगीं जीवणा जपेतो हंसारूढः तुरत उकत नहि बुधकु कहयने तुकलावू: गणगरइष्टइंगिजीवः नासगवरा नंद प्रमाण: नंदढोना क्याह सुनकयेलासी समहे सधोको देवि अंबीकान् पूजो देव गणेशः यै देखी ब्रक भानके गावे मंगलवारः क्या हवन अये नंदसुतके सुकृष्ण मुरारं चेरण फेरी दुंधुभिधुंदधवलकी घोर तैसी है धुनसंखकी तोर बधिपवरः नीलंअंबर मधुरक्त धवस्ते भाऊतपुतभावः लखंचुनीके जुमकासः मोतिझालर पानहीवो हरख उछाहा मनधनंधीरं जेवाको सत आदर देवीकभाकजुः बंद करे प्राणिपातः सिंगासन् बैठे सावरे श्रीराधावपासः पुरनमासी सरद चंद्रकी मन मेउग्यौ चंद्र अकासः गर्गअदिमुनी जनपडे करे बेद उच्चार मृगानैनी देसीटना नासोवरखत रंग आनार जादो बन्सी जलघटाः केसो धोके पाव कन्यादानबव्हबिदरच्यो सुनो पंच देकान कंचन खेडो रसनगडगड देऊ श्रीखभान्: कर्जधवरी घुमरी गीन अवनग्यान बिप्रसतोखिदछेना लेकरे स्वती कल्याण दे.

कित्येक ठिकाणीं समाजांत स्त्रियांना पुरुषांप्रमाणें पूर्ण हक्क असतो; व निम्मे मिळण्याची वहिवाट जरी आहे तरी जबाबदारी सारखी असून यजमानाच्या एकंदर कृत्यांबद्दल दक्षता ठेवण्याची वहिवाट आहे.

लग्नघरीं प्रथम दिवसापासून शेवटीं नवरा नवरीचें कंकणं सोडीपर्यंत घडणाऱ्या समारंभांच्या वेळीं हजर राहून वेळच्या वेळीं आपली कामगिरी बजावील त्यासच खाजगी ठराविक हक्क देण्याची वहिवाट आहे.

न्हाव्यानें लग्नांत मुख्य समारंभाचे वेळीं हजर राहून आपलीं कर्तव्यें केलीं पाहिजेत. तीं:—मण्डपस्तंभ,हळद लावणें, स्नान घालणें, उकिरडा पूजा, गडंगनेर, तेल चढविणें आणि तूप उतरणें (अभ्यंगस्नान), मसाल्याची हळद लावणें, व स्नान घालणें, तोरणें बांधणें, कळस कुंड आणि चवरी (वही) कुंभार व सुतार यांजकडील व्यवस्था, रोजची हळद लावून स्नान घालणें, रुखवत पोंचविणें, माहेरघरीं आमंत्रण (नौता) कोर करणें, छाबडे व माठ पोंचविणें, लग्नास हजर असणें, साडे, नवरानवरी घरीं पोंचविणें, मशालीची व्यवस्था करणें, कंकण सोडविणें आणि सुन्मुख, प्रतिपदा ( चांदरात्र ) मांडवपरतणी, बारा महिन्यांचे सण, ऋतुशांति, प्रथम संतती वगैरे समारंभाचे वेळीं हजर राहण्याचा धर्म आहे. कोणी मृत झाल्यास स्मशानयात्रा, सावडणें, सपिंडी, दाहावा, बारावा, अगर तेरावा वगैरे प्रसंगीं हजर राहण्याची वहिवाट आहे. पंच ( चौधरी ) ज्या वर्धा किंवा हुकूम देईल त्या मान्य करून पूर्ण समजून घेण्याचें कर्तव्य आहे. पंचाचे हुकूम, समाजांतील कामें वगैरे संभाळून बाहेरचीं अन्य कामें करण्यास मनाई नाहीं. समाजाचें काम आवरण्यासारखें नसल्यास किंवा अन्य कांहीं अडचण असल्यास मदत ह्मणून त्याच्या आप्तांनीं काम करण्यास हरकत नाहीं; परंतु त्यांस पंचाचे हुकुमावांचून हक्क मिळणें शक्य नाहीं. चालू हक्कदारीमध्यें खोटी किंवा खंड होऊं नये म्हणून आप्त मदतगारासारखे ठेवल्यास प्रसंगीं पंचांच्या खुशीनें त्यांसही नेमणूक देण्याची वहिवाट आहे. वार्षिक संक्रांत, अमावास्या, राखीपौर्णिमा आणि इतर सणांत अन्न मागण्यास आल्यास धान्य किंवा अन्न देतात. जातीचा हक्कदार या नात्यानें त्यानें त्याच्या जोखमीचीं सर्व कामें केलीं पाहिजेत. जरी न्हावी हा सर्व कार्यांत हजर असतो, तथापि त्यास अन्नव्यवहारांत मुळींच सामील करीत नाहींत.

# लोकसंख्या.

हिंदुस्थानांतील निरनिराळ्या भागांत आमच्या जातीची सुमारें चार लक्ष लोकसंख्या असावी; त्यांपैकीं आह्मांस पत्रोत्तरीं जी अजमासानें माहिती मिळाली आहे, तीवरून ही खालील लोकसंख्या दिली आहे:—

**राजपुताना.**

जयपुर शहर, ४०००.
जयपुर जवळील खेड्या पाड्यांत, ८०००.
सांगोनेर, ४००.
फुलेरा, १२५.
ब्यावर, ४००.
भरतपूर, ३५०.
अलवार, ३००.
टांक, २९०.
बुंदीसंस्थान, २५०.
बुंदी शहर, २००.
श्रीनगर, २००.
जोहवाडा, २००.
जोबनेर, २००.
उधनस, २००.
मोरंडी, २००.
काचरोदा, २००.
सवाई जयपूर, २००.
किसनगड, २००.
निंबहेरा, १००.

**मेवाड.**

उदेपूर, १४००.
चितोडगड, १२५.
जोधपूर, १२५.
श्रीनाथद्वार, १२०.

**पंजाब.**

दिल्ली, ६००.
हिसार, ८००.
भिवानी, ६००.

**मध्यहिंदुस्थान.**

रतलाम, ६००.
बडनगर, ४००.
माळवा प्रांत, ६०००.
जुनी इंदोर, ३००.
नवी इंदोर, २९०.
जावद, १२५.
निमच, ७९.

**संयुक्तप्रांत.**

बिंद्रावन, ८०.
मथुरा, ६०.
आग्रा, २५.
काशी, २५.

**मध्यप्रांत.**

नागपूर जिल्हा, ६००.

**वऱ्हाडप्रांत.**

अकोला जिल्हा, ७५०.
उमरावती जिल्हा, ७००.
बुलढाना जिल्हा, २९०.
इलिचपूर जिल्हा, २००.
हैद्राबाद डेक्कन, २५.
औरंगाबाद, ५००.
जालना वगैरे, २००.

**मुंबई इलाखा.**

मुंबई, व कोकणपट्टी इ. ५००.
पुणें शहर, ९००.
पुणें जिल्हा, ५००.
खानदेश जिल्ह्यांतील गांव व खेडीं, ४०००.
नगर जिल्हा, ९००.
सोलापूर जिल्हा, १५०.
कोल्हापूर संस्थान, १००.
सातारा जिल्हा, ७५.
बेळगांव जिल्हा, ९०.
धारवाड जिल्हा, २९.
सुरत, बडोदे, अहमदाबाद ५०.

**सूचना**—एकाच नांवाच्या अशा पुष्कळ जाती आहेत; परंतु केवळ नांवांवरूनच त्या सर्व एकच जाती आहेत असें होत नाहीं.

## जातिपंचायतीचें साधारण स्वरूप.

आपणामध्यें फार पुरातन काळापासून ज्या संस्था चालत आल्या आहेत, त्यांपैकीं “ **जातपंचायत संस्था** ” ही एक होय. ही संस्था अत्यंत उपयुक्त व महत्वाची आहे. ही संस्था ज्या मूलतत्वावर स्थापन केली आहे, तें मूलतत्व विद्याचारसंपन्न लोकांनींही मान्य केलें आहे. ग्रामपंचायत, स्थानिक स्वराज्य, लोकनियुक्त कायदे कौन्सिल आणि **पार्लमेन्ट** सभेसारख्या अत्यंत विकास पावलेल्या संस्था ह्यांची देखील उभारणी व रचना याच जात पंचायत संस्थेच्या मूलतत्वावरच झालेली आहे. जातपंचायत संस्था ही जातींतील लोकांच्या हक्कांचें सरंक्षण करणारी, त्यांच्यामध्यें विद्यावृद्धि करणारी आणि जातीची सुधारणा करणारी आहे; आणि पार्लमेंटसभा ही देशाच्या आणि प्रजेच्या हक्कांचें संरक्षण करणारी आहे; म्हणजे देशांतील यच्चयावत लोकांच्या हक्कांचें सरंक्षण करणारी आहे; यावरून असें ढळढळीत दिसून येतें कीं, जातपंचायत संस्था ही पार्लमेन्ट सभेसारख्या प्रचंड संस्थेची जननी आहे; पार्लमेन्ट सभा ही आपल्या देशाचें कल्याण करण्यासाठीं जशी झटत आहे, तशीच जात पंचायतीनेंही आपल्या जातींतील लोकांचें कल्याण करण्यासाठीं झटलें पाहिजे; इतकेंच नाहीं, तर हें तिचें खरें ब्रीद आहे. जातपंचायत संस्था स्थापन करण्याचा मुख्य हेतू असा आहे कीं, आपल्या जातींत विद्यावृद्धि झाली पाहिजे, आपल्या जातींतील लोकांना योग्य न्याय मिळाला पाहिजे, गरीबांना योग्य साह्य केलें पाहिजे, गरीबांचा छल करणारांचा योग्य बंदोबस्त झाला पाहिजे, सर्वांनीं न्यायानें वागावें आणि अन्यायमूलक वर्तन करतील त्यांना योग्य शासन मिळालें पाहिजे; आणि लोकांची अनाचाराकडे प्रवृति होऊं नये अशी त्यांच्या मनामध्यें निरंतर दहशत बसली पाहिजे. आपल्या जातींतील तंटेबखेडे बाहेर जाऊं नयेत, आणि त्यांचा आपण आपसांत निकाल करावा, आणि ज्ञातींतील क्षुल्लक खटले सरकारदरबारांत जाऊं नयेत, हा हेतू कांहीं वाईट नाहीं.

ज्या संस्था योग्य मनुष्याच्या हातीं असतात, त्यांचा परिणाम चांगला होतो; आणि ज्या संस्था अयोग्य मनुष्यांच्या हातीं असतात, त्यांचा परिणाम

अर्थातच वाईट होतो. तद्वत् ही जातिपंचायत संस्था अयोग्य मनुष्यांच्या हातीं गेल्यामुळें त्यांच्यापासून गोरगरिबांचा अत्यंत छळ होत आहे, त्यांना मनस्वी ताप होत आहे, त्यांना योग्य न्याय मिळत नाहीं, आणि पंचांच्या निकाला-वर पुढें अपील करण्याचा मार्ग नसल्यामुळें त्यांना जुलूम व अन्याय सहन करावा लागत आहे. जातपंचायत ही संस्था चांगली खरी, पण ती अज्ञानी, गर्विष्ठ व जुलमी लोकांच्या हातांत गेल्यामुळें ती अगदीं टाकाऊ झाली आहे. बळी तो कान पिळी या ह्मणीप्रमाणें ते गरिबांचे काळ झाले आहेत. जात-पंचायत संथेस सांप्रत किती हीन अवस्था प्राप्त झाली आहे, त्याचें स्वरूप वाचकांस प्रथम दाखविणें इष्ट व आवश्यक आहे.

सुज्ञ जन जे आहेत ते परस्परांस सुखप्राप्ति व्हावी एतदर्थ अनेक महत् कृत्यें करितात. त्यांच्याच सत्कृत्यांच्या योगानें सर्व मनुष्यांस थोडाबहुत तरी सुखाचा अंश प्राप्त होतो. मृत्युलोकीं स्वर्गसुखाच्या विश्रांतीचे हेच कोणी बाग जाणावे; तेणेंकरून ईश्वराचें स्मरण होऊन पुण्यफल पदरांत पडतें. *रावणादिकांसारख्यांचें जें आचरण तेंच मृत्युलोकीं +++ कुंड जाणावें. जे सद्‌गृहस्थ आहेत, ते विवेकबुद्धीला जागृत ठेवून यथाशक्ति सुखप्राप्तीची करणी करून दाखवितात. त्यांचा रस्ता पुण्यशील सुखबागेकडे जातो. जे लोक विवेकबुद्धि सोडून दुराचरण करितात, त्यांची करणी जातींत व एकंदर व्यवहारांत रावणासारखी दुराचारी होऊन, त्यांच्या जे संगतीला लागतात, त्यांचा रस्ता +++ कुंडाकडे जातो. तें +++ कुंड "जातींत पंचायती कर-ण्याचा प्रकार आणि गरिबाचा छळ" यांत ढळढळींत दिसून येतें. तो प्रकार असा:—

जातींत ज्याजवळ दोन पैसे आहेत, त्यास बहुतकरून असा गर्व होतो कीं, 'माझेंच वर्चस्व जातींतल्या सर्व गोरगरिबांवर असावें." ह्मणून तसले

---

* रा. हिरवे यांनीं '**शूद्र जातींच्या पंचायतीचे अनर्थकारक परिणाम आणि त्यांस उपाय**' या नांवाचें एक पुस्तक छापून प्रसिद्ध केलें आहे. त्यांत त्यांनीं पंचायतीमुळें कित्येक जातींत कसकसे अनर्थकारक परिणाम होतात, तें दर्शविलें आहे. तें वाचकांच्या दृष्टीस पडावें ह्मणून त्यांतील कांहीं भाग या लेखांत उतरून घेतला आहे.

बनलेले रावण आजपर्यंत निरर्थक दीर्घ प्रयत्न करीत आले; त्या रावणांस कोणी चौधरी, कोणी पटेल, कोणी शेट्या, आणि कोणी कारभारी ह्मणतात; आणि त्यांच्या अष्टप्रधान कामगारांस टोपण नांवानें 'कुटाळ' ( किंवा++++ चौकडी ) म्हणतात. जातींत त्यांच्या दीर्घ न्यायाची सभा चालावी, म्हणजे रावणी कचेरींत जातीच्या लोकांनीं हजर राहण्याकरितां त्यांस बोलावणें करण्यासाठीं कोणीतरी एक मनुष्य पाहिजे आणि जो तें काम करतो, त्यास कोणी न्हावी, मेहत्र्या अथवा चौघुला' ह्मणतात. त्या रावणी (बोकेबुवाच्या) अमलाखालीं राहणारे गोरगरीब, दीन, अज्ञान लोक ( उंदिर ) ही त्याची प्रजा जाणावी. न्हावी, मेहत्र्या अथवा चौघुला हा गरीब बिचारा दीन अवस्थेंतला मनुष्य, जातींत दोन पैसे बाळगणाराच्या आधीन असतो. त्यास चौधरी, कारभारी अथवा शेट्या हुकूम करील, त्याप्रमाणें वागावें लागतें. रावण आणि त्याचे कुटाळ कामगार मिळून रावणाची कचेरी बनते. ह्याच कचेरीला लोखंडी गांवकूस म्हणतात. ही लोखंडी शींव अथवा मर्यादा फक्त कोणी गरिबांनीं न ओलांडावी म्हणून त्या रावणी न्यायाधिशाची घारीसारखी तीक्ष्ण दृष्टि असते.

त्या रावणी कचेरीच्या कामाचा पहिला मासला असा आहे कीं, ती लोखंडी शींव अथवा मर्यादा क्वचित् कोणी गरीबानें उल्लंघन केली कीं, कुटाळ मंडळीच्या साह्यानें वारंटें बजावणारा न्हावी शिपाई शींव उल्लंघन करणारास त्या रावण न्यायाधिशाकडे नेतो. मग तो त्या जुलमी अमलाखालीं राहणारा गरीब मनुष्य घाबरून जातो; कारण कीं, दोन पैशाचें ऐश्वर्य आणि चौधरीबुवांचा बागलबुवा पाहून तो दिपून जातो. असें होणें हें गरिबीचें साहजिक लक्षण आहे. त्याला त्या बोके न्यायाधिशानें लाल डोळे करून धमकीनें प्रश्न विचारावे कीं, "ही जातीची शींव तूं कां उल्लंघन केलीस ?" श्रीमंत चौधरी कुटाळ आणि त्याचे बगलबच्चे यांनीं जर कितीही उल्लंघन केली तर तिकडे मुद्दाम डोळेझांक होते; पण त्या गरीब बापड्यानें भीत भीत कितीही खऱ्यास अनुसरून उत्तर दिलें, तरी तें न जुमानतां त्या बोकेन्यायाधिशानें आपलेंच घाणेरडें अन्यायाचें पालथें माप त्याच्या पदरांत घालण्याचा जुल्म करावा.

तो गरीब बिचारा तें माप जर न घेईल, तर त्या रावणाचे अष्टप्रधान कुटाळ (++++ चौकडी) कामगार जवळ असतातच, त्या सर्वांनीं मिळून त्या दीनावर जुलुमाचा कडेलोट करावा. इतकेंहि करून जर तो मुकाट्यानें शरण आला नाहीं, तर त्याला लागलीच धमकी देऊन सांगावें कीं, 'तूं आतां जातींत फार माजला आहेस. तुझी तजवीज सर्व जात जमून करूं, तेव्हां खात्री होऊन सीमोल्लंघन करण्याची तुझी खोड मोडेल." नंतर तो जुलमी न्यायाधिश आणि त्याचे अष्टप्रधान कुटाळ कामगार पंचाईत जमविण्याच्या विचारांत असतात; कारण कीं, त्या बिचाऱ्याचें जरी खरें आहे, तरी त्यानें जातीची शींव उल्लंघन केली, म्हणून त्यास हर तऱ्हा करून पालथा घातला पाहिजे. असें करण्याचें कूट एकदां अंधारांत ठरलें कीं, अमुक रोजीं जातीची पंचाईत होणार आहे, असा हुकूम न्हावी शिपायास फर्मावितांच तो त्याप्रमाणें जात जमवितो. त्या समयीं अज्ञान व गरीब लोक संख्येच्या भरतीकरितां जमतात. मग त्या गरीब मंडळीस कोणी एका कुटाळ कामगारानें असें कळवावें कीं, 'पहा, त्या फलाण्या माणसानें दांडगावा करून जातीची मर्यादा उल्लंघन केली, त्याला काय दंडखंड अगर शिक्षा करावयाची असेल ती करावी; परंतु डागल्याखेरीज त्यास तसा सोडूं नये." यांप्रमाणें पहिल्यानेंच मिनिट ( ठराव ) करून जावें. मग ते शेंपन्नास गरीब, दीन व अज्ञानी बिचारे—त्या कचेरीच्या ऐश्वर्याकडे पाहून भुलणारी प्रजा. त्यांच्या तोंडावाटे काय उत्तर निघावयाचें आहे! ते उगीच तोंडाकडे टकमक पाहून खालीं माना घालून बसतात. नंतर त्या कुटाळांपैकीं, दुसरा एकजण म्हणतो कीं, 'त्याला अमुक दंड करावा." तिसऱ्यानें जरा डोळे फिरवून किंचित् रागानें जास्ती दंड सांगावा, चौथ्यानें म्हणजे सर्वांच्या मागाहून त्या रावण न्यायाधिशानें तर लागलेंच तोंड फुगवून व डोळे वटारून कावरीबावरी नजर करून जमलेल्या मंडळीस एकदम गर्जना करून सांगावें कीं, 'त्या माजलेल्या मनुष्याची वहिवाट जातींत अजिबात बंद करावी." वहिवाट बंद करूं नका म्हणणारा छातीचा धड पुरुष त्या जमलेल्या बापड्यांत कोणता असणार? कोणाचीच मगदूर होत नाहीं. कदाचित् कोणी बोललाच तर त्याचें ऐकतो



नंबर ११ आग्रा.



अलहाबाद.



नंबर १२ नेरी. ( खानदेश )

येथील आमचे ज्ञातबंधु.

या फोटोंतील नांवें परिशिष्ट ब मध्यें पहा.

The Bombay Art Printing Works, Fort.

कोण ? ऐकलेंच तर त्याला दरडाविला कीं, सर्वांचीच चांदी उतरते. मग आणखी दुसरा कशाला वर बघतो ? सारांश, पूर्वीं अंधारांत कुटाळांनीं, कूट केल्याप्रमाणें आतां नुस्ता पंचायतींत तसा ठसा मात्र उमटावयाचा आहे. मग तसा ठसा उमटल्यावांचून राहत नाहींच. ठसा उमटला कीं, लागलेंच रामराम करून रावणीपंचाईत बरखास्त होते. नंतर जुलमानें ठरविलेल्या आरोपीस त्या कुटाळांनीं ओळख द्यावी कीं, " कां, तुला अंधरांत शरण ये म्हणून सांगितलें होतें, परंतु तुला मस्ती फार; आतां खुशाल एकटा सडत बैस." अशीं दोनचार उदाहरणें जातींत झालीं कीं, रावणी न्यायाधिशाचा आणि कुटाळांचा पगडा अथवा वर्चस्व जातींत बसलें.

रावणी न्यायाधिशाच्या आणि कुटाळांच्या आप्तवर्गांनीं अगर त्यांनीं स्वतः कसाही जातींत दांडगावा करावा, दारू प्यावी, जातीच्या गोरगरिबांस शिवी-गाळ करावी, किंवा पाहिजे तो अनाचार करावा. जणूंकाय त्यांस परवानगीच आहे. त्याविषयीं जर कोणी गरिबानें भीत भीत गोष्ट काढली, कीं त्याला खाडकन् त्याच वेळेस धमकावून टाकावें कीं, " आतां बोललास तें बोललास, पण आमच्या घरीं येऊन अगर जातींत येऊन जर बोलशील तर उलटें तुझेंच पारिपत्य करूं; मग उगाच आमच्या नांवानें रडत बसशील." शेवटीं त्या बिचाऱ्यानें दहापांचजणांजवळ चूं चूं करून उंदराप्रमाणें गपचूप बसावें. सारांश ज्या ज्या जातींत पंचायती करण्याची वहिवाट आहे, त्यांतील दोन पैसे बाळगणारांनीं मात्र गरीबगुरिबांचें काळ व्हावें आणि मन मानेल तसा स्वतः जातींत दांडगावा करून दुराचरणानें वागावें. ही केवढी जुलमाची घाशीराम कोतवाली आहे बरें ?

दुसरा मासला कोठें कोठें असा आहे कीं, फक्त गर्विष्ठ रावण ( पटल ) आणि त्याचे साथीदार कुटाळ ( हांजी हांजी करणारे ) यांनीं तर निमित्ताला देखील गोरगरीबांस न जमवितां वादी मात्र तोंडपुजा माणूस असला कीं पुरे. प्रतिवादी स्पष्टवक्ता माणूस असला तर त्याजविषयीं वादीनें जरा कानांवर कसलीही गोष्ट घातली कीं, त्याला त्याच्या स्पष्टवक्तेपणाबद्दल डागावा, ह्मणजे जातीची शिक्षा करावी; आणि अजिबाद जो ह्या रावणी

कचेरीच्या मताप्रमाणें वागत नाहीं, त्याला तर हां हां ह्मणतां पापडाप्रमाणें भाजावा आणि लागलाच शिपायास (न्हाव्यास, मेहेत्र्यास) सक्त हुकूम द्यावा कीं, "त्याला आमंत्रण देऊं नको." याला अपंक्त केला आहे. आतां याला काय उपाय करावा ? याप्रमाणें हायतोबा करीत मुकाट्यानें ते सर्व आप्तजण चुरमुऱ्याचे लाडू खात बसतात; कारण, त्याचा मामा, काका अगर भाऊबंद हेही गरीब, अज्ञान व भित्रेच असतात. त्यांच्या अंगीं मुळींच धारिष्ट नसतें. ते त्याला असा उलट उपाय सांगतात कीं, " तूं पंचांशीं दांडगावा कां करतोस ? आपण गरीब व कुटुंबवत्सल माणसें; ते सांगतील तसें मुकाट्यानें वागावें, त्यांच्याशीं नमून आर्जवानें रहावें, आणि पायां पडलास ह्मणून डोकें झिजतें का ?" मग तोही कच्याच दिलाचा घाबरलेला माणूस भयभीत होऊन निरुपाया-स्तव कुटाळांबरोबर पुन्हा गोड गोड बोलूं लागतो. जों जों ते त्याला झिट-कारून टाकतात, तों तों हा अधिक अधिक हांजी हांजी करूं लागतो. शेवटीं त्याला ते कुटाळ बोलतात कीं, " असें नुसतें कोरडें गोड गोड बोलून काय तुझी जातींत तजवीज होणार आहे ? " मग तो नाडलेला मनुष्य त्या कुटाळास कोणत्यातरी नीमित्तानें नम्रपणा दाखवील किंवा आपला सत्या-भिमान सोडला असें दाखवील तेव्हां त्या बिच्याऱ्यास पुन्हां जातींत घेतात.

सारांश, रावणकचेरी जसा दिवटा मिरवील, त्याप्रमाणें सर्व गरीब प्रजेनें निमूटपणें वागलेंच पाहिजे. सर्व गोरगरिबांनीं चाकराचाही पडचाकर अथवा गुलामाचाही पडगुलाम होऊन, वासराच्या तोंडाला जशा मुसक्या घालतात, किंवा चोर बकरे चोरतात, तेव्हां बकऱ्यांनीं ओरडूं नये म्हणून त्यांच्या जिभेला कांटे टोंचतात, तद्वत् जातींतील सर्व दीन लोकांनीं आप-आपल्या तोंडाला मुसक्या घालून अथवा तोंडास खीळ घालून जातींत बसावें; आणि रावणकचेरी हुकूम फर्मावील त्याप्रमाणें गुपचीप मुक्या जनावरां-प्रमाणें वागावें; कारण कीं, ती जातीची लोखंडी तटबंदी शींव कोणी गरी-बानें उल्लंघन करूं नये; परंतु रावणकचेरीनें मात्र मनास वाटेल तसें वागावें, बोलावें ! शिवाय त्याविषयीं गरीबानें ब्रदेखील काढूं नये. ह्या प्रकाराला तोंड धरून बुक्यांचा मार, नाहीं तर काय म्हणावें ?

अशा पंचायतीला वेताळाचें भुतावळें नाहीं म्हणावें तर काय समजावें ? शिकलेल्या लोकांस आतां अशी घाणेरडी स्थिति आणि जातींतल्या दोन पैसेवानांचें जुलुमाचें जूं मुळींच आवडत नाहीं; कारण वटवृक्षामाणें ज्ञानांकुराच्या मुळ्या हृदयांत शिरून ज्ञानाच्या योगानें मनुष्याच्या वागणुकींतही सुधारणा यंत्रादिकाप्रमाणेंच झाली पाहिजे, अशी ज्ञानाची योग्यताच आहे. परंतु पंचायती करण्याचा प्रकार वाडवडिलांपासून जो चालू आहे, त्यापासून आजपर्यंत कोणती सुखप्राप्ति झाली बरें ! आजतागाईत पंचायती करून सुखाचा लवलेश प्राप्त झाला नसून उलट वंशपरंपरा एकमेकांपासून एकमेकांस दुःख, क्लेश, संकटें आणि त्रास मात्र आपण सर्व पंचायती करणाऱ्या जाती भोगीत आलों आहोंत. हेंच येथें +++ कुंड जाणावें. ह्या +++ कुंडाचे जे रक्षक गर्विष्ठ रावण तेच यमराजे जाणावें; आणि जे कुटाळ त्यांच्या हाताखालीं कामगार आहेत, तेच यमदूत जाणावे. यालाच इहलोकीं '**यमपुरी**" म्हणावें. हा जुलमाचा प्रकार आतां ज्ञानाच्या प्रकाशानें इंग्रजी राज्यांत चकचकीत दिसूं लागला आहे.

पंचाईत करणें म्हणजे न्याय करणें; न्याय करणें हें सामान्य मनुष्याचें काम नाहीं. जसें देवळाच्या शिखरावर जर चुन्याचीं चित्रें करावयाचीं असलीं, तर त्यास साधारण चिखलकाम करणारा बिगारी लावून उपयोग नाहीं, तर त्याला उत्तम गवंडीच लाविला पाहिजे. जर दगडावर चित्रें खोदावयाचीं असलीं तर, त्याला धोंडफोड्या चालणार नाहीं; त्याला बारीक काम करणारा पाथरवटच पाहिजे. जर लांकडावर कोरींव काम करावयाचें असलें तर, त्याला लांकडाचे ओंढे कुऱ्हाडीनें फोडणारा लांकुडफोड्या लावून कोरींव काम होणार नाहीं, तर त्याला उत्तम कारागिर सुतारच पाहिजे. जर रेशमी कापडावर सुंदर कशिदा काढावयाचा असला, तर त्याला घोंगड्या तुणणारा चालणार नाहीं, त्याला उत्तम कशिदा काढणाराच पाहिजे. सारांश, ओबडधोबड अथवा दांडगें काम करणाराच्यानें नाजूक काम कधीं होणार नाहीं; कारण कीं, त्यानें लहानपणापासून बारीक काम करण्याकरितां कधींच जिवाला

तसदी घेऊन हात वळविला नाहीं; म्हणून त्याच्यानें तसलें बारीक काम कसें होईल ? हें सहजच सर्वांच्या लक्ष्यांत येण्यासारखें आहे.

मनुष्यसृष्टींत सर्वांत मोठें आणि फार नाजुक काम म्हटलें म्हणजे न्याय करावयाचें हें होय. न्याय करणें म्हणजे विटांचें माप इकडून तिकडे टाकण्याचें नाहीं. तें अकलेचें माप ब्रह्मांडांतून शोधून काढावें लागतें. आपण सर्वजण रात्रंदिवस पहातों कीं, न्याय करण्याकरितां म्याजिस्ट्रेट असून शिवाय वादी आणि प्रतिवादीतर्फे एकेक, दोनदोन वकील द्यावे लागतात. इंग्लिश पद्धत कशी आहे, ती पहा:—प्रथम आरोपीची चौकशी मामलेदारापुढें चालू होते. जर प्रतिवादीस वाटलें कीं, मामलेदाराकडून माझा न्याय बरोबर झाला नाहीं, तर तो कलेक्टरकडे अपील करतो. जर तिकडेहि त्याचें समाधान झालें नाहीं, तर तो सेशन जज्जकडे अपील करतो. तेथें जर त्यास वाटलें कीं, हाही न्याय बरोबर झाला नाहीं, तर तो शेवटीं हायकोर्टांत अपील लावितो. आणि कधीं कधीं तेथें त्यास यश मिळतें, अशींहि पुष्कळ उदाहरणें आहेत. म्हणूनच कित्येकांच्या फांशीच्या शिक्षा रद्द झाल्या आणि कित्येकांच्या जहागिरी व इनामी गांवें, जमिनी, इस्टेटी म्हणजे घरेंदारें सुटलीं. जर न्याय नसता तर कित्येकांचे निरर्थक जीव गेले असते; आणि कित्येक भिकारी होऊन देशोधडीस लागले असते. यावरून न्याय करण्याचें काम फार नाजुक असून, न्यायचातुर्याची अक्कल ब्रह्मांडांतून शोधून काढावी लागते. तें कांहीं रावणी पंचायतीसारखें दांडगाव्याचें काम नाहीं.

सेशन कोर्टांत जेव्हां ज्यूरीचे नियम पहिल्यानें चालू केले, तेव्हां शहरांतील कांहीं अशिक्षित व्यापारी लोकांस व बडे बापके बडे बेटे यांस ज्यूरींत घेऊं लागले. परंतु त्यांस विद्याबलाचें अंग नसल्याकारणामुळें न्याय आणि त्यांतील मर्म ( बारीक भेद ) बरोबर समजेनात; म्हणून ती पूर्वींची ज्यूरीची याद सरकारानें रद्द करून आतां सुशिक्षित व्यापारी लोकांस आणि सरकारी कारकुनांना मात्र ज्यूरींत घेतात. यावरून असें सिद्ध झालें आहे कीं, जर नुसता पैसा असला तर त्यास न्याय करण्याच्या बारीक पद्धती समजत नाहींत.

त्या समजण्यास विद्येचें सबळ सामर्थ्य लागतें. नुसत्या र, ट, फ करणाऱ्याची अक्कल खोल बुद्धींत शिरूं शकत नाहीं.

न्याय करण्याकरितां न्यायशास्त्र, नीतिशास्त्र, आणि अनेक धर्मशास्त्राचे ग्रंथ वाचून, मनन करून जेव्हां ज्ञानाचें भांडवल ब्रह्मांडांत सांठवावें, तेव्हां दुसऱ्याचा न्याय करण्याचें अंगीं सामर्थ्य येतें.

ब्राह्मण जात जरी इतकी सुशिक्षित आहे तथापि त्यांनीं आपल्या जातींत पंचायती करण्याचें सोडलें. त्याचीं अनेक कारणें आहेत. ते असें समजतात कीं, "आपल्या पदरचें खाऊन, लोकांचा वरंवटा घेऊन आपला माथा कुटीत बसण्यांत कोणतें शहाणपण आहे? शिवाय, त्यापासून लोककल्याणाचें कोणतें कार्य निष्पन्न होतें? पंचायती केल्यापासून उगीच विनाकारण आपआपल्या नातलगांत वैरभाव मात्र वंशपरंपरा अधिकाधिक वाढतो. जातींत पाहिलें तर कोणाचे मामे, चुलते, मावशे, काके, मेहुणे, भाऊबंद आणि सोयरेधायरे असून कोणाचे जिवलग इष्टमित्रही आहेत. अशा गोतावळ्यांत कोणी कोणाचा पक्ष घेतल्यावांचून पंचाईत होतच नाहीं. असा पक्ष घेऊन पंचाईत कर-ण्याला न्याय ह्मणत नाहींत. न्याय ह्मणजे निःपक्षपातानें जें काम करणें त्याला न्याय म्हणतात. असा शुद्ध न्याय जातींतल्या जातींत आणि आप्तवर्गात होण्याची आशा कधींच स्वप्नांतसुद्धां आणूं नये; ह्मणूनच जात जमवून पंचाईत करणें हें सुशील मनुष्याचें काम नव्हे." हें त्यांचें ह्मणणें अगदीं बरोबर आहे.

आतां जातींत सूड उगविण्याची ज्याची उमेद असते, तो प्रथम कांहीं दिवस रोजगारधंदा करून दोन पैसे मिळविण्याच्या नादांत असतो. दोन पैसे संपादन झाले कीं, षड्रिपूंनीं त्याची उचलबांगडी केलीच. मग तो जातीच्या पंचायतींत गेल्यावांचून राहत नाहीं. एकदा तो पंचायतींत गेला कीं, त्याला मागल्या गरीबीच्या वेळेस त्याजवर रावणी पंचांनीं जुलमाच्या कशा आगी पाखडल्या होत्या, त्याचें त्याला स्मरण होऊं लागतें. त्याच-प्रमाणें जर आतां त्याच्यावर किंवा त्याच्या आप्तवर्गावर जर ते पंच जुलूम

करूं लागले, तर त्यांस तो तसें करूं देत नाहीं. मग त्या पंचांच्याहि दुराचरणाच्या उखाळ्या पाखाळ्या हा काढूं लागतो; तेव्हां ते रावणी पंच जरा दबल्यासारखे एकदां दोनदां होतात आणि तिसऱ्यानें कुटाळ कूट करून त्यास पालथा घालण्याचा दीर्घ प्रयत्न करितात. त्याप्रमाणेंच याचाही पुढें उद्योग चालू असतोच. तो असा कीं, हा मैंदाचें सोंग घेतो, ह्मणजे पोटांत एक आणि ओंठांत एक "मन मानभावाचें आणि करणी कसाबाची" असा मैंदपणा धरल्यावांचून याचाही सूड उगविण्याचा उद्देश शेवटास जात नाहीं. अशा रीतीनें तो भाविक लोकांस गोष्टी बोलून त्यांचीं मनें वळवितो आणि रावणी पंचाचे दुराचरणाचे दृष्टांत लोकांपुढें मांडूं लागतो; तेव्हां हळू हळू कांहीं लोकांचा याजवर भाव बसतो. हा अटोका एकदां त्याच्या अंगांत आला कीं, मी प्रतिरावण केव्हां होईन, अशा हातघाईवर येऊन ठेपलेला असतो. मग प्रसंग आला कीं, त्यानें जातींत दुसरा तट केलाच समजावा.

दोन तट झाल्यावर प्रत्येकाला कांहीं तरी टोपण नांवें मिळतात. जातींत दोन तट झाल्याची एकदां ग्वाही फिरली कीं, मग उभयपक्षांतील लोकांत कौरवपांडवाप्रमाणें हाडवैर माजतें; ह्मणजे जळीं, काष्टीं, पाषाणीं एकमेकांस शत्रु दिसून केव्हां कसा सूड उगवीन, अशी रात्रंदिवस परस्परांस तळमळ लागते! दोन तट झाल्याचा एकदां नगरा वाजवून आणि शिंग फुंकून तुतारी वाजली कीं, दोन्ही पक्षांतील लोक लढण्यास ह्मणजे वाद उत्पन्न होऊन प्रसंगीं गालीप्रदान (शिवीगाळ) करण्यास, दांडगाई आणि मारामारी करण्यास, शिवाय एकमेकांची नालस्ती करण्यास आणि व्यर्थ चढाओढीनें पैशांचा चुराडा करण्यास लागतात. ह्याप्रमाणें दांडगावा होऊं लागला कीं, परस्परांच्या आप्तवर्गांची ओळख बिलकूल राहत नाहीं. एवढ्यानेंच समाप्ति होत नसते. न्यायान्यायाच्या संबंधानें जे दोन तट झालेले असतात, ते मुख्य मुद्दे सोडून एकमेकांचे हाडवैरी कसे होतात, तें पहाः—

कोणी कोणाच्या घरीं लग्नकार्यांत, श्राद्धपक्षांत, मृत्यूच्या दिवसमासांत अन्नव्यवहार करण्याचा प्रतिबंध दोहींकडील रावण अधिकारी करितात. तेणें-

 वाचनालय सातारा

करून जातींत कलह जास्त माजतात. मुलांलेंकरांस आणि बायामाणसांस देखील त्यांच्या दुराचरणाची करणी बाधत जाते; ह्मणजे मुलांलेंकरांच्या आणि बायामाणसांच्या हाडांत व मेंदूंत, तो वैरभाव पक्का पिढीजाद बिंबला जातो. अशाप्रकारें एकाच जातीपासून अनेक भेद झाले आहेत, अशीं पुष्कळ उदाहरणें आहेत.


आतां आपण एक महत्वाच्या गोष्टीविषयीं विचार करूं; ती गोष्ट हीच कीं, आपले आजेपणजे आणि आपणही आज कितीएक पिढ्या जातीच्या पंचायती करीत आलों; परंतु त्यापासून आपणांस कोणतें सुख मिळालें ? जातींतल्या गोरगरिबांला अमुक प्रकारचें सुख मिळालें ह्मणून कोणती कल्याणकारक मशाल जळते, ती दाखवाल काय ? बेचाळीस पिढ्यांपासून कांहींना कांहीं जातींत प्रत्येक लग्नासंबंधी कर, दंडखंड वगैरे घेतच आलों, तरी कोणी दवाखाना घातला का ? कीं जातीच्या गरीब मुलांकरितां एखादी शाळा तरी कोणी घातली काय ? जातींतल्या निराश्रित मनुष्याला अन्नपाणी मिळावें ह्मणूनं कोणी तरी कीर्ति केली आहे काय ? आजतागाइत काडी-इतकें सुख कोणास मिळालें नाहीं; पण नांव घेण्यासारखें एवढेंच मात्र आपण पिढीजाद करीत आलों कीं, हा रावण मेला कीं दुसरा नेमावा; दुसरा मेला कीं तिसरा तयारच असतो; आणि या सर्वांनींच आपल्या गोरगरिबांस गुरांप्रमाणें दावणीला बांधून टाकावें. रावणारावणांनीं एकमे-कांशीं भांडून जातींत जेवढा वैरभाव वाढवेल तेवढा मात्र वाढवावा. म्हणजे भाउबंदाला भाउबंद लागूं देऊं नये, सोयऱ्याला सोयरा ह्मणूं देऊं नये. सारांश, पांच दहा वर्षांत ज्यांनीं त्यांनीं तट करवा, एकमेकांशीं जन्म-भर वैर करावें, एकमेकांनीं एकमेकांस पाण्यांत पहावें. रोजगारधंद्यांत जो जशा तावडींत सांपडेल, तसें त्यांनीं त्याला रसातळास नेऊन टाकावें; तेव्हां एकमेकांच्या जिवाची शांति होते. पहा, हा केवढा अनर्थ आहे तो !!!

जातपंचायत ही संस्था अत्यंत उपयुक्त आहे; परंतु हीस जी पिढीजाद चौधरी नेमण्याची कीड लागली आहे आणि कुटाळरूपी भुंगे लागले आहेत,

त्यामुळें ही उपयुक्त संस्था ज्या ज्या ज्ञातींत आहे, त्या त्या जातींतील पुष्कळ समंजस लोकांस निरुपयोगी आणि हानिकारक अशी झाली आहे. जर संस्थेचा हेतू उत्तम आहे, तर तीस जी कीड लागली आहे, ती काढून टाकणें हा ज्ञात्यांचा धर्म आहे. शरिराच्या एखाद्या अवयवास जर एखादा रोग जडला तर तो बरा करण्यास उपाय योजणें हें शहाणपण आहे; तो न करितां एकदम सर्व शरीर कापून टाकणें हें कांहीं शहाणपणाचें लक्षण होणार नाहीं. तद्वत् जातपंचायत संस्था ही उत्तम आहे; पण तीस जी कीड लागली आहे, ती आपण काढून टाकली पाहिजे, आणि देशकालवर्त्तमान या स्थितीस अनुसरून तिचें स्वरूप केलें पाहिजे.

जातसमाजांत पिढिजाद चौधरी नेमण्याची किंवा होण्याची वहिवाट आहे, ती कमी करून हल्लींच्या निवडणुकीच्या तत्त्वावर आणून ठेवली पाहिजे. चौधरी, पटेल, शेटये ( सरपंच ) आणि पंच नेमावयाचे त्यांची निवडणूक समाजानें बहुमतानें करावी. यांची निवडणुक ही वार्षिक अगर त्रैवार्षिक करावी. जे चौधरी ( सरपंच ) आणि पंच नेमावयाचे ते स्वधर्माभिमानी, पोक्त, विचारी, सुशिक्षित आणि निःपक्षपातबुद्धीनें काम करतील, असेच निवडावे. समाजाच्या लोकसंख्येच्या मानानें शेंकडा दहा याप्रमाणें पंच निवडावे. चौधरी आणि जातिपंच यांनीं एकत्र बसून बहुमतानें त्यांच्यापुढें येणाऱ्या प्रकरणांचा निकाल लावावा ! त्यांचा निकाल वादीप्रतिवादीपैकीं कोणा एकास जर मान्य झाला नाहीं, तर त्यांनीं किंवा पंचांपैकीं कोणास मान्य झाला नाहीं तर त्यांनीं, जातीची एकंदर मंडळी जमवून बहुमतानें निकाल करीत असावा. सरपंचाचे किंवा पंचांपैकीं कोणाचें वर्तन अयोग्य दिसून आल्यास, एकंदर समाजाच्या बहुमतानें त्यांची नेमणूक रद्द करण्याचा अधिकार जातिसमाजास आहे. सरपंच आणि पंच निवडण्याचा जसा जातीस हक्क आहे, तसाच त्यांची निवडणूक रद्द करून नवीन नेमण्याचा जातीस पूर्ण अधिकार आहे.

जें जातपंचमंडळ निवडलें असेल त्याचें काम फक्त जातींतील तंटेबखेडे यांचा निकाल लावण्यापुरतें आहे असें नाहीं, तर त्यांनीं जातींत विद्या-



बडनगर ( माळवा, मध्यहिंदुस्थान ) कडील आमचे ज्ञातबंधु.

The Bombay Art Printing Works, Fort.

प्रसार करण्याचें, अनाथांना साह्य करण्याचें आणि सुधारणा करण्याचें पवित्र व श्रेष्ठ काम पत्करलें पाहिजे, आणि या कामीं त्यांना समाजानें भरपूर द्रव्यसाह्य अवश्य केलें पाहिजे. लग्नप्रयोजनांत जी रक्कम जमत असते, तिचा व्यय जातजेवणें घालण्यांत आणि शिमग्यांत नाचरंग तमाशे करण्यांत करणें अशी जी वहिवाट पडली आहे, ती कमी प्रमाणावर करून त्या रकमेचा व्यय गरीब विद्यार्थ्यांना आणि अनाथांना साह्य करण्याकडे होत जावा. परोपकारासारखें पुण्य नाहीं आणि परपीडेसारखें पाप नाहीं, हें गीतातत्त्व जातीनें निरंतर आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें पाहिजे, आणि त्याप्रमाणें वर्तन केलें पाहिजे. हें जातीच्या उन्नतीचें काम सिद्धीस जाण्यासाठीं समाजानें आपल्या ऐपतीप्रमाणें त्यांना पैशाची चांगली मदत केली पाहिजे.

आपण आपल्या सुखासाठीं आणि संरक्षणासाठीं जसा सरकारास मुकाट्यानें कर देतों, त्याचप्रमाणें आपल्या व आपल्या जातीच्या कल्याणासाठीं आपण आपल्या स्वतःवर संतोषानें कर लादून घेणें हा आपला धर्म आहे.

---

## सभा.

**सभा** हा शब्द फार पुरातन आहे; महाभारतांत "**सभापर्व**" हा एक स्वतंत्र अध्याय आहे. त्यामध्यें सभेविषयीं विस्तृत विवेचन केलें आहे. सभा भरण्याचें प्रशस्त व सोईस्कर स्थळ **देवालय** हें होतें. देवालयांत जो मंडप बांधतात, त्यास **सभामंडप** म्हणण्याची फार जुनी वहिवाट आहे. जर हा मंडप मुद्दाम सभेसाठींच तयार केला नसता, तर त्यास सभामंडप असें म्हणण्याचा प्रघात कधींच पडला नसता; आणि जर तो कीर्तन व भजन करण्यासाठीं तयार केला असता तर त्यास **कीर्तनमंडप, भजनमंडप** असें नांव दिलें असतें; परंतु तो मुख्यत्वेंकरून सभेसाठीं केला असल्यामुळें त्यास **सभामंडप** असें नांव दिलें आहे; यावरून असें उघड उघड दिसून येतें कीं, सभा ही कांहीं नवीन नाहीं, आणि ती भरविण्यास देवालय हेंच उत्तम स्थल असल्यामुळें देवालयांतच **सभामंडप** बांधीत असत.

हल्लीं सभेंतील प्रमुखस्थानीं विराजमान होणारास अध्यक्ष किंवा सभापति म्हणण्याचा प्रचार पडला आहे; परंतु पूर्वकाळीं चतुर्धारी ह्मणण्याचा प्रघात

असे. चतुर्धारी म्हणजे चार वेद जाणणारा, किंवा मनूच्या वचनाप्रमाणें दंड, नीति, न्यायविद्या, आत्मविद्या आणि चार वेद जाणणारा असा ज्ञानी मनुष्य हा सभाध्यक्ष होण्यास पात्र आहे. चतुर्धारी याच शब्दावरून पुढें चौधरी शब्द निघाला आहे. यावरून सध्याच्या काळीं चौधरी हा वेदज्ञानसंपन्न जरी नसला, तथापि तो विद्वान व न्यायनिपुण असाच असला पाहिजे.

## उद्देश.

१. स्वजातींतील लहानथोरांचा जमाव जमवून त्यांची संघशक्ति बनवून आपण एकाच कुटुंबांतील बंधु समजून परस्परांचें हित करण्यास झटणें.

२. हीं संघशक्ति रूपी सभा सर्वांनुमतें स्थापन करावी, आणि तिला सर्वांनुमतें नांवहि द्यावें.

३. असत्याचा त्याग करून सत्याची जोड करणें.

४. धर्मशास्त्रास अनुसरून विचार करणें.

५. सर्वांबरोबर प्रेमानें वागून सर्वांना समसमान लेखणें.

६. सर्वांचें ज्यांत कल्याण त्यांत आपलें कल्याण समजणें.

७. द्वेष, अहंकार व क्रोध सोडून जातीचें ज्यांत हित आहे, असे नियम करणें, धर्म पाळणें आणि दुसऱ्यासहि पाळण्यास लावणें.

८. जातीची सुधारणा आणि विद्याप्रसार यांकडे सर्वांनीं तन, मन, धनपूर्वक तत्पर असणें.

९. जात्युन्नति सभेला काया, वाचा, मनेंकरून मदत करणें हें प्रत्येक जातिबंधूचें आद्य कर्तव्य समजणें.

१०. दुर्गुण, दुराचार, दुर्व्यसन यांचा त्याग करणें म्हणजे निशा, जुवा, निंदा, चोरी, मत्सरीपणा, वगैरेंपासून अलिप्त असणें.

## नियम.

११. हे उद्देश सफल होण्यासाठीं समाजानें एक कार्यकारी मंडळी नेमावी; त्यांत एक अध्यक्ष ( प्रेसिडेन्ट ), एक चिटणीस ( सेक्रेटरी ), एक खजीनदार ( ट्रेझरर ), एक हिशेबतपासनीस ( ऑडिटर ) आणि जातीच्या संख्येच्या मानानें सभासद असावे.

१२. एक **कार्यकारी सभा** ( म्यानेजिंग कमिटी ) आणि दुसरी **साधारण** ( जनरल ) सभा असावी.

१३. कार्यकारी मंडळीचे जातीच्या संख्येच्या मानानें शेंकडा दहा सभासद (मेंबर) असावेत.

१४. जे दरमहा कमींत कमी दोन आणे वर्गणी देणारे असतील ते साधारण सभेचे सभासद समजावे.

१५. सभेच्या सभासदांनीं बहुमतानें निवडलेले अध्यक्ष, मंत्री, खजीनदार, हिशेबतपासनीस, कार्यकारी सभेचे सभासद जे प्रथम निवडलेले ते फक्त एकच वर्षाकरितां निवडले गेले आहेत; परंतु दुसऱ्या वार्षिक निवडणुकीच्या वेळीं जे पुन्हा निवडण्यास लायक आहेत, ते कायम करणें किंवा नवीन निवडणें हें सभासदांच्या बहुमतावर अवलंबून आहे.

१६. सभेची बैठक महिन्यांतून एक वेळ करीत असावी.

१७. मध्यंतरीं सभा भरविण्याची जरूरी दिसून आल्यास अध्यक्षांचे आज्ञेवरून भरवावी.

१८. सभेचा वार्षिक उत्सव दर वर्षास करीत जावा. त्या वेळीं चिटणीसानें सभेचा जमाखर्च आणि सभेनें केलेल्या कामाचा रिपोर्ट वाचून दाखवावा. त्याच्या प्रति सर्वांस द्याव्या आणि बाहेरगांवच्या सभासदांकडेहि पाठवाव्या.

१९. कोणताहि नवीन नियम करणें झाल्यास तो सभासदांच्या बहुमतानें करावा.

२०. सभेची जमा सर्वानुमतें पेढीवर (ब्यांकेंत) किंवा एखाद्या गृहस्थाजवळ किंवा खजिनदाराजवळ ठेवावी.

२१. सभेच्या जमेंतून सभेच्या कामाप्रीत्यर्थ जास्तींत जास्ती $\frac{1}{3}$ रकम खर्च करावी.

२२. जे द्रव्यद्वारें किंवा अंगमेहनतीनें सभेस आस्थापूर्वक मदत करतील, त्यांना कार्यकारी मंडळीचे सभासद करावें.

२३. सभेचा जमाखर्च, व्याख्यानें, निबंध, पत्रव्यवहार वगैरे देशभाषेंत करावा.

२४. बाहेरगांवच्या सभासदांनीं पत्रव्यवहार करून खुलासा मागविल्यास त्यांच्या पत्राचा सभेंत विचार करून नंतर उत्तर पाठवीत जावें.

२५. प्रसंगविशेषीं बाहेरगांवीं सभेच्या कामासाठीं मनुष्य पाठविणें झाल्यास त्याचा खर्च सभेच्या शिल्लकेंतून करीत जावा.

२६. लहान लहान गांवांतून सभेच्या पोटशाखा स्थापन कराव्या आणि त्यांनीं आपला खर्च शहरच्या मुख्य सभेच्या विचारानें करावा.

२७. सभेमध्यें जे ठराव बहुमतानें होतील; त्यांवर अध्यक्ष आणि सेक्रेटरी यांनीं आपल्या सह्या कराव्या.

२८. सभेंत जे ठराव बहुमतानें पसंत आणि अध्यक्षांच्या सम्मतीनें पसंत होतील, त्यांस सभेंत गैरहजर असलेल्या सभासदांची सम्मति आहे असें गृहित धरून चालावें.

२९. कार्यकारी मंडळीचे सभासद जर आपलें काम बरोबर करीत नसतील तर त्यांची नेमणूक बहुमतानें रद्द करण्याचा आणि त्यांच्या जागीं नवीन नेमण्याचा अधिकार सभासदांस बहुमतानें आहे.

३०. सभेच्या नियमांत फेरफार करणें, दुरुस्ती करणें, नवीन करणें वगैरे वार्षिक सभेच्या बैठकींत व्हावें.

३१. सभेचे हेतु व नियम छापून प्रत्येक सभासदास देत असावें.

समाजोन्नति ही विद्याप्रसारावांचून होणें अशक्य आहे. विद्याप्रसार हा द्रव्य आणि परिश्रम यांच्यायोगानें साध्य होणार आहे; ह्मणून प्रत्येक शहरच्या आणि गांवच्या समाजानें विद्यावृद्धीची आणि समाजसुधारणेची संस्था स्थापन करणें हा धर्म आहे. प्रारंभीं थेंब थेंब मिळून त्याचें डबकें होतें आणि पुढें त्या डबक्याचें तळें होत होत सरोवर बनतें. श्रीमान, प्रमुख, स्वजात्याभिमानी वगैरे मंडळीनीं अशा सत्कार्यास यथाशक्ति साह्य करून विद्यादानाचें आणि हुन्नरप्रसाराचें महापुण्य संपादन करावें. जात्युन्नतिसभेस साह्य करण्याचे चार मार्ग आहेत. उदाहरणार्थः—१ पुरस्कर्ते होणें, २ तहाहयात सभासद होणें, ३ हितचिंतक होणें आणि ४ सभासद होणें. पुरस्कर्ता हा सभेचा आश्रयदाता अथवा पोषिंदा आहे; त्यानें कमींतकमी २०० किंवा अधिक रुपये देणगी देणारास या सभेचा पुरस्कर्ता समजलें जाईल. १०० किंवा अधिक रक्कम देणारास तहाहयात सभासद समजलें जाईल. ५० किंवा

अधिक रक्कम देणारास संस्थेचा हितचिंतक समजला जाईल. या सभेच्या साधारण सभासदांचे तीन वर्ग करावे; उदाहरणार्थः—१ ल्या प्रतीच्या वर्गणीदारांनीं दरमहा एक रुपया वर्गणी द्यावी. २ ऱ्या प्रतीच्या वर्गणीदारांनीं दरमहा आठ आणे वर्गणी द्यावी; आणि ३ ऱ्या प्रतीच्या वर्गणीदारांनीं दरमहा दोन आणे वर्गणी द्यावी. या योजनेमुळें गरिबापासून श्रीमंतापर्यंत या संस्थेस साह्य करतां येणार आहे. लहान गांवांत वर्गणीचे दर कमी असल्यास हरकत नाहीं. मोठ्या गांवांतही तेथील पुढारी मंडळीच्या बहुमतानें कमजास्त फेरफार करावा. या सभेचा कारभार सुरळीतपणें चालण्यास अध्यक्ष नेमावा. अध्यक्षाची निवड ही पहिल्या तीन वर्गांतील लोकांतून करावी. जर या तीन वर्गांत आपलें नांव कोणी दाखल केलें नसेल तर दुसऱ्या तीन वर्गांतील पहिल्या वर्गापैकीं कोणा गृहस्थास बहुमतानें अध्यक्ष निवडावा. मंत्री, खजिनदार, हिशेबतपासनीस, कार्यकारी मंडळीचे सभासद पहिल्या तीन वर्गांतून बहुमतानें निवडावे. जर या तीन वर्गांत आपलें नांव कोणी दाखल केलें नसेल, तर दुसऱ्या तीन वर्गांतील पहिल्या व दुसऱ्या वर्गांतील लोकांना बहुमतानें निवडावें. अध्यक्षानें सभेचें काम सुरळीतपणें चालवावें. प्रसंगीं तंटाबखेडा उत्पन्न झाल्यास त्याचा निकाल मोठ्या पोक्त बुद्धीनें, शांतपणें आणि मुत्सद्दी धोरणानें करावा. सभेपुढें जीं प्रकरणें येतील, त्यांचा बहुमतानें निकाल करून त्याची अमलबजावणी मंत्र्याकडून करवावी. मंत्री याचें कर्तव्य कार्यकारीमंडळीच्या विचारें काम करणें, पत्रव्यवहार करणें, वार्षिक अहवाल ( रिपोर्ट ) तयार करणें, कार्यकारी मंडळीच्या सभा नियमितपणें भरविणें, वर्गणी जमा करणें, वार्षिक खर्चाची जंत्री तयार करणें, सभासदांची नोंद ठेवणें, व नियमांस अनुसरून इतर जरूर तीं तीं कामें करणें.

**खजिनदाराचें कामः**—खजिनदार यानें बहुमतानें सभेचा फंड नेमलेल्या पेढीवर किंवा आपलेजवळ ठेवणें; आणि हिशेबाचा तक्ता वर्षअखेर कार्यकारीमंडळीकडे रुजू करणें.

**हिशेबतपासनीस याचें कामः**—कार्यकारीमंडळीकडून आलेला हिशेब तपासणें.

**फंडाचा व्यय.**—या फंडांतून स्वतंत्र शाळा स्थापन करण्याच्या भानगडींत पडूं नये. गरीब मुलांस पाट्या, पुस्तकें, फी पुरविणें आणि जे गरीब व होतकरू विद्यार्थी आपल्या गरिबीमुळें आपला विद्याभ्यास पुढें चालविण्यास असमर्थ असतील, अशा विद्यार्थ्यांची योग्य चौकशी करून त्यांना आपला अभ्यास पुढें चालविण्यास स्कॉलर्शिपरूपानें ( शिष्यवृत्ति ) मदत करणें. जातिसुधारणेसंबंधानें निबंध लिहिणें, व्याख्यानें देणें आणि जे पसंत होतील त्यांस उत्तेजनार्थ बक्षिस देणें, जातीच्या सुधारणेसंबंधानें व्याख्यानें देणारा उपदेशक नेमणें, वाचनगृह स्थापन करणें, जीं मुलें वार्षिक परीक्षेंत उत्तीर्ण होतील त्यांना शालोपयोगी पुस्तकें बक्षिस देणें आणि त्यांचा सार्वजनिक रीतीनें गौरव करणें. ज्या विद्यार्थ्यास ह्या फंडांतून मदत झाली असेल, त्यानें नोकरीधंदा लागल्यावर त्याला मदत केलेल्या रकमेची फेड आपल्या उत्पन्नाच्या मानानें दरमहा एकदशांश करीत जावी; आणि त्यानें या सभेच्या कोणत्याही वर्गाच्या सभासदांत आपलें नांव दाखल करावें. सभेचा फंड वाढविण्यासाठीं प्रत्येक दिवाळींत आणि शिमग्यांत जातींतील प्रत्येक घरावर दोन आणे वरील फंडाकरितां बसवावे. अधिक दिल्यास उत्तमच आहे. हा **दोन आणे फंड** अवश्य स्थापन करावा.

## नम्रपूर्वक विनंति.

ही जी वर सभेची रचना केली आहे आणि तिचें सामान्य स्वरूप कसें असावें हें दर्शविलें आहे, त्यांत कोणत्याच प्रकारचा नवीनपणा नाहीं, हें वाचकांच्या तात्काल लक्ष्यांत येणार आहे. अशा प्रकारच्या सभा बहुतेक ज्ञातींमध्यें त्यांच्या त्यांच्या सोईप्रमाणें आज बहुत दिवसांपासून स्थापन झाल्या आहेत. असा वास्तविक खरा खरा व उघड प्रकार असतां पुण्यासारख्या विद्याचारसंपन्न शहरांत आपल्या जातीच्या उन्नतीकरितां अद्याप सभा स्थापन होऊं नयेत, इतकेंच नाहीं, तर कोणत्याच प्रकारची पूर्व चळवळहि दिसून येऊं नये, ही मोठीच खेदाची गोष्ट नव्हे काय ? पुणें शहर हें विद्यादेवीचें आद्यपीठ आहे—माहेरघर आहे. येथें सर्व जातींमध्यें आप-

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत

आपल्या जातीच्या उन्नतीसाठीं विशेष चळवळ व दीर्घोद्योग चालू आहेत; इतकेंच नाहीं तर जात्युन्नतीसाठीं वार्षिक परिषदा, संमेलनें वगैरे भरत आहेत. मग आपणच अशा सुधारणेच्या आणि विद्याप्रसाराच्या कामीं मागें असावें, निद्रेमध्यें घोरत पडावें, ही आपल्या ज्ञातीस हीनत्व आणणारी स्थिति नव्हे काय ? खुद्द आपल्याच जातीचे लोक इतर ठिकाणीं आपल्या उन्नतीसाठीं किती तरी आस्थापूर्वक परिश्रम करीत आहेत तिकडे लक्ष द्या, आणि आपली अनास्था व निद्रावस्था दूर करा. जयपूर येथें आपल्या जातीच्या सुधारणेसाठीं "**श्री शिल्पावत जात्युन्नति सभा,**" अजमीर येथें "**श्री कुमावत जात्युन्नति सभा,**" बडनगर येथें "**श्री कुमावत क्षत्रिय जात्युन्नति सभा,**" दिल्ली येथें "**श्री जातिपीर-बद्यानि सलूकस्मा सभा**" आणि इतर ठिकाणींहि अशाच प्रकारच्या सभा स्थापन झाल्या आहेत; आणि त्यांचा सभा स्थापन करण्याचा इष्ट हेतूहि बराच सफल होत चालला आहे, असें त्यांच्या वार्षिक रिपोर्टावरून ढळढळीत दिसून येत आहे. पूर्वीं आमच्यामध्यें चांगली चांगली सुशिक्षित मंडळी होऊन गेली; परंतु त्यांची जागा भरून काढण्यास पुढें मंडळी होऊं नये, ही किती खेदाची आणि शोचनीय स्थिति आहे बरें ! आपणामध्यें पुष्कळ थोर थोर कॉंट्रॅक्टर होऊन गेले, आणि सध्याहि आहेत. परंतु त्यांच्यापैकीं पुष्कळांना विद्येचा आणि त्यांतहि मुख्यत्वेंकरून इंग्रजी विद्येचा गंध नसल्यामुळें त्यांना आपलें हें अज्ञान जागोजागीं नडत आहे. त्यांना युरोपिअन ऑफिसरांबरोबर इंग्रजी बोलतां येत नसल्यामुळें त्यांचें पुष्कळ वेळां नुकसान झालें आहे. आमची जात ही जी कॉंट्रॅक्टी कामाच्या योगानें इतकी सधन झाली आहे; त्या या कॉंट्रॅक्टी कामामध्यें इतर शिकलेल्या जातीचे लोक पडल्यामुळें आतां आमची कॉंट्रॅक्टी कामांत मोठीच पिच्छेहाट होत आहे. याचें कारण काय ? तर आमच्यामध्यें विद्येचा अभाव हेंच होय. आमची नैसर्गिक बुद्धि जरी चांगली आहे खरी, तथापि तिला विद्येची जोड नसल्यामुळें आमच्यानें पूर्ववत् कॉंट्रॅक्टी कामामध्यें पुढें सरसावून पाऊल टाकतां येत नाहीं. यासाठींच आमच्या ज्ञातिबंधूंनीं **सभा**

स्थापन करून आपल्या जातींतील बुद्धिवान व होतकरू विद्यार्थ्यांना मदत करून पुढें आणण्याचें पुण्य संपादन केलें पाहिजे. आह्मी श्रेष्ठ ज्ञातीचे आहोंत. हा आमचा श्रेष्ठपणा कायम राखण्यास आपण विद्येंत पुढें आघाडी मारली पाहिजे. आपल्या जातीचा श्रेष्ठपणा हा आपल्या जातींतील सुशिक्षित लोकांवरच सर्वस्वी अवलंबून आहे, ही गोष्ट आमच्या लोकांनीं निरंतर लक्षांत ठेवली पाहिजे. यासाठीं आमच्यामध्यें सुशिक्षित लोकांची संख्या जेणेंकरून वृद्धि पावेल, त्याच दिशेनें प्रयत्न केले पाहिजेत. हें काम ज्ञातींतील प्रमुख लोकांवर सर्वस्वी अवलंबून असल्या कारणामुळें त्यांनीं या कामीं आस्थापूर्वक परिश्रम केले पाहिजेत. इतर चटसाऱ्या जाती विद्यारूपी शर्यतीमध्यें मोठ्या आवेशानें धांव मारीत आहेत; अशासमयीं आपण स्वस्थ बसून रहावें, ही स्थिति सर्व प्रकारें अनिष्ट व त्याज्य होय. ती सत्वर दूर केली पाहिजे. जर आह्मी असेच स्वस्थ बसलों, तर आमच्या पुढील पिढीस फार वाईट दिवस येणार आहेत, याचा आमच्या ज्ञातबंधूंनीं अवश्य विचार करावा. या आमच्या सूचनेची "**नळी फुंकिली सोनारें आणि इकडून तिकडे गेलें वारें**" अशी अवस्था होऊं नये, यासाठीं आपण कोणत्याहि प्रकारचा विलंब न लावतां आपल्या जातीमध्यें विद्याप्रसार करण्यास जातींत सर्वांचा एक विचार करा आणि तन, मन, धनपूर्वक प्रयत्न करण्यास सुरवात करा. विद्या ही सर्व सुधारणेची किल्ली आहे, ती प्रथम संपादन करा.

शेवटीं, हा बराच वाढलेला ग्रंथ समाप्त करण्यापूर्वी **श्रीतुकाराम महाराज** यांच्याच शब्दांत मी आपल्या ज्ञातबंधूंजवळ असें नम्रतापूर्वक मागणें मागतों कीं:

**बोलिलों जें कांहीं तुमचिया हिता । वचन नेणतां क्षमा कीजे ॥**
**वाट दावी तया नलगे रुसावें । अतित्याई जीवें नाश पावे ॥ १ ॥**
**निंब दिला रोग तुटाया अंतरीं । पोभाळितां वरी आंत चरे ॥**
**तुका ह्मणे हित देखण्यासी कळे । पडती अंधळे कूपांमाजी ॥ २ ॥**

**समाप्त.**

## परिशिष्ट अ.
## आमचा समाज व त्याचें कर्तव्यकर्म.

कित्येक संस्थानांत ग्रामपंचाइतीचें हल्लींच्या कालानुरूप पुनरुज्जीवन होऊं लागलें आहे; परंतु त्यांतील सभासद हे कांहीं पिढीजात सनदी कदमी नसतात; ते सर्व ग्रामवासी जनाकडून निवडलेले असतात; तद्वत् जातपंचाइतींतील चौधरी, पटेल व सरपंच हे बहुमतानें निवडलेले असावेत, ह्मणजे ते उभय पक्षास सुखावह होऊन अशा प्रकारच्या संस्था ह्या समाजमान्य होतात.

ज्या ठिकाणीं जातगंगेची पंचविसाच्या वर मंडळी असेल त्यांस सकल पंच, समाज, एकत्र मंडळी वगैरे म्हणण्याची वहिवाट आहे.

ज्या गांवांत पन्नासाच्या वर घरांची स्थाइक वस्ती असेल, त्या ठिकाणीं एकंदर समाजाच्या मतानें हुशार अशा एकदोन गृहस्थांस पंच नेमलें जातें व या नेमलेल्या पंचांस आजूबाजूच्या गांवांतील मंडळीनें मान देणें इष्ट आहे.

ज्या शहरांत जातीची पुष्कळ वस्ती आहे, त्या ठिकाणीं शंभर ते दोनशें घरांचे मानानें सरपंच, पटेल व चौधरी व कांहीं पंच असतात.

चौधरी, सरपंच, पटेल व पंच हे पिढीजाद नसून समाजानें नेमलेले असावेत व एक किंवा तीन वर्षांनीं योग्य गृहस्थांस बहुमतानें नवीन नेमणें हें उत्तम. तसेंच सरपंच ते अयोग्य आहेत असें समाजाच्या बहुमताच्या लक्षांत आल्यास त्यांचा अधिकार काढून घेण्याचा जसा समाजास अधिकार आहे, तसाच नवीन नेमण्याचाही आहे.

चौधरी, सरपंच, पटेल किंवा पंच हा विचारी, स्पष्टवक्ता, शांत स्वभावाचा विद्वान्, ज्ञानी, सत्यवक्ता, धूर्त, स्वधर्माभिमानी, व्यसनरहित, व लोकप्रिय असा असावा व अशाच गृहस्थास मान देण्याचें समाजाचें पाहणें आहे. लहानथोर समंजस एकंदर जातगंगा जमवून ज्या गृहस्थाबद्दल ज्यास्त मत मिळेल, त्यासच सरपंच हा मान देत जावा.

बहुमतानें ज्या गृहस्थास सरपंच हा मान देण्याचा निश्चय झाला असेल, त्यास एकंदर समाज बोलावून ब्राह्मणाचे हस्तें गंधाक्षता लावून, शेला, पागोटें देऊन दोन पानांचा जोड विडा द्यावा व जमलेल्या मंडळीस बहुमतानें पेढे किंवा लाडु वांटण्याची व्यवस्था झाल्यास उत्तम, अगर पानसुपारी वांटणें. हा सर्व खर्च समाजाच्या जमेंतून करीत जावा.

ज्यास हा मान मिळाला असेल त्यानें सवडीप्रमाणें थोड्या दिवसांत आपले शक्तीप्रमाणें सकलपंच जातगंगा पुरुष स्त्रियांसह जेवण द्यावें किंवा लाड्ड वांटावेत.

जातींत कोणत्याही प्रकारच्या कार्याचे वेळीं प्रथम यांना दोन विडे देण्याचें विसरू नये. तसेंच जे कोणी कांहीं वांटतील तेंही प्रथम दुप्पट देऊन नंतर सर्व जातबांधवांस वांटावें.

कोणत्याही प्रकारचे आपसांतील वाद, देणें, घेणें, धर्माविरुद्ध आचरण वगैरेबद्दल आपसांतच शेवटास लावावें. आपसांत निकाल लागत नसल्यास समाजाकडून न्याय घेत असावें व त्यानें पुढें दुसरीकडे न्याय मिळविण्यास जाऊं नये.

**पंचाईत**—बैठकीचे दिवशीं सर्व समंजस जातगंगा मंडळीनें आलें पाहिजे अगर दर घरचा एक तरी इसम हजर राहणें धर्म आहे. परंतु विशेष कारणपरत्वें सवलत असावी. पंचाइतीची बैठक वर्षांतून ४ वेळां जमवीत जावी, व अशा प्रसंगीं ज्या कांहीं तक्रारी, अर्ज, विनंती वगैरेंचा न्याय बहुमतानें कायम करून त्याचा निकाल सरपंचांकडून देत असावा.

जमा वाढविण्याकडे समाजाचें जसें लक्ष असतें तसेंच तिचा सदुपयोग करण्याकडेही असणें साहजिक आहे. पंचांची जमा ज्या पेढीवर ज्या गृहस्थाचे किंवा सरपंचाचे नांवानें व्याजीं ठेवली असेल, त्यानें जमाखर्चाच्या हिशेबाच्या वह्या ठेवल्या पाहिजेत, आणि दर वर्षाचे पंचाइतीचे बैठकींत सर्वांस कळवीत जावी; इतकेंच नाहीं तर हिशेब पंचांस रुजु केल्याच्या सह्या घेतल्यास कांहीं हरकत नाहीं. असें केल्यानें हिशेब ठेवणाऱ्यावर फारसें जोखीम राहात नाहीं.

जातगंगा श्रीमंत असल्यानें कर्ज काढण्याची कधींही वेळ येत नाहीं तर हमेशा जमा असते. प्रसंगीं वर्गणीनें खर्च पुरा करितां येतो. जातगंगेच्या जमेचा खर्च प्रयोजनमार्गें फारसा करूं नये. विद्यादान, हुन्नरोत्तेजन, अनाथ, पंगु वगैरेंस आश्रय देण्याकडे करावा.

समाजाचे मुख्य हक्क अशुभ कार्य वर्ज्य करून इतर शुभ कार्यावर, लग्न, पुनर्विवाह, प्रथमसंतती, दंड वगैरे वेळीं आहेतच; परंतु अलीकडे जे जेवणावळ, बारसें, पानसुंपारी, कथाकीर्तन, रंग, लाडू, नारळ, भांडीं, वस्त्रें वगैरे वांटणें, इत्यादि समारंभ होतात हें उत्तमच आहे. अशा समारंभांवर त्या मानानें समाजाचा हक्क असणें हें कांहीं गैर होणार नाहीं.

बाहेरगांवचा कोणी सद्गृहस्थ आपल्या गांवीं आल्याचा शोध लागल्यास त्याची चौकशी होऊन क्षेमसमाचार घेणें हा पंचांचा धर्म आहे. त्यानें खुशीनें जातीस मेजवानी केल्यास त्याचे कार्यास सर्वांनीं सर्व प्रकारची मदत करून त्यास समाजाकडून सन्मानादाखल शेलापागोटें करावें.

समाजाचीं भांडीं, बिच्छायत वगैरे सरपंचांचे किंवा पंचांचे लक्षांत येईल त्या गृहस्थाचे ताब्यांत ठेवावीं.

दरवर्षीं भांडीं व बिछायत तपासण्याचा व निरुपयोगी काढून नवीन करण्याचा अधिकार पंचांस ( समाजास ) आहे. हें काम ज्या वेळीं जमाखर्च रुजू केला जातो, त्याच वेळीं केल्यास विशेष उत्तम.

समाजास देणगी रूपानें, घर, भांडीं, दागिने, रोकड वगैरे कोणी खुशीनें दिल्यास त्याचा विचार करून स्वीकार करण्यास कांहीं हरकत नाहीं.

समाजाच्या वस्तु ह्या जातकार्याचेच उपयोगार्थ तयार केलेल्या असतात; ह्मणून अन्य जातीचे कार्यास देण्याची वहिवाट नसावी.

जातींत कार्य पुष्कळ ठिकाणीं आहे व भांडीं सर्वांस पुरत नाहींत तर प्रथम ज्याचें कार्य असेल त्यास लागणारीं भांडीं यादी लिहून त्यावर सही घेऊन द्यावीं; बाकीच्यांस क्रमाक्रमानें मिळण्याची व्यवस्था केल्यास हरकत नाहीं, अगर सर्वांस सारखी वांटणी करून भागत असल्यास तशी सवड करावी. समाजाच्या एकंदर भांड्यांची जबाबदारी चौधरीवर असते.

लग्न वगैरे कार्यांत शक्तीपलीकडे व वाजवीपेक्षां फाजील खर्च, नाच, तमाशे, रंग, बगीचे वगैरे कमी करणें हें उत्तम आहे.

विद्या, ज्ञान, कला, हुन्नर यांची वृद्धि होण्याविषयीं होतकरू मंडळीचें लक्ष लागलें आहे, तरी त्यांस मदत व उत्तेजन देणें फार अवश्य आहे; म्हणून तिकडे समाजाचें लक्ष असणें भूषणास्पद आहे.

समाजाकडून होणारा खर्च हा वहिवाट, ठराव व स्थलानुरूप निरनिराळा आहे. ब्राह्मण, बैरागी, न्हावी, भाट आणि कुंभार यांचे कांहीं हक्क समाजाकडूनच देण्याची वहिवाट आहे.

निराश्रित, अंध, पंगु, रोगी वगैरेंचें पोषण, बिनवारसी मृताचें दहन, व सुतक्यास दुःखवट्याची पानसुपारी, पागोटें, लुगडें वगैरेचा खर्च समाजजमेंतून करण्याची वहिवाट आहे. प्रसंगानुसार अनाथ मुलींचें लग्न समाजखर्चांतून होऊं शकतें; परंतु मुलाचें करणें असंमत आहे; तरी त्यास विद्यादानाची मदत करणें योग्य होईल.

समाजाचीं सर्व कामें पंच व सरपंचानें करावीं आणि समाजानें वरचे वर सुचवीत असावें.

कोणत्याहि ठिकाणचा सरपंच कोणत्याही गांवीं गेल्यास तेथील सरपंचाचे बरोबरीचा मान त्यास देण्याची रीत आहे.

समाजामध्यें दारु पिणें हें अगदीं वर्ज्य आहे; परंतु प्रसंगीं कोणी जर दारु पिऊन समाजांत आल्यास त्यास शासन करावें.

गांवांत जातींतील कोणी मृत झाल्यास एकंदर समंजस मंडळीनें जमून मयताची सद्गति लावली पाहिजे. या कामीं प्रथम चौधरी यांनीं पुढाकार घेऊन व्यवस्था लावली पाहिजे.

कोणत्याही प्रकारचें जातीचें प्रयोजन कोणी केल्यास त्याचे कार्यांत कोणत्याही प्रकारची अडचण न येईल अशी व्यवस्था पंच व सरपंचानें ठेवण्याची पूर्वापार चाल आहे.

घरगुती ह्मणजे आप्तेष्ट मंडळींत प्रयोजन केल्यास त्यावर कोणाचा कांहीं हक्क नाहीं. तरी जातीचें प्रयोजन अगर कार्य केल्यास त्यावर सर्वांचा

ठराविक हक्क लागू होतो अशी वहिवाट आहे. सर्व जातगंगेस आमंत्रण देण्याची इच्छा असेल तर सरपंचाकडे जाऊन कळविण्याची वहिवाट आहे.

मोठा समाज ज्या गांवीं आहे तेथें पुरोहित, न्हावी, भाट हे असतात. ते नसतील त्या ठिकाणीं गांवजोशाकडून लग्नकार्य वगैरे उरकून घेण्याची वहिवाट आहे.

ज्याचेकडे प्रयोजन असेल त्यानें आदलेदिवशीं रात्रीं सरपंचास कळविणें ह्मणजे तो न्हाव्याचे मार्गें जातींत बोलावणें फिरवितो. या वेळीं बहुतेक समंजस मंडळी पंच व सरपंच हजर राहतात. प्रयोजन देणारा उभा राहून विनयपूर्वक सांगतो कीं, सुगरा ( स्त्री पुरुष पाहुणे मंडळीसह ) किंवा पगडीबंद ( फक्त पुरुष मंडळी ) जेवण अमुक वेळेस अमक्याचे घरीं आहे, त्या वेळचें बोलावणें फिरविण्याची व्यवस्था व्हावी; ती मंडळी मान्य करून सरपंच न्हाव्यास हुकूम देतो; नंतर पानसुपारी वांटली जाते.

पंक्तीमध्यें पुरुषांची असो किंवा बायकांची असो, त्यांत पुरुषांनीं वाढण्यास हरकत नाहीं. पुरुषांनीं आंगरखा, पागोटें काढून जेवावयास बसणें प्रशस्त आहे.

परगांवची कन्या लग्न करून आणल्यास त्यावर जातीचा हक्क दोन पासून पांच रुपयेपर्यंत असतो; जास्त देणें खुशीवर आहे.

मुलाकडच्यांनीं लग्नांत एक जेवण व मुलीकडच्यांनीं एक जेवण देणें हें ऐपतीवर आहे; कोणाचा आग्रह नसतो.

एकत्र कुटुंबांत वडील इसमास आमंत्रण देण्याची वहिवाट आहे; परंतु विभक्त असल्यास ज्याचें त्यांच्या नांवें दिल्यास हरकत नाहीं.

कोणी धर्माविरुद्ध आचरण केल्यामुळें त्यास समाजानें अपंक्त केल्यावर त्याचे आईबाप, आप्त यांनीं त्याच्याशीं संबंध ठेऊं नये. जातीबाहेर असलेल्या गृहस्थाशीं अगर स्त्रीशीं कोणत्याही प्रकारचा व्यवहार करणें अप्रशस्त आहे. ज्ञातबाहेर अगर पंक्तिबाहेर यांत कांहीं अंतर नाहीं. अपंक्तास पंक्तिपासून कांहीं अंतरावर बसवून जेऊं घालण्याची फारशी वहिवाट नाहीं.

समाजाच्या संमतीशिवाय कोणास जातिबहिष्कृत करण्याचा किंवा जातीबाहेर केलेल्या गृहस्थास अगर स्त्रीस पावन करून घेण्याचा पंचांस अधिकार नाहीं. तो किंवा ती मेली तर त्यांस दहन करण्यास हरकत नाहीं.

नेमलेला उपाध्याय बदलतां येत नाहीं. त्याच्या बायकोचाही हक्क आहे; तिनें आपल्या मार्फत दुसरा कोणी दिल्यास काम चालतें. पुढें वंश नसल्यास जातीनें पसंत करून दुसरा नेमण्याची वहिवाट आहे.

कोणाचे घरीं मूल जन्मल्यावर त्यानें पांड्ये ( पुरोहित ) यास वेळ वगैरे कळविण्याची वहिवाट आहे.

## चौधरी, पटेल किंवा सरपंच.

चौधरी, पटेल किंवा सरपंच हे पिढीजात असण्यासंबंधानें बहुमत अनुकूल दिसत नाहीं; परंतु जुन्या पंचाईतीस सभेचें स्वरूप देणें आणि चौधरी, पटेल, किंवा सरपंच यांच्या जागीं अध्यक्षाची स्थापना करणें हा जो फेरफार सुचविला आहे, तो यदाकदाचित कोणास मान्य होण्यासारखा नसेल आणि पंचाईत, चौधरी, पटेल किंवा सरपंच कायम ठेवण्याचा ज्यांचा आग्रह असेल त्यांनीं पंचाइतीस कोणत्या प्रकारचें स्वरूप द्यावें आणि चौधरी, पटेल व सरपंच यांना किती अधिकार असावेत यासंबंधानें येथें थोडासा खुलासा करणें इष्ट व आवश्यक आहे; तो मान्य करणें अगर न करणें, हें ज्या त्या ठिकाणच्या समाजाच्या इच्छेवर अवलंबून आहे.

## चौधरी, सरपंच अथवा पटेल यांचें कर्तव्यकर्म.

हे बहुमतानें नेमलेले सन्मान्य गृहस्थ असावेत. एकंदर समाजाचे हे सर्व प्रकारें जोखीमदार असतात, म्हणून आपल्या समाजाचा आपणावर पूर्ण विश्वास बसावा ह्मणून देशकालमान वगैरेकडे धोरण ठेवून आपल्या अधिकाराचा योग्य उपयोग करणें हा त्यांचा मुख्य धर्म आहे.

स्थान सोडून बाहेरगांवीं जातां येत नाहीं, जावयाचें असल्यास किंवा कोणतीही अडचण असल्यास, गैरहजिरींत, आपल्या अधिकाराची सोय पंचांचे अनुमतानें लावावी.

जातगंगेचीं घरें किती असावीं आणि लोकसंख्या सुमारें किती असावी याची साधारण नोंद ठेवावी.

कोणतेंही जातकार्य अथवा प्रयोजन सरपंचांच्या अनुमोदनानें होत असल्यामुळें एखाद्यानें प्रयोजन केलें असतां किती साहित्य लागतें व खर्च सुमारें काय लागणार, हे कोणी प्रश्न केल्यास त्यास समजून देत असावें.

कोणत्याही प्रकारचें प्रयोजन कोणत्याही निमित्तानें कोणी करीत असेल तर त्याची ही तयारी समाजास पुरेशी आहे किंवा नाहीं, ही चौकशी करण्याची, मंडळीची पंगत बसण्याची व्यवस्था पाहण्याची, व पक्तींत वाढपेसंबंधानें कोणत्याही प्रकारची उणीव न पडूं देण्याची दक्षता ठेवावी.

कोणाकडे कार्य किंवा प्रयोजन असेल त्या ठिकाणीं शेवटपर्यंत राहून, कार्य निर्विघ्नपणें पार पडून आपले समक्ष रीतीप्रमाणें हक्कदारांची व्यवस्था लावावी.

सरपंचाला हरएक प्रकारच्या कार्यांत समक्ष हजर असलेंच पाहिजे; कारण मंडळी आणि कार्यकर्ता सर्वस्वी त्यांच्यावरच अवलंबून असतात.

सकल पंचांचे समाजाचे नांवें पत्र, अर्ज वगैरे आल्यास त्याचा निकाल सरपंचांनीं समाजाच्या अनुमोदनानें करावा.

समाजानें ठरविलेल्या नियमाप्रमाणें, पंचांचे हक्क वसूल करणें, खर्च करणें, नोंद ठेवणें, ती समाजतर्फे फंडास रुजू करणें, हक्कदारांची वांटणी करणें वगैरे जोखीमदारी चौधरीकडे असते.

मध्यंतरीं पंचाइतीची बैठक भरून कोणाचा न्याय करणें असल्यास तसें करण्याची वहिवाट आहे; परंतु या बैठकीबद्दल, पंचांचें अनुमोदन घेऊन ज्याचा न्याय करणें व देणें असेल त्याकडून समाजानें ठरविलेल्या नियमाप्रमाणें आकार घेऊन नंतर बैठकीचें बोलावणें करावें.

न्यायासनाचें महत्व जितकें समजलें जातें, तितकेंच तें जोखमीचेंही आहे. ज्या ठिकाणीं श्रीजातगंगा आहे व जिचा अधिकार तीन प्रकारचा म्हणजे साम, दाम व दंड करण्याचा आहे, तिचा उपयोग पोक्त विचारानें करणें हाच धर्म आहे.

उभय पक्षांची विनंति किंवा अर्ज प्रथम समजून घेऊन त्याबद्दल पुरावा आणि खात्री करून घेण्याचा समाजाचा धर्म आहे; आणि न्याय बहुमतानें देण्याची जरी रीत आहे तरी निकाल देणें जोखमीचें असल्यामुळें तो विचार करूनच देत असावा.

वरीलप्रमाणें चौधरी, पटेल, सरपंच असले म्हणजे सभेचा हेतू सफल झाल्यासारखाच आहे.

---

# परिशिष्ट ब.

## फोटोंतील नांवांची यादी.

**सूचनाः**—नांवांपुढें जे आंकडे दिले आहेत आणि ज्या खुणा दिल्या आहेत, त्याचें स्पष्टीकरणः—१ सुखवस्तु. २ कंट्राक्टर. ३ व्यापारी. ४ ओव्हरसिअर. ५ मेस्त्री. ६ क्लार्क. ७ शेतकरी. ८ गवंडी, राज, शिलावत, संतरास आणि कडिया. ९ विद्यार्थी. * ड्रॉईंगमास्तर. † पेन्टर. × फोटोग्राफर. ÷ ड्राफ्ट्समन. ०॥० सुतार.

## नंबर १. पुणें व मुंबई.

डावीकडून उजवीकडे पाहवें.

### रांग १ ली.

१ कै. श्री. नंदरामजी सुंदरजी कवलिये. १
२ कै० श्री. रावबहादुर भाऊसाहेब मनसारामजी धवारे, पुणें सिटी म्युनिसिपल कमिशनर. १

### रांग २ री.

१ श्री. शेट दत्तारामजी रामचंद्रजी कुकडवाळ. ( किनारीवाळ ) ९
२ चौधरी पांडुरंगजी किसनजी धवारे, १ म्युनिसिपल कौन्सिलर, पुणें.
३ शंकरराव बाळारामजी बैताडे. ५
४ भाऊसाहेब तुकारामजी बहिरे, स्टेशन मास्तर.
५ पांडुरंगजी गजाननजी लव्हाणीवाळ, माजी म्युनिसिपल कौन्सिलर, पुणें. २

### रांग ३ री.

१ हरिभाऊ कृष्णाजी कुंडळवाळ. २
२ राधाकिसनजी नारायणजी माळवाळ. २
३ कै० एकनाथजी बाळकृष्णजी लव्हाणीवाळ, एल. सी. ई. २
४ माधवराव रामचंद्रजी माळवाळ. २
६ विश्वनाथजी बाळारामजी किनारीवाळ. ९

### रांग ४ थी.

१ शिवरामजी मारुती तुसे, नांदगांवकर. २
२ गणपतरावजी काशीरामजी खिरणीवाळ १
३ सदाशिवराव गणपतराव बैताडे. ९
४ विश्वनाथजी बाबाजी कुंडळवाळ. ४
५ भालचंद्रजी गणपतरावजी खिरणीवाळ.

### रांग ५ वी.

१ कै० सितारामजी शेडुजी देवतवाळ. २
२ कै० नानाभाऊ गणपतराव धवारे. ३
३ कै० किसनजी तुकारामजी कारबवाळ. २

## नंबर २ पुणें आणि मुंबई.

डावीकडून उजवीबाजूस पहात यावें.

**रांग** १ ली, उभे तीन.

१ विठ्ठलराव नारायणजी माळवाल.*
२ बाळकृष्णजी एकनाथजी लव्हाणी-वाळ. १
३ विठ्ठलजी भवानजी खाटवाल. ५

**रांग** २ री, उभे सोळा.

१ दत्तारामजी तुळशीरामजी बैताडे.
२ जिवनजी छोटीरामजी खाटवाळ. ५
३ बाबुराव केशवजी बैताडे. ३. सातारा.
४ लक्षुमणराव बाळारामजी बैताडे. ५
५ गणपतराव मोतीरामजी देवतवाळ. २
६ पंढरीनाथ रामभाऊजी बाबरे. २
७ जनार्दन सोमनाथजी लव्हाणीवाळ.
८ शंकर आत्मारामजी काकरवाळ. ८
९ एकनाथ विठ्ठल दैमीवाळ. ०॥०.
१० ज्ञानदेवजी गजानन लव्हाणीवाळ. २
११ गणपतराव गुलाबचंदजी बगराणे. ४
१२ किसनजी गुलाबचंदजी सुतवाले. ५
१३ मारोतीराव केशवजी बैताडे.८.सातारा.
१४ गणपतराव केशवजी बैताडे.३.वेलापूर.
१५ रामचंद्रराव कृष्णाजी कुंडळवाळ. ३
१६ कै०श्री० शेट सितारामजी लक्षुमणजी किनारीवाळ (कुकडवाळ.) २

**रांग** ३ री, उभे चवदा.

१ श्री. हिरालालजी रामलालजी कवालिये.१
२ शंकरजी चिमणाजी नागे. २
३ गणेशजी जगंनाथजी घोडेले. ८. जयपूर.
४ सोमनाथजी बाळारामजी तेलपूरे. ०॥०
५ सखारामजी बाबाजी कुंडलवाळ. २
६ शेट उदेरामजी नारायणजी घोडेले. * जयपूर
७ चौ. बाळारामजी रूपचंदजी बबेरीवाळ. १
८ शेट रामचंद्रराव बाळारामजी किनारी-वाळ. २
९ पुरुषोत्तमजी रामचंद्रजी काकरवाळ. ६
१० भाऊ विठोबा धवारे. ६
११ केशवराव नारायणराव माळवाळ. ३
१२ तुळशीरामजी भिवाजी बैताडे. ३
१३ शंकर जिवनजी खाटवाळ. ८
१४ मारोती रामजी काकरवाळ. ८

**रांग** ४ थी, खुर्चीवर बसलेले तेरा.

१ कै० बाळारामजी भिवाजी बैताडे. ५
२ नारायणजी रामबिलासजी मनेव्या. ५ जयपूर.
३ गणपतराव विठोबा मोरवाळ.. २
४ श्री. लक्ष्मीनारायणजी रामबिलासजी मनेव्या. ५. जयपूर.
५ कै० नाथुरामजी बहिरुजी घोडेले. ५ जयपूर.
६ कै० चौ० श्री. रामचंद्रजी मनसारामजी धवारे. १
७ कै० चौ० श्री. काळुरामजी भाऊसाहेब धवारे, स्पेशल म्याजिस्ट्रेट व म्यु. कौन्सिलर पुणें. १
८ शेखचंद तुकारामजी लव्हाणीवाळ.२
९ रामचंद्रजी नारायणजी माळवाळ. २
१० गणपतराव भिवाजी बैताडे. ३
११ रामचंद्रजी भवानजी काकरवाळ. ५
१२ कै०बाळारामजी किसनजी जेठीवाळ.५
१३ बाळारामजी गंगारामजी पाडवे. ४

**रांग** ५ वी, जमिनीवर बसलेले सहा पागोटीवाले.

१ जनार्दन गणपतराव पाडवे. २
२ रंगलालजी भाऊसाहेब बहिरे. ९
३ शामलालजी भाऊसाहेब वहिरे. ६
४ पाडुरंगजी कृष्णाजी पाडवे. ४
५ बाळारामजी गंगारामजी ब्याहने. २
६ कै० गणपतराव कृष्णाजी पाडवे. २

जमिनीवर बसलेली विद्यार्थी मुलें वीस आहेत; त्यांचीं आडनांवें:—दैमीवाल बैताडे, नागे, बकवासे, पाडवे, टोणगरे, सारडीवाळ, बगराणे, उटवाले, खाटवाल, बहिरे, करोडीवाल, देवतवाल वगैरे.

## नंबर ३. सवाईजयपूर ( राजपुताना ).

डावीबाजूकडून उजवी बाजूकडे पाहत यावें.

**रांग** १ ली, खुर्चीवर बसलेले नऊ.

१ चौ.गणेशलालजी ठकेरामजी आनावड्या.
२ आनीलालजी नथुरामजी घोडेला. ३.
३श्री.उदयरामजी नारायणलालजी घोडेला×
४ उस्ता गोपीचंदजी रामजिवनजी तोंदवाळ. ५
५ श्री. लक्ष्मीनारायणजी रामबिलासजी मणेट्या. ५
६ नारायणप्रसादजी आनीरामजी खोवाल.*
७ बाबुलालचंदजी परसरामजी धनारिया.÷
८ चौ० गंगाबक्सजी गोपालजी खोराणा. ५
९ चौ० ओंकारनाथजी चंद्रजी खोराणा.५

**रांग** २ री, जमिनीवर बसलेले सहा.

१ पिथीलालजी गणेशलालजी वराडा. ८
२कल्याण बक्सजी गणेशरामजी मारवाळ.८
३ गुरबक्सजी हिरानंदजी मसलेट्या. ५
४ गुन्नालालजी जमनालालजी खोराणा. ३
५ गंगाबखजी जिवनरामजी जगनाथीया.×
६ उदेसिंहजी गणेशलालजी आनावड्या. ८

( या फोटोंत सर्वांच्या मागें उभा असलेला इसम हा श्रीशिलावत जात्युन्नतिसभा जयपूरचा शिपाई असून जातीचा माळी आहे. )

## नंबर ४. ब्यावर व फुलेरा. ( राजपुताना )

डावीकडून उजवीकडे पाहत यावें.

**ब्यावर. उभे नऊ.**

१ बाळुरामजी उदाजी कुंडळवाळ. २ जोधपुर.
२ बबुतीरामजी मेरूरामजी बैताडा. ५
३ देवीलालजी बबुतिरामजी बैताडा. ५
४ मेरूलालजी सेवारामजी जाईलवाळ. ६
५ साधुरामजी सेवारामजी किरोडीवाळ. २
६ मोहनलालजी नगरामजी नराणा. २
७ नाथुलालजी गोगराजजी जायवाळ. २
८ मुन्नालालजी भवानीरामजी धनारिया. २ ( अजमीर )
९ नाथुरामजी घाशिरामजी जाईलवाळ. ३

**फुलेरा. उभे तीन.**

१ गंगारामजी दुलजी आसीवाळ. फिटर.
२ दालचंद किसनजी जलंद्रा. फिटर.
३ धन्नालालजी ठाकुरसी आसीवाळ. ६

## नंबर ६. रतलाम व निमच. नंबर ७. बडनगर.

डावी बाजूकडून उजवी बाजूकडे पाहत यावें.

### रतलाम व निमच.

**रांग** १ ली, उभे पांच.

१ जगनाथ रामचंद्रजी कोल्हूगरा. ९
२ नरसिंगजी लखमीचंदजी वडमुंडा. २
३ जिवराज प्रतापजी आसीवाल. ८
४ बालचंद भरुजी कोल्हूगरा. ८
५ शिवनारायण श्रीकिसनजी मारोठ्या. ९

**रांग** २ री खुर्चीवर वसलेले तिघे.

१ रामप्रसादजी नरसिंगजी बडमुंडा. २
२ रामचंद्रजी नरसिंगजी बडमुंडा. २
३ बद्रिलाल श्रीकिसनजी मारोठ्या. फिटर.

### बडनगर. ( माळवा )

**रांग** १ ली, उभे असलेले चार.

१ नंदरामजी रामजी खटोड. ७
२ शंकरलाल केशवजी चोरमा. ७
३ भेरोलाल तुळशीराम बावरा. ७
४ मूलचंद कोदरजी साडीवाळ. ७

**रांग** २ री उंचावर बसलेले चार.

१ काळूराम रुपाजी आजमेरा. ७
२ नंदराम ओंकारजी खटोड. ७
३ कृष्णाजी ताराजी टिकोल्या. ७
४ केसुराम गुलाबजी उदीवाळ. ७

**रांग** ३ री जमिनीवर बसलेले सहा.

१ उदेराम मोतीजी सिगोठ्या. ७
२ उदेराम चत्राजी शिंदड. ३
३ सुरजमल्ल चत्राजी मुंडेल. ३
४ कनैय्यालाल काशीराम नैवाल. ३
५ केशवराम भगवानजी नैवाल. ३
६ वेणीराम जेताजी दोराया. ३

## नंबर ८. धुळें व जळगांवकडील ( खानदेश. )

डावीकडून उजवीबाजूकडे पहात यावें.

**रांग** १ ली; उभे आठ.

१ लोटणजी विठोबा तुसे. ७
२ राघोबा शेकूजी अनावडे. ८
३ काळुरामजी हंसराज जेठीवाळ. ८
४ गोविंदजी कुशाबा उदेवाळ. ७
५ तुकारामजी रामजी आनावडे. ८
६ काशिरामजी खुशालजी उदेवाळ. २
७ विठोबा रामजी उदेवाळ. ८
८ रामचंद्रजी केशवजी आनावडे. ८

**रांग** २ री; खुर्चीवर बसलेले सहा.

१ बारकूजी पांडुजी आनावडे. पाटील.
२ हंसराजजी दशरथजी जेठीवाळ. ७
३ रामजी सखारामजी आनावडे. ७
४ तुळशीरामजी भिवाजी बैताडे; पुणेकर. ३
५ धनाजी तुकारामजी बबेरीवाळ.पो.पाटील.
६ नारायणजी रामजी तुसे. ७

**रांग** ३ री जमिनीवर बसलेले सहा.

१ गोविंदा घनःशाम स[illegible]रवाळ. ८
२ श्री. नामदेव राघोजी तुसे. १
३ हरिबा बापुजी आनावडे. ७
४ गणपतराव लक्ष्मण आनावडे. २
५ पुंडलिक रामजी भोरोदे. ७
६ किसन विठोबा तुसे. ७

## नंबर ९. औरंगाबाद ( डेक्कन ).

डावीकडून उजवीबाजूकडे पहात यावें.

**रांग** १ ली; उभे सहा.

१ आसारामा धनुजी कामे. ५

२ रामरतनजी बालारामजी देवतवाळ. २

३ सितलजी भाऊजी देवतवाळ. २

४ विठ्ठलजी मनुजी कारबवाळ. ५

५ सितलजी रोडमलजी देवतवाळ. ५

६ काळुरामजी सितलजी देवतवाळ. २

**रांग** २ री, खुर्चीवर बसलेले सात.

१ झबुजी साबारामजी देवतवाळ. २

२ काशिरामजी रामाजी देवतवाळ. २

३ लच्छमनजी सेकुजी माहोरे. २.

४ मनुलालजी विठोबा कारबवाळ. ५

५ रोडमलजी खेमाजी देवतवाळ. २

६ चौ. छोटुरामजी सेवारामजी देवतवाळ. ८

७ बाळारामजी जयरामजी देवतवाळ. २

**रांग** ३ री, जमिनीवर बसलेले चार.

१ देवजी बाळारामजी उठवाल. ८

२ चौ. लच्छमनजी सितारामजी बारवाल. ८

३ बुलचंदजी सितारामजी जाजोरे. ५

४ गुलाब भवानी देवतवाळ. ८.

## नंबर. १०. दिल्ली ( पंजाब ).

डावीकडून उजवीकडे पाहावें.

**रांग** १ ली; उभे असलेले १८.

१ नानगचंदजी रामदासजी खोराण्या. ८

२ जगन्नाथजी भोलानाथजी माचीवाळ. ८

३ बिसनचंदजी नथुरामजी भादरपुरीये. ८

४ भोलानाथजी रुगनाथजी सुरला. ८

५ सेरसिंगजी डुंगरमल्लजी माचीवाळ. ८

६ रामदासजी किसनरामजी सिरोठा. ८

७ नथवामल्ल पांचुलालजी कुदेवाळ. ८

८ लेखराजजी घाशिरामजी दमीवाळ. ८

९ देवारामजी कलुरामजी धुमुने. ५

१० गोपीनाथजी मोहरीलालजी अजमेरे.+

११ रामचंदजी डुंगरमल्लजी माचीवाळ. २

१२ शिवनाथजी हरदेवजी बहरे. २

१३ प्यारेलालजी छाजुरामजी बहरे. ८

१४ रामप्रसादजी सुखदेवजी कुदाळ. ÷

१५ बिहारीलालजी किसनरामजी सिरोठा. ८

१६ हुल्लासीरामजी सरुपाराम जेठीवाळ. ८

१७ उमरावसिंग नानगराम सिंदल. २

१८ नथीमल्लजी चुन्निलाल माचीवाळ. ८

**रांग** २ री; खुर्चीवर बसलेले. १४.

१ जुहीमल्लजी रघुनाथजी सुरला. ८.

२ सितारामजी रामचंद्रजी सिरोया. ८

( मांडीवर बसलेला त्यांचा मुलगा )

३ गुरुदयालजी हुकूमचंदजी बताडा. ( बैताडे ) ३

४ रमोमल्ल नथीमल्ल बैताडे. ३

५ बाबु खनजनलाल चुन्निलाल देवतवाळ. पेनशनर ( मिरत ).

६ भोलानाथजी डुंगरमल्लजी माचीवाळ. २

७ कालीप्रसाद गणेशीलाल देवतवाल. मिरत. ÷

८ श्री. चौ. कल्याणसिंग गणेशीलाल बहरे. १

९ लालाहुकूमचंदजी भुऱ्येमल्लजी बैताडा. ३
१० मागीलाल मोतीराम बहरे. ३
११ मुरलीधर मोतीराम बहरे. ३
१२ पीरागमल्ल जिवनराम वोदोडा. ५
(खालीं बसलेला त्यांचा मुलगा)
१३ श्री. कंवर केवलसिंग कल्याणसिंग बहरे. १
१४ बाबु लालजीप्रसाद ग्यारसीराम जाजोरा. ६

**रांग** ३ री, जमिनीवर बसलेले २१.
१ नानगा रामप्रसाद साडीवाल. ९
२ गणपतराय बलदेवजी आसिवाळ. ९
३ डालुराम घाशिराम दमीवाल. ९
४ किसनलालजी डुंगरमल्लजी माचीवाल. ८
५ प्यारेलाल लक्ष्मीनारायण माचीवाल. ८
६ नथीलाल दवाराम धुमुणें. ९
७ कुंदनलाल रामप्रसादजी कुदाळ. ९
८ पाच्यालाल नारायण छापोला. ९
९ भोंदुमल्ल गणेशीलाल धुमुणे. ९
१० गुलाब उमराव बताडा. ९
११ मनोहरलाल किसनलाल माचीवाळ. ९
१२ रामगोपाळ लछमीनारायण माचीवाल. ८
१३ हेतराम भोलानाथ खाटूवाल. ८
१४ लछमन मुरलीधर बहरे. ९
१५ पीरभु लछमीनारायण माचीवाल. ९
१६ सुंदरलाल शंकरदास बबेरेवाल. २
१७ छित्तरसिंग रामचंद्र किसनराम गठेलीवाल. ९
१८ घनःशामदास शिवनाथजी बहरे. ९
१९ प्रभाती नथवामल्ल कुदाळ. ९
२० रामनाथ बुद्यामल्ल माचीवाळ. ९
२१ कुनुलाल कंवर केवलसिंग बहरे. ९

## नंबर ११. आग्रा व अलाहाबाद. नंबर १२. नेरी (खानदेश).

डावी कडून उजवीकडे पहावें.

**आग्रा.** खुर्चीवर बसलेले. २.
१ कन्हयालाल गंगारामजी टावला. ६.
२ इंद्रलाल जगन्नाथ प्रसाद मारोठ्या. ६.

मार्गे उभे असलेले २.
१ श्रीनारायण घाशीराम बालोठया. ÷
२ जोधराज गणेशीलालजी भोरोदिया. ÷

**अलाहाबाद.** खुर्चीवर बसलेले २
१ बालाबक्सजी बलदेवजी घोडेला. ५
२ नरसिंगलाल शिवलालवर्मा महरवंडिया. ६

**नेरी.**

**रांग** १ ली; खुर्चीवर बसलेले. १
१ शिवरामबुवा लक्षुमणजी तेलपुरे वैद्य

**रांग** २ री; खालच्या खुर्चीवर बसलेले ३.
१ चौ० पुंडलीक रामजी माळवाल. ८
२ बळीराम लोटू उजीवाळ. ४
३ लक्षुमण विट्ठल बडोदे. ८

# परिशिष्ट ( क ).

## चालू गोत्रें अर्थात आडनांवें.

६४ व्या पानाची पुरवणी.

| | | | |
|---|---|---|---|
| अरेना. | गोला. | बाथरा. | धुवाल. |
| अडाण्या. | घीया. | बोरा. | सखवाया. |
| अढीरना. | टीकोल्या. | बालोदिया. | सनुधा. |
| आऊया. | तोरमीवाल. | भादरपुरीया. | सराठीया.२ |
| आढीरीया. | दरदरवाळ. | भोमरीया. | सुरला. |
| आयतान. | नरोलिया.+ | माडीवाला. | सरबा. |
| ओथवाल. | नार. | मुडेल. | सरष्या. |
| इटारीया. | नयीवाल.* | महरवंडिया.* | सिदड. |
| करचुलीया.।· | नोषवाळ. | बडोदे. | सिंदल. |
| खनाडा. | नंदाजी. | वाडोदा. | सिरोठा. |
| खाथोर. ३ | बडगुंदा. | वालीदर. | सिरोया. |
| गऊवाळ. | बताडा. | षटोड. | सलवाडीया. |
| गमेरा. | खरोरा. ६ | संदलवाल. २ | सावळेचा. |
| जासोरा. ।· | | | |

इतिहासाच्या आधारें कर्नल टॉड साहेब यांनीं जी रजपुतांची वंशावळ तयार केली आहे ती येणेंप्रमाणें:—१ सूर्यवंश. २ सोमवंश ( चंद्रवंश ३ ग्रहिलोट ( गहिलोट ) पोटकुळें २४. ४ यदु, पोटकुळें ८. ५ त्वार, पोटकुळें १७. ६ राठोर पोटकुळें १३. ७ कष्याह ( कच्याह ). ८ प्रमार ( पोयरयांत ), पोटकुळें ३६. ९ चोहान, पोटकुळें २६. १० चालुक ( सोलंकी ), पोटकुळें १६. ११ परिहार, पोटकुळें १२. १२ चवरा. १३ तक ( तक्षक ). १४ जित ( नाट ). १५ हान ( हुन ). १६ काटी. १७ बल्ल. १८ झाल. १९ जेत्व ( कमरी ). २० गोहील. २१ सरवैय. २२ सिलार. २३ दबी. २४ गनूर, पोटकुळें ५. २५ दोद. २६ गहरवाल. २७ विरगुजर, पोटकुळें ३. २८ सेगनर. २९ सकरवल. ३० बेस. ३१ दहिया. ३२ जोह्या. ३३ मोहिल. ३४ निकुप. ३५ राजपाली ३६ दहिमा.

## परिशिष्ट ( ड ).



# कुमावत क्षत्रियांचे वंश, कुलें व चालू गोत्रें अर्थात् आडनांवें

आणि

# तत्संबंधी कांहीं पौराणिक व ऐतिहासिक माहिती.

कित्येक चालू गोत्रांच्या आडनांवाच्या उच्चारामध्यें अपभ्रंश झाल्याचें आढळून आलें आहे. कांहीं गोत्रांच्यापुढें **वाल** हा शब्द लागला आहे. पण तो रजपुतांमध्यें फारच कमी आहे. टॉड् साहेबांच्या **राजस्थान** या ऐतिहासिक ग्रंथाच्या ३०२ पानावरून असें कळून येतें कीं, **वाल** हा शब्द फक्त वैश्य ( व्यापारी ) जातीच्या गोत्रांस लावला जात आहे.

**बैताडे, बैताडिया**—हे चव्हाण कुळांतील पृथ्वीराज वंशीय आहेत असें जयपुर येथील भाटांच्या चोपड्यांवरून दिसून येतें. या आडनांवाचे लोक **गोतमराज** कुळांतहि आहेत; त्यांची मोठी वस्ती संयुक्त प्रांत, आग्रा, औध, काशी आणि जवनपुर येथें आहे. ( शेरिंग कृत **हिंदुजाती** आणि **कुलें,** पृष्ट २०२ आणि २१२. )

**देवतवाल**—( **दावत** ) हे चव्हाण कुळांतील आहेत; तसेच ते **गेहेलोत** कुळांतहि आहेत; ( टॉड् पान १९८ आणि २४९) राजवंशीय जी ३६ रजपूत कुलें आहेत, त्यांपैकींच हे एक आहेत. हे सूर्यवंशीय आहेत, असें श्री भागवत पुराणावरून दिसून येतें.

**बहीरिया** अथवा **बहरे** ह्या गोत्रांचे लोक रघु, यदु व चंद्र या तीन वंशांतील आहेत. जेसलमेर, बिकानेरच्या इतिहासांत हे राजवंशीय आहेत;

असें टॉडनें आपल्या ग्रंथांत लिहिलें आहे. आणखी, ते राजा **गज** यांचे वंशज आहेत. काश्मीरच्या राजानें आपल्या मुलीचा **गज**राजा बरोबर विवाह करून दिला. जेसलमेरमध्यें भटनेर व नागोरचे संस्थानाधिपति हे त्याचेच वंशज आहेत.

**कवलिया**—अथवा **काव्हिला** या आडनांवाची मंडळी पंजाबांत पुष्कळ आहे. हे भट्टीवंशाचे आहेत.

**कुंडलवाल—कंडाल** अथवा **कांडल** हे राठोर रजपूत आहेत. हे **रण**मल्ल राजाचे वंशज आहेत. मारवाडांतील **कोंडलाथ** हा जिल्हा जिंकला म्हणून यांना **कांडल** असें म्हणतात.

**जिजोरा, जाजोरा** अथवा **जोरा** हे राठोरवंशीय रजपूत आहेत. ( शेरींग पान १४०. )

**किनारीवाल**—हें सूर्यवंशीय आहेत.

**खिरनीवाल**—अथवा **खेरणी** हे सूर्यवंशीय आहेत. ( टॉड् १६७६. )

**नागे**—यांच्यापैकीं कांहीं नागवंशीय म्हणजे तक्षक आहेत; ( शेरींग पान २२६ ). महाभारतामध्येंहि यांचा उल्लेख आहे. तसेच ते चंद्रवंशीयही आहेत, असें **टॉडनें** बऱ्याच ठिकाणीं उल्लेख केला आहे.

**धवारिया**—यांच्यापैकीं कांहीं चव्हाण कुळांतील आणि कांहीं **राठोर** कुळांतील आहेत. ( शेरींग पान १४०.)

**मारवाल** अथवा **मारू** हे राजवंशीय रजपूत आहेत असें टॉडच्या ग्रंथावरून कळून येतें.

**माळवाल—माल** अथवा **माला** हे भारद्वाजवंशीय आहेत. ( शेरींग पान १०६. )

**मालीया—मालीन** हेही राजवंशीय रजपूत आहेत.(टॉड् २५०।२५१.)

**सराटीया**—हे परमार कुळांतील असून सूर्यवंशीय आहेत.

**माचीवाल** अथवा **माहेचा** हे राठोर कुळांतील आहेत.

 नगर वाचनालय सातारा

**पाडवे** अथवा **पवार** हे यदुवंशीय आहेत.

**धनारा**—हे राठोर कुळांतील आहेत. ( टॉड् पान १३१६.)

**करचुलीया**—हे गेहेलोत कुळांतील शिशोदीया रजपूत आहेत. ( शेरींग पान १३६. )

**नरोलिया**—हे तंवर कुळांतील आहेत. ( शेरींग पान १२२. )

**बबेरीवाल**—**बाहाबर** अथवा **बाबरे** हे राठोरपैकीं आहेत. ( टॉड पान १२५६. ) असोथम्याचा पुत्र डोहार याच्या सात पुत्रांपैकीं **बाहाबर** हा तिसरा पुत्र होय.

**धनारिया**—हे गेहोलोत कुळांतील सिसोदिया वंशांतील असून त्यांचा उदेपूर संस्थानाशीं संबंध आहे.

**जेठीवाल**—( **जेठी** ) हे यादव ( जाधव ) वंशीय आहेत, असें महाभारतावरून कळून येतें. आणखी, हे राजवंशीय आहेत, असें टॉडच्या १५१ आणि २८८ पानांवरून दिसून येतें. यांची मोठी वस्ती पंजाबांत असून मारवाडांतहि कांहीं आहे.

**दहिमीवाल**—( **दहिमा** ) हे राजवंशीय आहेत. (टॉड पान ३०६.) या वंशाची बरीच मंडळी दिल्लीचा राजा पृथ्वीराज चव्हाण याच्या पदरीं होती; आणि त्यांनीं मोठमोठीं शुरत्वाचीं कामें केलीं असें चव्हाणवंशाच्या इतिहासावरून दिसून येतें. आणखी, यांचा शरीरसंबंध राजघराण्याबरोबरहि होत असे. याच गोत्रासंबंधीं विशेष माहिती टॉडनें ३०६ आणि शेरींगनें १२१ पानामध्यें दिली आहे.

**दोराया**—( **दोरीया** ) हे तंवरवंशीय आहेत. मेनपूरी येथील राजानें आपलें शिरकमल दहींदेवीला अर्पण करण्याचा नवस केला होता; ह्मणून त्याच्यामागें त्यास **धंड** असें ह्मणत असत; परंतु पुढें त्याच्या वंशास **दोर** असें ह्मणूं लागले. या वंशाची वस्ती बुलंदशार आणि मोरोदाबाद येथें होती असें शेरींग पान १५० वरून समजतें.

**खाथेर**—( **खथोरीया** ) हे रोहीलखंडांतील आहेत; या खंडास पूर्वी काथेल असें ह्मणत असत; त्यावरून यांना **कथारिया** असें नांव पडलें. यांना गौड रजपूत असें ह्मणतात. ( शेरींग पान १७४. )

**गढवाळ.**—( **घरवाल**) हे राजवंशीय आहेत; असें शेरींग पान१७५ वरून सिद्ध होत आहे. आणखी, टॉड साहेबांनीं हे ३६ राजकुळांपैकीं आहेत असें २१८ पानामध्यें लिहिलें आहे. यांचें मूळ गांव मुजफरपूर आहे. सर इलियट यांच्या मताप्रमाणें हे कनोज राठोर वंशीय आहेत.

**संदलवाल**—( **संदालर, संदाल** ) हे परमारवंशीय आहेत. परमाराच्या १२ पोटशाखांपैकीं **इंदु** आणि **संदाल** हे सुप्रसिद्ध आहेत. त्यास भुमिया ह्मणजे जमीनदार असें ह्मणतात. टॉड पान २८७.

**जोसोरा**—( **सोरा** ) हे गिहलोतवंशीय रजपूत आहेत. यांचे मूळ गांव सुरसपूर; त्यावरून यांना **सोरा** हें नांव पडलें आहे. टॉड पान २८२ आणि शेरींग पान १२५.

**सुरला**—( **शिलार** ) हे राजवंशीय आहेत. (टॉड पान २४१–५१.)

**नांदीवाल**—( **नाद** ) हे चंद्रवंशीय आहेत; असें टॉडनें चंद्रवंशाच्या ४ थ्या कोष्टकांत दर्शविलें आहे. टॉड पान २००.

**धुमुन्या**—( **धुमानीन** ) हे सूर्यवंशीय. यांचा वंश हा श्रीरामचंद्रजीपासून चालत आला आहे. हे रजपूत आहेत. महाभारताच्या काळापासून यांचें मूळगांव अयोध्या, सुरसपूर आणि मेवाड आहे.

**मारोठ्या**—( **मारोटी** ) हे सोमवंशीय. (टॉड पान १६१.)

**कुसुंबीवाल**—( **किसंभीवाल; किसंभा.** ) हे चंद्रवंशीय असून यांची शाखा **पुरू** ही आहे. ( टॉड पान १५९ )

**शिरसवा**—( **शिरसा** ) हे चंद्रवंशीय आहेत. टॉड पान १९९.

**खरोरा**—( **ख्रोरा** ) हे सोंघी रजपूतांच्या १६ शाखांपैकीं १३ वे आहेत; यांचें मूलस्थान माळवा प्रांत; टॉड पान २८०.

 नगर वाचनालय सातारा

**गेधर, गैदर, गडहार—( गंधर )** हे चंद्रवंशीय आहेत; टॉड, पान १६१.

**कोल्हा—( कोरा )** हे रजपूतांच्या ९९ कुळांपैकीं एक आहेत. यांचें मूळगांव काशी आणि शारणपूर. शेरींग पान १२३।२४२.

**राजुरे—( राजोरे )** हे दहाव्या शतकांतील कच्छवा शाखेपैकीं आहेत. यांचें मूळ ठिकाण अमराबाद. हे अग्निकुळांतील सूर्यवंशीय आहेत. टॉड पान २६३.

**पालदिवाल, पालरीवाल—(पालवार, पालीवार )** हे यदुवंशीय आहेत. शेरींग पान २२३. यांचें मूलस्थान अलहाबाद, मिरझापुर, जवनपूर, अजीमगड, आणि गोरखपूर.

**भाडीवाल, भाटीवाल, भादीवाल—( भाईदल )** हे राठोर रजपूत आहेत. शेरींग पान १४०.

**खरेला, खरोल्या**—हे परमारपैकीं आहेत. मूळ गांव खैरालो. टॉड पान २६८, आणि शेरींग पान १४६.

**कैकव्या, ककाथिया—( काथिया )** हे चव्हाण वंशापैकीं आहेत; यांचें मूळ गांव ईशान्येकडील बुधान, जकाकाबाद, इटा हें होय.

**खाटवाल—( खाट, खटाव )** हे राजवंशीय आहेत. टॉड पान २४९.

**तोंडवाल**—मूळ शब्द **हातोंड,** पुढें **हा** चा लोप झाला. हे राठोरवंशीय आहेत. टॉड पान १२५५.

**बासनीवाल, बासल.**—बासेल शिवाल. यांतील मूळ शब्द बिसन, या शब्दावरून पुढें फेरफार होत गेला. यांची वस्ती अलहाबाद, गोरखपूर, गाजीपूर, येथें आहे. शेरींग पान २१७०.

**जगनाथ्या, जगन्नाथ्या,—( जनवाथीया )** हे अर्जूनवंशीय रजपूत आहेत. श्री जगन्नाथजीच्या पूज्य नांवावरून यांना हे नांव पडलें असावें.

**हौदखाशा, हौदरख्या, हाडखाशा**—हे हाड रजपूतपैकीं असून ते पंजाबाकडील आहेत. मूळ शब्द हार याचा अपभ्रंश हाड असा झाला. हें चव्हाणवंशीय आहेत. शेरींग पान १६०.

**टांक**—हे गवंडी आणि खोदींव काम करीत होते, त्यामुळें त्यांना तें नांव पडलें आहे. हे आपणांस **टंक** रजपूत ह्मणवितात. हे भट्टीवंशापैकीं आहेत.

**उधेवाल. उदेवाल—( उदे )** हे चंद्रवंशीय आहेत. टॉड पान २००.

**अनावड्या—( अगावरा )** मूळ गांव बीरपूर; यांच्यापैकीं कांहीं तंवर व कांहीं सोळंखी कुळांतील सोळा शाखांपैकीं रजपूत आहेत.

क्षत्रियांच्या आडनांवांपैकीं चालू गोत्र आणि कांहीं आडनांवें राजपुताना वगैरेकडील ब्राह्मण ज्ञातींतहि आढळतात.

**इतकें बोलिलों स्वभावें । त्यांत मानेल तितुकें घ्यावें ॥**
**श्रोतीं उदास न करावें । बहु बोलिलें म्हणोनी ॥ १ ॥**

वाचनालय ... भवानी पेठ
८८३५६

संपूर्ण.



# माझें टिपण.

## आर्या.

अनुकूल काल असतां, जो करि दुर्लक्ष साधण्या स्वहित ।
दुर्दैव त्या नराचें ! त्याच्या तो होय या जगीं अहित !॥१॥
अनुकूल प्रतिकूल स्थितिचें, फिरतें अहो ! सदां चक्र ।
दक्ष असति बुध म्हणुनी, होऊं देण्या न दैव तें वक्र ! ॥२॥

लेखक व प्रकाशक,
गणपतराव भिवाजी बैताडे. ( जी. बी. नाईक. )
नायकांचा वाडा, घ० नं० ६० रविवार पेठ, पुणें–सिटी.

मुद्रक,
केशव रावजी गोंधळेकर,
जगद्धितेच्छु छापखाना, ४३२ शनवार, पुणें–सिटी.

सन १९१६ इसवी.



गणपतराव भिवाजी बैताडे.

G. B. Naik., M. A. H. S., (Chicago U. S. A.)





माझा पुण्यांतील राहण्याचा वाडा.

श्री.

# मातापितृभ्यो नमः

मातृदेवो भव !



पितृदेवो भव !

## अर्पणपत्रिका.

श्लोक [ शिखरिणी ].

असे माता–तातासम कवण हो दैवत जनीं ।
रमो देवा सेवा घडुनि मम त्यांच्याच भजनीं ॥
चिमाबाई आई तुजशि उतराई जगुन मी ।
कसें व्हावें ठावें तिळ न ह्मणुनी त्वत्पद नमीं ॥ १ ॥
भला माझा आजा अभिमत जगोजी सकलिका ।
कुलामाजी आजी जणुं निपजली दिव्यकलिका ॥
भिवाजी सत्कार्जी ममजनक जो कीर्ति चढवी ।
मला सांगे आंगें सुजनचरितें ज्ञान पढवी ॥ २ ॥

श्लोक [ शार्दुलविक्रीडित ].


प्रेमें लालन पालन प्रतिपदीं केलें किती रक्षण ।
व्हाया राहुनि दक्ष लक्ष दिधलें जें शक्य तें शिक्षण ॥
सांगोनी व्यवहार दावुनि दिली सद्वर्तनाची रिती ।
झाले जे उपकार ते कितितरी नाहीं तयाला मिती ॥ ३ ॥
फेडाया लवमात्र ते मजकडे नाहींचकीं साधन ।
तत्रापी उपलब्ध जें तवकृपें मद्बुध्दिरूपी धन ॥
तेणें ह्या भवसागरांत घडलें जें काम माझ्या करें ।
तें तें मी स्मरुनी मनीं टिपण हें केलें असें आदरें ॥ ४ ॥

श्लोक [ स्रग्धरा ].

होतें मातापित्याचें बहु बहु ऋण तें फेडणें पुत्रधर्म ।
ह्यासाठीं आचराया खटपट करणें शक्य तें पुण्यकर्म ॥
दैवानें हेतु ऐसा हृदयिं उपजला पूर्वपुण्यस्य भावें ।
मीही त्वत्पादपदीं नमुनि "टिपण" हें अर्पितों प्रेमभावें॥५॥

गणपत भिवाजी.

# चव्हाण ऊर्फ बैताडे घराण्याची वंशावळ.



# दोन शब्द.

**जिये भूमिमाजी असे जन्म झाला। जिणें पोसुनी पिंड हा वाढवीला॥**
**शिरीं कर्ज हें आपल्या थोर आहे। तया फेडणें आद्य कर्तव्य आहे॥ १॥**

थोर थोर राजे, राजनीति चतुर मुत्सद्दी, महापराक्रमी योद्धे, विद्वान् पुरुष, भाविक इश्वर भक्त वगैरे लोकांचीं चरित्रें हीं सुरस, बोधपर व अनुकरणीय अशीच असतात. इतकेंच नाहीं, तर ती एक ज्ञान वृद्धिचें प्रबल साधन आहे, असें जे लोकमत होऊन बसलें आहे, तें अगदीं यथार्थ आहे, याच कारणामुळें पुरातन काळापासून अशा पुरुषांचीं चरित्रें लिहून ठेवण्याचा प्रघात हा सर्व देशांत पडला आहे; आणि त्यापासून जगाच्या सुधारणेस म्हणजे अर्थातच मानव जातीच्या उन्नतीस मोठेंच साह्य झालें आहे. राजाचें चरित्र राजांना, मुत्सद्यांचें चरित्र मुत्सद्यांना, योद्धांचें चरित्र योद्धांना, विद्वानांचें चरित्र विद्वानांना आणि साधुसंतांचें चरित्र भाविकजनाना हितकर,उपदेशपर व वाचनीय होत असतें. तद्वत व्यापाऱ्याचे चरित्र हें व्यापाऱ्याना मार्गदर्शक होत असतें; आणि त्यापासून त्याना आपली व्यापार वृद्धि कशी करावीं याचें अनुभवसिद्ध ज्ञान प्राप्त होत असतें. थोर थोर पुरुषांच्या चरित्र वाचनापासून इतर जनासहि ज्ञान व बोध प्राप्त होतो; आणि त्यांच्या बहुश्रुतपणांत अधिक भर पडत असते.

स्वतःचे चरित्र स्वताच लिहून काढण्याच्या कामांत अनेक मोठमोठ्या अडचणी असतात; आणि याच अडचणीमुळें स्वतः लिहीलेल्या आत्मचरित्राची संख्या ही इतरांनीं लिहीलेल्या चरित्रापेक्षा अत्यंत अल्प असते. आपणच आपल्या स्वतःचा गौरव करून घेणें आणि प्रौढी मिरविणें हें पुष्कळ लोकांना इष्ट वाटत नाहीं; आणि वास्तविक खऱ्या खऱ्या घडून आलेल्या गोष्टी कितीही जपून व भीत भीत लिहिल्या तथापि त्या संबंधानें पुष्कळाकडून असा आक्षेप घेण्यांत येण्याचा संभव आहे, कीं हें आत्मस्तुतिपुराण आहे; याच कारणामुळें लोक आत्मचरित्र लिहिण्याच्या भानगडींत पडत नाहींत.

येथील कित्येक वर्तमानपत्राच्या आणि मासिकाच्या संपादकांनीं माझें जिवन चरित्र आपल्या वर्तमानपत्रांत आणि मासिक पुस्तकांत प्रसिद्ध करण्याकरितां अनेक वेळां मागितलें होतें. परंतु माझ्या मनाचा पूर्वीपासूनच असा कल होता आणि सध्याहि आहे कीं, माझें चरित्र हें कोणत्याहि विचाराच्या दृष्टीनें प्रसिद्ध करण्याच्या योग्यतेचें नाहीं. मी इतक्या योग्यतेचा नाहीं; आणि या मानास मुळींच पात्र नाहीं; कारण मी इतका कांहीं मोठा विद्वान नाहीं; किंवा माझ्या हातून कोणतीही म्हणण्यासारखी जनसेवाहि घडली नाहीं. मी एक साधारण व्यापारी मनुष्य आहे; अशा स्थितींतील मनुष्याच्या चरित्रवाचनापासून लोकांना कोणत्या प्रकारचें ज्ञान व बोध प्राप्त होणार आहे बरें? मग असलें नीरस चरित्र प्रसिद्ध करणें व्यर्थ नव्हे काय? इतकेंच नाहीं, तर असलें चरित्र प्रसिद्ध करणें म्हणजे आपण होऊनच आपणांस लोकांच्या उपहासास पात्र करून घेणें होत नाहीं काय? याच कारणामुळें मीं आपलें चरित्र कोणाजवळ कथन करून तें प्रसिद्ध करण्यास दिलें नाहीं.

माझ्या घड्याळाच्या व्यापाराचा सुलौकिक युरोप व अमेरिका येथें पसरला, त्या समयीं अमेरिकेंतील युनायटेड स्टेटस्मधील शिकागो येथील "**अमेरिकन ज्युवलर**" या मासिकाच्या संपादकानें माझें चरित्र आपल्या मासिकांत प्रसिद्ध करण्याकरितां मागि-

तलें; परंतु माझें चरित्र कोणत्याहि प्रकारें प्रसिद्ध करण्यालायक नाहीं, हें माझें बनलेलें ठाम मत बदलण्यास मला कोणत्याच प्रकारचें सबळ कारण दिसेना. माझे मित्र कै. रा. सा. नारायणराव रघुनाथ नवलकर स्पेशल मॅजिस्ट्रेट यांनीं मला अशी आग्रहपूर्वक विनंति केली आणि खऱ्या मित्त्वबुद्धीनें अशी सल्ला दिली कीं, जर युनायटेड स्टेटस्‌सारख्या विद्याचारसंपन्न देशांतील मासिकानें तुमचें चरित्र मागितलें आहे, अशा समयीं आपण आपलें चरित्र पाठविण्यास कोणत्याच प्रकारचा संकोच बाळगूं नये किंवा अनमान करूं नये. मी आपलें चरित्र मोठ्या आनंदानें लिहून देईन. मला त्यांचा शब्द मोडवेना; म्हणूनच मला मोठ्या निरुपायानें माझ्या जीवनवृत्तांतील ठळक ठळक गोष्टी त्यांना निवेदन कराव्या लागल्या; त्यांनीं त्यांची योग्य जुळणी करून तें अमेरिकेस पाठविलें; तेथें तें सचित्र प्रसिद्ध झालें.

मी जेव्हां माझ्या ज्ञातीचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली आणि ज्यांच्याकडून मला माहिती मिळेल अशा लोकांबरोबर माझा पुष्कळ पत्रव्यवहार झाला आहे; त्या सर्वांनीं मला अशी विनंति केली कीं, " आपण या इतिहासाबरोबर आपलें चरित्रहि प्रसिद्ध करा; कारण जातीचा इतिहास आजपर्यंत तयार करण्याचा कोणींहि यत्न केला नाहीं; तो आपण करीत आहांत. आणखी, आपण हें काम केवळ निरपेक्ष व परोपकारबुद्धीनें स्वीकारलें आहे. त्यामुळें आपण जातीच्या स्तुतीस पात्र झालां आहांत. अशा थोर व वंद्य पुरुषाची साग्र माहिती आम्हांस अवश्य असली पाहिजे; म्हणून आपण इतिहासाबरोबर आपलें सविस्तर चरित्र जोडा; ही आमची योग्य व सयुक्तिक पण नम्र विनंति मान्य करण्यास आपण बिलकुल अनमान करणार नाहींत अशी आमची आपणाजवळ आग्रहपूर्वक प्रार्थना आहे;" परंतु मला मनापासून आपलें चरित्र प्रसिद्ध करणें इष्ट वाटत नाहीं खरें, पण माझ्या प्रेमळ व हितेच्छु लोकांच्या आग्रहावरून मला तें मोठ्या दिलगिरीनें प्रसिद्ध करावें लागत आहे. चरित्र या थोर पदास मी मुळींच पात्र नसल्यामुळें आणि मित्रांचा हिरमोड होऊं नये म्हणूनच मी यास **चरित्र** हें थोर नांव न देतां '**माझें टिपण**' हें अगदीं साधें नांव दिलें आहे. याच्या वाचनापासून कितपत फायदा होईल याविषयीं मला मोठी जबरदस्त शंका आहे.

**जातीचा इतिहास आणि माझें टिपण**—हें सुमारें २०० पानांचें पुस्तक होऊन सुमारें हजार बाराशें रुपये खर्च येईल असा माझा अंदाज होता. परंतु माझ्या अंदाजाच्या बाहेर ४०० पानांचें पुस्तक होऊन छपाई, बाईंडिंग, फोटो काढणें, त्यांचे ब्लॉक करणें, शोध करून माहिती गोळा करणें, ती शुद्ध रीतीनें लिहून काढण्याच्या कामीं ठेवलेलीं माणसें, पोस्ट वगैरे कामीं मला सुमारें ३००० रु. वर खर्च आला.

मी हें 'माझें टिपण' माझ्या कुटुंबांतील प्रस्तुतच्या आणि भावी पिढीस उपयोगी पडेल अशाच धोरणानें लिहिलें आहे; म्हणूनच मी या टिपणांत माझ्या कुटुंबांतील बऱ्या वाईट ठळक ठळक गोष्टींचा समावेश केला आहे. सदरहु गोष्टींचें महत्व माझ्या हल्लींच्या पिढीस जरी फारसें वाटत नसलें, तथापि भावी पिढीस त्याचें विशेष महत्व वाटणार आहे. कारण या टिपणांत त्यांना त्यांच्या पूर्वजांविषयीं बरेंच ज्ञान प्राप्त होणार आहे; आणि आपल्या कुटुंबांत कोणकोणत्या बऱ्यावाईट गोष्टी घडल्या त्या त्यांना कळून येणार आहेत. आणखी, त्यापासून त्यांना पुष्कळ बोध प्राप्त होऊन आपली सुधारणा करण्यास चांगलें साधन होणार आहे. म्हटलें आहे, " पुढल्यास ठेंच मागचा शाहणा. "

मी या टिपणांत माझ्या आयुष्यांत मला मिळालेला अनुभव कथन केला आहे. अनुभव हा सदोदित चांगलाच मिळत असतो असें कांहीं नाहीं. जग हें दुःखानें भरलें आहे. मनुष्य सुखाची इच्छा बाळंगतो, आणि त्याची सारी धडपड ही सुखप्राप्तिकडे असते; परंतु इंग्रजींत अशी एक म्हण आहे कीं, Man proposes and God disposes म्हणजे मनुष्य चिंतीतो एक; आणि ईश्वरी योजना असते निराळीच; त्यामुळें मनुष्याचे विचाराप्रमाणें सर्वच गोष्टी घडून येत नाहींत, **जगीं सर्व सुखी असा कोण आहे? विचारी मना तूंच शोधून पाहे** । या श्रीसमर्थ रामदासस्वामी महाराजांच्या वचनाप्रमाणें या जगामध्यें सुखापेक्षां दुःखाचेंच पारडें अधिक भरतें; म्हणूनच श्रीतुकाराम महाराजांनीं असें म्हटलें आहे कीं, **सुख पाहतां जवा एवढें दुःख पाहतां पर्वताएवढें** हा अनुभव सर्वत्रांचा आहे; त्यांस मी तरी कसा आणि कां म्हणून अपवादक होणार ? मला या जगामध्यें जो अनुभव आला आहे त्यावरून या दोन महाथोर श्रेष्ठ पुरुषांचे विचार अगदीं बरोबर आहेत; याचा मला चांगला अनुभव आला.

मला संततीचा अभाव आणि संतती होऊन ती अल्पायुषी होते; याच कारणामुळें माझ्या अपत्यप्रेमाचा ओघ हा माझ्या विभक्त कुटुंबांतील मंडळीकडे ओढला आणि मी त्यांना साह्य केले. या माझ्या करण्यांत स्वार्थ आणि परमार्थ असे दोन्हींहि हेतु होते; स्वार्थ असा कीं, माझ्या वृद्धापकाळीं माझ्या जवळ माझ्या खऱ्या प्रेमाची मंडळी असावीं; आणि परमार्थ हेतू असा कीं, ही मंडळी अगदीं निराश्रित आहे, अशा त्यांच्या स्थितींत त्यांना नोकर ठेवून साह्य करणें हा मनुष्य धर्म आहे आणि हाच आद्यधर्म व श्रेष्ठ कर्तव्यकर्म होय. आपण ज्यांच्यावर उपकारांचे ऋण करून ठेवलें आहे ते कदापि कृतघ्न न होता सदोदित कृतज्ञ राहतील; मीं याच हेतूनें त्यांचे पोटच्या मुलांप्रमाणें पालनपोषण केले, त्यांच्यावर प्रेम केलें आणि त्यांना नांवरूपास आणण्यासाठीं त्यांच्या विद्याभ्यासास सढळ हातानें पाण्यासारखा पैसा खर्च केला. यांच्या कुंटुंबांत एक तरी ग्रज्यूएट करीन अशी माझी मोठी उमेद व महत्वाकांक्षा होती. परंतु सांगण्यास पराकाष्टेचा खेद वाटतो कीं, माझी सर्वस्वी नाऊमेद झाली; आणि पूर्ण निराशा झाली. ज्यांचे कल्याण करण्यासाठीं मी इतका झटलों, आणि मागला पुढला विचार न करतां त्यांच्या करितां माझ्या पैशाचा चुराडा केला ते उलट माझे हितशत्रु बनले ! पहा ! ही दुनया कशी आहे ती ! ते उपकारांची फेड अपकारांनीं करूं लागले आहेत ! धर्म करतां कर्म उभें राहते असें जें म्हणतात त्याचा मला चांगला अनुभव आला !

ज्याचें कुटुंब मोठें आहे, त्या कुटुंबांतील संततींत आणि नातलगांत इस्टेटीसंबंधानें वादाचे अनेक प्रश्न उत्पन्न होत असतात; तसा प्रकार आपल्या पश्चात् आपल्या कुटुंबांत होऊं नये, म्हणूनच माझ्या वडिलांनीं आपल्या ह्यातींतच आपलें व्यवस्थापत्र करून ठेविलें होतें. पुढें माझ्या वडिलांच्या मागें आम्हां चौघां बंधूंनीं आपणांस एकमेकांपासून कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये म्हणून आह्मी एक करारनामा तयार करून विभक्तपणा कबूल केला. माझ्या वडील बंधूंस त्यांच्या शेवटच्या स्थितींत देखील त्यांच्या स्वतांच्या कुटुंबासंबंधानें व्यवस्थापत्र करूं दिलें नसल्यामुळें मला फार त्रास व नुकसान सोसावें लागलें.

औदार्य, दया, क्षमा वगैरे गुणांची सुरवात प्रथम आपल्या कुटुंबांत म्हणजे संततींत आणि नातलगांमध्यें होऊं देणें हा जरी मनुष्यप्राण्याचा आद्य व श्रेष्ठ धर्म आहे, तथापि तितक्या वरून त्यांचा एकत्र कुटुंबांत समावेश करतां येणार नाहीं. घरच्या व्यापारांत

बाहेरचे नोकर ठेवल्यापेक्षां आपल्या नातलगास पगारी नोकर ठेवणें आणि त्यांत त्यांना चांगलें हुषार करणें यामुळें ते कांहीं भागीदार किंवा मालक होत नाहींत.

माझी स्वकष्टार्जित स्थावरजंगम इस्टेट व व्यापार आहे, त्याचें कायदेशीर, खरे हक्कदार मालक माझी औरस संतति व पत्नी आहे; कारण माझे सर्व नातलग विभक्त आहेत.

ज्या कुंटुंबांत निरुद्योगी, व्यसनी, स्त्रीअंकित असा पुरुष उत्पन्न होतो, त्याच्यापासून अनेक मार्गानें कुंटूंबसुखाचा नाश होतो; इतकेंच नाहीं, तर तो कुंटूंबद्वेषी बनल्यापासून आपल्या स्वताच्या सुखाचाहि शत्रु बनतो. असा दिग्विजयी पुरुष कुंटुंबांत पैदा झाला म्हणजे तो कुंटुंबाच्या कर्त्या पुरुषाबरोबर इतकें वैर दाखवितो कीं, तो त्याला जगांत मूर्ख ठरविण्याचा उद्योग करतो ! अशा प्रकारचीं शेकडों उदाहरणें आपण प्रत्यक्ष अवलोकन केली आहेत आणि आपल्या कानावरूनहि गेलीं आहेत. अशा प्रकारचा मला अनुभव आल्यामुळें मला त्याचा या टिपणांत मोठ्या कष्टानें उल्लेख करण्याचा प्रसंग आला आणि कुंटुंबदोषपरिस्फोट करून आपली लेखणी विटाळावी लागली याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटत आहे. माझ्या हातून जो प्रतिकूल लेख लिहिण्यांत आला आहे तो मला अगदीं निरुपायानें लिहावा लागला आहे याचा त्यांनीं कोणत्याहि प्रकारचा मनांत विस्मय वाटूं देऊं नये, कारण मीं हे सद्हेतूपूर्वक लिहिलें आहे. या स्पष्ट लिहीण्याचा त्यांनीं विषाद न मानतां माझ्या हेतूकडे लक्ष देऊन वर्तन सुधारतील अशी मला उमेद आहे.

माझ्या आज्यानें जें कांहीं टिपण लिहून ठेवलें होतें त्यावरून मला आपल्या पूर्वजांविषयीं माहिती देतां आली आहे. माझ्या रोजनीशींतील टिपण आणि वह्यांतील नोंद यांचाहि या टिपणास पुष्कळ उपयोग झाला आहे; म्हणूनच अधिकारी, व्यापारी, नोकर, शेतकरी मग तो श्रीमान व सुखी असो किंवा गरीब व दुःखी असो, अशापैकीं ज्यांना लिहितां वाचतां येतें त्यांनीं आपल्या आयुष्यांत घडलेल्या बऱ्यावाईट व सुखदुःखाच्या प्रसंगाचें टिपण व जमाखर्च अवश्य लिहून ठेवावें ! हें काम क्षुल्लक व तुच्छ मानूं नये, हें अत्यंत श्रेष्ठ व महत्वाचें समजलें पाहिजे; कारण त्याचा उपयोग स्वतास आणि भावी पिढीस केव्हां व कसा होईल हें आज सांगतां येत नाहीं.

मला व्यापारासंबंधानें बरावाईट अनुभव आला आहे त्यावरून माझें असें मत झालें आहे कीं, व्यापार चांगला; पण भांडवल नाहीं असें पुष्कळ लोकांचें नेहमी रडगाणें असतें तें अगदीं पोकळ व मिथ्या आहे. ही सबब अगदीं पुळपुळीत आहे. बिनभांडवलानें व्यापार धंद्यांत शिरून लक्षाधीश नव्हे तर नवकोट नारायणापेक्षांही सवाई नवकोट नारायण झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आपण स्वतः पाहिली आहेत, वाचलीं आहेत आणि ऐकलीं आहेत. आपण जर योग्य दिशेनें व्यापार करण्याचा प्रयत्न केला तर हळू हळू आणि क्रमाक्रमानें सर्व गोष्टी अनुकूल होतात. असाध्य तें साध्य होतें, अशक्य तें शक्य होतें, आणि भांडवलाची उणीव पडत नाहीं. तसेंच जे व्यापारी आहेत, त्यांनीं आपलीं मुलें आपल्या व्यापारांत घालण्यापूर्वी त्यांना दुसऱ्या व्यापाराच्या येथें ठेवून त्यांनीं तेथें व्यापारी ज्ञान व अनुभव संपादन केलें पाहिजे. स्वतःच्या मुलांस शिकविण्यास आपण जरी स्वतःसमर्थ असलों तथापि आपण त्यांस शाळेंत पाठवितों आणि घरीं गुरु ठेवतों; तद्वत व्यापाऱ्यानें आपला मुलगा दुसऱ्याच्या येथें शिक्षणसंपादनार्थ ठेवल्याशिवाय त्याला योग्य व्यापाराशिक्षण प्राप्त होत नाहीं. जर आपण आपल्या मुलांना प्रथमारंभापासूनच आपल्या घरच्या व्यापारांत

टाकलें तर ते शेट बनून जमाखर्च तुच्छ मानतात आणि व्यापारी धोरणाच्या अगदीं विरुद्ध वर्तन ठेवतात. त्यापासून प्रसंगीं मोठें नुकसान सोसावें लागतें.

मी स्वतः कांहीं एकदम व्यापारी बनलों नाहीं, मीं प्रथम नोकरी पत्करली आणि कामाचा नियमितपणा व महत्व मला समजल्यावर, मी जरी प्रारंभीं बिनभांडवलानें व्यापार करण्यास सुरवात केली आणि व्यापार भराभराटीस आणला खरा; पण पुढें मी आपल्या व्यापाराची सर्व व्यवस्था पाहण्याचें काम, पैशाची वास्तविक किंमत काय आहे आणि व्यापार कोणत्या धोरणानें चालविला पाहिजे याविषयीं अनभिज्ञ अशा माझ्या तरुणनोकर नातलगांच्या स्वाधीन प्रसंगामुळें मला आपला व्यापार करावा लागला आणि त्यांच्यावर सर्व भरंवसा ठेवून बसलों. आणखी, आपल्या नातलगांस दुसऱ्या व्यापाऱ्याच्या येथें ठेवल्यास आपल्या योग्यतेस हिनत्व येतें अशा कोत्या व आकुंचित विचारामुळें मी आज जो ३५ वर्षे व्यापार करून भरभराटीस आणला होता, त्याची घडी विस्कळीत झाली, त्यास उतरती कळा लागली आणि माझ्या भाविपिढीच्या सुखाचा सर्वस्वी नाश झाला; आपण जी निरुपायामुळें आणि अकल्पित प्रसंगामुळें चूक केली, त्याबद्दल इतरांना दोष देण्यापेक्षां आपण आपली चूक कबूल करणें हेच अशा प्रसंगी योग्य व सयुक्तिक दिसतें.

मीं व्यापारांत आपली प्रगति कशी करून घेतली हे मीं लिहिलेल्या टिपणावरून दिसून येणार आहे. आपण जर व्यापारांत दिर्घोद्योग, अविश्रांत परिश्रम, प्रामाणिकपणा, सरळ वर्तन व चिकाटी धरली तर आपणास यशप्राप्ती झाल्यावांचून कदापि राहणार नाहीं.

मीं हें माझें टिपण प्रसिद्ध केलें आहे; त्यांत यदाकदाचित कोणाला अतिशयोक्ति किंवा आत्मस्तुति केल्यासारखें वाटेल. परंतु अशा प्रकारचा कोणाचाहि ग्रह होऊं नये, यासाठीं मी मुद्दाम शेवटीं **लोकमत** म्हणजे मजसंबंधानें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या देशांतील आणि निरनिराळ्या भाषेंतील वर्तमानपत्रकारांनीं जे उद्गार काढले आहेत त्यापैकीं फारच थोडे आणि अतिसंक्षेपांत जे उतारे दिले आहेत, त्यांकडे लक्ष्य फेंकलें असतां त्यांनीं मजसंबंधानें किती अनुकूल व प्रशंसापर विचार प्रगट केले आहेत आणि मी स्वतः माझें लिहिलेलें टिपण ह्याची प्रांजलपणें तुलना करून पाहिली असतां मजवर अतिशयोक्ति किंवा आत्मस्तुति केल्याचा दोष कोणासहि कधींहि आणतां येणार नाहीं, अशी मला पूर्ण खात्री आहे.

प्रेसच्या नजरचुकीनें पान २८ यांतील टीप ढासळली आहे. तसेंच पान ९४ मध्यें **श्रीगजाराजा** असें चुकून पडलें आहे, तेथें **श्री. सौ. गजराराजा** असें वाचावें. तसेंच पान १०५ ओळ २० यांत **एकत्रकुटुंब** असें जें सदर दिलें आहे, तेथें **विभक्त कुटुंब** असें वाचावें. आणखी कांहीं बारीकसारीक चुका राहिल्या गेल्या आहेत; त्याचें शुद्धिपत्र जोडण्याच्या भानगडींत पडलों नाहीं.

**जगद्धितेच्छु** छापखान्याचे मालक रा. रा. केशव रावजी गोंधळेकर यांनीं मुदतींत आणि माझ्या इच्छेनुरूप काम करून दिलें त्याबद्दल त्यांचेहि प्रसिद्धपणें आभार मानतों.

माझे पुतणे चि. गजाननराव यांनीं आपल्या कर्तव्यास स्मरून या माझ्या **टिपणाचीं** प्रुफें तपासण्याच्या कामीं जी उत्कंठा प्रदर्शित केली त्याबद्दल मी आपला येथें संतोष व्यक्त करीत आहें.

ता. १ मार्च सन १९१६

**जी. बी. नाईक.**

# प्रेसच्या व माझ्या नजरचुकीनें राहिलेली नोंद.

**वार्षिक धर्मः**—श्रावणमासांतील धर्मकृत्यें हीं पूर्वापार जशीं चालत आलीं आहेत तशींच तीं अद्यापपावेतों सुरळीत चालविलीं आहेत; आणि तीं तशींच पुढें चालू ठेवणें हा धर्म होय. मीं ज्या ज्या देवस्थानांस गेलों होतों आणि कांहीं क्षेत्रांच्या ठिकाणीं जें कांहीं वर्षासन किंवा मदत म्हणून देण्याची वहिवाट ठेवली आहे ती माझ्या हयातीपर्यंतचीच आहे; परंतु ती माझ्या पश्चात चालू ठेवणें हें माझ्या वंशजाच्या खुषीची गोष्ट आहे.

**जाहीर नोटीसः**—आम्हां सर्व बंधुंच्या फारकती झाल्या आहेत; आणि त्याप्रमाणें आम्ही सारे विभक्त असून एकमेकांच्या स्थावर जंगम इष्टेष्टीवर अथवा व्यवहार वगैरेवर कोणत्याहि प्रकारचा हक्क संबंध नाहीं. सर्व प्रकारच्या देण्याघेण्याचा ज्याचा तो स्वतंत्र मालक, जबाबदार आणि मुकत्यार आहे, अशा स्पष्ट अर्थाची नोटीस मी मुंबई येथील **इंदुप्रकाश** ता. २७ व २९ डिसेंबर सन १९१३ इ. **जगद्वृत्त** ता. २८ डिसेंबर सन १९१३ इ. पुणें व मुंबई येथील **ज्ञानप्रकाश** ता. २ आणि ५ जानेवारी १९१४ इ. कोल्हापूर येथील **ज्ञानसागर** ता. ५ जानेवारी १९१४ इ. व इतर वर्तमानपत्रांतूनही प्रसिद्ध केली आहे.

**लग्नः**—माझे वडील बंधु कै० बाळा रामजी यांची कन्या आणि माझी पुतणी चि. सौ. हिराबाई ही रा. रा. पांडुरंग किसन मनसाराम धवारे यांना दिली आहे; त्यांची जेष्ठ कन्या चि. **सुमनाबाई** हिचा विवाह रा. रा. पंढरीनाथ रामभाऊ बाबरे यांचे चि. **बाबुराव** यांच्या बरोबर ता. २१ जानेवारी सन १९१६ रोजीं त्यांच्या लौकिकाप्रमाणें मोठ्या थाटानें झाला.

**लग्नः**—माझे कनिष्ट बंधु चि. तुळशीराम यांची जेष्ठ कन्या व माझी पुतणी चि॰ **सारजाबाई** हिचा विवाह श्री. कै. सिताराम लक्षमण शेट किनारीवाळ यांचे नातू चि. पुरुषोत्तम बाळाराम यांच्या बरोबर ता. २१ फेब्रुवारी १९१६ रोजीं झाला.



# चौहान ( बैताडे ) यांचा वंश

१ सावळदास.—२ रामदास.—३ खेमाजी.—४ लखमाजी.—५ भिवाजी.

६ जगोजी.






# प्रकरण १ लें.

## स्वकुलवृत्तनिवेदन.

———:०:———

माझे पूर्वज हे जयपुराजवळ चार कोसांवर **सांगानेर** या नांवाचें एक गांव आहे, तेथील रहिवाशी होते. जयपूर येथील माझ्या कुलाच्या बडव्याकडून व माझ्या आजाच्या टिपणावरून मला आमच्या पूर्वजांविषयीं जी माहिती मिळाली आहे, त्यावरून असें कळून येतें, कीं आमच्या कुळाचा मूळ पुरुष **पृथ्वीराज** चव्हाण ( चौहाण ) हा होय; आणि यांच्यापासून आमचा वंशविस्तार झाला आहे. आमच्या वंशांतील कित्येकांना जहागिरी मिळाल्या होत्या; आणि त्यांच्याकडून भाटबडव्यांना चांगल्या देणग्या मिळाल्या होत्या; असें भाटांच्या चोपड्यांवरून दिसून येतें. संवत १७८० मध्यें हरिनाथ बारठ याचे पूर्वज आपल्या दक्षिणेंतील यजमानाकडे आले होते. ते उंटावर आले; त्या काळीं उंटावर प्रवास करावा लागत असे. त्यांचे प्रवासांतील उंट चोरून नेल्यामुळें आमच्या पूर्वजांविषयींची सविस्तर हकीगत लिहून ठेवलेल्या चोपड्याही चोरीस गेल्या. तो काळ मोठ्या धामधुमीचा होता. जयपुराकडील मंडळी उंटावर प्रवास करीत असे, तें उंट चोरानें नेलें आणि त्यांच्याबरोबर दक्षिणेंतील बहुतेक वंशाच्या चोपड्याहि चोरीस गेल्या; त्यामुळें असा शोचनीय

परिणाम झाला कीं, आह्मी आपल्या पूर्वजाच्या इतिहासास मुकलों. आमच्या जातीचें नांव **कुमावत क्षात्रिय** होय.

मला आमच्या घराण्याच्या सात पिढ्यांचीं नांवें ठाऊक आहेत; ती येणें-प्रमाणें:—**सावळजी**चा पुत्र रामजी. **रामजी**चा पुत्र खेमाजी. **खेमाजी**ला आवाजी, लखमाजी आणि नेमाजी असे तीन पुत्र होते. आवाजी आणि नेमाजी यांचे वंशज बहुत करून मेवाड, पंजाब, औध, मध्यप्रांत इकडे गेले असावेत. खेमाजीचा पुत्र लखमाजी. **लखमाजी**ला चार पुत्र होते; त्यांचीं नांवें:—१ काशि-राम २ रामचंद्र ३ भिवाजी आणि ४ काळुराम. **भिवाजी**ला तीन पुत्र होते; त्यांचीं नांवें:— कृष्णाजी २ जगोजी आणि ३ देवीदास. कृष्णाजी व देवी-दास यांचे वंशज गुजराथ आणि दक्षिणेंत पसरले आहेत. लखमाजींचा पुत्र भिवाजी, भिवाजीचा पुत्र **जगोजी,** आणि जगोजीचे पुत्र **भिवाजी.** रामदास हे सवंत १७००मध्यें सौराष्ट्र ( काठेवाड ) येथें येऊन राहिले. तदनंतर ते गुजराथेंत येऊन राहिले. त्यांचें पुत्र खेमाजी हे सवंत १७४० मध्यें वैदर्भ ( वऱ्हाड ) प्रांतांतील अंजनगांवीं येऊन राहिले. पुढें ते सवंत १७६५ मध्यें औरंगाबादेजवळील लसूऱ्या ( लासूर ) गांवीं येऊनराहीले. पुढें त्यांचे पुत्र लखमाजी हें परत गुजरा-थेंत गेले; तेथें त्यांस **भिवाजी** नांवाचा पुत्र झाला; त्यानें सुरत जिल्ह्यांतील श्री. गायकवाडसरकारच्या ताब्यांतील सोनगड मुक्कामीं वस्ती केली. पुढें त्यांस **जगोजी** या नांवाचा पुत्र झाला. यांना शिकारीचा मोठा शोक असे; इतकेंच नाहीं, तर ते चांगले शिकारी होते. त्यांच्या जवळ चांगलीं चांगलीं शिकारी कुत्रीं होतीं; त्यांच्या साह्यानें त्यांनीं तीन वाघ मारले, ही बातमी श्री. गायकवाडसरकारच्या कानावर गेल्यामुळें त्यांनीं त्यांस एक बंदूक आणि एक तलवार बक्षीस देऊन इनामही दिलें. आणखी त्यांना शिल्प कामदार नेमून '**गजधर**' व **नाईक** ही पदवी दिली.

भिवाजीचे पुत्र जगोजी हे आपल्या वडलांच्या मागें सोनगड मुक्कामीं त्यांची नोकरी संभाळून शेतीभातीचेंही काम करीत होते. यांनाही शिकारीचा मोठा शोक असे. ते तीराचा नेम मारण्यांत इतके पटाईत होते कीं, केवळ शब्द ऐकून त्या जागीं नेमका तीर मारीत असत; इतकी शब्दवेध कला त्यांनीं सुसाध्य करून घेतली होती. बनाटीचे हात खेळण्यांतही ते मोठे निपुण होते.

जगोजी हे आपल्या वयाच्या सुमारें ५५ वें वर्षीं वारले; यांना गुजराथी चां-गलें लिहितां वाचतां येत असे. जगोजीच्या कुटुंबाचें नांव आनंदीबाई; हिला चार मुलें आणि दोन कन्या झाल्या; त्यांपैकीं तीन मुलें आणि एक मुलगी बाळ-पणींच वारली. भिवाजी आणि शिवबाई हीं दोन मुलें वांचलीं. भिवाजी हे माझे वडील होत. हे लहाणपणीं इतके आजारी होते कीं, ते या दुःखण्यांतून वांच-तील असा मुळींच भरवंसा नव्हता; इतकी त्यांची अत्यावस्था झाली होती. यांना पोटांतील विकार झाला होता, तो बरा होण्यासाठीं त्यांना गुराला डागतात त्याप्र-

माणें पांच ठिकाणीं डागलें होतें. या अघोरी उपायानें त्यांचा पोटांतील विकार साफ बरा झाला. लहानपणीं यांच्या हातापायांत कडे तोडे होते, ते चोरानें काढून घेऊन त्यांस गांवाच्या बाहेरील खिंडाऱ्यांत एका खोड्यांत अडकवून ठेवलें. यावरून त्या काळीं दागिन्यांसाठीं प्राण घेण्याचा प्रघात कमी असावा असें दिसतें. सहा मुलांपैकीं शेवटचीं दोन मुलें वांचलीं. त्यामुळें ती आईबापांचीं फार लाडकीं होतीं हें निराळें सांगणें नलगे. या त्यांच्या लाडामुळें मुलाचें लक्ष विद्याभ्यासाकडे लागावे इकडे कोणी प्रयत्न केला नाहीं. पूर्ववहिवाटीप्रमाणें त्यांस लहानपणापासूनच तालमींत घातल्यामुळें ते कुस्त्या करणें, दांडपट्टा खेळणें वगैरे तालमींतील शिक्षणांत चांगले प्रवीण झाले होते. त्यांनीं आपली शरीर संपत्ति चांगली संपादन केली होती. एके वेळीं दसऱ्यास गांवकरी लोकांच्या कुस्त्या, दांडपट्टे, बनाटी वगैरे खेळामध्यें त्यांनीं मध्यभागीं उभें राहून त्यांच्या सभोवतालीं कांहीं अंतरावर चांगलीं हुशार आठ मनुष्यें उभीं करून त्यांच्यावर गोट्यांचा एकसारखा वर्षाव करीत असतां तो ते आपल्या दांडपट्यानें एकही गोटा आपल्या अंगास लागुं न देतां आपला बचाव केला; या त्यांच्या चलाखीबद्दल त्यांना गांवकऱ्याकडून कडींतोडीं बक्षिस मिळाली. त्यांना आपल्या वडलांच्या पश्चात् त्यांची मेस्त्रीची नोकरी मिळाली. याचें पाहिलें लग्न सन १८२४ सालीं आपल्या वयाच्या सुमारें २० व्या वर्षीं झालें; तें गुजराथ प्रांती झालें; परंतु लग्न होऊन पुरा एक महिना झाला नाहीं तोंच त्या बिचारीचा अंत झाला! त्यामुळें सन १८२६ सालीं खानदेशांतील शिलेदार घराण्यांपैकीं बगडाने यांची कन्या **भिमाबाई** यांच्या बरोबर त्यांचा द्वितीय विवाह झाला. लग्नांत त्यांचें इकडील नांव **चिमाबाई** असें ठेवलें. ही माझी मातोश्री होय.

**भिवाजी** यांची वडील बहीण **शिवबाई** हिचे पुण्याचे कानोजी करोडीवाळ यांस घरजांवई करून त्यांच्याबरोबर लग्न लावून दिलें होतें. घरजांवई करण्याचें कारण असें कीं, या बहिणभावंडांमध्यें विलक्षण प्रेम असल्यामुळें त्यांचा वियोग होऊं नये याकरितां घरजांवई केला म्हणजे आपली कन्या दुसऱ्याच्या घरीं जाणार नाहीं. हें लग्न गुजराथेंतच सोनगड मुक्कामीं झालें. सन १८३० सालीं भिवाजीस एक कन्या झाली तिचें नांव देऊबाई असें ठेविलें, आणि शिवबाईस एक कन्या झाली, तिचें नांव धनाबाई असें ठेवलें. भिवाजींचा स्वभाव सत्वशील होता; पण वृत्ति जरा तामसी होती. संस्थानांतील नोकरीचा पगार नियमित वेळीं मिळत नसे, म्हणून त्यांची प्रांत अधिकाऱ्याबरोबर पगारासंबंधानें आणि इनामासंबंधानें बरीच तक्रार झाली; त्यामुळें त्यानें त्यांचा पगार वगैरे चुकता करून त्यांनीं चोवीस तासांचे आंत आमच्या संस्थानांतून निघून जावें असा ठराव केला. त्यामुळें सन १८३१ सालीं आपल्या घरच्या दोन बैलगाड्यांमध्यें आपला संसार भरून पनवेलीस येऊन दाखल झाले; त्या वेळीं आगगाडी नसल्यामुळें प्रवास हा बैलगाडीं-

तूनच करावा लागत असे. चोवीस तासांत सोनगड सोडण्याचा त्यांना हुकूम झाल्यामुळें आपलें स्वतःचें घरदार, इनामी जमीन, गुरेंढोरें सर्व टाकून देऊन सडे माणसासहित यावें लागलें. ते पनवेल मुक्कामीं आल्यावर त्यांना इंजिनीअर खात्यांत गवंडीकामावर देखरेख करण्याची मेस्त्रीची जागा मिळाली. तेथें बापु बिंद्रावण व भाऊसाहेब मनसाराम यांचीं कंत्राटी कामें चाललीं होतीं. पुढें यांची बदली खोपोली येथें झाली. तेथें कांहीं काळ घालाविल्यावर मुंबईपासून रेल्वे सुरू झाली त्या वेळीं त्यांनीं सरकारी नोकरी सोडून रेल्वेंत नोकरी पत्करली. प्रथम त्यांची नेमणूक बोरघाटाच्या बोगद्याच्या कामावरील गवंडीकामावर मेस्त्रीच्या जागीं झाली. तेथें पुण्याचे नानासाहेब फडतरे हेही होते. बोगद्याच्या कामावर जे लोक काम करीत होते त्यांना आठा दिवसांनीं मुठभरून रुपये वेतन मिळत असे. हें काम मोठें धोक्याचें असल्यामुळें जे मजूर लोक सुरक्षित असत त्यांना आठ दिवसांनीं मुठभरून रुपये वेतन मिळत असे, असें सांगतात. भिवाजीचे चुलतबंधु भागिरथ, गणपतराव आणि ग्यानोजी हे पुण्यास राहत होते. भागिरथ हे पुण्यांतील मूळा-मुठानदीवर धरण बांधण्याच्या कामावर मेस्त्री होते. हें समजल्यावर भिवाजी त्यांना भेटण्याकरितां पुण्यास गेले. तेथें त्यांनीं आदितवारांत दारुवाल्याच्या पुलावर नंबर ५ चें दोनखणाचें एकमजली लहानसें घर विकत घेऊन ठेवलें. माझी वडील बहीण देऊबाई हिचें लग्न गणपतराव शेडोजी धवारे यांजबरोबर झालें. हीस दोन पुत्र आणि दोन कन्या झाल्या. वरील घरीं वडील बंधु **बाळाराम** यांचा जन्म सन १८४५ सालीं झाला. बोगद्याचें काम पूर्ण होईपर्यंत कर्जत आणि खंडाळा या दोन स्टेशनांमध्यें लोक बैलाच्या किंवा घोड्याच्या गाड्यांनीं प्रवास करीत असत. मुंबईपासून थेट पुण्यापर्यंत आगगाडीचा रस्ता नव्हता; तो बोगदे तयार झाल्यावर झाला. बाळारामाच्या पाठीवर दोन मुली आणि एक मुलगा झाला. मुलगी राधाबाई ही बाळपणींच वारली, तिच्या पाठीवर बाबाजी नांवाचा मुलगा झाला; त्याच्यानंतर यशोदा या नांवाची मुलगी झाली, ही देखील बाळपणींच वारली. बाबाजी हा आपल्या वयाच्या तिसरे वर्षीं गमावला. बाबाजीचे पाठीवर माझा जन्म (**गणपतराव**) सवंत १९१५ शालीवहान शके १७८१ साली श्रावणमासीं कृष्ण-पक्षी तिथी एकादशीस पुणें जिल्ह्यांतील तळेगांव दाभाड्याचे येथें झाला. त्यावेळीं माझे वडील भिवाजी हे रेल्वे लाईनच्या कामावर मेस्त्री होते. मी आपलें साग्र चरित्रकथन पुढें करणार असल्यामुळें तत्संबंधानें येथें अधिक विस्तार करीत नाहीं. माझ्या पाठीमागून **मंजुळाबाई** या नांवाची कन्या शके १७८३ सालीं झाली. हिच्या पाठीवर शके १७८६ सालीं **गंगुबाई** या नांवाची कन्या झाली. या दोन्ही मुलींचा जन्म भुसावळ मुक्कामीं झाला. यांचा जन्म होण्यापूर्वीं माझ्या वडिलांची नेमणूक तापी नदीच्या पुलाच्या कामावर झाली असल्यामुळें ते भुसावळ मुक्कामीं राहत होते. तेथें त्या वेळीं आमच्या जातीचा चांगलाच जमाव होता. पुढें

तेथून त्यांची बदली गाणगापुरास झाली. या ठिकाणीं त्यांनीं एक विहीर खणली आणि त्या विहीरीजवळच एक धर्मशाळाही बांधली. अलिकडे त्या विहिरीचा आणि धर्मशाळेचा जिर्णोद्धार विठ्ठल चैतन्य यांनीं केला. श्री गाणगापुर क्षेत्रास जाण्यास हेंच स्टेशन असल्यामुळें या विहीरीचा आणि धर्मशाळेचा यात्रेकरू लोकांस चांगला उपयोग होत आहे. माझे वडील हे निःसीम दत्तोपासक असल्यामुळें तें दोन तीन महिन्यांनीं सहकुटुंब **श्रीदत्ताच्या** दर्शनास जात असत. यांचें मुख्य आराध्य दैवत **श्रीशंकर** हें होय. यापुढें तेथून त्यांची बदली गुलबर्गा आणि गाणगापूर या दोन स्टेशनांमधील हुनसडगी या गांवीं झाली. तेथें त्याना शके १७८९ सालीं **गोपाळराव** झाला; आणि पुढें याच गांवीं शके १७९१ अश्विन मासीं शुद्ध द्वितीयेस **तुळशीरामाचा** जन्म झाला.

माझी वडील बहीण देऊबाई हिचें लग्न गणपतराव शेडोजी धवारे यांच्या बरोबर झालें. माझी धाकटी बहीण चि. मंजुळाबाई हिचें लग्न **किसन** गणोजी सदीवाळ ( कुंडलवाल ) यांच्या बरोबर झालें. आणि तिच्या पाठीवरची धाकटी बहीण चि. गंगाबाई हिचें लग्न भाऊसाहेब काशीराम जाजोरे यांच्या बरोबर झालें.

माझी वडील बहीण सौ. देऊबाई हिच्या आठ संततिपैकीं नानाभाऊ हा एक होय. माझे वडील बंधु बाळाराम यांना आपला विद्याभ्यास करण्यासाठीं पुण्यांत देऊबाईच्या घरीं ठेविलें होतें. त्यांना आपला शाळेचा खर्च भागण्याकरितां शाळा सांभाळून रंग, सफेती देणें व चित्रें काढणें वगैरे कामें करावीं लागत असत.

माझ्या वडिलांना दरमहा पगार रुपये तीस, आणि याशिवाय घोड्याबद्दल भत्ता पंधरा रुपये मिळत होते; परंतु कुटुंब मोठें असल्यामुळें तें कांहीं पुरेसें नव्हतें; यामुळें आमची घरची स्थिति बरीच गरीबीची होती; त्यामुळें माझे वडील बंधु बाळाराम यांचा इंग्रजी थोडाबहुत अभ्यास झाल्यावर त्यांना शाळा सोडून नोकरीच्या शोधास लागावें लागलें.

माझी आजी आनंदीबाई हिला पुण्यांत तिची मुलगी ( माझी आत्या ) शिवबाई हिच्या घरीं ठेवली होती. ती कांहीं महिन्यांनीं वारली. तिच्या दिवसाच्या दिवशीं माझ्या जातींतील एकंदर स्त्रीपुरुषांस जेवण दिलें; त्या वेळीं दोन हजारांवर जातीचीं माणसें होतीं. सहाशेंच्या वर घरें होतीं. फक्त दारुवाल्याच्या पुलावरच ४०।५० घरें होतीं. दिवस मालपुवे आणि दहीं यांचा घातला. सुमारें सात पल्ल्याचे मालपुवे करावे लागले.

माझ्या वडील बंधुचें पहिलें लग्न त्यांच्या पंधरासोळाच्या सुमारास झालें; त्यांस कै. नंदराम सुंदरजी नाईक कवालिये यांचे कारभारी कै. सखारामजी तेलपुरे यांची पुतणी भागुबाई ही वधू केली. तिचा स्वभाव मोठा हट्टी आणि आईचे

फाजील लाड यामुळें तीं नांदण्यास फारशी येत नसे; ह्मणून ते तिचा त्याग करून दुसरें लग्न करण्याच्या मार्गास लागले.

माझ्या बंधूस गुलबुर्ग्यास रेलवे इंजिनीअरच्या ऑफिसमध्यें एक महिना उमेदवारी केल्यावर तेथें दरमहा दहा रुपये पगाराच्या टाईम किपरच्या कामावर कायम केलें. माझ्या वडिलांची बदलीही गुलबुर्गा रेलवे लाइनीवर झाली. पुढें माझ्या आणि माझ्या बंधूच्या विद्याभ्यासाकरितां व मुलींना योग्य स्थळ मिळण्याकरितां एकंदर मंडळीची पुण्यास रवानगी केली.

माझे वडील स्वभावानें नम्र, सत्त्वशील, धार्मिक व देवभोळे होते. यांना साधारण गुजराथी येत असे. हे आपल्या कामदार मंडळींत कामाशिवाय फारसे मिसळत नसत. हे हमेशा आपली रिकामपणाची वेळ साधुसंत, बैरागी वगैरे मंडळींत घालवीत असत. यांना ज्योतिषाचा नाद असून **लीलावती** शास्त्रासंबंधीं चांगली माहिती होती. ते फार देवभोळे होते. ते नेहमीं प्रातःकाळीं स्नान करून, भस्म लावून गंध लावून आणि देवपूजा करून कामावर जात असत. त्यांना हांसत किंवा विनोदानें बोलण्याची मुळींच संवय नव्हती. ते आपली नोकरी इतक्या प्रामाणिकपणानें करीत असत कीं, ते कोणापासून कधींही लांच घेत नसत. ते फार मितभाषणी असत; ते घरांत देखील मुलांमाणसांत कामाशिवाय अधिक बोलत नसत. त्यांना अमर्याद आणि अश्लील भाषणाचा अत्यंत तिरस्कार असे.

माझी परमपूज्य मातोश्री ही स्वभावानें फार गरीब व भोळी असल्यामुळें ती आम्हां बहीणभावंडांतील भांडणतंट्याचा निकाल लावण्यास अगदींच असमर्थ असे. कारण वडिलांचा घरांत मोठा दरारा असल्यामुळें तिचा कांहीं इलाज चालत नसे. प्रसंगविशेषीं तिनें जर मोठ्या धैर्यानें आमच्या तक्रारी वडिलांच्या कानावर घातल्या तर उलट आमचे वडील तिचाच खर्पूस समाचार घेत असत. ती कधींहि बाजारहाट करण्यास बाजारांत जात नसे. तिला पुरे वीस रुपयेहि मोजतां येत नव्हते. आमचे आईबाप आह्मा बहीणभावंडांचे कोणत्याहि प्रकारें लाड करीत नव्हते. या उभयतांच्या सुशील स्वभावाचा संस्कार माझे वडील बंधु, तीन बहीणी आणि मजवर चांगला झाला.

माझे वडील बंधु बाळाराम हे नोकरींत आपली चांगली हुशारी दाखवीत गेल्यामुळें त्यांची बढती जलद होत चालली; त्यामुळें आमच्या प्रपंच्याच्या खर्चाचीहि चांगली सोय होत गेली. पुढें जी. आय. पी. रेल्वेचें कंत्राट जे. **कार्स** या नांवाच्या एका युरोपिअनानें घेतलें; त्यामुळें अथातच रेल्वे खात्यानें आपलें चालू **इस्टाब्लिशमेन्ट** ( नोकरमंडळी ) त्यांच्या स्वाधीन केलें; परंतु माझ्या वडिलांची नोकरी ही रेल्वे खात्याकडेसच होती. त्या वेळीं माझ्या वडिलांस आणि आतेस " सुरतकर " याच नांवानें ज्ञातिमध्यें ओळखीत असत. माझ्या आत्येची मुलगी धनाबाई ही सातारच्या छत्रपतींचे आश्रित कै. सोमाजी राणोजी छापरवाळ यांना

वधू करून दिली होती. हे राजमहालाचे वगैरे कामावर हुद्देदार ( मेस्त्री ) होते. यांस छत्रपति महाराजांकडून चांदीचा ओळंबा, करणी आणि गज हीं इनाम मिळून आणि कांहीं जमिनीही इनामी मिळाल्या होत्या; यांस **गजधर** असें म्हणत असत.

वडील बंधु बाळाराम हे आपला पगार वडिलांचे स्वाधीन करीत होते; आणि अवांतर प्राप्ती ही आपल्या दुसऱ्या लग्नासाठीं संचय करून ठेवित होते. आपलें दुसरें लग्न पुण्यास जमणार नाहीं आणि तेथें अनेक विघ्नें येऊन पुष्कळ त्रासहि होईल; यासाठीं त्यांनीं सोमाजी नायकाबरोबर साताऱ्यास आपल्या दुसऱ्या लग्नासंबंधानें पत्रव्यवहार सुरू केला; श्री. रामचंद्र मनसाराम धवारे यांस जी मुलगी देण्याचें ठरलें होतें, ती चुडामण माळवाल यांची कन्या भागुबाई ही होय. तीच मुलगी आमच्या बंधूस वधू नेमस्त करून आणि तिथीनिश्चय करून वडील बंधूस बोलाविलें. ते रजा घेऊन पुण्यास आले; आणि ते मला आणि आमचे आतेबंधु मणीरामजी करोडीवाळ यांस बरोबर घेऊन साताऱ्यास गेले. आम्ही सर्व मंडळी सोमाजीचे घरीं उतरलों. पुणेकर जात मंडळीनें अशा अडचणी काढल्या कीं, पहिल्या स्त्रीची व्यवस्था लावल्याशिवाय, पंचांच्या सम्मतीशिवाय आणि एकास पूर्वींच नेमस्त झालेली वधू दुसऱ्यास करतां येत नाहीं; या त्यांच्या हरकतींस न जुमानतां हळद लावण्यांत आली. या लग्नास अडथळा करण्याकरितां आणि विघ्नें आणण्याकरितां पुण्याहून मंडळी मुद्दाम साताऱ्यास आली; आणि दादा जलंद्रे यांची मदत घेऊन ते लग्न हाणून पाडण्याच्या खटपटीस लागले; परंतु त्या ठिकाणीं सोमाजीचें वजन दांडगें होतें आणि रा. सा. देवराव कृष्णराव ठोसर हे माझ्या वडील बंधूचे शाळा सोबती ते त्यावेळीं तेथें पोलिस इन्स्पेक्टर होते त्यामुळें लग्नांतील चटसारीं विघ्नें टळून हें लग्न पोलिस अधिकाऱ्याच्या बंदोबस्तानें लागलें. या वधूचें नांव काशिबाई असें ठेवलें. हिला एक पुत्र आणि एक कन्या झाली. पुत्राचें नांव लक्ष्मणराव, आणि कन्येचें नांव राधाबाई.

माझी धाकटी बहीण मंजुळाबाई हिची रामचंद्र, अनुसुयाबाई आणि गजानन हीं तीन मुलें हल्लीं आहेत. माझी कनिष्ठ बहीण गंगाबाई हीस एक मुलगी ममताबाई आहे.

माझे धाकटे बंधु गोपाळराव यांचा अभ्यास इंग्रजी पांच इयत्तेपर्यंत झाला होता. हे पुण्यांत कंत्राटदाराच्या हाताखालीं मेस्त्रीचें काम करीत होते. नंतर त्यांनीं किराणा जिन्नस विक्रीचें दुकान काढलें होतें. यांना संगत चांगली नसल्यामुळें त्याचा परिणाम त्यांना शेवटीं भोगावा लागला. यांचें लग्न त्यांच्या वयाच्या सुमारें सोळावें वर्षीं झालें. यांचें कुटुंब बाबाजी कानोजी खाटवाळ यांची कन्या **रखमाबाई** हें होय. या बाईस कांहीं संतति झाली नाहीं. माझी बहीण मंजुळाबाई ही पुण्यांत सन १८९७ सालीं प्लेगनें वारली; त्या समयीं तिचा एक मुलगा अवघा एक

वर्षांचा होता; त्याचा प्रतिपाळ करण्यास कोणी नाहीं असें पाहून कै. गोपाळरावाचें कुटुंब ह्मणजे थोरल्या रखमाबाई हिनें त्याचा मातेप्रमाणें संभाळ केला. त्या वेळीं मीं तिला ह्मटलें की, 'तुला कांहीं ' संतति नाहीं आणि या लहान बालकाचा ममतेनें प्रतिपाल करण्यासहि कोणी नाहीं यासाठीं तुं याचा पोटच्या मुलाप्रमाणें संभाळ कर.' त्याप्रमाणें तिनें केलें.

माझे कनिष्ठ बंधु तुळशिराम यांचाहि इंग्रजी चारपांच पुस्तकांपर्यंत अभ्यास झाला होता. यांचा विवाह तुकाराम कारबवाळ यांची कन्या **रखमाबाई** हिच्या-बरोबर झाला. हिला घरांत धाकटी रखमाबाई असें ह्मणतात; हिस चार मुलें आणि दोन मुली आहेत. मुलांचीं नांवें:-**दत्ताराम** ( जन्म शके १८१२) **पुरुषोत्तम, हरिभाऊ** आणि **कृष्णा** ( जन्म शके १८३२ ता. ६।१२।११ ) आणि मुलींचीं नांवें **सारजा** आणि **कलावती**. मी तुळशिराम यांस आपल्या जी. बी. नाईक आणि कंपनीच्या पुण्याच्या ऑफिसांत म्यानेजर या नात्यानें नोकरीवर ठेवलें होतें; परंतु त्यांचें कुसंगतीमुळें कामाकडे लक्ष्य नसल्यामुळें मला ही पुण्याची शाखा बंद करावी लागली. नंतर ते पुढें मोत्याची दलाली आणि व्यापार करूं लागले. मी त्यांस व्यापार करण्यास जें भांडवल दिलें होतें; तें त्यांनीं घोड्याच्या शर्यतीमध्यें घालविलें; इतकेंच नाहीं तर, हे कुटुंबवत्सल असल्यामुळें मी त्यांच्या नांवावर जीं घरें व ईस्टेट करून दिली होती तिचाहि त्यांनीं निकाल लावून टाकला. !!!

वडलांची बदली शहाबाद, वाडी, यादगिरी, कृष्णा, रायचूर, वगैरेकडे रेल्वे मेस्त्रीच्या कामावर झाली. पुढें त्यांची बदली पुण्यास झाली. पुण्यास हे बरेंच वर्षें नोकरीवर होते. यांनीं रेल्वेमध्यें पंचावन वर्षें नोकरी केली आणि शेवटी ग्राच्युएटी घेऊन पुण्यांत आपल्या आयुष्याचे दिवस ईश्वर मार्गांत घालवू लागले.

बाळाराम यांची बदली रायचुरकडील कृष्णेच्या पुलावरील कामावर झाली. तेथील काम पुरें झाल्यावर त्यांची बदली शिकंदराबादेस झाली. तेथील लष्करी बराखीचीं कामें त्यांच्याच देखरेखीखालीं झालीं;तीं कामें पूर्ण झाल्यावर वऱ्हाडांत बालाजीचे बासीम या गांवीं झाली. पुढें साहेबांचे भागीदार हेनरीसाहेब आणि यांचें पटेना, म्हणून त्यांनीं आपल्या कामाचा राजिनामा दिला. आणि स्वतः कंत्राटें घेण्यास नागपुरास गेले; तेथें माझे चुलतबंधु एसबा ग्यानुजी बैताडे हे रेल्वे मेस्त्री होते; तेथें ते रेलवेचीं कंत्राटी कामें करूं लागले. पुढें ते बासीमला येऊन तेथें कंत्राटें घेऊं लागले. तेथील कंत्राट माझ्या स्वाधीन करून त्यानीं मद्रासेकडील नंदियाल गांवीं कंत्राट घेतलें. तेथें त्यांना कंत्राटी कामांत फायदा न झाल्यामुळें ते पुण्यास परत आले. नंतर पुण्याहून ठाण्यास गेले; तेथें त्यांना तानसा तलावावर शंभर रुपये दरमहा पगारावर सुपरवायझरचें काम मिळालें. ती नोकरी अत्यंत त्रासदायक असल्यामुळें त्यांनीं सोडून दिली आणि परत पुण्यास येऊन सिटी म्युनिसिपालिटीमध्यें मेस्त्रीची नोकरी पत्करली; पण तेथील पगार पन्नास रुपयांच्या वर वाढणारा नसल्यामुळें त्या जागेचा

राजीनामा देऊन पुनः रेल्वेंत नोकरी धरली. त्यांनीं बार्शी, डिकसाळ वगैरेकडे नोकरी करून नंतर त्यांची बदली पुण्यास झाली. दुसऱ्या कुटुंबास पुढें संतति होणें बंद झाल्यामुळें त्यांनीं औरंगाबादची कृष्णाबाई कारवाळ जी केवळ हळदीच्या डागाची होती; तिच्या बरोबर पुनर्विवाह लावला. तिला **शंकर**, **नथुराम** व **हिराबाई** अशीं तीन अपत्यें आहेत. बाळाराम हे स्वभावानें स्पष्टवक्ते असून प्रेमळ होते. बाळाराम यांची कन्या राधाबाई ही खडकींतील मारोती देवतवाळ यांस दिली होती; ती पुढें काळ्यानें वारली. तिला एक कन्या अनुसया या नांवाची होती, ती पुण्यांतील मानाजी बाळाराम तेलपुरे सब ओव्हरसीअर यांस दिली होती. तीही एडन मुक्कामीं वारली. तिला एक मुलगा आहे त्याचें नांव दत्तू.

---

# प्रकरण २ रें.

## जन्म, बाळपण; विद्याभ्यास.

---

माझा जन्म पुणें जिल्ह्यांतील सेनापती दाभाडे यांचे तळेगांवीं झाला; हें मागील प्रकरणामध्यें सांगितलें आहे. माझ्या वडिलांची नोकरी रेल्वे खात्यामध्यें असल्यामुळें आणि कोणत्या एका गांवीं स्थाईक राहणें नसल्यामुळें मला माझ्या नवव्या वर्षी शाळेंत घातलें. माझा आणि माझ्या बंधूचा विद्याभ्यास व्हावा ह्मणून माझ्या वडिलांनीं माझ्या मातुश्रीला पुण्यांत नेऊन ठेवलें. आमच्या मोहल्यांत म्हणजे दारुवाल्याचें पुलावर पेशवाईच्या अमदानींतील देवजी बुवा यांचा मठ अद्याप प्रसिद्ध आहे. या सत्पुरुषाचा लौकिक फार चांगला आहे. यांचा जन्म जरी चांभार वर्गामध्यें झाला होता, तथापि श्रेष्ठ वर्गांतील लोकांच्या मनांतहि त्यांच्या विषयीं पूज्य बुद्धि वास करीत आहे. यांनीं समाध घेतली. त्यांच्या पुण्यतीथीचा उत्सव मोठा होत असे. पूर्वीं उत्सव प्रसंगीं सर्व ज्ञातीवर्गास भंडारा करीत असत. यांच्या मठांत तात्या मिरासदार पंतोजीची एक गांवठी शाळा होती. या शाळेचा त्या काळीं इतका लौकिक असे कीं, येथें मोडी अक्षर, हिशोब, जमाखर्च, तोंडचे हिशोब चांगले शिकविले जात असत. प्रथम मला याच शाळेंत घातलें; आणि येथूनच माझ्या शिक्षणास सुरवात झाली. त्या काळची शिक्षण पद्धत आणि हल्लींच्या काळची शिक्षण पद्धत यांमध्यें मोठेंच अंतर आहे. त्या काळचे तात्या पंतोजी पुराणांत वर्णन केलेल्या राक्षसाप्रमाणें महाभयंकर व उग्र दिसत असत. विद्यार्थी अभ्यास चुकला

किंवा गैरहजर राहिला म्हणजे तात्या पंतोजीकडून चवदाव्या रत्नाचा खर्पूस प्रसाद मिळत असे. त्या वेळची शासन पद्धत ही अत्यंत निर्दयपणाची असे. घोडी देऊन खालून छड्यांचा सपाटून मार मिळत असे. खुर्ची देणें, आंगठे धरावयास लावणें अशा नानाप्रकारच्या शिक्षा होत्या. तात्यानें अंगावर मोठमोठे वळ येईपर्यंत जरी मारलें तरी आईबाप त्याला कांहीं बोलत नसत. मुलास पंतोजी आणि सुनेस सासु; यांच्यावर मुळींच अपील नसे. छडी लागे छम छम आणि विद्या येई घंघं असा लोकसमज त्या वेळीं होऊन चुकला होता. मुलाला जो धाक दाखवितो आणि जी क्रूर शिक्षा करितो ती त्याच्या कल्याणाकरितांच करतो. जर मुलांना पंतोजीनें मारलें नाहीं, तर त्यांना विद्या कशी येणार ? मी या शाळेंत तीन वर्षें होतों; या तीन वर्षांत मोडी अक्षर, मोडी जुनी हातचीं पत्रें वाचणें, पत्रें लिहिणें इतकी विद्या संपादन केली; म्हणजे हल्लींच्या काळांतील चार पांच इयत्तेपर्यंत माझा अभ्यास झाला. नंतर असें झालें कीं, गोपाळराव केळकर या नांवाच्या एका इंग्रजी मास्तरानें मोहोल्यांत फिरून असें जाहीर केलें कीं, मी उद्यांपासून याच मोहल्यांत एक इंग्रजी शाळा स्थापन करणार आहें, त्या शाळेंत आपलीं मुलें पाठवा; त्या शाळेंतील पहिला विद्यार्थी मीच होय. त्या वेळीं शाळेंत हावार्डसाहेबांनीं तयार केलेलीं क्रमिक पुस्तकें शिकवीत असत. त्या शाळेंत माझा इंग्रजी तीन इयत्तेपर्यंत अभ्यास झाला. शाळेंत मी मन लावून शिकत असें. मी तिसऱ्या नंबराच्याखालीं कधींहि गेलों नाहीं. त्या शाळेंत सहा महिन्यांत जवळ जवळ पन्नास मुलें जमलीं. पुढें गोपाळराव मास्तरनें आपली शाळा लष्करांत साचापिराजवळ नेली. शाळेंत असतांना मधल्या सुट्टींत मला गोट्या खेळण्याचा नाद लागला. मी कांहीं दिवस लष्करांतील शाळेंतहि जात होतों; तेथें चवथ्या इयत्तेस प्रारंभ करून ती पूर्ण केली; त्या वेळीं माझें वय सुमारें चवदा पंधरा वर्षांचें असावें. माझी घरची गरीबी असल्यामुळें माझे कपडे खादीचे असत. जोडा कसा तो ठाऊक नसे. घरीं रिकामपणीं आईला पाणी आणण्यास, दळण दळण्यास आणि इतर कामांस मदत करावी लागत असे. मी आपला अभ्यास दिवसाच करीत असें; पण रात्रीं करण्याचा प्रसंग आल्यास रस्त्यावरील म्युनिसीपालिटीच्या कंदीलाचा आश्रय करावा लागत असे; किंवा स्नेह्याचे घरीं जावें लागत असे. यावरून माझ्या घरची स्थिति कशी असावी ती अधिक स्पष्ट करण्याची जरूर नाहीं.

शाळेंत गैरहजर राहिल्यानें मार्क कमी लागतात आणि नंबर खालीं जातो म्हणून मी जातींत नेहमीं होणाऱ्या कार्यप्रयोजनास जात नसे. एके वेळीं असा प्रसंग आला कीं, मणिराम आणि गोविंदराव कुंडळवाल खाणवाले यांचे येथें लग्नानिमित्तानें प्रयोजन होतें. त्या वेळीं जातीचे चौधरी आणि प्रमुख रामचंद्र मनसाराम नाईक धवारे यांनीं माझ्या वडिलांस असें विचारलें कीं, " आपलीं मुलें जातींत जेवणास कां येत नाहींत " आमच्या वडलांचा स्वभाव हा स्पष्टवक्तेपणाचा

असल्या कारणामुळें त्यांनीं असें उत्तर दिलें कीं, " घरच्या सर्वच मंडळीनें जेवणास आलेंच पाहिजे असें कांहीं नाहीं. मुलें शाळेंत जातात त्यामुळें त्यांना आपली शाळा सोडून येणें बरें वाटत नाहीं; म्हणून तीं कांहीं आलीं नाहींत. " नाईक म्हणाले, " हें कांहीं बरें दिसत नाहीं. " वडील म्हणाले तीं मोठीं झाल्यावर त्यांना समाजाचें महत्त्व कळूं लागलें म्हणजे येऊं लागतील. चौधरीनें मला जेवण्यास येण्यास एका जातीच्या मनुष्याबरोबर शाळेंत बोलावणें पाठविलें. त्या मनुष्यास मीं असें उत्तर दिलें कीं, " मी आपला शाळेंतील अभ्यास सोडून आणि वडिलाच्या आज्ञेवांचून वरणभाताचें जेवण जेवण्यास येऊं इच्छित नाहीं. " हा माझा निरोप त्या मनुष्यानें चौधरीस जातीच्या मंडळींत कळविला; त्यांना या निरोपाचें मोठें आश्चर्य वाटलें; आणि ते म्हणाले कीं, " याचे लग्नांत जर पक्वान्नाचें जेवण कराल तर मंडळी जेवण्यास येईल. " माझ्या वडिलांनीं उत्तर दिलें कीं, " जातींतील सर्वच मंडळी कांहीं आपल्यासारखी श्रीमंत नाहीं. जो तो आपापल्या शक्तीप्रमाणें करीत असतो. " ही घडलेली हकिगत मला माझ्या वडिलांकडून कांहीं कळली नाहीं; परंतु इतर मंडळीकडून कळली; त्या वेळीं मी आपल्या आईजवळ असे उद्गार काढले कीं, पहा, ही श्रीमान मंडळी, गरीबाबरोबर कसा विनोद करीत असते. तुझ्या आणि वडिलांच्या कृपेनें मला जर काळ अनुकूल झाला तर मी यांना बोलून न दाखवितां करून दाखवीन.

**सोयरीक** आमच्या जातीमध्यें वरपक्षाकडील मंडळी आपल्या मुलास मुलगी मागण्यासाठीं वधूगृहीं जाण्याची वहिवाट आहे; परंतु जरी आमच्या घरची गरीबी होती तथापि आमच्या घरची चालचालणूक, रीतभात, वळण, मर्यादा, विद्या वगैरे संबंधानें आमच्या घराण्याचा लौकिक जातींत चांगला पसरला होता; म्हणूनच आमच्यामध्यें जरी वरपक्ष मुलगी मागण्यास जाण्याची वहिवाट होती, तरी ती टाकून वधूपक्षाकडील दोनचार सुखी पक्षाकडून आपली मुलगी मला करावी असा प्रयत्न सुरू झाला. चांगल्या सुखी घराण्यांतील मुली मला द्याव्या असा त्यांचा प्रयत्न चालला होता आणि तो माझ्या मातोश्रीस पसंत पडला खरा; पण माझ्या वडिलांचें मत याच्या अगदीं उलट होतें, त्याचें कारण असें होतें कीं, आपली गरीब स्थिति असल्यामुळें श्रीमंत घराण्यांतील मुली केल्यापासून आपणांस आणि आपल्या मुलास सुख होण्याचे ऐवजीं उलट त्रास मात्र होणार आहे. आणखी श्रीमंताच्या नादानें आपल्या ऐपतीबाहेर कर्ज काढून लग्न करणें हें चुकीचें होऊन शेवटीं अपकीर्तीस कारण होणार आहे. दोन तीन ठिकाणच्या मुलींकडील मंडळीनें केवळ मला पहाण्यासाठीं कोणत्या तरी निमित्तानें जेवण्याचा बेत करावा; त्या प्रसंगीं तेथें वडील मला आपल्याबरोबर घेऊन जात असत. तेथील मंडळीनें मला अक्षर काढण्यास सांगावें, आणि शाळेंतील अभ्याससंबंधानें मला कांहीं प्रश्न विचारावे; हें त्यांचें करणें जरी

मला पसंत नव्हतें, तथापि वडिलांच्या दराऱ्यामुळें मला तें निमुटपणें मान्य करावें लागत असे. मी परत घरीं आल्यावर तेथें घडलेली सविस्तर हकीगत मातोश्रीस निवेदन करावी; आणि तिनें याचें मजजवळ स्पष्टीकरण करावें; त्या वेळीं मी म्हणालों कीं, मला इतक्या लवकर लग्न कर्तव्य नाहीं. हेच माझे उद्‌गार मी दुसऱ्या दोन तीन प्रसंगीं आईजवळ काढले, तें तिनें माझ्या वडिलाना कळविलें. त्यांनीं तें लक्षांत ठेवून मोघमामध्यें असें उत्तर दिलें कीं, मुलांचा हट्ट चालविणें म्हणजे आपला अपमान करून घेणें होय; तसें केल्यानें मुलांस हट्ट चालविण्यास उत्तेजन दिल्यासारखें होतें; यासाठीं कसेंहि करून याचें यंदा लग्न केलेंच पाहिजे; कारण, पुढें तीन वर्षेपर्यंत लग्न करतां येणार नाहीं. यासाठीं नागोजी नरसुजी गढवाळ यांची ज्येष्ठ कन्या करावी असा माझा विचार आहे. माझ्या मातोश्रीनें ती मुलगी पाहिली होती; पण ती तिला पसंत नव्हती म्हणूनच तिनें आपली मान्यता दर्शविली नाहीं; तिनें फक्त इतकेंच उत्तर दिलें कीं, "विचार करून करणें हा आपला धर्म आहे." त्या समयीं माझें वय सुमारें सतरा वर्षांचें होतें. बऱ्याच मंडळीनें माझ्या वडिलांस कळविलें कीं, "सदरहू गृहस्थाची मुलगी करणें ती तुमच्या मुलास आणि घराण्यास शोभण्यासारखी नाहीं." माझ्या वडिलांनीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, "हीच त्याच्या आयुष्याची आणि सुखाची लक्ष्मी आहे." या भाषणास दोन तीन दिवस लोटले नाहींत तोंच मुलीचे वडील एक दोन मंडळी बरोबर घेऊन आमच्या घरीं आले, रीतीप्रमाणें त्यांनीं माझ्या वडिलांच्या हातांत श्रीफळ दिलें आणि म्हणाले, आमची कन्या चिरंजीवी कोंडाबाई ही आपले चि. गणपतराव यांना मीं मोठ्या संतोषानें दिली आहे." वडिलांनीं श्रीफळाचा स्वीकार केला आणि त्यांची विनंतिहि मान्य केली. नंतर तिसरे दिवशीं माझे वडील पांचसहा मंडळी बरोबर घेऊन मुलीच्या घरीं गेले आणि रीतीप्रमाणें साखरपुडा होऊन मुलीस चिरडी नेसवून कुंकूं लावण्याचा विधि उरकून घेतला. पुढें आठ चार दिवसांनीं माझ्या दृष्टीस माझी भावी वधू पडावी म्हणून तिला आणि इतर आप्तस्वाकिय स्त्रियांना आमच्या घरीं जेवणाचा बेत केला; त्यावेळीं ती माझ्या नजरेस पडली. मी लागलाच आईजवळ जाऊन तिला असें स्पष्ट कळविलें कीं, "मला ही नवरी नको. जर तुह्मी हिचें लग्न मजबरोबर करण्याचें ठरवाल तर मी घरांतून पळून जाईन" इतर आप्त स्त्रियांनींहि आपली या मुलीबद्दल नापसंती दर्शविली; आणि तुला ही कसली फारच ठेंगणी आणि न शोभणारी बायको पाहिली आहे म्हणून त्यांनीं माझी फारच चेष्टा चालविली. तदनंतर पुनः मीं आईजवळ जाऊन असें गाऱ्हाणें केलें कीं, 'पहा, मला बायको पसंत नाहीं, इतकेंच नाहीं, तर येथें जमलेल्या सर्व आप्तवर्गीय स्त्रियांनाहि ती पसंत नाहीं, अशा मुली बरोबर माझें लग्न कां लावतां ? अशी बायको मला कां पाहिली ? आणि ही तुमची कसली हौस !' आईनें त्रासानें उत्तर दिलें कीं, 'तूं

मला त्रास देऊं नकोस. तूं आपल्या बापाला जाऊन विचार,' पण बापाजवळ जाण्याचें धैर्य कोणास होतें ? पुढें कांहीं दिवस लोटल्यावर मला सासऱ्याकडून जेवणाचें आमंत्रण आलें. मी निरुपायामुळें लहान बंधु वगैरे मंडळीसह गेलों. मीं रीतीप्रमाणें नमस्कार केला; तेथें त्यांची त्यावेळीं आप्त मंडळीहि जमली होती. जेवण्यास पक्वान्नांचा बेत केला होता. भोजन झाल्यावर मला शेला, पागोटें, हार-तुरा, पानविडा दिला. हा सर्व सोहळा जरी मला विषाप्रमाणें वाटत होता, तथापि तो मला मुकाट्यानें सहन करावा लागला. अशा प्रसंगीं मन किती तरी प्रफुल्लित असावयाचें पण तसें न होतां उलट उदासीन झालें !

**दुखण्यांतील विलक्षण हकीगत**

नंतर मी थोड्याच दिवसांनीं हिंवतापानें आजारी पडलों. डॉक्टर वैद्यांचे उपचार न करतां घरगुती इलाज चालले होते. सुमारें एक महिन्यांत इतका क्षीण झालों कीं, मला बिछान्यांतून उठण्याची शक्ति राहिली नाहीं. नुसत्या दुधावर दिवस काढीत होतों. वडलांनीं मला देवाचा अंगारा लावून आराम पडण्यासाठीं देवाचा धांवा करावा. दोन दिवस तर मी अगदीं निचेष्ट पडून राहिलों. कोणाबरोबर भाषणहि केलें नाहीं. वडील म्हणाले कीं, उद्यांचा तिसरा दिवस हा गणपतीला कठीण आहे; त्यामुळें त्या दिवशीं घरांतील बहुतेक आप्तमंडळी दुःखांत होती. त्या दिवशीं मध्यरात्रीस बारा वाजण्याच्या सुमारास माझ्या बिच्छान्यावर वरील पटईतून एक पांच फूट लांबीचा मोठा सर्प पडला, तो माझी वडील बहीण देऊबाई हिनें पाहिला, आणि ती मोठ्यानें ओरडली. तिच्या त्या ओरडण्यानें मीं शुद्धीवर आलों, आणि जवळच एक वेताची छडी पडली होती त्या छडीचे एक दोन तडाके मी त्या सर्पास दिले; माझ्या बहिणीनें त्या सर्पास ठार मारून टाकलें. वडील मठांतून परत घरीं आल्यावर त्यांना ही हकीगत कळविली; तेव्हां ते असें ह्मणाले कीं, मुलावरील विघ्न टळलें. आतां त्याला लवकर आराम पडेल; त्याप्रमाणें दुसऱ्या दिवसाच्या सकाळपासूनच मला आराम पडत चालला; आणि मी लवकरच बरा झालों.

**बंधूचें पत्र**

माझ्या लग्नाच्या तयारीसंबंधानें झालेली सविस्तर हकीकत मीं आईबापांस न कळवितां त्या वेळीं वडील बंधु शहाबादेस होते त्यांना पत्रद्वारें लिहून कळविली, आणि त्यांना माझे लग्नसंबंधीं काय विचार होते तेंहि कळविलें. या गोष्टीचा वेळींच योग्य विचार झाल्यास ठीक आहे; नाहींतर याचा पुढें परिणाम कांहीं ठीक होणार नाहीं. तुमच्या गळीं जी पहिली बायको बांधिली होती त्यापेक्षांहि अधिक वाईट माझ्या गळीं बांधित आहेत. यापत्राचें उत्तर जरी त्यांनीं मला दिलें नाहीं, तथापि त्यांनीं माझ्या वडिलांस मोठ्या अकलहुषारीनें असें लिहून कळविलें कीं, अलीकडे आपणाकडून पत्र न आल्यामुळें आपल्याकडील कांहींच वर्त्तमान समजत नाहीं; पण पुण्याहून कांहीं मंडळी येथें

आली आहे, त्यांच्याकडून मला असें कळलें आहे कीं, आपण चि. गणपतीकरितां वधू पाहिली आहे आणि साखरपुडाहि झाला आहे; पण आपण वधू योग्य पाहिली नाहीं, या ह्मणण्यांत कितपत तथ्यांश आहे याचा खुलासा आपणांकडून सत्वर होईल अशी आशा आहे. जर ही गोष्ट खरी असेल तर गणपती आपणांजवळ कांहींच बोलणार नाहीं खरा; पण त्याची नाराजी आहे हें समजल्यावर मला फार वाईट वाटणार आहे. अशा अर्थाचें पत्र माझ्या वडिलांस आल्यावर त्यांनीं तें मजजवळ वाचण्यासाठीं दिलें; तें मीं त्यांना वाचून दाखविलें. तें ऐकून ते अतिशय गरम झाले. माझ्या पत्रानें हा सारा प्रकार माझ्या बंधूच्या कानावर गेला असा वडिलांच्या मनांत संशय उत्पन्न होण्याच्या पूर्वींच माझी आई ह्मणाली कीं, " आमच्या घरांतील गोष्टींची उठाठेव तेथें जाणाऱ्या लोकांनीं कां करावी ? " या मुलीबरोबर माझें लग्न मुळींच होऊं नये अशी जरी माझी फार इच्छा होती, आणि लग्नाच्या पूर्वीं कोठें-तरी पलायन करावें असा जरी माझा ठाम विचार झाला होता; तथापि तो वडि-लांच्या धाकामुळें आणि आप्तवर्गाच्या उपदेशानें मला कृतीमध्यें आणतां आला नाहीं.

**लग्न.**

पंधरा दिवसानंतर माझी लग्नतीथ त्याच मुलीबरोबर नेमली. घरांत लग्न तयारी चालली पण माझ्या मनास आनंद न वाटतां अधिकच उद्विग्न झालें. मी एकांतांत विचार करीत बसूं लागलों. शाळेंतील अभ्यासावर माझें चित्त लागेना. लग्नांतील गणपती पूजन झालें. मंडप उभारणी झाली. मला हळद लावली. नवरदेव बनवलें. वडील कोठें बाहेर गेले ह्मणजे मंडपांत न बसतां कोठें तरी एका बाजूला बसून विचार करीत बसावें. वडील बंधु, भावजय व इतर आप्त मंडळी गांवाहून लग्नाकरितां आली. आप्त वर्गाकडून फळें, फुलें मिठाई वगैरेंची भेट आल्यास नाराजी दाखवावी. रीतीप्रमाणें सुखसोहाळे करून घ्यावे लागले. कालमानाप्रमाणें सर्व व्यवस्था ठीक झाली. लग्नास जाण्याच्या पूर्व रात्रीं देवीची पूजा करून त्या रात्रीस जागरण कर-तात. नवरदेवाच्या हातापायांस मेंदी लावतात; त्या मेंदीच्या योगानें ह्मणा किंवा जागरणानें ह्मणा, किंवा चित्त अस्थिर असल्यामुळें ह्मणा, मला लग्नास जाण्याच्या पूर्वीं एकदम थंडी भरून ताप आला; त्यामुळें घरांतील मंडळी घाब-रून गेली, आणि हें वर्तमान हां हां ह्मणतां सर्वत्र पसरलें; त्यामुळें मंडळी समा-चारास येऊं लागली. वैद्याचे वगैरे उपचार सुरूं झाले; या समयीं वडिलांस फार वाईट वाटलें; आणि ते आपल्या वडील मुलांजवळ असें बोलले कीं, हा " सारा नाराजीचा परिणाम आहे. " नंतर माझे वडील बंधु मजजवळ आले आणि म्हणाले कीं " तूं अशा प्रसंगीं हिंमत धरली पाहिजे. हा कुळाला कलंक लाव-ण्याचा प्रसंग आहे. मी तुझें दुसरें लग्न करून देईन. तूं अधीर होऊं नकोस. " मला अशा स्थितींत रीतीप्रमाणें सजवून घोड्यावर बसवून मंडळीसह वाजत गाजत

वधूमंडपाकडे जाण्यास मिरवीत नेलें. वधूच्या मंडपाच्या अलिकडे सात आठ घरें आल्यावर सडकेवरून एक सर्प आडवा गेला; त्यांस आमच्या वडिलांच्या मनांतून मारावयाचें नव्हतें; पण वऱ्हाडी मंडळीनें त्याला ठार केलें. या प्रसंगीं मंडळींत शुभाशुभासंबंधानें गप्पा सुरू झाल्या. आमची मिरवणूक वधूमंडपी दाखल झाली. नेमलेल्या वेळीं गोरज मुहूर्तावर आमचें **सुमंगल सावधान** झालें. हें माझें लग्न संवत १९३३ मध्यें झालें. जेवण खावण, आहेर वगैरे सर्व उरकल्यावर आमची वरांत नवरीसह घरीं आली.

**शाळेला निरोप**

लग्न झाल्यावर महिनापंधरादिवसांनीं सासुरवाडी आणि त्यांच्या आप्तवर्गाकडील मेजवान्यांचे प्रसंग वरचेवर येऊं लागले. वडिलांनीं पूर्वी केलेले खादीचे कपडे आणि त्यास वरचेवर ठिगळें दिलेले कमी झाले; आणि वडीलबंधूनीं नवीन केलेले कपडे आणि सासुरवाडीकडील आहेरांत आलेले कपडे यांच्या योगानें माझा बाह्य रंग जसा खुलत चालला तसाच माझा अंतरंगहि खुलत चालला. हें जेव्हां माझ्या वडिलांच्या नजरेस आलें तेव्हां त्यांनीं माझें शाळेंत जाणें बंद केलें.

---

# प्रकरण ३ रें.

## रुपेरीबेडी अर्थातच ताबेदारी.

---

मला वडिलांची अशी आज्ञा झाली कीं, आतां तूं पुणें स्टेशनावर माझ्या हाताखालीं पुष्कळ गवंडी आहेत यास्तव त्यांच्यामध्यें जाऊन तेथें गवंडी काम शिक; किंवा शिकंदरबादेस तुझे वडील बंधु आहेत त्यांच्याकडे जाऊन ते सांगतील त्याप्रमाणें वाग. मी या वडिलांच्या आज्ञेप्रमाणें शिकंदरबादेस गेलों. तेथें त्यांना वडिलांची इच्छा कळविली, तेव्हां ते असें बोलले कीं, तुझे वय लहान आहे आणि विद्या अल्प आहे; याकरितां तूं येथें राहून स्वस्थ अभ्यास कर; परंतु मी तसें न करतां मधून मधून त्यांच्या कामावर जाऊन त्यांची काम करण्याची पद्धत अवलोकन करीत असें.

माझ्या वहीनीबाईचा ओढा तिच्या बंधूकडे विशेष असे; त्यामुळें मीं असा विचार केला कीं, येथें आपली कांहीं सोय लागणार नाहीं. तेथें त्या वेळीं **कार**

आणि इंगल्स या युरोपिअन कॉनट्रॅक्टर्सची बराकी बांधण्याचीं कामें चाललीं होतीं; तेथें माझ्या बंधूस नोकरी होती. मी भावाच्या अपरोक्ष साहेबांस भेटलों; आणि त्यांना सांगितलें कीं, मी बाळारामाचा धाकटा बंधु आहें. मला आपण काम शिकण्याकरितां आपल्या आफिसांत उमेदवार ठेवा; ही माझी विनंति त्यांनीं मान्य करून मला सांगितलें कीं, आपण खुशाल येत जावें. पहिल्या महिन्यांतच माझी हेडक्लार्कला चांगली मदत झाली, ह्मणून दुसऱ्या महिन्यापासूनच हल्लीं शिक्का ( मोंगलाईंतील नाणें ) रुपये सात ह्मणजे कलदार सव्वा पांच रुपये पगार सुरू झाला. तो मी बंधूजवळ दिला; त्या वेळीं बंधू कांहींच बोलले नाहींत; पण वहिनीबाई बंधूंसमक्ष असें बोलल्या कीं “ आपल्या घोडेवाल्याला दरमहा दहा रुपये पगार मिळतो; त्या जागीं भावजींची योजना झाल्यास ठीक होणार आहे. ” मी आणि माझे बंधु या तिच्या उत्तरांतील खोंच समजलों. हा मीं उपदेशच समजून तो ग्रहण केला; आणि यापुढें आपण फार विचारानें वागण्याचा निश्चय केला. पुढें तिसऱ्या महिन्यास मला दहा रुपये पगार मिळूं लागला. पुढें प्रत्येक महिन्यास पांच पांच रुपये बढती मिळून माझा पगार तीस रुपये झाला. नंतर माझी ऑफिसांतून बदली बाहेरील कामावर देखरेख करण्याचे आणि सुतार, गवंडी, मजूर वगैरे लोकांची हजेरी ठेवण्याच्या कामावर झाली. हें काम मी उत्तम प्रकारें केल्यावर मला दरमहा चाळीस रुपये पगार मिळूं लागला. मी आपला सर्व पगार बंधुच्या स्वाधीन करीत असे; या पगाराशिवाय आपले उत्पन्न आणखी अधिक कसें वाढवावें याचें ज्ञान मला हाताखालच्या मंडळीनें करून दिलें; त्याच्या योगानें पगाराशिवाय दुपटी तिपटीनें हातांत पैसा खेळूं लागला, पण त्यापासून मनाला कांहीं संतोष होत नसे. हें माझें उत्पन्न मीं आपल्याजवळ ठेवीत असें. हें काम संपल्यावर त्या साहेबानें वऱ्हाडांतील बाशिम कारंजा रोडचें काम घेतलें. या वेळीं त्यांचा भागिदार इंगल हा मरण पावला; ह्मणून त्यानें हेनरी या नांवाचा दुसरा युरोपियन भागिदार घेतला; त्यानें मला त्याच्या हाताखालीं तिकडे पाठविलें. मीं आपल्या कामांत दक्ष असल्यामुळें इतरांची मुळींच पर्वा करीत नसें. मला मजूर, कामगार, गवंडी, लहान लहान कंत्राटी कामें करणारे यांच्या पगारांचा आणि हिशोबांचा तक्ता तयार करावा लागत असे; आणि त्यांचा पगार चुकविण्याचें काम पगारमास्तर किंवा स्वतः साहेब करीत असत. एके वेळीं असें झालें कीं, हेड अकाऊन्टंटच्या हातून दोनशें रुपयांची चूक झाली. ती नजरचूक बेरजेची होती; याबद्दल साहेबांस संशय येऊन त्यांनीं मला शिपायांबरोबर अशी चिठ्ठी पाठविली कीं, “ कांहीं रकम चुकत आहे, यासाठीं आपण लवकर येऊन भेटावें; ” त्या वेळीं आमच्या घरीं श्रीसत्यनारायणाची पूजा होती म्हणून मीं असें उत्तर पाठविलें कीं, “ मीं आपणास उद्यां सकाळीं येऊन भेटेन. ” आणखीं, त्यांत असें लिहिलें कीं, “ मी आपला रात्रींचा नोकर नाहीं. ” या माझ्या स्पष्ट लिहि-

ण्याचा साहेबांस बराच राग आणि संशयही आला असावा; कारण साहेब हे पोलिस सुपरिन्टेंडेंन्ट साहेबाला घेऊन त्याच वेळीं रात्रीं माझ्या घरीं आले. त्यांनीं आपल्या नांवाचें कार्ड ( चिठी ) मजकडे पाठविलें. मीं त्या वेळीं पूजेस बसलों होतों. मीं आपल्या गड्याबरोबर असें उत्तर पाठविलें कीं, " मी या वेळीं पूजेस बसलों आहें; याकारितां मी आतां आपणास भेटूं शकत नाहीं, मी आपणास उदईक सकाळीं भेटेन. " हा माझा निरोप ऐकून ते निमुटपणें निघून गेले. दुसरे दिवशीं मी ऑफिसमध्यें गेलों आणि पेशीट ( पगाराचा तक्ता ) तपासला, तो बरोबर आहे असें मला दिसून आलें. मग मीं साहेबांस असें सांगितलें कीं, ही नजरचूक अकाउन्टटची ( हिशोब तपासणिसाची ) आहे; अशी हेडक्लार्क आणि साहेबांचीही खात्री झाली; आणि माझा हिशोब बरोबर आहे असें त्यांनांही आढळून आलें; परंतु मीं त्याच वेळीं आणि तेथेंच अशी नोटीस दिली कीं, " चोवीस तासांत माझा राजिनामा मंजूर होऊन माझ्या कामाचा चार्ज घ्यावा. " मीं नोकरीचा राजिनामा देऊं नये म्हणून साहेबांनीं माझी अनेक प्रकारें समजूत केली, पगार वाढविण्याची आशा दाखविली; तथापि मीं ती मान्य केली नाहीं. शेवटीं ते असें बोलले कीं, " मी तुझा राजीनामा शिकंदराबादेस थोरल्या साहेबांकडे पाठवितों; तोंपर्यंत आपण कामावर आलें पाहिजे. " मीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, " तुह्मी तारेनें जबाब मागवा. मी इतके दिवस येथें राहूं शकत नाहीं. " मी कामावर न जातां तसाच घरीं निघून आलों; आणि शिकंदराबादेस तार केली; तारेचा जबाब साहेबांस आला असावा. मीं दोन दिवसांनीं हेडक्लार्कला कागदपत्राचा चार्ज दिला; आणि आतां मजवर कोणत्याही प्रकारची जबाबदारी राहिली नाहीं अशी दुसरी नोटीस दिली.

**बंधुप्रेम आणि तारुण्यांतील अविचारपणा**:—वऱ्हाड प्रांतांतील उमरावती जिल्ह्यांतील तहसील मंगरुळपीर येथें मी आणि माझे वडील बंधु बाळाराम नोकरीवर होतों; त्या वेळीं पावसाळ्यांत जवळच्या एका ओढ्यास महापूर आला. पूर येण्यापूर्वीं माझे वडील बंधु त्या ओढ्यापलीकडील एका खाणीचें काम पाहण्यास गेले होते; ते तेथेंच पुरामुळें अडकून राहिले. माझ्या बंधूंचा तांबड्या रंगाचा घोडा होता आणि माझा पांढऱ्या रंगाचा घोडा होता; त्या वेळीं गांवांत अशी एक गप्प उडाली कीं, एक तांबडा घोडा जिनासह पुरातून वाहून गेला; आणि माझ्या बंधूला अशी बाजारगप्प कळली कीं, एक पांढरा घोडा जिनासह पूरांतून वाहून गेला. त्यामुळें परस्परांच्या मनांत परस्परांविषयीं विपरीत तर्क उत्पन्न झाले, परंतु त्यास उपाय नाहीं. मी बंधूंच्या शोधास निघालों; मी त्या ओढ्याच्या कांठच्या गांवीं जाऊन पोंहचलो. ओढ्याला महापूर आला होता; तो कांहीं कमी झाला नव्हता. मी जेव्हां तेथील पाटीलकुळकर्ण्यास कळविलें कीं, मला ओढ्यापलिकडील गांवीं जाणें आहे. तेव्हां ते ह्मणाले कीं, अशा वेळीं धीवर ( कोळी ) पलिकडे घेऊन जाण्यास अगदींच असमर्थ आहेत; आणि नेणें हें महाधोक्याचें

होणार आहे. मी त्यांचें बोलणें न जुमानतां घोड्यावर बसून घोडा ओढ्याकडे दामटला. त्या वेळीं गांवकरी मंडळीही धिवरासह माझ्या पाठोपाठ आली. मीं अविचारानें धारिष्ट करून त्या पुरांत उडी तर टाकली; माझ्या मागून दहा बारा धीवरांनीं पुरांत उड्या टाकून मला मोठ्या मुष्किलीनें पलीकडे नेलें. त्या वेळीं जरी पाऊस पडत होता आणि चिखल जरी फार झाला होता, तरी मी बंधु ज्या गांवीं होते, त्या गांवचा रस्ता धरला, तों तिकडून माझे बंधु आपल्या तांबड्या घोड्यावर स्वार होऊन आपल्या कामगार मंडळीसह येत होते. आमच्या त्या प्रसंगींच्या भेटी रामभरत भेटीप्रमाणें अत्यंत आनंदजनक झाल्या. आम्हीं त्या धीवर लोकांना त्यांच्या जिवावरील कामगिरीबद्दल पंचवीस रुपये बक्षीस दिले.

मी ही नोकरी सोडल्याबरोबर लागलीच मला बासिमवालाजी येथें फॉरेस्ट खात्यांत दुय्यम शिरेस्तेदाराची दरमहा पगार रुपये चाळीस याशिवाय पंधरा रुपये भत्त्याची नोकरी लागली; ही नोकरी मी सुमारें तीन महिने केली. पुढें मला ही नोकरी सोडण्याचें कारण असें झालें कीं, साहेबाबरोबर जंगलांत फिरण्याचा मला मोठा त्रास आला. यावरील दोन नोकरीची हकीगत मी जेव्हां वडील बंधूस कळविली तेव्हां ते मोठे नाराज झाले. पुढें जेव्हां वडिलांना हें वर्तमान कळलें तेव्हां त्यांनीं मला असें पत्र पाठविलें कीं, “ तुझ्या करितां मजजवळ पुष्कळ कामें आहेत; यासाठीं तूं इकडे लवकर निघून ये. ” या वेळीं माझे वडील रायचुरास होते; म्हणून मी तिकडे गेलों; आणि वडिलांनीं माझ्या बायकोलाहि पुण्याहून तेथें बोलावून घेतलें. नंतर वडिलांची मला अशी आज्ञा झाली कीं, “ तूं उद्यांपासून माझ्याबरोबर कामावर ये. ” ही वडिलाज्ञा श्रवण करून मला इतका हर्ष झाला कीं, माझ्या आवडीचें काम येथें असेल म्हणूनच माझ्या वडिलांनीं मला येथें बोलावून घेतलें. परंतु त्यांनीं एका गवंड्यास असा हुकूम केला कीं, “ याच्या लायक एक हातोडा आणि टांकी देऊन यास दगड घडविण्याचें काम शिकवा. ” याप्रमाणें हुकूम देऊन ते आपल्या दुसऱ्या कामावर निघून गेले. गवड्यानें मला हातोडा व टांकी दिली, आणि एक दगड देऊन तो घडण्यास सांगितलें. त्या वेळीं माझें मन दुःखानें भरून आलें; आणि मागचें स्मरण झालें कीं, माझ्या हाताखालीं पुष्कळ गवंडी असून मी त्यांच्याकडून काम करून घेणारा होतों; पण आतां मला त्यांचेपासून त्यांचें काम शिकून घेण्याचा प्रसंग आला आहे, मीं चांगल्या नोकऱ्या सोडल्या, याबद्दल वडिलांनीं ही मला शिक्षाच दिली आहे; असा माझ्या मनाचा दृढ ग्रह झाला. वडील पुन्हां येऊन मीं कामास अद्याप सुरवात कां केली नाहीं, असें विचारतील ही भीति मनांत उत्पन्न झाली. अशा मनाच्या स्थितींत हातोडा व टाकी हातांत धरून दगडावर एक दोन टांकीचे घाव मारतों न मारतों तोंच टांकी हातांतन निसटून ती एका शेजारच्या काम करीत असलेल्या गवंड्याच्या

पायास लागली, त्यामुळें त्याला जखम झाली, आणि हातोड्याचा घाव माझ्या हातावर पडून मलाहि जखम झाली. एका गवंड्यानें माझी जखम बांधून तो मला रेल्वे डॉक्टराकडे घेऊन गेला. डॉक्टरनें माझी जखम धुवून तिजवर पट्टी बांधली. नंतर मी घरीं जाऊन बसलों. अर्ध्या तासानंतर वडील कामावर येऊन त्यांनीं मज-विषयीं चौकशी केली; तेव्हां तेथील गवंड्यानीं घडलेला प्रकार त्यांना कळ-विला. माझे वडील दररोज दोनप्रहरीं घरीं जेवण्यास येत असत; पण आज ते घरीं न येतां कामावरच्च घरून जेवण मागविलें. दोनतीन दिवसांनीं माझा हात हळूं हळू बरा होत चालला. मला आतां लवकर नोकरी लागावी याकरितां मी उपोषण करून श्रीशंकराचें अनुष्ठान सुरूं केलें. एक आठवडा लोटला नाहीं तोंच, मला असा शोध लागला कीं, येथें रेल्वे मेल सर्विसचें रेकार्ड आफिस आहे; आणि तेथें असिस्टन्ट सुपरिंटेंडन्टची स्वारी महिन्यांतून दोनतीन वेळा येत असते; यासाठीं मी तें ऑफिस पहाण्यासाठीं आणि चौकशी करण्याकरितां तेथें गेलों; त्या समयीं असिस्टन्ट सुपरिंटेंडन्ट हेहि तेथें आले होते; त्यांचें नांव धर्माय्या असें होतें. ते जातीनें अस्पर्श जातीचे असून उत्तम स्वभावाचे होते; असा त्यांचा चांगला लौकिक ऑफिसच्या मंडळीकडून मला कळला. मी त्यांना जाऊन भेटलों, आणि मीं त्यांना आपली सविस्तर हकीगत कळविली. ती ऐकून घेऊन ते मला असें ह्मणाले कीं, येथें पुरेसे उमेदवार आहेत; यासाठीं मी तुह्मांला सोलापुरच्या रेकार्ड आफिसचे हेडक्लार्क गंगाधरपंत पुरंदरे यांस पत्र देतों ह्मणजे ते तुह्मांला आपल्या ऑफिसांत उमेदवार ठेवतील; आणि तेथें तुह्मांला लवकरच्च पगारी नोकरी मिळ-ण्याचा संभव आहे. ही हकीगत मी आपल्या वडिलांना कळविली; त्या वेळीं वडि-लांनीं मला असें उत्तर दिलें कीं, ‘ तुला नोकरी मिळेल; पण तेथें तूं फार दिवस टिकणार नाहींस. धर्मय्याची आणि माझी चांगली ओळख आहे; तसेंच सोलापुरचे पुरंदरे यांचा आणि माझा चांगला परिचय आहे; कारण ते पुण्याचे राहणारे आहेत, तूं सध्या एकटाच जा. ” त्याप्रमाणें मी सोलापुरास येऊन रावसा-हेब पुरंदरे यांना धर्माय्याचें पत्र दिलें. त्यांनीं मला ऑफिसांत ठेवलें आणि सार्टीं-गचें काम शिका असें सांगितलें. त्या वेळीं दौंड मनमाड लायनीवर कॉलरा फार जोरांत चालला होता; त्या लायनीचा एक सार्टर कॉलऱ्यानें आजारी पडल्याची तार आली. मला लागलाच हुकूम दिला कीं, तुह्मी हें पत्र घेऊन दौंडास जा; आणि तें तेथील मेल एजंटास द्या; त्याप्रमाणें मीं केलें. मेल एजंटनें माझी नेम-णूक दौंड मनमाड लायनीवर कॉलऱ्यानें आजारी पडलेल्या सार्टरच्या जागीं थोड्या दिवसांकरितां केली. सुमारें दोन महिने मीं हें काम केलें. तेथें मला सुमारें वीस रुपये दरमहा पडूं लागला. नंतर माझी तेथून बदली सोलापूर ते रायचूर लाय-नीवर झाली. त्यामुळें माझें मन आनंदीत झालें. मीं हें काम तीन महिने केल्यावर मला हैद्राबाद ( डेक्कन ) स्टेशनावर मेल एजंट नेमलें. तेथें मला पंचवीस रुपये

पगार मिळूं लागला; मीं हें काम दोन महिने केल्यावर माझी पुण्यांत सुपरिटेंडन्टच्या ऑफिसांत त्याच पगारावर असिस्टन्ट क्लार्कच्या जागीं बदली झाली; त्यामुळें मला अधिकच आनंद झाला. हें काम मीं चार महिने केल्यानंतर माझी बदली मुंबईस सबडिलीव्हरी सुरू करण्याचा विचार होऊन सर्व डिव्हीजनांतून ( भागांतून ) पन्नास सार्टरांतून सोळा सार्टर्स पसंत केले; त्यांमध्यें मीहि एक होतों. सुपरिंटेंटंड रा. ब. लछमनसिंग यांनीं मुंबईची सबडिलीव्हरी सुरू करण्याचा विचार करून प्रथम मुंबई ते पुणें यांच्या दरम्यान सुरू केली. त्यांत आठ सार्टर्स कायम केले; त्यांतच मीहि एक होतों; यामुळें मला कायमची तीस रुपये दरमहाची नोकरी मिळाली; त्या वेळीं रा. ब. दामोदरपंत पुरंदरे हे आमचे हेडक्लार्क होते.

एके वेळीं असें झालें कीं, एका बड्या अधिकाऱ्याचीं दोन पत्रें चुकून भलत्याच थैलींत टाकलीं गेलीं होतीं. हीं चुक सार्टींग करतेवेळीं माझ्या नजरेंत आली; त्या वेळीं ज्या गाडींतून तीं पत्रें जावयाचीं होतीं ती गाडी चालू लागण्याच्या वेळीं मी मोठ्या चलाखीनें तीं पत्रें त्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलीं. त्या गाडींत आमचे इन्स्पेक्टर जनरल साहेबहि होते; त्यांनीं माझें हें चलाखीचें व धाडसाचें कृत्य पाहून तें आपल्या खिशांतील पुस्तकांत लिहून ठेवलें. ते कलकत्त्यास पोंचल्यावर त्यांच्या ऑफिसांतून आमच्या सुपरिटेंडन्टसाहेबांस असें लिहून आलें कीं, " ज्या सार्टरानें हें मोठें धाडसाचें आणि हुशारीचें काम केलें त्या सार्टरला त्याच्या सेक्शनमध्यें बढती देण्याचा प्रसंग आला म्हणजे पहिली बढती त्यास द्यावी. " हें वर्तमान जाणाऱ्या येणाऱ्या सार्टरानीं माझ्या वडिलांस कळविलें. हें माझें धाडसी कृत्य माझ्या वडिलांस पसंत पडलें नसावें म्हणून वडील बंधूचें मला असें पत्र आलें कीं, " इकडे कामें पुष्कळ असल्या कारणामुळें तीं माझ्या एकट्याच्यानें कांहीं आवरलीं जात नाहींत, यासाठीं तूं तीन महिन्याची रजा काढून इकडे लवकर निघून ये. " त्याप्रमाणें मी सुपरिंटेडन्टकडे माझी तीन महिन्याची शिल्लक असलेली हक्काची रजा मला मिळण्यासाठीं अर्ज केला; पण तो मंजूर करीनात. शेवटीं, मीं निक्षून विनंति केली कीं, माझी रजा मंजूर व्हावी, न केल्यास मला राजिनामा द्यावा लागेल. सुपरिन्टेंडेंटनें माझी अशी समजूत केली कीं, " तुम्हांला पुढील महिन्यापासून पन्नास रुपये पगार होणार आहे; यासाठीं आपण आतां रजा घेण्याच्या भानगडींत पडूं नका. " पण ही गोष्ट मीं कबूल केली नाहीं. शेवटीं त्यांस माझी रजा मंजूर करणें भाग पडलें. मी लागलाच वऱ्हाडांत वासिमास बंधूकडे निघून गेलों. त्या वेळीं बंगाल नागपूर रेलवेची नवीन लाईन नुकतीच सुरू झाली होती; आणि तेथें माझ्या वडिलांच्या परिचयांतले स्टील साहेब यांची चीफ इंजिनिअरच्या जागीं नेमणूक झाली होती. त्यांचेकडून माझ्या वडील बंधूस असें पत्र आलें होतें कीं, " तूं किंवा तुझा धाकटा बंधु यांनीं इकडे यावें; मी काम देईन. " त्याप्रमाणें भावानें माझी नागपुरास रवा-

नगी केली. मीं त्या साहेबांस जाऊन भेटलों; त्यांनीं मला लायनीचे सेकंड डिव्हिजनचे डिस्ट्रिक्ट इंजिनीअर यांस पत्र दिलें; तें मीं त्यांना नेऊन दिलें. त्यांनीं मला भंडारा जिल्ह्यांतील तुमसर जवळील दोन मैल लांबीचें काम दिलें. जरी मी कामांत फारसा वाकबगार नव्हतों, तथापि मी मोठ्या धारिष्टानें कंत्राट घेतलें. माझीं सर्व कामें इतरांना पोट कंत्राटें देऊन ते करून घेत असत. मीं मुंबईस आणखीं सहा महिन्यांची बिनपगारी रजा मिळण्याचा अर्ज केला; साहेबांनीं मेहेरबानी करून नऊ महिन्याची रजा मंजूर करून मला असें कळविलें कीं, " ही नोकरी पेनशनची असून तुमचा हक्कही चांगला असून तुह्मांला चांगली बढती होणार आहे, यासाठीं जितकें लवकर येववेल तितकें लवकर निघून यावें. "

पुढें मला तुमसर स्टेशनचें काम मिळालें. माझीं इकडील कामें व्यवस्थेशीर चालत होतीं. ह्यावेळीं मला तंबाखु खाण्याचें व्यसन जडलें होतें; त्यासाठीं मला चंची बाळगावी लागत असे; त्या चंचींतच माझी कांहीं रकम ठेवण्याची वहिवाट असे. यावेळीं इकडील ओव्हरसीअर पुण्यांच्या लष्करामध्यें राहणारे जलया एल्लाप्पा कामाठी यांस बढती मिळाली; तेव्हां त्यांनीं मंडळीस गाण्याची पार्टी आणि मोठी मेजवानी दिली; त्याप्रसंगीं मलाहि आमंत्रण असल्यामुळें मी गेलों होतों. रात्र फार झाल्यामुळें मी तेथेंच मुक्काम केला; त्या रात्रीं माझी चंची चोरीस गेली; त्यांत सातशें रुपयांच्या नोटा होत्या. या चोरीचा मीं पोलिसास रिपोर्ट केला; पण कांहीं शोध लागत नाहीं त्यामुळें पोलिस इन्स्पेक्टरची एक ग्रेड कमी झाल्याचें समजलें. त्या दिवसांपासून मीं तंबाखू खाण्याचें सोडून दिलें, आणि मित्रमंडळीच्या संगतीनें विडी ओढण्यास सुरुवात केली.

मी मोंगलाईंत होतों, त्याच वेळीं मला शिकारीचा नाद लागला. मला जंगलांत फिरण्याचा प्रसंग असल्यामुळें मी बंदुक, पिस्तोल व तलवार यांचा परवाना काढला होता. मला हरयाळ पक्ष्याची शिकार करण्याचा फार नाद असे. तिकडे तलाव पुष्कळ असल्यामुळें मी माशांचीहि शिकार करीत असें. मला कामांत पैसा चांगला मिळाला म्हणून मी सुमारें एक हजार रुपये खर्च करून तुमसर येथील शिवालयाचा जिर्णोद्धार केला. मला कंत्राटच्या कामांत पैसा चांगला मिळत असे ह्मणून मी सन १८७९ सालीं आपल्या पोस्ट खात्यांतील सरकारी नोकरीस अखेरचा राजिमाना दिला. मी सुमारें चार वर्षें सरकारी नोकरी केली. माझ्या बरोबरीचे जे सार्टर लोक होते ते हल्लीं २०० पासून ३०० पर्यंत असिस्टन्ट सुपरिंटेंडन्ट झालें आहेत.

तेथील सर्व कंत्राटी कामें पुरीं झालीं; आणि तेथील कामेंहि संपलीं. नंतर मीं रायपुराजवळील कटींगचें काम घेतलें. धोंडफोडे, सुरंगे, बेलदार, वडार या लोकांना अगाऊ रकमा देऊन त्यांना कामावर नेलें; आणि काम सुरू केलें;

पण तेथील हवा फार खराब होती; आणि पाणीहि फार विषारी होतें. तें जरी चांगलें गरम करून आणि दोन तीन वेळा गाळून उपयोगांत आणलें, तरी हातापायाच्या काड्या आणि जलोदरासारखें पोट मोठें होत असे; अशा या त्रासानें कामगार मंडळी टिकाव धरीना, शेवटीं, नुकसान होऊं लागलें आणि मीहि आजारी पडलों. त्या कामांत मला बरेंच नुकसान सोसावें लागलें. अखेरीस मला तें काम सोडून देण्याचा प्रसंग आला!

जेव्हां ही हकीकत बंधुस समजली तेव्हां त्यांचे मला असें पत्र आलें कीं, गाडी, बैल, घोडे विकून इकडे निघून यावें. तिकडे राहूं नये; त्याप्रमाणें मी पंधरा दिवसांत सर्व व्यवस्था लावून बासीम येथें परत आलों. तेव्हां माझी प्रकृति सुधारली. नंतर बंधूनें मद्रासकडे नंदियाल या गांवीं कंत्राट घेतलें. ते तिकडे निघून गेले;आणि त्यांचीं बासिम येथलि कामें मीं संभाळलीं. त्या वेळीं माझ्या बंधूना थोडेंसें कर्ज झालें होतें. फॉरेस्ट खात्यांत मीं पूर्वीं नोकरी केली असल्याकारणामुळें, आणि मजजवळ पांच बैलाच्या गाड्या असल्याकारणामुळें ऑफिसरकडून याच वेळीं मीं जळाऊ लांकडाचें कंत्राट घेतलें. चार आणे देऊन जंगलांत पडलेलीं लांकडें एक गाडी भरून घेऊन यावींत. मी सुमारें पंचवीस गाड्या ठेवून पुष्कळ सर्पण गोळा केलें आणि दुसऱ्या ज्या गाड्या सर्पण भरून येत असत, त्याहि मी खरेदी करून टाकीत असें; यामुळें गांवांतील लोकांस लांकडाची फारच अडचण पडत गेली. पावसाळा सुरू झाल्याबरोबर बाहेरून लांकडें येत नाहींत, अशी संधी पाहून आणि यदाकदाचित् आल्यास मीच त्या गांवांत येण्याच्या अगोदर खरेदी करून टाकीत असें, अशा हजारों गाड्या संग्रह करून ठेवलेल्या लांकडांची गांवांत मनुष्य ठेवून वखार काढली, आणि तीं माझ्या इच्छेप्रमाणें विकूं लागलों. त्यांत मला बरीच किफायत झाली आणि बंधूना कर्जमुक्त केलें.

एके दिवशीं माझ्या कुंटुबानें गड्याकडून बाजारांतून एक पैशाची दळलेली हळद विकत आणली आणि हळद काढून घेऊन कागद फेंकून दिला. तो पिवळा कागद माझ्या दृष्टीस पडल्याबरोबर मीं उचलून घेतला, आणि घरीं तयार केलेल्या हळदीचा उपयोग करण्याची आपली वहिवाट असतां आजही कुटलेली हळद विकत कां आणली या संबंधानें मी घरांत चौकशी केली; तेव्हां मला असें कळलें, कीं हळद संपली म्हणून विकत आणली. तें चिठोरें मी वाचून पाहिलें; त्यांत अमेरिकेंतील न्यूयार्क येथील एका डॉक्टर कुपरच्या विजेच्या पुतळ्याची जाहिरात माझ्या दृष्टीस पडली; त्यावरून मी एक डझन पुतळ्या मागाविल्या. त्या मला तीन महिन्यांनंतर मिळाल्या. ह्या पुतळ्या ज्या रोगाकरितां तयार केल्या आहेत असें जाहिरातींत लिहिलें होतें त्या रोग्यांना अनुभव पाहण्यासाठीं मी फुकट दिल्या. त्यापासून कांहीं रोग्यांना गुण आला; म्हणून मीं पुनः सहा डझनची मागणी केली, आणखी, मीं

त्यांना असें सुचविलें कीं, आपण जर पुतळ्याप्रमाणें आंगठ्या तयार कराल तर फार बरें होईल; आणि अशा सहा डझन आंगठ्याही मला पाठवून द्या असें लिहिलें. नंतर मी या विजेच्या वस्तूंची येथील वर्तमानपत्रांतून जाहिराती देण्याची सुरवात केली. मागण्याहि बऱ्याच येऊं लागल्यामुळें मीं तो धंदा सुरू केला. तेथील कांहीं लोकांनीं मला असें सुचविलें कीं, जर आपण पुणें मुंबईसारख्या मोठ्या शहरीं हा धंदा सुरू कराल तर तुम्हांस चांगलीच किफायत होईल.

माझें धाकटे बंधु चि. तुळशीराम यांच्या लग्नाकरितां मी पुण्यास आलों; त्या वेळीं मातोश्री मला असें ह्मणाली कीं "तूं मला जर वचन देशील तर मी तुला एक गोष्ट विचारतें," मीं तिला उत्तर दिलें, "तूं माझी आई आहेस. मी तुझाच आहें. तुझी आज्ञा मला शिरसावंद्य आहे. मग वचन तें कशाला पाहिजे ?" आई ह्मणाली "माझी तीनहि मुलें मजजवळ आहेत; आणि तूंही मजजवळच असावास अशी माझीं फार इच्छा आहे." मीं उत्तर दिलें "बरें आहे; मी तिकडील माझा सर्व व्यवसाय वर्ष सहा महिन्यांत आटोपून येण्याचा विचार करीन." मी लग्नकार्य उरकल्यावर माझ्या कुटूंबाला घेऊन परत बासिमला निघून गेलों. तेथें मीं इस्पितळाचें काम घेतलें; त्या कामांत मला चांगला फायदा झाला. पुढें मीं कामें घेण्याचें बंद केलें. मी त्या गांवीं घर बांधण्याकरितां जागा खरेदी करून सामानहि आणून ठेवलें होतें. त्या गांवीं माझ्या जातीचा विटा व कौलें पुरवणारा एक कंट्राक्टर होता; त्याची तेथील लोकांत चांगलींच मानमान्यता होती; तो घरचा चांगला सुखी होता पण मी त्याला आपल्याच जातीचा आहें याची ओळख दिली नव्हती. त्याला एक नातु झाला; त्या वेळीं आकोला, उमरावती आणि इतर ठिकाणचीं माझ्या जातीची सुमारें दोनशे मंडळी जमली होती; त्या वेळीं मी त्यांच्या जातीचा आहे असें कळलें; ह्मणून त्यांच्यांतील थोर व प्रतिष्ठित मंडळी मला भेटण्यास आली; आणि ती मला असें ह्मणाली कीं, "आपण येथें इतकें वर्षें असून आमच्या बरोबर कोणत्याही प्रकारचा संबंध ठेवला नाहीं हें कांहीं ठीक केलें नाहीं. आपण मोठे लोक पडलांत ह्मणूनच आपण गरीबांस ओळखलें नाहीं. हें कांहीं बरें नाहीं." मीं उत्तर दिलें "आपण माझ्या जातीचे आहांत; हें आजच मला आपल्या भेटीअंतीं कळलें." त्यांनीं मला असा आग्रह केला कीं, "उदईक आमच्या येथें नातवाचें बारसें आहे, त्यास आपण आपल्या घरच्या मंडळीसह भोजनास येण्याची कृपा करावी." मीं उत्तर दिलें "पुसद गांवीं माझें शाळेची इमारत बांधण्याचें काम चाललें आहे, तें पहाण्यास आमचा इंजिनीयर जाणार आहे; यासाठीं मला तेथें हजर असलें पाहिजे; या अडचणीमुळें माझें येणें होणार नाहीं. एतदर्थ मंडळीनें मला क्षमा करावीं," नंतर ते ह्मणाले कीं, 'आपल्या कुटुंबाला तरी पाठवून द्यावें.' मीं पाठविण्याचें कबूल केलें; आणि दुसऱ्या दिवशीं माझें कुटुंब त्यांच्या येथें जाऊन पांच रुपयांचा अहेर करून आलें. शाळेचें आणि इतर किरकोळ

कामें संपल्यावर क्रमाक्रमानें व सोयीसोयीनें कंत्राटी कामासाठीं सांठविलेल्या सामानाची विक्री सुरू केली. त्याचप्रमाणें जवळील बैल, गाड्या, गाई, म्हसी, घोडे हेंहि विकूं लागलों.

---

# प्रकरण ४ थें.

## स्वतंत्र व्यवसाय.

वडील बंधूंना नंदीयाल येथील कामांत नुकसान आल्यामुळें त्यांनीं मजजवळ रकम मागितली, आणि ती मीं त्यांना पाठवून दिली. तेहि आपलें तेथील काम आटोपून पुण्यास निघून येण्याच्या विचारांत होते. त्याप्रमाणें ते पुण्यास येऊन रिकामे बसले. माझा धाकटा बंधु गोपाळराव यानेंहि शाळा सोडून संगतीनें तो अनेक फंदांत शिरला. मी आपला चालता रोजगार बंद करून माझें कुटुंब, कन्या आहिल्याबाई आणि पुत्र पांडुरंग यांच्यासह पुण्यास आलों. माझे वडील मात्र नोकरीवर होते; पण इतक्या मोठ्या कुटूंबाचा निर्वाह त्यांच्या पगारामध्यें होण्यासारखा नसल्यामुळें कर्ज काढून प्रपंचाचा गाडा चालवावा लागला. ही स्थिति पाहून माझ्या मनाला अर्थातच वाईट वाटूं लागलें; आणि आतां पुढें काय करावें या विवंचनेंत मी पडलों. माझी धाकटी बहीण सौ. मंजुळाबाई ही आमच्या घराजवळच राहत होती. माझी आई तिच्या घरीं गेली आणि तेथून तिनें आपल्या पदराखालीं कांहीं झांकून आणल्याचें दिसलें. कांहीं तरी खाण्याचा पदार्थ आणला असावा असें वाटून मीं काय आणलें म्हणून आईला विचारलें; तेव्हां मला कळलें कीं, मीठ आणलें ! ज्या घरांत वर्षास लागणारें साहित्य एकदम आणून ठेवण्याची वहिवाट असे, त्याच घरांत आमच्या कारकिर्दींत मीठ उसनें मागून आणण्याचा प्रसंग यावाना ! हें पाहून माझ्या मनाची स्थिति फारच वाईट झाली. इतक्यांत माझी बहीण सहज घरीं आली. मीं तिला क्षेमकुशल विचारलें. तेव्हां तिनें उदासवृत्तीनें असें उत्तर दिलें कीं, , ' माझा नवरा आठ दहा आणे रोजीं मिळविणारा त्यांत माझी सासु, आम्ही उभयतां, आणि मुलेंबाळें काळ काढीत आहोंत. देव ठेवील त्या स्थितींत दिवस काढीत आहोंत. ' मी तिच्या मनाचें समाधान करण्याच्या हेतूनें म्हटलें कीं ' तुझी मुलें मोठीं झाल्यावर तुझी हीं संकटमय स्थिति दूर होऊन आनंदानें कालक्रमण करशील. " त्या वेळीं तिनें मला असें उत्तर दिलें कीं, " तुम्ही आपल्या आईला हुशार आणि कर्ते मुलगे आहांत,

प्र-९२८
प्रति-९०
११३४६



वाचनालय
श्री कुआवत क्षत्रिय जातीच्या इतिह

याशिवाय तुम्हांस बाबांची मदत आहे; असें असतां देखील तुमच्या येथें मीठ आहे तर पीठ नाहीं अशी जर स्थिति आहे तर माझ्या मुलांचा काय उजेड पडणार हें आपल्यावरूनच पहा. " हें तिचें उत्तर मार्मिक असून यांत खोल विचार भरले होते. माझी येथें येऊन फसल्यासारखी स्थिति झाली असें आतां स्पष्ट दिसूं लागलें. माझ्याजवळ जी कांहीं शिल्लक होती; त्यांतून मीं वडिलांचें थोडें कर्ज फेडलें, घरांत वर्षाची सामुग्री भरून ठेवली आणि कांहीं रोकड आई आणि बंधु यांच्या जवळ ठेवली. माझ्या स्वतःजवळ फक्त एकशें दहा रुपये शिल्लक राहिले.

हिंदुस्थानामध्यें मुंबई शहर हें व्यापारांचें केंद्रस्थान आहे. आणि ही प्रसिद्धी मी हमेषा ऐकत होतों. इतःपर नोकरी करावयाची नाहीं असा माझा दृढ निश्चय झाला. जर व्यापार करावा तर जवळ भांडवल नाहीं. आणखी इकडील व्यापारासंबंधी माहिती नसून कोणाचा आश्रयहि नाहीं; अशा विचारामध्यें येथें दिवस घालविण्यापेक्षां मुंबईत जाऊन तेथें राहून व्यापार कोणता करावा याचा विचार करावा, हें योग्य होणार आहे. मुंबईत आमच्या जातीचीं घरें पुष्कळ आहेत हें मला ठाऊक होतें; पण आपल्या उद्योगधंद्यासाठीं जातीच्या घरीं जाऊन राहणें हें माझ्या मनाला प्रशस्त दिसेना. पुढें शोधाअंतीं मला असें समजलें कीं शाळेतील आपल्या बरोबरीच्या विद्यार्थ्यांपैकीं तुळशिराम संतुजी काळे आणि रामचंद्र बाबाजी पवार हे मुंबईत राहत आहेत. मी त्यांचा राहण्याचा पत्ता काढला. घरांत आईस आणि वडील बंधुस विचारलें कीं, मी आठ चार दिवस मुंबई पाहण्यास जातों; त्यांनीं जाण्याची परवानगी दिली आणि मला सांगितलें कीं, पोटापाण्याची चांगली व्यवस्था पहा आणि प्रकृतीला नीट जपत जा. माझी स्नेही मंडळी मला कांहीं तरी मार्ग दाखवितील अशा विचारानें मीं निघण्याची तयारी केली. मी आपल्या जवळील शिल्लक आणि बेतापुरते कपडे घेऊन मुंबईस दाखल झालों; तेथें कामाठीपुऱ्यांत माझे स्नेही राहत होते त्यांच्या घरीं जाऊन उतरलों. बऱ्याच वर्षांनीं भेटीचा योग आला म्हणून त्यांनीं आपला आनंद प्रदर्शित केला. तुळशिराम काळे आणि रामचंद्र पवार हे लॉरेन्स आणि मेयो या चष्म्याचे व्यापारी यांच्याकडे नोकरीस होते; आणि ती नोकरी त्यांनीं नुक्तीच सोडून आपण स्वतः चष्म्याचा व्यापार करावा असा त्यांचा विचार चालला होता. त्यांचे दुसरे तीन बंधु घड्याळें दुरुस्त करण्याच्या आणि सोनार कामांत कुशल होते. ते मार्क्स कंपनींत नोकर होते. तुळशिरामजीला इंग्रजीचें बरेंच ज्ञान होतें; ते आपल्या रिकामपणाच्या वेळीं खाजगी शिकवण्या करीत असत; ह्मणून त्यांना मास्तरहि ह्मणत असत. हे चौघे बंधु एकत्र राहत होते. रामचंद्र पवार यांस तीन बंधु होते आणि तेहि सर्व एकत्र राहत होते. यांनीं असा विचार केला कीं, आपला जमाव चांगला आहे; आणि सर्व मंडळी निरनिराळ्या हुन्नरमध्यें चांगली प्रवीण आहे. आपण जर कंपनी काढली तर ती चांगली चालूं शकेल. चष्म्याच्या व्यापारांत चांगला

फायदा आहे; आणि या व्यापाराचें आपणांस चांगलें ज्ञान झालें आहे; परंतु जवळ भांडवल नसल्यामुळें तें कोठून आणावें या विचारांत ते होते. काळे आणि पवार यांच्या जवळ दागिने व रोकड मिळून सुमारें दोन हजार रुपयांची माया असावी. त्यांचा लॉरेन्स, बेनेट आणि कंपनी या नांवानें व्यापार करावा असा विचार होऊन त्यांनीं विलायतेस सुमारें दीड हजार रुपयांचा माल पाठविण्यास लिहीलें होतें. मीं त्यांच्या येथें राहून दोन वेळां जेवावें, गांवांत रिकामें फिरावें आणि आपण कोणता व्यापार करावा याचा विचार चालला होता. मीं वरचेवर या मंडळीस विचारावें कीं, " मी एक कुटुंबवत्सल मनुष्य आहें; मला कांहीं तरी मार्ग दाखवा; " तेव्हां त्यांनीं मला असें स्पष्ट कळविलें कीं, " भांडवलाशिवाय व्यापार नाहीं. तुमच्याजवळ जर भांडवल असेल तर आम्ही तुह्मांला पुष्कळ मार्ग दाखवूं." मीं त्यांना पुन्हां विनंति केली कीं, " मी कुटुंबवत्सल आहें; यासाठीं आपण मला कांहीं तरी आश्रय दिल्यास उत्तम होणार आहे. " मला तुळशिरामजीनें असें विचारलें कीं, "आपला काय विचार आहे तो मला स्पष्ट सांगा." मीं सांगितलें कीं, " माझ्याजवळ भांडवल नाहीं; पण माझी अंग मेहनत आहे. आपण जो व्यापार करणार आहांत, त्यांत माझा एक आण्याचा भाग ठेवा. मला तुह्मी जें काम सांगाल, तें मी करण्यास तयार आहें. भांडवलापेक्षांहीं माझी अंगमेहनतरूपी मदत अधिक महत्त्वाची होईल. हें आपणांस पुढें समजून येईल." त्यांनीं मला पुन्हा विचारलें कीं, " आपणाजवळ भांडवल किती आहे ? " मी त्यांना खरी स्थिति कळविली कीं, " माझ्याजवळ मुळींच भांडवल नाहीं; किंवा व्यापाराचें ज्ञान नाहीं किंवा हुन्नरहि नाहीं, " तेव्हां त्यांनीं मला स्पष्ट कळविलें कीं, " मुंबईत भांडवल किंवा हुन्नर याशिवाय कांहींच वळणार नाहीं. तुमचे वडील व वडील बंधु नोकरी करीत आहेत, तेव्हां त्यांच्या मदतीनें आपण कोठून तरी पांच हजार रुपये आणा, ह्मणजे तुमचा एक आण्याचा भाग ठेवण्याचा विचार करतां येईल. " मीं त्यांना उत्तर दिलें, " मी तर येथें बीन भांडवलानें उद्योग करण्यास आलों आहे." तेव्हां मला त्यांनीं असें स्पष्ट उत्तर दिलें कीं, " येथें क्राफर्ड मार्केट मोठें आहे. रोज सकाळीं आणि संध्याकाळीं तेथील प्रत्येक दुकानदाराजवळून एक एक पै भीक मागून आणल्यास आपला प्रपंच भागून वर्षा दोन वर्षांत सहज आपला एक आण्याचा भाग ठेवतां येईल, इतकी रक्कम आपल्या संग्रहीं होणार आहे. मग आपण आह्मांकडे या, ह्मणजे आपला एक आण्याचा भाग ठेवूं. "

हे वरील शब्द जरी त्या वेळीं मला विषवत् वाटले तथापि त्या विषयीं मनांत कोणत्याहि प्रकारें वाईट न वाटतां कधीं कधीं वाईटापासूनहि चांगलें निष्पन्न होतें; तद्वत् या भाषणाकडूनहि कां होणार नाहीं ? असा मीं आपल्या मनाशीं विचार केला. आतां येथें राहणें इष्ट नाहीं; असा माझ्या मनाचा कल झाला, आणि तोहि स्वाभाविक आहे. म्हणून मी भायखळ्यावर पीरखान गल्लींत जेथें

माझ्या जातीची बरीचशी मंडळी राहत होती, तेथें सडकेवर एखादी लहानशी खोली भाड्यानें घेऊन रहावें असा विचार ठरविला. त्याप्रमाणें दरमहा दोन रुपये भाड्याची एक खोली घेतली. जवळ एक शंभर रुपयांची नोट होती, ती मोडून त्यांपैकीं वीस रुपये त्यांच्या मुलांच्या हातीं खाऊ म्हणून ह्मणा किंवा मी त्यांच्या घरीं दोन महिने जेवलों त्याबद्दल मोबदला म्हणून ह्मणा देऊन, मंडळीचे आभार मानून, आणि आपलें पाकेट घेऊन भाड्यानें घेतलेल्या खोलींत येऊन राहिलों. पण ती खोली इतकी खराब होती कीं, तींत दोन कलाकहि बसवणार नाहीं; म्हणून मीं घराच्या रखवालदार भय्यास अशी विनंति केली कीं, " जर मी या जागेंत राहिलों तर मी आजारी पडेन, यासाठीं दुसरी एखादी हवाशीर खोली दिल्यास बरें होईल. " त्यानें मला दरमहा तीन रुपये भाड्याची खोली दाखविली; ती मला पसंत पडून अगाऊ एक महिन्याचें भाडें दिलें. पुण्याकडून येणाऱ्या जाणाऱ्या मंडळीकडून स्वयंपाकाकरितां भाडीं आणि पांघरण्यास वस्त्रें मागवून घेतलीं. माझी स्वतः हातानें स्वयंपाक करण्याची पूर्वीपासूनच वहिवाट असल्यामुळें त्याचें विशेष कांहीं वाटत नसे. याप्रमाणें आठ चार दिवस लोटल्यावर मीं असा विचार केला कीं, असें स्वस्थ बसून आपला निभाव लागणार नाहीं. आपणाजवळ तर व्यापाराला भांडवल नाहीं आणि भांडवलाशिवाय तर आपल्याला व्यापार कर्तव्य आहे. दीर्घोद्योग, प्रामाणिकपणा, आणि ज्ञान हे तीन गुण असले म्हणजे श्रीहारे यश देण्यास समर्थ आहे असें समजून मुंबईचा माल कोणते व्यापारी बाहेर कोणत्या गांवीं पाठवितात याचा बारीक रीतीनें तपास काढण्यास सुरवात केली. मला थोडासा तपास लागला; आणि विचाराअंतीं असें समजून आलें कीं, कामिशन एजंटचा ( अडतीचा ) धंदा केल्यास त्याला भांडवलाची फारशी गरज लागत नाहीं; म्हणून एक हजार कार्ड छापून कामिशन एजंटचा धंदा सुरू केला, त्या कार्डांत नियम, अडतीचे दर, अटी वगैरेसंबंधीचा खुलासा केला. अडतीचें नांव गणपतराव भिवाजी नाईक आणि कंपनी ( जी. बी. नाईक आणि कंपनी) असें ठेवलें. या नांवाचीं कार्डें बाहेर गांवाहून माल मागविणाऱ्या व्यापारी लोकांचे पत्ते मिळवून त्यांच्याकडे रवाना करण्याची सन १८८३ चे सुमारास सुरवात केली. सुमारें दोन तीनशें कार्डें बाहेरगांवीं गेल्यावर खरेदी आणि हुंड्या येऊं लागल्या. कांहीं अडते मंडळी व्याज, बट्टा, कसर ही बाहेरगांवच्या खरेदी करणारांस देत नसत; याशिवाय खरेदीची अडत आकारून माल पाठवीत असत; पण मी अडतीशिवाय दुसरें कांहींच घेत नसें, त्यामुळें माझ्या खरेदीचा माल इतर अडत्यापेक्षां त्यांना स्वस्त भावानें पडत असे, आणखी, त्यामुळें त्यांना आपल्या गांवांतील इतर व्यापाऱ्यांपेक्षां आपला माल अधिक स्वस्त दरानें विकतां येत असे, या कारणामुळें इतर व्यापाऱ्यांची खरेदी मजकडे येऊं लागली. जुन्या अडत्यांमध्यें आणि माझ्या आडतीमध्यें फरक इतकाच होता

कीं, त्यांचा व्यवहार हा खात्यावर चालत असे, आणि माझा व्यवहार हा रोखीनें असल्यामुळें मला स्वस्त भावानें खरेदी करतां येत असे; आणि त्यामुळें माझ्याकडील खरेदी व्यापाऱ्यांनाहि स्वस्त भावानें पडत असे. आणखी मजकडे व्यवहार कमी असल्यामुळें त्यांना माल वेळेवर मिळत असे. अशा प्रकारें प्रथम प्रथम खरेदीचा व्यवहार रोजचा हजार पंधराशेंपर्यंत होऊं लागला. जितकी खरेदी मोठी तितकी अडत कमी. मी हें सर्व काम एकटाच दलालाच्या साह्यानें करीत असे. मला या धंद्यामध्यें बरेंच यश मिळत चालल्यामुळें मी सात रुपये भाड्याची प्रशस्त जागा घेऊन माझ्या कुटुंबासहि बोलावून घेतलें, आणि धाकटा बंधु गोपाळराव यासहि बोलाविलें; परंतु तो स्वच्छंदी असल्यामुळें त्याचा मला जसा उपयोग व्हावा तसा कांहीं झाला नाहीं;* म्हणून मला लिहिण्याच्या कामावर एक पगारी कारकून ठेवावा लागला; आणि याच समयीं विजेच्या आंगठ्या आणि पुतळ्यांची जाहिरात हिंदुस्थानांतील बहुतेक भागांतील वर्तमानपत्रांत देण्याचें सुरू केलें. माझे कनिष्ठ बंधु तुळशीराम याचें लग्न झाल्यामुळें त्याचें लक्ष अभ्यासावरून उडालें; आणि तो गांवांत चैनीनें फिरूं लागला. असें जेव्हां मला कळलें तेव्हां मी पुण्यास गेलों; आणि त्याला सांगितलें कीं, मी मुंबईच्या विजेच्या आंगठ्या, पुतळ्या वगैरे मालाच्या दुकानाची एक शाखा पुण्यास काढतों; त्याची तूं व्यवस्था पहा. या शाखेसाठीं बुधवारच्या चौकांत माडीवर जागा घेऊन तेथें ऑफिस काढलें; आणि जाहिरातींत मुंबईचा आणि पुण्याचा असे दोन पत्ते दिले. या दोन्ही ठिकाणीं कामें चांगलीं चालूं लागलीं.

तुळशिराम संतुजी काळे आणि रामचंद्र बाबाजी पवार या दोघांनीं मिळून **लारेन्स बेनेट** आणि **कंपनी** या नांवानें चष्म्याचा व्यापार सुरू केला, तोंच **लारेन्स** आणि **मेयो** या युरोपियन चष्म्याच्या व्यापाऱ्यांनीं आपल्या नांवासारखें नांव धारण करून आणि सारखा व्यापार सुरू केला, तो बंद करण्यासाठीं हायकोर्टांतून **इंजंक्शन** ( मनाईचा हुकूम ) काढला. त्यामुळें त्यांना बरेंच नुकसान सोसावें लागलें; आणि नांव बदलावें लागलें. पुढें त्यांना जेव्हां रकमेची गरज लागली तेव्हां ते मजकडे आले. मीं स्नेहसंबंध जाणून त्यांना प्रसंगीं मोबदला ठेवून रकमेची मदत केली.

कमिशन एजन्सी आणि विजेच्या आंगठ्या व पुतळ्यांचा व्यापार बराच जोरानें चालूं लागला. मला वर्तमानपत्रांतून जाहिराती देण्यासाठीं दरमहा तीनशेंपासून पांचशें रुपयांपर्यंत खर्च येऊं लागला; त्यामुळें माझा व्यापार बऱ्याच मोठ्या प्रमाणावर होऊं लागला; आणि सर्व हिंदुस्थानभर लहानमोठ्या शहरांत मिळून दोनश्यांवर एजंट नेमले. लोकांस त्यापासून फायदाही बराच होऊं लागला. जागा

*म्हणून ते परत पुण्यास गेले; तेथें त्यांच्यावर अदावतीनें फौजदारी झाली. त्यांच्या बचावासाठीं म मुंबईहून धैर्यवान ब्यारिस्टर यांना घेऊन गेलों होतों. या खटल्याप्रीत्यर्थ मला दोन हजार रुपये खर्च आला, आणि त्यांच्या व्यापाराचें देणें देण्याबद्दल सुमारें एक हजार रुपये भरावे लागले.

पुरेनाशी झाल्यामुळें दुसरी दहा रुपये दरमहा भाड्याची जागा घेतली आणि एक नोकर ठेवला.

नंतर मी पुण्यास गेलों; तेथेंही विजेच्या आंगठ्या व पुतळ्याचा व्यापार चांगला चालला होता; तेथील प्रपंच्याचा सर्व खर्चहि तेथील उत्पन्नावर भागूं लागला. हें पाहून माझ्या मनाला फारच आनंद झाला. वडील बंधूंसहि **टान्सा वाटर वर्क्स**वर नोकरी लागली; आणि ते ठाण्यास निघून गेले. मी दिपवाळी निमित्तानें माझे वडील, मातोश्री, बंधु आणि बहिणी यांना मुंबईस बोलावून घेतलें. त्या प्रसंगीं हजारो रुपयांच्या हुंड्या येणें जाणें, पार्सलचे मनीआरडरस वगैरे, विजेच्या आंगठ्या–पुतळ्या विकत घेण्यास येणाऱ्या गिऱ्हाईकांची गर्दी, दलालांच्या वरचेवर भेटी हें सर्व पाहून आमची मंडळी अगदीं थक्क होऊन गेली ! लक्ष्मीपूजनाचे दिवशीं मातोश्रीकरितां सोन्याचे दागिने तयार केले होते ते एका ताटांत घालून तीर्थरूपांपुढें नेऊन ठेवले; त्या वेळीं तीर्थरुप ह्मणाले “ या गिल्टाच्या दागिन्यावांचून आपलें कांहीं अडलें होतें काय ? ” त्या वेळीं मीं म्हटलें कीं “ हे दागिने गिल्टाचे नसून अस्सल सोन्याचे आहेत. ” नंतर त्यांनीं जेव्हां ते सर्व हातांत घेऊन तपासून पाहिले,तेव्हां त्यांची पूर्ण खात्री झाली कीं, हे गिलिटाचे दागिने नसून सोन्याचे आहेत; आणि ते मोठे आश्चर्यचाकित झाले, आणि त्यासमयीं त्यांच्या मुखांतून असे उद्गार निघाले कीं, “ तुझी ही गडबड काय आहे ती मला कांहीं समजत नाहीं. ” मीं आपल्या बहीण भावजयांस व त्यांच्या मुलांबाळांस वस्त्रें घेतलीं. मीं मातोश्रीकरितां जे सोन्याचे दागिने केले होते त्यांपैकीं कांहीं दागिने मातोश्रींनीं माझ्या कुटुंबाला आणि माझी कन्या अहिल्याबाईला घालण्यास दिले.

**समुद्रप्रवास**—सन १८८८ सालांत मी व माझें पहिलें कुटुंब सौ. कोंडु, तिची कन्या चिरंजीवी अहिल्याबाई, पुतण्या दत्ताराम आणि एक गडी यांना बरोबर घेऊन महाशिवरात्रीच्या पर्वणीकरितां श्रीक्षेत्र गोकर्ण येथें आगबोटींतून गेलों. तेथें सहा दिवस मुक्काम करून मार्मागोवा येथें आगबोटीनें गेलों. गांव पाहिला; आणि दुसऱ्या दिवशीं आगबोटीनें परत येत असतां समुद्रांत तुफान झालें; आणि आमच्या आगबोटींत पाणी शिरूं लागलें. मी त्या वेळीं फारच घाबरून गेलों. आगबोटीवरील कप्तानाला देखील ही भयप्रद स्थिति आहे असें दिसून आलें. उतारूंचें रक्षण करण्यासाठीं त्यानें प्राणरक्षक लहान बोटी काढिल्या आणि त्यांत स्त्रियामुलांना बसविलें. पण मला कांहीं त्या प्राणरक्षक ( लाईफ ) बोटींत बसण्यास जाऊं देईना; तो ह्मणे कीं, प्रथम मला बायकामुलें यांचें प्राणरक्षण केलें पाहिजे. त्या प्रसंगीं मजजवळ सुमारें हजारबाराशें रुपये किंमतीचे दागिने होते ते मी त्याला आणि इतर खलाशांना देऊं लागलों; आणि मला प्राणरक्षक बोटींत बसवा अशी विनंति करूं लागलों; पण ते त्या दागिन्यांना वश झाले नाहींत. माझ्याबरोबर दुसरे जे पुरुष उतारू होते, त्यांनींहि पैशाची लालूच दाखविली; पण ती देखील त्यांनीं नाकारली. ही

गडबड सुमारें अर्धा तास चालली होती. त्या आगबोटींतील धान्य व इतर जड सामान समुद्रामध्यें फेंकून दिलें; नंतर आमची आगबोट स्थिर झाली; आणि प्राणरक्षक बोटींतील बायकामुलें पुन्हां त्यांत घेतलीं. याप्रसंगीं सामानसुमानाचें आणि व्यापारी लोकांच्या मालाचें नुकसान झालें; पण प्राणहानी झाली नाहीं. सर्व उतारू मुंबईस आपल्या घरोघरीं सुखरूप पोहोंचले.

पुढें कांहीं दिवस लोटल्यावर मीं भीत भीत वडिलांना अशी विनंति केली कीं, " मला आपणांजवळ कांहीं बोलणें आहे, आपण जर मला वचन द्याल तर मी बोलतों. " वडील म्हणाले " आमच्या जवळ कांहीं नाहीं; उलट आह्माला कर्ज आहे. " मीं म्हटलें कीं, " मला कांहीं आपणांजवळ पैसे मागावयाचे नाहींत. " मग ते म्हणाले, " असें जर असेल तर खुशाल बोल; कांहीं हरकत नाहीं. " मीं म्हटलें कीं, " विनंति इतकीच आहे कीं, आपण, मातोश्री, वडील बंधु व भावजय यांना बरोबर घेऊन महायात्रा करून यावें. " पण ही माझी विनंति श्रवण करून त्यांना महासंकटावस्था प्राप्त झाली आहे असें त्यांच्या त्या वेळच्या मुद्रेवरून दिसलें. त्यांच्याकडून लवकर उत्तर मिळालें नाहीं; कारण ते नेहमीं असें म्हणत असत कीं, "**मनमो चंगा तो काठवट मे गंगा** " त्यांना दांभिक भक्ति, धर्मढोंग वगैरे मुळींच आवडत नसे. अनाथ लोकांना अन्नदान करण्यांत महापुण्य आहे, असा ते मला नेहमीं उपदेश करीत असत. त्यावेळीं त्यांची काशीस जाण्याची इच्छा दिसली नाहीं. आणि अनेक अडचणी दाखवुं लागले. शेवटीं, ते म्हणाले कीं, " मला तेराशें रुपये कर्ज झालें आहे. कर्ज ठेवून यात्रा करणें हा कांहीं धर्म नव्हे. " मीं तत्क्षणीं त्यांना न कळवितां त्यांच्या सावकाराकडे त्यांच्या कर्जाची फेड म्हणून तेराशें रुपयांची हुंडी पाठविली. तिसऱ्या दिवशीं पोंच आणि कर्जाची भरपाई आली. ती त्यांस दाखविली; त्या वेळीं ते मला असें म्हणाले कीं, " माझी कांहीं काशीस जाण्याची इच्छा नाहीं. तूं आपल्या मातोश्रीला, बंधूला आणि भावजयाला काशीयात्रेला पाठवून दे. " मीं म्हटलें कीं, " भाऊ भावजय हें केव्हांहि यात्रा करतील. कामाच्या गर्दीमुळें माझ्या दैवांत आपणास काशीस नेण्याचें पुण्य नाहीं; आणि आपण बरोबर असल्याशिवाय मातोश्रीला काशी केल्याचें श्रेय प्राप्त होणार नाहीं. " नंतर त्यांनीं दुसरी अडचण अशी काढली कीं, " इतक्या माणसांस काशीयात्रा करण्यास खर्चहि बराच येणार आहे. " यावर मीं म्हटलें कीं, " त्याची काळजी आपणांस नको आहे, आपण ज्याची भक्ति करीत आहांत, तोच पार पाडणारा समर्थ आहे." यावर ते पुनः असें म्हणाले कीं, " जर बाळाराम माझ्या इच्छेप्रमाणें वागतील आणि करतील तर मी दोन महिन्यांची रजा घेऊन काशीस येतों. " मीं विचारलें कीं, " आपल्या इच्छेप्रमाणें वागणें म्हणजे कसें ?" याचा त्यांनीं असा खुलासा केला कीं, " माझें ब्राह्मणापेक्षां बैरागी, गोसावी, आतिथि इकडे अधिक लक्ष्य आहे. " मीं वडील बंधूंना सुचविलें कीं, ' बाबा काय म्हणतात

नगर वाचनालय सातारा
संगणकीकृत



इकडे लक्ष ठेवा.' पुढें वडिलांनीं आणि थोरल्या बंधुंनीं रजा काढून काशीस जाण्यास निघाले. माझ्या थोरल्या भावजयचा अतिशय हट्टी व तिरसट स्वभाव असल्यामुळें तिनें काशीस जाण्याचें साफ नाकारलें; तिच्यासाठीं काढलेल्या तिकिटावर वडील बंधूंचा मुलगा लक्ष्मणराव हा त्यांच्या बरोबर काशीस गेला.

सर्व यात्रेकरू मंडळी यात्रा करून दीड महिन्यानंतर पुण्यास परत आली. ती रीतीप्रमाणें नानाच्या पेठेंतील निवंडुग्या विठोबाच्या देवळांत उतरली. तेथें श्रीगंगेस नमस्कार करून आणि त्यांना नवीन वस्त्रें परिधान करण्यास देऊन जातींतील सर्वत्र मंडळीस आमंत्रण करून मोठ्या समारंभानें वाजतगाजत स्वगृहीं आणलें. पंधरा दिवसांनंतर गंगापूजन व मामदें झालें. त्या प्रसंगीं ब्राह्मण, बैरागी, अतिथि यांस सुग्रास भोजन दिलें, त्यावेळींही जातींतील सर्व स्त्री, पुरुष, मुलें यांना भोजनास बोलाविलें होतें.

मीं वडिलांस अशी विनंति केली कीं, आतां आपला वृद्धापकाळ झाला आहे; आणि आपल्या आशिर्वादानें सर्व कांहीं व्यवस्था चांगली चालली आहे; यासाठीं यापुढें आपण नोकरीच्या दगदगींत पडूं नये. ही माझी विनंति त्यांनीं मान्य करून आपण जी रेलवे खात्यांत पंचावन्न वर्षें नोकरी केली; त्याबद्दल ग्राच्युएटी ( इनाम ) घेऊन मोकळे झाले; आणि आपलें आयुष्य ईश्वरसेवेंत घालवूं लागले.

**व्यापारोत्तेजक**:—या नांवाचें मीं एक व्यापारविषयक वर्तमानपत्र सन १८८७ मध्यें प्रसिद्ध करूं लागलों. याची वर्गणी केवळ नांवाला बारा आणे ठेविली होती; यांत उपयोगी वस्तूंचा आणि व्यापारी लोकांना वरचेवर लागणाऱ्या मालाचा बाजारभाव, व्यापारी बातम्या, पत्रव्यवहार आणि इतर व्यापारसंबंधीं उपयुक्त लेख, जाहिराती वगैरे प्रसिद्ध होत असत; आणि या पत्रांत माझ्या स्वतःच्या व्यापारासंबंधीं जाहिरातीहि येत असत. हें पत्र प्रत्येक पंधरवड्यास बाहेरगांवच्या नवीन नवीन पत्त्यावर फुकट पाठवीत असें. हें सतत तीन वर्षें चाललें होतें. त्याच्या योगानें थोड्या खर्चांत माझ्या व्यापाराची विशेष प्रसिद्धि होऊन चांगलीच व्यापारवृद्धि झाली.

**हुन्नरोत्तेजक**:—मी या नांवाचें मासिक पुस्तक सन १८९० पासून काढण्यास सुरवात केली होती. तें दोन वर्षें चाललें होतें. हें काढण्याचा मूळ हेतू असा होता कीं, आपल्या देशामध्यें कलाकौशल्याचा जो ऱ्हास होत चालला आहे आणि त्याकडे लोकांचें जें दुर्लक्ष्य झालें आहे ही स्थिति सर्वथैव अनिष्ट होय, ती दूर करावी आणि लोकांची आपलें कलाकौशल्य उर्जितावस्थेंत आणण्याकडे प्रवृत्ति व्हावी. कलाकौशल्यवृद्धिशिवाय कोणत्याहि देशाचा तरणोपाय नाहीं. हें खऱ्या स्वदेशी चळवळीचें मुख्य तत्व तें मीं पंचवीस वर्षांमागें या मासिकाच्या द्वारें लोकांपुढें प्रतिपादन करीत होतों; यांस वर्गणीदारहि पुष्कळ असून तें लोकमान्य झालें होतें. त्यांची सालिना वर्गणी अवघा एक रुपया ठेविली होती; त्यापासून

माझ्या व्यापारासहि पुष्कळ सहाय्य झालें. यांत अनेक लोकोपयुक्त वस्तू कशा तयार कराव्या आणि त्यांत कोणकोणतीं द्रव्यें किती प्रमाणानें घालावीं याची कृतिसह माहिती देत असे.

**पुत्राचा मृत्यू !!!** १–माझा पांडुरंग या नांवाचा एकुलता एक पुत्र अत्यंत क्षीण प्रकृतीचा होता. माझें धंद्याकडे विशेष लक्ष गुंतल्यामुळें माझें त्याच्याकडे दुर्लक्ष झालें. मीं त्याला औषधोपचारासाठीं पुण्यास पाठविलें; पण त्यास गुण मुळींच आला नाहीं. माझ्या दुर्दैवानें मला त्याच्या मृत्यूची अत्यंत शोकजनक तार सन १८९० मध्यें आली ! माझा जीव अत्यंत उदास झाला. लोकांनीं मला असा उपदेश केला कीं, भावांचीं व बहिणीचीं मुलें हींच आपलीं मुलें आहेत असें समजून आपल्या दुःखित मनाचें सांत्वन करा. तुमची संतति वांचत नाहीं याकरितां दुसरें लग्न करा. ही धर्मशास्त्राज्ञा आहे. आणि त्याप्रमाणें आपण अवश्य कराच, अशी शिफारस करणारे माझे जातीचे सितारामशेट, मुंबईतील सिताराम बिल्डिंगचे मालक, रामचंद्र काकरवाळ, भाऊसाहेब उटवाले आणि चिमणाजी नाईक नागे अवसरीकर वगैरे मंडळी प्रमुख होय.

**घड्याळः**—हिंदुस्थानच्या सर्व भागांत सर्वांस गरज लागेल असा व्यापार म्हटला म्हणजे वॉचेस ( खिशांत ठेवण्याचीं घड्याळें ) टाइमपीसेस आणि क्लॉक ( मोठीं घड्याळें ), हा होय; तो मीं सन १८९० मध्यें सुरू केला. त्यावेळीं माझ्या ऑफिसमध्यें तीन कारकून, एक घड्याळ दुरुस्त करणारा आणि दोन शिपाई नवीन ठेवून पंधरा रुपये दरमहा भाड्याची जागाहि घेतली.

---

# प्रकरण ५ वें.

## लग्नकार्यें वगैरे.

—:०:—

**लग्नः**—माझी कन्या चि. अहिल्याबाई ही स्वरूपानें सुंदर, शरीरप्रकृतिनें सुदृढ आणि वर्तनानें सुशील होती. तिला सातवें वर्ष लागतें न लागतें तोंच तिला दोन तीन ठिकाणच्या चांगल्या मागण्या आल्या, पण अद्याप तिचें वय लहान असल्याकारणामुळें माझा आणि माझ्या वडिलांचा असा विचार होता कीं, इतक्यांतच तिच्या लग्नाची घाई करावयाची नाहीं; परंतु माझी मुलें आणि मुली मिळून पांच लेंकरें गेलीं. हीं सर्व आपल्या वयाच्या एक दोन वर्षांच्या आंतच गेलीं. माझी संतति अल्पा-

युषी होऊन जाते म्हणून मुलींच्या दोन्हीं आज्या, चुलतेचुलत्या वगैरे सर्व आप्तांचा असा विचार झाला कीं, हिचें लग्न केलें म्हणजे ती दुसऱ्याची होईल आणि तिचें आयुष्य वाढेल; आणखी ती आपणास लाभेल. आपल्या पदरांत पडेल. अशा त्यांच्या अज्ञानमूलक विचारापुढें माझ्या आणि माझ्या वडिलांच्या विचारांची मात्रा मुळींच चालेना.

रा. ब. भाऊ मनसाराम नाईक धवारे यांचे जांवई चौधरी बाळाराम रूपचंद सूतवाले यांचे चिरंजीव रामचंद्र हा वर नेमस्त करून भाऊसाहेबांना माझ्या वडिलांनीं नारळ दिला; ( याचा अर्थ असा कीं, माझी नात तुमच्या नातवास दिली ) पुढें तीन महिन्यांनीं तिचें लग्न करण्याचें ठरलें. त्या समयीं माझी वडील बहीण सौ. देऊबाईनीं मला अशी विनंति केली कीं, " माझा वडील मुलगा सखाराम हा आतां वयांत आला आहे, तुला आमच्या घरची सर्व स्थिति ठाऊक आहेच; आणि ते तुमच्या भरंवशावर असल्यामुळें इकडे लक्ष्य घालीत नाहींत. भाच्याचें लग्न करून देण्यांत महत् पुण्य आहे. यासाठीं तुझ्या मुलीच्या कार्यांत माझ्या मुलाचें कार्य सहजीं उरकलें जाईल. " मीं उत्तर दिलें कीं, " श्री पांडुरंग समर्थ आहे. मुलास नवरी पाहवी. " तोंच माझ्या वडील भावजयीच्या मनांत असें आलें कीं, आपला वडील मुलगा लक्ष्मण याचेंही लग्न उरकून घेणें चांगलें आहे. तिचेंहि म्हणणें पडलें कीं, माझ्याहि मुलाचें लग्न करा; त्या वेळीं माझ्या वडिलांनीं माझे वडील बंधु बाळाराम यांना सांगितलें कीं, एका वर्षांत तीन कार्यें होत नाहींत; आणि तसें करणें हेंहि बरें नाहीं; परंतु माझ्या भावजयेच्या हट्टी स्वभावापुढें माझ्या बंधूंचें कांहींच चालत नसे. म्हणून मला मोठ्या निरुपायानें त्या कार्यासही सम्मति द्यावी लागली; आणि वधू पाहण्यास सांगितलें; त्याप्रमाणें बाळाराम शिमार यांची कन्या अहिल्याबाई ही माझ्या बंधूंचा मुलगा लक्ष्मण यास वधू नेमस्त केली. पहिल्या तिथीस माझी कन्या अहिल्याबाई, दुसऱ्या तिथीस माझा भाचा सखाराम आणि तिसऱ्या तिथीस माझा पुतण्या लक्ष्मण याप्रमाणें कांहीं दिवसांच्या अंतरानें एका महिन्यामध्यें हीं तीन्ही कार्यें उरकून घेण्याचें ठरविलें. माझ्या मुलीची हळद सात दिवसांची काढली आणि दुसऱ्या दोघांची पांच पांच दिवसांची काढली. माझ्या मुलीकडील वरपक्ष हा सर्वच गोष्टीनें श्रेष्ठ असा होता; त्यामुळें या लग्नाची व्यवस्था माझ्या इच्छेप्रमाणें करण्यास मी अगदींच अज्ञान होतों; आतां आपण या कार्यसिद्धीसाठीं चांगले पोक्त आणि मोठीं कार्यें करून स्वतः अनुभव घेतलेल्या मंडळीचा सल्ला घ्यावा असा मीं निश्चय केला; त्याप्रमाणें नंदराम नाईक यांचे व्याही आणि माझ्या धाकट्या बहिणीचे चुलत सासरे म्हणजे आमच्या वडिलांचे व्याही गोवर्धन नाईक जाजोरे मेस्त्री यांचा सल्ला घ्यावा म्हणून मीं त्यांची भेट घेतली. तेव्हां त्यांनीं सिताराम शेडोजी देवतवाळ कंट्राक्टर यांना बोलावून घेतलें. हे गृहस्थ माझे वडील चुलतबंधु. एसबा ग्यानबा बैतांडे यांची

मुलगी लक्ष्मी ही सितारामजीचे पुतणे गणपतराव मोतीरामजी यांस दिली होती; त्यामुळें तेही अर्थातच माझे व्याही होते. मी त्यांना अशी विनंति केली कीं, ' मी अज्ञान आहें. मी येथें राहत नाहीं. मला येथील चालरीत विशेष माहीत नाहीं. मीं तुमचाच आहें. वरपक्षाकडील सर्व स्थिति आपणांस ठाऊकच आहे. आपण या लग्नांत सर्व पुढाकार घेऊन कार्याचा शेवट गोड करावा. " त्यांनीं मला असा प्रश्न विचारला कीं, " या लग्नाप्रीत्यर्थ आपली किती रक्कम खर्च करण्याची इच्छा आहे ? " मीं उत्तर दिलें कीं, " मुलगी दैवशाली आहे; म्हणून तिच्या नांवानें दरवर्षास पांचशें रुपये काढून ठेवीत होतों; त्याप्रमाणें चार हजारांपर्यंत खर्च करण्याचा माझा संकल्प आहे; आणि याच रकमेंतून भाच्यापुतण्याचेंहि लग्न उरकून घेण्याचा मानस आहे. "

हा आंकडा ऐकून त्यांना मोठें आश्चर्य वाटलें, ते मला म्हणाले कीं, " आपण शुद्धीवर बोलतां काय ? " मीं उत्तर दिलें कीं, " आपण मला असा प्रश्न कां विचारतां ? आपणांस विस्मय कां वाटावा ? " त्यांनीं उत्तर दिलें कीं, " तुमचे, तुमचे सर्व बंधूंचे आणि बहीणींचे लग्नांत प्रत्येक लग्नास तीन चारशें रुपयांचेवर खर्च झाला नाहीं आणि तुह्मी आज इतकी मोठी रक्कम बोलत आहांत याचेंच आम्हांस आश्चर्य आणि विस्मय वाटत आहे. खरें जें काय असेल तें आम्हांला कळवा. व्यर्थ आमची थट्टा करूं नका. " मीं त्यांना उत्तर दिलें कीं, " आपल्यासारख्या थोर मंडळीनें आमच्यासारख्या गरीबांना कार्य प्रयोजनांत मिष्टान्नांचें भोजन घातलें म्हणजे त्यांची जशी थट्टा करतां आणि जसें त्यांना विनोदानें हिणवितां तशी माझी थट्टा नाहीं आणि तसा माझा विनोदहि नाहीं. सर्व मंडळीच्या कृपेनें, माझ्या मुलीच्या सुदैवानें आणि संतति नसल्यानें मला अशी इच्छा उत्पन्न झाली आहे कीं, कोणत्या तरी निमित्तानें ज्ञातगंगेची सेवा करावी. मीं सांगितलेला आंकडा खरा आहे. " हें ऐकून त्यांनाहि आनंद वाटला, आणि मोठें भूषण वाटलें. ते म्हणाले कीं, " तुमच्या वडिलांची आणि बंधूंची इतका खर्च करण्याची मर्जी आहेना ? " मीं " होय " म्हणून उत्तर दिलें. नंतर ते म्हणाले " तुमचें कार्य तुमच्या इच्छेनुरूप निर्विघ्नपणें पार पाडणारा श्री पांडुरंग समर्थ आहे. आपण अगदीं बेफिकीर रहा. " त्यांनीं यादी करण्यास सुरवात केली. आणि मला विचारलें कीं, "आपण वधू, वर आणि वरपक्षाकडील मंडळीस देणगी व आहेर केवढ्याचा करावयाचा ? " मीं उत्तर दिलें कीं, ' सुमारें एक हजार रुपयांचा आहे. त्याचप्रमाणें पुतण्याच्या अणि भाच्याच्या वधूंना कापड व दागिने किती रुपयांचे करावयाचे ? " असा मला त्यांनीं प्रश्न केला. मीं उत्तर दिलें कीं, ' सुमारें साडे सातशें रुपयापर्यंत, आणि बाकी राहिलेल्या रकमेंतून अन्नखर्च, नाचगाणें, मंडप, वाजंत्री वगैरे कामीं करावा. " नंतर त्यांनीं मला असा प्रश्न केला कीं, ' तुमचें हल्लींचें जें राहतें घर आहे त्यांत तुमच्या आप्त मंडळीचाहि

समावेश होत नाहीं. मग अशा घरांत इतर मंडळींचा समावेश कसा होणार ? आणि लग्नसाहित्य कोठें ठेवणार ? या सर्वांची व्यवस्था कशी लावणार ? " मीं उत्तर दिलें कीं, ' शेजारचें बालाजीचें देऊळ व मठ, आणि दुसऱ्या बाजूचीं दोन घरें, समोरील मारुतीचें देऊळ आणि त्याच्या सभोंवतालची जागा इतकीं आपल्या ताब्यांत मिळण्याचा संभव आहे. " ते म्हणाले " फार उत्तम आहे. जागेची सोय लागली. "

आपण आपल्या मुंबईकडील व्यापाराची व्यवस्था लावून लग्नाच्या पूर्वीं निदान पंधरा दिवस येथें निघून यावें. लग्नानंतर देखील पुढें एक महिना आपणास येथें रहावें लागेल. अशी आपण आपल्या ऑफिसाची व्यवस्था लावा. कन्या, जामात आणि सुनांना जे दागिने घालावयाचे असतील ते करण्याच्या कामास लागा. या लग्नास लागणाऱ्या खर्चाला तुमच्या वडिलांची किंवा बंधूची मदत आहे काय ? मीं उत्तर दिलें कीं, " हें सर्व त्यांचेंच वैभव आहे. मी निमित्तास मात्र धनी आहें. " त्यांनीं सर्व जोखीम पत्करली आणि मीं त्यांची रजा घेऊन घरीं निघून आलों. मला त्यांनीं जातेसमयीं अशी सूचना केली कीं, " बोलून दाखविण्यापेक्षां करून दाखविण्याचें महत्त्व अधिक आहे; म्हणून खर्च किती करणार आहांत तो बाहेर फुटूं देऊं नका. "

वडील, वडील बंधु आणि मातोश्री यांना मीं, असा प्रश्न केला कीं, 'आपण तीन लग्नें करण्याचीं काढलीं आहेत; यांची पुढें कशी काय व्यवस्था लावावयाची ?' तेव्हां त्यांनीं उत्तर दिलें कीं, " आजपर्यंत जसें करीत आलों तसेंच पुढें करावयाचें. या तिन्ही लग्नास एक हजार रुपये लागतील. " मातोश्री ह्मणाल्या " तुझ्या मुलीच्या लग्नांत वरपक्षाकडील विचार लक्षांत आणून काय तें करावें " वडिलांनीं यावर असें उत्तर दिलें कीं, ' आपल्या पदरीं चार मुलें आहेत, आणि काळ हा सारखाच रहात नाहीं. यासाठीं मागील पुढील विचार करून योग्य दिसेल तें करावें. " मीं उत्तर दिलें कीं, " तुम्हीच सर्व करणारे आहांत; तुम्हांला जसें गोड दिसेल तसें करावें. " कनिष्ठ बंधु तुळशीरामाला अशी सूचना केली कीं, " शिल्लक जी कांहीं राहील ती वडिलांच्या स्वाधीन करावी; आणि त्या शिलकेंतून सवडीप्रमाणें लागणाऱ्या साहित्याची सोय करीत जावी. " याप्रमाणें विचार होऊन मी मुंबईस निघून गेलों.

सन १८९१ सालीं माघमासीं तिघांच्याही लग्नाच्या तिथींचा निश्चय केला. मी आपल्या मुंबईतील ऑफिसाचा बंदोबस्त करून मंडळीसह पुण्यास आलों, आणि गोवर्धन नाइक जाजरे आणि सिताराम शेडोजी देवतवाळ ( मैंदीवाले ) यांना मीं भेटण्यास घरीं बोलाविलें; त्याप्रमाणें ते आले. मीं त्यांना असें बोललों कीं, ' या तीन्ही लग्नांत किती प्रयोजनें घातलीं पाहिजेत; आणि तीं कोणत्या पक्वान्नाचीं घालावयाचीं, त्यांस साहित्य काय काय लागेल आणि किती आणावें लागेल ? पुणें, मुंबई,

खानदेश, औरंगाबाद, सातारा आणि इतर गांवची जातीची मंडळी मिळून बारा तेराशें पात्रांचा सुमार आहे. माझे घरीं लग्नास प्रारंभ झाल्यापासून तों कार्यसिद्धि होईपर्यंत माझी आप्त व पाहुणे मंडळी वगैरे मिळून सकाळ संध्याकाळ धरून दोनशें पात्र होणार; या सर्वांचा विचार करून याद्या लिहून साहित्य खरेदी करावें; आणि आपल्या हाताखालीं माझे धाकटे बंधु गोपाळराव यांस मदतीस घेऊन साहित्य, मंडप, वाजंत्री, आचारी, पाणके इत्यादिकांच्या तयारीस लागावें. ज्याचे जसे आकडे येतलि तसे ते चुकविण्यास चि. तुळशीरामाकडे व्यवस्था सोंपविली आहे.'

या लग्नाकरितां मंडप मोठा व भव्य उभारला असून त्याची रचना फारच चांगली केली होती, त्यामुळें तो चांगला शोभिवंत दिसत होता. तो उत्तम रीतीनें शृंगारला असून अत्यंत प्रेक्षणीय झाला होता; तो पाहण्यास गांवांतील लोकांच्या झुंडीच्या झुंडी लोटत होत्या. या लग्नानिमित्त आठ मोठीं प्रयोजनें दिलीं. प्रत्येक प्रयोजनास तीन पक्वान्नांचेवर आणि प्रत्येक प्रयोजनाच्या वेळीं निरानिराळ्या पक्वान्नांचा बेत केला जात असे. लग्नास आणि पानसुपारीस पुण्यांतील व लष्करांतील सर्व जाती व धर्मांतील प्रमुख मंडळीस आणि त्या वेळीं येथें असलेल्या राजे जहागिरदार वगैरे मंडळीस आमंत्रण केलें होतें; त्याप्रमाणें ती मंडळी आली; त्यांचें योग्य स्वागत करून त्यांची व्यवस्था उत्तम ठेवली होती. या लग्नांची गडबड सुमारें एक महिना चालली होती. हीं तीन्ही मंगलकार्यें निर्विघ्नपणें सिद्धीस गेलीं. माझा पाहूणचार करण्याच्या हेतूनें रा. ब. भाऊ मनसाराम धवारे नाईक यांनीं एकंदर ज्ञातीसह मला एक पक्वान्नाची मोठी मेजवानी केली. त्याचप्रमाणें गोवर्धन नाईक यांनींहि मला एक मोठी मेजवानी केली. तसेंच सिताराम शेडोजी यांनींहि मला मेजवानी केली. या तीन गृहस्थांनीं माझा पाहुणचार करण्यासाठीं मोठ्या थाटाची, खर्चाची आणि एकंदर जातगंगेसह मला मेजवानी केली. तद्वत् नंदरामजीनाईक कवलिये यांचे चिरंजीव रामलाल नाईक, सोमनाथ सखाराम लव्हाणीवाल तुकाराम घाशिराम लव्हाणीवाल.इ.अनेक मंडळीनें मला मेजवान्या केल्या. शेवटीं मलाहि या मंडळीस एकंदर जातीसह मोठ्या थाटाची व खर्चाची मेजवानी करावी लागली. ती फारच मोठ्या प्रमाणावर झाली. ही मेजवानी अपूर्व होती. या लग्नांतील एकंदर व्यवस्था, टापटीप आणि बेत याची लोक अद्याप प्रशंसा करीत आहेत. रामचंद्र मनसाराम नाईक हें त्यावेळीं मला असें म्हणाले कीं, ' गणपतरावांनीं आपल्या येथील लग्नसभारंभ मोठा अपूर्व आणि सरदारी थाटाचा केला खरा, पण या थाटास शोभेल असें त्यांचें घर नसल्यामुळें त्यांनीं ही उणीव सडकेवर मोठा भव्य, सुंदर व राजमहालासारखा मंडप उभारून भरून काढली खरी; पण त्यांनीं आह्मांस सडकेवर जेवावयास बसविलें." तेव्हां मीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, ' मीं शाळा सोडून जातींतील लग्नकार्यांतील डाळभाताच्या जेवणास जात नसें ही गोष्ट जेव्हां आपल्या कानावर आली, तेव्हां आपण माझ्या वडिलांजवळ असे उद्गार काढले

होते कीं, याच्या लग्नांत लाडू केल्यास आह्मीं येऊं; परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. ही आपली अपेक्षा परमेश्वराच्या कृपानुग्रहानें आणि आपल्या सर्वांच्या आशीर्वादानें आज मला पूर्ण करतां आली त्याबद्दल मी आपले, जातगंगेचे आणि परमेश्वराचे अत्यंत कृतज्ञबुद्धिपूर्वक फार फार उपकार मानतों; त्याचप्रमाणें आपल्या आशिर्वादानें जागेचीहि अडचण लवकरच दूर होईल. ”

या लग्नास दहा हजार रुपये खर्च आला असावा, असा लोकांचा समज होता; पण मला सुमारें सहा हजार आणि याच लग्नानिमित्तानें माझेआप्तसंबंधीं जातींतील हितेच्छु व इतर स्नेही मंडळीस सुमारें तीन चार हजार रुपये खर्च आला असावा. सिताराम शेडोजी आणि गोवर्धन नाईक यांनीं मला या कार्यांत मनःपूर्वक मदत केली ह्मणून मीं त्यांचे कृतज्ञबुद्धिपूर्वक उपकार मानले.

**व्यवस्थापत्रः**—आपलीं चारही मुलें उद्योगधंद्यास लागलीं आहेत, तीं आपला स्वतंत्र रीतीनें निर्वाह करण्यास समर्थ झालीं आहेत. पुढें परस्परांना परस्परांपासून कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये; आपसांमध्यें भांडणतंटे होऊं नयेत, हल्लीं माझा वृद्धापकाळ झाला आहे आणि मुलेंहि कर्तीं झालीं आहेत; ह्मणून त्यांनीं ता. २४ डिसेंबर सन १८९१ सालीं साध्या कागदावर आपल्या इस्टेटीचें व्यवस्थापत्रक करून ठेवलें; त्यांत असें लिहिलें कीं, सुना आणि मुलांलेंकरांच्या अंगावर जे दागदागिने आहेत ते त्यांना मी बक्षीस देऊन टाकिले आहेत. पांचशें रुपयांची इस्टेट चौघां मुलांना वांटून दिली आहे. न्याहाल पेठेंतील घर नंबर ५ आणि आदितवार पेठेंतील घर नंबर ४७ हीं दोन घरें मीं अनामत ठेविलीं आहेत. या दोन घरांची किंमत एक हजार रुपये आहे. ती माझे आणि माझ्या कुटुंबाचे दिवसमास, क्रिया कर्मास जो मुलगा खर्च करील तो त्या घराचा मालक होईल.

**करारनामाः**—आह्मीं चौघां बंधूंनीं आपसांत तंटाभांडण होऊं नये, एकमेकांस एकमेकांसपासून कोणत्याही प्रकारचा त्रास होऊं नये. ज्याच्या त्यांनीं स्वतंत्रपणें व्यापार धंदा करून निर्वाह करावा. म्हणून आम्हीं एकमतानें ता. १२ जानेवारी १८९२ रोजीं पांच रुपयांच्या स्टांप कागदावर करार करून तो रजिस्टरही केला.

**वाडा खरेदीः**—मी सन १८९२ सालीं मनुभारती गुरु मोरु भारती यांचा वाडा रविवार पेठ घर नंबर ६० हा सुमारें सात हजार रुपयांला खरेदी घेतला; आणि सन १८९३ मध्यें त्या वाड्यावर तिसरा मजला, चौकांतील बाजूवरील माडी आणि सडकेवरील पडवी बांधण्याचें काम सिताराम शेडोजी यांच्या देखरेखीखालीं सुरू केलें; यास सुमारें सहा हजार रुपये खर्च आला. तिसऱ्या मजल्यावरील दिवाणखाना मोठा भव्य व अत्यंत सुंदर आणि इतका प्रशस्त व सोईस्कर झाला आहे कीं, ग्रीष्मऋतूंत मोठमोठे सरदार, जहागिरदार व थोर थोर लोक येऊन राहूं लागले. आणखी, या दिवाणखान्यांत निरनिराळ्या समाजाच्या सभा, थोरथोर गृहस्थांस

पानसुपाऱ्या आणि मेजवान्या आणि लग्नकार्यें होऊं लागलीं. श्री. कमाबाईसाहेब शिर्के हा वाडा वीस हजार रुपयांस विकत मागत होत्या पण मी दिला नाहीं. अक्कलकोटच्या माजी महाराजांच्या आईसाहेब दरमहा शंभर रुपये भाडें देऊन राहत होत्या. **श्रीरामदासः**—मी, सिताराम शेडोजी आणि सखाराम भाऊ अनवडे मिळून सज्जनगडावर श्री समर्थ रामदास स्वामीमहाराज यांच्या समाधीच्या दर्शनास पुण्याहून निघालों. आह्मी तिघेहि सेकंड क्लासनें प्रवास करीत होतों, आमच्या डब्यांत आह्मां तिघांशिवाय सवथा कोणीहि उतारू नव्हता, यामुळें आह्मां तिघांस गाडींत चांगली झोंप लागली. आह्मांस सातारा रोड स्टेशनावर उतरावयाचें होतें; पण आह्मी गाढ झोंपेंत असल्यामुळें पुढें मिरज स्टेशनापर्यंत गेलों; तेथें आह्मांला गार्डानें उठविलें. त्यावेळीं आमच्या असा विचार झाला कीं, आपण आतां जर कोल्हापुराजवळ आलों आहोंत तर कोल्हापुरास जाऊन श्री **अंबाबाईचें** दर्शन घ्यावें. त्याप्रमाणें आह्मीं मिरज स्टेशनावर उतरून कोल्हापुरच्या गाडींत बसून कोल्हापुरास गेलों. तेथें आह्मी ज्ञानसागर छापखान्याचे मालक रा. मंत्री यांच्या येथें जाऊन उतरलों, त्यांनीं आमची व्यवस्था चांगली ठेवली, श्री अंबाबाईचें दर्शन घेऊन, तेथील राजवाडा पाहून रात्रीच्या गाडीनें निघालों; ते नरसोबाचे वाडीस जाऊन **श्रीदत्ताचें** दर्शन घेतलें आणि तेथून जरंड्याचे मारुतिचें दर्शन घेऊन नैवेद्य करून साताऱ्यास गोवर्धनदास शेट ( जमादार ) यांच्या येथें आलों; ते सज्जनगडावरील पंचांपैकीं एक पंच होते. आह्मी दुसऱ्या दिवशीं सज्जनगडावर गेलों, तेथें समाधीची पूजा नैवेद्य वगैरे केला. तेथील पंच मंडळीनें आह्मांस अशी विनंति केली कीं, "आपणांसारखी मंडळी येथें आली आहे यासाठीं येथें आपलें कांहीं तरी स्मरणीय कृत्य व्हावें अशी श्रीरामदासस्वामींची आज्ञा आहे. येथें पुण्यांतील गुर्जर मंडळींनीं आपल्या नांवाच्या **ओऱ्या** बांधल्या आहेत; तशा आपण तिघांनीं तीन ओऱ्या बांधाव्या." मीं म्हटलें कीं, 'श्रीसमर्थ करून घेणार समर्थ आहेत.' नंतर आम्ही तेथील प्रेक्षणीय स्थळें पहात पहात तळ्यावर आलों; तेथील मधुर जलपान करून आम्ही तेथें विश्रांति घेत बसलों. तेव्हां शेट गोवर्धन आह्मांस ह्मणाले कीं, "हा तलाव बांधण्यास कोणी तरी दाता मिळाल्यास उत्तम होईल." आम्ही गडावरून उतरून साताऱ्यास आलों. त्या समयीं मंडळींत मज संबंधानें असें भाषण निघालें कीं, नाईकांना मुलेंलेंकरें होतात; पण तीं कांहीं वांचत नाहींत. याकरितां यांनीं द्वितीय संबंध करण्यास कांहीं हरकत नाहीं. साताऱ्यास आल्यावर माझ्या जातीचीं मंडळी तेथें सुमारें शंभर होती त्यांना मिष्टान्न भोजन देऊन त्यांच्या भेटीचा आणि पंगतीचा लाभ घेतला. नंतर आम्ही पुण्यास आलों. तदनंतर मुंबईस गेलों. मुंबईस गेल्याबरोबर सातारा, कोल्हापूर, बेळगांव, तंजावर, रत्नागिरी, कारवार येथील वर्तमानपत्रांत मीं अशी जाहीरात दिली कीं, या सहा महिन्यांत माझ्या विजेच्या आंगठ्या, पुतळ्या यांच्या विक्रीपासून जें उत्पन्न होईल ते सर्व स-

ज्जनगडावरील श्रीरामदास स्वामींच्या समाधीजवळ ओऱ्या बांधण्याच्या कामीं खर्च केलें जाईल. विक्रीच्या ठिकाणाचा पत्ता सातारा येथील गोवर्धन शेट यांचा दिला होता. **श्रीसमर्थांस** करून घेणें होतें ह्मणून सहा महिन्यांत सुमारें दोन हजार रुपयांची विक्री साताऱ्च्या पत्त्यावर झाली. मीं गोवर्धन शेट यांस पत्र लिहून कळविलें कीं, एक ओरी बांधण्याचें काम सुरू करावें; आणि तें काम पुरें झाल्यावर त्या ओरीवर माझ्या नांवांचा शिलालेख करून बसवावा; आणि बाकीची रक्कम तलाव बांधण्याचे कामीं खर्च करण्यास सांगितली. सदरहु काम पुरें झालेलें पाहण्यास मला पुष्कळ वेळां बोलावणें आलें होतें; परंतु अद्यापपर्यंत माझें जाणें झालें नाहीं.

**द्वितीयविवाहः**—मुंबईत माझ्या येथें आत्माराम जळेंद्रे सातारकर यांचे वडील चिरंजीव संतराम आणि त्यांचा स्नेही लिंगन गौडा देसाई हे राहत असत; आणि ते **टेक्निकल स्कुलमध्यें** अभ्यास करीत होते. माझी आप्त व हितचिंतक मंडळी प्रसंगविशेषीं मला दुसरें लग्न करण्यासंबंधीं बोलत असे. मींही दोनतीन वेळां असें बोललों कीं, हल्लींच्या माझ्या कुटुंबाची इच्छा असल्यास होऊन जाईल. एके समयीं माझी कन्या चि. सौ. अहिल्याबाई ही मजजवळ असें बोलली कीं, ‘ मला भाऊ असावा अशी माझी फार इच्छा आहे; यासाठीं तुम्ही मला दुसरी आई करा. ” मीं उत्तर दिलें कीं, “ तुझी आई करणारी आहे. ” नंतर तिनें ही गोष्ट आपल्या आईजवळ काढली; तिच्या आईनें असें उत्तर दिलें कीं, “ माझी कांहीं मनाई नाहीं; त्यांनीं एक सोडून चार कराव्यात. ” मुलीनें हें तिचें म्हणणें मला कळविलें; त्या वेळीं मीं असें उत्तर दिलें कीं; “ जर तुझी आई संभाळील आणि मला कोणत्याहि रीतीचा त्रास होणार नाहीं, असें जर ती कबूल करीत असेल, आणि ती जर आपल्या सासुसासऱ्यांची परवानगी मिळवून देईल तरच मी दुसरें लग्न करीन.” तदनंतर ती पुण्यास गेली; आणि आपल्या सासुसासऱ्यांस ही गोष्ट सांगितली; आईनें चटकन् आपली सम्मति दिली; पण वडिलांना पुढील भविष्य माहीत होतें; म्हणूनच त्यांनीं उत्तर दिलें कीं, याचें सारें दुःख तुलाच सोसावें लागणार आहे याचा चांगला विचार करून जें करणें असेल तें करावें. ती मुंबईत आल्यावर तिनें मला ही हकीगत कळविली. मी त्या वेळीं मुंबईत सिताराम बिल्डिंगचे मालक सिताराम लक्ष्मण यांच्या घराजवळच राहत होतों, त्यामुळें आम्ही हमेषा आपल्या रिकामपणीं एकमेकांच्या येथें जात येत होतों. त्यांनीं होऊनच एके दिवशीं मजजवळ अशी गोष्ट काढली कीं, “ आपण दुसरें लग्न करावें. ” मीं म्हटलें“ आपण वधू पसंत करून आणा; मीं लग्नास तयार आहें. ” त्या वेळीं ते म्हणाले कीं, मुंबईत वधू पाहण्याचें काम मी करतों, पुण्यास सिताराम शेडोजी पाहतील आणि साताऱ्यास संतरामजी पाहतील. मुली पुष्कळ आहेत; आणि सहज मिळण्याचा संभव आहे. संतरामजींच्या घरींही एक दोन मुली आहेत; त्यांच्या संबंधानें माझ्या कुटुंबानें होऊनच शोध केला. संतरामाच्या धाकट्या बहिणीचें वर्णनमाझ्या मुलीक

डून मला कळविलें आणि साताऱ्यास कोणास तरी पाठवून शोध करण्यास सांगितलें.माझा द्वितीय विवाह करण्याचा विचार चालला आहे;ही गुणगुण संतरामाच्या कानावर गेली आणि त्यानें ती मला न कळवितां साताऱ्यास आपल्या वडिलांस लिहून कळविली. माझे चुलत बंधु आणि आतेबहीण हीं साताऱ्यास राहत होतीं, त्यांना पत्र पाठवून संतरामाच्या बहिणीविषयीं माहिती मागविली; त्याचें उत्तर आलें कीं, वधू बरी आहे. नंतर माझ्या कुटुंबानें पुण्यास लिहिलें कीं, " माझी स्थिति आपण जाणतच आहांत,त्यामुळें पुष्कळ मंडळी त्यांना द्वितीय संबध करण्यासाठीं अतिशय आग्रह करीत आहे म्हणून त्यांच्या इच्छेनें आणि माझ्या सम्मतीनें, आपणास कळवितें कीं, आपली इच्छा असल्यास सातारचे आत्मराम जळंदरे यांची वडील कन्या जानकीबाई हिला कोणी तरी जाऊन पहावें;पसंत असल्यास लग्नाचा निश्चय करावा. " त्याप्रमाणें धाकटे बंधु तुळशिराम हे जाऊन तेथील चुलतबंधु आणि आतेबहीण यांच्या विचारानें वधू पसंत केली; आणि मागणी करून तिथि निश्चय करून इकडे मला कळविलें. त्याप्रमाणें वडील बंधु, धाकटे बंधु व त्याचें कुटुंब, मातोश्री, भगिनी सौ. गंगाबाई, वडील भावाची सून चि. सौ. अहिल्याबाई आणि तिघे जवळचे आप्त यांसह साताऱ्यास जाण्याविषयीं मीं लिहून कळविलें; आणि तेथें सर्व सिद्धता करा. त्याप्रमाणें मंडळी साताऱ्यास निघून गेली. भावी वधूचा बंधु संतराम हा माझ्या येथें होता; तो साताऱ्यास निघून गेला. ज्या दिवशीं हळद त्याच दिवशीं सकाळीं मी साताऱ्यास जाऊन दाखल झालों. रीतीप्रमाणें चार दिवस लग्नसोहळा थाटानें झाला. तेथील जातीस तीन पक्वान्नांचीं जेवणें दिलीं. पांचव्या दिवशीं लग्न लागलें. सुमारें एक हजार रुपये किंमतीचे दागिने वधूच्या अंगावर घातले; त्यांपैकीं चवदा तोळ्यांची सरी वधू आईबापांच्या घरीं असतां चोरीस गेल्याचें वर्तमान मला वरातीचे वेळीं कळलें. रीतीप्रमाणाणें खासगी रीतीनें चौकशी केली; पण शोध कांहीं लागला नाहीं; म्हणून जाती पंचांस कळविलें कीं, याची जोखीम आपणांवर आहे; नाहीं तर मी पोलिसास वर्दी देतों. त्यांनीं मला असें सांगितलें कीं, ' आपण आपली नवरी घेऊन घरीं जावें. आम्ही याची व्यवस्था लावतों. ' पुढें जातींतील मंडळीनें सरीचा पुष्कळ शोध केला; पण त्यानांहि तपास लागला नाहीं. पुढें आठ पंधरा दिवसांनीं माझ्या नवीन वधूचा चुलता दयारामजी यांनीं पुण्यास येऊन चोरीस गेलेल्या सरीच्या निम्या किंमतीची सरी मध्यस्थ मंडळीमार्फत माझ्या नवीन कुटुंबाच्या गळ्यांत घातली.

**तटः**—माझा द्वितीय विवाह झाला, त्याप्रसंगीं मुंबईंतील आमच्या जातीमध्यें दोन तट होते; एका तटांत सितारामशेट, सिताराम बिल्डिंगचे मालक हे होते आणि दुसऱ्या तटांत मी होतों. ह्या तटप्रकरणाच्या वादाचा निकाल तुकाराम घाशिराम लव्हाणीवाळ यांच्या मुलाच्या लग्नांत होणार होता; म्हणून सिताराम शेटजी हे मुद्दाम साताऱ्याहून पुण्यास निघून आले आणि मीही माझ्या नवीन वधूसह आणि

कांहीं मंडळीसह पुण्यास निघून आलों. त्या वेळीं मुंबईहून सितारामशेट पुण्यास येऊन मुंबईतील तटाची सर्व हकीगत श्री. रा. ब. भाऊ मनसाराम धवारे यांस निवेदन केली; तेव्हां त्यांनीं आपलें असें मत दिलें कीं, ' तुमच्या विरुद्ध तटांतील मंडळी मुद्दाम त्वरेनें आज येथें येऊन दाखल झाली आहे. कोणाच्याहि कार्यांत विघ्न नको आहे. आणि तुम्हां उभयतांचें परस्पर दर्शन झाल्यास वादाचा प्रश्न उपस्थित झाल्यावांचून राहणार नाहीं ! यामुळें सिताराम शेट आपल्या आप्तांच्या येथील लग्नकार्य सोडून कांहीं कामाच्या निमित्तानें मुंबईस निघून गेले; पण मी न डगमगतां रीतीप्रमाणें लव्हांणीवाळ यांच्या लग्नास जाऊन सर्व मंडळीच्या भेटीचा लाभ घेतला; पण वादाचा प्रश्न बिलकुल निघाला नाहीं.

**राज्याभिषेक**–श्रीमन्महाराज शाहू छत्रपति सरकार करवीर, यांची स्वारी श्री. रा. ब. भाऊ मनसाराम धवारे यांच्या वाड्यामध्यें येऊन उतरत असल्यामुळें त्यांचा आणि माझा परिचय झाला होता आणि पुढें तो माझ्या हिंदु वॉचेसवरून विशेष झाला. जेव्हा त्यांचा सन १८९४ सालीं राज्याभिषेक झाला त्या समारंभास मला आमंत्रण आलें होतें; त्याप्रमाणें मी आपले धाकटे बंधु चि. तुळशीराम यांस पाठविलें; त्यांची तेथें राजपाहुणें या नात्यानें उत्तम प्रकारें व्यवस्था ठेवली होती.

**सनद**. ता. २२ डिसेंबर सन १८९६ सालीं श्रीमन्ममहाराज सरकार कोल्हापूर यांचें दिवाण ऑफिसकडून मला अशी सनद* मिळाली कीं, या संस्थानास आणि खाजगी खात्यास लागणारीं क्लॉक्स टाईमपिसेस, वॉचेस, जवाहीर वगैरे तुमचेकडून घेतलीं जातील आणि तुह्मीं ती पुरवली पाहिजेत. तुह्मांस सरकारनें कृपावंत होऊन नेमलें आहे असें त्यांच्या गॅझिटमधून प्रसिद्ध केलें याबद्दल मी श्री महाराज यांचे अत्यंत कृतज्ञबुद्धिपूर्वक फार फार उपकार मानले; आणि त्याप्रमाणें अद्यापपावेतों सुरळीत व्यवहार चालला आहे.

**हिंदुवॉचः**–श्री छत्रपति शिवाजी महाराज यांचा जन्मोत्सव आणि त्यांच्या समाधीचा जिर्णोद्धार या संबधानें चळवळ नुक्तीच कोठें सुरवात झाली होती; आणि हिंदुस्थानच्या बहुतेक भागामध्यें पसरत चालली होती; अशा समयीं मलाहि अशी कल्पना सुचली कीं, आपलें परमपूज्य दैवत श्रीमहादेवपार्वती आणि मराठी राज्याचा मूळस्थापक शिवाजीमहाराज यांची प्रतिमा खिशांतील घड्याळाच्या तबकडीवर काढल्यास अशा घड्याळांचा चांगला खप होण्याचा संभव आहे; म्हणून मी त्याचा

* His Highness the Maharaja of Kolhapur is hereby pleased to appoint Messrs G. B. Naik & Co. of Bombay and Poona Watchmakers and Suppliers to the Kolhapur State.

Kolhapur,
22 nd December 1896.

By. Order
V. K. Kirtikar
Huzar Chitnis.

नमुना ( डिझाईन ) तयार करून आणि त्याची सविस्तर हकिगत लिहून त्याचे पेटन्ट मला मिळण्याकरितां कलकत्त्यास हिंदुस्थान सरकाराकडे अर्ज केला; तो मंजूर होऊन सन १८९५ सालीं मला त्याचें पेटन्ट मिळालें. सदरहु घड्याळाचें नांव हिंदुवाच असें ठेवलें. हें गव्हर्नमेन्ट ग्याझिटमध्यें प्रसिद्ध झालें; त्यामुळें या अपूर्व कल्पनेची हिंदुस्थानांतील बहुतेक भागांतील आणि निरनिराळ्या भाषेंतील वर्तमानपत्रकारांनीं प्रशंसा केली; आपली कल्पना लोकपसंत आहे असें मला दिसून आल्याबरोबर, मीं ही माझी कल्पना स्विझरलंडला सचित्र लिहून कळविली; आणि अशा नमुन्याचीं निकल, चांदी व सोन्याचीं खिशांतील घड्याळें दहा हजार रुपये किंमतीचीं पाठवून देण्याची पाहिली मागणी केली; आणि त्याचप्रमाणें न्यूयॉर्ककडून दोन हजार रुपये किंमतीची हिंदु टाईमपिसेस मागविलीं. सुमारें चार महिन्यांनंतर माल आला. तें जसें दिखावूं होतें तसेंच तें टिकाऊही होतें. वेळही बरोबर दाखविणारें होतें; अशी माझी खात्री झाली, इतकेंच नाहीं तर त्यांतील मार्मिकांचीही पूर्ण खात्री झाली. ज्या वर्तमानपत्रकारांनीं मला पेटन्ट मिळाल्याचें प्रसिद्ध केलें होतें आणि या माझ्या कल्पनेचा गौरव केला होता त्या वर्तमानपत्रकारांकडे त्यांच्या योग्यतेप्रमाणें कांहींकांकडे निकल वाच आणि कांहींकांकडे हिंदु टाइमपीस त्यांच्या अभिप्रायाकरितां नजर पाठविलें. त्या सर्व वर्तमानपत्रकारांनीं कालम दोन कालम इतका आपला विस्तृत अभिप्राय वर्णनपर व गौरवयुक्त प्रसिद्ध केला; त्याच्या योगानें जाहिरात न देतां हा सर्व आणलेला माल तीन महिन्यांच्या आंतच विकला गेला; त्यामुळें मीं दुसरी वीस हजार रुपयांचा माल पाठवून देण्याची मागणी केली, आणि नंतर हळूहळू वर्तमानपत्रांतून जाहिराती देण्याचें सुरू केलें. या माझ्या अपूर्व कल्पनेबद्दल मला बऱ्याच राजेरजवाड्यांकडून चांगला उदार राजाश्रय मिळाला.

**राष्ट्रीयसभाः**—सन १८९५ सालीं पुण्यास राष्ट्रीयसभेची बैठक झाली; त्यासमयीं बाबु सुरेंद्रनाथ बानर्जी हे अध्यक्ष होते; त्यांस मीं एक चांदीचें हिंदु वॉच सभेच्या सेक्रेटरीच्या मार्फत नजर केलें; आणि मीं मुद्दाम जपानांतून तयार करवून आणलेले तीन हजार सुंदर पंखे कांग्रेसच्या मंडपांत जमलेल्या डेलिगेटस, प्रेक्षक आणि इतर मंडळीस वाटले; या पंख्यांच्या एका बाजूस हिंदु घड्याळांचीं चित्रें आणि दुसऱ्या बाजूला वर्णनात्मक जाहिरात दिली होती; अध्यक्षांनीं आपल्या भाषणांत हिंदु वॉचेसची कल्पना, त्यांतील हिंदु देवतांची सुबक चित्रें, समयास अनुसरून स्वार्थ व परमार्थ दृष्टीनें जाहिरात देण्याची अनुकरणीय नवीन टुम, धाडसी प्रयत्न इत्यादि गोष्टींचा उल्लेख करून कंपनीचे आभार प्रदर्शित केले.

**चरित्रः**—इग्लंड, फ्रान्स, जर्मनी आणि अमेरिका वगैरे पाश्चात्त्य देशांतील वर्तमानपत्रकारांनींहि या माझ्या अपूर्व कल्पनेची आणि शोधक बुद्धीची तिकडे प्रशंसा व प्रसिद्धी केली; ती इतकी कीं, त्यांनीं माझें चारित्र आणि कंपनीसंबंधी

साग्र व सचित्र माहिती मागितली* "परंतु यांप्रसंगीं मी माझे परम मित्र रा. सा. नारायणराव रघुनाथ नवलकर ऑनररी मॅजिस्ट्रेट यांची सल्ला विचारली आणि त्यांनीं देण्याविषयीं आपली संमति दर्शविली. ते म्हणाले कीं, जर बिन पैशावांचून तुमची प्रसिद्धि, लौकिक आणि गौरव होत आहे तर जरूर द्यावी, मीं मोठ्या आनंदानें तुमचें चरित्र इंग्रजींत लिहून देईन." त्याप्रमाणें त्यांनीं माझी सविस्तर हकीगत विचारून घेऊन माझें चरित्र लिहिलें आणि त्यांनीं तें परभारें त्यांच्याकडे पाठवून दिलें. तें माझें सचित्र चरित्र अमेरिकेंतील मुख्य व सुप्रसिद्ध शहर **शिकागो** येथील **अमेरिकन ज्युएलर** या मासिक पुस्तकाच्या वर्ष १८ अंक ६ म्हणजे सन १८९८ च्या जून महिन्याच्या अंकांत प्रसिद्ध झालें आहे. पुढें लंडन येथील **वाच मेकर, ज्युएलर्स** आणि **सिल्व्हरस्मिथ** या नांवाच्या मासिकपुस्तकांत त्याचा साग्र उतारा घेतला; इतकेंच नाहीं तर जर्मनी, फ्रान्स, वगैरेंकडील पुष्कळ मासिक पुस्तकांत आणि वर्तमानपत्रांतही त्याचे संक्षिप्त उतारे आले आहेत. त्याच्या प्रती हिंदुस्थानांतील प्रसिद्ध अशा वर्तमानपत्रांकडे मोबदला म्हणून आल्या त्यामुळें इकडील वर्तमानपत्रकर्त्यांच्या वाचण्यांत माझा सचित्र चरित्र लेख आला. तो वाचून त्यांनीं आपला संतोष व्यक्त केला. आणि माझें अभिनंदन करून कित्येक वर्तमानपत्र-कारांनीं असा उल्लेख केला कीं, "आमच्या या हिंदुस्थान देशांत जी. बी. नाईक यांच्या सारखे कल्पक, शोधक व धाडसी मनुष्य उत्पन्न झाल्यास आपल्या देशाची व्यापारवृद्धि लवकरच होण्याचें एक सुचिन्ह होय."

**मानः**—युरोपांतील पुष्कळ मासिकांनीं आणि वर्तमानपत्रकारांनीं माझ्या कल्पक शक्तीसंबंधीं अभिनंदनपर लेख लिहिलें; त्यामुळें हा माझा सुलौकिक ऐकून अमेरिकेंतील शिकागो येथील **हॉरालाझिकल सोसायटीनें** मला आपला मेंबर ( सभासद ) केलें. हा मान आजपर्यंत हिंदुस्थानांतील कोणाएकासहि मिळाला नव्हता तो प्रथम मला मिळाला. ( M. A. H. S. Chicago. )

पुण्याचें ऑफिस बंद करण्याचें कारण असें झालें कीं, तेथील व्यवस्था पाहण्याचें काम माझे कनिष्ठ बंधु तुळशिराम यांच्याकडे होतें. त्यांनीं आपला जमाखर्च मुळींच ठेवला नाहीं. त्यांना वाईट संगत लागली त्यामुळें त्यांचें व्यापाराकडे लक्ष कमी झालें; यास्तव मला तेथील ऑफिस बंद करणें भाग पडलें.

**फिरते एजंटः**—मि. गॅडी या नांवाचा एक युरेशियन नोकर ठेवून त्यास आणि तुळशिराम यांस सर्व प्रकारचा घड्याळांचा माल देऊन त्यांना हिंदुस्थानांतील राजे, महाराजे, राणा, महाराणा, नबाब, ठाकूर वगैरे थोर थोर मंडळीस

---

* येथील केरळकोकिळ, ज्ञानचक्षु, ज्ञानप्रकाश जगद्वृत्त, ज्ञानसागर, व्यापारी इत्यादि पत्रांच्या संपादकांनीं माझें चारित्र आपल्यां मासिकांत आणि वर्तमानपत्रांत प्रसिद्ध होण्याकारितां मागितलें होतें. परंतु त्या वेळीं मीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, मी कांहीं तितक्या योग्यतेचा मनुष्य नाहीं,

भेटून आपला माल त्यांना दाखवून तो विकण्याची आणि त्यांना लागेल तो माल पुरविण्याची योजना केली. या योजनेमुळें मालाचा खप होऊन कंपनीची विशेष प्रसिद्धिही झाली.

**वडीलांचें वर्तन.** माझे वडील सकाळीं व संध्याकाळीं ठराविक देवदर्शनाच्या निमित्तानें तीन चार मैलांचा व्यायाम करीत होते. त्यांचा आहार आणि निद्राही नियमित असे. त्यांची प्रकृति सुदृढ होती. ते कधींहि कोणत्याहि विशेष विकारानें आजारी पडले नव्हते किंवा त्यांची आपल्या प्रकृतिसंबंधानें कोणत्याहि प्रकारची कुरकुर नसे. मी त्यांचें घरांत कधींहि हास्यवदन पाहिलें नाहीं; ते कारणाशिवाय कोणाबरोबरहि भाषण करीत नव्हते. त्यांना अमर्यादेचें वर्तन मुळींच खपत नसे. त्यांचें विशेष बसणें उठणें बैरागी गोसावी वगैरे साधुसंत मंडळीमध्यें असे; त्यामुळें क्वचित प्रसंगीं चिलीम ओढीत असत. त्यांचा नेहमीचा पोषाख खादीचा पांढरा असे. ते कोणावरही अवलंबून राहत नसत. त्यांची राहणी अगदीं साधी असे. त्यांनीं शेवटपर्यंत आपल्या मुलाच्या कमाईची आशा केली नाहीं.

**वाडाः**—मीं जेव्हां नवीन वाडा सुधारून वाढविला तेव्हां ते त्या वाड्यांत येऊन राहण्यास खुषी नव्हते. मीं तो वाडा विकत घेतल्यावर दोन तीन वर्षेंपर्यंत त्यांनीं तो वाडा पाहिला नाहीं; किंवा तेथें काय चाललें आहे याची विचारपूसहि केली नाहीं. वडील बंधूनें त्यांना सांगितलें कीं, आपलें राहतें घर अगदीं मोडकळीस आलें आहे; तें कोणत्या वेळीं काय करील याचा कांहीं भरंवसा नाहीं. आपण सर्व मंडळीसह त्या नवीन वाड्यांत राहण्यास जावें हें बरें आहे. त्यांनीं या म्हणण्यास आपला रुकार दिला. नंतर सुमुहूर्त पाहून गृहशांति केली; प्रथम गृहप्रवेश करण्यास माझ्या दुसऱ्या कुटुंबास सांगितलें आणि तिच्या मागून बाकाची सर्व मंडळी घरांत गेली. माझे आप्त व इतर शुभचिंतक, कारागीर मजुर यांचें म्हणणें असें पडलें कीं, आम्हांस गृहप्रवेशाचें भोजन मिळालें नाहीं; यासाठीं मीं माझे धाकटे बंधु गोपाळराव यांस अशी सूचना केली कीं, ' मला सत्यनारायण करावयाचा आहे, रात्रौ हरिकीर्तन करावयाचें आहे, आणि दुसऱ्या दिवशीं आपल्या एकंदर जातीस, स्नेही मंडळीस आणि वाड्याचें काम करणाऱ्या सर्व लोकांस मिष्टान्न भोजन देणें आहे; याची सर्व सिद्धता करून मला कळवा म्हणजे मी मुंबईहून येऊन हा समारंभ उरकून घेईन, त्याप्रमाणें मीं केलें. हा समारंभ झाला त्याच्या दुसऱ्या दिवशीं वडील बाळारामास बोललें कीं, या उधळ्या पोरानें या घराची रचना व व्यवस्था कशी काय केली आहे ती मला दाखीव; त्याप्रमाणें हे उभयतां चोहोंकडे फिरून सर्व घर पाहिलें; आणि त्यांनीं माझ्या वडील बंधूजवळ असे उद्गार काढले कीं, " कुटुंबवत्सल मनुष्यास ज्या सोयी पाहिजे आहेत; त्या बहुतेक या वाड्यांत केल्या आहेत. गणपतीची व्यवस्था व विचार फार चांगला आहे. " वाडा सर्व पाहून आल्यावर माझे थोरले बंधु त्यांना असें म्हणाले

कीं, "या वाड्याला रोजचें एक शेर तेल दिव्याला लागणार आहे; आणि वाडा झाडून साफ ठेवण्यास एक गडी पाहिजे" वडिलांनीं उत्तर दिलें कीं, यानें असें तें काय केलें आहे? माझ्या हाताखालीं जे पूर्वीं कारकून होते ते आज दोन घोड्यांच्या गाड्या उडवीत आहेत!!! मग यांनीं कांहीं जास्त केलें आहे असें मला वाटत नाहीं."

**वडिलांचा मृत्यु!** वयोमानाप्रमाणें माझे वडील बरेच अशक्त होऊन थकत चालले होते; तथापि त्यांचा व्यायाम कांहीं कमी झाला नव्हता. मी माझे धाकटे बंधु गोपाळराव यांस असें सांगून ठेवलें कीं, एखादा गाडी घोडा चांगला सोईस्कर मिळाल्यास विकत घेऊन टाका; त्याप्रमाणें त्यांनीं एक नवीन टांगा व घोडा विकत घेतला; परंतु त्या गाडींत माझे वडील किंवा मातोश्री कधींही बसलीं नाहींत. माझ्या वडिलांस बरोबर दिसत नसल्यामुळें त्यांना चष्मा वापरण्यासंबंधानें मी पुष्कळ वेळां आग्रहपूर्वक विनंति केली; पण ती त्यांनीं मान्य केली नाहीं. एके दिवशीं रात्रींच्या समयीं ते तळमजल्यावरील दोनतीन पायऱ्यांवरून पाय घसरून चौकांत पडले आणि त्यांच्या तोंडाच्या उजव्या बाजूस गुप्त मार लागला; त्यामुळें त्यांचें बाहेर फिरणें बंद झालें; तेव्हांपासून ते घरांत बसून असत. प्रातःकाळीं उठल्याबरोबर त्यांचा असा क्रम असे कीं, जे बैरागी, गोसावी, भट; भिक्षुक, आंधळे, पांगळे, लंगडे; लुळे येतील त्यांना मूठभर जोंधळे वाटीत बसावें; हा क्रम त्यांच्या मागें अद्यापपर्यंत चालू ठेवला आहे. वडील उत्तरोत्तर अधिकच अशक्त होत चालले, ह्मणून मीं त्यांना अशी अत्यंत नम्रतापूर्वक विनंति केली कीं, आपण गांजा ओढण्याचें व अफू सेवन करण्याचें बंद केल्यास विशेष उत्तम होणार आहे.; त्याप्रमाणें त्यांनीं गांजा ओडण्याचें एकदम बंद केलें आणि हळू हळू अफू सेवन करण्याचें कमी करीत गेले. याचा असा परिणाम झाला कीं, त्यांची शक्ति अधिकच क्षीण होत गेली. पचन शक्तीचा ऱ्हास होत गेल्यामुळें अन्नहि कमी जाऊं लागलें. मी पुण्यास येऊन राहिलों. त्यांनीं हजामत करवली आणि स्नान वगैरे करून चांगली हुशारी दाखविली. त्यांनीं आपल्या आप्त मंडळीस सूचना केली कीं, उदईक सर्वत्र आप्त वर्गास बोलावणें पाठवा आणि त्यांना रीतीप्रमाणें भोजन घाला. त्यांनीं आह्मां चौघां बंधूंना आपल्या जवळ बोलाविलें आणि सांगितलें कीं, "मला ग्रह अनिष्ट आले आहेत, जर हे पुढील तीन दिवस पार पडले तर मी आणखी तीन वर्षें तुमच्या सहवासांत राहीन. तुम्ही सर्व बंधु एका विचारानें वागा आणि तिघां बंधूंनीं गणपतीस त्रास न देतां त्याच्या इच्छेनुरूप वागल्यास त्यांत तुमचें हित आहे."

मला मुंबईहून अशी तार आली कीं, ज्यानें माझ्या जवळ आपले सुमारें तीन हजार रुपयाचे दागिने गहाण ठेविले होते, ते सोडविण्यास तो आला आहे; यासाठीं आपण स्वतः येऊन किंवा किल्ली पाठवून व्यवस्था लावावी; त्याप्रमाणें मी

मुंबईस निघून गेलों. त्या वेळीं वडिलांची प्रकृति विशेष काळजी बाळगण्यासारखी दिसली नाहीं; आणि त्यांनींही मला सांगितलें कीं, जा आणि लवकर निघून ये. ज्याचे दागिने होते त्याचे त्यास देऊन टाकले. मी सायंकाळीं बाहेर गेलों असतां वडील घाबरल्याची तार आली; ती शेजाऱ्यानें घेऊन आपल्या जवळ ठेविली. मी त्या दिवशीं जरा उशिरानें घरीं परत आलों; तेव्हां तार मला मिळाली; ती वाचल्याबरोबर मी स्टेशनावर गेलों आणि स्पेशल गाडी काढण्याची खटपट केली; पण पूर्वीं सहा तास नोटीस दिल्याशिवाय स्पेशल गाडी काढतां येत नाहीं असें मला उत्तर मिळालें. मीं घरीं गेल्यावर मला दुसरी तार आली कीं, "वडिलांची अत्यावस्था आहे." आणि लागलीच एका तासानें तिसरी तार आली कीं, "बाबा गेले;" मी रात्रीच्या गाडीनें पुण्यास निघून गेलों. मजशिवाय सर्व मंडळी त्यांच्या जवळ अंतकाळच्या समयीं होती; मी तेथें प्रातःकाळीं चार वाजतां गेल्यावर मला अशी हकीगत कळली कीं, "त्यांनीं आपल्या वडील पुत्रास शिवलीलामृताचा अकरावा अध्याय वाचण्याची आज्ञा केली; त्याप्रमाणें त्यांनीं वाचून दाखविला. श्रीशंकराची आरती त्यांनी स्वतः म्हटली; आणि सर्वांस म्हणावयास लाविलें. प्रसाद वांटण्यास सांगितलें आणि गणपति आला काय याची चौकशी केली. बंधूंनीं सांगितलें कीं, त्यास तारा पाठविल्या आहेत, तो एक दोन तासांत येथें येईल. वडिलांनीं वार, तीथ व वेळ विचारली; आणि ह्मणाले कीं, "सृष्टिक्रम चालू आहे. मजसाठीं कोणीं दुःख व शोक करूं नये. जो करील त्याचें बरें होणार नाहीं; आनंदानें श्रीहरीचें नामस्मरण करा. आमच्या मातोश्रीच्या बांगड्यांवरून हात फिरविला आणि वडील मुलास आपल्याजवळील गौरीशंकराची माळ दिली. माझ्यासंबंधानें विशेष खर्च करूं नका असें माझ्या गणपतीला सांगा. दुःख व संकटप्रसंगी मन आवरून धरा आणि धैर्य सोडूं नका. थोरल्या मुलास सांगितलें कीं, तूं आतां माझ्या जवळ बैस; बाहेर कोठें जाऊं नकोस; आणि सर्वांना आज्ञा केली कीं, तुह्मीं मोठ्यानें भजन करा. भजन चाललें असतां वडील मुलाच्या आणि सर्वांच्या हातून गंगा घेतली आणि रात्रीचे अकरा वाजतां ( ता. २० माहे मे सन १८९५ ) रोजीं आपल्या वयाच्या सुमारें ९० व्या वर्षीं त्यांनीं आपला देह ठेविला !

माझ्या वडिलांच्या मृत्यूची बातमी दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझ्या जातींतील मंडळींना कळली. माझी सर्व जात आणि इतर जातींतील पुष्कळ मंडळी जमली; या शिवाय बैरागी, गोसावी आणि भजनी मेळेही बरेच आले होते. प्रेतयात्रेस हजाराच्या वर मंडळी जमली होती, प्रेतावर सोन्याचांदीचीं फुलें, नाणें व फुलें उधळीत स्मशानांत नेलें. चौघां बंधूनीं क्षौर करून थोरल्या बंधूनें कनिष्ठबंधूस क्रियाकर्म करण्याची आज्ञा दिली. लकडीपुलावर ब्राह्मणेतर लोकांची स्मशानभूमि आहे; आणि ज्या जागीं हल्लीं म्युनिसिपालिटीनें बाग केला आहे त्या जागीं त्यांचें चंदनाच्या लांकडानें दहन केलें. त्यांच्या अस्थि व रक्षा कनिष्ठ बंधूकडून श्री क्षेत्र



माझे परमपूज्य

## तीर्थरूप कै. श्री. भिवाजी जगोजी चव्हाण.

ऊर्फ


## बैताडे, नाईक.

**जन्म**-सन १८०४. **मृत्यु**-२० मे १८९५.

# चव्हाण ऊर्फ गौतम वंशज.

———:०:———

बैताडे, बैताडा, भथारिया, बटोरिया, भाहाटाडीया हें एकच आडनांव खरें; पण निरनिराळ्या देशांत त्याचा उच्चारहि निरनिराळा करितात. ही आडनांवानें राजपुताना, पंजाब, मध्यप्रांत, गुजराथ, महाराष्ट्र वगैरे देशामध्यें प्रचारांत आहे ह्यापैकीं राजपुतान्याकडील एका घराण्याची खालील वंशावळः—



नाशिक येथें गोदावरीमध्यें टाकल्या. त्यांची दशक्रिया नाशिकास केली. त्यांचा दिवस पुण्यास केला; याप्रसंगीं आमच्या जातीचे, स्मशान यात्रेस आलेले आणि जे आमच्या बरोबर अन्नव्यवहार करीत असलेले लोक, आणि बाहेरगांवची दिवसाकरितां आलेली मंडळी मिळून सुमारें १२०० शें पात्र झालें. जेवणास मालपुवे केले होते; त्याच दिवशीं मुंबईस जातीस भंडारा करण्याची व्यवस्था शेट सिताराम लक्ष्मण किनारीवाळ यांच्याकडे सोंपाविली होती; त्याचप्रमाणें त्याच दिवशीं साताऱ्यास जातीस भंडारा करण्याची व्यवस्था माझे नातलग रामचंद्र केशव बैताडे यांच्याकडे दिली होती. माझ्या वडिलांची कोणत्याही प्रकारची आशा राहिली नाहीं; त्यांना आपल्या पुत्राच्या वैभवकाळीं मरण आलें. आपले पुत्र चांगले कर्त्ते आणि लौकिकवान निघाले याचा त्यांना मोठा अभिमान वाटत असे. त्यांचे जवळ अंतकाळच्या समयीं चार पुत्र, तीन कन्या, सहा सुना, तीन जांवई, दहा नातू, दोन नातसुना, दोन नांतजांवई आणि आठ नाती होत्या. अशा भर कुटुंबांत त्यांचा अंत झाला. हें त्यांच्या पूर्वपुण्याईचें फळ होय. यां शिवाय वडिलांच्या बाजूकडील आणि मातोश्रीच्या बाजूकडील आप्तवर्गाचा परिवार फार मोठा होता.

**ऑफिसः**–सन १८९६ सालीं प्रथम मुंबईस प्लेग सुरू झाला; त्यामुळें दररोज सुमारें पांच सहाशें माणसें प्लेगमुखीं बळी पडूं लागलीं. माझ्या कंपनीच्या ऑफिसांतील बहुतेक मंडळी धाबरली; आणि सर्व मंडळीनें मला असें सांगितलें कीं, कांहीं महिन्याकरितां ऑफिस बंद ठेवा, आणि आह्मांस गांवीं जाऊं द्या. त्यामुळें माझा निरुपाय होऊन मला माझें ऑफिस बंद ठेवणें भाग पडलें. मीं मंडळीस सांगितलें कीं, आपण पुण्यास ऑफिस नेऊं; तेथें तुह्मी चला. कांहीं मंडळी पुण्यास आली, आणि कांहीं आपल्या गांवीं निघून गेली. पुण्यास लागणाऱ्या आफिसासाठीं कांहीं सामान, दप्तर आणि थोडा माल तेथें नेला. माझ्या वाड्यांतच ऑफिस स्थापन केलें.

**राजाश्रयः**–माझ्या हिंदु वॉचेसचीं कामें सुबक पाहून पुष्कळ संस्थानिक मला आपल्या फोटोचीं वॉचेस तयार करून पाठविण्यास सांगत असत. त्याप्रमाणें मी पुष्कळ राजे रजवाड्यांच्या फोटोची वॉचेस करून पाठवीत असे. त्याबद्दल मला माझ्या मालाची किंमत मिळत असे. इतकेंच नाहीं तर हजारपांचशें रुपये इनामही मिळत असे. ज्या संस्थानिकांनीं मला इनामें दिलीं आणि आपला उदार राजाश्रय दिला त्यांचीं नांवें:—श्रीमन्महाराज छत्रपति सरकार करवीर, अलिजाबहादर शिंदे सरकार, श्री. गायकवाड सरकार, जुनागडचे नबाबसाहेब, बनारसचे महाराज, ह्मैसुरचे महाराज, भावनगरचे महाराज, पन्नाचे महाराज, दरभंगाचे महाराज, यांशिवाय लहानमोठ्या संस्थानिकांकडूनही मला चांगला आश्रय मिळाला; आणि तो अद्यापपर्यंत चालू आहे; त्यांच्या दरबारास आणि खानगी खात्यास लागणारीं घड्याळें व वॉचेस वगैरे मजकडूनच पुरवली जातात.

पन्नाच्या महाराजांकडून मला चांदीसोन्याचें सिंव्हासन तयार करण्याबद्दल हुकूम मिळाला; त्याप्रमाणें चार नकाशे आणि एक मॉडेल ( नमुना ) त्यांच्याकडे पाठविला; त्यांपैकीं एक नकाशा आणि मॉडेल पसंत झाला. प्लयान, मॉडेल आणि दोन मनुष्यें जाण्यायेण्याचा खर्च मला मिळाला; याशिवाय पांचशें रुपयें किंमतीची हिऱ्याची आंगठी बाक्षिस मिळाली. हें काम मर्जीप्रमाणें झाल्यास आणखी इनाम किंवा जाहगिरी देण्यांत येईल असें दरबारानें मला कळविलें. सिंव्हासन सुमारें एक लाख रुपये किंमतीचे करण्याचें ठरलें होतें, परंतु इंग्रज सरकाराने पन्नाच्या महाराजांचा अधिकार काढून घेतल्यामुळें काम पूर्ण झालें नाहीं. ( या संबंधानें विशेष हकीकत **लोकमत** या सदराखालीं पाहवीं. )

माझा बहुतेक व्यापार बाहेरगांवच्या मागण्यावर होत असल्यामुळें दुकान घालावें लागलें नाहीं; त्याच्या योगानें कोठेंहि राहिल्यास व्यापारास कांहीं अडचण पडत नसे.

**घड्याळांची भेटः**—मीं माझ्या ऑफिसमध्यें माझ्या आप्तांपैकीं जी मंडळी ठेवली होती, ती सारी नोकर याच नात्यानें ठेवली होती. मीं '**कंपनी**' हें नांव जरी धारण केल होतें तरी त्यामध्यें माझ्याशिवाय दुसरा कोणीहि भागिदार नव्हता किंवा कोणाचाहि अर्थाअर्थीं संबंध नव्हता; आणि तीच स्थिति आजपर्यंत चालू आहे. ही कंपनी एका हिंदूची असल्याकारणामुळें देवळांतील सभा मंडपांत, मठांत आणि इतर परोपकारी संस्थेच्या दिवाणखान्यामध्यें ठेवण्यास क्लॉक ( मोठें घड्याळ ) च्या मागण्या येत असत. अशा ठिकाणीं मी घड्याळाचे दाम न घेतां फुकट पाठवीत असें. तसेंच मला कोणच्या देवळांत किंवा परोपकारी संस्थेमध्यें जाण्याचा प्रसंग आला आणि तेथें घड्याळाची मोठी उणीव आहे असें जर माझ्या नजरेस आलें तर मी स्वतः होऊन तें फुकट पाठवीत असें. अशा घड्याळाची किंमत पंधरा रुपयांपासून पंचवीस रुपयांपर्यंत असे. अशीं मीं आजपर्यंत निरनिराळ्या धर्म संस्थांना शंभराच्या वर घड्याळें फुकट पाठविलीं आहेत. यांत माझा स्वार्थ व परमार्थपर हेतु असे. स्वार्थ असा कीं, माझ्या मालाची प्रसिद्धि व्हावी; आणि परमार्थ हा कीं, लोकांना वेळ समजण्याचें साधन करून ठेवावें.

**म्युनिसिपल कमिशनरः**—सन १८९७ सालीं पुणें सिटी म्युनिसिप्यालीटीच्या कमिशनरांची निवडणूक होती. माझ्या स्नेही व हितचिंतक मंडळीची अशी आग्रहाची इच्छा होती कीं, मीं या निवडणुकींत उमेदवार ह्मणून पुढें यावें. ते ह्मणाले कीं, आम्ही तुह्मांला प्रातिज्ञेनें निवडणून आणूं; इतकें त्यांचें उत्तेजन आणि इतकी त्यांची सबल आशा दिसली; आणि ती शक्य दिसल्यामुळें मी घोरपडे आणि गंजपेठेंत उभा राहिलों; त्याच पेठेंत श्री. काळुराम भाऊ मनसाराम, आणि रा० ब० रामनारायण अमरचंद हेही उमेदवार होते. या उभयतांची अशी पूर्ण खात्री झाली कीं, मी जरूर निवडून येईन; इतका मजसंबंधानें मंड-

ळीचा प्रेमभाव व उत्साह दिसून आल्यावरून कांहीं शिष्टमंडळीसह श्री. कालुरामजी हे मला भेटण्याकरितां माझ्या घरीं आले आणि त्यांनीं मला अशी विनंति केली कीं ' आपण मला वडिलांसमान आहांत. आणखी आपण माझे आप्त आहांत; आपली योग्यता म्युनिसिपल कमिशनरपेक्षांहि अधिक आहे. माझे लाड आणि हट्ट पुरवणें हा तुमचा धर्म आहे. आणि या त्यांच्या म्हणण्यास त्यांच्या बरोबरीच्या शिष्ट मंडळीनेंहि आपलें पुष्टीकरण दिलें. हे श्रीमान गृहस्थ माझी कांहीं अन्य कामांत मदत मागत असतील किंवा धर्मकृत्यास मदत मागत असतील असा माझा त्या वेळीं समज झाला; त्यांनीं मजजवळून वचन मागितलें आणि तें मीं दिलें; तेव्हां ते म्हणाले कीं, ' आपण कमिशनर होण्यासाठीं उमेदवार उभे राहण्यासंबंधानें जो कमिटींत अर्ज पाठविला आहे तो काढून घ्यावा; आणि मला त्या कामीं मदत करावी. आपल्या मदतीवांचून माझी इच्छा कदापी परिपूर्ण होणार नाही. ही गोष्ट माझे बंधु तुळशिराम व इतर हितचिंतक मंडळी कबूल करीनात; परंतु माझें पूर्वींच वचन गेलें असल्यामुळें आणि फुकटची दगदग नको आहे असा विचार करून मीं अर्ज काढून घेतला; आणि त्यांना मदत करून कमिशनर निवडून आणिलें.

मला ज्या अर्थीं माझ्या नातलगांच्या आग्रहावरून म्युनिसिप्यालिटीच्या लोकनियुक्त निवडणूकींतून आपलें नांव काढून घ्यावें लागलें, त्या अर्थीं मी सरकारतर्फें तरी निवडून यावें, यासाठीं माझे हितेच्छु सरदार रा. ब. कुपुस्वामी मुदलीयार, रा. व. पांडुरंग दाजी अधिकारी हुजूर डेप्युटी कलेक्टर, खा. ब. एम. एच. दस्तुर स्पेशल क्यान्टोटमेन्ट म्याजिस्ट्रेट, रिसालदार मेजर सय्यदुल्लाखान, मुंबईच्या गव्हर्नर साहेबांचे नेटिव ऍडीक्यांप वगैरे मंडळीनें कलेक्टर साहेबाकडे माझी शिफारस केली. हे सन १८९७ साल नसून सन १८९८ साल होते.

**पानसुपारीः**—कोल्हापूरचे दिवाण रा. ब. सबनीस यांस मी आपल्या पुण्यांतील वाड्यांत ता. ४ मे सन १८९८ रोजीं पानसुपारी केली; त्याप्रसंगीं प्रमुख मंडळी आली होती.

**चौकशीः**—मोर्वीचे ठाकूर यांच्या येथें त्यांच्या राजपुत्राचें लग्न निघालें त्या वेळीं एका गृहस्थानें मला असें सुचविलें कीं, तुम्ही जीं नवीन तऱ्हेचीं हिंदु वॉचेस तयार केलीं आहेत, तीं या प्रसंगीं त्यांच्याकडे पाठवून द्यावीं; त्याप्रमाणें सुमारें एक हजार रुपये किंमतीचीं खिशांतील घड्याळें पाठवून दिलीं. त्या वेळीं माझ्या येथें रयत एजन्सीचा मूल उत्पाद भास्करराव सहस्त्रबुद्धे हा इंग्रजी कारकून होता. मोर्वीच्या ठाकुराकडे माल पाठवून बरेच दिवस लोटले; पण त्याची रक्कम आली नाहीं. पुष्कळ पत्रें पाठविलीं, पण त्यांचें उत्तर देखील नाहीं. त्या वेळीं नुक्ताच, पुण्यांत प्लेगचे मुख्य अधिकारी र्‍यांडसाहेब यांचा खून महाराणी व्हिक्टोरिया यांच्या डायमंड जुबिलीच्या रात्रीं झाला होता. माझ्या कारकुनानें माझ्या अपरोक्ष ठाकूरसाहेबांस असें पत्र लिहिलें कीं, ' व्यापाराच्या रकमा वेळे-

८८३४६



वर न आल्यास व्यापारास नुकसान सोसावें लागतें; अशा जर रकमा गुंतून राहिल्या तर अशा चळवळीच्या वेळीं आपल्यासारख्यांनीं मदत न केल्यास आमचें मोठें नुकसान होत आहे. ” याचा अर्थ विपरीत समजून तें पत्र त्यांनीं इन्स्पेक्टर जनरल ऑफ पोलिसकडे पाठवून दिलें. ती वेळ मोठीच विकट होती; ऱ्यांड साहेबांसारख्या बड्या सरकारी अधिकाऱ्याचा खून, आणि तोहि ज्युबिलीच्या रात्रीं, धरपकडीची सुरवात, आणि शिवाजी उत्सवासंबंधानें चाललेल्या चळवळीविषयीं सरकारची संशयवृत्ति, अशा समयीं मी शिवाजीच्या मुखवट्याचीं घड्याळें काढलीं, आणि माझ्या कारकुनानें आपल्या पत्रांत वापरलेला ‘ चळवळींच्या वेळीं ’ या शब्दामुळें गुप्त पोलिसांचा माझ्याभोंवतीं सुळसुळाट झाला. ते अनेक रूपानें, अनेक वेषानें, आणि अनेक निमित्तानें तपास करूं लागले. एके दिवशीं ते येऊन मला म्हणाले कीं, ‘ आपणास पुण्याच्या पोलिस सुपरिंटेंडन्टच्या ऑफिसमध्यें बोलाविलें आहे. ” पण मीं त्यांना सांगितलें कीं, ‘ मी मॅजिस्ट्रेटच्या समन्सशिवाय येऊं शकत नाहीं. ’ ते मला दोन तीन वेळां बोलावयास आले तेव्हां मीं त्यांना हेंच ठराविक उत्तर दिलें. तदनंतर डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडन्ट, इन्स्पेक्टर आणि दोन तीन शिपाई माझ्या घरीं आले; त्यावेळीं त्यांनीं मला सांगितलें कीं, आम्हांला आपणांस कांहीं प्रश्न विचारावयाचे आहेत; आणि कांहीं चौकशी करावयाची आहे. ’ मीं त्यांना असा स्पष्ट जबाब दिला कीं, “ मला आपल्या प्रश्नांचीं उत्तरें माझ्या वकिलाच्या सम्मतीशिवाय देतां येत नाहींत. ” तेव्हां ते म्हणाले कीं, “ येथें मॅजिस्ट्रेटचा कांहीं संबंध नाहीं; आणि त्यामुळें वकिलाचाहि संबंध येत नाहीं. आपणासंबंधानें चौकशी करण्याकरितां कांहीं प्रकरण आलें आहे. त्या प्रकरणासंबंधानें आम्हांस जी चौकशी करावयाची होती, ती आम्हीं बहुतेक केली आहे. आतां फक्त तुमच्याकडून आमची चौकशी कितपत सत्य आहे ती पाहण्याकरितां आह्मांला खुलासा विचारला पाहिजे.” मीं उत्तर दिलें ‘ असें जर आहे तर माझी कांहीं आपणास हरकत नाहीं. मजकडून जितका खुलासा करवेल तितका करून देण्यास मी तयार आहें.”

प्रश्नः—तुमच्या कंपनीचा व्यवहार हा किती वर्षांपासून चालू आहे. ? उत्तरः—सुमारें पंधरा वर्षांपासून. प्रः—कंपनींत भागीदार किती आहेत ? उ. भागीदार कोणी नाहींत. मी एकटाच आहे. प्र. कंपनी हें नांव आपण कां म्हणून धारण केलें ? उ. अशी वापरण्याची कांहीं ठिकाणीं वहिवाट आहे; आणि प्रसंगीं भागीदार केल्यास नांव बदलण्याचें कारण पडूं नये. प्र. तुमच्या कंपनींत भांडवल किती आहे ? उ. याचें उत्तर मीं देऊं शकत नाहीं. प्र. तुमच्या कंपनींत नोकर किती आहेत ? उ. मुंबईत प्लेग असल्यामुळें नोकर मंडळी गांवीं गेली आहे; हल्लीं कामावर सहा आहेत. प्र. येथें आल्यावर आपण कोणीं नवीन नोकर ठेवला आहे काय ? उ. होय. नवीन तीन नोकर ठेवले

अमर वाचनालय, सातारा


आहेत. प्र. तुमचा हेडक्लार्क कोण आहे ? उ. भास्करराव सहस्रबुद्धे. प्र. तुमच्या पश्चात् पत्र लिहिण्याचा आणि सही करण्याचा त्यास अधिकार आहे काय ? उ. होय. प्र. टिळकांचा आणि आपला कांहीं परिचय आहे काय ? उ. मला 'परिचय' या शब्दाचा अर्थ बरोबर समजत नाहीं; त्याचें स्पष्टिकरण करा. त्यांनीं याचा असा खुलासा केला कीं, तुम्ही त्यांच्या येथें त्यांची सल्लामसलत विचारण्यास जात असतां काय ? उ. मुळींच नाहीं. प्र. शिवाजीच्या चित्राचीं घड्याळें करण्याची कल्पना तुम्हांला कोणीं सुचविली ? उ. ही माझी स्वतःची कल्पना आहे; ती मला माझ्या व्यापारी धोरणानें सुचविली आहे. प्र. तुम्ही दुसऱ्यांच्या फोटोचीं घड्याळें करूं शकाल काय ? उ. होय; कोणच्या वस्तूचा खप अधिक होईल, हेंच व्यापाऱ्यांचें पाहणें असतें. प्र. तुमचीं शिवाजीच्या चित्राचीं घड्याळें किती खपतात ? उ. शेंकडों. प्र. संस्थानिकांकडून तुमचें कांहीं घेणें आहे काय ? उ. होय. प्र. त्यांच्याकडून तुमच्या रकमा किती दिवसांच्या आंत मिळत असतात ? उ. दोन तीन महिन्यांच्या आंत. प्र. हल्लीं तुमच्या संस्थानिकांकडून किती रकमा येणें आहेत ? उ. सुमारें पांच सहा हजार रुपये येणें आहेत. प्र. तुमचीं त्यांना पत्रें पाठवून रकमा मागविण्याची वहिवाट आहे काय ? उ. होय. प्र. सहा महिन्यांच्या पूर्वीची तुमची कोणा संस्थानिकाकडून रकम येण्याची राहिली आहे काय ? उ. होय. प्र. कोणत्या संस्थानिकाकडे ? उ. मोरवीचे ठाकूरसाहेब. प्र. त्यांना आपण एकंदर किती पत्रें लिहीलींत ? उ. सुमारें दहा बारा. प्र. पत्रांचीं उत्तरें आलींत काय ? उ. मुळींच नाहींत. प्र. तुह्मीं जीं पत्रें लिहितां त्यांची नकल ठेवतां काय ? उ. होय. प्र. तीं तुह्मी वाचतां किंवा नाहीं ? उ. आमचीं पत्रें ठराविक मजकुरांचीं असल्यामुळें तीं मीं कधीं कधीं वाचीतही नाहींत. प्र. तुह्मीं जशीं शिवाजीच्या चित्राचीं घड्याळें काढलीं आहेत; तशीं इतर राजांच्या चित्राचीं काढलीं आहेत काय ? उ. होय; ज्या राजांकडून मला मागणी आली आहे त्या राजांना त्यांच्या फोटोचीं घड्याळें करून पाठविलीं आहेत. प्र. मोरवीच्या ठाकुराला आपण जीं पत्रें पाठविलीं आहेत त्यांच्या नकला दाखवा. (त्याप्रमाणें दाखविल्या. ज्या पत्रांत '**चळवळ**' हा शब्द होता त्या शब्दाखालीं रेघ मारली ) हा शब्द आपल्या कारकुनानें कोणत्या हेतूनें लिहिला आहे त्याचें स्पष्टीकरण करून सांगा ? उ. मालाच्या विक्रीचे पैसे जितके लवकर येतील तितका व्यापार वाढविण्यास अधिक उत्तेजन येतें आणि माझ्या व्यापाराची चळवळ नवीन असल्यामुळें मीं ह्या दृष्टीनें चळवळ हा शब्द वापरला आहे. प्र. मोरवीकडील आपली रकम आली किंवा नाहीं ? उ. मुळींच आली नाहीं. प्र. मग आपण पुढें काय करणार ? उ. पोलिटीकल एजंटला कळवूं.

शेवटीं, त्यांनीं मला असें सांगितलें कीं, तुमच्यासंबंधानें पोलिसचा पूर्वी-

पासूनच रिपोर्ट चांगला आहे यासाठीं आपणास घाबरण्याचें मुळींच कारण नाहीं. आह्मीं रीतीप्रमाणें चौकशी केली आहे. तसदीची माफी असावी; आपण त्याबद्दल आपल्या मनाला कोणत्याही प्रकारें वाईट वाटूं देऊं नये.

---

# प्रकरण ७ वें.

## मृत्यूंची परंपरा, महायात्रा, प्रवास वगैरे.

—:०:—

**लग्न**—मी माझी भाची चि० सोनाबाई ( सौ. गंगाबाईची कन्या ) हिचें विठ्ठल दैमीवाळ मेस्त्री यांच्या दुसऱ्या मुलाबरोबर लग्न करून दिलें.

**अनामत**—ग्यानु कुदाळ या मृत मनुष्याचे दागिने पंचांनीं माझ्या स्वाधीन केले होते, यास पुत्रसंतान नव्हतें. हे दागिने त्यानें आपल्या वृद्ध मातोश्रीच्या चरितार्थ आणि तिच्या दिवसवाऱ्यासाठीं ठेविले होते. कांहीं मंडळी त्याच्या स्त्रीस अनुकूल होऊन दागिने मिळण्यासाठीं कोर्टांत पंचांवर फिर्याद केली; कोर्टानें चौकशीअंतीं खटला काढून टाकला; आणि ज्याच्या स्वाधीन दागिने आहेत, तो मनुष्य चांगला अब्रुदार आहे, असें ठरविलें. या दागिन्यांची पंचांचे मतानें व्यवस्था केली.

**वर्षश्राद्धः**—माझ्या वडिलाच्या वर्षश्राद्धानिमित्तानें पूर्वरात्रीं हरिकीर्तन करून दुसरे दिवशीं दान, धर्म, कर्म करून जातींतील एकंदर मंडळीस आणि इतर स्नेही व परिचित लोकांस पंचपक्वान्नाचें भोजन दिलें; या शिवाय साधु संतमंडळीस आणि महारोगी गृहांतील अनाथ व पंगू लोकांसही भोजन दिलें.

**प्लेगः**—पुण्यांत प्लेग वाढल्यामुळें आम्ही सर्व मंडळी स्टेशनाजवळील बंगल्यांत रहावयास गेलों.

**मृत्युः**—माझे धाकटे बंधु गोपाळराव यांस क्षयाच्या विकारानें सन १८९६ सालीं माघ वद्य एकादशीस देवाज्ञा झाली. त्यांस कांहीं पुत्रसंतति झाली नाहीं.

**मृत्युः**—माझी धाकटी बहीण चि. सौ. मंजुळाबाई ही सन १८९६ सालीं फाल्गुन शुद्ध पौर्णिमेचे दिवशीं प्लेगनें वारली, तिला तीन पुत्र व दोन कन्या झाल्या. त्या अज्ञानस्थितींत असल्यानें आणि त्यांचा सांभाळ करण्यास कोणी नसल्यामुळें मला त्यांचा सांभाळ करावा लागला. तिचा कनिष्ठ पुत्र गजानन हा सुमारें दीड वर्षाचा होता; त्याचा सांभाळ माझी धाकटी दुःखी भावजय म्हणजे गोपाळरावचें कुटुंब रखमाबाई हिनें केला. ही त्याची विशेष काळजी बाळगीत आहे.

मृत्युः—माझी पुतणी आणि वडील बंधु बाळरामजी यांची जेष्ठ कन्या चि. सौ. राधाबाई ही खडकीवाले चि. मारोती देवतवाळ यांस दिली होती; ती काल-न्यानें सन १८९६ सालीं वारली. तिला अनुसया या नांवाची एक कन्या झाली; ती चि. मानाजी बाळाराम तेलपुरे यांस दिली होती; ती मुलगी सन १९१४ सालीं एडन मुक्कामीं वारली; तिला एक मुलगा दत्ताराम या नांवाचा आहे.

मुत्युः—माझा भाचा आणि वडील बहीण देऊबाईचा मुलगा सखाराम हा प्लेगनें वारला.

पुत्रजन्मः—माझें द्वितीय कुटुंब सौ. जानका ही गरोदर असून पूर्णमास भरले होते; त्या सालीं पुण्यांत प्लेग विशेष जोरानें चालला होता, म्हणून आम्ही सर्व मंडळी विठ्ठलवाडींत राहण्यास गेलों; तेथें सन १८९७ सालीं विठ्ठल या नांवाच्या माझ्या मुलाचा जन्म झाला.

मृत्युः—माझा भाचा चि. मारोती, चि. मंजुळाबाईचा वडील मुलगा हा प्लेगनें वारला.

मृत्युः—माझी धाकटी बहीण चि. गंगाबाई ही प्लेगनें सन १८९७ सालीं गेली. तिचा मुलगा सोमनाथ हा आपल्या वयाच्या तेराव्या वर्षीं गेला. तिची कन्या चि. ममताबाई हिचा प्रथम विवाह रामलाल भाऊसाहेब बहिरे यांच्या बरोबर झाला; पण ते अकालीं वारल्यामुळें तिचा द्वितीय विवाह हरिभाऊ कृष्णाजी कुंडलवाळ सांगलीकर यांच्या बरोबर झाला.

मृत्युः—माझी वडील बहीण ती. देऊबाई यांना प्लेगनें सन १८९७ सालीं देवाज्ञा झाली. यांना एक चिरंजीव नाना भाऊ या नांवाचा आहे; यास सखाराम-भाऊ अनावडे यांच्या कन्या सरस्वती आणि भागीरथी दिल्या आहेत. त्यांस सखाराम ( रावसाहेब ) या नांवाचा एक मुलगा आहे.

मृत्युः—माझें दुसरें कुटुंब सौ. जानकी ही विषमज्वरानें सन १८९८ सालीं पौष मासीं वारली; तिला विठ्ठल या नांवाचा मुलगा झाला तो तिच्या मरणसमयीं होता. तिच्या दिवसाच्या दिवशीं जातींतील सर्व मंडळीस दहींपुरीचें जेवण दिलें.

मृत्युः—माझा विठ्ठल नांवाचा मुलगा आपल्या वयाच्या दुसऱ्या वर्षीं निमोनियाच्या विकारानें मरण पावला. हा आपल्या आईच्या मागें सुमारें चार महिन्यांनीं वैशाखमासीं गेला.

लग्नः–अहमदनगर जिल्ह्यांतील कोरेगांव येथील कोंडाजी जोनवाळ यांची कन्या कृष्णा हिच्याबरोबर माझें तिसरें लग्न पुणें मुक्कामीं सन १८९८ सालीं वैशाखमासीं झालें.

मृत्युः–माझें पाहिलें कुटुंब सौ. कोंडु हिची कन्या चि. सौ. अहिल्याबाई ही नुक्तीच वयांत आली होती; ती स्वभावानें चांगली होती. आणि तिच्यावर

उभयपक्षाकडील मंडळींचें अत्यंत प्रेम असे. तिला तिच्या सासुरवाडींतील आणि इतर आप्त मंडळी असा आग्रह करीत होती कीं, तुझे वडील आणि मामेसासरे श्री. काळुरामजी धवारे हे विठ्ठलवाडीस प्लेगसाठीं राहण्यास गेले आहेत; तेथें तूं राहण्यास जा; त्यावेळीं तिनें मंडळीस असें उत्तर दिलें कीं, " माझ्या सासूचे दिवस भरत आले आहेत; त्यामुळें मला कांहीं जातां येत नाहीं. " पुढें तिला प्लेग झाला, तिला विठ्ठलवाडीस आणलें, आणि एक दिवस राहून दुसऱ्या दिवशीं ( म्हणजे जुलै सन १८९८ मध्यें ) तिनें आपला देह ठेवला. या तिच्या अकालीं मरणामुळें आमच्यावर दुःखाचा डोंगर कोसळला. आमच्या मनाला जें दुःख झालें तें मला शब्दानें लिहून दाखवितां येत नाहीं. तिचें वय लहान होतें. पण ती मोठी विचारी होती. तिचा स्वभाव प्रेमळ व गोड असल्यामुळें ती सर्वांना प्रिय असे. अशा अल्पवयांत तिचा अंत झाला ह्मणून तिच्या परिचयांतील मंडळी हळ-हळत होती. या वेळीं विठ्ठलवाडींत आणि जवळच आसपास प्लेगमुळें लोकमान्य बाळ गंगाधर टिळक, डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख, शेट किसनदास माडीवाले, श्री. काळूराम भाऊ मनसाराम धवारे आणि इतर बरीच जातींतील आणि परजातींतील मंडळी राहण्यास आली होती.

**यात्राः**—या सद्गुणी कन्येच्या मृत्युमुळें आमच्या उभयतांच्या मनाची स्थिति अत्यंत उदासीन होऊन सर्व त्याग करावा. अशी मनाची वृत्ति झाली. मुलीच्या तिसरे दिवशीं आम्हीं उभयतां व भाचा चि. रामचंद्र यास बरोबर घेऊन निघालों; ते पुणतांबें, नाशिक, ओंकारमानदाता, चित्रकूट, विंध्याचल, पुनपुना, प्रयाग, गया, वगैरेकडील देवदर्शन व तीर्थविधि करीत करीत काशीस जाऊन पोहोंचलों. तेथें कायमचा वास करण्याच्या हेतूनें स्वतंत्र बिऱ्हाड केलें; आणि नित्य गंगास्नान करून देवदर्शन करून काळ काढीत होतों. पुण्यांतील आप्तवर्ग, स्नेही आणि माझ्या ऑफिसांतील मंडळीकडून मला तेथें वरचेवर पत्रें येत असत. ते मला असें लिहीत असत कीं, ' तुमच्या एकट्याच्या जिवावर पंधरावीस कुटुंबांचा निर्वाह होत आहे; आणि मातोश्रीचें सारें लक्ष तुमच्याकडे लागून राहिलें आहे; याचें श्रेय संपादन करण्यापेक्षां काशीवासाचें श्रेय अधिक नाहीं. आपण पदरीं पुण्य जोडण्याचें टाकून उलट पापाचे वांटेकरी मात्र होत आहांत; आणि हें आमचें ह्मणणें सत्य आहे किंवा असत्य आहे याचा निर्णय तेथील शास्त्रीमंडळीकडून करून आपल्या मनाची खात्री करून घ्यावी. पुणेकर मंडळीचा अत्यंत आग्रह पडल्यामुळें आणि काशींतील हितचिंतक मंडळीचेंहि असें मत पडलें कीं, या वयांत सर्व त्याग करून वैराग्य धारण करणें हें कांहीं योग्य दिसत नाहीं. पुढें कुटुंबाची प्रकृति अस्वस्थ दिसल्या-मुळें निरुपायास्तव कुटुंबास आणि भाच्यास पंचकोशीकरून पुण्यास रवाना केलें; आणि मी तेथें एकटाच राहिलों.

**सन्मानः**—घड्याळावरील दरभंग्याच्या महाराजांच्या फोटोचें काम उत्तम झाल्या-

बद्दल पत्रव्यवहार चालू होता; आणि त्यांच्या फोटोचीं कांहीं ड्राइंगरूम क्लॉक (दिवाणखान्यांत ठेवण्याचीं मोठीं घड्याळें ) तयार करून दिलीं होतीं; तीं त्यांना फार पसंत पडलीं. त्यासंबंधानें पुण्याहून मला अशी तार आली कीं, तुह्मांला दरभंग्याच्या महाराजांनीं बोलाविलें आहे; म्हणून मी दरभंग्यास निघून गेलों. तेथें त्यांनीं माझी व्यवस्था राजपाहुण्याप्रमाणें ठेविली होती. महाराज मला म्हणाले कीं, आपण हें काम अपूर्व केलें आहे, म्हणून आपणास दरबाराकडून पोषाखाबद्दल ११०० रुपये दिले आहेत. मीं ती रक्कम पुण्याच्या ऑफिसच्या पत्त्यावर पाठवून दिली. त्यांनीं मला पुण्यापासून दरभंग्याचें येण्याजाण्याचें सेकंडक्लासचें आगगाडीचें भाडें दिलें. राजाज्ञा घेऊन मी परत काशीस आलों. काशीच्या महाराजांकडून माझें व्यापारसंबंधीं कांहीं येणें होतें तें घेऊन, त्यांचाही निरोप घेऊन अयोध्या, मथुरा, गोकुळ, वृंदावन, गोवर्धन इकडील देवदर्शन घेत फिरत असतां उदेपूरच्या राण्याचें आपणास बोलावणें आलें आहे; यासाठीं आपण तिकडे जावें अशी पुण्याहून मला तार आली. त्याप्रमाणें मी तिकडे गेलों; तेथें त्यांनीं मला आपला राजपाहुणा या नात्यानें ठेवलें. तेथें रीतीप्रमाणें मला दरबाराकडून पोषाखाबद्दल रोख रुपये तीनशें मिळाले. मी जेव्हां राण्यांचा निरोप घेण्यास गेलों तेव्हां ते मला म्हणाले कीं, "आपण जर श्रीनाथद्वाराच्या अगदीं जवळ आला आहांत तर नाथद्वारचें श्रीनाथजी महाराजांचें दर्शन घेऊन जावें." मी उत्तर दिलें कीं, फार बरें आहे. त्याप्रमाणें संस्थानाकडून माझी जाण्यायेण्याची व्यवस्था झाल्यावर मी तिकडे निघून गेलो. माझी तेथेंहि राजपाहुण्याप्रमाणें उत्तम व्यवस्था ठेविली होती. श्री नाथजी महाराज हे कृष्णरूप भगवान आहेत. येथें वैष्णव मंडळी येत असते; त्यांत भाटे लोकांची मोठी गर्दी असते. येथें दिवसांतून अनेक भोग होत असतात. पुराणांतरीं वर्णन केलेल्या कृष्णलीलेप्रमाणें लीला दिसून येते. येथील सारी व्यवस्था राजवैभवाप्रमाणें ठेवली आहे. देवाचे रत्नजडित अलंकार विपुल आहेत. जामदारखान्यांत संपत्ति अगणित आहे. देवाचें उत्पन्नहि प्रचंड आहे. हें क्षेत्र मनोरम्य व अत्यंत प्रेक्षणीय आहे. मी येथें कांहीं दिवस मुक्काम करून श्री गोवर्धन महाराजांची आज्ञा घेण्यास निघालो; तेव्हां महाराजांनीं मला देवाचा प्रसाद म्हणून पाच पोषाख किंमत रुपये २५० चे देण्याकरितां माझ्यापुढें ठेवले; आणि संस्थान देवतेचे देवकारभारी मला असें म्हणाले कीं, 'हा पोषाख प्रसाद घ्या किंवा रोख रुपये अडीचशें घ्या,' मी त्यांना असें उत्तर दिलें कीं "मीं देवाला पंधरा रुपयांच्यावर कांहीं केलें नाहीं, असें असतां हा अडीचशें रुपयांचा पोषाख मी कसा घेऊं ?" देवकारभारी मला असें म्हणाले कीं, 'आपण राजाचे पाहुणे असल्यामुळें येथील नियमाप्रमाणें आपणांस हा मानाचा पोषाख घेतला पाहिजे. मी त्या प्रसादांतून एक प्रासादिक उपवस्त्र काढून घेतलें. आणि बाकीच्या पोषाखाबद्दल मला रोकड रकम द्या असें म्हटलें. मला त्यांच्याकडून २३५ रुपयांच्या

मोहरा मिळाल्या; त्या मी देवाच्या भांडारखान्यांत अर्पण केल्या आणि त्या माझ्या नांवानें जमा केल्या. पुढें तेथून मी परत उदेपुरास आलों. उदेपुरच्या राण्यांची आज्ञा घेऊन जयपूर, जोधपूर, अजमीर, रतलाम, आग्रा, दिल्ली, कुरुक्षेत्र, इंदूर, आलवार, ग्वालीयर, हरिद्वार, वगैरे ठिकाणीं प्रवास केला; त्या वेळीं हरिद्वारास अतिशय थंडी असल्यामुळें मला तेथें स्नान करण्याची इच्छा होईना. तेथील उपाध्ये मला असें म्हणाले कीं, " आपण इतके दूर येऊन तीर्थविधि न करतां आणि गंगेचें स्नान न करतां जाणें हें कांहीं बरोबर नाहीं. " मीं मोठ्या जुलमानें क्षौर केलें; पण स्नान करण्याची बिलकूल इच्छा होईना. उपाध्यानें मला आचमन करण्यासाठीं गंगेजवळ नेलें, इतक्यांत माझ्या माघून दोन ज्वान गडी आले आणि त्यांनीं मला एकदम उचलून गंगेंत तीन वेळां बुचकळून काढलें आणि तसेंच मला उचलून बाहेर आणलें. मला सर्व बाजूनीं धुण्या लावून ठेवलेल्या जागेमध्यें नेऊन बसविलें. त्यांनीं माझें अंग पुसलें. कोरडें वस्त्र नेसविलें. मला त्यावेळीं बिलकूल शुद्ध नव्हती. त्यांनीं माझ्या अंगावर ऊबदार वस्त्रें पांघरून मला बिऱ्हाडीं आणून पोंहचविलें; तेथें आल्यावर मी लवकरच शुद्धविर आलों. रीतीप्रमाणें श्राद्ध वगैरे केलें. तेथें माझा श्री बद्रिनारायण आणि गंगोत्री येथें जाण्याचा निश्चय झाला. त्यावेळीं जिकडे तिकडे बर्फ पडत असल्यामुळें देवळाचे दरवाजे बंद असतात त्यामुळें आणि त्यावेळीं तिकडील यात्रा करणारी मंडळी नसल्यामुळें मला माझा तिकडे जाण्याचा बेत रहित करावा लागला.

पुणेंकर मंडळीनें प्रवास आटोपून लवकर घरीं या असा तगादा लावल्यामुळें मला घराचा रस्ता धरावा लागला. मी हरिद्वाराहून माझे काशींतील अडते सदाशिव हरी सोहनी यांस लिहून कळविलें कीं, अर्धा शेर गंगा राहील अशा बेताच्या लोट्या चारशें खरेदी करून, त्यांच्यावर श्रीशंकराचें चित्र खोदून, त्यांत प्रयागची गंगा भरून तोंडें बंद करून त्या लोट्या माझ्या पुण्याच्या पत्त्यावर रवाना कराव्या; त्याप्रमाणें त्यांनीं रवाना केल्या. मी हरिद्वाराहून पुण्यास येऊन दाखल झालों. गंगापूजन करून देवब्राह्मण घातले; आणि त्या लोट्या जातीच्या व स्नेही मंडळीच्या घरीं प्रसाद म्हणून वांटल्या. हा माझा प्रवास पांच सहा महिन्यांचा झाला.

मुंबईः—मी सन १९०७ सालीं पुण्याहून एक कारकून आणि एक शिपाई बरोबर घेऊन मुंबईस आलों. ज्या खोलीमध्यें सामान ठेविलें होतें ती खोली उघडली; त्या वेळीं बरेंच नुकसान झाल्याचें दिसून आलें. सुमारें चार हजार रुपये किंमतीचे मालाची खराबी झाली. तदनंतर मीं ठाकुरद्वारजवळ दसरी सालिसिटर यांच्या घरांत एक प्रशस्त जागा दरमहा ३० रुपये भाड्यानें घेतली; आणि तेथें ऑफिस उघडलें. पुण्यांतील ऑफिस बंद केलें आणि तें मुंबईस आणलें. आणखी घरच्या मंडळीसही मुंबईस बोलावून घेतलें. व्यापारास कोणती तरी नवीन चलनशक्ति दिली पाहिजे याचा मी विचार करूं लागलों. मला वाचण्याचा मोठा नाद




Mr. G. B. Naik's Office Establishment.

The Bombay Art Printing Works, Fort,

असल्यामुळें माझ्याकडे युरोपांतील अनेक व्यापारविषयक पुस्तकें आणि मासिक पुस्तकें येत असत. एका मासिकांत कुपनासिस्टिमची जाहिरात माझ्या अवलोकनांत आली.

**कुपनसिस्टीम** ह्मणजे प्रथम तीन रुपये दोन आणे भरून एक **सर्टिफिकेट** ( दाखला ) चार कुपनसह विकत घ्यावें. तीं चार कुपनें सर्टिफिकेट विकत घेणाऱ्यानें प्रत्येकीं दहा दहा आणेप्रमाणें विकावीत. अशा रीतीनें सर्टिफिकेट विकत घेणारानें आपले अडीच रुपये वसूल करून घ्यावे. ज्यांनीं तीं कुपनें विकत घेतलीं असतील त्या कुपनावर आपलें नांव लिहून प्रत्येकानें आपलें कुपन आमच्या कंपनीकडे पाठवून आणि त्याच्याबरोबर अडीच रुपये पाठवून सर्टिफिकेट विकत घ्यावें. ते अडीच रुपये ज्यानें पाहिल्यानें सर्टिकिकेट घेतलें असेल त्याचे नांवें जमा करून सर्टिफिकेट द्यावयाचें. अशीं चार कुपनें दहा रुपये किमतीचीं आलीं ह्मणजे ज्यानें पहिल्यानें सर्टिफिकेट घेतलें असेल त्याला ज्या घड्याळाची विक्रीची किंमत पंधरा रुपये आहे असें निकल वॉच, किंवा चांदीचें वॉच किंवा क्लॉक फुकट द्यावयाचें. यामुळें गिऱ्हाइकाला फुकट वॉच मिळून मला व्यापारी भावाप्रमाणें प्रत्येक नगाच्या पाठीमागें आठ आण्यांपासून एक रुपयापर्यंत नफा मिळत असे.

ही नवीन व्यापारी टूम सन १८९८ सालीं काढल्यामुळें ती सोडत किंवा लाटरीच्या कायद्याच्या कलमाखालीं येऊं नये किंवा समजली जाऊं नये, म्हणून मीं या **स्कीम** ( युक्ती ) ची एकंदर रचना लिहून ती मुंबई सरकारकडे पाठविली; आणि याप्रमाणें मला व्यापार कर्तव्य आहे; यांत लोकांचें कोणत्याहि प्रकारचें नुकसान अथवा फसवेगिरीचा धंदा नसल्यास सरकारानें मला अशा तऱ्हेनें व्यापार करण्याची परवानगी द्यावी असा सरकारास अर्ज केला. एक महिना लोटला; तरी उत्तर नाहीं; म्हणून स्मरणार्थ दुसरें पत्र पाठविलें; त्याचें उत्तर असें आलें कीं, तुमचें प्रकरण आम्हीं हिंदुस्थानसरकाराकडे पाठविलें आहे आणि तेथून तें विलायतेस गेलें आहे. त्यांच्याकडील उत्तराची वाट मीं तीन महिनेपर्यंत पाहिली; तरी उत्तर नाही. शेवटीं मी ही सिस्टीम सुरू केली.

हा नवीन कुपन सिस्टीमचा व्यापार फारच मोठ्या प्रमाणावर सुरू झाला. मुंबईतील कुपन व सर्टिफिकेट घेणारांची ऑफिसमध्यें अतिशय गर्दी होऊं लागली. पत्रें, रजिस्टर्ड पत्रें, मनी आर्डरी यांची ऑफिसांत मनस्वी गर्दी उडाली; ती इतकी कीं, रोजचा त्यांचा आंकडा दोनशेंपर्यंत जाऊन पोहोंचला; त्यामुळें अर्थातच मला ऑफिसमध्यें काम करणाऱ्या लोकांची संख्या वाढवावी लागली; त्या वेळीं युरोपियन, ख्रिश्चन, पार्शी आणि हिंदु असे आठ कारकून, दोन वॉच रिपेरर, चार शिपाई, चार हमाल, दोन रखवालदार आणि एक सुतार मला अधिक ठेवावा लागला; तथापि काम वेळेवर आटपत नसे; पोस्टखात्यावरहि माझ्या कामाचा मनस्वी बोजा पडला. हें माझें जंगी प्रमाणावरील काम जेव्हां पोस्टाच्या नजरेस आलें तेव्हां त्यांना

माझ्या कंपनीस स्वतंत्र पोस्ट ऑफिस करून द्यावें लागलें; त्याप्रमाणें आमच्या येथें असें लिहून आलें कीं, तुम्ही जें पोष्टाचें नांव सांगाल त्या नांवाचें पोष्ट ऑफिस तुमच्या सोईकरितां तुमच्या ऑफिसजवळ उघडण्यासंबंधानें सरकारची परवानगी आली आहे. त्याप्रमाणें एकंदर मंडळीचा असा विचार झाला कीं, नाईक या नांवाचें पोष्ट आफिस असावें; पण हा त्यांचा विचार मला कांहीं पसंत पडला नाहीं. मीं ठाकुरद्वार पोष्ट ऑफिस असें नांव सुचविलें; आणि त्याप्रमाणें त्या नांवाचें पोष्ट ऑफिस माझ्या ऑफिसाच्या नजीकच शंभर कदमांवर उघडलें; तें अद्याप कायम आहे. माझ्या ऑफिसमध्यें रोजची ५०० । ६०० रुपयांची घडामोड होत असे; असें सुमारें दोन वर्षें चाललें होतें. सदरहू स्कीम मीं रजिस्टर न केल्यामुळें ती इतर व्यापाऱ्यांनीं आपल्या दुसऱ्या मालावर सुरू केली; आणि त्यामुळें जरी माझ्या स्कीमचें महत्त्व कमी होत चाललें; तरी लोकांनीं ३०,००० सर्टिफिकिटें विकत घेतलीं आणि १,२०,००० लोकांनीं कुपनें विकत घेतलीं. वॉचेस, क्लॉक, वगैरे यांचा खप सुमारें ३०,००० पर्यंत झाला. या कुपन सिस्टिममुळें कंपनी विशेष प्रसिद्धीस आली. या सिस्टिमनें ३००००० लक्ष रुपये किमतीची घड्याळांची विक्री झाली; पुढें व्यापार मंदावत चालल्यामुळें मला ऑफिसांत ठेवलेली मंडळी कमी करावी लागली.

**मृत्यु.**:– मुंबईत सन १९०० सालीं प्लेग सुरूं झाला म्हणून मी चौपाटीवर राहण्यास गेलों; आणि तेथून मी रोज ऑफिसांत वेळेवर येत असें. माझी पुतणी वडील बंधूंची कन्या चि. हिराबाई ही श्री. काळुराम भाऊ मनसाराम धवारे यांचे चुलत बंधु पाडुरंग किसन नाईक यांस देण्याचें ठरलें, तीथिनिश्चय झाला, आणि मला लिहून आलें कीं, लग्ननिश्चय ठरला आहे, एतदर्थ आपण सर्वत्र मंडळीसह येऊन कार्यसिद्धि करावी. त्याप्रमाणें मी आपलें तिसरें कुटुंब सौ. कृष्णा हीस पुण्यास पाठवून दिलें; आणि लग्नाच्या तयारीस सुरवात केली. माझें कुटुंब तेथें गेल्यावर तिला ताप आला. त्यावेळीं पुण्यास प्लेग नव्हता; त्यामुळें हा दगदगीचा किंवा हवापालट झाल्याचा ताप असावा असें वाटलें. पण मला तिसऱ्या दिवशीं अशी तार आली कीं, ती प्लेगनें आजारी आहे. मी आणि माझें पहिलें कुटुंब पुण्यास निघून गेलों. त्याच्या दुसऱ्या दिवशीं नवरी मुलीस हळद लावण्याचा दिवस नेमला होता. सहा डॉक्टरांची कमिटी नेमली होती; त्या सर्वांचें असें मत पडलें कीं, ही बरी होईल, भीती बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. ही लग्नांत कांहीं घोंटाळा करणार नाहीं. तुह्मीं बेलाशक मुलीस हळद लावा. मीं माझ्या स्त्रीला विचारलें तेव्हां तिनेंहि हुशारी दाखविली; " मी बरी होईन, भिण्याचें मुळींच कारण नाहीं." त्याप्रमाणें तिनें स्वतः आपल्या हातानें नवरी मुलीस हळद लावली. लग्नसमारंभास सुरवात झाली. हळद लावल्यावर ती दोन दिवस बरी होती, पण तिसरे दिवशीं दुःखणें उलटलें आणि एकदम ताप सडकून चढला; आणखी ती स्वस्थ पडून राहिली. नंतर पंधरा मिनिटांनीं जागी.झाली; त्यावेळीं तिला असें स्वप्न पडलें

कीं, " तिला देवाजवळ घेऊन गेले होते; परंतु देव तिला असें बोलले कीं, तूं बाबुलनाथची सेवा एकनिष्ठपणें केलीस; म्हणून यापुढें तूं आपल्या नवऱ्याची सेवा आणखी तीन वर्षें कर. परंतु ही गोष्ट तूं कोणाला कळवूं नकोस; जर कळवशील तर तुला तात्काळ मरण येईल." मी तिला विचारलें कीं ' तुला झोंप लागली होती काय ? " तिनें उत्तर दिलें कीं, ' आपण मला विचारूं नये; आणि मी तुह्माला सांगू नये." मीं म्हटलें, " मर्जी तुझी." नंतर मी आपल्या उद्योगास निघून गेलों. तदनंतर एका तासानें तिनें मला बोलावणें पाठविलें; त्याप्रमाणें मी गेलों. ती मला म्हणाली, " मला आपली अशी आज्ञा आहे कीं, कधींही खोटें बोलूं नये; यास्तव झालेला खरा प्रकार मी आपणाजवळ निवेदन करतें. मला स्वप्न पडलें किंवा भास झाला, किंवा काय झालें तें माझें मलाच समजत नाहीं; कारण स्वप्नांतील गोष्टी कांहीं खऱ्या नसतात. आपण माझ्या आईबापांना मजजवळ बोलवा म्हणजे त्यांच्या समक्ष सांगतें." त्याप्रमाणें तिच्या आईबापांना बोलावलें, त्यावेळीं तिच्या जवळ माझें थोरलें कुटुंबहि बसलें होतें. नंतर तिनें वरील स्वप्नांतील हकिगत कळविली; ती संपते न संपते तोंच ती म्हणाली, ' पहा ही माझ्या पुढें अक्राळविक्राळ रूप धारण करून मंडळी उभी आहेत, आणि तीं मला रागें भरतात कीं, ' तूं त्यांना हें कां सांगितलेंस ? आणि हें पहा, त्यांनीं माझ्या पुढें मडकें फोडलें.' हे शेवटचे शब्द तिच्या मुखांतून निघते वेळीं ती फारच घाबरली; आणि पुढें अर्ध्या तासाचे आंतच तिनें आपला प्राण सोडला ! प्राण सोडण्यापूर्वीं तिनें ब्राह्मणाकडून लघुरुद्र करवून, आपल्या हातानें दक्षणा देऊन सर्व ब्राह्मणांस नमस्कार केला. तिच्या मृत्यूमुळें उभारलेल्या लग्नाची हळद धुवून काढावी लागली. दोन्ही पक्षांकडील नुकसान बरेंच झालें.

**युवराजलग्नः**—सन १९०० सालीं ह्मैसूरचे हल्लींचे महाराज यांच्या वडिलांच्या कारकिर्दींत त्यांचा माझ्या कंपनीस चांगला आश्रय होता; त्यामुळें हल्लींचे श्री. कृष्णराज वडियार बहादुर महाराजांचें जेव्हां लग्न निघालें तेव्हां त्यांनीं मला त्या लग्नाचें आमंत्रण पाठविलें; त्याप्रमाणें मी माजी महाराजांच्या फोटोचीं तीन मोठीं घड्याळें आणि हल्लींच्या महाराजांच्या फोटोचीं दोन सोन्याचीं घड्याळें घेऊन माझे धाकटे बंधु चि. तुळशीराम यांस ह्मैसुरास पाठविलें; आणि या वस्तूंचा महाराजांला नजराणा केला. महाराजांनीं माझा नजराणा पसंत केला; पण परराज्यांतील लोकांचा नजराणा स्वीकारण्याची आमची कांहीं वहिवाट नाहीं यास्तव आम्हांला त्या वस्तु आमच्या नजराण खात्यांत जमा करतां येत नाहींत; असें सांगून मला त्यांची किंमत दिली आणि पोषाख देऊन माझ्या बंधूंची योग्य संभावना केली. ही हकिकत तिकडील ' स्टँडर्ड ' या नांवाच्या इंग्रजी वर्तमानपत्रांत सविस्तर प्रसिद्ध झाली आहे.

**जन्मः**—माझे कनिष्ट बंधु तुळशीराम यांचा दुसरा मुलगा पुरुषोत्तम याचा

जन्म ता. १२ आक्टोबर सन १८९८ आणि तिसरा मुलगा हरिभाऊ याचा जन्म सन १९०१ मध्यें झाला. यांच्या जेष्ठ व कनिष्ठ पुत्रांचा जन्म याच पुस्तकांत आठव्या पानावर दिला आहे.

लग्नः—सोलापुर जिल्ह्यांतील भगवंताची बार्शी येथील उदेरामजी बनावडे यांची कन्या चि. संताबाई ही माझ्या धाकट्या बंधूनें मजकरितां वधू पाहून ठेविली होती; आणि त्याप्रमाणें मला कळविलें. मी पुण्यास जाऊन बरोबर कै. बंधु गोपाळराव यांचें कुटुंब रखमाबाई आणि भाची ममताबाई वगैरे मंडळी यांना बरोबर घेऊन बार्शीस जाण्यास निघालों. ज्या डब्यामध्यें मी बसलों होतों त्याच डब्यांत माझ्या शेजारीं **श्री गोंदवलेकर** महाराज हे येऊन बसले. प्रथम मीं कांहीं त्यांना ओळखलें नाहीं. त्यांना पोहचविण्याकरितां त्यांची बरीच शिष्यमंडळी स्टेशनावर आली होती; ती त्यांच्या पायां पडून त्यांची आज्ञा घेत होती. पुढें मला चौकशीअंतीं जेव्हां बुवांचें नांव समजलें, तेव्हां मी गाडी चालली असतां उभा राहिलों, आणि नमस्कार करून म्हणालों कीं, " महाराज मी अज्ञान असल्यामुळें आपणांस ओळखलें नाहीं; हा मजकडून मोठाच प्रमाद झाला आहे. त्याची आपण मला क्षमा करावी. " त्या समयीं ते म्हणाले, " तुह्मीं लग्नाला जात आहांत, ती वधू आपण अवश्य करावी. तिची प्रकृति बरोबर नसल्यामुळें ती जरी आपणांस पसंत पडणार नाहीं तथापि आपण तिचेंच पाणिग्रहण करावें; कारण ती आपणांस लाभल्यास तिच्या हस्तें दोन तीन देवालयाचीं कामें होणार आहेत. " महाराज पंढरपुरास जाण्याकारितां कुरडूच्या वाडीच्या स्टेशनावर उतरले, आणि आम्हीही त्याच स्टेशनावर उतरून बार्शीच्या गाडींत जाऊन बसलों. माझ्या आगाऊ सुचनेप्रमाणें मला स्टेशनावर घेण्यास तेथील शिष्ट मंडळीपैकीं, गणपतराव काशीरामजी खीरनीवाळ व इतर कांहीं मंडळी आली होती. त्यांच्या बरोबर मीं घरीं गेलों; आणि त्यांना विचारलें कीं, " आमच्याकरितां स्वतंत्र बिऱ्हाड पाहिलें आहे, तें कोठें आहे ? " त्यांनीं उत्तर दिलें कीं, आम्ही त्याची अगोदरच व्यवस्था करून ठेवली आहे; आपण बेफिकीर असा. आम्ही त्यांचे घरीं भोजन करून आमच्याकरितां त्यांनीं आपल्या शेजारींच एक स्वतंत्र वाडा पाहिला होता त्या वाड्यांत जाऊन राहिलों. कोणावरहि दोष किंवा शब्द येऊं नये, यासाठीं वधू माझ्या साहजिकच दृष्टीस पडावी अशी व्यवस्था केली. मी आणि माझ्या घरच्या मंडळीनें तिला पाहिलें. तिला पाहून माझी घरची मंडळी नाराज झाली; आणि माझेंहि मन खट्टू झालें. हें वधूकडील मंडळीच्या लक्षांत आलें. आतां माझ्या पुढें अति बिकट विचाराचा प्रश्न येऊन पडला; तो असाः—आपण येथें लग्नाच्या तयारीनें आलों, हें वर्तमान सर्वांना विदित झालें आहे. श्री. गोंदवलेकर महाराज यांची सुचनाहि माझ्या नजरेसमोर होती. त्या गांवांत दुसरी उपवर मुलगी नव्हती, या सर्व गोष्टींचा विचार करून मी हळद मोठ्या

निरुपायानें लावली; आणि लग्न सन १९०१ सालीं उरकून घेतलें; कारण पुढील तीथीस माझी पुतणी, वडीलबंधूची कन्या चि. हिराबाई हिच्या लग्नाचा निश्चय किसन मनसाराम नाईक धवारे यांचे चि. पांडुरंगजी यांच्या बरोबर ठरला होता. मी आपली नवीन वधू, तिची धाकटी बहीण सुंदराबाई आणि लग्नास आपल्या बरोबर आणलेल्या आप्तवर्गासह श्रीक्षेत्र पंढरपूर येथें जाऊन **श्रीपांडुरंगांचें** दर्शन घेऊन घाईनें निघून आलों. पुतणीच्या लग्नाची सर्व तयारी माझे वडील बंधु आणि धाकटे बंधूनीं करून हें शुभ कार्य रीतीप्रमाणें निर्विघ्नपणें पार पडलें. हल्लीं माझ्या या पुतणीस तीन पुत्र आणि दोन कन्या आहेत. जांवईबुवा हे पुण्यांतील एक सुखवस्तु गृहस्थ आहेत. वडिलोपार्जित इस्टेट चांगली आहे. हे सुशिक्षित असून नुक्तेच पुणें सिटी म्युनिसिपालिटींत लोकनियुक्त कौन्सिलर झाले आहेत.

**औरंगाबादः**—ता.२६ सप्टेंबर सन १९०२सालीं मी, माझे बंधु तुळशीराम, त्यांचे शालक किसन तुकाराम कारवयाळ, पुतण्या लक्ष्मणराव, एक कारकून आणि एक शिपाई इतक्या मंडळीसह औरंगाबादेस माझ्या जातीचा बराच मोठा समाज असल्यामुळें त्यांच्या भेटीचा लाभ घेण्यासाठीं निघालों. निघण्यापूर्वीं रा. शितलजी भाऊ देवतवाळ कंट्राक्टर यांस मीं तार केली होती; त्याप्रमाणें ते जातींतील प्रमुख मंडळी, चौधरी आणि स्नेही माझें आदरपूर्वक स्वागत करण्यासाठीं आले होते. जातीचा आणि स्नेही मंडळीचा असा आग्रह पडला कीं, आमच्या घरीं उतरावें. मीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, " मी येथें आपल्याच दर्शनाकरितां आलों आहें. यासाठीं मला राहण्याकरितां आपण एखादा स्वतंत्र बंगला चारपांच दिवसांकरितां पहा. " मीं त्यांचा प्रेमपूर्वक निरोप घेऊन प्रोफेसर काळे हे मजकरितां स्टेशनावर आले होते, त्यांनीं मला आपल्या गाडींत बसवून आपल्या घरीं नेलें. त्यांनीं आमची राहण्याची आणि जेवणाची व्यवस्था उत्तम ठेविली होती. तिसरे प्रहरीं माझी जातीची चौधरी वगैरे प्रमुख मंडळी मला येथें भेटण्यास आली. माझ्या वडील बंधूंचे तिसरे संबधी श्वशुर आणि शालक यांचा असा आग्रह पडला कीं, आपण सर्वच मंडळी आमच्या घरीं चलावी. मीं त्यांना स्पष्ट कळविलें कीं, मला स्वतंत्रपणें राहणें आवडतें; याचें कोणास वाईट वाटूं देऊं नये; त्याप्रमाणें त्यांनीं बंगलावजा स्वतंत्र घर पाहून ठेवलें होतें, तें आमची मंडळी पाहून आल्यावर मीं प्रोफेसर साहेबांची परवानगी घेऊन तेथें राहण्यास गेलों. या गांवीं आमच्या जातीचीं सव्वादोनशें घरें होतीं; आणि पांच सहाशें मंडळीचा जमाव होता. मीं रा. काशीराम रामाजी देवतवाळ आणि चौधरी मंडळीस अशी विनंति केली कीं, " मला एकंदर जातगंगेचें दर्शन घेण्याची इच्छा आहे. आणि त्यांच्या पंक्तीचाहि लाभ करून घ्यावा; म्हणून भाजीभाकर करण्याचा माझा विचार आहे; यासंबंधानें आपलें मत काय आहे तें आपण मला सांगा. " हा माझा विचार त्यांना पसंत पडला. मीं त्यांना आणखीं अशी विनंति केली कीं, " आपण सर्व व्यवस्था करा. मला येथील कांहींच

माहिती नाहीं. " खर्चासाठीं मीं त्यांच्या स्वाधीन पांचशें रुपये केले. त्यांनीं मिष्टान्नाच्या दोन मेजवान्या जातीस होतील अशा बेतानें तयारी केली. भोजनाच्या पूर्वरात्रीं त्यांनीं हरिकीर्तन केलें. ठरल्याप्रमाणें त्यांनीं माझ्या खर्चानें दोन जेवणें केलीं. मला तेथील माझ्या एकंदर जातगंगेचें दर्शन घडल्यामुळें मोठा संतोष झाला. मीं मंडळीच्या परिश्रमाबद्दल त्यांचे प्रेमपूर्वक आभार मानले. तेथील चौधरी मंडळीस शेला पागोटें दिलें, उपाध्यास शालजोडी दिली, भाट व न्हावी यांना चांदीचीं कडीं दिलीं, न्हावीणीस लुगडें दिलें. तेथील जातीपंचांनीं मला एक मेजवानी केली, त्याप्रसंगीं पंचांकडून मला शाल व पागोटें मिळालें; आणि माझ्या बरोबरीच्या मंडळीस शेले पागोटीं दिलीं. माझ्या इतर स्नेही मंडळीकडूनहि मला अनेक मेजवान्या झाल्या. या गांवीं माझा सुमारें आठ दहा दिवस मुक्काम होता, त्या वेळांत मीं तेथील सर्व जुनीं प्रेक्षणीय स्थळें पाहून घेतलीं. माझी तेथील जातीची मंडळी मोठी प्रेमळ होती; त्यांचा मीं निरोप घेऊन निघालों. मला पोहोंचविण्यास बहुतेक मंडळी आली होती. त्यांचा तो प्रेम पाहून मला मोठा गहिंवर आला.

**दौलताबाद**:—औरंगाबादेहून निघून मी दौलताबादेस आलों. येथील जुन्या काळच्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्यांचा मी लौकिक ऐकून होतों; त्याप्रमाणें ते किल्ले वर्णनीय आणि प्रेक्षणीय आहेत; त्या किल्ल्यांत **श्री. जनार्दनस्वामी**ची समाध आहे; त्या समाधीच्या दर्शनास भाविक जन पुष्कळ येत असतात. त्या समाधीचें मीं भक्तिपूर्वक दर्शन घेतलें.

**वेरूळ**:—दौलताबादेहून मी वेरुळास गेलों. तेथलि **श्री. घृष्णेश्वर** ज्योतिर्लिंगाला लघुरुद्र, महापूजा व ब्राह्मणभोजन घातलें. नंतर मी तेथील जगप्रसिद्ध कोरींव लेणीं पाहण्यास गेलों. तीं खरोखरच पाहण्यासारखीं आहेत. तेथील रंग आणि कारागिराच्या चातुर्याची जितकी प्रशंसा करावी तितकी ती थोडीच होणार आहे. इतकें त्यांचें कौशल्य अप्रतिम व अवर्णनीय आहे. वेरुळास जातेसमयीं मध्यें लहान लहान गांवें लागतात. तेथील पिरांचे दरगे व मशिदी पाहण्यासारख्या आहेत. माझा मुक्काम वेरुळास तीन दिवस होता.

**बेलापुर**:—मी वेरुळाहून जो निघालों तो नगर जिल्ह्यांतील बेलापूर गांवीं आलों; तेथें आमच्या भाऊबंदांपैकीं गणपतराव केशवराव बैताडे हे राहत आहेत. त्यांच्या घरीं मी जाऊन उतरलों. मीं त्यांना विचारलें कीं, " आपल्या गांवांत लग्नकार्य झाल्यास आपल्या जातीची किती मंडळी जमत असते ? " त्यांनीं उत्तर दिलें कीं, " आजूबाजूंच्या खेड्यांतील मंडळी धरून सुमारें शें सव्वाशें जमते. " मीं म्हटलें, " मला त्यांची भेट घेण्याची फार इच्छा आहे. याकरितां आपण उदईक आपल्या घरीं भंडाऱ्याचा बेत करा, आणि सर्वत्र मंडळीस आमंत्रण द्या." त्याप्रमाणें त्यांनीं माझ्या खर्चानें जातीच्या सर्व लोकांस भंडारा करून मिष्टान्न भोजन दिलें. तेथील

माझ्या जातीचा समाज पाहून मनाला मोठें समाधान वाटलें. मी तेथील देवदर्शन करून पुण्यास निघून आलों आणि तेथून पुढें मुंबईस येऊन पोंचलों.

**श्री अक्कलकोटचे स्वामी यांचा साक्षात्कार.** मीं सन १८९३ सालीं माझें पहिलें कुटुंब सौ. कोंडु, दुसरें कुटुंब सौ. जानका, कन्या चि. सौ. अहिल्याबाई, पुतण्या चि. दत्तू व भय्या इतकी मंडळी बरोबर घेऊन पुण्याहून श्रीक्षेत्र गाणगापूर येथें जाण्यास निघालों. त्यावेळीं दत्तू हा जरी ज्वरानें थोडासा आजारी होता, तथापि मी मुलांलेंकरांचा विशेष भुकेला असल्यामुळें तशा स्थितींत मीं त्यालाहि आपल्या बरोबर घेतलें आणि त्यासहि त्यावेळीं आमचा विशेष लळा असल्यामुळें तोहि आमच्या बरोबर येण्यास मोठ्या आनंदानें निघाला. आगगाडींत त्याचा ताप अधिक वाढत चालला. गाणगापूर रोड स्टेशन-वर उतरल्यावर तेथें तर तो बेशुद्ध पडला. ती वेळ रात्रीची होती, राहण्याची गैर-सोय, वगैरे अनेक कारणांमुळें आमच्या मनांत अनेक प्रकारचे भलभलते विपरीत नानाकुतर्क येऊन मनाची मोठी उदासवाणी स्थिति झाली. पहांटेस तीन वाज-ण्याच्या सुमारास इतर सर्व यात्रेकरूंनीं गाणगापुरास जाण्यास बैलगाड्या जोडल्या. आह्मीं असा विचार केला कीं, याला गाणगापुरास नेऊन श्री गुरूंच्या चरणीं ठेवावा; मग जें होईल तें होवो. आतां श्री गुरूंचा धांवा करण्यापलीकडे अन्य उपाय नाहीं. आम्हीहि गाड्या जोडून निघालों. गाणगापूरच्या शिवेंत पोहचतां-क्षणींच त्यास आराम पडत चालला; आणि गांवांत गेल्याबरोबर त्याचा ताप कमी होऊन सर्व मंडळीनें श्रीगुरुमहाराजांचें दर्शन मोठ्या भक्तिभावपूर्वक घेतलें. त्या समयीं आह्मांस जो आनंद झाला तो वर्णन करतां येत नाहीं, इतका तो मोठा होता. आह्मी तेथें तीन दिवस मुक्काम करून यथाशक्ति देवास नैवद्य व ब्राह्मण भोजन घालून देवाचा निरोप घेऊन निघालों. आह्मांला श्री अक्कलकोटच्या स्वामी-महाराजांच्या समाधीचें दर्शन घ्यावयाचें होतें म्हणून आम्ही कडवगांवीं उतरलों. रा. रा. रामचंद्रजी नारायणजी माळवाल सातारकर स्टेट ओव्हरसिअर, अक्कलकोट यांना पूर्वींच तार केल्यावरून त्यांनीं आमच्यासाठीं स्टेशनावर संस्थानची दोन घोड्याची गाडी तयार ठेवली होती, त्यांत आह्मी सर्व मंडळी बसून त्यांच्या घरीं जाऊन उतरलों. त्यांनीं आमची व्यवस्था उत्तम ठेवली होती. पहिल्या दिवशीं समाधिचें आणि पादुकांचें दर्शन घेतलें. दुसऱ्या दिवशीं सर्व मंडळीसह दर्शनास गेलों. इच्छा पुत्रफलप्राप्तीची; म्हणून आम्ही उभयतां वांच्छित इच्छा सफल व्हावी अशी प्रार्थना करीत होतों; त्या समयीं माझ्या पाठीमागें एक भव्य, उंच, सुंदर व सदृढ भगवी वस्त्रें परिधान केलेला तेजःपुंज संन्याशी बरोबर एक शिष्य असा अवचित येऊन उभा राहिला. त्याला पाहून मी आणि माझी मंडळी तर घाबरलींच. नंतर आह्मी बाजूला होऊन स्वामींच्या समाधिकडे ध्यान लावलें, तों त्या संन्याशानें मला मोठ्या रागानें जवळ बोलाविलें; मी त्यांच्या चरणावर मस्तक ठेवून शिर-

साष्टांग नमस्कार केला. तसाच सर्वत्र मंडळीनेंहि केला. त्या संन्याशानें आपल्या शिष्याच्या झोळींतून खडीसाखर काढून ती मला आपला प्रसाद म्हणून दिली; आणि बोलला कीं, "श्री गुरूंच्या कृपेनें तुला पुत्रलाभ होईल." इतक्यांत स्वामिमहाराजांचे पुजारी मोठ्या लगबगीनें बाहेर येऊन त्यांनीं त्या संन्याशास शिरसाष्टांग नमस्कार करून प्रार्थना केली कीं, "महाराज, श्री स्वामीमहाराजांच्या समाधीची जागा वगैरे पाहवी." संन्याशानें उत्तर दिलें कीं, 'मी सर्व जाणत आहें.' पुजारी त्या संन्याशास प्रसाद देण्याकरितां गाभाऱ्यांत नारळ आणण्याकरितां गेला असतां इकडे असा चमत्कार झाला कीं, तो संन्याशी गुप्त झाला. आम्ही त्याच्या शोधास लागलों; इतक्यांत पुजारीही नारळ घेऊन आला आणि आह्मांला विचारलें कीं, "महाराज, कोठें गेले ?" आम्ही म्हणालों कीं, "आह्मांला कांहीं माहिती नाहीं; आम्हीं त्यांच्याच शोधांत आहोंत." हें आमचें उत्तर ऐकून पुजारी एकदम स्तब्ध झाला; आणि त्यानें आह्मांस असें सांगितलें कीं, "धन्य आहे तुमची ! स्वामीमहाराज आपल्या भक्तजनांस कोणत्याहि रूपानें दर्शन देत असतास. आपणांस ज्यांनीं प्रसाद दिला ते प्रत्यक्ष स्वामी होत. तुमचें सुदैव फार मोठें होय." त्यांच्याच आशीर्वाद कृपेनें पुढें माझ्या दुसऱ्या कुटुंबास विठ्ठल या नांवाचा पुत्र झाला.

पुढें आह्मीं सर्व मंडळी तुळजापुरास जाऊन श्री अंबाबाईचें दर्शन घेतलें; तेथें तीन दिवस मुक्काम करून रीतिप्रमाणें देवीस नैवद्य वगैरे केला. तेथून परत पंढरपुरास येऊन तेथें देवदर्शन, नैवद्य व ब्राह्मणभोजन घालून दौंडास आलों. तेथून श्रीक्षेत्र नाशिक येथें जाऊन श्री गोदावरीचें स्नान करून श्रीत्र्यंबकेश्वराचें दर्शन घेतलें; आणि परत मुंबईस आलों.

**माझें पांचवें लग्नः**—माझे श्वशुर उदयरामजी बनावडे आणि त्यांचें कुटुंब राधाबाई हीं पुण्यास आपले वडील जांवई गणपतराव खिरणीवाळ यांच्या येथें राहून आपला धंदा करीत असत. त्यांस एक अविवाहित कन्या सुंदरा या नांवाची होती; ही माझें चौथें कुटुंब सौ. संता हिची धाकटी बहीण होय. माझें सासुसासरे हे उभयतां प्लेगनें वारले; त्यावेळीं त्यांनीं सुंदरास मुंबईस माझ्या घरीं पोहचतें केलें. माझें चौथें कुटुंब सौ. संता ही फारच अशक्त असून सदा आजारी पडत असे. आणखी, तिला क्षयाचा विकार होता. ही कांहीं फार दिवस वांचणार नाहीं; आणि पुढें आपणांस लग्न करण्याचा प्रसंग हा येणार; या संबंधानें माझ्या चौथ्या कुटुंबानें मत दिलें कीं, आपल्या घरीं जर घरबसल्या लक्ष्मी चालून आली आहे तर तिचा स्वीकार कां करूं नये ? आपण माझ्या बहिणीचें पाणीग्रहण करणें हें उत्तम आहे. नंतर मी जेव्हां आपल्या आप्त मंडळीचें आणि सिताराम शेट यांचें मत विचारलें तेव्हां त्या सर्वांचें अनुकूल मत पडल्यावरून मीं तिच्या बरोबर लग्न करण्याचा निश्चय केला; आणि हें लग्न नाशिक मुक्कामीं जाऊन करण्याचा विचार ठरला; त्याप्रमाणें मी माझें थोरलें कुटुंब, चौथे कुटुंब

सौ. संता, आते बहीण धनाबाई छापरवाळ, लक्ष्मीबाई देवतवाळ, धनाबाईचा मुलगा चि. गणपतराव, एक कारकून आणि दोन शिपाई बरोबर घेऊन नाशिक येथें माझे तीर्थउपाध्ये अनंत बेळे यांच्या घरीं उतरलों, आणि तेथें हें लग्न सन १९०३ सालीं उरकून घेतलें. या प्रसंगीं मीं नाशिकांतील वेदशाळा आणि पाठशाळा यांतील विद्यार्थी आणि मधुकरी यांना भोजन दिलें. तसेंच वसंत पूजा व मंत्रजागरण करून शास्त्री व भटभिक्षुकांना उपहार देऊन यथाशक्ति दक्षणा वाटली. नंतर मी सर्व मंडळीसह मुंबईस निघून आलों.

**दिल्लीदरबारः**—सन १९०३ सालीं सातवे **एडवर्डबादशहा** यांच्या राज्यारोहणाचा दरबार दिल्ली येथें भरला; त्या समयीं **लॉर्डकर्झन** साहेब हे हिंदुस्थानचे व्हाईसरॉय होते. मला दरबार पाहण्याचा योग आला होता; पण मी न जातां धाकटे बंधु तुळशीराम यांस पाठवून दिलें. त्यांची तेथें राहण्याची व्यवस्था कोल्हापुरच्या महाराजांच्या क्यांपमध्यें दिवाणसाहेबांच्या तंबूमध्यें झाली होती; त्यामुळें त्यांना दरबारांतील बहुतेक भाग पाहण्याची सुसंधी मिळाली.

**मृत्यूः**—माझी वडील भावजय सौ. काशीबाई यांना प्लेगनें सन १९०३ सालच्या मार्च महिन्यांत देवाज्ञा झाली. यांचा स्वभाव थोडा तामसी व हट्टी होता, पण त्या मोकळ्या मनाच्या होत्या. यांचा दिवस जातींतील सर्वत्र मंडळीस दहीपुरीचा केला. त्यांना एक मुलगा लक्ष्मणराव या नांवाचा आहे; त्यांस दोन पुत्र काशिनाथ व रामलाल आणि एक कन्या दगडाबाई ( शांता ) आहे.

**सितारामशेटः**—पुढें मुंबईस प्लेग सुरू झाला म्हणून मी दादरवर झोंपडें बांधून सर्व मंडळीसह तेथें जाऊन राहिलों. शेट सिताराम लक्ष्मणजी किनारीवाळ हेहि माटुंग्यास झोपडें बांधून तेथें राहण्यास आले होते. कधीं कधीं ते आणि मी त्यांच्याच गाडींत बसून मुंबईस किंवा मुंबईहून दादरास येत जात होतों. यांचा आणि माझा स्नेहसंबंध हा फार दिवसांचा होता. जरी यांचा आणि माझा व्यवसाय अगदीं निरनिराळा होता; तथापि आम्ही एकमेकांस आपआपलीं सुखदुःखें सांगत होतों, आणि एकमेकांच्या सल्ल्याप्रमाणें वागत होतों. पुण्यास कांहीं कार्यानिमित्तानें जाणें झाल्यास, आणि देहू, आळंदी या ठिकाणीं जाण्याचा प्रसंग आल्यास ते आणि मी बरोबरच जात येत होतों. त्यांचे आणि माझे विचार अगदीं घरोब्यासारखे होते. सिताराम बिल्डिंगचा कांहीं भाग कोसळला आणि त्याखालीं कांहीं माणसें मेलीं; त्या वेळीं त्यांच्यावर जो मोठा प्रसंग आला होता, त्या प्रसंगीं मी त्यांना माझ्या बुद्धिसामर्थ्यानुरूप मदत केली. त्यांचा खटला सेशन कमिट केला होता; पण त्यांतून ते ज्या दिवशीं दोषमुक्त झाले त्या वेळीं ते आणि मी कोर्टांतून बरोबरच घरीं आलों, आणि त्यांच्या कारखान्यांतील मंडळीस मीं पेढे वांटून माझा आनंद व्यक्त केला.

सितारामशेट हे नेहमीं संध्याकाळीं ठाकूरद्वारीं माझ्या घरीं येत असत; आणि आम्हीं उभयतां गाडींत बसून फिरावयास जात होतों. ते मला म्हणाले कीं, 'मी इतक्या मोठ्या सिताराम बिल्डिंगमध्यें एकटाच राहत आहें; म्हणजे त्या ठिकाणीं आपल्या जातीचें दुसरें बिऱ्हाड नाहीं. आपण आपलें ऑफिस आणि राहणें तेथें करावें. मी तुम्हांपासून इतरांपेक्षां भाडें थोडें कमी घेईन; आपल्या सहवासानें माझ्या मनाला बरें वाटेल असा त्यांचा फारच आग्रह पडल्यावरून मी सन १९०३ सालीं माझें ऑफिस आणि बिऱ्हाड तेथें नेलें. त्यांनीं पाहिल्या तीन महिन्यांचें भाडें मजपासून इतरांपेक्षां कमी घेतलें; परंतु पुढें इतरांप्रमाणें रुपये पन्नास घेऊं लागले. त्यांनीं जरी विद्या संपादन केली नव्हती, तथापि ते मोठे बुद्धिमान, मोठे विचारी आणि मोठे दूरधोरणी होते. त्यांना बिलकूल अहंपणा नव्हता. ते मला नेहमीं असा बोध करीत होते कीं, तुम्ही लग्नकार्यांत, प्रयोजनांत, यात्रेंत, दिवसवारे घालण्यांत व जातजेवणें देण्यांत आपल्या ऐपतीच्या बाहेर खर्च करून पैशाचा दुरुपयोग व चुराडा करीत आहांत. तुम्ही आपले बंधु, पुतणे, भाचे यांना स्वतंत्र उद्योगधंदा करण्यास लावा. त्यांना आपल्या पायावर उभें राहण्यास समर्थ करा. आळशाप्रमाणें बसून खाण्याची त्यांना जी संवय लागली आहे त्यापासून त्यांचा नाश होणार आहे. त्यांना जी शिळी भाकर खाण्याची संवय लागली आहे ती त्यांना टाकून देण्यास लावा; आणि ताज्या भाकरीची त्यांना चव लावा; म्हणजे दुसऱ्याच्या कष्टानें मिळविलेलें अन्न खाण्याच्या ऐवजीं आपण स्वतः अंगमेहनत करून मिळविलेलें अन्न खाण्यास तयार करा. आपण मुंबईंत इस्टेट करून कायमचें उत्पन्न करून ठेवा. जग हें त्रिविध आहे. जगाच्या नादीं लागूं नका. हा त्यांचा बोध मीं घेतला नाहीं याचा आतां मला मोठा पश्चात्ताप होत आहे. शेट सिताराम यांच्या इस्टेटीचें दरमहा सोळा हजार रुपये उपन्न आहे. त्यांना तीन स्त्रिया होत्या; पण त्यांपैकीं हल्लीं दोन जिवंत आहेत. यांना रामचंद्र या नांवाचा एक मुलगा होता, तो माझा साडभाऊ लागत होता. तो आपल्या आईबापांचा एकुलता एक मुलगा असल्यामुळें तो त्यांचा फारच लाडका होता; त्याचा सन १९०३ सालीं पुण्यांत अकालीं अंत झाला; त्यास एक कन्या आणि मुलगा दत्ताराम या नांवाचा आहे. तो हल्लीं सितारामशेटच्या सर्व इस्टेटीचा मालक आहे. सध्या त्याचें वय तेरा वर्षांचें आहे. शेट नेहमीं माझ्याजवळ असे उद्गार काढीत असत कीं, माझा आतां वृद्धापकाळ झाला आहे. माझा नातू अद्याप लहान आहे. माझ्या मागें माझ्या इस्टेटीची व्यवस्था कशी लागेल याचीच मला मोठी चिंता लागली आहे; आणि विचार पडला आहे. शेवटीं मीं त्यांना असें सुचविलें कीं, "आपल्या दोन स्त्रिया आणि दोन पुतणे बाळाराम भाऊ आणि रामचंद्र बाळाराम या चौघांना आपले ट्रस्टी नेमणें अत्यंत उत्तम आहे; यावर आपली मर्जी." यावर त्यांनीं मला असें

उत्तर दिलें कीं, या ट्रस्टींत मी तुमचेंहि एक नांव घालतों. पण ही गोष्ट मी हमेषा नाकारीत असें. हे ट्रस्टी पुढें मागें ऑफस होऊन सर्वच इस्टेट सरकारी रिसिव्हरच्या ताब्यांत जाणार, असें मीं पूर्वींच भाकीत करून ठेवलें होतें आणि तें अखेरीस खरेंहि झालें; म्हणूनच मी या ट्रस्टीच्या भानगडींत पडलों नाहीं. पुढें शेटची प्रकृति उत्तरोत्तर क्षीण होत चालली म्हणून ते जरी नागपाड्यावरील आपल्या घरांत रहावयास गेले होते तरी ते नेहमीं माझ्या घरीं येत असत; आणि ते आणि मी मिळन संध्याकाळीं फिरण्यास जात होतों. पुढें त्यांच्या मांडीस गळू होऊन ते फारच आजारी पडले; त्यांचें दुःखणें फारच वाढत चाललें. तें डॉक्टरानें शस्त्रप्रयोग करून कापून काढलें. जसजशी त्यांची प्रकृति अधिकाधिक बिघडत चालली तसतशी त्यांच्या विशेष सलगींतील मंडळीस त्यांच्या भेटीस जाण्याची मनाई होऊं लागली. शेवटीं त्यांनीं नाईक नाईक करून प्राण सोडल्याचें मला कळलें; याबद्दल माझ्या मनास अत्यंत दुःख वाटत आहे. त्यांना ता. २७ माहे जानेवारी सन १९०९ सालीं देवाज्ञा झाली !!!

**कारंजा:**—पुणें शहरांतील बुधवार चौकांत ज्या जागीं पूर्वीं पेशव्यांचा वाडा होता त्या वाड्यावर घड्याळ होतें, त्या जागेंत मनुष्यांना आणि जनावरांना पाणी पिण्याची सोय: आणि वर चार कंदील असा लोखंडाचा सुंदर कारंजा तयार करून तो थोडक्या जागेंत राहतलि असा तयार केला असतां चौक सुशोभित दिसेल, असा प्लयान तयार करून, पुणें सिटी म्युनिसिपालिटीस सन १९०३ सालीं असा अर्ज केला कीं, मी माझ्या वडिलांच्या स्मरणार्थ पांच हजार रुपये खर्च करून कारंजा तुमच्या स्वाधीन करतों; त्याचा आपण स्वीकार करावा. कमिटीनें प्लॅन वगैरे मंजुर केला; पण जागा मागील बाजूची दाखविली, ती मला पसंत पडली नाहीं. नंतर मी पुणें सबर्बन म्युनिसिपालिटीला यासंबंधानें अर्ज केला कीं, बोलाईच्या चौकांतील जागा या कारंजासाठीं मला मिळावी; पण त्यांनीं मला असें उत्तर दिलें कीं, सदरहू जागा आम्हीं व्हिक्टोरिया मेमोरिअल फंडांतून कारंजा बांधण्याकरितां जरी राखून ठेवली आहे, तरी ती जागा फार रहदारीची असल्यामुळें सरकार परवानगी देईल किंवा नाहीं याविषयीं संशयच आहे. दोन्हीकडून नकारार्थी उत्तर आल्यामुळें मला मोठ्या कष्टानें आपला बेत रहित करणें भाग पडलें. सदरहु रकम मी निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या धर्मसंस्थांना वडिलांच्या नांवें देऊन टाकली.

**सौ. संताचा मृत्यु:**—हें माझें चौथें कुटुंब माझ्या घरीं आल्यापासून नेहमीं आजारी असे. पुष्कळ औषधोपचार केला, पण आजार कांहीं कमी झाला नाहीं. ही माझ्या घरीं दोन वर्षें होती; तिचें लग्न होऊन माझ्या घरीं आल्याबरोबर एका असामीनें दिवाळें काढलें असतां त्या असामीनें माझी त्याच्याकडे असलेली बाराशें

रुपयांची रकम मी न मागतां आणून दिली. ती जोंपर्यंत माझ्या घरीं होती तों पर्यंत माझा व्यापार मोठ्या भरभराटीनें चालला होता. तिचा स्वभाव शांत, नम्र व गर्वरहित होता. ती जेव्हां फारच आजारी पडली तेव्हां मीं तिला पुण्यास पाठवून दिली; परंतु तेथील हवेचा किंवा औषधोपचाराचा तिच्या प्रकृतीवर कोणत्याहि प्रकारचा इष्ट व हितकर परिणाम झाला नाहीं. तिला सन १९०४ सालच्या दिवाळींतील लक्ष्मीपूजनाच्या दिवशीं देवाज्ञा झाली. मला तिच्या मृत्यूची तार आली; त्याप्रमाणें मी पुण्यास निघून गेलों. त्या वेळीं माझ्या मनाला अत्यंत दुःख झालें, माझी मातोश्री म्हणाली कीं, " ही कामधेनुसारखी लक्ष्मी आपणांस लाभली नाहीं ! ती आजानबाहू होती ! " या प्रसंगीं मला श्री. गोंदवलेकर महाराजांच्या भाषणांचें स्मरण झालें; त्यामुळें विशेष दुःख होणें हें अगदीं स्वाभाविक आहे. पुण्यांत तिची नातलगांनीं योग्य काळजी घेतली नाहीं हें मला येथें मोठ्या कष्टानें म्हणावें लागत आहे. ! ! !

---

# प्रकरण ८ वें.

## व्यापारास उत्तेजन वगैरे

**लॉर्ड ल्यामिंगटनः**—ता. २७ माहे सप्टेंबर सन १९०४ रोजीं लॉर्ड ल्यामिंग्टन, मुंबईचे गव्हरनर यांचे कारकीर्दीमध्यें गव्हरनरसाहेबांचें **स्टेट प्रोसेशन** ( अधिकारवैभवयुक्त स्वारीची मिरवणूक ) काढण्यांत आलें; त्या समयीं मला पोलिस सुपरिंटेंडन्ट साहेबांनीं असें कळविलें कीं, या मोहल्यांत आपण प्रमुख पैकीं एक आहांत; आणि दरबारचे मानकरी आहांत; याकरितां गव्हरनरसाहेबांची स्वारी या मोहल्यांतून जाईल, त्यावेळीं आपण त्यांना पान विडा करा; त्याप्रमाणें मी गव्हरनरसाहेबांच्या स्वागतार्थ आपल्या वाड्यावर निशाणें, पताका वगैरे लावल्या, रस्ता सुंदर रीतीनें शृंगारला; आणि शहरांतील आणि लष्करांतील प्रमुख लोकांना पानसुपारीस येण्याचें आमंत्रण केलें; त्याप्रमाणें ते आले. शाळेंतील मुलांमुलींना आणून त्यांचेकडून राजगीत गाण्याची व्यवस्था केली. नेमलेल्या वेळीं गव्हरनरसाहेबांची स्वारी आपल्या पत्नीसह आणि लवाजम्यासह आली. त्यांचें आदरपूर्वक स्वागत केलें. त्यांना हारतुरे, पानविडा, अत्तरगुलाब दिला; त्यांचा त्यांनीं मोठ्या प्रेमानें स्वीकार केला. लेडी ल्यामिंग्टन यांना जो **बोकेट** ( फुलांचा मोठा गुच्छ ) अर्पण केला; त्यामध्यें एक सुवर्णमय हिंदुवॉच

बसविलें होतें, त्यांनीं या हिंदुवॉचची आणि त्याच्या कल्पकतेची प्रशंसा केली. ही पानसुपारी उत्तमापैकीं एक झाली; आणि व्यवस्था खुरेख ठेवली होती असें मुंबई पुण्यांतील दैनिक इंग्रजी व मराठी वर्तमानपत्रकारांनीं आपलें मत प्रदर्शित केलें. या पानसुपारीची सर्व व्यवस्था माझ्या गैर हजरींत माझे धाकटे बंधु तुळशीराम यांनीं केली.

**विद्यार्थ्यांना उत्तेजन**:---सन १९०४ सालीं ऑक्टोबर महिन्यांत विद्येंत मागें असलेल्या वर्गांतील विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना विद्यासंपादन करण्यास उत्तेजन यावें, एतदर्थ सुमारें तीनशें विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांना मी एकत्र जमवून ' **विद्येचें महत्व** ' या विषयावर व्याख्यान दिलें; त्या प्रसंगीं मे. शेफर्डसाहेब ( मुंबई सरकारच्या एझिक्युटिव्ह कौन्सिलचे मेंबर हे त्या वेळीं पुण्याचे कलेक्टर होते ) हे अध्यक्षस्थानीं विराजमान होऊन त्यांच्या हस्तें मुलांस पुस्तकें व खाऊ वांटला. या समारंभास शहरांतील बरीच प्रमुख मंडळी आली होती; शेवटीं नामदार दिवाण बहादुर काशिनाथ रामचंद्र गोडबोले यांनीं सुरस भाषण करून अध्यक्षांचे आणि मंडळीचे आभार प्रदर्शित केले.

**टॉवर क्लॉक** कोल्हापुर येथील श्रीमन्महाराज राजाराम छत्रपति यांच्या कारकिर्दींतील जुन्या राजवाड्याच्या नगारखान्यावरील मोठें क्लॉक ( घड्याळ ) कित्येक वर्षांपासून बिघडून निरुपयोगी होऊन पडलें होतें, आणि त्याचप्रमाणें नवीन राजवाड्यावरील मोठें घड्याळ हेंही निरुपयोगी होऊन पडलें होतें; तें दरबारानें मुंबईतील :नामांकित युरोपिअन कंपनीच्या म्यानेजरांना मुद्दाम बोलावून आणून दाखविलें; त्यांनीं हीं घड्याळें फार जुनीं झालीं आहेत; आणि ती आतां दुरुस्त होण्यासारखीं नाहींत असें त्यांनीं आपलें मत व्यापारी दृष्टीनें दिलें; म्हणजे ते आपणापासून नवीन घड्याळें खरेदी करतील. नंतर माझ्या कंपनीच्या म्यानेजरास सन १९०५ सालीं बोलावणें आलें; त्याप्रमाणें मीं माझे धाकटे बंधु यांस त्यांच्याबरोबर एक हुशार घड्याळाची दुरुस्ती करणारा मनुष्य देऊन सदरहु घड्याळें पाहण्यास पाठवून दिलें; त्यांनीं त्याप्रमाणें पाहून मला सर्व हकिगत येऊन कळविली; त्यावेळीं महाराजांना मी अशी विनंति केली कीं, 'आपलीं घड्याळें निरुपयोगी झालीं आहेत आणि असें युरोपिअन कंपन्यांनींही आपणांस कळविलें आहे; परंतु माझी इच्छा प्रयत्न करून पाहण्याची आहे; त्याची मला परवानगी असावी; त्याप्रमाणें मला परवानगी मिळाली. मी माझ्या दुरुस्ती करणाऱ्या कारखान्यांतील दरमहा दीडशें रुपये पगाराचा हेडरिपेरर, आणि त्याच्या हाताखालीं दुसरे चार दुरुस्ती करणारे आणि माझा बंधु तुळशीरामजी आणि भाचे रामचंद्रराव यांना कोल्हापुरास पाठवून दिलें. त्यांनीं प्रथम जुन्या राजवाड्यावरील घड्याळाची दुरुस्ती करण्याच्या कामास सुरवात केली; तेव्हां त्यांना असें कळून आलें कीं, तेथील स्थाईक घड्याळें दुरुस्त करणारानें त्या घड्याळांतील यंत्राचे कांहीं भाग

चोरून नेऊन ते विहीरीमध्यें टाकून दिलें होते; त्यामुळें अर्थातच आमचा अगदींच निरुपाय झाला, आम्हांला सरकारकडे वर्दी देणें भाग पडलें. महाराजांनीं आपल्या गुप्त पोलिसांकडून शोध करविला; आणि त्यांनीं विहिरींत टाकलेलें सामान काढून आणून आमच्या स्वाधीन केलें. सरकारानें त्याच्यावर खटला करण्याचा हुकूम केला परंतु तो मनुष्य कुटुंबवत्सल असून सदरहू घड्याळावर किल्ली देणारा होता. ही सर्व हकीगत जेव्हां मला समजली, तेव्हां मी महाराजांना विनंति केली कीं, या मनुष्यास शिक्षा झाल्यास माझा दुर्लौकिक होण्याचा संभव आहे, याकरितां त्याला कारागृहशिवाय करून अन्य तऱ्हेनें शिक्षा द्यावी. परम दयाळु महाराजांनीं त्याचें वतन खालसा केलें आणि त्याला सोडून दिलें. त्या घड्याळाचें काम माझ्या नोकरांनीं नव्याप्रमाणें उत्तम करून दिलें, आणि तें उत्तम चालू लागलें, हें पाहून **श्री. महाराज सरकार,** एकंदर ऑफिसर व प्रजाजन यांना मोठा आनंद झाला.

नंतर **नवीन** राजवाड्यावरील टॉवर क्लॉकच्या दुरुस्तीच्या कामास सुरुवात केली. त्या घड्याळाच्या यंत्राचा बराच भाग झिजून गेला होता, तो भाग विलायतेहूनच मागवून आणण्याचा प्रसंग होता; तो भाग जेव्हां त्यांनीं मजकडे पाठवून दिला तेव्हां तो मी विलायतेस न पाठवितां येथील कारखानदाराकडूनच तयार करून घेतला; तो विलायतेप्रमाणें सुबक झाला. नंतर मी तो कोल्हापुरास पाठवून दिला. तो त्यांनीं व्यवस्थेशीर रीतीनें आणि यांत्रिक रचनेप्रमाणें मोठ्या अक्कलहुशारीनें आणि मोठ्या मेहनतीनें बसविला; आणि तें अगदीं नव्याप्रमाणें चालू झालें. या घड्याळांत प्रत्येक पाव तासानें मधुर बाजा वाजतो. हीं दोन्ही घड्याळें उत्तम प्रकारें चालू झाल्याबद्दल.महाराजांकडे रिपोर्ट न करतां स्वतःसरकारस्वारीनें दिवाणासह येऊन पाहिलें; तें पाहून सरकार स्वारी फार खुष झाली. आणि म्हणाली, आज पंचवीस तीस हजार रुपये किंमतीचीं घड्याळें निरुपयोगी झालीं होतीं, तीं या कंपनीनें दुरुस्त केली आहेत. घड्याळें कशी काय चालतात ती पंधरा दिवसपर्यंत पाहवींत; आणि नंतर मंडळीस जाण्याची परवानगी द्यावी; त्याप्रमाणें माझी मंडळी तेथें तीन महिनेपर्यंत राहिली होती. तेथील एझिक्युटीव्ह इंजिनीअर आणि टेक्निकल सुपरिंटेडन्ट यांनीं या घड्याळाचें काम फार चांगलें झालें आहे, आणि तें नवीन घड्याळाप्रमाणें झालें आहे असा आपला रिपोर्ट केला; त्या रिपोर्टाची नक्कल रीतीप्रमाणें मजकडे पाठवून दिली; मी उलटपत्रीं महाराजांना कळविलें कीं, आपले कृपेनें आणि मदतीनें हीं दोन्हीं टॉवर क्लॉक्स दुरुस्त झालीं आहेत. सरकारानें माझ्या कामदार मंडळीस पोषाख दिला. आणि मला लिहून कळविलें कीं, तुमचें जें कांहीं बील झालें असेल तें पाठवा. माझ्या कामदार मंडळीकडून दरबार आणि इतर ऑफिसांतील मोठमोठीं घड्याळें जी अगदीं निरुपयोगी झालीं होतीं, तींहि दुरुस्त करून घेतलीं. तसेच विजेच्या ब्याटऱ्या वगैरे दुरुस्त करून घेतल्या. नंतर माझी मंडळी महाराजांचा निरोप घेऊन निघाली. रीतीप्रमाणें बील पाठविलें त्याची

रक्कम मला मिळाली; आणि या अपूर्व कामगिरिबद्दल मला एक सोन्याचें सन्माननीय मौल्यवान् मेडल ( पदक ) मिळालें.

**सनद दुसरीः**—भावनगर हें काठेवाडांतील एक मोठें संस्थान आहे; या संस्थानाचें काम मी पूर्वींपासून करीत होतों; माझें काम पसंत पडल्यामुळें त्यांनीं माझ्या कंपनीस दरबारास आणि खानगी खात्यास लागणारीं क्लॉक, वॉचेस, टाइम पिसेस वगैरे पुरविण्याची सनद * दिली; त्याप्रमाणें अद्याप व्यवहार चालू आहे; ही सनद देतेवेळीं त्यांनीं मला सन १९०५ सालीं बोलाविलें होतें; परंतु मीं आपल्या धाकट्या बंधूस पाठवून दिलें; त्यांची तेथें राजपाहुणे या नात्यानें उत्तम व्यवस्था ठेवली होती. येतेवेळीं सनद, पोषाख दोनशें रुपये किंमतीचा आणि जाण्या येण्याचा खर्च दिला.

**सिताराम फ्री स्कूल पुणें:**—ही शाळा मी शेट सिताराम लक्ष्मण मुंबईतील सिताराम बिल्डिंगचे मालक यांचें मन वळवून पुण्यांत स्थापन करवली. मीं त्या शाळेंतील मुलांना उत्तेजनार्थ दोन समारंभ केले; पहिल्या समारंभाच्या प्रसंगीं श्री. काळुराम भाऊ मनसाराम नाईक यांनीं अध्यक्षस्थानीं विराजमान होऊन मुलांना मीं दिलेलीं शालोपयोगीं पुस्तकें आणि खाऊ वांटला. दुसऱ्या प्रसंगीं म्हणजे ता. २४ डिसेंबर सन १९०५ रोजीं कै. गोपाळराव छोटीराम गवंडी वकील यांनीं अध्यक्षस्थान सुशोभित करून मीं दिलेलीं शालोपयोगीं पुस्तकें आणि मिठाई मुलांमुलींस वाटली. आणखी, माझे जातींतील नूतन मराठी विद्यालयांतील विद्यार्थी कै. परशराम बाबाजी कुंडळवाळ हे मॅट्रिक्युलेशन परिक्षेंत उत्तीर्ण झाले, म्हणून त्यास एक चांदीचें घड्याळ किंमत रुपये २५ चें बक्षिस देऊन त्यांचा सार्वजनिक रीतीनें गौरव केला. यासंबंधीं सविस्तर हकिगत त्यावेळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाली आहे.

---

## जाहिरनामा.

### दिवाणसरकार करवीर यांजकडून.

१ नंबर १६. मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनी मुबई, यांनीं कोल्हापूर येथील जुन्या राजवाड्याच्या नगारखान्यावरील घड्याळ दुरुस्त केल्याबद्दल त्यांस एक सुवर्णपदक बक्षीस देण्यांत आलेलें आहे.

ता. १५ डिसेंबर. १९०६

R. V. Subnis.
दिवाण, सरकार करवीर.

* His Highness the Maharaja of Bhavnagar is by Resolution No 200 dated 11th October 1905 pleased to appoint Messrs G. B. Naik & Co. of Bombay and Poona, Watch makers & Jewellers in ordinary to the Bhavnagar State.

Bhavnagar
12th October 1905

Ratilal Chhotelal Desai,
for Diwan of Bhavnagar.

**स्वदेशी मालाचें प्रदर्शनः**—सन १९०६ सालच्या जून महिन्यांत पुण्यांत गायकवाडांच्या वाड्यांत स्वदेशीबाजार आणि प्रदर्शन भरलें होतें. त्या प्रदर्शनांत ज्यांचा माल शास्त्रीय पद्धतीनें तयार केला असेल आणि तसल्याच परदेशी तयार केलेल्या मालाची सर्व प्रकारें बरोबरी करणारा झाला असेल, त्यास बक्षिस देण्यास मी एक हिंदु वॉच प्रदर्शनाच्या व्यवस्थापकांकडे पाठविलें होतें; सदरहु वॉच अलेंबिक केमिकल वर्क्स कंपनीचे प्रो. कोटी भास्कर यांचे जिन्नस पसंत पडून त्यांस तें बक्षिस दिलें गेलें.

**वेळेचें महत्व आणि व्ययः**—मी जो घड्याळाचा व्यापार सुरू केला आहे, त्यास अनुसरून सन १९०६ सालीं हें पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. हें पुस्तक राजमान्य आणि लोकमान्य असें झालें. मुंबई इलाख्याच्या आणि वऱ्हाड प्रांताच्या सरकारी विद्याखात्यानें विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यास आणि लायब्रऱ्यांस देण्याकरितां मंजूर केलें आहे. तसेंच प्रमुख विद्वानांनीं आणि वर्तमानपत्रकारांनीं आपले अनुकूल अभिप्राय दिले आहेत. श्रीछत्रपति सरकार करवीर यांनींही आपला उदार राजाश्रय दिला आहे. आणखी, श्री. गायकवाडसरकार यांनीं मला याचें गुजराथींत भाषांतर करण्याची आज्ञा केली आहे; परंतु तसें करण्यास कार्यबाहुल्यामुळें मला अद्याप सवड झाली नाहीं.

**शांताबाईचा जन्मः**—माझें पांचवें कुटुंब सौ. सुंदरा हिला संवत १९३१ म्हणजे शके १८२७ ज्येष्ठ शुद्ध ५ रोजीं कन्या झाली. तिचें नांव चंद्रा असून तिला शांता या नांवानें हांका मारतात. हिचा जन्म झाल्यापासून हिची आई ही नेहमीं आजारी असे; तिला औषधोपचारासाठीं कामा हॉस्पिटलमध्यें दोन महिने ठेवलें होतें. त्यावेळीं शांतीचें वय सुमारें सव्वा वर्षाचें होतें. हिच्या आजीनें बाळपणीं तिचें नवसाचें नाक टोंचलें.

**पालकपुत्रः**—माझे धाकटे बंधु कै. गोपाळराव यांस संतति नव्हती त्यांचें कुटुंब रखमाबाईनें आपला भाचा गजानन याचा त्याची आई लहानपणींच वारल्यामुळें पुत्रवत् संभाळ केला आणि त्याचा वडील किसन गणपतराव सदीवाळ हे म्हणाले कीं, हा मुलगा तुह्मीच संभाळा म्हणून शास्त्राधारें तिचा पालक पुत्र असा विधि केला.

**लग्नः**—माझा भाचा रामचंद्र किसन कुंडळवाळ हा माझी मधली बहीण मंजुळाबाई हिचा दुसरा मुलगा. ह्याचा सांभाळ लहानपणापासून माझ्या मातोश्रीनेंच केला. याचा अभ्यास पुण्यांत इंग्रजी सहाव्या इयत्तेपर्यंत झाला. पुढें त्याचें लग्न विठोबा बिलोठे यांची कन्या सिताबाई हिच्या बरोबर सन १९०६ सालीं झालें; हिला पुढें क्षय होऊन ती सन १९०८ सालीं मरण पावली. नंतर हा माझा भाचा आर्टस्कुलमध्यें कांहीं दिवस एनग्रेव्हींगचें काम शिकत होता; पुढें तें सोडून हल्लीं तो माझ्या ऑफिसमध्यें इंग्रजी क्लॉर्कचें काम करीत आहे. नंतर

सन १९१० सालीं त्याचें दुसरें लग्न छोटुराम मामोडे यांची कन्या रखमाबाई हिजबरोबर झालें. हिची आई चमत्कारिक स्वभावाची असल्यामुळें मुलगी नांदविण्याचा तिचा रंग दिसेना; म्हणून मीं कांहीं मंडळीसह तिच्या येथें जाऊन तिची समजूत घालण्याचा प्रयत्न केला आणि जाती पंचानेंही तिची समजूत करण्याची शिकस्त केली; आणखी जांवयानेंहि योग्य रीतीची चांगलीच समज दिली, तरी ती आपली मुलगी नांदविण्यास पाठविना. ही स्थिति पाहून मला कांहीं मंडळीनें असें सुचाविलें कीं, ही मुलगी नांदण्यास येईल अशी आशा बाळगणें व्यर्थ आहे; तुम्ही हिचा नाद सोडून आपल्या भाच्याचें तिसरें लग्न करा. त्याप्रमाणें सन १९१४ सालीं मे महिन्यांत कै. किसन काशिराम खिरनीवाळ यांची कन्या चि. दगडाबाई ( सिताबाई ) हिच्याबरोबर केलें. यांस हल्लीं विठ्ठल नांवाचा मुलगा ता० ३ नवंबर सन १९१५ रोजीं झाला.

जे. पी.:—श्री.शेट सिताराम लक्ष्मणजी किनारीवाळ, कंट्राक्टर सिताराम बिलडिंगचे मालक यांनीं स्वज्ञातीतींल मंडळीच्या सह्यानिशीं ता. २७आक्टोबर सन १९०६सालीं मुंबई सरकारास असा अर्ज केला कीं, मुंबईत आमच्या जातीचा जमाव मोठा आहे; आणि आम्हांस वरचेवर जस्टिस आफ धी पीसची गरज लागते. आमच्या जातींत एकहि जास्टिस आफ धी पीस नाहीं. या मानास आमच्या समाजांतील रा. रा. गणपतराव भिवाजी ऊर्फ जी. बी. नाईक हे प्रमुख गृहस्थ सर्वस्वी लायक आहेत. यासाठीं आपण हा मान त्यांना द्यावा अशी विनंती आहे. आणखी नाम. दाजी आबाजी खरे, डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख, रा. ब. डॉ. नाईक दांडेकर वगैरे जे. पी. नीही आपलें पुष्टीकारण दिलें.

लग्नः—सन १९०६ सालीं माझ्या वडील बंधूचा चिरंजीव शंकरराव आणि माझी बहीण मंजुळाबाईची मुलगी चि. अनुसुयाबाई यांचा विवाह ठरला. माझ्या पुतण्यास बिहारीदास जेठीवाळ यांची कन्या चि. पार्वतीबाई ही वधू नेमस्त केली; आणि माझ्या भाचीस बाळाराम तेलपुरे यांचा मुलगा चि. सोमनाथ हा वर नेमस्त केला. एकाच तिथीस हीं दोन्हीं मंगलकार्यें उरकून घेतलीं. या दोन्हीं कार्याप्रीत्यर्थ मला दीड हजार रुपयांवर खर्च आला. सौ. पार्वतबाई ही सन १९०८ सालीं लोणावळें मुक्कामीं कालव्यानें वारली.

लग्नः—माझे वडील बंधु बाळारामजी यांनीं रामभाऊ दैमीवाळ ( कोपरगांवकर ) यांची कन्या चि. अहिल्याबाई ही आपला मुलगा चि. शंकरराव यास वधू नेमस्त करून दुसरें लग्न केलें. या लग्नाचें गडगनेर ( बीनोरा ) जांवई चि. पांडुरंगजी किसनजी धवारे यांनीं मोठ्या थाटानें केला. या लग्नास खर्च सुमारें एक हजार रुपये आला; तो सर्व माझ्या बंधूनीच केला. हें लग्न सन १९०८ सालीं झालें. शंकरराव हें लोणावळ्यास आपल्या वडिलांच्या मेस्त्रीच्या कामावर आहेत यांस दरमहा पन्नास रुपये मिळत आहेत. हे स्वभावानें शांत असून परबुद्धीचे आहेत,

सन १९०७ च्या जानेवारी महिन्याच्या १२ व्या तारखेस खग्रास सूर्यग्रहणाची महापर्वणी होती; त्या वेळीं मी, माझें पांचवें कुटुंब सौ० सुंद्रा, तिची कन्या शांताबाई, भावजय रखमाबाई, तिचा पुत्र गजानन, आणि कारकून चिंतोपंत यांना बरोबर घेऊन श्रीक्षेत्र पंढरपूर येथें जाण्यास निघालों; त्या प्रसंगीं जरी पुष्कळ स्पेशल ( खास ) आगगाड्या सुटल्या होत्या तरी उतारूंची मनस्वी गर्दी असल्याकारणामुळें आम्ही सेकंड क्लासचे तिकीट काढून बार्शीरोड ( कुरडुवाडी ) स्टेशनावर येऊन दाखल झालों. पुढें बार्शी टाऊनहून ज्या आगगाड्या पंढरपुरास जाण्यास येत होत्या, त्या गाड्यांस मालाचें व जनावरांचे डबे जोडून त्यांतून यात्रेकरू नेण्याची गर्दी उसळली होती; गार्डींत जागा मुळींच नाहीं; म्हणून मला दोन तास स्टेशनावर रखडत बसावें लागले. तेथें चि. शांताबाईस एकदम ज्वर भरला, आणि ती अगदीं बेशुद्ध पडली. आम्ही सर्व मंडळी घाबरून गेलों. आतां आम्हांस श्री पांडुरंगाचें दर्शन आणि चंद्रभागेचें स्नान न होतां तसेच परत पुण्यास जावें लागणार अशा प्रकारें आमची निराशा होऊन परत पुण्यास जाण्याची आम्ही तयारी करीत आहोंत, तोंच यात्रेकरू मंडळींत श्री पांडुरंगरूपी वैद्य आमच्या जवळ आला, त्यानें मुलीस पाहिलें; आपल्या बटव्यांतून कांहीं औषध काढून दिलें, आणि तो असें म्हणाला कीं, मलाहि पंढरपुरासच जाणें आहे. आपण घाबरूं नये. मुलीचा ताप हा उन्हाच्या झळीचा आहे. आपण पहिल्या वर्गाचे तिकीट काढा म्हणजे आपणांस कांहीं त्रास होणार नाहीं; म्हणून मीं त्या वैद्यासह तिकीट काढलें. आम्ही सर्व मंडळी पंढरपुरास जाऊन दाखल झालों. स्नान व देवदर्शन करून बिऱ्हाडीं आलों. मुलीला आराम पडत चालला; परंतु दुसऱ्या दिवसापासून सौभाग्यवतीची प्रकृति तापानें बिघडली; तिला डॉक्टरचे औषधोपचार सुरू केले; त्यामुळें आम्हांला तेथें आठ दहा दिवस मुक्काम करावा लागला. या ठिकाणीं मुंबईच्या प्रार्थनासमाजानें बालरक्षक आणि बालहत्त्या प्रतिबंधक संस्था स्थापन केली आहे; तिचे सेक्रेटरी रा. भोसले यांनीं मला अशी विनंति केली कीं, आपण ही संस्था पाहण्यास यावें; त्याप्रमाणें मी गेलों. ही अत्यंत उपयुक्त संस्था आणि तेथील व्यवस्था पाहून मनाला परम संतोष झाला. मी या संस्थेस यथाशक्ति साह्य आणि संस्थेच्या उपयोगाकरितां एक क्लॉक ( मोठें घड्याळ ) बक्षिस दिलें. क्षेत्रांतील एकंदर अनाथ, अंध, पंगु यांस पिठलें भाकरीचें जेवण दिलें. दुसरें दिवशीं ब्राह्मण भोजन घालून देवाचा निरोप घेऊन गाणगापूरास श्रीदत्ताच्या दर्शनास गेलों. तेथें देवाचा अभिषेक, नैवद्य, ब्राह्मणभोजन आणि एकंदर सेवेकऱ्यांस भोजन घातलें. तेथें माझा तीन दिवस मुक्काम होता. नंतर मी पुण्यास येऊन तेथून मुंबईस आलों.

**दत्तारामाचें लग्नः—** सन १९०७ च्या मे महिन्यांत माझा पुतण्या म्हणजे

८८३५६
... वाचनालय ... तार



माझे बंधु तुळशिराम यांचा वडील मुलगा दत्ताराम यास कै. नथुराम भाऊसाहेब उटवाले यांची कन्या चि० बची ऊर्फ सोनु ( लक्ष्मीबाई ) ही वधू नेमस्त केली. मीं या लग्नांत गणपतीस अक्षत नेण्याची मिरवणूक काढली; ही आमच्या जातींत पहिलीच होय. ही मोठ्या थाटानें काढली. याच्या लग्नांत माझ्या एकंदर जातीस व इतर स्नेही मंडळीस पितळेचीं ताटें वांटलीं. सुमारें हजार रुपयांचीं ताटें चारशें मंडळीस वांटली. या लग्नानिमित्तानें जयपुराकडील आमच्या ज्ञातींतील पांच प्रमुख गृहस्थ मुद्दाम आले होते; त्यांना एकंदर रीतरिवाज पाहून परम संतोष झाला आणि तो त्यांनीं योग्य प्रसंगीं व्यक्तहि करून दाखविला; या लग्नाचें गडगनेर श्री. काळुराम भाऊमनसाराम धवारे यांनीं मोठ्या थाटानें केलें; तसेंच रा. रा. गणपतराव मोतीराम देवतवाळ यांनींहि थाटाचे गडगनेर केले. या लग्नानिमित्तानें जातींतील सर्वत्र लहानथोर मंडळीस मीं दोन पक्वान्नाची प्रयोजनें दिली. लग्न झाल्यानंतर जाती समाजाचा एक फोटो ग्रूफ घेतला. तो मी लिहिलेल्या जातीच्या इतिहासांत घातला आहे. जयपुरकर पाहुणे मंडळीस जाती पंचांकडून एक मोठी मेजवानी देण्यांत आली; आणि त्यांना पोषाख देऊन त्यांचा गौरव करण्यांत आला; त्याचप्रमाणें मीहि त्यांना एक मोठी मेजवानी देऊन पोषाख दिला. हें लग्न मीं मोठ्या थाटानें केलें; मला या लग्नाप्रीत्यर्थ तीन हजार रुपयांच्या वर खर्च आला. दत्तारामचें लग्न झाल्यावर त्यांनीं शाळेला राजीनामा ठोकला !

**पुत्रजन्मः**—संवत १९६४ शेके १८२९ वद्य ४ पौष ( सोमवार ता. २२ जानेवारी सन १९०८ रोजीं माझे पांचवें कुटुंब सौ. सुंदरा हीस पुत्ररत्न झालें. ( हा माझ्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं झाला ) त्याचें नांव सदाशिव. याच्या आजीनें बाळपणीं त्याच्या पायांत नवसाची बेडी घातली. त्याच्या जन्माच्या वेळीं नातलगांचे तिच्याकडे दुर्लक्ष झाल्यामुळें तिला बाळंत रोग जडला; त्यामुळें ती वरचेवर आजारी पडत असे.

**मातोश्रीचा मृत्युः**—माझी परमपूज्य व अत्यंत प्रिय मातोश्री चिमाबाई ह्या आपल्या आयुष्यांत कधींहि आणि कोणत्याहि विकारानें आजारी पडत नसत आणि यांची शरीरप्रकृतिसंबंधानेंहि कोणत्याहि प्रकारची कुरकूर नसे. वयोमानाप्रमाणें दिवसांनुदिवस प्रकृति अशक्त होऊन, अन्नपचनशक्ति कमी होत जाऊन, कोणत्याहि प्रकारचा विशेष विकार न होतां सन १९०८ च्या आश्विनमासी वद्य ८ रोज शनिवार शके १९३४ रोजीं त्यांनीं आपला देह ठेविला; त्या समयीं त्यांचें वय सुमारें ८५ वर्षांचें असावें; त्यांची स्मशानयात्रा दुसरे दिवशीं सकाळीं झाली; तीस ज्ञातींतील एकंदर मंडळी आणि इतर मिळून सुमारें पांच सहाशें माणसें होतीं. त्यांचा दहनविधि चंदन आणि इतर लांकडानें केला. त्यांचें क्रियाकर्म माझें धाकटे बंधु तुळशिराम यांच्याकडून करविलें. त्यांची रक्षा आणि अस्ति श्रीक्षेत्र नाशिक येथें गोदावरी नदींत नेऊन टाकल्या. त्यांचा दिवस मालपोह्याचा घातला.

माझ्या मातोश्रीचें आयुष्य मोठ्या कष्टांत गेलें. यांचा स्वभाव अगदींच साधा, प्रेमळ व भोळा होता; त्या अतिशय देवभोळ्या होत्या. त्यांचे वर्तन अति नम्र व मर्यादशील होतें. मरणसमयीं त्यांच्या जवळ त्यांचें तीन पुत्र, पांच सुना, दहा नातू, सहा नाती, सहा नातसुना, तीन नातजांवई, तीन पणतू आणि तीन पणती इतका मोठा परिवार होता.

**राजकन्याविवाहः**—**श्रीमन्महाराज शाहु छत्रपति,** सरकार करवीर यांची प्रिय कन्या **श्री. राधाबाई आक्कासाहेब** महाराज यांचा विवाह देवासच्या थोरल्या पातीचे महाराज **श्री. तुकोजीराव** यांच्या बरोबर ता. २१ मार्च सन १९०८ रोजीं झाला; या विवाहाचे आमंत्रण मला श्री. करवीर सरकार आणि देवास सरकार या उभय महाराजांकडून आले; म्हणून मी, माझा बंधु तुळशीराम, चुलतबंधु बाबूराव, शालक किसनभाऊ आणि दोन शिपाई बरोबर घेऊन गेलों होतों. आमचें स्टेशनावर योग्य स्वागत होऊन राजपाहुणे म्हणून आम्हांला राहण्यास एक स्वतंत्र बंगला दिला होता; त्यांत गाडी घोडा, मुदपाकाची व्यवस्था, चाकरनोकर वगैरेंची पूर्वींच व्यवस्था करून ठेवली होती. तेथिल राजवैभव आणि लग्नसमारंभ वर्णन केल्यास एक मोठा ग्रंथ होणार आहे; इतका तो अप्रतिम आणि अवर्णनीय झाला. आह्मीं लग्नांतील सर्व समारंभास जात होतों. मीं सुमारें पांचशें रुपयांचा अहेर केला आणि मलाहि महाराजांकडून परत योग्य अहेर मिळाला.

**श्रीरामेश्वरः**—सन १९०८ सालीं माझें वडील बंधु बाळाराम यांनीं दोन महिन्याची रजा घेऊन आपले सर्व कुटुंब, भाचा नानाभाऊ व इतर पंधरा सोळा मंडळी बरोबर घेऊन श्रीरामेश्वर, मधुरा, शिवकांची; विष्णुकांची, मिनाक्ष वगैरेकडील यात्रा केली. या प्रसंगीं त्यांनीं मला आपल्याबरोबर येण्यासंबंधानें फारच आग्रह केला; पण कार्यबाहुल्यामुळें मला जातां आले नाहीं; याबद्दल मला फार दिलगिरी वाटत आहे! माझे बंधू तुळशीराम हे माझ्या व्यापारानिमित्तानें हिंदुस्थानांत फिरत असतां त्यांना तीन वेळा काशीची आणि एक वेळा रामेश्वराची यात्रा घडली. या प्रवासांत त्यांनीं तिकडील सर्व भाग पाहिला.

**मराठी ग्रंथसंग्रहालयः**—या संस्थेस माझी पूर्ण सहानुभूति आहे, आणि अशा प्रकारची अत्यंत उपयुक्त आणि ज्ञानवर्धक संस्था प्रत्येक मोठ्या शहरींच नव्हे, तर लहान लहान गांवांतूनहि स्थापन झाली पाहिजे असें माझें ठाम मत आहे; म्हणून मीं मुंबईतील या संस्थेस माझ्या खाजगी लायब्ररींतील कांहीं पुस्तकें बक्षीस दिलीं. या संस्थेच्या सेक्रेटरीनें मला अशी विनंति केली कीं, 'या संग्रहालयाच्या उपयोगाकरितां आपणांकडून एक मोठें घड्याळ ( क्लॉक ) मिळावें; त्याप्रमाणें हें संग्रहालय श्री. महाराज सयाजीराव गायकवाडसरकार यांचे हस्तें उघण्याचा समारंभ झाला, त्या प्रसंगीं मी त्यांना एक मोठें घडयाळ दिलें. प्रोफेसर

देवल यांची सर्कस सुप्रसिद्ध आहे; त्यांची जशी कीर्ति आहे तशींच त्यांचीं कामेंहि खरोखरच वर्णनीय आणि प्रेक्षणीय होत असतात. प्रो. देवल हे आपल्या ता. १६ माहे मे सन १९०९ रोजींच्या सर्कशीचें उत्पन्न मराठी ग्रंथसंग्रहालयास देणार होते त्यामुळें प्रमुख व थोरथोर नागरिक जनांनीं आपल्या आगमनानें आपली या संस्थेविषयीं प्रेमबुद्धि प्रकट केली आणि या संस्थेस उदारबुद्धीनें आश्रय दिला, यासमयीं कांहीं प्रमुख मंडळी मजकडे आली आणि त्यांनीं मला असें सांगितलें कीं, या सर्कस कंपनीच्या मालकांस आपणाकडून योग्य, स्मरणीय आणि सन्मान-दर्शक भूषण मिळावें. हें मंडळीचें म्हणणें मीं संतोषानें मान्य केलें आणि स्वखर्चानें एक सुवर्णपदक (मेडल) तयार करून देण्याचे कबूल केलें. ज्या दिवशीं हा खेळ होता त्या दिवशीं माझी प्रकृति अस्वस्थ असल्यामुळें मला जातां आले नाहीं; म्हणून मीं तें सुवर्णपदक माझा पुतण्या चि. दत्ताराम व भाचा चि. रामचंद्र ह्यांच्याबरोबर पाठवून दिलें; तें येथील पोलिस कमिशनरसाहेबांच्या हस्तें प्रो. देवल यांस अर्पण केलें; त्या वेळीं मीं हें सुवर्णपदक दिल्याबद्दल कमिशनरसाहेबांनीं आपला आनंद व्यक्त करून माझे आभारप्रदर्शन केलें. डॉ. सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनीं सर्कशीचे उत्पन्न ग्रंथसंग्रहालय यास दिल्याबद्दल प्रो. देवल यांचें आभार मानलें आणि पोलिसकमिनर साहेबांनीं अध्यक्षस्थान स्वीकारल्याबद्दल मामुल वहिवाटी-प्रमाणें त्यांचे आभार मानले; आणि मीं दिलेलें सुवर्णपदक त्यांनीं प्रोफेसर यांस दिलें याबद्दल माझ्या वतीनें त्यांचें आभार मानले.

**हळदकुंकुः**—माझें पहिलें कुटुंब सौ. कोंडु ही दरवर्षीं हळदकुंकूं करीत असते; पण सन १९०९ सालीं मोठ्या थाटानें हळदकुंकु करण्याचें तिच्या मनांत आलें; त्याप्रमाणें कार्ड छापून गांवांतील प्रमुख घराण्यांतील आणि जातींतील स्त्रियांना आमंत्रण केलें. कार्ड पाठवून स्त्रियांना हळदकूंकवाचें आमंत्रण देण्याचा हा प्रकार पहिलाच असावा. आमंत्रणाचा स्वीकार करून आणि अशा प्रसंगीं आमंत्रणाची देखील जरूर नसल्यामुळें हजारांच्या वर सौभाग्यवती स्त्रिया आल्या होत्या. प्रत्येक स्त्रीला हळदकुंकु भरून एक एक जर्मनसिल्व्हरचा किंवा पितळेचा करंडा देऊन तिची रीतीप्रमाणें ओटी भरून, उपहार व रसपान याची व्यवस्था केली होती. या समारंभास मला माझ्या अजमासाच्या पेक्षां पुष्कळच अधिक खर्च करावा लागला; कारण हे जर्मन सिल्व्हरचे आणि पितळेचे करंडे वांटले.

**जीवावरील दुःखणेः**—ता० ९ माहे डिसेंबर सन १९०९ रोजीं रात्रीं मला अकस्मात भयंकर वाताचा विकार झाला; त्यावेळीं माझी अवस्था मोठी कठीण दिसली. सुदैवानें त्याप्रसंगी माझ्या कुटुंबांतील एकंदर मंडळी मजजवळच होती. माझ्या वडील बंधूला आणि भाचा नाना भाऊला मी या दुःखण्यांतून उठेन असा मुळीच भरंवासा वाटला नाहीं. याप्रसंगीं सरदार गृहाचे मालक रा. विश्वनाथपंत साळवेकर आणि त्यांच्या पत्नी सौ. वेणूताई यांनीं

घरच्या मंडळी पेक्षांहि माझी अधिक शुश्रूषा केली. कनिष्ट बंधूनें नामांकित डॉक्टर आणले. घरांतील मंडळी फार घाबरून गेली. मला त्या वेळीं जरी बोलण्याची शक्ति राहीली नव्हती तरी तशा अवस्थेंत मी माझ्या मुलांचा चांगला संभाळ करा असें बोललो. परमेश्वराच्या दयेनें माझा या दुःखाण्यांत पुर्नजन्म झाला. माझा समाचार घेण्या ाठीं पुण्याहून मुद्दम श्री. काळुराम भाऊ मनसाराम धवारे नाईक आणि इतर बरीच आप्त मंडळी आली होती.

**जुनागड**:—या संस्थानाचे नबाब **सर रसुलखानजी** यांचा माझ्या व्यापारास चांगला उदार राजाश्रय असे. मी या संस्थानास बऱ्याच वर्षांपासून माल पुरवित असें. दरबारास आणि इतर कचेऱ्यांस क्लॉक, टाईमपिसेस मीच पुरवित असें; इतकेंच नाहीं, तर नबाबसाहेबांच्या खानगी खात्यास लागणारीं वॉचेस आणि त्यांच्या फोटोचीं वॉचेस आणि जव्हाहीर मजकडूनच पुरवला जात असे. ज्या राजेरजवाड्यांनीं मजकडून माल घेण्याची मला सनद दिली आहे त्या राजेरजवाड्यापेक्षां यांच्याकडून मला अधिक आश्रय असे. हे नेहमीं आपल्या कामदार मंडळींना प्रसंगानुसार सोन्याची वॉचेस आणि सांखळ्या बक्षीस देत असत. साधारण हूजऱ्याच्या खिश्यांत ४००।५०० रुपयांच्या खालीं घड्याळ नसे; चौकशी केल्यास असें कळून येत असें कीं, नबाबसाहेबांनीं हे आम्हांस बक्षीस दिलें आहे. नवीन क्लॉक्स, वाचेस, टाईम पिसेस, शेडे व सांखळ्या यांची नवीन तऱ्हा निघाली म्हणजे त्या नवीन मालाचे माझे हें पाहिले गिऱ्हाइक होत. यांनीं न मागविता मी जरी किती ही किंमतीचा माल पाठविला तथापि तो त्यांना पसंत होत असे; आणि मीं त्यांना कळविलेल्या किंमतीचा मला ताबडतोब चेक ( रकम ) यावयाचा. इतका यांना नव्या नव्या घड्याळांचा, वॉचेसचा, शेडे साखळ्यांचा संग्रह करण्याचा मोठा शोक असे. त्यांच्याजवळ या वस्तूंचा मोठा संग्रह असे आणि तो अधिक करण्याचा दांडगा छंद असे. ते आपल्या जुन्या संग्रहांतील घड्याळें वगैरे आपल्या कामदार लोकांना बक्षीस देत असत; आणि नवीन वस्तूं संग्रह करण्याचा नाद असल्यामुळें हजारों रुपयांचा माल न मागतां पाठविला असतां त्याचा स्वीकार होत असे; परंतु त्यांत नवीनपणा मात्र असला पाहिजे; किंमतीचा प्रश्न नाहीं. हे संस्थानिक जुन्या पद्धतीचे होते. त्यांना सातवे **एडवर्ड बादशहांकडून** नुकताच **जी. सी. एस. आय.** हा बहुमानाचा किताब मिळाला होता; तो घेण्याकरितां त्यांची स्वारी मुंबईस सन १९०९ सालीं आली होती; बरोबर पांचशें मंडळी होती. रीतीप्रमाणें मीहीं त्यांच्या स्वागतार्थ स्टेशनवर गेलों होतों. दुसऱ्या दिवशीं नबाब साहेबांनीं मोटार पाठवून मला आपल्या बंगल्यावर बोलावून घेतलें. हे घड्याळाचे मोठे शोकी असल्यामुळें मीं त्यांच्यासाठीं पन्नास हजार रुपयांचा माल संग्रह करून ठेवला होता. मी जेव्हां त्यांना भेटण्यास गेलों तेव्हां त्यांनीं मला पहिला प्रश्न हा केला कीं, "आपण बरोबर कांहीं माल आणला आहे काय ?" मीं उत्तर दिलें कीं, "आज्ञा झाल्यास उदईक

आणीन. " दुसरे दिवशीं मला बोलावण्याकरितां त्यांची मोटार आली. मी सुमारें एक लाख रुपये किंमतीचा माल घेऊन गेलों; त्यापैकीं सुमारें पंधरा हजार रुपयांचा माल त्यानीं खरेदी केला. ज्या दिवशीं त्यांना पदवी अर्पण करण्याचा दरबार होता, त्या दिवशीं त्यांची स्वारी मौल्यवान पोषाख आणि जडजव्हाहीर घालून बंगल्यांतून बाहेर निघाली, त्यावेळीं मीही त्यांच्याजवळ उभा होतों; ते जेव्हां मोटारमध्यें बसूं लागले तेव्हां त्यांच्या कंबरेच्या जवाहिराच्या पट्ट्यांत कांहीं अव्यवस्था झाली; ती त्यांनीं मला जवळ बोलावून दाखविली; मी त्यावेळीं त्यांची बिलकूल खोटी न करतां तो लागलाच त्यांच्या कंबरेस व्यवस्थेशिर रीतीनें बांधून त्यांची रवानगी केली. त्यांनीं मुंबईहून जातेसमयीं माझी बऱ्याच वर्षांची त्यांची सेवा म्हणून म्हणा किंवा त्यांना बहुमान मिळाला म्हणून म्हणा किंवा त्यांचा कंबरपट्टा विलंब न लावतां तत्क्षणीं बसवून दिला म्हणून म्हणा मला त्यांनीं एक बहुमोल पोषाख, मुलास खाऊ आणि ऑफिसांतील मंडळीस पांचशें रुपये दिले. जुन्या पद्धतीच्या राजाच्या औदार्याचा हा एक मासला आहे. आणखी, ते मला म्हणाले कीं, " माझ्या राज्यांत तुह्मां हिंदु लोकांचीं पवित्र स्थानें पुष्कळ आहेत; त्यांचें दर्शन घेण्यास जरूर जरूर या, तुमची व्यवस्था उत्तम ठेवली जाईल. नंतर पांच सहा महिन्यांनीं त्यांचा अंत झाला. हें दुःखकारक वर्तमान ऐकून कंपनीचा एकदम $\frac{१}{५}$ व्यापाराचा आश्रय कमी झाला म्हणून दिलगिरी वाटते !

**श्रीक्षेत्रगाणगापुरः**–सन १९११ सालीं मी, माझे मंडळीसह बंधु तुळशीराम ह्याचें शालक किसन भाऊ, व माझें भाचें जावई सोमनाथ यांशिवाय माझ्या बंधूच्या घरांतील बायका मुलें सुमारें वीस मंडळीसह पुण्याहून श्रीक्षेत्र गाणगांपूर येथें श्रीदत्त दर्शनास जाण्यास निघालों. गाणगांपूर क्षेत्र हें स्टेशनापासून बारा मैलावर मोंगलाईत आहे. आम्ही सर्व मंडळी प्रातःकाळीं बैल गाड्या करून तेथें जाण्यास निघालों; आणि तेथें सर्वत्र सुखरूप पोहचलों. तेथें आमचा चार पांच दिवस मुक्काम होता. देवदर्शन, पूजाअर्चा, ब्राह्मणभोजन वगैरे यथाशक्ति करून तेथुन निघण्याची तयारी केली; त्या समयीं माझें थोरलें कुटुंब सौ. कोंडु आणि धाकटें कुटुंब सौ. सुंदर ह्या मला असें बोलल्या कीं, "आम्ही येथें देवापुढें लावण्यासाठीं सव्वा लक्षवाती केल्या आहेत; त्या देवापुढें लावण्याच्या राहिल्या आहेत. " मीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, " येथें मी देवापुढें वाती लावल्याचें कधीं पाहिलें नाहीं. आतां आपणांस येथून निघून पुढें पंढरपुरास जाणें आहे; तेथें त्या देवापुढें लावूं " दोन गाड्यांत सामान भरलें. माझी भाची ममताबाई हिला मासिक अडचणीमुळें बसण्याकरितां घोडा आणला. त्या वेळीं तिच्या भावांनी तिची अशी थट्टा केली कीं, " आम्ही सर्व मंडळी गाडींत बसणार, आणि तूं एकटी घोड्यावर बसणार; काय तुझा डौल !" म्हणून ती कोणासहि न सांगतां पुढें निघून गेली. आम्ही सर्व

मंडळी देवास नमस्कार करण्यास देवळाकडे गेलों. माळवदावर कांहीं सामान राहिलें आहे काय हें पाहण्याकरितां माझे भाचेजांवई व पुतण्या गजानन हे गेले, ते एका माळवदावरून दुसऱ्या माळवदावर उडी मारताना गजाननचा झोंक जाऊन तो बारा फूट उंचावरून खालीं पडला. या दोन माळवदाच्या मध्यें घराचे काम चाललें असल्यामुळें तेथें दगडाच्या खांडक्या ठेवल्या होत्या, त्यावर तो पडला; त्या त्याच्या कपाळास, हनवटीस आणि खांद्यास लागल्या. तो इतक्या उंचीवरून खालीं पडल्यामुळें आणि भयंकर जखमा होऊन अतिशय रक्त गेल्यामुळें अगदीं बेशुद्ध पडला; थोडीशी धुगधुगी मात्र राहिली होती; तसेच त्याला उचलून घरांत आणले. त्या खेड्यांत कोणी डॉक्टर किंवा वैद्य नव्हता; त्या प्रसंगीं माझ्या मुखांतून असें दुःखोद्गार निघाले कीं, अरे देवा, मी त्याला लहानपणापासून वाढविलें, तो आतां चांगला पंधरा सोळा वर्षांचा झाला, तूं अशा रीतीनें त्याचा शेवट करून आमच्या आशेची सारी निराशा केलीस, हे तूं कांहीं ठीक केलें नाहींस ! हे माझ्या मुखांतून दुःखाचे शब्द निघाल्यावर त्याची आई, चुलत्या व बहीण यांनीं रडण्यास सुरवात केली.हा रडण्याचा कल्होळ देवळांतील व गांवकरी लोकांच्या कानावर गेल्यामुळें ती सर्व मंडळी तेथें गोळा झाली. मी बोललों कीं, " कोणीतरी जाऊन वैद्याला तरी आणा. " तोंच कोणी एक ब्राह्मणाचा बटू सुमारें दहा बारा वर्षांचा होता; त्याची कांती मोठी तेजःपुज होती, त्यानें लंगोटी शिवाय दुसरें वस्त्र परिधान केलें नव्हते, हातांत पळीपंचपात्री घेतली होती; अशा थाटानें माझ्यापुढें येऊन उभा राहीला; आणि मला म्हणाला कीं, " या खेड्यांत वैद्य म्हटले म्हणजे स्वतः देवच होत. आपण देवाची सेवा करण्याच्या कामीं कांहीं तरी चुकलां असाल, याचें स्मरण करा; म्हणजे मुलास तत्काल आराम पडेल. " तेव्हां मीं सर्व मंडळीस विचारलें कीं, " देवाचा नवस फेडण्यास कोण विसरलें आहे काय ? " तेव्हां सर्वत्र मंडळीनें उत्तर दिलें कीं " कोणी नाहीं. " पुन्हां ती बटू मूर्ति म्हणाली कीं, " कांहीं चूक झाली आहे काय याचें स्मरण करा. " मी म्हटलें कीं, " कांहीं बुवा चूक झाली नाहीं. माझ्या शक्तीप्रमाणें मला जी सेवा करावयाची होती तीं केली. " बटूनें विचारलें कीं, " आपण जाण्याच्या वेळीं कांहीं उद्गार काढले होते काय ? " मीं उत्तर दिलें कीं, " माझ्या कुटुंबानें सव्वा लक्ष वाती येथें लावण्यासाठीं तयार केल्या आहेत, त्या मी म्हणालों कीं, येथें लावण्याचा प्रघात नाहीं; . त्या आपण पंढरपुरास जाऊन लावूं. " असे माझ्या मुखांतून उद्गार निघाले होते खरे. बटू म्हणाला कीं, " साक्षात् श्री पांडुरंग आणि श्री दत्त महाराज येथें आहेत. ते आणि हे एकच आहेत; याकरितां त्या वाती आपण आतां येथेंच लावून टाका. प्रथम मुलाच्या अंगाला महाराजांचा अंगारा लावा; म्हणजे, तत्काल त्याला आराम पडेल. " असें सांगून तो मुलगा गेला. मीं लागलाच देवळांत जाऊन देवाचा अंगारा

आणला; आणि तो मीं श्रीदत्त प्रभूचें नांव घेऊन मुलाला लावला. सव्वा लक्ष वाती लावण्यासाठीं तीन चार रुपयांचें तूप विकत आणून त्या देवळांत देवाजवळ लावल्या. तोंच गजानन एकदम शुद्धीवर येऊन असें म्हणाला कीं, "आपण सर्व देवदर्शन करून आलां अहांत; आतां मी जाऊन दर्शन करून येतों." ही त्याची इतक्यांत इतकी हुशारी पाहून सर्व मंडळीस मोठा आनंद झाला आणि चमत्कार वाटला. मुलगा चांगला हुशार झाला.

या सर्व मंडळींत माझी भाची ममताबाई ही मला कांहीं दिसली नाहीं; तेव्हां तिच्या शोधास मंडळी पाठविली. पाटील कुलकर्णी व गांवकरी यांना कळविलें. नंतर एकानें असा तर्क केला कीं, मासिक अडचणीमुळें यदाकदाचित् ती पुढें निघून गेली असेल; म्हणून तिचा शोध करण्यास माझा जांवई सोमनाथ यांस घोड्यावर बसवून पाठविलें; त्यानें असा शोध लावून आणला कीं, 'ममताबाई येथून तीन मैलांवरील एका गांवाजवळ बसली आहे. हें वर्तमान समजल्यावर आम्ही देवदर्शन करून निघालों; मुलगी सांगितल्या ठिकाणीं बसलेली भेटली; तिला घेऊन गाणगापुरच्या स्टेशनावर गेलों. तेथें आम्हांला असें आढळून आलें कीं, वरील गडबडींत एक आमचें कपड्याचें गांठोडें चोरीस गेलें; त्यांत शेंसव्वाशें रुपयांचे कापड होते. आम्ही पंढरपुरचें तिकीट काढून पंढरपुरास जाण्यास निघालों. मी आगगाडींत बसून या घडलेल्या अपघाताविषयीं विचार करीत असतां मी आपल्या मनाशीं असें ह्मणालों कीं, "देवा, अज्ञानपणामुळें क्षुल्लक चूक झाली त्यास इतकी मोठी जबरदस्त शिक्षा नको होती." आणखी त्या गांवांत वर वर्णन केलेला मुलगा कोणाचाहि नाहीं, असें मला पुजारी सेवेकरी वगैऱ्यांनीं सांगितलें; त्यामुळें त्या मुलासंबंधानें माझ्या मनांत अत्यंत पूज्यबुद्धि उत्पन्न झाली; आणि ती प्रत्यक्ष भगवंताचीच मूर्ति होती अशी माझ्या मनाची भावना मागाहून झाली; तेव्हां आणखी मी आपल्या मनाशीं असें म्हणालों कीं, 'आपण बटूवेषाने मला दर्शन दिलें, याबद्दल मी आपणांस मोठा धन्य समजत आहें; पाडुरंगा, धन्य तुझी! आणि धन्य तुझी आगाध लिला!!!

**श्रीक्षेत्र पंढरपूरः**—मी आपल्या मनांत असा विचार करूं लागलों कीं, पंढरपुरास देवळांत नेहमीं मनस्वी दाटी असते; त्यामुळें देवाचें बरोबर दर्शन घडत नाहीं; आणि माझ्याबरोबर पुष्कळ बायकामुलें आहेत; त्यांना दर्शन कसें घडेल? याच चिंतेंत मी होतों. इतक्यांत आमची गाडी पंढरपूर स्टेशनावर येऊन दाखल झाली. विश्वनाथ गोपाळ हे आमचे बडवे होते, हे मोठे श्रीमान व सुशील आहेत. यांना आम्हीं येण्याची अगाऊ सूचना केल्यामुळें त्यांचा मनुष्य आम्हांस घेण्यासाठीं स्टेशनावर आला होता; त्यांच्याबरोबर आम्ही सर्वत्र मंडळी चंद्रभागेवर आलों; तेथें स्नान करून सामान बडव्याच्या मनुष्याबरोबर बिऱ्हाडीं रवाना केलें; आणि आम्ही देवाची धुळभेट घेण्यास देवळांत गेलों. तेथें अतिशय गर्दी

होती; ह्मणून मी आपल्या मंडळीस एका बाजूला उभें केलें. मी, माझा पुत्र चि. सदाशिव यास बरोबर घेऊन देवाजवळ जाण्याचा प्रयत्न करूं लागलो. माझ्या शेजारी एक वृद्ध बाई सुमारें ८०।९० वर्षांची उभी होती; ती मला बोलली कीं, "मी अति वृद्ध व अत्यंत अशक्त आहे; मी येथें दोन तास उभी आहें; पण माझा कांहीं देवाजवळ शिरकाव होत नाहीं. आपण तरी मला देवदर्शन घडवा." मला तिची मोठी कींव आली; आणि तिला असें उत्तर दिलें कीं, "बाई, कांहीं हरकत नाहीं. प्रथम मी तुला दर्शन करून देईन आणि नंतर मी करीन." पण एकसारखी गर्दी उडाल्यामुळें रिघाव कांहीं होईना. इतक्यांत एक देवाचा लठ्ठंभारती पुजारी आपल्या दोन्ही हातांच्या कोपरांनीं गर्दी हटवीत चालला होता; त्याच्या कोंपराचा मार माझ्या छातीस मोठ्या जोरानें लागला. त्यासारखा मी खालीं बसलो. हें माझे बंधु, बंधूचे शालक व पुतणें यांनीं पाहून ते रागानें मोठें चवताळून त्याच्या अंगावर गेले आणि देवाजवळ चाललेल्या त्या गलेलठ्ठ व अगडबंब भटास खेंचून गरुडखांबाच्या मंडपांत आणून त्याला चांगलें चत्रदावें रत्न दाखाविलें आणि त्याची कणीक चांगलीच मऊ केली. त्यावेळीं मी मध्यें पडून त्यांची अशी समजूत केली कीं, "हा देवाचा पुजारी आहे, याला कोणीं मारूं नये." हा चाललेला सर्व प्रकार तेथें असलेले देवळाच्या बंदोबस्ताचे पोलिस पाहत होते. मीं त्या पोलिसांना विचारलें कीं, "असाच काय आपण देवळामध्यें पोलिस बंदोबस्त ठेवीत आहांत?" मीं त्या चौघां पोलिसांचें बकल नंबर टिपून घेतले. इतक्यांत आमचा बडवाहि आला. त्यानें आमचें सर्वांचें देवदर्शन करविलें; आणि मी त्या वृद्ध स्त्रीसहि चांगलें दर्शन करून दिलें. नंतर आम्ही सर्व मंडळी आपल्या बिऱ्हाडीं निघून आलों. आमचीं स्वयंपाक करण्यास सुरवात होते न होते तोंच माझ्याकडे त्या गलेलठ्ठ पुजाऱ्याच्या विरुद्ध असलेली उत्पात व पुजारी मंडळी आली; आणि मला म्हणाली कीं, 'ज्यानें तुम्हांला देवळांत त्रास दिला हा घरचा मोठा श्रीमंत आहे; पण अति अनाचारी आणि दांडगा आहे. हा यात्रेकरूंना मनस्वी त्रास देतों. आपल्यासारख्यांनीं त्याचा बंदोबस्त केल्यास फार उत्तम होणार आहे. इतकेंच नाहीं, तर आपणांस मोठें पुण्य प्राप्त होणार आहे. पुढें पोलिस इन्स्पेक्टरला ही देवळांतील हकिकत समजल्यावरून तेहि माझ्या बिऱ्हाडी आले; आणि मला म्हणाले कीं, "ज्यानें आपणांस त्रास दिला त्याच्यासंबंधानें आपण आमच्याकडे रिपोर्ट करा म्हणजे आम्ही त्याचा योग्य बंदोबस्त करतों." मीं सर्वांचें भाषण शांतपणें ऐकून घेतलें आणि त्यांना असें उत्तर दिलें कीं, "मी आपल्या म्हणण्याचा विचार करीन." तेथील मामलेदार हें माझ्या ओळखीचें असल्यामुळें तेहि रात्रीं माझ्या बिऱ्हाडीं मला भेटण्यास आले; त्यांचेंहि मत त्या बडव्याच्या विरुद्ध पडलें. मीं आपल्या मनाशीं असा विचार केला कीं,

आपण येथें देवदर्शनास आलों आहोंत; आपल्या हातून देवाचा कांहीं तरी अपराध घडला असावा; म्हणूनच त्यांनीं मला ही शिक्षा केली असावी. असा विचार करून मीं पुढें त्या बडव्याविरुद्ध कांहीं केलें नाहीं. परंतु देवाची लीला देवच जाणे ! दुसऱ्या दिवसापासून माझी मंडळी त्रिकाल देवदर्शनास जात होती. त्यावेळीं देवळांत कितीही गर्दी असली तथापि तेथील पोलिस वगैरे गर्दी हटवून माझ्या मंडळीस चांगलें देवदर्शन करून देत असत. देवाच्या मनांत असें करणें होतें म्हणूनच मला प्रथमच्या दर्शनास धक्का देवविला. हा त्याचा मला साक्षात् चमत्कार झाला असें मी समजतों. माझा पंढरपुरास दहा बारा दिवस मुक्काम होता. माझे धाकटें कुटुंब सौ. सुंदर हिची माहेरकडील आप्तमंडळी बार्शीस होती; त्यांना तार करून येथें बोलावून घेतलें. देवब्राह्मण पूजा वगैरे यथासांग केली. देवाचा मौल्यवान जवाहिरखाना पाहिला. तेथील रहिवाशी व कामानिमित्तानें आलेले व बार्शीहून बोलाविलेल्या माझ्या जातीच्या सुमारें पन्नास मंडळीस भोजन दिलें; माझ्या कुटुंबांनीं आपल्या सर्व जातींतील सर्व सव्वाष्णी स्त्रियांना चोळीचें खण वांटले. या वेळीं माझ्या थोरल्या कुटुंबानें आपलें एकादशी व्रतही उजवले. नंतर आम्ही तेथून दुसऱ्या दिवशीं निघून पुण्यास आलों.

**नारायणनागबळीः**—सन १९१० सालीं ता. २८ फेब्रुवारी संवत १९६६, रोजीं मी, माझे पहिलें आणि पांचवें कुटुंब, कन्या शांताबाई, पुत्र सदाशिव व एक गडी बरोबर घेऊन श्री गोदावरीच्या स्नानाकरितां नाशिकास गेलों; तदनंतर तेथून श्री त्र्यंबकेश्वरास गेलों. तेथें आमचा मुक्काम आठ दहा दिवस होता; त्या वेळीं मी नारायणनागबळी, महारुद्रअभिषेक, अलंकारसहित देवपूजा, सोमवारव्रताचें उद्यापन, सुमारें दोनशें ब्राह्मणांस सुग्रास भोजन, क्षेत्रांतील अनाथ पंगूस साधे जेवण घातलें. मी जेव्हां माझ्या द्वितीय कुटुंबाच्या वेळीं येथें आलों होतों तेव्हां पिशाचविमोचन बलीदान केलें, आणि चवथ्या कुटुंबाच्या वेळीं कपिलादानविधि केला. आम्हीं सर्वत्र मंडळी त्र्यंबकेश्वराहून भाचे रामचंद्र यांच्या द्वितीय विवाहाकरितां पुण्यास निघून आलों.

**वडीलबंधूचा अंतकाळः**—माझे वडील बंधु बाळारामजी यांना मूत्रपिंडाचा विकार होता; तो बरा होण्यासाठीं शस्त्रक्रिया केली पाहिजे, असें डॉक्टरांचें मत पडलें; म्हणून ते रजा घेऊन बरोबर दत्ताराम, आचारी व गडीसह मिरजेस गेले; आणि तेथें डॉक्टर वॉनलेससाहेब यांच्या हातून शस्त्रक्रिया केली. त्याच्या योगानें जरी त्यांना थोडा आराम पडला खरा, तथापि वयोमानाप्रमाणें प्रकृति क्षीण झाली होती, त्या समयीं मीं त्यांना नम्रपूर्वक अशी विनंति केली कीं, तुमचीं दोन्ही मुलें कर्ती झालीं आहेत; यासाठीं आतां आपण रेल्वेंतून ग्राच्युएटी घेऊन नोकरींतून मोकळें होऊन वस्थ विश्रांति घेत बसावें. परंतु मनुष्य प्राण्याला लोभ हा कांहीं केल्या सोडवत

नाहीं; आणि सुटतहि नाहीं; त्यामुळें ते पुन्हां आपल्या नोकरीवर रुजू झाले. सुमारें एक महिना काम केल्यावर पुन्हा आजारी पडले; आणि माझ्या वाड्यांत औषधोपचारासाठीं येऊन राहिले. आम्हीं सर्व मंडळी त्यांना वडिलांसमान समजून त्यांची योग्य रीतीनें सेवा करीत होतों, त्यांच्या ठिकाणीं सर्वांचें लक्ष काळजीपूर्वक होतें; आणि तेहि आम्हांसर्वांबरोबर प्रेमानें आणि मोकळ्या मनानें वागत होते. परंतु त्यांचें तिसरें कुटुंब आणि वडिल चिरंजीव यांच्या मनांत विपरीत विचार आला; आणि ते नाराज असतांहि त्यांना आमच्या घरांतून आणि मंडळींतून काढून आपल्या राहत्या घरीं म्हणजे न्याहालपेठ घर नं. ५ येथें नेलें. त्यांची तेथें व्हावी तशी सुश्रूषा होत नसल्यामुळें त्यांचा विकार वाढत चालला; आणि त्यांचें प्रकृति सुधारण्याचें चिन्ह हें कांहीं बरें दिसेना; म्हणून मीं त्यांच्या बरोबरीची जी मंडळी त्यांच्या भेटीस व समाचारास येत होती त्यांना मी अशी सूचना केली कीं, यांना दोन कुटुंबांपासून संतति झाली आहे; यासाठीं यांच्या पश्चात् आपसांमध्यें वाद उत्पन्न होऊं नये आणि आम्हांसहि त्रास होऊं नये यासाठीं त्यांनीं या प्रसंगीं आपले व्यवस्थापत्र जर केलें तर फार बरें होणार आहे. मीहीं त्यांना स्वतः समजावून सांगितल्यामुळें तेहि आपलें व्यवस्थापत्र करण्याच्या विचारांत होते; आणि त्याप्रमाणें त्यांनीं मला आज्ञा केली होती; परंतु त्यांचें वडील चिरंजीव यांस हें मुळींच आवडले नाहीं; त्यांची अशी इच्छा होती कीं, मी वडील मुलगा असल्यामुळें सर्व कांहीं आपणांस मिळावें, अशी त्याची इच्छा दिसून आल्यावरून माझ्या वडीलबंधूनीं माझें व नानाभाऊंच्या समक्ष आणि चारी मुलें यांना रोख व दागिने सुमारें सहा सात हजारांचे वांटून दिले; आणि त्यांनीं विकत घेतलेलीं घरें पुणें व लोणावळें येथें आहेत याचाहि निकाल कळविला. शेवटीं असें म्हणाले कीं, "रहातें घर नंबर पांच न्याहालपेठ हें माझे धाकटे बंधु गणपतराव यांच्या हक्काचें आहे; यासाठीं आपण त्यांच्या मर्जीप्रमाणें वागल्यास ते आपणांस कोणत्याहि प्रकारचा त्रास देणार नाहींत. त्यांनीं आपल्या घराण्याची अब्रू व सुलौकिक फार चांगला वाढविला आहे. तुम्ही त्यांच्या आज्ञेप्रमाणें वागल्यास त्यांत तुमचेंच हित व कल्याण आहे. ते तुम्हांस कधींहि अंतर देणार नाहींत." हे शब्द माझी वडील भावजय सौ. कृष्णाबाई हिला वाईट वाटून तिनें असा स्पष्ट जबाब दिला कीं, "मी त्यांच्या आज्ञेंत कधींहि वागणार नाहीं." अर्थातच त्यावेळीं मलाहि बोलण्याचा प्रसंग आला; मी म्हणालो कीं, आपल्या पश्चात् या रहात्या घराचा वाद उत्पन्न होण्याचा संभव दिसत आहे; आणि त्याप्रमाणें त्यांचा वडील चि. लक्ष्मण याचा रंगहि मला तसाच दिसून आला; त्यामुळें निरुपायास्तव मला वडील बंधूस वकिलामार्फत अशी नोटीस द्यावी लागली कीं, "आपण राहात आहांत तें घर दान, गहाण, बक्षीस, विक्री किंवा कोणत्याहि प्रकारची विल्हेवाट करूं नये !" या नोटीशीबद्दल त्यांच्या वडील पुत्रास

मोठा त्वेष आला; परंतु माझे बंधु कांहीं एक बोलले नाहींत. उलट आपल्या मुलाची समजूत केली. धाकटे चिरंजीव नोकरीवर होतें. वडील चिरंजीव दांभिक आणि स्वार्थ हेतूनें रोग्याची शुश्रूषा करीत होते, एके वेळीं मी आणि इतर नातलगांचे समक्ष त्यानें पैशासंबंधी वाद सुरू असतां रोग्याच्या छातीवर सुमारें १००,१२५ गीनींची पिशवी जोरानें फेंकली. त्यापासून रोग्यास काय त्रास झाला असावा आणि त्याचे अपत्यास काय वाटलें असावें ! मी त्याच्या वडिलांच्या समाचारास जात होतों; हें त्याला आतां आवडेनासें झालें; आाणि मीं त्याच्या घरीं वरचेवर जाऊं नये अशा गोष्टी तो करूं लागला; म्हणून मी मोठ्या दुःखानें व त्रासानें मुंबईस निघून गेलों. पुढें माझ्या वडील बंधूच्या समक्षच यांच्याजवळ कांहीं तरी अधिक असावें किंवा कोठें तरी छपवून ठेवलें असावें यासंबंधाचा वाद त्यांच्या कुटुंबांत उत्पन्न झाला; या वादामुळें रोग्याचे फारच हाल होऊं लागले. प्रकृति सुधारण्याच्या ऐवजीं ते मृत्युपंथास लागले; आणि ते ता० ८ जानेवारी सन १९११ रोजीं वारले ! मला जेव्हां त्यांच्या मृत्यूची तार मुंबईस आली तेव्हां मी पुण्याल निघून गेलों. त्यांच्या हुशार चिरंजीवानें त्यांची आणि माझी शेवटची भेट होऊ दिली नाहीं ! ! ! याचे मला जेव्हां जेव्हां स्मरण होते तेव्हां तेव्हां माझ्या मनाला पराकष्ठेचें दुःख होते. त्यांचा मुलगा चि. शंकरराव हा लोणावळ्यास नोंकरीवर होता; त्याची नऊ तास वाट पाहिली, पण त्यालाहि त्याच्या वडिलाचें शेवटचें दर्शन झालें नाहीं; याबद्दल तोहि फार दुःख करीत होता. बंधूंच्या मागें त्यांची स्त्री, पुत्र ४, सुना २, कन्या १, नातूनाती ७, बंधु २ व त्यांची आप्त मंडळी इतका परिवार आहे. माझ्या बंधूंच्या प्रेतयात्रेस चार पांचशें मंडळी होती. त्यांच्या अस्थि चि. शंकर आणि त्यांचे जांवई पाडुरंगजी या उभयतांनीं प्रयागास नेल्या. त्यांचा दिवस जातींतील सर्वत्र मंडळीस आणि इतरांस मालपोह्याचा घातला.

माझे वडील बंधु यांची शरीरप्रकृति चांगली सशक्त व निरोगी होती. त्यांना अश्वपरीक्षेचे चांगलें ज्ञान होतें. ते घोड्यावर बसणारे उत्तमापैकीं होते; त्यांनीं शिकंदरबादेंतील घोड्यांच्या शर्यतीमध्यें आपल्या स्वतःच्या स्वारीच्या घोड्यावर बसून दोन वेळां शर्यत जिंकली. आणखी, दुसऱ्याच्या घोड्यावर बसून दोन वेळां शर्यतींत पहिला नंबर मिळविला. एके प्रसंगी ते घोड्यावरून खालीं पडले, त्यामुळें त्यांना इतकी इजा झाली कीं, त्या वेळीं त्यांचा पुनर्जन्म झाला. हीं त्यांची अवस्था पाहून वडिलांनीं त्यांना अशी ताकीद केली कीं, तूं अतःपर शर्यतीमध्यें घोड्यावर बसण्याचे सोडून दे. वडीलाज्ञेमुळें त्यांनीं त्या दिवसापासून शर्यतीमध्यें घोड्यावर बसण्याचें वर्ज्य केले.

मी जेव्हां वाशिमास होतों तेव्हां हींगोलीस तलावाचे काम चाललें होतें; तेथें निजाम सरकारची फौज होती; त्या फौजेवरील एका युरोपिअन कर्नलनें एक

उत्तम स्वारीचा घोडा सोळाशें रुपयांस विकत घेतला; तो विकत घेऊन तीन दिवस झाले नाहींत तोंच कर्नल साहेबांचा अंत झाला; त्यामुळें त्याच्या मडमेनें तो घोडा सोडत काढून विकला. प्रत्येक टिकीटाची किंमत दहा रुपये ठेवली होती. मींहि एक तिकीट विकत घेतलें. माझ्या तिकीटाच्या नंबरावर तो घोडा मला आला. इतक्या थोडक्या किंमतीमध्यें मला इतका उमदा घोडा मिळाला ह्मणून मला मोठा हर्ष झाला; पण वडील बंधु आणि हाताखालची मंडळी यांनीं आपली नापसंती दर्शविली; कारण याचा पायगुण चांगला नाहीं. हा घोडा माझ्या घरीं आला त्याच्या तिसऱ्या दिवशीं माझें एक कंत्राटी काम नापसंत होऊन माझें तीन हजार रुपयांचें नुकसान झालें; ह्मणून वडील बंधूंनीं तो घोडा विकण्याकरितां उमरावती व अकोला येथें पाठविला; परंतु तो कोणी विकत घेण्यास धजेना! शेवटीं मीं तो घोडा **श्रीबालाजीस** अर्पण केला.

**घरासंबंधीं वादः**— मी वडील बंधूच्या दुःखी मंडळीच्या मनाचें सांत्वन केलें; आणि वडील या नात्यानें त्यांना योग्य उपदेशहि केला. तदनंतर आठचार दिवसांनीं दोघें बंधु लक्ष्मण व शंकर दुसरी दोन तीन मंडळी बरोबर घेऊन माझ्या घरीं आलें; आणि मला विचारूं लागले कीं, " आम्ही राहतों त्या घराचा आपण काय विचार करणार आहांत ? " मी त्यांना असें उत्तर दिलें कीं, ' ज्याप्रमाणें माझे वडील बंधु राहत होते, त्याप्रमाणें आपणहि त्या घरांत आनंदानें खुशाल रहावें; आणि तुह्मी राहून जें उत्पन्न होईल तें तुम्हीं घराच्या दुरुस्ती करण्याच्या कामीं लावावें. तुमच्या वडिलानीं व्यवस्थापत्र केलें नाहीं यामुळें पुढें मागें वादाचा प्रश्न उत्पन्न होऊं नये; म्हणून तुम्हीं मला रीतीप्रमाणें भाडे चिठ्ठी लिहून द्या. ' परंतु त्यांनीं मला भाडेचिठ्ठी लिहून दिली नाहीं; पण मला उलट असें उत्तर दिलें कीं, "तुमच्याजवळ जी कांहीं इस्टेट आहे त्या सर्वांचा आम्हांस निम्मा हिस्सा मिळाल्यावर आम्ही आपणांस भाडेचिठ्ठी लिहून देऊं. " आणि या दिशेनें त्यांचे प्रयत्न, खटपट व कारस्थान सुरू झालें. त्यांचें राहतें घर न्याहालपेठ नं. ५ याची त्यांनीं कोणत्याहि प्रकारें अफरातफर करूं नये; म्हणून मी त्यांना वर्तमानपत्रांतून नोटीस दिली; आणि पुष्कळ चांगली चांगली मंडळी मध्यस्थी घालून त्यांना असें कळविलें कीं, " जग हें तमाशा पाहणारें आहे. ज्यांत आपलें अहित होत आहे असें आपण कधींहि करूं नये. माझी नुकसानी तीच तुमची नुकसानी, आणि तुमची नुकसानी तीच माझी नुकसानी असें समजून वागा. " हें माझें म्हणणें त्यांना रुचलें नाहीं. ते आपल्या मंडळीच्या नादीं लागून माझ्याबरोबर अमर्यादशीलपणानें वर्तन करूं लागले; आणि माझी सर्व गांवांत न शोभेल अशी टीका आणि निंदा सुरू केली; तथापि मी त्याची मुळींच पर्वा न करतां पुन्हा त्यांना समजावून सांगितलें कीं, अशा करण्यांत तुमचेंच नुकसान आहे. मी जितकी जितकी त्यांची समजूत करण्याचा प्रयत्न करूं लागलों, तितके तितके ते माझ्या

आधिकच विरुद्ध जाऊं लागलें ! असो, दैव आपलें ! असें समजून मोठ्या कष्टानें आणि निरुपायानें मी आपल्या धाकट्या बंधूच्या हातून आपलें वडिलोपार्जित घर आपल्या ताब्यांत मिळावें ह्मणून कोर्टात सन १९११ मध्यें दावा नंबर ३३१ चा मांडला; कोर्टानें दोन्ही पक्षांकडील पुरावा ऐकून घेतला. बंधूला आपल्या तर्फे पुरावा हजर करते वेळीं चांगल्या संभावित लोकांना तसदी द्यावी लागली. अशा खटल्यांत विरुद्धपक्षाकडून मोठे अब्रुदार व सत्यभाषण करणारे यांनीं देखील प्रतिज्ञेवर आपल्या विवेकाविरुद्ध जबान्या दिल्या ! ! ! याचें मला फार वाईट वाटत आहे. वडील बंधु बाळरामजी यांनीं लोणावळ्याहून मला अशीं तीन चार पत्रें पाठविलीं होतीं कीं, आम्ही राहतों तें घर (न्याहालपेठ घ. नं. [illegible]) हें तुमच्याच मालकीचे आहे यासंबंधानें आपण अगदीं बेफीकीर असावें. याच पत्रावरून खटल्याचा निकाल ता. २८ मे सन १९११ रोजीं माझ्या कनिष्ठ बंधुच्या तर्फेनें झाला. जरी खटल्याचा निकाल माझ्या बंधुसारखाच झाला, तरी ताबा देईनात; त्यामुळें नाझरामार्फत ताबा घेण्याचा प्रसंग आला. या वादांत विनाकारण मला घराच्या किंमतीइतका खर्च आला ! तीर्थ० बाळारामजींचे दोन पुत्र चि. लक्ष्मण व चि. शंकर यांचा संभाळ व विद्याभ्यास आणि त्यांचीं लग्नेंहि मीच केलीं, असें असतां त्यांनीं कोर्टापर्यंत प्रकरण नेलें याचें मला राहून राहून वाईट वाटत आहे; कारण ते मला आपल्या वडिलापेक्षां अधिक मान देत होते; हा सारा चिथावणीचा परिणाम होय !

**राजमान्य जुगार अर्थात् घोड्यांच्या शर्यती.**

घोड्याच्या शर्यतीमध्यें जुगार खेळण्याचा ज्यांना ज्यांना म्हणून नाद लागला आहे; त्यांत त्यांना यश आलें नाहींत; उलट त्यांचें सर्व जाऊन ते भिकेस मिळाले आहेत; आणि शेवटीं, कित्येकांना आत्महत्त्या करण्याचा प्रसंग आला !!! अशीं आपण पुष्कळ उदाहरणें घडलेलीं पाहिलीं आहेत. या नादास लागलेल्यांपैकीं कोणी उदयास आलेला असा क्वचितच असेल; पण नाश झालेल्यांचीं शेकडों उदाहरणें आपणांस दाखवितां येतील. घरास घूस लागूं नये, लांकडास उधई लागू नये, त्याप्रमाणें तरुणांस जुगाराचा नाद लागूं नये; पण माझे धाकटे बंधु तुळशीराम यांस हा नाद लागला ! मी मोत्यांचा व्यापार करीत आहें; सोईस्कर इष्टेट विकत घेत आहें असा बहाणा करून ते मजपासून हजारों रुपये घेऊन जात होते. ज्या भावावर माझा पूर्ण विश्वास होता. मला संतति वगैरें नसल्यामुळें माझा सर्व आधार त्यांच्यावर आणि त्यांच्या संततीवर होता; हें कुटुंबवत्सल असून निरुद्योगी असल्यामुळें यांना आपणावर किती मोठी जबाबदारी आहे हें कळण्याचें त्यांना ज्ञान असेल असा मला त्यांच्यासंबंधानें भरंवसा होता; पण हा भ्रमाचा भोपळा फुटला !!! जेव्हां माझ्या नजरेस घरांतील दागिने कमी झाल्याचें आणि मीं त्यांना तीन घरें

विकत घेऊन दिलीं होतीं तींही त्यांनीं विकून टाकल्याचें आलें तेव्हां मीं चौकशी करण्यास सुरवात केली. तुमच्या व्यापाराचा जमाखर्च मला दाखवा आणि तुमची शिल्लक कोठें आहे तीही मला दाखवा, त्यावेळीं मला अनेक उडवाउडवींचीं उत्तरें देऊं लागले, शेवटीं त्यांनीं मजजवळ असें कबूल केलें कीं, मीं अपराधी आहें आणि तुम्हांस बुडविलें. आपणांकडून मी मागवीत असलेली रकम सारी घोड्यांच्या शर्यतीमध्यें घालविली ! ! झालें ! भ्रमाचा भोपळा एकदाचा फुटला ! ! ! ज्या व्यापारांत जमाखर्च नाहीं, आणि ज्या कुटुंबांत खर्चीकपणाला मर्यादा नाहीं; त्या कुटुंबांतील मंडळी तशाच वळणावर जाणार. अशा प्रकारचे अनपेक्षित पाझर फुटल्यामुळें आमच्या जातींत ज्यांच्या वडीलांनीं आपल्या संततीस दरमहा पांचशें, तीनशें, व दोनशें रुपयाचें उत्पन्न होईल अशी इस्टेट करून ठेवली होती; पण त्याच्या संततीस या जुगाराचा नाद लागल्यामुळें ते अगदीं कफलक बनले आहेत. हाच दुर्गुण माझ्या नातलगांना लागल्यामुळें त्यांनीं माझ्या पैशाचा चुराडा उडवून त्यांनीं आपल्या मुलांचाहि नाश केला. मी आपल्या वृद्धापकाळांतलि सुखशांतीस सर्वस्वी मुकलों.

**श्री मातृगया आणि डाकुरः**— मी सन १९१२ सालीं मिरजेहून परभारें श्री सिद्धपुरास गेलों. तेथें माझा तीन दिवस मुक्काम होता. मीं तेथील सर्व धर्मविधि केलें. माझा द्वारकेस जाण्याचा विचार होता; पण तो मला माझ्या प्रकृतीच्या अस्वस्थतेमुळें रहित करावा लागला; परत येते समयीं अहमदाबाद, डाकूर, बडोदें सुरत वगैरे पाहत पाहत मुंबईस आलों; आणि तेथील कामकाजाची व्यवस्था पाहून परत मिरजेस गेलों.

**माझें पांचवें कुटुंबः**—सौ. सुंदरा ही चि. सदाशिवाच्या जन्मापासूनच आजारी होती; ती बरीं होण्यासाठीं मुंबईतील पुष्कळ नामांकित डॉक्टरांचे औषधोपचार केलें; पण कांहीं गुण नाहीं. तिला गर्भस्राव झाल्यामुळें ती फार आजारी झाली; म्हणून मी तिला घेऊन पुण्यास गेलों. तेथें तिच्या मांडीस एक गळूं झालें; त्यापासून ती फारच गळाली; आणि हिचें कांहीं ठीक चिन्ह नाहीं असें वाटूं लागलें. मुंबईचे डॉक्टर शिरगांवकर आणि पुण्याचें डॉक्टर मोदी व नायडु यांनीं तिचे गळूं कापून काढलें. त्यामुळें तिला थोडा आराम पडला. पुढें डॉक्टरच्या सूचनेवरून तिला हवा बदलण्यासाठीं मिरजेस नेलें; तेथें तिला दोन महिने ठेविलें होतें. तेथें तिची प्रकृति बरीच सुधारली. नंतर एकंदर मंडळीसह कोल्हापूरची देवी **श्री अंबाबाई**, नरसोबाच्या वाडीचे **श्री दत्तमहाराज** आणि औदुंबरचे **श्री सद्‌गुरु महाराज** यांचें दर्शन घेऊन पुण्यास आलों; त्यावेळीं मीं तुळशिरामास कळविलें कीं, ' डॉक्टरच्या आणि माझ्या मतानें हिला आणि तिच्या मुलाला मुंबईच्या हवेवर ठेवणें हें अपायकारक होणार आहे; म्हणून माझी हिला येथेंच ठेवण्याची फार इच्छा आहे; तुम्ही येथें हिची सर्व व्यवस्था पहा. ”

पण इतकी गोष्ट देखील त्यांनीं कबूल केली नाहीं. त्यामुळें मला मोठ्या निरुपायानें तिला मुंबईला घेऊन जावें लागलें ! मुंबईंत आल्यावर ती गरोदर राहिली; पूर्ण मास भरल्यावर तिला पुण्यास पाठविलें; तेथें ती प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. पण तो उपजतांक्षणींच मरण पावला. हा मुंबईच्या हवेचा परिणाम म्हणा किंवा माझें दुर्दैव म्हणा! माझ्या जन्मपत्रिकेंत लिहिल्याप्रमाणें सर्व गोष्टी बरोबर घडून आल्या खऱ्या; पण माझ्या वृद्धावस्थेंत आणि अंतकाळ होईपर्यंत मला दोन पुत्रांचें सुख लिहिलें होतें. पण येथें मात्र पत्रिकेस बाध आला. आणि हस्तरेषा चुकली ! असो, ती बाळंत झाल्यावर तिची प्रकृति फारच बिघडली. पुष्कळ इलाज करून पाहिले; पण तिला बिलकूल आराम पडला नाहीं. डॉक्टरांचा सल्ला असा पडला कीं, मिरजेस घेऊन जावें; त्यामुळें सन १९१३ च्या फेब्रुवारी महिन्यांत तिच्या मरणोन्मुखावस्थेंत तिला मिरजेस घेऊन जावें लागलें. तेथील डॉक्टरांनीं तिला तपासलें आणि मला सांगितलें कीं, 'हिला क्षय झाला आहे, हें आम्हीं तुह्मांला पूर्वींच कळविलें होतें; आपण हिला कोणत्या हवेवर ठेविलें होतें?" तेव्हां मीं सांगितलें कीं, "मुंबईच्या हवेवर ठेविलें होतें." डॉक्टर म्हणाले, "ही आपण फारच वाईट गोष्ट केली; आतां ती येथें आपले आयुष्याचे दिवस काढील. पण ती बरी होणार नाहीं, कारण, आतां तिचें दुखणें अगदीं असाध्य झालें आहे." मला तेथें तिच्या जवळ रहावें लागलें आणि तिची शुश्रुषा करावी लागली; त्यामुळें माझ्या व्यापारास बराच धक्का बसला. त्याप्रसंगीं मी, माझे बंधु, पुतणे, भाचे वगैरे मंडळीस अशी विनंति केली कीं, आपणापैकीं कोणीं तरी मिरजेस येऊन रहावें; पण त्यांनीं न येण्यासंबंधानें उडवाउडवीचीं उत्तरें दिलीं. शेवटीं निरुपायामुळें तिच्या जवळ माझ्या थोरल्या कुटुंबास ठेवून मी मुंबईस निघून आलों. तिच्याजवळ तिचीं दोन्ही लेकरें ठेवलीं होतीं. यासमयीं चि० सौ० अनुसूयाबाई ही वाताच्या विकारानें आजारी होती आण तिच्या कन्येच्या जिवाला बरें नसल्यामुळें तिच्या पतीनें यांना मिरजेस पाठविलें होतें. या कुटुंबाच्या दुखण्यामुळें माझा व्यापार या वेळीं निम्मे पेक्षांही कमी झाला.

सुमारें तीन चार महिने मीं माझ्या कुटुंबाला मिरजेस ठेविलें होतें. पण प्रकृति सुधारण्याचें कांहींच चिन्ह दिसेना; ती असें म्हणूं लागली कीं, 'मला येथें आराम पडत नाहीं; यासाठीं मला पुण्यास घेऊन चला; पण त्या वेळीं पुण्यास प्लेग होता; त्यामुळें तिला तेथें नेणें बरें नाहीं; म्हणून मीं एकंदर मंडळीसह तिला मुंबईस आणिलें, येथें आल्यावर ती दिवसानुदिवस अधिकाधिकच क्षीण होत चालली; ती जरी इतकी क्षीण झाली होती तरी तिनें आपल्या तुळशीच्या आणि शीतला देवीच्या पूजेमध्यें कधींच अंतर पडूं दिलें नाहीं. तिच्या पिशवीमध्यें सुपारीएवढा शालिग्रामासारखा एक गोटा होता; तो तिला वाडींतील कृष्णानदींत सांपडला होता; त्याची ती नित्य नेमानें पूजा करीत असे. तो गोटा एके दिवशीं तिच्या पिशवींतून नाहींसा

झाला; त्या दिवशीं तिनें असे उद्गार काढले कीं, ' आतां माझा अंतकाळ जवळ आला आहे. येथें जागेची मोठी अडचण आहे. यासाठीं मला पुण्यास घेऊन चला.' परंतु अशा स्थितींत तिच्या इच्छेप्रमाणें व्यवस्था करितां आली नाहीं. नंतर लवकरच तिची बोलण्याची शक्ति गेली; आणि ती आपले विचार आपल्या बोटाच्या खुणेनें दर्शवूं लागली; असें पांच सहा दिवस चाललें होतें. ता.१९ नवंबर सन१९१३ या दिवशीं तिला बोलण्याची चांगली शक्ति आली. तिच्या शुश्रुषेस तिची वडील सवत असे. ती वारंवार तिच्याजवळ असे उद्गार काढीत असे कीं, ' माझ्या आईबापांच्या हातूनही इतकी मेहनत झाली नसती; इतकी मेहनत आपण मनापासून करीत आहांत; मी आपली उतराइ होण्यास अगदींच असमर्थ आहें. माझ्या पेटींत जी रक्कम आहे त्या रकमेचे माझे मुलास आणि मुलीस दागिने करा; माझ्या दागिन्यांपैकीं जे दागिने मुलीस देण्यासारखे असतील ते मुलीस द्या आणि बाकीचे दागिने मोडून त्याची जी रक्कम येईल ती मुलाचे नांवानें ब्यांकेमध्यें ठेवावी." शेवटीं तिनें आपल्या सवतीच्या गळ्यांत घट्ट मिठी घालून तिला म्हणाली कीं, ' माझे अपराध क्षमा करा आणि माझ्या मुलामुलीस सांभाळा ' असें म्हणून नमस्कार केला. धाकट्या जावांस आलिंगन देऊन त्यांना सांगितलें कीं, " जसें तुमच्या मुलांकडे तुमचें लक्ष आहे तसेंच लक्ष माझ्या मुलाकडे ठेवा." नंतर आपली कन्या शांताबाई हिला जवळ बोलावून तिच्या तोंडावरून हात फिरविले, आणि म्हणाली कीं, ' तूं जिजीच्या ( वडील सवतीच्या ) आज्ञेंत वाग. माझ्या करितां तूं रडूं नकोस किंवा दुःख करूं नकोस !' मुलाला जवळ बोलावून ह्मणाली कीं, 'तुला दोन वैरी शिवाय करून बाकीची प्रेमाची मंडळी आहे; त्यांच्या आशीर्वादानें तूं दीर्घायुषी हो.' रामचंद्र भाच्यास आपल्या जवळ बोलाविलें आणि त्यास म्हणाली कीं, ' सदाशिव हा तुझा धाकटा भाऊ आहे असें समजून त्याचा सांभाळ कर.' मी त्याप्रसंगीं त्या ठिकाणीं बसून हा चाललेला प्रकार पाहत होतों. माझें वरचेवर दुःखाचे सुस्कारे काढणें चाललें होतें; आणि नेत्रांतून गंगायमुना वाहात होत्या. त्यावेळीं मी तिला असें बोललों कीं, ' तूं अशी वेड्यासारखी आणि घाबरल्यासारखी कां करतेस ? तूं आज मोठ्या हुषारीनें भाषण करीत आहेस आणि हुषारहि दिसत आहेस. यावरून तुला परमेश्वरदयेनें आराम पडला आणि तुझ्यावरील विघ्न टळलें.' तेव्हां तिच्याही डोळ्यांतून अश्रुधारा वाहूं लागल्या. त्यावेळीं माझें दुःख मला आवरेना, जवळच दुर्गाताई ( डॉ. दाणी यांच्या सासु ) होत्या. त्यांना ती म्हणाली कीं, ' आत्या, हे जर आतांच असें करूं लागले तर माझ्या मुलांचा सांभाळ कसा होईल ? ' आणखी ती असें म्हणाली कीं, 'ज्यांनीं माझ्या दुःखण्यांत पाण्यासारखा पैसा खर्च केला; आणि प्रयत्न करण्यास कोणत्याही प्रकारें कसूर केली नाहीं, त्यांची सेवा माझ्या हातून कांहींच घडली नाहीं. याचेंच मला राहून राहून वाईट वाटतें आणि खेद

होतो.' असें बोलून पुढें ती म्हणाली, 'माझा जीव घाबरा होत आहे, डॉक्टरला बोलवा, मला गंगा द्या, आणि सर्वत्र मंडळीस माझा नमस्कार असो.' डॉक्टर दाणी वरच रहात होते, ते खालीं येण्याच्या पूर्वींच तिनें देवाचें नामस्मरण करीत तक्यावर मान टाकली; इतक्यांत डॉक्टरसाहेबहि आले; त्यांनीं तिची नाडी पाहिली आणि त्यांनीं तिला सांगितलें कीं, 'आतां देवाचें नामस्मरण चालूं द्या आणि या समयीं दुसऱ्या कोणत्याही गोष्टी मनांत आणूं नका.' त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं तिनें आपला प्राण सोडला!!! रीतीप्रमाणें तिच्या स्मशानयात्रेस जातीची आणि परजातीची मंडळी आली होती. तिच्या पूर्व इच्छेप्रमाणें दानधर्म केला. तिच्या दिवसाच्या दिवशीं पुण्यांतील जातीची प्रमुख मंडळी आणि आप्तसंबंधी वगैरे तीस चाळीस मंडळी आली होती; आणि येथील जातीचे सर्व लोक आले होते. हिचा दिवस श्रीखंडपुरीचा घातला.

मरणसमयीं तिचें वय सुमारें पंचवीस वर्षांचें होतें. तिला लिहितां वाचतां चांगलें येत होतें, तिचा स्वभाव थोडा करारी असून मनांत दुःख करणारी अशी होती; पण ती पोक्त बुद्धीची आणि विचारी अशी होती. ती मोठी देवभक्त होती. तिचा स्वभाव प्रेमळ, भाषण गोड, वर्तन मर्यादशील होतें. तिच्या या अकालीं मरणासंबंधानें येथील दैनिक आणि साप्ताहिक वर्तमानपत्रांतून दुःखोद्गार प्रगट झाले* त्यामुळें माझ्या मुंबईतील आणि बाहेरगांवांतील मित्रमंडळीकडून दुःखवस्याचीं पुष्कळ पत्रें आणि तारा आल्या, त्या इतक्या कीं, त्या सर्वांना उत्तरें लिहीत बसलों तर कितीएक दिवस लागणार आहेत; म्हणून मी त्या सर्वांचे वर्तमानपत्रांतूनच आभार प्रदर्शित करणें मला भाग पडलें. माझ्या कुटुंबाच्या दुःखण्यांत डॉ. कृष्णराव वामन दाणी यांनीं आस्थापूर्वक व निरपेक्ष बुद्धीनें औषधोपचार केला आणि चांगली काळजी घेतली; एतदर्थ मीं डॉक्टरसाहेबांचे जितके उपकार मानावे तितके थोडेच होणार आहेत. याशिवाय डॉ. मेअर, डॉ. चाईल्ड, डॉ. शिरगांवकर, लेडी डॉ. बेनसन, लेडी डॉक्टर ब्रॉडला, लेडी डॉ. कुटीना पुण्यांतील डॉ. नायडु आणि डॉ. मोदी, मिरजेचे डॉ. वॉनलेस व भडभडे यांनींहि काळजीपूर्वक औषधोपचार केले पण माझ्या दुर्दैवानें त्यांच्या हातास यश आलें नाहीं!!!

मी आणि माझें वडील कुटुंब हीं दोघेंही वृद्ध, आप्तांचा आश्रय नाहीं, मुलें अज्ञान असें पाहून ती या दुःखण्यांतून उठावी म्हणून पांच सहा हजार रुपये खर्च केले; पण त्याचें चीज झालें नाहीं; इश्वरेच्छा!!!

---

* त्यापैकीं **इंदुप्रकाश** ता. २४।११।१३ मधील उतारा:—

**मृत्यु:**—येथील घड्याळांचे सुप्रसिद्ध जुने व्यापारी मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनीचे मालक रा. रा. जी. बी. नाईक यांचें कनिष्ठ कुटुंब सौ. सुंदराबाई यांस क्षय रोगानें ता. १९-११-१३ रोजीं देवाज्ञा झाली हें कळविण्यास आम्हांस फार दुःख वाटतें. या फार सुशिक्षित असून धर्मनिष्ठ होत्या. मरणसमयीं त्यांचें वय अवघें २५ वर्षांचें होतें, त्यांस एक कन्या व एक मुलगा आहे.

**सभा**:—पुणें येथें ता० २६ माहे एप्रिल सन १९१३ रोजीं **राज** ( गवंडी ) जातीची **समाजसुधारणा** आणि **विद्याप्रसार** यासंबंधानें विचार करण्याकरितां सभा भरली होती. अशा प्रकारची सभा ही आमच्या ज्ञातींत पहिलीच होय; या सभेस जातीचा मोठा समाज कै. श्री. काळुरामभाऊ मनसाराम यांच्या भव्य दिवाणखान्यांत जमला होता; त्या प्रसंगीं अध्यक्षस्थान श्रीयुत पांडुरंग कृष्णाजी पाडवे आलेगांवकर कंक्ट्राक्टर हे सुशोभित करणार असें ठरलें होतें; हे अत्यंत गरीब स्थितींत असतांहि ओव्हरसीअरच्या परीक्षेपर्यंत अभ्यास करून सबइंजिनीअरपर्यंत मजल मारली आहे. हे चांगले विद्वान असून यांचा स्वभाव अतिनम्र, शांत आणि विचारी असा आहे. आणखी, हे मोठें स्पष्ट वक्ते आहेत. या समयीं आपणांस जातीचे सनदी हक्कदार चौधरी समजणाऱ्या मंडळीच्या मनांत असा विकल्प आला कीं, सदरहु गृहस्थ अध्यक्ष झाल्यास आपल्या गादीच्या पूर्वापार चालत आलेल्या लौकिकास बराच बाध येणार आहे म्हणूनच या सभेंत त्यांना कोणीं मत न देतां किंवा सूचना न करतां जशी सनदी चौधरी मंडळी आपल्या नेमलेल्या आसनावर जाऊन बसते तशी ही गर्भ श्रीमंत आणि श्रीमंताचे आश्रित सेकावाटीच्या आणि राजावाटीच्या चौधरींची दुक्कल येऊन अध्यक्षाकरितां नेमलेल्या जागेवर विराजमान झाली ! हा प्रकार पाहून बहुतेक मंडळीचा मोठाच विरस झाला. हे अध्यक्ष दोन शब्द तरी बोलतलि अशी मंडळीची कल्पना होती; पण ते कांहींच बोलले नाहींत ! मला या सभेस अवश्य येण्याविषयीं मंडळीचें आग्रहाचें आमंत्रण होतें, म्हणूनच मी मुद्दाम मुंबईहून या सभेकरितां पुण्यास गेलों होतों. हा सभेंत घडलेला प्रकार पाहून माझ्या मनाला फार वाईट वाटलें; आणि येथें जर आलों नसतों तर फार बरें झालें असतें असें मला वाटूं लागलें. असो. दहा पंधरा जणांचीं भाषणें सारीं एका तासामध्यें उरकलीं. नंतर पुष्कळ मंडळीनें आपली अशी आग्राहाची इच्छा प्रदर्शित केली कीं, मीं दोन शब्द बोलावे; आणि ही त्यांची आग्रहाची इच्छा आदरपूर्वक केलेली दिसल्यावरून मी बोलण्यास उभा राहिलों. माझ्या भाषणाचा मुख्य रोख स्वज्ञातीची सुधारणा व्हावी आणि विद्याप्रसार व्हावा यावरच होता. यासंबंधीं मीं माझे विचार पुस्तकरूपानें सहा तासांत छापूनहि काढले होते; तीं पुस्तकें मीं तेथें जमलेल्या मंडळींत वाटलीं; त्यावेळीं किती एक अक्षरशत्रु पण मत्सरी लोकांनीं असे उद्गार काढले कीं, 'हा दिवाणखाना मंडळीनें अगदीं गच्च भरून गेला आहे, वारा येण्यास मार्ग कमी आहे आणि त्यामुळें उकाडा मनस्वी होत आहे, अशा समयीं नाइकांनीं हीं पुस्तकें मंडळींत वांटलीं ही त्यांनीं मोठीच नामी गोष्ट केली; कारण, हीं पुस्तकें आम्हांस वारा घेण्याच्या कामीं पंख्यासारखीं उपयोगी पडलीं आहेत.' माझें भाषण बहुजनसमाजास मान्य झालें; इतकेंच नाहीं, तर ज्ञानप्रकाश, जगद्वृत्त, इंदुप्रकाश, व्यापारी, सयाजीविजय वगैरे

वर्तमानपत्रकारांनीं त्यासंबंधानें आपले उत्तम अभिप्राय व्यक्त केले आणि त्यांतील बराच भाग त्यांनीं आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केला.

पुढें थोडक्याच दिवसांनीं जयपूर येथील " **श्रीशिल्पावतू जाति उन्नति** " सभेची वार्षिक सभा ता. २७ डिसेंबर सन १९१३ रोजीं भरली होती; त्या सभेचें मला अत्यंत आग्रहपूर्वक आमंत्रण व तारा आल्या होत्या; त्याप्रमाणें मीं त्या सभेस जाऊन भाषणही करण्याचा माझा विचार ठरविला होता; पण माझें पांचवें कुटुंब अकालीं वारल्यामुळें मला जातां आलें नाहीं; मी हा निबंध त्या सभेकडे पाठवून दिला आणि त्यांना असें कळविलें कीं, मला कुटुंबाच्या मृत्युदुःखामुळें येतां येत नाहीं. ह्याबद्दल मला फार वाईट वाटत आहे. मीं आपणाकडे एक निबंध पाठविला आहे तो आपणास मान्य झाल्यास आपण आपल्या सभेंत वाचून दाखवावा; त्याप्रमाणें तो त्यांना मान्य होऊन त्याचें हिंदींत भाषांतर होऊन सभेंत सेक्रेटरीनें वाचून दाखविला. तो तेथील सर्वत्र मंडळीस पसंत होऊन त्यांनीं आपल्या १९१३ च्या द्वितीय वार्षिक रिपोर्टामध्यें छापून प्रसिद्ध केला आहे.

**श्रीमंत अलिजाबहादर शिंदे सरकार यांचा द्वितीय विवाहः**—लेफटनन्ट कर्नल रामराव साहेब भोंसले क्वार्टर मास्तर जनरल संस्थान ग्वाल्हेर यांचा आणि माझा घरोबा पंचवीस वर्षांपासून होता आणि त्यामुळें ते मुंबई पुण्यास आल्यास माझ्या येथें उतरत असत; आणि यांचे आप्त श्री. सरदार गणपतरावसाहेब माहूरकर माहाडिक वगैरे थोर थोर मंडळी माझ्याच येथें उतरत असत. या थोर मंडळींना ठाऊकच होतें कीं, माझा व्यवहार हा बहुतेक संस्थानिक, जाहगीरदार, सरदार वगैरे बड्या मंडळींत असल्यामुळें यांचा त्यांच्याशीं चांगला परिचय आहे. **श्री. अलिजाबहादर महाराज माधवराव शिंदे सरकार** यांना वंशवृद्धीस्तव द्वितीय संबंध कर्तव्य होता; आणि त्यांना योग्य वधू पाहण्यासाठीं दोन तीन ऑफिसरांची खास नेमणूक झाली होती; त्यांत लेफ. कर्नल भोंसले साहेब हेहि एक होते; त्याप्रमाणें ते माझ्या येथें आले आणि त्यांनीं आपला येण्याचा हेतुहि मला कळविला. आणखी, या कामीं आपण मला साह्य करा असेंहि म्हणाले. मीं बरें आहे असें उत्तर दिलें. मीं दक्षिणेंतील जाहगिरदार आणि सरदार घराण्यांतील सुमारें ३०—४० उपवर मुलींचे फोटो मागितले; परंतु त्यांपैकीं एकहि पसंत पडला नाहीं. शेवटीं गोव्याकडील साखळीचे जहागीरदार श्री. विठ्ठलराव बाबासाहेब राणे सरदेसाई यांची द्वितीय कन्या साळुबाई यांचा फोटो आणि जन्मपत्रिका मागविली आणि ती ग्वालेरीस महाराजसाहेबांकडे पाठविली. छत्तिस गुण जमल्याची आणि फोटो पसंत झाल्याची संतोषजनक तार आली. जनरल भोंसलेसाहेब हे साखळीस जाऊन भावी वधूस आणि त्यांच्या बापास घेऊन मुंबईस आले; ही मंडळी माझ्या येथेंच उतरली; आणि कांहीं **सरदार आश्रमांत** उतरली. महाराजांना तार केली. महाराज येथें येऊन आपल्या बंगल्यांत उतरले. आम्ही वधू पाहण्यास अमुक वेळीं येतों,

अशी वर्दी आली. ग्वाल्हेर दरबाराचा मला बऱ्याच वर्षांचा चांगला उदार राजाश्रय असल्यामुळें महाराजांचे पाय माझ्या ऑफिसास लागणार हें माझें महा थोर भाग्य समजून मी त्यांच्या योग्य स्वागतार्थ उत्तम व्यवस्था केली. मी माझ्या शक्तीप्रमाणें ऑफिसांतील नेहमींची मांडणी बाजूला करून त्यांच्या थोर राजवैभवाला शोभेल अशा प्रकारें ऑफिस श्रृंगारलें. नेमलेल्या वेळेबरोबर सरकारस्वारी आपल्या दोन तीन ऑफिसरसह आली. मीं त्यांचें योग्य स्वागत केलें. महाराजांनीं वधू पाहिली; आणि ती त्यांना पसंत झाली. श्री. सरकार स्वारी जातेसमयीं मीं त्यांना हारतुरे, पानसुपारी अत्तरगुलाब दिलें. पुढें सुमारें दोन महिन्यांनीं तीथिनिश्चय झाला. वधूस नेण्याकरितां श्री. सरदार अप्पासाहेब शितोळे सी. आय. इ, श्री. बाजीराव कांटे साहेब वगैरे मंडळी सावळीस गेली. मला सरदेसाईसाहेबांनीं सावळीहूनच अशी तार केली कीं, आम्ही ग्वालेरीस जाण्यास निघालों आहोंत, आपणहि निघण्याच्या तयारींत असा. ही सर्व मंडळी मुंबईस दाखल झाली. श्री राणेसाहेबानीं मला असें आग्रहानें सांगितलें कीं, ' **श्रीपांडुरंगाच्या** कृपेनें आणि आपल्या आशीर्वादानें हा अपूर्व संबंध जुळून आला आहे. आपण मुलीचे धर्माचे वडील आहात; यासाठीं आपण लग्नास अवश्य यावें. आपण मला जनरल रामराव साहेबांचे जागीं आहांत. आपण माझे वडील बंधुसमान आहांत. श्री. शिंदेसरकारांकडून श्री. सरदार अप्पासाहेब शितोळे व श्री. सरदार बाजीराव कांटेसाहेब यांनीं माझ्या येथें येऊन मला लग्नाचें आमंत्रण दिलें. तें मला स्वीकारणें भाग पडलें. मी, माझा बंधू तुळशीराम, भाचा रामचंद्रराव आणि एक शिपाई बरोबर घेऊन भावी राणी सरकारांबरोबर ग्वाल्हेरीस ता. ५ मे सन १९१३ रोजीं गेलों. तेथें स्टेशनावर श्री. राणेसाहेबांप्रमाणें माझेंहि स्वागत झालें. श्री.राणीसाहेब ज्या महालांत उतरल्या होत्या त्याच महालाच्या शेजारच्या स्वतंत्र तंबूंत आमची राहण्याची व्यवस्था केली होती. तेथें माझा राजपाहुण्यासारखा मानमरातब ठेवला होता. मी जें इतिहासांत पूर्वकाळांतील मराठ्यांचें खरें राजवैभव वाचलें होतें, तें मला तेथें प्रत्यक्ष पाहण्यास मिळालें; आणि मराठ्यांचें खरें राजवैभव हल्लीं तेथेंच नांदत आहे असें म्हटल्यावांचून माझ्यानें राहवत नाहीं. या अपूर्व योगाबद्दल मला पराकाष्ठेचा आनंद झाला आणि मोठें भूषण वाटूं लागलें. लग्नांत एकंदर सोहळा व मान श्री. राणेसाहेबांप्रमाणें माझाही ठेवण्यांत आला होता. मी आपल्या शक्तीप्रमाणें महाराजांस आणि श्री. राणेसाहेबांस अहेर केला. मला माझ्या मंडळीसह तिपटीनें उलट अहेर आला. श्री. नारायणराव ऊर्फ बाळासाहेब महाडिक जहागीरदार यांनींहि मोठ्या थाटाची मला मेजवानी करून बहुमानाचा पोषाख केला. मला निघण्याची अतिशय घाई असल्यामुळें मी आपल्या मंडळीसह श्री. शिंदे सरकारचा निरोप घेऊन निघालों. आमच्या बरोबर श्री. **गजाराजा** (श्री. सौ. साळुबाईसाहेबांचें सासरचें नांव ) महाराणीसाहेबांचे चुलते व सख्खे बंधु

श्री. बाळासाहेब हेहि निघाले. हें लग्न सन १९१३ सालच्या मे महिन्यांत ८ व्या तारखेस लागलें.

**नुकसानः**—मी आपल्या चालत्या काळांत माझ्या हितचिंतक मित्रांच्या सूचनेप्रमाणें वागलों नाहीं याचा आतां मला पश्चात्ताप होत आहे. माझा व्यापार अनेक कारणांमुळें मंदावत चालला. वय होऊन गेलें. पदरीं एक अज्ञान मुलगा आहे. आप्तमंडळीचा कोणत्याही प्रकारें आश्रय नाहीं; आणि कायमचें उत्पन्नही करून ठेविलें नाहीं; अशा स्थितींत दूरदर्शीपणा कमी होत जातो. मी ता. १ माहे सप्टेंबर सन १९१४ रोजीं मुंबईतील बजारगेटस्ट्रीट नांवाच्या रस्त्यावरून येत असतांना तेथें एक घर जुन्या वेळचें बांधलेलें दोनखणी, चार मजली, दरमहा भाड्याचें उत्पन्न सुमारें दीडशें रुपये याचा लिलांव सरकारमार्फत चालला होता. लिलावाच्या शर्ती मीं कांहीं पाहिल्या नाहींत. या घराची किंमत सुमारें अठरा हजार रुपये असावी, तें घर लिलावांत मला पांच हजारांला मिळालें. त्याच वेळीं माझ्या मनांत असा संशय उत्पन्न झाला कीं, हें घर जेव्हां इतक्या कमी किंमतीला गेलें तेव्हां यांत कांहीं तरी गोम असावी; आणि शेजाऱ्यापाजाऱ्यांनीं देखील मला जागृत केलें कीं, हें घर आपण घेऊं नये; हें भानगडीचें आहे. दुसऱ्या दिवशीं मला त्या घराच्या तिघां हक्कदारांची नोटीस आली. हें प्रकरण त्रासदायक जाणून सुमारें एक हजार रुपये नुकसान सोसून सदरहु लिलांव मला रद्द करावा लागला.

**सोलापुरचा प्रवास**—माझ्या ऑफिसच्या शेजारीं **रावबहादुर** रामकृष्ण हणमंत पागे, डेप्युटी पोलिस सुपरिंटेंडेन्ट सी. आय. डी. सिमला, यांचें ऑफिस बऱ्याच वर्षांपासून असल्या कारणामुळें त्यांचा आणि माझा चांगला परिचय झाला आहे. यांचा सुस्वभाव, सरळ वर्तन आणि स्नेहास योग्य अशी वर्तणूक असल्यामुळें त्यांचा आणि माझा चांगला स्नेहसंबंध जडला आहे. गेल्या डिसेंबर महिन्यांत त्यांनीं सोलापुरांत बांधलेल्या बंगल्याची वास्तुशांति होती, त्या समयीं त्यांनीं मला अशी प्रेमपूर्वक विनंति केली कीं, आपण आपल्या सर्वत्र मंडळीसह वास्तुशांतीकरितां सोलापुरास आलें पाहिजे. ह्मणून मी, माझें कुटुंब, पुत्र व कन्या आणि भाचा नानाभाऊ यांना घेऊन सोलापुरास ता. ८ माहे डिसेंबर सन १९१४ रोजीं गेलों. रा. सा. रामकृष्णपंतांनीं स्टेशनावर आमचें योग्य स्वागत केलें; आणि माझ्या इच्छेवरून माझी राहण्याची सोय माझे मित्र डॉ. सदाशीवराव दाणी यांच्या बंगल्यांत केली. वास्तुशांतीसंबंधीं एकंदर समारंभ तीन चार दिवस चालला होता; त्यांनीं आमची व्यवस्था उत्तम ठेविली होती. या समारंभांत मला श्री **नारायण महाराज** केडगांवकर यांच्या पाद्यपूजेचा आणि प्रसादाचा लाभ झाला. नंतर तेथील मंडळीनें मला अशी सूचना केली कीं, आपण जर अनायासें येथपर्यंत आलां आहांत तर आपण तुळजापूरच्या **श्रीभवानी** मातेचें दर्शन घेऊन

जावें. " माझें दुसरें कुटुंब होतें, त्या वेळीं मी तुळजापुरास गेलों होतों, आणि माझ्या पांचव्या कुटुंबाची फार इच्छा होती कीं, मुलांलेंकरांस देवीच्या दर्शनास न्यावें; परंतु तसें कांहीं घडलें नाहीं. आतां ही अनायासें चांगली संधी आली आहे, ती आपण वायां जाऊं देऊं नये, असा मनाचा निश्चय झाला. रावबहादुर पागे यांनीं गाडीघोड्याची व्यवस्था करून दिली. मीं मंडळीसह तुळजापुरास गेलों. मी यथाशक्ति देवीची पूजाअर्चा व नैवेद्य केला; नैवेद्यास तेथील स्वजातीच्या मंडळीस आमंत्रण केलें होतें. जातीची मंडळी पन्नास जमली होती; मिष्टान्नाचाच बेत केला होता. तेथें तीन दिवस मुक्काम करून देवीची आज्ञा घेऊन परत सोलापुरास आलों. डॉ. दाणी वगैरे मंडळी मला असें म्हणाली कीं, " आपण विजापुरास जाऊन तेथील ऐतिहासिक स्थलें पाहून या. तसेंच गाणगापुरास जाऊन **श्रीदत्ताचें** दर्शन घ्या, आणि तेथें नजिकच नुक्तेच नवीन सिद्ध पुरुष श्री. **चिदानंदस्वामी** समाधिस्थ झाले आहेत; त्यांच्या समाधीच्या दर्शनार्थ दर गुरुवारीं दहा पंधरा हजार यात्रा भरत असते तीही पहा. " हें त्यांचें म्हणणें मला पसंत पडून मी मंडळीसह गाणगांपुरास निघालों. आमच्या बरोबर इतर यात्रेकरूंच्या पंचवीस तीस गाड्या होत्या. गाड्या पहाटेस तीन वाजतां जोडल्या. मार्गांत एक मोठा खराब ओढा होता; म्हणून गाडीवानांनीं पुरुषमंडळीस गाडींतून उतरून पलीकडच्या पायरस्त्यानें येण्यास सांगितलें. ती वेळ अंधारी होती; जवळ उजेडाचें कांहींच साधन नव्हतें. मी, माझा भाचा आणि इतर पांच सहा मंडळी रस्ता चुकून भलतीकडे आडरानांत गेलों. नुक्तीच पाऊस पडण्यासहि सुरवात झाली होती. अनवाणी चालल्यामुळें माझ्या पायांत पुष्कळ कांटे रुतले. त्या योगानें बराच त्रास झाला. गाड्या बऱ्याच पुढें निघून गेल्या. पण आम्ही कांहीं आलों नाहीं, म्हणून गाडीवानांनीं गाड्या थांबवून ते आमचा शोध करण्यास लागले; आणि आम्हांस गांठून मार्गावर आणलें. आमचे पाय चिखलांत भरले असल्यामुळें ते धुण्यास जवळच एक डोह होता तेथें गेलों. त्या डोहाजवळ शेवाळ बरेंच होतें. माझा त्या ठिकाणीं पाय घसरला, त्यावेळीं मीं डोहांत पडणार होतों. पण हातांत काठी असल्यामुळें बचाव झाला; पण त्या गडबडींत माझा सोन्याचा चष्मा व पॉकेट बुक डोहांत पडलें. असो. नंतर आम्हीं गाणगापुरास पोहोंचलों. पायांत कांटे रुतल्यामुळें पाय सुजून गेले होते, ते कांटे गाणगापुरांत न्हाव्याकडून काढविले. नदीपलीकडे श्री. चितांबर स्वामीची समाधि होती, तेथें जाण्याची मला फार उत्कंठा झाल्यामुळें मी तेथें कोळ्याकडून भोपळ्याची सांगड बांधून त्यावर बसून तेथें गेलों आणि दर्शन घेऊन परत आलों. मीं तेथें मंडळीसह तीन दिवस राहून **श्रीगुरुदेवदत्त** महाराजांची पूजा व नैवेद्य करून त्यांची आज्ञा घेऊन विजापुरास गेलों. तेथील जुन्या ऐतिहासिक सुप्रसिद्ध इमारती पाहून सोलापुरास आलों. नंतर तेथून पंढरपुरास गेलों. तेथें माझा आठ दिवस मुक्काम होता. तेथील माझ्या रहिवाशी

आणि कामानिमित्तानें आलेल्यां जातबंधूंस मिष्टान्न भोजन दिलें. तसेंच गांवांतील अंध, पंगु, अनाथ वगैरे लोकांसही जेऊं घातलें. नंतर तेथून आम्हीं सर्वत्र मंडळी निघून मुंबईस येऊन दाखल झालों.

**समाजास विनंतिः**—जेथें लोकांचा पुष्कळ जमाव असतो, तेथें त्यास समाज असें म्हणतात; अशा समाजांत निरनिराळ्या मताचीं आणि निरनिराळ्या विचाराचीं मनुष्यें असतात; आणि मुख्यत्वेंकरून दोन मताचे पुढारी असतात; असें असल्या-वांचून खरी समाज सुधारणा होत नसते. म्हटलें आहे **वादे वादे जायते तत्वबोधा.** हें म्हणणें अगदीं सत्य व यथार्थ आहे. विद्येंत मागें असलेल्या व विद्याहीन अशा समजांत एखाददुसरा विद्वान् असला म्हणजें त्याची स्थिति वेड्याप्रमाणें होऊन जाते; इतकेंच नाहीं, तर त्याची गणना मूर्खांत होते; म्हणूनच त्याला आपली विवेक-बुद्धि एका बाजूला गुंडाळून ठेवून त्या समाजांतील लोकांबरोबर मिळूनमिसळून वागल्याखेरीस गत्यंतरच नाहीं. त्यामुळें त्याच्या ज्ञानाचा, अनुभवाचा आणि विचाराचा व्हावा तसा उपयोग व फायदा समाजास होत नाहीं; या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ पुष्कळ उदाहरणें आहेत. समाजांत अज्ञानमूलक आणि अंधपरंपरेच्या अनेक गोष्टी दिसून येतात; त्यापासून द्रव्याचा व्यर्थ व्यय होऊन तरुण व होतकरू मंडळीच्या मनावर अयोग्य व विपरीत परिणाम होऊं लागले, म्हणून मी एक विनंति-पत्र माझा पुतण्या चि० गजाननराव गोपाळराव बैताडे यांच्या नांवानें छापून काढून त्याच्या हजारों प्रती विद्येंत मागें असलेल्या अशा समाजांतील पुढारी गृहस्थांकडे पाठविल्या, त्याचा परिणाम कांहीं समाजावर अनुकूल झाल्याचें माझ्या कानांवर आलें आणि या विनंतीपत्राच्या प्रति बहुतेक वर्त्तमानपत्रांकडे त्यांच्या अभिप्रायार्थ पाठ-विल्या; त्यांनी हें लोकमान्य झालें म्हणून आपल्या पत्रांत तें साग्र प्रसिद्ध केलें; इतकेंच नाहीं, तर प्रमुख पुढाऱ्यांनीं आपलें अनुकूल मत देऊन त्याचा गौरव केला; पण आमच्या जातीवर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं.

**लग्नः**—माझे पुतणे म्हणजे बंधु गोपाळराव यांचे पुत्र चि. गजानन यांचें लग्न खानदेशांतील नांदगांवीं राहणारे रा. रा. शिवरामजी मारुती तुसे यांची कन्या पुंजाबाई ( सरस्वती ) हिच्याबरोबर ता. १६ माहे मे सन १९१५ रोजीं नांदगांव मुक्कामीं झालें. या लग्नास माझे बंधु तुळशीराम, त्यांचा पुत्र पुरुषोत्तम, जांवई सोमनाथ तेलपुरे, माझें थोरलें कुटुंब, माझी भावजय म्हणजे मुलाची आई रखामाबाई, भाचा रामचंद्र, पुत्र सदाशिव आणि कन्या शांताबाई इतकी मंडळी येथून गेली होती. तेथील जातीचा जमाव शेंदीडशापर्यंत होता. लग्नांत त्यांना पंचपक्वान्नाचें भोजन दिलें. तेथील जातीची स्थिति आणि लग्नांतील वहिवाटी फारच माग-सलेल्या दिसून आल्या.

**लग्नः**—माझा पुतण्या चि. दत्ताराम याची पाहिली पत्नी *चि. सौ. लक्ष्मी ही

*हीस ता. ३० मे सन १९१५ रोजीं देवाज्ञा झाली.

नगर वाचनालय सातारा

संगणकीकृत

सुमारें पांच सहा वर्षांपासून क्षयानें आजारी असल्यामुळें आणि ती संसारोपयोगी होईल असें कोणत्याही प्रकारचें चिन्ह दिसत नसल्यामुळें त्याचें दुसरें लग्न करण्याचा प्रसंग आला; त्याप्रमाणें रा. रा. विष्णूजी बाबाजी कुंडळवाल वांईवाले सब-ओव्हरसीअर यांची कन्या चि. रखमाबाई ( यमुना ) ही वधू नेमस्त करून ता. २६ मे सन १९१५ ( बुधवार वैशाख शुद्ध १२ संवत १९७१ ) रोजीं पुण्यास लग्न केलें.

**लग्नः**—माझे वडील बंधु कै० बाळारामजी यांचे तिसरे पुत्र चि. नथुराम यांचा विवाह रा. रा. गणपतराव विठोबा मोरवाळ कंट्राक्टर यांची कन्या चि. भागिर्थीबाई हिच्या बरोबर ता. २८ डिसेंबर सन १९१५ रोजीं झाला. वडिलांच्या पश्चात् यांचें राहणें व विद्याभ्यास त्यांच्या मेहुण्याच्या येथें झाला असल्यामुळें या लग्नाची व्यवस्था तेथेंच त्यांचें वडील बंधु चि. शंकरराव यांनीं आपल्या कुळास शोभेल अशा थाटानेंकेला; परंतु लग्नचिठ्ठी आणि आमंत्रण यासंबंधानें अज्ञानपणा झाल्यामुळें लोकांत आणि जातींत फार टीका झाली.

**माझ्या वडिलांचे शब्दः**—ही तुझ्या आयुष्याची आणि सुखाची लक्ष्मी आहे. हे शब्द माझे परमपुज्य वडील माझ्या पाहिल्या लग्नाच्या वेळीं बोलले होते. सौभाग्यवती कोंडू ही माझी पाहिल्या लग्नाची बायको होय; हिचा स्वभाव शांत, भाषण मित, वृत्ति आनंदी, राहणी साधी, वर्तन मर्यादशील आणि पतिआज्ञेंत तत्पर आणि ती कुटुंबांतील लहानथोरांच्या मर्जीविरुद्ध कधींहि गेली नाहीं. हिला थोडें लिहितां वाचतां येतें. आपल्यांत अशी एक साधारण म्हण पडून गेली आहे कीं, स्त्रियांना लोण्याची देखील सवत सहन होत नाहीं, पण ही म्हण जिनें आपल्या आचरणानें निव्वळ खोटी ठरविली, या तिच्या असाधारण गुणाचा लौकिक सुप्रसिद्ध आहे आणि म्हणूनच लोक तिची प्रशंसा करतात, या तिच्या वर्णनीय आणि प्रशंसनीय गुणाबद्दल मला आणि एकंदर आप्तजनांस किती तरी आनंद व संतोष होत आहे याचें वर्णन करणें अगदीं अशक्य आहे. आपणास एक पुत्र आणि चार कन्या झाल्या; पण त्या अकालींच गेल्या.* आपली संतति वांचत नाहीं, आणि आपला वंश पुढें चालावा, एतदर्थ तिनें स्वतः पुढाकार घेऊन माझीं चार लग्नें केलीं. माझ्या प्रत्येक स्त्रीच्या दुःखण्यांत ती त्यांची आपल्या पोटच्या मुलाप्रमाणें सुश्रुषा करीत असे; पण तिला त्यांत शेवटीं यश येत नाहीं; म्हणून ती सतत दुःखाचे उद्गार काढीत असते. हिचें आपल्या सवतीसंबंधानें इतकें निर्मळ व प्रेमळ वर्तन असे कीं, ह्या सवती आहेत असें मला कधींही आणि कोणत्याही कारणानें दिसून आलें

* तिच्या कन्यांपैकीं चि० अहिल्याबाई हिचा विवाह ता. ६ फेब्रुवारी सन १८९२ रोजीं झाला, आणि ती ता. ६ माहे आक्टोबर सन १८९९ रोजीं प्लेगनें मृत्यू पावली ! तिच्या दुःखामुळें आम्ही उभयतां व भाचा रामचंद्र मिळून ता. २२ माहे आक्टोबर सन १८९९ साली काशीस जाऊन दाखल झालो.

नाहीं, इतकेंच नाहीं, तर शेजाऱ्यापाजाऱ्यांसहि दिसून आलें नाहीं. ती आपल्या सवतीबरोबर सख्ख्या बहिणीप्रमाणें मोठ्या प्रेमानें, आनंदानें, गोडीगुलाबीनें आणि एक चित्तानें वागत असे. माझ्या चार बायका वारल्या त्या शेवटीं मरणसमयीं असे उद्गार काढीत असत कीं, ' आम्ही आपले अत्यंत कृतज्ञबुद्धिपूर्वक उपकार मानून देह ठेवीत आहोंत. " किती हें अपूर्व प्रेम ! आणि तेंहि आपल्या सवतीवर ! ! याचमुळें मला कोणत्याच स्त्रीपासून कोणत्याच प्रकारचा त्रास झाला नाहीं. हें मी माझें मोठें सुदैव समजतों. तिचीं गेलेलीं मुलें, सवतीचा वियोग, आणि कुटुंबांतील मंडळीचें अमर्यादशील वर्तन याचें तिच्या मनाला कधीं कधीं मोठें दुःख होत असतें. तिची चौथी सवत सौ. सुंदरा हिची कन्या शांताबाई आणि पुत्र सदाशिव आहे, त्यांच्या चिंतेमध्यें ती सदासर्वकाळ असते. आपल्या आप्त मंडळीचें विरुद्ध मत व विचार आहे. माझ्या किंवा माझ्या सवतीच्या माहेरचा आश्रय नाहीं. आम्हां उभयतांचें वय झालें आहे आणि लेकरें पाहिलीं तर ती अज्ञान, त्यांची आपल्या पश्चात् काय अवस्था होईल याचीच तिला रात्रंदिवस चिंता लागली आहे. हिची राहणी नियमितपणाची असल्यामुळें तिची दुःखण्यासंबंधी विशेष तक्रार कधींच नसावयाची. ती नियमानें देवदर्शनास जात असते, यामुळें तिचा अनयासें व्यायाम होत असतो. ती सोमवार, गुरुवार, एकादशी व चतुर्थी हीं व्रतें करीत असते. तिचें वय हल्लीं जरी ५४ वर्षांचें आहे, तरी ती घरांतील सर्व व्यवस्था स्वतः पाहत असते; आणि कोणावर अवलंबून नसते. अशा प्रकारची सद्गुणी स्त्री पूर्वपुण्याईवांचून मिळत नसते असें जें म्हणतात तें अगदीं सत्य आहे; आणि तें माझ्याहि अनुभवास पूर्णपणें आलें; म्हणून मी परमेश्वराचा फार उपकारी आहें. माझ्या वडिलांचे शब्द सत्य ठरले; म्हणून मला मोठा आनंद व भूषण वाटत आहे.

---

## प्रकरण ९ वें.

——:०:——

### मागील कांहीं आठवणी.

——:०:——

**सुवर्णः**—मी ज्या वेळीं शिकंदराबादेजवळील त्रिमलगिरी येथील बराकीच्या कामावर टाईमकीपर होतों त्या वेळीं ते उन्हाळ्याचे दिवस होते. एके दिवशीं दोनप्रहरच्या सुट्टींत मला एक गोसावी येऊन भेटला आणि म्हणाला कीं, मला एक खडावा करून दे. मी सुतारास सांगून त्याला एक खडावा करून दिला; तो पाहून त्याला आनंद झाला. आणखी, तो मला असें म्हणाला कीं, मला गांज्याची चि-

11354

लीम भरून द्या. गांजा नव्हता म्हणून अर्ध्या मैलावर गांव होतें तेथें माणूस पाठवून गांजा आणि चिलीम आणविली. ती एका गंजडी गवंड्याकडून तयार करवून त्यास दिली. त्यानें व इतर गंजेडीनें ती ओढली. गोसावी चिलीम एका कोपऱ्यांत ठेवून निघून गेला. एका गंजडीनें मला विचारून ती चिलीम घेतली. त्या चिलमींत खड्यांच्या ऐवजीं जो तांब्याचा पैसा ठेवला होता तो सोन्याचा झाला. तो खरोखरच सोन्याचा आहे किंवा नाहीं तो पाहण्यासाठीं बाजारांत विकण्यास पाठविला. तो खऱ्या सोन्याचा ठरून खऱ्या सोन्याच्या भावाप्रमाणें त्याची किंमत आली; ती मीं सुतार व गवंडी मंडळीस वांटून टाकली.

प्रसंगः—मी जेव्हां तुमसरपासून सुमारें बारा मैलांवर भंडारा जिल्ह्यामध्यें होतों तेव्हां मला खजिन्यांतून रकमा आणण्यास जाण्याचा वरचेवर प्रसंग येत असे. कधीं तर मला येण्यास रात्रहि होत असे. एके समयीं कांहीं चोरांनीं मजवर पाळत ठेवून मीं घोड्यावरून ओढ्यांत अडकून पडावें अशी व्यवस्था करून ठेविली होती. वराच्या ओढीनें घोडा धांवत असतां त्यास पुढील स्थिति दिसल्याबरोबर तो एकदम मागें फिरला, आणि मलाहि संकट चिन्ह दिसल्यावरून मी परत घोडा दामटीत नेला.अशा रीतीनें त्या घोड्याच्या सुचविण्यावरून प्रसंग टळला.

वाघः—माझे वडील माझें कुटुंब घेऊन पुण्याहून नागपुरास आगगाडीनें आले; पुढील तुमसरपर्यंतचा प्रवास हा बैलगाडीनें करावा लागतो; ह्मणून मी त्यांना तुमसरास आणण्यासाठीं दोन गाड्या व चार मनुष्यें नागपुरास रवाना केलीं; ते गाड्यांत बसून येत असतां संध्याकाळच्या सुमारास एका मोठ्या वरंगलीजवळच्या ओढ्याजवळ त्यांच्या गाड्या आल्या; त्यावेळीं एक मोठा वाघ गाडी जाण्याच्या रस्त्यावर मध्येंच आडवा पडलेला बैलास दिसला. ज्या वरंगळीवर चाकें बांधून गाडी चालवावी लागते अशा वरंगळीवर त्यांच्या गाडीचीं चाकें बांधलीं नव्हतीं; असें असतां बैल एकदम उभे कां राहिले ? ज्या बैलांना गाडीवानास मारण्याचा कधींच प्रसंग येत नाहीं, त्या बैलांना चापून मारीत असतांहि एक पाउलहि पुढें टाकीत नाहींत; असें आज कां झालें हें पाहण्यासाठीं माझे वडील गाडीखालीं उतरून त्यांनीं चोहोंकडे नजर फेंकली. जरी ती चांदणी रात्र होती तरी त्यांना डोळ्यांचा चकचकाट दिसला; आणि त्याचा वास आल्यामुळें बैल उभे राहिले आहेत. वडिलांनीं गाडीवानास म्हटलें कीं, गडबड करूं नका; येथें स्वारी ( वाघ ) आहे; प्रसंग मोठा बिकट आहे. माझे वडील गाडीच्या पुढें कांहीं दूर अंतरावर जाऊन साष्टांग नमस्कार करून तेथें हात जोडून उभे राहिले. वाघ आपलें शेंपूट आपटीत उभा राहिला; तो सर्वांच्या नजरेस पडल्यावर मंडळीची किती गाळण उडाली असेल ती विचारूंच नका, शेवटीं, वाघ तेथून निघून जंगलांत बऱ्याच अंतरावर गेल्यावर गाड्या मार्गास लागल्या. मला ही हकीगत सांगितल्यावर मीं वडिलांना विचारलें कीं, वाघ मुकाट्यानें कसा गेला ? त्यांनीं असें

अमर वाचनालय तारा



उत्तर दिलें कीं, नाग व वाघ हे आपणांस शूराच्या हस्तें मरण इच्छितात, तसें नसल्यास शरण येणारास मरण देत नाहींत; किंवा उपद्रवहि करीत नाहींत.

**साक्षात्कारः**—मी जेव्हां प्रथमच नरसोबाच्या वाडीस गेलों होतों, तेव्हां माझ्या बरोबर सीताराम शेडोजी आणि सखाराम भाऊ अनवडे होते. आम्हीं त्रिवर्गांनीं **श्रीगुरुदेवदत्त** यांचें दर्शन घेतलें. मीं त्यांना असें सांगितलें कीं, आपला आजच्या रात्रीचा येथें मुक्काम आहे ; उदईक प्रातःकाळीं आपण येथून निघणार; याकरितां हें पांच रुपये घ्या, बिऱ्हाडीं जा आणि देवास पेढ्यांचा नैवद्य दाखवा आणि ब्राह्मणांस दक्षणा वांटा; त्याप्रमाणें ते निघून गेले. माझें मन शेजआरती व प्रदक्षिणेंत तल्लीन झाल्यामुळें मी देवळांत राहिलों; त्या समयीं माझ्या मनांत असे विचार आले कीं, सेवेकरी आणि भक्तजन देवाचें भजन किती तरी गोड वाणीनें करीत आहेत; जर मला गातां आलें असतें तर किती छान झालें असतें बरें ? इतक्यांत एक ब्राह्मण मजकडे आला आणि म्हणाला कीं, तुमची स्नेहीमंडळी तुमची बिऱ्हाडीं वाट पहात आहेत; यासाठीं लवकर चला. मीं त्याच्या या म्हणण्याकडे मुळींच लक्ष्य दिलें नाहीं. नंतर थोड्या वेळानें दुसरा ब्राह्मण आला आणि म्हणाला कीं, ब्राह्मणांस पेढे व दक्षणा वांटण्यास खोळंबा झाला आहे; यासाठीं लवकर चला. मीं त्यास असें उत्तर दिलें कीं, " तुम्हीच उरकून घ्या; माझी वाट पाहत बसूं नका. " देवाची शेजारती वगैरे झाल्यावर मीं मोठ्या लगबगीनें बिऱ्हाडाचा रस्ता सुधारला; इतक्यांत माझ्या पाठीमागून एक ब्राह्मणाचा मुलगा हातांत पंचपदी पुस्तक घेऊन येत होता; तो मोठ्यानें मला हांका मारून असें म्हणूं लागला कीं, ' अहो रावसाहेब, आपण जें इच्छित आहांत तेंच हे घ्या. मीं मोठ्या जलदीनें पुढें चाललों होतों; आणि मनांत असें म्हणालों कीं, हें ब्राह्मण किती तरी त्रास देतात; इतके शब्द पुरे होतात न होतात तोंच मला ठेंच लागली, मी खालीं, पडलों आणि गुडघ्यास बरीच इजा झाली. तसाच मी उठून बिऱ्हाडीं गेलों. मंडळी देवास नैवद्य दाखवून ब्राह्मणांस पेढे व दक्षणा वांटून स्वस्थ माझी वाट पाहत बसली होती. मीं त्यांना म्हटलें कीं, आपण सारें उरकून घेतलेंत, मग मला बोलवावयास दोन ब्राह्मण पाठविण्याची हौस कां केली ? त्यावेळीं ते बोलले कीं, " आम्हीं तुम्हांस बोलावण्यास कोणासहि पाठविलें नाहीं. " जमलेल्या मंडळींत चौकशी केली, त्यांनींही नाहीं म्हणून उत्तर दिलें. त्या समयीं सितारामजी असें म्हणाले कीं, ' तुम्हांस बोलविणारे आणि पुस्तक देणारे श्री दत्तमहाराजच असणार! नंतर आम्हीं यासंबंधानें सूक्ष्म रीतीनें विचार केला तेव्हां हें देवाचेंच कृत्य असावें अशी आमच्या मनाची खात्री झाली. देव भक्तास कोणत्या तरी रूपानें व मार्गानें प्रत्यक्ष भेट देतो; परंतु त्याच्या अगाध लिलेविषयीं लोक अज्ञान असल्यामुळें मागाहून त्याचें त्यांना ज्ञान होत असतें; अशी त्याची अगम्य लीला आहे; आम्ही

प्रातःकाळीं उठून देवाचा निरोप घेऊन जरंड्याच्या श्रीमारुतीचें दर्शन घेण्यासाठीं निघालों.

**श्री मारुतीः**—आम्ही जरंडेस्टेशनावर उतरून तीन भाडोत्री घोडे करून जरंडेश्वराच्या डोंगराच्या पायथ्याशीं गेलों. तेथें मी सितारामजींस असें म्हणालों कीं, ' उपवास करणाऱ्या लोकांना डोंगर चढण्याचा त्रास होईल; पण मी हां हां म्हणतां सहज डोंगर चढून जाईन. ' चढण अत्यंत बिकट असल्यामुळें मी अर्धा डोंगर चढलों नाहीं तोंच मीं अगदीं थकून गेलों; आणि पुढें एक पाऊल टाकण्याची शक्ति राहिली नाहीं. जवळील गांवकरी आणि नित्य नेमानें दररोजचे दर्शन घेणारे लोक मला थकलेला पाहून असें बोलूं लागले कीं, आपण मनांत कांहीं तरी विपरीत विचार आणला असावा; अथवा गर्वोक्तीनें कांहीं तरी उद्गार काढले असावेत. यासाठीं आपण मारुतीरायाची क्षमा मागून तुझ्याच सामर्थ्यानें मी हा डोंगर चढेन अशी तुम्ही मनांत लीनपणें श्री मारुतीरायाची प्रार्थना करा; म्हणजे तो तुम्हांला डोंगर चढण्याची शक्ति देईल. जवळच एक पाण्याचें कुंड होतें तेथें आम्हीं स्नान केलें. नित्यपूजा-पाठ करून श्रीमारुतीचें ध्यान करून अशी प्रार्थना केली कीं, ' माझ्याकडून अज्ञानानें किंवा विनोदानें जो अपराध घडला असेल त्याची क्षमा करून मला आपलें दर्शन घडावें. आम्ही त्याचें नामस्कारण करीत हळू हळू डोंगर चढूं लागलों. आम्हांला आतां कोणत्याच प्रकारचे श्रम पडले नाहींत. आम्ही डोंगरावर चढलों, देवास अभिषेक, पूजा देवब्राह्मण वगैरे करून भोजन केलें. नंतर देवाचा निरोप घेऊन साताऱ्यास आलों.

**वडिलांचे उद्गारः**–मजसंबंधानें माझ्या वडिलांनीं असे उद्गार काढले आहेत कीं, तुला व्यापारामध्यें दोन पैसे मिळतील खरे; पण तुझ्याजवळ म्हणण्यासारखा द्रव्यसंचय होणार नाहीं. तूं मोठा कल्पक, विचारशील व धोरणी होशील. तुझी लोकांत चांगली मानमान्यता वाढेल; पण तुझ्या वडील बंधूखेरीज करून कोणत्याहि आप्तवर्गाचा तुझ्यावर खरा प्रेमभाव असणार नाहीं; ते तुला अनेक मार्गानें त्रास देतील. तूं त्यांचें जितकें जितकें कल्याण करण्यास झटशील तितके तितके ते तुझ्या विरुद्ध जाऊन ते आपला स्वतःचा नाश करून घेतील; इतकेंच नाहीं, तर ते आपल्या संततीच्या नाशासही कारणीभूत होतील. ते तुला सर्वस्वीं नागावतील, आणि तुझी गणना मूर्खांत करतील. तुला कुटुंबसुख आणि संततिसुख फारच कमी आहे. तुझा प्राणघात होण्याचा प्रसंग आहे. जातीपैकीं कांहीं लोक आणि आप्त जनांपैकीं कांहींजण तुझा अज्ञानानें आणि गर्वानें बाह्यत्कारीं द्वेष व मत्सर करतील खरे; पण अंतरयामीं त्यांची तुजसंबंधानें प्रेम व पूज्यबुद्धि राहील. हे माझ्या वडिलांचे बोल अक्षरशः खरे झाल्याचा मला पूर्ण अनुभव आला; याचा मला येथें उल्लेख करण्यास मोठें दुःख वाटत आहे. अशा प्रेमरहित कुटुंबांत परमेश्वरानें मला जन्मास घातलें, हा पूर्वजन्मीच्या कर्मांचा परिणाम

होय असें समजून "ठेविलें अनंतें तैसेंचि रहावें । चित्तीं असों द्यावें समाधान," या श्री तुकोबारायाच्या उपदेशास अनुसरून मीं आपले दिवस काढीत आहें. माझ्या आतस्वकीयांचें कल्याण करण्याकडे माझे सारे विचार व प्रयत्न होते. त्यास हरताळ लागली; त्याचा शेवटीं परिणाम असा झाला कीं, मी आपल्या संसारसुखास आणि अपत्यसुखास मुकलों; याबद्दल माझ्या मनाला पश्चात्ताप होऊन दुःख वाटतें.

**मातोश्रीचे बोलः**—माझी मातोश्री मला नेहमीं असें सांगत असे कीं, ज्या कुटुंबांत पुनर्विवाहाची भार्या आहे त्या कुटुंबांत अनेक कलह उत्पन्न होत असतात; आणि ज्या कुटुंबांत स्त्रीचा सारा ओढा आपल्या माहेराकडे अधिक असतो तेथें सुख नांदत नसतें; या दोन्ही गोष्टींचा मला पूर्ण अनुभव आला.

**वडील बंधूंचे विचारः**—माझ्या वडील बंधूचें मला असें सांगणें असे कीं, ज्या कुटुंबांत अमर्यादा, निरुद्योगीपणा, आळस व व्यसन यांचें साम्राज्य आहे अशा कुटुंबाचा सर्वस्वी नाश झाल्याचीं विपुल उदाहरणें आहेत. अशा कुटुंबांत तुला कदापि सुखप्राप्ति होणार नाहीं. हें जाणूनच मीं पूर्वीपासून अलिप्त राहिलों. तूंहि अशा आप्तवर्गापासून अलिप्त रहा आणि तुला त्यांना जी मदत करणें असेल ती योग्य मार्गानें करीत जा. अशी माझी तुला खऱ्या बंधुत्वाच्या नात्यानें प्रेमाची सूचना आहे.

**ज्योतिष्याचे बोलः**–शरीरप्रकृति चांगली व निरोगी राहील; पण मागें अनेक चिंता असणार. ज्ञानतेज अधिक असणार. मन हे उदार व परोपकारी असणार. अनेक भार्यांचा योग असून अंतीं दुःखी व्हाल. संततीचा अभाव, पण अर्धें आयुष्य उलटल्यावर दोन पुत्राचा योग आहे. पण त्यांपैकीं एकाचा घात होणार. एका बंधूखेरीज करून दुसरे विरुद्ध मार्गावर असणार. व्यापारांत पूर्ण यश मिळून कीर्ति चांगली संपादन कराल. धन विपुल मिळवाल पण संचय होणार नाहीं. आप्त सुखी असावे आणि आपणांत सौख्य आणि ऐक्यभाव असावा; यासाठीं आपण त्यांना तन–मन–धनपूर्वक आश्रय द्याल; पण हें सारें निष्फळ होणार. तुमच्या संततीच्या संबंधानेंहि त्यांच्या मनांत पूर्ण द्वेष व मत्सरभाव उत्पन्न होऊन ते तिला शत्रुवत् पहातील; आणि निर्वंश होण्याची आणि दत्तकाची योजना करण्याची इच्छा प्रदर्शित करतील. आप्तांमध्यें एकी राहणार नाहीं; आणि स्वार्थ साधण्यापलीकडे त्यांना कांहींच दिसणार नाहीं; आणखीं समजणारहि नाहीं. तुमचा दुर्लौकिक करण्यांत ते बिलकूल कसूर करणार नाहींत. अपत्यांत कुसंगतीनें अमर्यादा, असत्य, जुगार, मत्सर, मद्य, गर्व यांचें वर्चस्व होऊन तुम्हांस मूर्खांत ढकलतील; त्यामुळें तुमच्या प्रकृतीस विशेष ताप होणार. तुमच्या पश्चात् अनेक भानगडी व विचार उत्पन्न होणार. इ. इ. इ.

**कनक** आणि **कांताः**—जर आपण आजपर्यंतचे ऐतिहासिक ग्रंथ सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन आणि मनन केले तर आपणांस असें कळून येतें कीं, पूर्वकालीं ज्या

कांहीं मोठमोठ्या उलाढाली झाल्या त्यांच्या मुळाशी **कनक** आणि **कांता** या दोहोंपैकीं कोणती तरी एक गोष्ट असावयाचीच; त्याचप्रमाणें ज्या नामांकित घराण्याचा नाश झाला किंवा होऊं घातला आहे त्याच्याहि मुळाशीं बहुतकरून **कनक** आणि **कांता** यांपैकीं कोणती तरी एक गोष्ट कारणीभूत असावयाचीच हें अगदीं निःसंशय व निर्विवाद आहे.

पुरातन काळापासून आजपर्यंत **मर्यादा** हें एक खऱ्या गृहसौख्याचे आणि शांतीचें प्रबल साधन आहे; परंतु जेथें तिचें उल्लंघन झालें तेथें खऱ्या सुखशांतीचा ऱ्हास झाला म्हणून समजावा.

पूर्वकाळीं वडील मनुष्यें आपल्या जवळ किती माया आहे ती घरांतील इतर मंडळीस आणि स्त्रियांसहि कळूं देत नसत; त्यामुळें कुटुंबांत ऐक्य आणि सौख्य नांदत असे; परंतु आपल्या संपत्तीचा अंत कुटुंबांतील पुरुष, स्त्री आणि मुलें यांना कळूं दिला म्हणजे त्यापासून तीं अमर्यादशील होऊन कुटुंबांत दुःखें व संकटें यांचा सुळसुळाट होतो, इतकेंच नाहीं तर, कित्येक प्रसंगीं त्यांच्या प्राणांचे बळीहि पडल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत.

ज्या कुटुंबांत जी स्त्री वारंवार आजारी पडते आणि हमेषा आपल्या प्रकृतीच्या अस्वस्थतेसंबंधानें कुरकूर करीत असते, ती प्रथम मर्यादेचें उल्लंघन करून आपल्या पतीस आपला गुलाम बनविते. त्या स्त्रीला आपला पति, आपली संतति आणि माहेरचें गणगोत याशिवाय इतर कोणी दिसत नाहीं. नंतर ती कुटुंबांतील इतर मंडळीवर स्वतंत्रतेनें अधिकार चालविण्यास सुरवात करते. आपल्या पतीस आपला अंकित करून विभक्त होण्यासाठीं त्याचे कान फुंकते; किंवा कुटुंबांतील इतर मंडळीस जेणेंकडून ताप होईल आणि वाद उत्पन्न होतील अशा प्रकारचें वर्तन समयानुसार ठेवण्यास सुरवात करते.

अशा स्त्रीचा पति हा बहुशा पराधीन, मूर्ख, निरुद्योगी आणि दुर्व्यसनी बनून घरांतील आप्त मंडळीस त्रासदायक तर होतोच, पण त्याची संततिहि त्याच्याच वळणावर जाते; आणि ती अधिकच विषारी होऊन त्यांची आपल्या घराण्याचा विध्वंस करण्यापर्यंत मजल जाऊन धडकते. अशा प्रकारें पुष्कळ प्रतिष्ठित व चांगल्या नांवलौकिकास आलेल्या घराण्यांचा नाश झाला आहे.

ज्या गृहस्थाचें कुटुंब मोठें, खाऊनपिऊन सुखी, आणि मर्यादशील आणि एक विचारें वागून संसारसुखाचा उपभोग घेत आहे अशा प्रकारच्या सुखी व आनंदी कुटुंबांत वरील प्रकारची स्त्री कलंकीरूप प्रगट करते; आणि तिचे बाईलाधीन झालेले पति तिच्या नादानें दिग्वीजयी बनून आपल्या स्वतःच्या आणि दुसऱ्याच्या भावी पिढीचा नाश करण्यास प्रवृत्त होतो. अशा प्रकारचे कलंकी स्त्रीपुरुष ज्या कुटुंबांत पैदा झाले असतील त्या कुटुंबाचा जो कर्ता असेल, वृद्ध असेल तोच उलट घरींदारीं सर्वस्वीं मूर्ख ठरतो!!!

पण तो ज्ञानी असल्यामुळें त्यांस ह्या 'मूर्ख' विशेषणाचें कोणत्याही प्रकारें विषमय वाटत नाहीं; परंतु जर का अशा स्थितीमध्यें त्याचें वय होऊन गेलें असेल, मायेममतेचें जवळ कोणी नसेल आणि उतारवयांत झालेली संतति अज्ञान स्थितींत असेल; आणखी त्या अज्ञानसंततीस त्याच्या मातापित्यांच्या बाजूकडील प्रेम करणारें कोणी नसेल तर त्या वृद्धाला आपल्या पश्चात् आपल्या अज्ञान संततीचें कोण बरें पाहील हीच मोठी चिंता लागलेली असते. अशा अज्ञान व निराश्रित संततीच्या हिताकडे लक्ष्य ठेवणें हाच खरा परोपकाराचा आणि पुण्याचा मार्ग आहे.

**व्यापारः**—उत्तम शेती खरी, पण सांप्रत तिची अत्यंत कनिष्ठ स्थिति होऊन तिची श्रेष्ठता काय ती म्हणी मध्येंच गुरफुटून राहिली आहे, असें पुष्कळांचें मत झालें आहे. उत्तम हें पद व्यापारानें पटकाविलें आहे, असेंहि पुष्कळांचें ठाम मत होऊन बसलें आहे, तेंही खरेंच ठरत आहे. व्यापारांत नियमानें वागल्यास आणि प्रसंगानुरूप योग्य दिशेनें प्रयत्न करीत गेल्यास खरोखरच रंकाचे राव बनल्याचीं पुष्कळ उदाहरणें आपल्या नजरेसमोर ढळढळीत दिसत आहेत; म्हणूनच हल्लींच्या काळीं व्यापार हाच उत्तम व श्रेष्ठ होय. जरी कांहीं लोक नोकरी ही उत्तम समजत आहेत, तथापि तिचें उत्पन्न अगदीं मर्यादित असेंच असतें. मी एक साधारण गरीब स्थितींतला असून मजजवळ कांहींच भांडवल देखील नसतां केवळ व्यापारी धोरण आणि दीर्घ प्रयत्न यांच्याच योगानें मला भरभराटीच्या काळाचा अल्पसा अनुभव प्राप्त झाला. अशा समयीं माझ्या हातून जें कांहीं घडलें त्याचें दिक्प्रदर्शन केल्यास मी काहीं आत्मस्तुति दोषास पात्र होणार नाहीं.

**एकत्र कुटूंबः**—कर्तव्य धर्म जाणून मीं आपल्या नातलगांचीं लग्नें, आणि स्वकीय नातलगांना साह्य आणि त्यांचा प्रतिपाल या कामीं आजपर्यंत मला सुमारें ६८,००० रुपयांवर खर्च करावा लागला आहे.

धर्मादाय आणि सार्वजानिक कार्यास मदत वगैरे कामीं १५०००रुपये खर्च आला.

**द्रव्यहानीः**—सुखाअंतीं दुःख हें ठेवलेलें आहेच, या न्यायास अनुसरून मला किती ठोकारा बसल्या ह्याहि येथें नमूद करून ठेवल्या पाहिजेत. नुक्तीच जी आपल्या देशांत ब्यांकांचीं दिवाळीं काढण्याची सांथ येऊन गेली त्या साथींत **बर्माब्यांक**, **पिपल्सब्यांक** आणि **स्पेसीब्यांक** ह्या बळी पडल्या. या ब्यांका **लिक्विडेशन**मध्यें ( म्हणजे दिवाळें काढल्यामुळें ) गेल्यामुळें मला रुपये १०,००० ची ठोकर बसली !!! तसेंच कांहीं कारखाने व कंपन्यांचे शेअर्स ( भाग ) घेतले होते; पण त्यांपैकीं कांहीं डुबल्या त्यामुळें मला ३,००० चट्टा बसला ! आणखी, माझे कनिष्ठ बंधुनें मी मोत्यांचा व्यापार करतों असें दाखवून मजजवळून रुपयांच्या वरचेवर मोठमोठ्या रकमा उचलाव्या आणि त्या घोड्यांच्या शर्यतींतील जुगारामध्यें घालवाव्या; या त्याच्या नादामुळें त्यानीं मला१०,००० च्या खड्यांत आणलें !!!

**सोनेरी टोळीः**—मुंबईत हमेशा बाहेरगांवचे राजेरजवाडे येत असतात; त्यांपैकीं

कित्येकांकडून त्यांचे नोकर माझ्या ऑफिसांत येऊन कळवीत कीं, अमुक महाराजांची स्वारी आली आहे; त्यांना आपणाकडून कांहीं माल खरेदी करावयाचा आहे; यासाठीं तो आपल्या मनुष्यानें मजबरोबर घेऊन यावा अशी सरकारची आज्ञा झाली आहे. त्याप्रमाणें मी त्याच्याबरोबर माझ्या मनुष्याजवळ माल देऊन पाठवीत असें; आणि त्यामुळें चांगली विक्री होत असे. कधीं कधीं असेंहि प्रसंग आले आहेत कीं, अमुक राजानें माल घेऊन येण्यास सांगितलें आहे. मीं आपल्या मनुष्याबरोबर माल देऊन पाठवावा. राजाचा नोकर बंगल्याजवळ जाऊन राजेसाहेबांस माल दाखवितों अशी थाप देऊन त्याच्याजवळून माल घेऊन बंगल्यांत जावें. माझ्या मनुष्यानें त्याची वाट पाहत दोन दोन, चार चार तास बाहेर तिष्ठत बसावें. आणि शेवटीं असें कळून यावें कीं, आपणास सोनेरी टोळीनें फसविलें ! अशा प्रकारें माझें नुकसान सुमारें ५००० रुपयांपर्यंत झालें आहे. ! !

**संभावित फसवेगिरीः**—कित्येक लोक आपण देऊळ बांधतों, अमुक अमुक देवळाचा जिर्णोद्धार करतों. अमुक ठिकाणीं तळें किंवा विहीर बांधतों. मीं अमुक सार्वजनिक संस्थेचा मनुष्य आहें; याकामीं आपली मदत मागण्यास आलों आहें. अशाप्रकारें संभावितपणाचें ढोंग दाखवून मला सुमारें ३००० रुपयापर्यंत फसविलें आहे ! !

**बाललीला** ! ! ! मुंबई शहरांत म्युनिसिपालिटीची सूर्योदय होण्यापूर्वींच रस्ते झाडून काढण्याची वहिवाट आहे. हिंवाळ्याच्या दिवसांत लोक कचऱ्याच्या लहान लहान ढिगास काडी लावून शेकत बसतात; हा प्रकार माझी कन्या चि. अहिल्याबाईनें पाहिला; त्या वेळीं ती सुमारे पांच वर्षांची होती. तिनेंहि एके दिवशीं घरांतील दाराच्या कोपऱ्यांत ठेवलेल्या कचऱ्याच्या कागदाच्या चिठोऱ्यास काडी लावून आग लावली ! त्या कचऱ्यांत आणखी कागद टाकण्याच्या हेतूनें माझ्या पेटींत ठेवलेल्या शंभर रुपयांच्या नोटांचा पुडका काढून तोही त्यांत टाकला ! मला कागद जळल्याचा वास आला, म्हणून मी कागद कोठें जळत आहेत तें पाहण्यासाठीं उठलों, तेव्हां माझ्या नजरेस असें पडलें कीं, मुलगी कागद जाळीत बसली आहे आणि त्यांत नोटाहि जळत आहेत. त्या मीं पेपर करेन्सी ऑफिसांत नेल्या पण त्याचा कांहींच उपयोग झाला नाहीं !

**खोट्या नोटाः**—माझें ऑफिस जेव्हां भायखळ्यावर होतें त्या वेळीं दुसरा असा एक प्रसंग आला कीं, एका व्यापाऱ्याकडून मला एका हुंडीचे ५०० रुपयांच्या पांच पांच रुपयांच्या नोटा आल्या; त्या मी जमा केल्या. मीं ह्या नोटा आणि घरांतील दुसरी रकम घेऊन सराफ बाजारांत हजार बाराशें रुपयांचें सोनें विकत घेण्याकरितां गेलों. सोनें खरेदी केलें, आणि त्याचे पैसेहि चुकते केले; त्यांतील पांच पांच रुपयांच्या नोटा पाहून सराफानें मला असें कळविलें कीं, ह्या नोटा बनावट आहेत ! आपण चांगले भले व संभावित गृहस्थ आहांत,

म्हणूनच मी आपणांस आपला हितचिंतक याच नात्यानें असें सांगतों कीं, आपण यासंबंधानें विशेष चर्चा न करितां, आपल्या नोटा चोरीस गेल्या किंवा गहाळ झाल्या असें मानून त्या जाळून टाका! हाच या प्रसंगीं अगदीं उत्तमोत्तम मार्ग आहे. त्या सराफानें मला आपल्या घराजवळ आणून पोंहचविलें. बाजारांत पांच पांच रुपयांच्या खोट्या व बनावट नोटा निघाल्या आहेत यासंबंधानें त्यानें माझी पूर्ण खात्री केली; म्हणूनच मला त्या पांचशें रुपयांच्या पांच पांच रुपयांच्या नोटा जाळून टाकाव्या लागल्या!!!

**अग्निः**—सिताराम बिल्डिंगमध्यें तीन चार वेळां आगी लागल्या. दोन वेळां तर मोठीच भयंकर आग लागली. इमारतीच्या मालकाचें आणि भाडेकरी व्यापारी लोकांचें पुष्कळ नुकसान झालें. एका वेळीं तर माझ्या ऑफिसाचेवर आणि दुसऱ्या वेळीं माझ्या ऑफिसाच्या शेजारीं आग लागली होती! परंतु परमेश्वराच्या कृपेनें माझें कोणत्याहि प्रकारचें नुकसान झालें नाहीं. पुण्यांतील माझ्या स्वतःच्या वाड्याशेजारील श्री विठ्ठलमंदिरास आग लागली होती! त्या प्रसंगींहि श्री अग्निनारायणानें मोठीच कृपा केली; त्यामुळें कांहींच नुकसान झालें नाहीं.

**नातलगाचें वर्तनः**—माझ्या वयाच्या सुमारें विसाव्या वर्षापासून तों आतांपर्यंत मला नोकरी व व्यापार निमित्तानें बाहेरगांवीं राहण्याचे प्रसंग आले; त्यामुळें पुण्यास जाणें व राहणें फारच थोडें म्हणजे वर्षातून दहा बारा दिवसांच्या पलीकडे मुळींच होत नसे; यदाकदाचित अधिक झाल्यास तेथें माझे जे नातलग स्वतंत्रपणें राहत आहेत त्यांना माझी मोठी अडचण वाटे; आणि ते कांहीं तरी कुरापत काढीत; त्यामुळें मला आपला गाशा लवकरच गुंडाळावा लागत असे.

वडिलांनीं जें कांहीं केलें त्याचा अभिमान त्यांच्या संततीला असणें हें अगदीं स्वाभाविक आहे. ज्या गांवीं माझ्या वडिलांनीं आपली इस्टेट करून ठेविली आहे तेथेंच मीहि आपली इस्टेट करून ठेविली आहे. मी जीं तेथें कांहीं स्वकष्टार्जित घरें विकत घेतलीं आहेत; तीं सांभाळण्यास आणि तिची कमजास्त व्यवस्था पाहण्यास कोणीतरी जवळचा किंवा एखादा भाडोत्री मनुष्य ठेविला पाहिजे; म्हणून मीं माझे नातलग जे मायापाशांत गुंतले आहेत आणि व्यसनाधीन झाले आहेत; अशांच्या स्वाधीन मला जरी तीं करावीं लागलीं आहेत तथापि मीं त्यांच्याकडून भाडेचिठ्ठी लिहून घेतली आहे. ते माझे नातलग आणि कुटुंबवत्सल असल्यानें आणि ते माझे म्हणविणारे असल्यामुळें त्यांचा प्रपंच सुखानें चालला पाहिजे अशा प्रकारची मी त्यांची सोय करून दिली; परंतु स्त्रीबुद्धीनें चालणारे आणि व्यसनी असल्यामुळें ते स्वहितशत्रु बनले, आणि स्वहितास मुकले. ते आपल्या आणि आपल्या संततीच्या नाशास कारणीभूत झाले. हें जेव्हां मला समजलें, तेव्हां मला असें कळून चुकलें की, मीं यांच्यावर भरंवशानें आणि नातलग समजून वडिलांचें चिरस्मरणीय स्मारक अथवा देणगी जी माझ्या हक्काची व मालकीची तीहि

नामशेष होणार; म्हणून मी त्यांना विनयपूर्वक अशी सूचना केली कीं, तुह्मांस दिलेल्या देणगीचा तुह्माला सांभाळ करतां आला नाहीं आणि करण्यास आपण अगदीं अपात्र आणि नालायक आहांत; यासाठीं आपण माझी अनामत माझ्या स्वाधीन करा. ही तुमच्याकडे फार दिवस राहणार नाहीं. माझ्या नातलगांनीं ती माझ्या स्वाधीन करण्यास रुकार दिला; परंतु त्याच्या संततीपैकीं वडलि चिरंजिवानें मला असें उत्तर दिलें कीं, माझे अज्ञान बंधु सज्ञान झाल्यावर तुमची अनामत तुह्मांस परत करण्यासंबंधानें विचार करतां येईल. मी पुढील भाविष्य केल्याप्रमाणें ती माझी अनामत तिसऱ्याच्या ताब्यांमध्यें जाऊन विकण्याचा प्रसंग आला; त्यावेळीं सज्ञान बोलूं लागले कीं, हें आपल्या वडिलांचें स्मारक नाहींसें होत चाललें आहे, तें आतां आपण आपल्या ताब्यांत घ्या; त्याप्रमाणें ती मीं सोडवून घेतली. अशा नातलगांच्या स्वाधीन एखादी अबला किंवा अज्ञान यांचा सांभाळ करण्याचें काम सोंपाविलें तर ते आपल्या विवेकाचा कोणत्या प्रकारें उपयोग करतील तें उघड उघड दिसत आहे. असे नातलग ज्या कुटुंबांत असतील त्या कुटुंबांत कितपत सुख-शांति नांदणार आणि त्याचा शेवट कसा होणार हें निराळें सांगणें नको.

**त्रागा** अथवा **पोकळभीतिः**—यासंबंधानें माझे वडील यांनीं मला आपला असा अनुभव सांगितला कीं, माझी बहीण शिवबाई ही नेहमीं आमच्या आई-बापांना क्षुल्लक कारणावरून अतिशय त्रास देत असे; आणि मी आपला जीव विहिरींत देईन अशी भीति दाखविण्यासाठीं ती विहिरीच्या बांधावर विहिरींत पाय सोडून बसत असे. हिची चांगली खोडकी मोडण्याची मी संधी पाहत होतों. एके दिवशीं ती नेहमीप्रमाणें जीव देण्याची भीति दाखविण्याकारितां विहिरीच्या बांधावर विहिरींत पाय सोडून बसली. या प्रसंगीं मी तिला दोराच्या जाळ्यांत अड-कवून राहटाच्या दोरास बांधून विहीरींत सोडून दिलें; आणि तेथें तिला चांगल्याच दोन चार गटांगळ्या खाऊं दिल्या; त्या वेळीं ती मोठ्या दीन स्वरानें ओरडून असें बोलली कीं, मला वर घ्या, मी यापुढें जीव देईन असे शब्द तोंडावाटें काढणार नाहीं; तेव्हां तिला वर घेतलें. त्या दिवसापासून तिनें जीव देईन असे शब्द काढले नाहींत; आणि आपला हट्टी स्वभावहि सोडला.

माझे धाकटे बंधु गोपाळराव हे जेव्हां आयत्या पिठावर रेघा ओढणारे आणि व्यसनाधीन झाल्याचें माझ्या वडिलांच्या नजरेस आलें, तेव्हां या त्याच्या अमर्यादशील आणि वाईट संगतीचा वाईट पारिणाम होणार तो सुधारण्यासाठीं त्यांनीं असें केलें कीं, त्याला कामापुरतीं भांडीं आणि एक महिन्याची पोटगी देऊन त्याला निराळा ठेवला. आणखी त्याला असें सांगितलें कीं, तूं स्वतः कमाई कर आणि वाटेल तसे रंगढंग उडीव. परंतु दोन तीन महिने लोटतात न लोटतात तोंच त्यांच्याजवळचें किडीकमुड्डक पार झालें. अशी जेव्हां वेळ येऊन थडकली तेव्हां त्याचे डोळे उघडले, कुसंगत सोडली आणि शुद्धीवर आले.

मी माझ्याजवळ भावाचीं आणि बहिणीचीं मुलें जवळ केलीं असल्यामुळें मला त्यांना अधिक बोलतां येत नसे. ते जरी माझा अगदीं क्षुल्लक गोष्टीवरून उपमर्द करीत तरी मी तो निमुटपणें सहन करीत असे. पुढें तर त्यांच्या रुसण्या-फुगण्याचा फार्स होऊं लागला. मीं आतां बाटतों, किंवा जीव देतों; असें मला भय दाखवूं लागले. यांनीं असें भलतें सलतें करूं नये म्हणून मी देवाला इतका भक्तिभाव पूर्वक नमस्कार केला नसेल इतका त्यांना केला; आणि त्यांची मनधरणी करावीं लागत असे; कारण मला दिर्घायुषी संतति नाहीं, आणि झाली होती ती अल्पायुषी झाली आणि हल्लीं आहे ती फार अशक्त! याचमुळें मला त्यांची इतकी पायधरणी करावी लागली. जेथें निरुद्योगी, व्यसनी, आयत्या-पिठावर रेघा ओढणारे व पंगतचे पठाण, अमर्यादशील अशी पंचरंगी विचारी मंडळी असेल तेथें खरें गृहसौख्य कसें प्राप्त होणार?

## जातीचा इतिहास लिहिण्याकडे माझ्या मनाची प्रवृत्ति कशी झाली?



कै. श्री नंदरामजी.

कै. श्री. नंदरामजी सुंदरजी कवलीये नाईक पुण्यांतील कंट्राक्टर यांनीं तुळशी बागेंतील **श्री राममंदिर** याचें शिखर आणि सभामंडप यांचा जिर्णोद्धार केला. या कामीं सुमारें एक लाख रुपये खर्च करून त्यांनीं मोठा भव्य सभामंडप बांधला आणि शिखरहि उंच शोभिवंत बांधलें. त्याचप्रमाणें त्यांनीं श्री क्षेत्र पंढरपूर येथील चंद्रभागेंतील श्री. **पुंडलिक** यांचें मोठें देवालय बांधलें; याशिवाय त्यांनीं अनेक धर्मकृत्यें केलीं; आणि जातीचीहि त्या काळानुरुप उत्तम सेवा केली. हल्लीं त्यांचे एक नातू आहेत; त्यांचे नांव हिरालाल. हा इतिहास लिहिण्याची प्रथम कल्पना ही श्री० नंदरामजी यांनींच माझ्या मनामध्यें घातली त्याबद्दल मी त्यांचे येथें आभार प्रदर्शित करतों.

आम्ही रजपूत असून आमच्या जातीची गणना शूद्रांत ( कुंभारांत ) कां

झाली आहे ? लोक आम्हांस शूद्र कां म्हणतात ! याविषयीं सूक्ष्मरीतीनें शोध व विचार करण्यास मला अनेक प्रसंग मिळाले. मी पुष्कळ ठिकाणीं फिरल्यामुळें आणि माझ्या मनाचा शोध करण्याकडे स्वाभाविक कल असल्यामुळें मला फारच थोड्या ठिकाणीं स्वजातीचे विटा कौलें करणारे कारखानदार आणि भेंड्याच्या (मातीच्या) भिंती बांधणारे मजूर आढळण्यांत आले. परंतु मडकीं वगैरे खरें कुंभारी कर्म करणारे कोणीच आढळलें नाहींत. हीं कामें करणारी स्वतंत्र जात असून आणि आम्ही खरे रजपूत असून आमच्या जातीस कुंभार हें विशेषण कां मिळालें, ही गोष्ट माझ्या मनास अतिशय डाचत असे. विटाकौलें करण्यासंबंधानें हमेषा वाद व चर्चा केल्यास असें उत्तर मिळत असे कीं, " हात बाटले म्हणून जात ही कांहीं बाटत नाहीं. पोटासाठीं कोणताहि प्रामाणिक धंदा केल्यास अधर्म होत नाहीं. "

माझा आपल्या जातीचा इतिहास लिहिण्याचा प्रयत्न हा पुष्कळ वर्षांपासून चालू होता; यामुळें कांहीं वर्षांपूर्वी आपणहि आपल्या जातीचा इतिहास प्रसिद्ध करावा अशी कल्पना रा. गोवर्धन बाळारामजी किनारीवाळ ( कुकडवाळ ) यांच्या डोक्यात आली होती; त्यांनीं छापील विनंतिपत्र द्वारें असा डांगोरा पिटविला होता कीं, " आम्ही सतत नऊ वर्षे सारखा प्रयत्न करून जातीची आपले हातून कांहीं तरी अल्प सेवा घडावी या हेतूनें, ' **परदेशी कुंभार** अथवा **कुंभार गवंडी** ( ज्या जातींत नाकांत नथ घालण्याची चाल नाहीं ) या **जातीचा इतिहास** लिहीत आहोंत " अशा महा इतिहास शोधक लेखकास आपल्या ज्ञातीच्या मूळ नांवासंबंधानें ' सतत नऊ वर्षे सारखा प्रयत्न करून 'ही कितपत शोध लागला आहे, हें ठरविण्याचें काम मी आपल्या विचारशील वाचक वर्गावर सोंपवितों. अज्ञानामुळें आपल्या ज्ञातीस जें हीन नांव प्राप्त झालें आहे तें या सज्ञानाच्या काळांत चालू ठेवणें यांत ज्ञातीची कितपत सेवा घडणार आहे याचाहि निर्णय करण्याचें काम चाणाक्ष वाचकावरच सोंपविलें पाहिजे. सदरहु **विनंतिपत्र** सन १९०६ सालीं प्रसिद्ध झालें असून इतिहास हा सन १९०७ सालीं प्रसिद्ध होणार होता; परंतु तो अद्याप गर्भावस्थेंतच पडून राहिला आहे. ह्मण आहे " बोलेल तो करील काय ? आणि गर्जेल तो पडेल काय ? " अशा प्रकारची त्याची अवस्था झाली; यावरून ही एक गोष्ट विशेष ढळढळीत रीतीनें दिसून आली कीं, आपल्या जातीचा इतिहास लिहिणें हें मोठें कठीण व जोखमीचें काम होतें. अशा स्थितींत मी ही जी जातीची वेडीवांकडी सेवा केली आहे ती लोकांना कितपत रुचते हें ठरविण्याचें काम माझ्या ज्ञात बंधुचें आहे.

जेव्हां मी वऱ्हाडामध्यें होतो, तेव्हां माझा एका ऑनररी म्याजिस्ट्रेट बरोबर स्नेह झाला होता. मीं त्याच्या मुलाच्या लग्नाकरिता मुंबईहून कांहीं सामान मागवून दिलें होतें; त्याचा बहुतेक हिशेब मला मिळाला; परंतु ते क्षुल्लक बाकीकडे दुर्लक्ष्य करीत असत. एके वेळीं माझा मनुष्य त्यांच्याकडे बाकी मागण्यास गेला असतां, त्याच्या-

जवळ ते विनोदानें असें म्हणाले कीं, " कायहो, कुंभाराची जात किती तरी हलकट असते. " माझ्या मनुष्यानें त्याच वेळीं त्यांना असें उत्तर दिलें कीं, ' रावसाहेब, भटाइतकी नसते. " या विनोदाचा परिणाम कोर्टापर्यंत जाऊन मी आपली बाकी वसूल तर केलीच, पण त्या दिवसापासून माझ्या मनाची विशेष प्रवृत्ति जातीचें मूळ शोधाकडे लागून राहिल्याकारणानें तो एक प्रकारचा छंदच लागून राहिला; त्याबद्दल लोकांनीं मला नांवें ठेवलीं; आणि जरी अनेक विघ्नें, अडचणी आणि उमेद खचण्याचे प्रसंग येऊन घडकले तथापि त्यांस न जुमानता प्रयत्न अखंड चालू होता; त्याप्रमाणें वडिलांच्या पुण्याईनें वेडींवाकडीं कशीं तरी चार अक्षरें खरडून मी सन १९१५ मध्यें मनाचें समाधान करून घेतलें.

मीं जो जातीचा इतिहास लिहिला आहे तो कितपत उपयुक्त व महत्त्वाचा झाला आहे हें ठरविण्याचें काम ज्याच्या त्याच्या विचारावर अवलंबून आहे; तो त्यांच्या विचाराच्या कसोटीस कसा उतरेल तो उतरो; पण त्यासंबंधानें मला येथें इतकें सांगितल्यावांचून राहवत नाहीं कीं, इतिहास शोधण्याचें आणि तत्संबंधीं विचार करण्याचें आणि लिहिण्याचें काम सर्वस्वी माझ्या एकट्यावरच पडल्यामुळें त्याच्या दगदगीनें माझ्या प्रकृतीवर बराच अपायकारक परिणाम झाला आणि दृष्टीसहि बरेंच मांद्य आलें; इतकेंच नाहींतर, कुटुंबांतील दोषासही पात्र करून घेतलें आहे. आपल्या कुटुंबांतील अगदीं जवळच्या नातलगाच्या मृत्यूसारख्या दुःखप्रसंगीं आणि विवाहासारख्या मंगल कार्यास जाणें हा मनुष्याचा आद्य व श्रेष्ठ धर्म आहे. पण अशा सुख-दुःखाच्या प्रसंगीं इतिहास लिहीण्याच्या कामांत मी इतका निमग्न व तल्लीन होऊन गेलों होतों कीं, मला माझ्या घरच्या माणसांच्या शुभाशुभ प्रसंगीं जातां आलें नाहीं. माझे पुतणे चि. दत्ताराम, आणि गजानन यांच्या लग्नास जातां आलें नाहीं; मला माझा भाचा नाना भाऊ, भाची भमताबाई आणि बंधुशालक किसनभाऊ यांच्या दिवसांस जातां आलें नाहीं; तसेंच किंवा इतर महत्त्वाच्या कार्यांत भाग घेतां आला नाहीं; याबद्दल मला मोठी दिलगिरी वाटत आहे. याशिवाय व्यापारधंद्याकडे दुर्लक्ष्य झाल्यामुळें किती माझें नुकसान झालें असेल, हें निराळें सांगणें नकोच.

इतिहास लिहिण्यास कोणत्या प्रकारची सामुग्री पाहिजे, ती गोळा करण्याचे मार्ग व साधनें कोणतीं, माहिती देणारे कशा प्रकारचे असावेत, जी माहिती गोळा केली आहे ती कितपत सत्य व विश्वसनीय आहे, तत्संबंधानें चर्चा करून निर्णय ठरविण्यास तसाच योग्य मनुष्य पाहिजे. परंतु तसें कांहीं न झाल्यामुळें ही सारी जबाबदारी माझ्या एकट्यावरच पडली; त्यामुळेंही अनेक प्रमाद व नजरचुका होण्याचा पुष्कळ संभव आहे. तसेच इतिहास छाप-ण्याचें काम पूर्ण झाल्यामुळें दोन अत्यंत महत्त्वाच्या विषयांच्या टिपणाचें स्मरण वेळेवर न झाल्यामुळें तें चुकून राहिलें. ही चूक मागाहून नजरेस आली. त्यामुळें जे विषय मूळ ग्रंथांत यावयास पाहिजे होते; तें निरुपायामुळें इतिहासाच्या

प्रस्तावनेंत आणि परिशिष्टामध्यें घालावे लागले; याबद्दल मला फार दिलगिरी वाटत आहे. इतिहास व माझें टिपण हें २०० पानाचें होऊन १०००रु. खर्च येईल असा माझा अजमास होता; पण तें ४०० पानाचें होऊन २५००रु. खर्च आला.

**नित्यकर्मः**--मी जेव्हां वीस वर्षांचा होतों तेव्हां माझ्या वडिलांनीं मजजवळ असे उद्गार काढले होते कीं, आपण जर आपल्या अमोल्य वेळेचा दुरुपयोग केला तर आपण परमेश्वराच्या घरीं दोषी ठरुं; आणि निरुद्योगामुळें मनुष्यास कुबुद्धि प्राप्त होते. या वडिलांच्या उपदेशपर शब्दांचा माझ्या मनावर चांगला संस्कार घडला. आपण आपला वेळ व्यर्थ दवडूं नये; यासंबंधानें मी आस्थापूर्वक विशेष काळजी बाळगीत असतों. मीं आपल्या मनावर आपल्या आयुष्याचें वेळापत्रक लिहून ठेवल्यासारखें आचरण ठेवलें आहे. मी प्रातःकाळीं बरोबर पांच वांजतां उठतों. सहा वाजेपर्यंत ईश्वरनामस्मरण करतों. नंतर रोजचीं वर्तमानपत्रें वाचीत नियमित व ठराविक याचक वर्गास दानधर्म करून स्नानास जातों. स्नान करून आल्यावर श्रीशंकराची पूजा करणें, श्रीशिवलीलामृताचा एक अध्याय वाचणें, अकराशें जप करणें वगैरे धर्मविधि उरकण्यांत नवाचा सुमार होतो. तदनंतर बाहेरगांवचें आलेलें टपाल पाहून त्यावर संक्षिप्त उत्तरें, शेरे, वर्द्या वगैरे लिहून अकराचे आंत भोजन उरकून ऑफिसांतील कामास सुरवात करावयाची. ऑफिसांतील काम साडेपांच वाजेपर्यंत एकसारखेंच चालत असतें. शेवटीं, जमाखर्च तपासून देवदर्शनाच्या उद्देशानें सुमारें दीडतास व्यायाम घ्यावयाचा. आठ वाजतां संध्याकाळचें भोजन झाल्यावर सुमारें एक तास बाहेर किंवा घरांत फिरावयाचें. नंतर ईश्वरभजन करून बरोबर दहा वाजतां विश्रांति घ्यावयाची.

मी शाकाहारी आहें. जागरण वर्ज्य आणि नियमितपणा असल्यामुळें माझी प्रकृतिसंबंधानें कधींहि कोणत्याहि प्रकारची कुरकूर नसते. माझ्या विसाव्या वर्षीं माझा जितका आहार होता तितकाच आजपर्यंत आहे. मी चहा, कॉफी कधींहि पीत नाहीं, सकाळीं आणि रात्रीं आतपाव किंवा पावशेर दूध घेत असतों. मला विडीखेरीजकरून दुसरें कोणतेंहि व्यसन नाहीं; अलिकडे वयाच्या मानानें ती मला त्रास देत असल्यामुळें तिला लवकरच फारकत द्यावी लागेल असें दिसतें. माझ्या साऱ्या आयुष्यांत कै. शेट सिताराम लक्ष्मण यांच्या सहवासानें आणि आग्रहानें मला दोन तीन वेळां सर्कस आणि सार्वजनिक कार्यास मदत करणारें नाटक पाहण्यास जाण्याचा प्रसंग आला होता. मला कारणावांचून विशेष बोलण्याची जरी संवय नाहीं; तथापि जर एखादा विषय निघाला तर त्याचें पूर्ण विवेचन केल्यावांचून सोडावयाचें नाहीं. ऑफिसांतील किंवा घरांतील मनुष्यांना रागाच्या आवेशांत अपशब्द बोलाण्याची खोड नाहीं; परंतु ती रागाची वेळ निघून गेल्यावर शांतवृत्ति धारण करून प्रसंगानुसार विनोदपर व उपदेशपर दृष्टांत देऊन त्या मार्गानें कानउघाडणी करण्याची संवयी आहे.

**अपुरती विद्याः**—धन्य आहे माझ्या वडिलांची! ज्यांची विद्या केवळ गुजराथी सही करण्यापुरती, घरची अत्यंत गरिबी आणि संसाराचा पसारा पाहिला तर तो मोठा, अशा स्थितींत आणि नानाप्रकारच्या अडचणींत असतांहि त्यांना विद्येचें महत्त्व व योग्यता पूर्णपणें कळत असल्यामुळें त्यांनीं आपल्या चौघां पुत्रांना इंग्रजी चार पांच इयत्तांपर्यंत शिक्षण दिलें; त्यामुळें त्या शिक्षणावर आम्हीं दोघां वडील पुत्रांनीं अब्रूंत आयुष्य काढलें असें म्हणण्यास कोणत्याच प्रकारची हरकत दिसत नाहीं. हें विद्येचें महत्त्व मलाहि चांगलें समजून माझी आपले दोघे धाकटे बंधु गोपाळराव आणि तुळशीराम यांना बी. ए. पर्यंत शिक्षण देण्याची फार इच्छा होती; आणि त्याप्रमाणें मीं त्यांच्या विद्याभ्यासाची व्यवस्था ठेविली होती. मी आणि माझे वडील बंधु हे नोकरी आणि उद्योगधंद्यानिमित्तानें बाहेर गांवीं होतों; त्यामुळें या दोघां बंधूंना पुण्यासारख्या शहरीं विद्यासंपादनार्थ स्वतंत्रपणें ठेविलें होतें. त्यांच्या वयाच्या सतराव्या वर्षीं त्यांचीं लग्नें झालीं होतीं; यामुळें त्यांचें विद्येवरील लक्ष उडालें होतें. ते विद्येचे ग्राज्युएट होण्याच्या ऐवजीं चैनीचे मात्र ग्राज्युएट बनले! तदनंतर मीं त्यांना आपल्या उद्योगधंद्यांत घेतलें. त्यांचें अर्धवट ज्ञान, तारुण्यावस्था आणि स्वातंत्र्य अशा स्थितींत त्यांच्या हातांत पैसा खेळूं लागला. त्यांनीं जमाखर्च पद्धतीस अजीबात फांटा देऊन ते आपला खाजगी खर्च वाढता दाखवूं लागले. अर्थातच त्यांच्या अशा वर्तनानें त्यांच्या स्त्रियांच्या स्वातंत्र्यासहि विशेष उत्तेजन मिळत गेलें; आणि घरांत अमर्यादशीलपणाचें वर्तन सुरू झालें. वडील बंधु बाळाराम आणि धाकटे बंधु गोपाळराव यांना विभक्त राहण्याची बुद्धि झाली. अशा समयीं पैशाचा ओघ तिसऱ्याच ठिकाणीं होऊं लागला. जी स्त्री वरचेवर आजारी पडते किंवा आजारीपणाचें ढोंगसोंग दाखवीत असते, तिजवर पतिप्रीति अधिक वृद्धिंगत होत असते. पुढें ते पुरुष स्त्रीबुद्धिच्या अंकींत होऊन जातात; आणि त्यांना कुटुंबांत अनेक लबाड्या करण्याची खोड लागत असते. मला संततीचा अभाव असल्यामुळें वडील व कनिष्ठ बंधूचीं मुलेंलेकरें यांना जवळ करणें, त्यांचें लालनपालन करणें, त्यांना विद्या शिकविणें, आणि त्यांना नांवारूपास आणणें अशी हौस उत्पन्न होणें अगदीं स्वाभाविक आहे. वडील बंधूचीं दोन मुलें आणि कनिष्ठ बंधूचीं दोन मुलें हीं लहानपणापासून चवदा पंधरा वर्षांचीं होईपर्यंत मीं त्यांना आपल्याजवळ ठेवून घेतलें होतें; आणि त्यांचें इंग्रजी चारपांच इयत्तांपर्यंत शिक्षण सुरळीत आणि व्यवस्थेशीर चाललें होतें; परंतु **स्त्रीबुद्धिः प्रलयावहा** हें सत्य होण्याकरितां त्यांच्या लग्नाची हौस त्यांच्या मातापितरांच्या मनांत उत्पन्न होऊं लागली; त्यामुळें अर्थातच मला मोठ्या निरुपायामुळें मान्यता देऊन त्यांचीं लग्नेंहि मलाच करून द्यावीं लागलीं. मुलांचे फाजील लाड व आईबापांची हौस याचा असा परिणाम झाला कीं, मुलांच्या विद्येचा अवतार संपला आणि माझा हेतु पार रसातळास गेला ! ! !

**लायब्ररी**:–आपल्या ज्ञातींतील मंडळींना परस्परास भेटण्याचे वरचेवर प्रसंग यावेत, जातीसुधारणेसंबंधानें विचार, चर्चा व खल व्हावा, विद्यार्थी वर्गास उत्तेजन यावें व द्यावें वगैरे हेतूनें पुण्यांत शुक्रवार पेठेंत गजानन घाशिराम लव्हाणवाळ कंत्राटदार यांच्या घरांत एक फुकट लायब्ररी काढली होती; सदरहु लायब्ररीस मी आपल्या पुस्तकसंग्रहापैकीं सुमारें १०० पुस्तकें दिलीं होतीं. याशिवाय माझ्या व्यापाराच्या ज्या ज्या वर्तमानपत्रांत आणि मासिकपुस्तकांत जाहिराती येत होत्या तीं पत्रें व मासिकें मजकडे येत होतीं, तीं पत्रेंहि मी नियमानें या वाचन-गृहाकडे पाठवीत असें. या पुस्तकालयाची आस्थापूर्वक काळजी बाळगणारे असें तरुण व होतकरू रघुनाथराव गजानन लव्हाणीवाळ कंट्राक्टर यांच्या देखरेखीखालीं व्यवस्था ठेवली होती; हे त्याचे आनररी सेक्रेटरी [ सन्मानीय चिटणीस ] होते. यांनीं ओव्हरसीयरची परीक्षा देऊन नोकरीहि करीत होते. पण पुढें ती त्यांनीं सोडून स्वतंत्र कंत्राटी कामें घेऊं लागले; त्यांत त्यांनीं चांगली अब्रू व लौकिक संपादन केला. हे पुण्यांतील म्युनिसिपॅलिटींत लोकनियुक्त म्युनिसिपल कमिशनर होते. यांचा स्वभाव सर्वांसच प्रिय होईल असाच होता. यांना आपल्या जातीची सुधारणा व्हावी आणि जातींत विद्यावृद्धि व्हावी याविषयीं मोठी कळकळ असे आणि त्या दिशेनें त्याचे प्रयत्नहि चालले होते; अशा तरुणांचा अकालीं प्लेगनें अंत आला यामुळें त्यांच्या कुटुंबाचेंच नव्हे तर, आमच्या जातिसमाजाचें मोठेंच नुकसान झालें ! ! ! त्यांच्या मागें सदरहु लायब्ररीची आस्था बाळगणारा कोणी राहिला नाहीं आणि अशिक्षित व अक्षरशत्रूस या संस्थेची आवश्यकता, उपयुक्तता आणि महत्त्व कळत नसल्यामुळें ही अत्यंत लोकोपयुक्त संस्था शेवटीं लयास गेली ! पुण्यासारख्या शहरीं आपल्या जातीची एक लायब्ररी असावी याची मोठी उणीव आहे. यांनीं श्रीक्षेत्र आळंदी येथें एक धर्मशाळा बांधली आहे.

**डेक्कन वॉच एजन्सी**:–माझ्या पांचव्या कुटुंबाच्या दुखण्यामुळें तिची प्रकृति सुधारण्यासाठीं मला तीस मिरज वगैरे ठिकाणीं घेऊन जाण्याचा प्रसंग आला. अशा समयीं कंपनीचा सर्व व्यवहार तरुण व वाईट मंडळीच्या संगतीचे, अपुर्ते व्यापारी आणि व्यवहारज्ञानहीन माझा पुतण्या चि. दत्ताजीराव आणि भाचा रामचंद्रराव यांच्या स्वाधीन करण्यापलीकडे कांहींच इलाज राहिला नाहीं. द्रव्य दिसूं लागलें आणि हातांत पैसा खेळूं लागला म्हणजे अनेक प्रकारची बरी वाईट बुद्धि सुचते, असें जे म्हणतात तें अगदीं खरें आहे. अशा प्रसंगीं वरील एजन्सी काढण्याचा विचार त्यांच्या डोक्यांत उभा राहीला. या विचाराच्या योगानें आणि संगतीच्या सहवासानें द्रव्याचा अपव्यय, व्यापारांत लक्ष नसणें आणि खोट्यानाट्या जमाखर्चानें आपली एजन्सी काढण्याची हौस पुरवून घेण्याकडे लक्ष्य लागणें हें अगदीं उघड आहे. आईबापांचे फाजिल लाड, आणि दुखण्याचें कोड पुरविण्यांत आणि स्वतंत्र उद्योग धंदा पाहण्यांत त्यानें आज तीन वर्षें घालविलीं,

पण कोठेंहि जुळण्याचा योग आला नाहीं. यांच्या अशा वर्तनापासून त्यांच्या आप्त व बंधुवर्गावर अनिष्ट परिणाम घडला असें म्हणतात.

**फ्ल्यान्टर्स फ्रुट एजन्सीः**—भाचे रामचंद्रराव हे मात्र दम धरून माझ्या ऑफिसमध्यें राहिले आहेत; आणि त्यांना आपल्या आयुष्याची जोखीम कांहींशी समजली म्हणूनच त्यांनीं जमवाजमवी करून सन १९१५ सालीं प्ल्यान्टर्स फ्रूट एजन्सी काढून फळांचा व्यापार सुरूं केला आहे. हें त्यांचें करणें बरें आहे; परंतु व्यापारांत सचोटी व नम्रपणा धारण केल्यास त्यांचा व्यापार हा हळू हळू क्रमाक्रमानें वाढण्याचा संभव आहे. अशा प्रकारें इतर आप्त आपली जोखीम समजत गेल्यास खरोखरच त्यांतच त्यांचें हित व कल्याण होणार आहे.

**व्यापाराला उतरती कळाः**–ज्या कुटुंबांत अमर्यादा असल्यानें आणि खऱ्या प्रेमाचा आणि मायेचा लेश देखील नसल्याच्या योगानें प्रसंगीं मलाच सर्व पाहावें लागत असतें. माझें पांचवें कुटुंब क्षयानें आजारी होतें, तिच्या माहेरचें जिव्हाळ्याचें कोणीच नव्हतें, तिला अज्ञान एक पुत्र आणि एक कन्या आहे, आमची म्हणजे मी आणि माझे थोरलें कुटुंब यांची अशक्त प्रकृति व उतारवय होत चाललें आहे; अशा स्थितींत तिच्या दुःखण्यांत तिची योग्य शुश्रुषा करण्यास दुसरें कोणीच नसल्यामुळें माझ्या थोरल्या कुटुंबाला प्रपंचांतून लक्ष कमी करून तें तिच्या शुश्रुषेंत घालवावें लागलें; आणि मलाही माझें व्यापारांतून लक्ष कमी करणें भाग पडलें; अशा प्रसंगीं माझ्या कनिष्ठ बंधूनें सर्व संभाळलें पाहिजे होतें आणि तशी मीं त्यांना विनंतिपूर्वक सूचनाहि केली होती; परंतु ते मायापाशांत रंगल्यामुळें त्यांनीं ही माझी सूचना मान्य केली नाहीं; म्हणूनच निरुपायास्तव अमर्यादशील, अर्धवट शिकलेले, गर्वांत गुरफटलेले, तारुण्यावस्थेंतील कुसंगतीनें बनलेले असे माझ्या ऑफिसांतील दत्ताराम भाचे रामचंद्र यांच्या हातांत चांगलाच जमलेला व्यापाराचा कारभार स्वतंत्रपणें चालविण्याचा अधिकार द्यावा लागला; परंतु त्यांच्या व्यापारी धोरणाच्या विरुद्ध वर्तनाच्या योगानें हजारों रुपयांचें नुकसान होऊन व्यापाराची जमलेली घडी विस्काळित होऊन तीस उतरती कळा लागत चालली. सन १९०९ सालापासून ज्या हेतूनें मी अनेक मार्गांनें बरें करण्यास गेलों, पण याच्या उलट मोबदला मात्र मला मिळत गेला. मी विश्वासावर राहिलों म्हणूनच मी स्वकुटुंबघातकी आणि त्यांचा हितशत्रु बनलों. मी माझ्या वृद्धावस्थेकरितां आणि अज्ञानाच्या पोषणार्थ जें थेंबें थेंबें सांचविलेलें होतें त्यास चोहोंकडून पाझर फुटला आणि मी वृद्धापकाळच्या सर्व सुखास विन्मुख झालों.

**जी. बी. नाईक आणि कंपनीः**—सन १८८० सालीं कृषिकर्मशास्त्रभिज्ञ असा माळी, पण त्याच्या सतत परिश्रम करण्याच्या व्यासंगाच्या योगानें त्यानें फुकट बी संपादन केलें; तें बी त्यानें एका खडकाळ जमिनीवर लावलें; त्याचा एक लहानसा **जी. बी. नाईक** आणि **कंपनी**रूपी रोपा उगवला; त्यास त्या

माळ्यानें **वेळेचें महत्व**रूपी खत, हिंदू मातेचे **आनुकुल्य**रूपीजीवन, **ज्ञान**रूपी वायु, **नियमनिष्ठ**रूपी जोपासना, **धर्मभीरु**रूपी आस्था, **सचोटी**रूपी कुंपण, इत्यादि गुणांचें योग्य सार्थक्य करून त्या बालतरूरुपी **कंपनीचें** मूळ गेल्या पस्तीस वर्षांत इतकें खोल जाऊन मजबूत झालें कीं, त्याचा वृक्ष बनला. त्या वृक्षाच्या शीतलछायेखालीं पक्ष्यांना चांगलें आश्रयस्थान प्राप्त झालें; आणि त्याच्या मधुर फळानें योग्य पक्षांचें चांगलें पोषण होऊं लागलें. आणखी, हा वृक्ष त्यांच्या उपजिवीकेस उत्तम साधनभूत झाला; परंतु काग व गिधाड यांच्या मनांत त्या वृक्षाविषयीं द्वेष, कुबुद्धि व मत्सर उत्पन्न होऊन पुष्कळ पीडा झाली खरी; परंतु हा वृक्ष आपल्या भरतारुण्याच्या जोमांत असल्यामुळें तो कोणासहि जुमानीत नसे, पुढें जरी माळ्यास वृद्ध दशा प्राप्त झाली; आणि त्याच्या मनाची प्रवृत्ति ऐहिक मार्गावरून उडून पारमार्थिक मार्गाकडे लागल्यामुळें या वृक्षाकडे जरी त्याचें दुर्लक्ष्य झालें तरी देखील कित्येक कृषिकर्मशास्त्रज्ञांनीं हा वृक्ष ( **कंपनी** ) दहा हजार रुपयास विकत घेण्याची ( Good--will ) आपली इच्छा प्रदर्शित केली. या वृक्षावर त्याच्या तारुण्याच्या बहारामध्यें जरी अनेक अनपेक्षित टोळधाड येऊन धडकली त्यामुळें जरी हा वृक्ष पल्लवरहित अगदीं रुक्ष दिसत आहे खरा, तरी अशा वृक्षाची पुन्हा आस्थापूर्वक मशागत केल्यास हा वृक्ष अल्प कालातच पूर्ववत पल्लव, पुष्प व फलयुक्त होणार आहे. असें या वृक्ष अनुभविक माळ्याचें भविष्य आहे.

**सहवासः**—ब्राम्हणाची जात ही जन्मतःच बुद्धिमान, नेमस्त व वळणशील असल्यामुळें त्यांच्या सहवासांत काळ क्रमण केला असता त्यांच्या अंगीं जे सदगुण वास करीत आहेत, त्यांचा योग्य संस्कार आपल्या वर्तनावर झाल्यावांचून कदापि रहात नाहीं असा मला पूर्ण अनुभव आला आहे. अशा प्रकारचें माझे वडीलाचेंहि ठाम मत असल्यामुळें आणि माझ्या वर्तनावर कुसंगतीचा अनिष्ट परिणाम होऊं नये, म्हणूनच त्यांनीं बाळकृष्ण बाबाजी दिघीकर या गरीब ब्राह्मण विद्यार्थास आमच्या घरीं ठेवून घेतलें होतें, त्याला शाळेंत लागणारीं पुस्तकें व वस्त्रें माझे वडीलच पुरवित असत आणि तो गांवांत मधुकरी मागून आणि नादार विद्यार्थि होऊन आपला विद्याभ्यास चालवीत असे. त्याच्याबरोबर मीहि आपला अभ्यास करीत असें. तो हल्लीं निजाम इलाख्यांत ओव्हरसीअर आहे. त्यावेळीं मला असें वाटत होतें कीं, हा ब्राह्मण विद्यार्थी आपल्या घरीं विनाकारण ठेवला आहे. परंतु त्याच्या सुशील संगतीचा उत्तम ठसा माझ्या मनावर झाला. त्या विद्यार्थ्याच्या सहवासाचें महत्त्व आतां मला चांगलें कळूं लागलें आहे. ज्यांना मुलें आहेत त्यांनीं तीं आपल्या जवळ न ठेवतां दूर ठेवावी. तीं जवळ ठेवल्यास आईबापांच्या फाजिल लाडानें त्यांच्याकडून जसा विद्याभ्यास व्हावा तसा कांहीं होत नाहीं. इतकेंच नाहीं, तर तीं चांगलीं होण्याच्या ऐवजीं उलट बिघडण्याचाच विशेष संभव आहे. आपलीं मुलें

दूर ठेवल्यानें प्रारंभीं जरी आपणास अवघड वाटणार आहे, तथापि त्याचा परिणाम मुलांवर इष्ट असाच होणार आहे. आणि मातापितरांस सुखकर झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. युरोपिअन लोक आपल्या मुलांना बाळपणापासूनच बोर्डींगामध्यें पाठवितात, आणि त्याचें अनुकरण पुष्कळ ठिकाणीं झालें आहे. पुरातनकाळीं मुलगा आठ वर्षांचा झाला म्हणजे त्याला गुरुगृहीं पाठवीत असत आणि एक तप झालें म्हणजे त्याचा विद्याभ्यास पूर्ण होऊन तो स्वगृहीं येत असे. नंतर तो गृहस्थाश्रमी होत असे; म्हणजे त्याचा विवाह होत असे.

**क्षमाः**—माझी प्रिय भगिनी, भावजय, व मित्र यांनीं प्रसंगानुसार मला शब्दबाणानें जागृत केलें; त्या प्रसंगीं त्यांचे ते शब्दबाण मला विषवत् वाटणें हें अगदीं स्वाभाविक होतें खरें; पण मी ते उपदेशपर समजूनच त्याचें ग्रहण केलें त्याचा परिणाम चांगला व हितावह झाला. याच विचारानें मीं आपल्या आप्तवर्ग आणि हितेच्छु मंडळीस अल्पमतीनें जो उपदेश केला, सन्मार्ग दाखविला व जी निर्भत्सना केली ती त्यांना अप्रिय व विपरीत भासण्याचा संभव आहे अशा मंडळीसंबंधानें मला प्रतिकूल टीका करून आपली पवित्र लेखणी विटाळण्याचा मोठ्या निरुपायानें प्रसंग प्राप्त झाला एतदर्थ माझ्या मनाला मोठीच दिलगिरी वाटत आहे. ही प्रतिकूल टीका लोकांच्या मनास अप्रशस्त दिसण्याचा कांहीं अंशीं संभव आहे; तथापि कधीं कधीं वाईटापासूनहि चांगलें निष्पन्न झाल्याचीं पुष्कळ उदाहरणें आहेत. यदाकदाचित् यांत कोणास प्रमाद झाला असेल असें वाटत असल्यास त्याची ते मला क्षमा करतील अशी मला पूर्ण आशा आहे. त्यांनीं माझ्या शुद्ध हेतूकडे आपलें लक्ष्य द्यावें. द्वेष किंवा निंदकबुद्धीनें मीं ही टीका केली नाहीं. त्यांचें कल्याण व्हावें याच उच्च ध्येयानें बरेंवाईट पण सत्य लिहावें लागलें आहे.

प्रत्येकानें हीं खालील भृतहरीचीं वचनें आपल्या डोळ्यासमोर नित्य ठेवावीं:—

**भाग्याला सुजनत्व भूषण असे कीं मौन शौर्यास तें।**
**ज्ञानाला शम त्या शमास विनय द्रव्यास दातृत्व तें॥**
**अक्रोधत्व तपा क्षमा प्रभुपणा धर्मास निर्दंभता।**
**या सर्वासहि मुख्य भूषण पहा सच्छील तें तत्त्वतां॥ १॥**
**वानोत निंदोत सुनीतिमंत। चळो असो वा कमला गृहांत॥**
**हो मृत्यु आजीचि घडो युगांतीं। सन्मार्ग टाकूनि भले न जाती॥ २॥**

---

# प्रकरण १० वें.

—:+:—

## लोकमत.

माझ्या अर्थातच माझ्या कंपनीसंबंधानें हिंदुस्थानांतील आणि युरोपांतील वर्तमानपत्रकारांनीं आणि मासिक पुस्तककारांनीं वेळोवेळीं जे अनुकूल व अभिनंदन-पर लेख लिहिले आहेत, ते जर साग्र छापून काढल्यास त्यांचा पांचशें पानाच्या वर एक मोठा स्वतंत्र ग्रंथच होणार आहे; इतका मोठा लेखसंग्रह झाला आहे; परंतु ग्रंथविस्तारभयास्तव मला तसें करतां येत नाहीं, म्हणूनच मला कांहीं निवडक पत्रांतील लेख अतिसंक्षिप्तपणें येथें देण्याचा संकल्प करावा लागला आहे. सन १८९५ सालापूर्वींचा लेखसंग्रह हा निष्काळजीपणामुळें वाळवीच्या भक्ष्यस्थानीं पडला. त्या काळाचा कमिशन एजन्सीच्या सचोटीच्या व्यवहारासबंधीं आणि विजेच्या आंगठ्या आणि पुतळ्या यांच्या अचुक गुणासंबंधीं आलेले प्रशंसापर लेख नाहींसे झाले याबद्दल माझ्या मनाला फार दिलगिरी वाटत आहे.

**मुंबई वैभवः**—मुंबई ता० २३ जुलै सन १८९५ इ. जी० बी० नाईक आणि कंपनीनें युरोपिअन कंपनीशीं चांगलीच टक्कर मारून आपले व्यापारांत जय मिळविला.

**पंडितः**—मुंबई ता० २३ जुलै सन १८९५ इ. उनोने अपना व्यापार भी सुधार लिया और देशकाभी आच्छा किया. इनका दाखला दुसरे भी व्यापारी लेवेंगे तो उनका कल्याण और देशका भला होगा.

**वार्ताहरः**—मुंबई ता० २४ जुलै सन १८९५ इ. मि० नाईक हे मोठे धोरणी व कल्पक आहेत असें दिसतें. व्यापाऱ्यास जे कांहीं गुण असावे लागतात, त्यांपैकीं नाईक ह्यांचे ठायीं बरेच आहेत.

**अखबारः**—पुणें, ता० २९ जुलै सन १८९५ इ० कोणत्याही व्यापारांत आघाडी मारण्यास योजक लागतो; त्याप्रमाणें जी. बी. नाईक कंपनिचे मालक यांनीं आपलें नायकी कसब खर्च करून एक मजेदार हिंदु वॉच तयार केलें आहे.

**जगत्समाचारः**—ठाणें, ता० १७ आगस्ट सन १८९५ इ. नायकांचें डोकें व्यापारवृद्धीस अगदीं योग्य आहे असें म्हणावें लागतें.

**श्री सयाजी विजयः**—बडोदें ता. १७ आगस्ट सन १८९५ इ. घड्याळा-वर अशा प्रकारची योजना ही एकंदर पृथ्वींत पहिलीच असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं.

**व्यापारीः**—पुणें ता. १८ आगस्ट सन १८९५ इ. रा. गणपतराव भिवाजी

नाईक हे गृहस्थ जरी ग्राज्युएटांपैकीं नाहींत तरी यांचें व्यापारी डोकें कांहीं विलक्षण आहे. व्यापार कोणता फायदेशीर व त्यांत कसें धोरण ठेवावें लागतें हें ज्ञान मि० नाईक यांच्या जवळ पूर्ण आहे; असें म्हणण्यास आम्हांला कांहींच हरकत दिसत नाहीं.

**ज्ञानसागरः**—कोल्हापूर ता. १९ आगस्ट सन १८९५ इ० जी० बी० नाईक या कंपनीची ओळख वाचकांस करून देणें म्हणजे सूर्य पूर्व दिशेस उगवतो असें सांगण्यापलीकडे नाहीं. या कंपनीनें आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे.

**बोधसुधारकः**—सातारा ता. २८ आगस्ट सन १८९५ इ. व्यापारी तत्व इंग्लिश किंवा युरोपांतील आणि जपानसारख्या आणखी कित्येक राष्ट्रांस जसें समजलें आहे तसें आमच्या हिंदुस्थानांतील लोकांस समजलें नसल्यामुळेंच आमच्या कोणत्याहि व्यापारास उत्तेजन नाहीं; तथापि पुण्यांतील प्रसिद्ध रा. रा. गणपतराव भिवाजी ऊर्फ जी. बी. नाईक यांना हें व्यापारी तत्त्व चांगलें समजलें आहे.

**गरिबांचा कैवारीः**—मुंबई ता. १५ सप्टेंबर सन १८९५ इ. लोकांना काय आवडतें हे ओळखून तें पैदा करणें हें खऱ्या व्यापाराचें लक्षण रा. रा. गणपतराव भिवाजी नाईक ह्यांचे अंगीं पूर्ण वसत आहे हें पाहून आम्हांस संतोष होतो.

**नाशिकवृत्तः**—नाशिक ता. २३ नोवेंबर सन १८९५ इ० या एकोणिसावे शतकांत एक एक अपूर्व कल्पना निघेल तेवढी थोडीच! या कल्पना पाश्चिमात्त्य लोकांच्याच असल्यामुळें त्यांचा फायदा आम्हांस मुळींच होत नसे. परंतु मोठ्या समाधानाची गोष्ट ही कीं, अलीकडे आपल्यांतहि नवीन शोध व कल्पना काढणारे लोक उत्पन्न होऊं लागले आहेत. त्यांपैकींच रा. रा. गणपतराव भिवाजी नाईक हे एक होत.

**ज्ञानचक्षुः**—पुणें ता. १८ डिसेंबर सन: १८९५ इ. नायकांच्या ह्या अपूर्व ( हिंदु घड्याळें ) उद्योगाची आम्ही तारीफ करतों.

**जगद्धितेच्छुः**—पुणें पौष वद्य १२ शके १८१७. आपल्या देशबांधवांचे स्वदेशप्रीति स्वाभिमान इ० गुण उदयास आणण्याचा नायकांनीं हा उत्तम सोपा मार्ग काढला यांत संदेह नाहीं. घड्याळाची ही कल्पना बहारीची काढली व ती लोकांस चांगली आवडेल असा आमचा समज आहे.

**ज्ञानसागरः**—कोल्हापूर ता. १३ जानेवारी सन १८९६ इ. जी० बी० नाइकांचे व्यापाराची आम्ही अशी कांहीं खुबी पाहतों कीं, त्यांचे प्रत्येक धंद्यांत कांहीं तरी नवेपणा असून नवीन टूम असते, कांहीं तरी एकाचें अनुकरण करण्यां-तला प्रकार त्यांच्यांत मुळींच नसतो.

**श्रीसयाजीविजयः**—बडोदें. ता० १८ जानेवारी सन १८९६ इ. जी. बी. नाईक कंपनी माहीत नाहीं असे वर्तमानपत्राचे वाचक फारच थोडे सांपडतील. ह्या

प्रसिद्ध कंपनीनें ह्या वर्षी आपल्या अपूर्व कल्पनेनें व उदारतेनें स्वार्थ आणि परमार्थ अशीं दोन्हीं कार्यें साधून अशा बाबतींत नांवलौकिकास आलेल्या पाश्चिमात्य देशांतील व्यापारी लोकांवरहि कांहींअंशीं ताण केली असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. **टाईम्स ऑफ इंडिया**सारख्या पत्रानेंसुद्धां या कंपनीची तारीफ केली त्यापेक्षां ही कंपनी विशेष स्तुतीस पात्र आहे असें म्हणण्यास काहीं प्रत्यवाय नाहीं.

*Arakan Times.* Akyab ( Burma ) 25 May 1899-We have often and often noticed in our papers, the commercial enterprise of this firm, but since then patronage had extended and consequently the various departments increased in size.

*The Keystone.* Philadelphia, U. S. America November 1903-One of the most enterprising and extensive jewelry establishments in the vast Indian Empire is that G.B.Naik & Co. of Bombay. This house favoured with the patronage of Princes, Chiefs & of India, and supply, the various departments of the Indian Government. They are extensive importers of Watches, Clocks, Jewelry & Their business is wholesale and retail.

*The Indian Echo.* Calcutta 26-1-1904--Messrs G. B. Naik & Co. of Bombay are so wel known that they need no particular introduction at our hands and have a high reputation as to their dealings with customers. Their firm is of long standing and has a very extensive sale.

*The Anglo Lusitano.* Bombay, 28-10-1907. Messrs G. B. Naik & Co. started business in this city in 1880 and during the 27 years of their existence, they have striven to meet the demands of their customers. They have been awarded Gold medals and diplomas of honour and are suppliers to several Government departments and the Native States of India.

**व्यापारीः**—पुणें, ता. १२-१-१८९६ **नाईक** यांनीं जाहिरातीची नवीनच टूम काढली, ती अशीः–ह्यांनीं ५०००० चिनी पंखे तयार करवून त्या पंख्यावर आपल्या घड्याळाच्या जाहिरतीचें हस्तपत्रक चिटकविलें आणि ते पंखे सर्वांना मिळून तो प्रतिनिधी लोकांनीं आपल्या बरोबर नेल्यामुळें आयतेच पोस्टेज खर्च न करितां त्यांच्या घड्याळाची प्रसिद्धी पंजाब, बंगाल, वायव्यप्रांत, वऱ्हाड, मध्यप्रांत, सिंध, मद्रास इत्यादि हिंदुस्थानांतील सर्व भागांत झाली व ज्या ज्या वेळीं ते लोक तो पंखा हातांत घेतील, तेव्हां तेव्हां मि. नाईकांचे घड्याळाची त्यांस आठवण होईल. त्याचप्रमाणें आपल्या मालाची प्रसिद्धी करण्यांत मि. नाईकांची हातोटी मोठी विलक्षण होय. त्याप्रमाणें राष्ट्रीय सभेचे अध्यक्ष यांसहि त्यांनीं एक हिंदु

चांदीचें घड्याळ नजर केलें यामुळें सर्व वर्तमानपत्रांत बिना खर्च त्यांचा उल्लेख केला जाऊन कांग्रेसच्या रिपोर्टांतही त्याचा समावेश बिना खर्च केला जाईल.

**मुंबईपंचः**––मुंबई ता. २०।१।१८९६ इ० पंखे गेल्या राष्ट्रीय सभेच्या वेळीं जमलेल्या लोकांस पांच हजारांवर फुकट वांटण्यांत आले. विलायती व्यापाऱ्यांप्रमाणें संसारांत स्वार्थ साधून परमार्थ साधण्याची अजब कला नाईक यांस उत्तम प्रकारें साधली आहे. उगीच मोठमोठ्या सभा भरवून व लांबलचक लेख लिहून ' यंव करावें, त्यंव करावें ! अशा कोरड्या गप्पा मारून आपली नामप्रसिद्धी करून घेणाऱ्या भाडोत्री देशहितेच्छूंपेक्षां नाईक यांचा स्वदेश व्यापारवृद्धी वाढविण्याचा क्रम स्तुत्य व वाखाणण्यालायक नाहीं असें कोण म्हणेल ? थ्यांक मि. नाईक.

**ज्ञानचक्षुः**––पुणें ता. ६ मे सन १८९६ इ० मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनी यांनीं प्रसिद्ध हरिभक्तिपरायण नारायण बोवा घमंडे आणि मुंबईचे गणेश लक्ष्मण पागे हे उभय गृहस्थ सार्वजनिक कामामध्यें नेहमीं निरपेक्ष वृत्तीनें मेहनत घेतात हें बघून त्यांस एकेक हिंदु वाच बक्षीस दिलें. रा. नाईक यांचें सार्वजनिक संस्था व सार्वजनिक माणसें यांचेकडे विशेष लक्ष असून त्याबद्दलचा ते आपल्या शक्तीप्रमाणें गौरव करितात हें त्यांस भूषण आहे.

**ज्ञानसागरः**––कोल्हापुर ता. ३ आगस्ट सन १८९६ इ० गणपति उत्सवांत व मेळ्यांत म्हणतां येतील अशीं संगिताचीं नाना चालीचीं पदें, साक्या, झगडे वगैरे पुस्तकांत दिलेले आहेत. सदरहु पुस्तकाचा नंबर, ५०,००० कापीज छापण्यांत आल्या असून मुंबई इलाख्यांतील ठिकठिकाणीं होणारे मेळ्यास मोफत वाटले जाणार. **जी. बी. नाईक** यांचेकडून खर्चानें व अचाट कृतीनें होत असलेली देशसेवा पाहून कोणासही संतोषच होईल. गेल्या राष्ट्रीय सभेचे वेळीं व मुंबई येथें **भारतधर्म महापरिषदेंत** याच कंपनीकडून हजारों जपानी नक्षीदार **पंखे** वांटण्यांत आले, जी. बी. नाईक यांजकडून देशसेवेचे नवीन नवीन प्रकार निघत असलेले पाहून संतोष होतो, आणि म्हणूनच यांचे व्यापारास श्री गजानन बरकत देवो असें आम्ही इच्छितों.

**सुबोधसिंधुः**––खांडवा, आषाढ वद्य ११ शके १८१८ येवढें मात्र आमच्यानें म्हटल्यावांचून राहवत नाहीं कीं, जी. बी. **नाईक** कंपनीस स्वतःच्या मालाची लोकांत प्रसिद्धि कशी करावी व त्यापासून आपला लाभ कसा करून घ्यावा ही हातोटी पाश्चात्त्य लोकांप्रमाणें चांगली साधली आहे यांत संशय नाहीं.

**मदतनीसः**––रत्नागिरी ता. २७ आगस्ट सन १८९६ जी. बी. नाईक कंपनीचें व्यापाराचे बाबतींत पुढें पाऊल आहे तें हें पदांचें बुकच सांगतें. पुष्कळ लोकांचीं मनें आपणाकडे ओढून घेतलीं व व्यापारी कामांत

पुष्कळ आपलें पाऊल पुढें लोटलें. खेड्यांत मारुती व निवडुंग असावयाचेच तसे यांचें नांवाचीही प्रसिद्धि आहे. याजबद्दल तिचें **अभिनंदन** केलें पाहिजे.

**खानदेशवैभवः**—धुळें ता. २ आक्टोबर सन १८९६. आपल्या मालाची प्रसिद्धि आणि खपविण्याचे विचार युरोपियन कंपन्याशिवाय कोणासहि साधत नाहींत, आमच्या नेटिवांमध्यें दोन चार व्यापारी दिसतात, त्यांत विशेषेंकरून मुंबईतील जी. बी. नाईक कंपनी यांचें प्रसिद्धीचें काम विशेष आहे व कल्पनाहि विशेष आहे. या कंपनीचे चालकाची बुद्धि व कल्पनाहि विशेष दिसते.

**ज्ञानसागरः**–( कोल्हापूर ) ता. १६।८।१८९७ इ० मुंबईचे प्रसिद्ध व्यापारी जी. बी. नाईक कंपनीनें श्रीमन्महाराज छत्रपति साहेब सरकार करवीर यांस पुत्ररत्नप्राप्ति झाली त्याप्रीत्यर्थ आनंद प्रदर्शित करण्याकरितां कोल्हांपूर शहरांतील एकंदर मराठी शाळांतील विद्यार्थ्यांस मेवामिठाई देण्याचा समारंभ श्री. बाबासाहेब पाटणकर यांचे वाड्यांत झाला. हा समारंभ साजरा करण्याकरितां जहागीरदार, सरदार, मोठमोठाली कामगार मंडळी आली होती. ११ शाळांतील ९०० विद्यार्थ्यांना मेवामिठाइचे पुडे वांटले.

"*Daily Telegraph and Deccan Herald*" Poona 19th August 1897. In commemoration of the birth of a Prince to H.H. the Maharaja of Kolhapur, Messrs G. B. Naik and Co., distributed sweetmeats among about one thousand pupils of all the Vernacular Schools at Kolhapur A large number of the leading gentlemen at Kolhapur were present.

**ज्ञानसागरः**—कोल्हापुर ता. २८ नोवेंबर सन १८९८. मध्य हिंदुस्थानांतील संस्थानिक श्रीमंत सरकार **महेंद्र महाराज** संस्थान पन्हा ह्यांनीं आपल्या तसबिरीचें क्लॉक्स आणि वॉचेस जी. बी. नाईक कंपनीकडून तयार करविलीं, हें काम पाहून सरकारस्वारी फार खुष होऊन उत्तेजनादाखल बक्षीस रुपये पांचशें, दीडशें रुपयांचा पोषाख व तेथें उत्पन्न होणारे हिऱ्याची आंगठी सुमारें किंमत रुपये दोनशांची बक्षीस दिली; व आपले संस्थानचे वॉचमेकर व जुवेलर्सची सनद दिली असें कळतें. शिवाय सुमारें एक लाख रुपये किंमतीचें सिंहासन चांदीचें वगैरे तयार करण्याचें कामही दिलें आहे. ह्मैसूरचे महाराज व आमचे महाराज छत्रपतीसाहेब यांणीं सदर कंपनीस चांगला आश्रय दिला आहे. इकडे इतरांनींहि लक्ष द्यावें.

**खानदेशवैभवः**—धुळें ता. २—१२—१८९८. रा. जी. बी. नाईक हे स्वतः मोठे चतुरस्र, कार्यदक्ष व दीर्घोद्योगी आहेत ह्याजविषयीं त्यांच्या उद्यमाचें वाढतें प्रमाण भरपूर साक्ष देईल, आम्हांस जे लोक पाहिजे आहेत, ते अशाच प्रकारचे. ज्यांच्या अंगीं अशीच कल्पकता आहे असेच

लोक पाहिजे आहेत. त्यांवांचून आमचें कलौद्योगज्ञान वर्धमान दशेस येणार नाहीं, व त्यावांचून आमच्या देशाची खरी उन्नति होणार नाहीं.

**ज्ञानचक्षुः**——पुणें ता. ७——१२——१८९८. येथील उद्योगी व मेहनती नाईक यांच्या कामाचें दिवसेंदिवस अधिकाधिक अभिनंदन होत असलेलें बघून आम्हांला त्यांचें विशेष गौरव केल्याशिवाय राहवत नाहीं. पन्हांचे महाराजांची त्यांना जी सिंहासन करण्याची आज्ञा झाली आहे त्या सिंहासनाचें काम फारच दर्शनीय होईल असा आमचा अजमास आहे. कारण, या सिंहासनावर बसलें असतां मागें एक मनुष्य पंख्यानें वारा घालणें सुरू होईल. बाजूच्या अप्सरा दोघीजणी ह्या मोरचल व चवरी हालवितील असे अनेक यांत्रिक योजनाचें होऊन तें ह्या देशांत एक अद्वितीय व अपूर्व राजासन होईलसें वाटतें.

**दीनबंधुः**——मुंबई ता. २०—२—१८९८. ह्या कंपनीचा व्यापार दिवसें-दिवस वृद्धी पावत चालला आहे. या कंपनीची व्यापार करण्याची हातोटी व चौकसपणा अभिनंदनीय आहे.

*The Punjab Times*, Rawalpind 2-4-1898. Messers G B. Naik & Co, Watch makers and Jewllers of Bombay and Poona, have published an interesting and illustrated sheet whichcontains not only advertisements of their business but also a combination of artistic and thoughtful ideas in the form of a group of pictures which has the tinge of politices and poltical men. × × is really instructive and interesting.

**हिंदुपंचः**—ठाणें ता.८-१२-१८९८ जी. बी. नाईक हा मूळचा अगदीं साधारण मनुष्य असतां तो स्वकष्टानें व स्वपराक्रमानें इतक्या मानमान्यतेला चढला, तेव्हां हें त्याच्या सतत श्रमोद्योगाचे फल त्यास मिळत आहे, व तें फल बघून इतर निःसत्व व निरुद्योग्यांनीं आपल्या माना खालीं घालाव्या. नाइकांत परानुकरण कर-ण्याचा जो गुण आहे त्याचें अनुकरण इतर हुन्नरी व कारागीर यांणीं कां करूं नये ? त्याबद्दल कोणाला कांहीं प्रातिबंध नाहीं. पण तितकी अक्कल पाहिजेना ? तिचाच तर अभाव आहे. नाईक हा हळू हळू हिंदुस्थानांतील सर्व संस्थानाचा वॉचमेकर व ज्वेलर झाल्यास त्यांत अश्चर्य कसचें ? प्रसिद्ध व्यापारी मंडळ्यांकडे बघा; लंड् एण्ड ब्लॉकी, मार्कस ॲण्ड को, रोज एण्ड को, पियर्स एण्ड को इत्यादि मंडळ्या मोठमोठ्या राजांचे व राजकुलीनांचे आश्रय संपादून मोठ्या उमेदीनें व उत्साहानें आपआपल्या उद्योग धंद्यांत यशस्वी बनले असतात. त्यांचेंच अनुकरण मि. नाईक करीत आहेत. त्यांत कांहीं विशेष नाहीं. पण, वर म्हटल्याप्रमाणें तेंही करण्यास अक्कल लागते. डोकें पाहिजे, लक्ष व धोरण हवें आहे, तें नाईकांत आहे. व त्याकरितांच त्याला ह्या अभिनंदनाचें पारितोषिक खुद्दांकडून अत्यंत औदार्यानें देण्यांत येत आहे. त्यांची योजना व कल्पना विचार करण्यासारखी आहे यांत संशय नाहीं. आपला धंदा जाहीर करण्याची त्यांची युक्ती वाखाणण्यासारखी आहे.

त्यांचें एकंदर वर्णन पाहतां ते लोकांचे पुढें येत आहेत. तेव्हां त्यांचें अभिनंदन व गौरव कां करूं नये ? स्वस्त्यस्तु ते भो नाईक ?

**शिक्षकः**—चिकोडी, ता. २१ मे १८९८ नायकांनीं जाहिराती प्रसिद्ध करण्याची जी ही नवीन टूम कार्डांची काढली आहे ती प्रशंसनीय आहे.

**देशभक्तः**--बडोदें ता. २३ मे १८९८ या कंपनी ये साहाशिकपणो आने अनेक खासाथी दुनियानां घणाक भागपर सारी नामना मेळावी छे, आने तेवो जो आउंज चालू राखसे तो वधारे प्रख्यात थशे, एवी आशा छे.

**ज्ञानचक्षुः**–पुणें ता० १७ आगष्ट सन १८९८. जी. बी. नाईक यांची आतां हिंदुस्थानांत चांगली प्रसिद्धि झाली असून यांच्या नांवाची प्रसिद्धि युनायटेड्स्टेट अमेरिका, क्यानडा, ग्रेटब्रिटन आणि जर्मनी अशासारख्या दूरदूरच्या देशांतहि होत आहे असें तिकडून येणाऱ्या वर्तमानपत्रावरून वगैरे कळतें. मि. जी. बी. नायकासारखे उद्योगी व हुन्नरी व्यापारी लोक फारच थोडे असून त्यांचेसंबंधानें इकडे व्हावा तसा गौरव व अभिनंदन होत नाहीं, ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे.

**खुराखीः**–मुंबई ता० २४ आगष्ट सन १८९८ इ० रा. रा. गणपतराव भिवाजी नाईक यांच्या अटोकाट मेहनतीनें त्यांच्या प्रस्तुतच्या धंद्याबद्दल अमेरिका, जर्मनी, ग्रेटब्रिटन वगैरेंसारख्या प्रदेशांतहि माहिती पसरूं लागली आहे. ज्या देशांतील लोक अत्यंत कलाकुशल म्हणून नांवाजलेले आहेत, अशा इंग्रज लोकांच्या देशांतील मासिकांत हिंदुस्थानांतील एका व्यापाराचें सचित्र चारित्र नजरेस पडेल असें आमच्या स्वप्नींहि नव्हतें; परंतु तो सुदीन मेसर्स जी. बी. नाईक कंपनीनें आणला हें खरोखर तिला भूषणास्पद आहे.

"*Baluchistan Herald*" Quetta 5-2-1898-As regards the Merits of the firm of Messrs G. B. Naik & Co. we may unhesitatingly say that it stands for nearly a score of years and is largely patronized by most of the Princes and Chiefs of India.

"*Deccan Herald.*" Poona 6 November 1898. Mr. G. B. Naik entertained Dewan Bahadur R. V. Subnis, B. A. Dewan to H. H. the Maharaja of Kolhapur, at his Hall. It was well furnished and the road was decorated with bannerets & . There was music in honour of the guests; A large number of the leading citizens were present+ + + In conclusion he was thanked by Mr. G. B. Naik for having kindly invited him for Pansupari party at his house.

*American Jeweler*, Chicago. Iel U. S. A. Vol XVIII No 6 June 1898--The Principle office of the G. B. Naik & Company is in Poona, India, and is managed by a younger brother Mr. T. B. Naik who although but 28 years of age, has developed a remarkable capacity for business. Their branch houses, agencies and travelling agents in cities of India. They are firm believers in the power of printers Ink. They publish catalogues twice a year 50,000 copies each time. The compony handles large quantities of very valuable merchandise

which is shipped to them to sell on comission and their reputation for honesty in returns of :highest. Their motto is "Small Profits and Quick Return."

*The Daily Post*, Bangalore 15th may 1899. The idea of pictured card is a capital one and executed and Srtistically Painted, and the children are very pretty

देशमित्र---सुरत ता. १८ मे सन १८९९ या कंपनीना अजब कार्डना माटे धन्यवाद घटे छे.

*The "Hindu."* Madras, 11-2-1899. A Native Watch Maker and Jewellers. etc Messrs G. B. Naik & Co. Bombay and Poona had manufactured clocks with the Photos of H. H. Raja Rameshwarsingh Bahadur and of the deceased Maharaja sir Laxmeshwarsingh Bahadur K. C. I. E. of Darbhunga and presented them to H. H. Maharaja Rameshwarsingh Bahadur who was much pleased with the skill exhibited in their manufactures and gave them a handsome present of Rs 1100, on the 6th December 1899.

☞ Such remarks were also expressed in the following papers:- Poona *The Marrattha*; Vizagapatam. *The East coast News*; Rajkote, *The Kathiawar News*, Bankipore, *The Behar Times*, Nagapatam *The South India Post*, Ravalpindi, *The Panjab Times*, Trivandrum, *The Western Star*, Akyab, *The Arakan News, & Times*, Cochin, *The Argus*, Jodhapur, *TheMarwār Gazettes*, Nagercoil, *The Travancore Times*, Mysore *The Standard*, Tellichery, *The Times* of *Malabar*. Bombay, *The Indian Spectator*, Dacca, The Bengal *Times* etc.

**भारतमित्रः**—कलकत्ता ता० २२–१–१९०० इ० पूना का जी. बी. नायक कम्पनीने दरभंगाके मृत तथा वर्तमान महाराजा कीं तस्बीर घडीपर बनाकर वर्तमान महाराजा को भेट की थी माहराजने रुपया ११०० कम्पनी को इनाम दिया है.

**काळः**–पुणें मार्गशीर्ष शुद्ध ६ शके १८११ इ० येथील जी. बी. नाईक कंपनीनें दरभंग्याचे महाराजांना त्यांच्या फोटोचीं चित्रें डायलवर काढून कांहीं घड्याळें तयार करून दिलीं. तें काम त्यांनीं उत्तम केलें म्हणून महाराजांनीं त्यांस किंमतीशिवाय आणखी रु० १,१०० बक्षीस दिले. हें ह्या कंपनीस भूषणावह आहे.

☞वरील हकीगत मराठी, गुजराथी, हिंदी, कानडी, तामील, वगैरे पत्रांतून आली आहे. पुणें येथील **केसरी, जगद्धितेच्छु, व्यापारी, ज्ञानचक्षु, ज्ञानप्रकाश, पुणेंवैभव** वगैरे. यांशिवाय अहमदनगर येथील **सुदर्शन, न्यायसिंधु, नगरसमाचार,** बडोदा **बडोदावत्सल, देशभक्त,** सातारा **प्रेक्षक, शुभसूचक;** धुळें, **आर्यवृत्त, खानदेश वैभव;** सोलापुर **सोलापूरसमाचार; कल्पतरू;** पेण **सुधारक;** पंढरपूर, **पंढरपूरमित्र;** वेंगुर्लें, **लोकमत;** कोल्हापुर, **शाहुविजय, ज्ञानसागर;** भडोचा **भडोचसमाचार;** अलमोडा **अखबार;** बनारस **भारतजीवन;** लष्कर ग्वालिअर,

**ग्वालीअर ग्याझिट**; अजमिर, **राजस्थानसमाचार**, नाशिक **नाशिकवृत्त** इ. इ. बहुतेक वर्तमानपत्रांतून महाराजांचें औदार्य प्रगट करून कंपनीचें अभिनंदनच केलें आहे.

**केसरी**--पुणें, ता. ५-१-१९०४रा. रा. गणपतराव भिवाजी ऊर्फ जी. बी. नाईक यांनीं काशी येथील शिवगोविंद धाम मठ, राममंदिर व वाचनालयाचे उपयोगाकरितां मोठीं घड्याळें दिलीं. या स्तुत्य देणगीबद्दल व्यवस्थापक आभारी आहेत, वगैरे.

**केसरी**:--पुणें, ता. २५-७-१९०५ कोल्हापूर येथील नवीन राजवाड्यावरील भव्य व मोठें घड्याळ ( टॉवरक्लॉक ) व जुन्या राजवाड्या-पुढील नगारखान्यावरील मोठें घड्याळ कै० श्री. राजाराम महाराजांच्या कार-कीर्दींत लावलें आहे; तें आज कित्येक वर्षांपासून मोडून नादुरुस्त झालें होतें, त्याची दुरुस्ती करण्याची खटपट व प्रयत्न पुष्कळ प्रसिद्ध युरोपिअन वॉचमेकरांनीं व कारागिरांनीं करून पाहिला; परंतु त्या कामीं कोणास यश आलें नाहीं. शेवटीं, श्रीमन्महाराज शाहू छत्रपती सरकार करवीर यांच्या आश्रया-खालीं असलेली प्रख्यात जी. बी. नाईक आणि कंपनीच्या कारागिरांनीं गेल्या दोन तीन महिन्यांत हीं मोठीं घड्याळें उत्तम रीतीनें दुरुस्त केलीं त्याबद्दल योग्य मोबदला कंपनीस देऊन शिवाय इनाम व बहुमानाचें मोलवान सोन्याचें पदक ( मेडल ) दिलें. हें कंपनीस भूषण आहे.

**केसरी**:—पुणें, ता. २४-९-१९०५. श्री. भावनगरचे महाराजानें या कंपनीस आपले दरबार व खाजगी खात्यास लागणारे क्लॉक्स, ज्युवेलरी वगैरे पुर-विण्याची सनद दिली. या कंपनीनें सज्जनगड ( परळी ) येथील श्री रामदासांचे मठांतील सभामंडपांत ठेवण्यासाठीं एक मोठें क्लॉक अर्पण केलें; तें दसऱ्याच्या दिवशीं समारंभानें ठेवण्यांत आलें. या कंपनीचे उद्योग आणि औदार्य स्तुत्य आहे. या कंपनीनें **वेळेचें महत्व व व्यय** या निबंधाच्या विषयाचें विवेचन सुबोध, मार्मिक आणि बहुश्रतपणाचें झालें आहे.

ही हकीगत हिंदुस्थानांतील इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दु, कानडी, तामील वगैरे वर्तमानपत्रकारांनीं गौरवून प्रसिद्ध केली आहे.

**इंदुप्रकाश**:—मुंबई ता० ६।१०।१९०६ जी. बी. नाईक कंपनीस गेल्या विजयादशमीच्या दरबारच्या वेळीं घड्याळ दुरुस्तीचें यश संपादन केलें याबद्दल श्री छत्रपती महाराज कोल्हापूर यांजकडून एक सुवर्णपदक बक्षीस देण्यांस येऊन त्यांचा बहुमान करण्यांत आला हें कळविण्यास आम्हांस संतोष वाटतो. या पदकावर Awarded to Messrs G. B. Naik & Co. for their competency in Horology" हे शब्द कोरले आहेत.

**नेटिव ओपिनिअन**:-ता. २ आगष्ट सन१९०१५, इ० मुंबईचे जी. बी.

नगर वाचनालय सातारा.



नाईक यांनीं कोणास न होणारें कोल्हापूर येथील जुन्या वाड्यापुढील घड्याळ दुरुस्त केलें.

*The Bombay Gazette 10th oct. 1906*--The Kolhapur Gold Medal-Messrs G. B. Naik & Co., Watch Makers, Hornby Road, Bombay, who are already Watch Makers by appointment to most of the leading Native Princes of India, have recently had the unique honour of being presented with a Gold medal, bearing the coat-of--Arms of H. H. the Maharaja of Kolhapur, G. C. S. I. for their Competency in Horology. It may be mentoioned that the medal was conferred on them especially for the masterly way in which they executed the entire repairs to the old Palace Nagarkhana clock which were given up as done for, by several other Watch Makers of India.

**समर्थः**--ता. ९ आगष्ट सन १९०५ इ. बऱ्याच कंपन्यांनीं हें (कोल्हापूरचें) घड्याळ दुरुस्त होणें शक्य नाहीं असें कळविलें होतें तें जी. बी. नाईक कंपनीनें चांगल्या प्रकारें चालू केलें आहे.

**हिंदुपंचः**--ठाणें ता. ९ आगष्ट सन१९०५इ० राणीच्या पुतळ्यावरील डांबर निघतां निघेना तेव्हां डॉ. गजर पुढें आले. कोल्हापुरचें टावर क्लॉक दुरुस्त होईना अशा समयीं नाईक कंपनी पुढें आली आहे. यावरून आम्हां हिंदु लोकांत पुष्कळ चांगले गुण आहेत, पण त्यांची चीज करून घेणारा हरीचा लाल कोणी नाहीं एवढें मात्र खरें. मेसर्स नाईक अॅन्ड को, ग्रॅंड पपा उइश यू लांग लाईफ अॅन्ड प्रॉस्पिरिटी.

**बडोदावत्सलः**--बडोदा ता. १३ आगष्ट सन १९०५ इ० टावर क्लॉक दुरुस्त करण्याचा पुष्कळ अनुभव्यांनीं प्रयत्न केला पण त्यांचा प्रयत्न निष्फळ होऊन मेसर्स जी. बी. नाईक आणि कंपनीचा उद्देश सफल झाला हें कळविण्यास आम्हांस महत् आनंद वाटतो.

या कंपनीची व्यापारांत सचोटी.नियमितपणा, खात्रीचा माल, माफक किंमत, दिखाऊ, टिकाऊ, अचूक वेळ दाखविणारीं वॉचेस क्लॉकस वगैरे या संबंधाचा सुलौकिक सुप्रसिद्ध आहे; आणि तत्संबंधानें हक्सरों सर्टिफिकिटें आलीं आहेत व येत आहेत.

मीं हें **माझें टिपण** जरी अतिसंक्षिप्तामध्यें लिहिण्याचा संकल्प केली होता तरी तें मारुतीच्या शेंपटाप्रमाणें वाढतच चाललें. आणखी, तें यदाकदाचित वाचकांस कंटाळवाणेंहि होण्याचा संभव आहे; यासाठीं येथें लेखणीस रजा देण्याच्यापूर्वी **श्रीतुकाराममहाराज** यांच्या वाणीनें अशी लीनतापूर्वक प्रार्थना कारितों कीं:--

**आतां तरी पुढें हाचि उपदेश । नका करूं नाश आयुष्याचा ॥**
**सकळांच्या पायां माझे दंडवत । आपुलालें चित्त शुद्ध करा ॥**
**हित तें करावें देवाचें चिंतन । करूंनियां मन एकविध ॥**
**तुका म्हणे हित होय तो व्यापार । करा काय फार शिकवावें ॥**

समाप्त.